# शारीर तत्त्वदर्शन

[दोष—धातु—मलांचे स्वरूप व कार्य]

***वैद्य श्री. पु. हिर्लेकर***

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# शारीर तत्त्वदर्शन

[दोष–धातु–मलांचे स्वरूप व कार्य]

वैद्य श्री. पु. हिर्लेकर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

प्रथमावृत्ती – एप्रिल, १९८७

प्रकाशक – सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२

© – प्रकाशकाधीन

मुद्रक – सूर्यकांत प्रिंटर्स, गांधी चौक, अमरावती

किंमत – रु. ४२/-

## अनुक्रमणिका

## ऋण—अनुबंध

जन्मास आलेल्या प्राण्यास मरण चुकत नसते आणि आपल्या जीवितावस्थेत त्याला अनेक व्याधींना किंवा रोगांना तोंड पण द्यावे लागते. हे रोग बाहेरच्या परिस्थितीमुळे आणि वातावरणात उत्पन्न होणाऱ्या जंतु, कीटक इत्यादिकांच्या मुळे तर होतातच, पण हवा, ऊन, पाऊस, अन्नातील जीवनोपयोगी द्रव्यांचे कमी अधिक प्रमाण यामुळे पण उत्पन्न होऊ शकतात. अपघात झाल्यामुळेही प्राण्याला इजा होते. या सर्व गोष्टींवर उपाय योजणे ही पण प्राण्यांची प्रवृत्ती असते. हे उपाय प्राण्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीमुळे त्याला नकळत म्हणजे जाणीवेशिवाय होतात किंवा माणसासारख्या उच्च प्राण्यात उत्पन्न होणाऱ्या जाणिवेमुळे, रोगांचे कार्यकारण शोधल्यामुळे होतात. मांजर नेहमीच गवत खात नाही. पण पोट दुखते तेव्हा खाते असे म्हणतात. मांजराचा गवत खाण्याचा उपक्रम हा नैसर्गिक प्रवृत्तीतून उत्पन्न होतो. पण जाणीव असलेले प्राणी आणि माणूस यांच्या जाणीवेतही मोठा फरक आहे. त्यामुळे आपल्या विकासप्रक्रियेत आपल्याला होणाऱ्या व्याधी, रोग आणि अपघात यांवर माणसाने जाणीवपूर्वक उपाय शोधून काढले आहेत. या सर्वांचे जे शास्त्र त्याने बनविले त्याचे नांव आहे वैद्यकशास्त्र. वैद्यकशास्त्राचेही पोटभेद आहेत — रोगनिदान आणि चिकित्सा, औषधी, शल्यनिदान व उपाय. शल्यशास्त्राकरिता शरीराच्या सांगोपांग रचनेचेसुद्धा माणसाला ज्ञान असणे आवश्यक ठरते. शिवाय रोग होऊ नयेत म्हणून रोगप्रतिबंधकांचा विचार पण त्याला करावा लागतो.

हे सर्व करावयास माणसाला शतकानुशतके लागली. माणसाच्या ज्ञानप्रक्रियेचाच हा एक भाग. माणूस आपला अनुभव जसजसा साठवू लागला तसतशी त्याच्या ज्ञानात भर पडू लागली आणि असे अधिक ज्ञान असलेल्यांना तो 'जाणते', 'वैद्य', 'डॉक्टर', 'शल्यचिकित्सक' इत्यादि नांवांनी संबोधू लागला. आजही जाणता हा शब्द ज्याला भूतखेतादि विषयींचे ज्ञान आहे आणि जो भूतबाधेपासून माणसाला मुक्त करू शकतो तो, याच अर्थाने आपण वापरतो. परंतु या सर्व शब्दांचा अर्थ 'शहाणा' एवढाच आहे.

विश्वास आणि श्रद्धा यांवर आधारलेला अनुभव आणि बुद्धी आणि तर्क यांवर आधारलेला अनुभव यांतही आपण हळूहळू फरक करू लागलो. शास्त्र किंवा विज्ञान हे बुद्धीवर आधारलेल्या अनुभवाचे अपत्य होय.

व्याधी किंवा रोग यांच्या पुरताच विचार केला तर, माणसाला हे कळते की काही रोग हे असाध्यच आहेत, म्हणजे त्यांचे पर्यवसान हे मरणातच होते. पण काही रोग कष्टसाध्य आणि काही सुसाध्य असतात. काही सामान्य व्याधी तर काही दिवस प्राण्यांना त्यांची पीडा होत असली तरी काही औषधोपचार न करताही आपोआप नाहीशा होतात. (उदा. सर्दी, पडसे). बाहेरच्या विश्वाचे आक्रमण आपल्यावर जसजसे होत‥.जाते तसतसा आपल्या शरीराचाही प्रतिकार सुरु होतो, आणि व्याधीपासून बरे होणे याचा खरा अर्थ एवढाच आहे की, आपल्या शरीराचे प्रतिकारसामर्थ्य एवढे वाढविणे की त्यामुळे बाहेरचे आक्रमण आपोआप थांबेल. वैद्यकशास्त्रात त्यामुळेच स्वशरीरापासून वेगळे असलेले जंतू, बाहेरचे हवामान आणि शरीराचे प्रतिकारसामर्थ्य यांचा विचार करणे आवश्यक होते. औषध देणे हे एका अर्थाने आपल्या शरीराच्या प्रतिकारसामर्थ्यास मदत करणेच असते. ही मदत दोन प्रकारची असते. आपणांस थंडी बाधली तर आपण आपले अंग शेकतो. म्हणजे आपल्या शरीरातील उष्णतेला आपण बाहेरच्या उष्णतेची मदत देतो. आपल्या शरीरातील एखादे द्रव्य कमी झाले तर आपण ते शरीरास पुरविण्याचा प्रयत्न करीत असतो. पण शरीरास आवश्यक असलेले द्रव्य शरीरात 'ओतल्याने' त्याचा फायदा मिळतोच असे नाही. ते शरीरात एकजीव

अनुक्रमणिका

करण्याचे सामर्थ्यही शरीरात असावे लागते. शरीरास आवश्यक असणारे द्रव्य शरीराशी कसे एकजीव करता येईल हा पण वैद्यकशास्त्रासमोरील महत्त्वाचा प्रश्न आहे. या आणि अशा प्रश्नांतून निरनिराळ्या चिकित्सापद्धती जन्माला आल्या आहेत. आयुर्वेद, युनानी चिकित्सापद्धती, ॲलोपॅथी, ॲक्यूपंक्चर, ॲक्यूप्रेशर इत्यादींचा उपयोग करणारी चिनी चिकित्सापद्धती आणि होमिओपॅथी किंवा सम—चिकित्सा अशा चिकित्सापद्धती यांपैकीच काही होत. अर्थात् या सर्व चिकित्सा-पद्धतींचा प्रस्तुत संदर्भात विचार करण्याचे कारण नाही.

आज भारतात आपली जुनी आयुर्वेद चिकित्सा पद्धती नाहीशी होण्याच्या मार्गावर आहे. कारण विज्ञानाच्या स्फोटाबरोबरच रोगचिकित्सेतसुद्धा एक मोठी क्रांती या ३००/४०० वर्षांत झाली. पदार्थविज्ञानामुळें 'क्ष' किरणांचा शोध लागला, सूक्ष्मदर्शक यंत्रामुळे साध्या डोळ्यांना न दिसणारे मलेरिया, न्यूमोनिया, क्षय, महारोग इत्यादिकांचे जंतू माणसाने शोधून काढले आणि रोगांच्या लसी उत्पन्न केल्या. इंजेक्शनचे आणि शस्त्रक्रियेचे एक नवीन दालनच त्याने उघडले. या क्रांतीमुळे जुनी चिकित्सापद्धती इतिहासजमा होऊ लागली. पण जुन्या चिकित्सेत काही अर्थच नव्हता असे मात्र म्हणता येणार नाही. माझी आई माझ्या लहाणपणी माझे पोट दुखले की, डीकेमाली, सागरगोट्या इत्यादि मला खायला देई, खोकला आला तर मध, हळद, किंवा आडुळशाचा काढा देई. थंडी वाजून ताप आला म्हणजे निर्गुंडीचा पाला घालून उकळलेल्या पाण्याने आंघोळ घाली, व चिराइताचा काढा प्यायला देई. जर कोठे दुखले तर चंद्रज्योतीच्या पाल्याचा शेक देई. आणि कोठे जखम झाली आणि त्यातून रक्तस्त्राव होत राहिला तर कमरमोडीच्या पाल्याचा रस काढून तो त्या जखमेत घाली व त्यामुळे क्षणार्धात तो रक्तस्त्राव बंद होई. आंबेहळद, रक्तचंदन, गव्हला, कचोरा, नागरमोथा, कडुलिंब, मेंदी, परडी, गोखरु, कुडा, अश्वगंधा, सर्पगंधा, कुचला इत्यादि अनेक गोष्टींचा उपाय आरोग्याकरिता कसा होतो हे मी माझ्या आईपासून शिकलो. खरूज, इसब, कावीळ, इत्यादि रोगांकरिता माझ्या लहानपणी आम्हाला कधी डॉक्टर, वैद्याकडे जावे लागले नाही. मंदार (रुई) चे लहानसे कोवळे पान विड्यात घालून दिल्याने मी कित्येकांचा हिवताप बसविला आहे. आमचे घर हे वैद्यांचे घर असल्यामुळे काष्ठऔषधांच्याबरोबरच रसायनांचाही उपयोग आमच्या घरी होत असे. त्यामुळे हेमगर्भ, कालकूट, सहस्त्रपुटी अभ्रक, महायोगीराज गुग्गुळ, मकरध्वज इत्यादिमुळेही काय किमया होते हे पण मी पाहिले आहे. पण केवळ या औषधाचा उपयोग म्हणजेही काही आयुर्वेद नव्हे. या औषधांचा जसा उपयोग होतो तसा होमिओपॅथिक औषधांचाही फार चांगला उपयोग होतो. पण कोणत्याही औषधांचा उपयोग व्हावयाचा असला तरी प्रथमतः रोगनिदान झाले पाहिजे आणि तो रोग, औषध आणि शरीर यांचा परस्परसंबंध प्रस्थापित झाला पाहिजे. वैद्यकशास्त्र हे चिकित्सेचे शास्त्र होय. वैद्यकशास्त्र आणि विज्ञान शेवटी हातात हात घालूनच जातात.

भारतात या वैद्यकाचे एक शास्त्र केले गेले आणि या शास्त्राचा व त्यातील तत्त्वांचा विचार ज्या एका विशिष्ट प्रकारे केला गेला, त्याला आजच्या जगात 'एकदेशी' महत्त्व किती द्यावयाचे हा जरी प्रश्न असला तरी त्याचे ऐतिहासिक महत्त्व वादातीत आहे. हा सर्व विचार टाकाऊ म्हणून फेकून देता येणार नाही. कारण तो माणसाच्या अनुभवाचा भाग आहे, विज्ञानाचा भाग आहे, अंधश्रद्धेचा नाही. सर्व ऐतिहासिक चिकित्सापद्धतींचा उपयोग करून आजची शरीरचिकित्सापद्धती समृद्ध करणे किंवा या सर्वांची मिळून एक चिकित्सासमष्टी उत्पन्न होणे आवश्यक आहे. आपले ज्ञान हे अशा चिकित्सासमन्वयानेच वाढते, यात शंका नाही. त्यामुळेच चरक, सुश्रुत, वाग्भट इत्यादि आपल्या आयुर्वेद–ग्रंथांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या ग्रंथांव्यतिरिक्तही अनेक ग्रंथ आपल्या देशात उत्पन्न झाले. या सर्व ग्रंथांतील विद्या पण आपणास अभ्यास न करिता टाकाऊ ठरविता येणार नाही. त्यांतील टाकाऊ भाग पाखडून बाहेर टाकला पाहिजे आणि उरलेला

भाग हा वापरला पाहिजे. आम्ही प्रसिद्ध करीत असलेला प्रस्तुत ग्रंथ हा आपल्या आयुर्वेदीय विचारांची ओळख करून देणारा ग्रंथ आहे.

आयुर्वेदाच्या मताप्रमाणे साऱ्या व्याधी त्रिदोषांतून उत्पन्न होतात. याशिवाय धातू, मल, वीर्य इत्यादि गोष्टींचा पण आयुर्वेदात विचार आहे. आपले शरीर हे या त्रिदोषांनी 'समवेत' असते. हे तीनही दोष वाढले, एका विशिष्ट प्रमाणाबाहेर गेले म्हणजे सन्निपात होतो, मरण येते. पण सर्व व्याधींमध्ये या दोषांचे प्रमाण कमी अधिक असतेच. हे दोष वात, पित्त आणि कफ या नांवानी प्रसिद्ध आहेत. जुने वैद्य नाडीपरीक्षा करीत असत आणि त्या परिक्षेतही वात, पित्त, कफ यांना महत्त्वाचे स्थान असे. दोष हा शद्ब का वापरण्यात आला असा प्रश्न येथे उपस्थित केला जाऊ शकतो. पण दोष किंवा वात, पित्त, कफ हे पारिभाषिक शद्ब, संज्ञा–शद्ब आहेत. ते एका विशिष्ट अर्थाने वापरले गेले आहेत. आयुर्वेदाच्या मागील तत्त्वज्ञान हे सांख्याचे आहे, असे म्हणतात. सांख्यात प्रकृती आणि गुण असे शद्ब आहेत. प्रकृती त्रिगुणात्मक असते. सत्व, रजस, तम, हे गुण होत. या तीन गुणांच्या कमी अधिक प्रमाणामुळे प्रकृतीचा संसार सुरु होतो. प्रकृतीचे विकृतीत रुपांतर होते. कदाचित या दृष्टांतावरही आयुर्वेदाची उभारणी झाली असेल. पण आयुर्वेदातील दोष हे भावरूप दोष आहेत, ते गुणांचे केवळ अभाववाचक नाहीत, हे पण ध्यानात ठेवले पाहिजे.

वात, पित्त, कफ, हे शद्ब आयुर्वेदीयांनी का वापरले हे सांगणे कठिण आहे. पण सुरुवातीस त्यांच्यासमोर आपल्या अन्ननलिकेचा दृष्टांत नसेलच असे नाही. आपल्या शरीराचा मुख्य भाग जरी मेंदु असला तरी आपले सर्वसामान्य पोषण होते ते अन्नाच्या द्वारे. फुफ्फुस, हृदय, यकृत, प्लीहा इत्यादींवर प्राथमिक परिणाम आपल्या अन्नातून होतो किंवा आपल्याला शीत, उष्ण इत्यादि जे बाधते तेही शरीराच्या सामान्यपणे याच भागात. शिर व हातपाय वगळता जे 'धड' राहते तो गळ्यापासून मांड्यापर्यंतचा शरीराचा मुख्य भाग. याच्या तीन भागांत आपणास अनुक्रमे कफ, पित्त आणि वात ह्या गोष्टी आढळतात. (नाक, गळा आणि) फुफ्फुस या भागांवर जेव्हा थंडी किंवा उष्णतेचा परिणाम होतो तेव्हा तेथे कफ निर्माण होतो. आपण जे निरनिराळे पदार्थ खातो त्यांतील काही कफ उत्पन्नच करणारे असतात. आपण अन्नपचनाचा जेव्हा विचार करतो, तेव्हा आपल्या अन्नात पित्तरस मिसळला जातो तो पोटाच्या मधल्या भागात. या पित्ताचे प्रमाण जर कमी अधिक झाले तर आपल्या प्रकृतीत फरक पडतो, मळमळू लागते, ओकारी होते, लघवी पिवळी होते, इत्यादि. आपल्या पोटाच्या खालच्या भागात वात उत्पन्न होतो. वात म्हणजे वायु. या वायूमुळे गॅसेस होतात किंवा स्तंभ उत्पन्न होतो. मेंदूवर परिणाम होतो. हे जे आपले सामान्य अनुभव, ते गृहीत धरून वैद्यांनी त्यांचे पारिभाषिक शद्ब बनविले, आणि शास्त्रात त्यांचा उपयोग केला. एका रीतीने पाहिले तर आपले जेवढे रोग असतील तेवढेच त्यावरचे उपाय पण असतील. जर आपल्या रोगांचे तीन भागांत वर्गीकरण केले तर आपल्या रोगोपायांचेही तीन भागांत वर्गीकरण करता यावे. जर आपल्या शरीराचे १२ भागांत वर्गीकरण केले तर रोगांचेही १२ भागांत वर्गीकरण करता यावे. आपले शरीर जर पंचमहाभूतांचे बनले असले तर आपले रोग आणि आपली औषधे ही पण पांचच असतील. कारण शरीराला बळकट करणे, शरीराची मूळ प्रकृती उत्पन्न करुन घेणे, म्हणजेच व्याधीवर उपाय करणे होय. ठोकळ मानाने असे आयुर्वेदशास्त्रज्ञांना वाटते, आणि त्यातून आयुर्वेदाची उत्पत्ती आणि वाढ झालेली आहे. दोष, रस, धातू, द्रव्य इत्यादि संकल्पनांचा त्यांनी विचार केलेला आहे.

अमरावतीचे वैद्य पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर हे निष्णात वैद्य म्हणून प्रसिद्ध होते. ते संस्कृतचे पंडित पण होते. त्यांचे चिरंजीव वैद्य श्री. पु. हिर्लेकर हे पण उत्तम वैद्य आणि संस्कृत पंडित आहेत. ते एम. ए. आणि आयुर्वेदाचार्य आहेत. वैद्य पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर यांनी रुग्णांवर केवळ औषधोपचारच केला नाही

अनुक्रमणिका

तर खोलात जाऊन आयुर्वेदात म्हणजे शरीराच्या शास्त्रात मूलग्राही संशोधन पण केले. हे त्यांचे मूळ संशोधन "शारीरं तत्त्वदर्शनम्" या नावांने प्रसिद्ध आहे. याच ग्रंथाचा सटीप अनुवाद त्यांचे पुत्र श्री. श्री. पु. हिर्लेकर यांनी 'शारीर तत्त्वदर्शन' या नांवाने मराठीत केला आहे. या ग्रंथाचे ऐतिहासिक महत्त्व तर आहेच पण शरीरशास्त्र समजण्याकरिताही त्याचा फार मोठा उपयोग होईल. शरीर याचा अर्थ आत्मा असाही आहे. पण या प्रश्नाच्या संबंधात शारीर याचा अर्थ शरीरविषयक असाच घ्यावा लागेल. श्री. हिर्लेकर यांनी हा ग्रंथ मराठीत आणून मराठी लोकांवर अनन्य उपकार केले आहेत. आयुर्वेदाच्या संशोधकांवरही त्यांचे फार मोठे उपकार आहेत.

माझी श्री. हिर्लेकर यांची अमरावतीस भेट झाली, त्यांचे हे पुस्तक त्यांनी मला दाखविले, आणि साहित्य संस्कृती मंडळाकडून ते प्रसिद्ध करण्याची मला विनंती केली. त्यांची विनंती अमान्य करण्याचा प्रश्नच नव्हता. कारण साहित्य संस्कृती मंडळाचा जन्मच अशी पुस्तके प्रसिद्ध करून आपल्या पूर्वजांचा ठेवा आजच्या पिढीस उपलब्ध करून देण्यासाठी आहे. हा ग्रंथ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचा मी अध्यक्ष असतांना प्रसिद्ध होत आहे हे मी माझे भाग्य समजतो. माझ्या या प्रास्ताविकास मी ऋण—अनुबंध म्हणतो. कारण आपल्या पूर्वजांचा अनुभव आजच्या पिढीपर्यंत पोचविणे हे ऋषिऋण असे मी समजतो.

४२ यशोधन,
मुंबई ४०००२०
९ एप्रिल १९८७.

**सुरेन्द्र बारलिंगे**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

अनुक्रमणिका

# शारीर तत्त्वदर्शन

## (दोष - धातु - मलांचे स्वरूप व कार्य)

वैद्यभूषण **पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर कृत**
शारीरं तत्त्वदर्शनं नाम वातादिदोषविज्ञानम्
या संस्कृत ग्रंथाचा मराठी अनुवाद

— अनुवाद —
**वैद्य श्री. पु. हिर्लेकर**
एम्. ए., आयुर्वेदाचार्य,
अमरावती.

अनुक्रमणिका

# निवेदन

वैद्यभूषण प्राणाचार्य पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर, **आयुर्वेद–बृहस्पती** यांच्या **शारीरं तत्त्वदर्शनं नाम वातादिदोषविज्ञानम्** या संस्कृत ग्रंथाचा हा मराठी अनुवाद आहे.

अखिल भारतातील आयुर्वेदतज्ज्ञांनी प्रशंसिलेला हा ग्रंथ १९४२ साली प्रकाशित झाला. तत्पूर्वी १९३२ साली ग्रंथातील पूर्वार्ध केवळ श्लोकस्वरूपात दिल्ली येथून प्रकाशित होणाऱ्या आयुर्वेदमहासंमेलन–पत्रिकेतून प्रसिद्ध झाला होता.

वैद्य हरिहर वामन देशपांडे, वाङ्मयविशारद, अमरावती, यांनी केलेला हिंदी अनुवाद मूळ ग्रंथाबरोबरच प्रसिद्ध करण्यात आला होता. वैद्य के. कृष्णभट्ट शिरोमणी, निरचल, यांनी केलेला त्याचा कन्नडभाषानुवाद १९६४ साली प्रसिद्ध झाला. त्याच्या इंग्रजी अनुवादाचाही उपक्रम पूर्वी झाला होता पण तो पूर्णतेस गेला नाही. मात्र अलीकडेच नासिकचे डॉ. चिं. ब. खाडिलकर यांनी ग्रंथाचा संपूर्ण इंग्रजी अनुवाद तयार केला आहे. अद्यापि तो प्रकाशित झाला नाही. मराठी अनुवादापैकी काही अंश पनवेल येथून प्रसिद्ध होणाऱ्या आरोग्य–मंदिर मासिकातून जुलै १९५४ ते जुलै १९५६ या अवधीत प्रसिद्ध झाला होता. आता तो संपूर्णतया ग्रंथरूपाने प्रसिद्ध होत आहे.

१९५२ साली झांशी आयुर्वेद विश्वविद्यालयाकडून याच ग्रंथाच्या आधारे मूळ ग्रंथलेखकास आयुर्वेद–बृहस्पती (डॉक्टर ऑफ् सायन्स इन् आयुर्वेद) ही उपाधी प्रदान करण्यात आली.

दिल्ली येथील निखिलभारतवर्षीय आयुर्वेद विद्यापीठाकडून प्रस्तुत ग्रंथ त्रिदोषविषयाच्या अध्ययनार्थ संदर्भ–ग्रंथ म्हणून पूर्वीच स्वीकारण्यात आला होता. दिल्ली येथील केन्द्रीय शुद्धायुर्वेद पाठ्यक्रम समिती कडूनही या ग्रंथाला शरीरक्रियाविज्ञान या विषयासाठी एक आधारग्रंथ म्हणून अलीकडे मान्यता देण्यात आली आहे.

मूळ ग्रंथ हा गद्यपद्यात्मक म्हणजे मूळ पद्य वत्यांवर विवरणात्मक गद्य टीका अशा स्वरूपाचा असल्याने शब्दशः अनुवाद करणे हे धोरण स्वीकारलेले नाही.

मूळ ग्रंथातील संस्कृत श्लोक स्वतंत्रतया सलग उद्धृत केले आहेतच. तथापि, मूळ ग्रंथाची अपेक्षा न ठेवता केवळ भाषांतर वाचणारांना ग्रंथकर्त्याचा अभिप्रायच मराठी भाषेतून यावत्शक्य सुबोध, सलग व अविकृत स्वरूपात विशद व्हावा, ही या अनुवादातील भूमिका आहे.

अर्थात्, श्लोकांचा अनुक्रम न देणे, विवेचनाच्या ओघात उपस्थित झालेल्या उपप्रश्नांचा समावेश टीपांत करणे, अनुवाद हा मूळ श्लोक त्यांवरील टीका या दोघांचाही मिळून असल्याने काही शब्द वा शब्दसंहती वगळणे, उत्तरार्ध दर्शन १ ते १२ यांना अनुक्रमे १३ ते २४ हे क्रमांक देणे इत्यादींचा अवलंब करावा लागला.

पूर्वार्ध दर्शन ६ श्लोक १, २ वरील टीकेतील मजकुराचा अनुवाद पूर्वार्ध दर्शन २ श्लोक २१ वरील टीकेतील मजकुराच्या अनुवादात समाविष्ट केला आहे. तसेच दर्शन ६ श्लोक १ ते ४ यांचा अनुवाद सहाव्या

अनुक्रमणिका

प्रकरणाच्या आरंभी देण्याऐवजी पांचव्या प्रकरणाच्या शेवटी दिला आहे. अनुवादाच्या उपयुक्त भूमिकेला अनुसरूनच हे फरक केले आहेत.

परंतु, असे असले तरी कुठेही स्वतःच्या पदरचे अधिक विवेचन अथवा स्पष्टीकरण बुद्ध्याच केलेले नाही. कारण, हे भाषांतर आहे, भाष्य नव्हे. टीपांतील मजकूरही स्वतंत्र नसून अनुवादरूपच आहे.

प्रतिपाद्य विषयाची थोडक्यात पण विभागशः कल्पना यावी या हेतूने अनुवाद–ग्रंथाच्या शेवटी संपूर्ण ग्रंथातील एकूण विवेचनाचा प्रकरणशः निष्कर्ष दिला आहे. तो कशाचा अनुवाद नसला तरी त्यात वैचारिक स्वातंत्र्य नाही हे उघड होय.

– o –

अनुक्रमणिका

# अनुक्रम


ऋण—अनुबंध ........ ४

निवेदन ........ ९

पूर्वार्ध ........ १६

दर्शन—१ दोष, धातू व मल—संज्ञानिर्णय ........ १६

दर्शन २— दोषादींचे स्वरूप ........ २१

दर्शन ३— वातादींचे विशिष्ट स्वरूप, कर्मे, व संज्ञा ........ २८

दर्शन ४ — शारीरधातूंची उत्पत्ती ........ ३५

दर्शन ५ — शारीर द्रव्यांचे सामर्थ्य ........ ४०

दर्शन ६—शरीराची समुदायात्मकता ........ ४९

दर्शन ७ — शारीर धातूंचे सामर्थ्यविशेष ........ ५३

दर्शन ८—शारीरद्रव्यांचे गुणविशेष ........ ५७

दर्शन ९ — गुणांचे स्वरूपविशेष ........ ६०

दर्शन १०—त्रिदोषांचे गुणसमुदायत्व ........ ६४

दर्शन ११—त्रिदोषांचे सामर्थ्यविशेष ........ ७०

दर्शन१२— वातादींचे “दोष”त्व ........ ७४

सारांश (पूर्वार्ध) ........ ७७

उत्तरार्ध ........ ७८

दर्शन १३— दोषगुणांची आश्रयस्थाने ........ ७८

उत्तरार्ध ........ ८७

दर्शन १४— दोषांचे भेद व त्यांची कार्ये ........ ८७

दर्शन १५—शरीरकर्मांचे दोषानुसारी त्रैविध्य ........ ९४

दर्शन १६—शारीरिक कर्मांतील त्रिविध विकृती ........ १०४

दर्शन १७—दोषकोपोद्भव विविध विकार व त्यांचे स्वरूप ........ ११३

दर्शन १८—विविध विकारांचे शूलदाहशोथात्मक त्रैविध्य ........ १२५

दर्शन १९ — दोषांचे संसर्ग आणि सन्निपात ........ १३६


अनुक्रमणिका

दर्शन—२० विशिष्ट विकारातील अन्य दोषांचा संबंध ........ १४०

दर्शन २१—चिकित्सेतील दोषानुबंध ........ १४७

दर्शन २२ — विशिष्ट चिकित्सेतील वातादींचा अनुबंध ........ १५७

दर्शन२३— द्रव्यगुणवर्णनातील दोषानुबंध ........ १६१

दर्शन २४ — त्रिदोषाविज्ञानातील विज्ञेय विषयांचे दिग्दर्शन ........ १७०

सारांश (उत्तरार्ध) ........ १८५

उपसंहार ........ १८६

निष्कर्ष ........ १८७

परिशिष्ट ........ २०६

शारीरं तत्त्वदर्शनम नाम वातादिदोषविज्ञानम् (मूलसंहिता) ........ २०६

मूलग्रंथानुक्रमः ........ २०७

अनुक्रमणिका

## स म र्प ण



**वैद्यभूषण प्राणाचार्य पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर, आयुर्वेद–बृहस्पती**

श्रीमतां तातपादानां **पुरुषोत्तमशर्मणाम्** ।
उपहारस्वरूपेयं गुरूणां पादयोः कृतिः ॥

अनुक्रमणिका

# शारीर तत्त्वदर्शन

नमामि कनकादित्यं गुरुं तातं तथैव च

**पुरुषोत्तमशर्माणं** भिषग्विद्याप्रबोधकम् ॥

**प्रास्ताविक**

वायू, पित्त आणि कफ हेच देहोत्पत्तीला हेतुभूत असून अविकृत स्थितीत तेच शरीराचे धारण करतात. शरीरमूलक अशा या त्रिदोषांचे स्वरूप, रुक्षस्निग्धादि कर्मसाधक गुण आणि श्वसन, पचन, संश्लेषण इत्यादि कार्ये यांविषयी आयुर्वेदाचा वास्तविक अभिप्राय चरकादि ग्रंथांच्या वचनाधारेच यथावत् परिचित व्हावा, हाच **शारीर तत्त्वदर्शन** या ग्रंथाच्या प्रवृत्तीतील उद्देश आहे.

धर्म, अर्थ काम आणि मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थाला शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य साधनीभूत असून हे स्वास्थ्यसाधन आयुर्वेदाने साधते. आयुर्वेदाच्या अध्ययनाने स्वास्थ्यसंरक्षण व व्याधिविनाश यां दोनही गोष्टी साधतात. स्वास्थ्याचे पालन केल्याने रोगपरिहार आपोआपच होतो मग स्वास्थ्यसंरक्षण आणि व्याधिविनाश असे द्विविध साध्य सांगण्यात प्रयोजन कोणते, अशी शंका येथे उपस्थित होण्यासारखी आहे. परंतु, हितकारक आहारविहारादिकांनी स्वास्थ्याचे पालन करणारांनाही जल, वायू, काल इत्यादींच्या वैषम्यामुळे उद्भवणारे विकार टाळता येत नाहीत, आणि निर्धनांनाच नव्हे तर धनिकांनाही स्वास्थसंरक्षणाचे नियम पाळणे सर्वदा शक्य होत नाही, ही वस्तुस्थिती विचारात घेतली म्हणजे स्वास्थ्यसंरक्षणाबरोबरच व्याधिविनाशाचाही निर्देश करण्यात अन्वर्थकता असल्याचे दिसून येईल.

श्वसन, उत्सर्जन आदि नैसर्गिक व आहारादिकांच्या हीन, मिथ्या व अतियोगाने उत्पन्न होणाऱ्या विषम, अशा सर्व क्रियांचे वर्णन, तसेच ज्वर, अतिसार, गुल्म आदि नानाविध व्याधींची उत्पत्ती, त्यांचा प्रसार, रोगप्रशमनार्थ सांगण्यात आलेले दीपनपाचनादि चिकित्साविशेष, या सर्वांचे विवरण आयुर्वेदात वातादि त्रिदोषांना अनुसरूनच करण्यात आले आहे. रोगप्रतीकारार्थ योजण्याच्या औषधांचे रुक्ष, स्निग्ध, उष्ण, शीत आदि गुण, वमन, विरेचन, स्वेदन, स्तंभन आदि कार्ये, तसेच आहार्य द्रव्यांचे रस, वीर्य, विपाक [रसवीर्यविपाकांबरोबर या ठिकाणी प्रभावाचा उल्लेख जाणूनच केला नाही. विशिष्ट द्रव्यांच्या शरीरातील विशिष्ट स्थानावर होणाऱ्या कर्माला 'प्रभाव' ही संज्ञा असून रसरक्तादि धातूंचे व हृदय, फुफ्फुस आदि अवयवांचे स्वभावानुकूल संवर्धन करणाऱ्या द्रव्यांना आहार्य द्रव्ये म्हणून संबोधण्यात येते. अशा द्रव्यांचा उल्लेख आयुर्वेदात 'स्वस्थहित' या संज्ञेने केला आहे. जी द्रव्ये स्वस्थहित नसतात त्यांचा शरीरातील विशिष्ट स्थानावर होणारा परिणाम अथवा प्रभाव दोन प्रकारांनी होत असतो. काही द्रव्ये दोषांचा प्रकोप करतात तर काही दोषांचे शमन करतात. आणि तदनुसार त्यांचा प्रकोपण द्रव्ये व शमन द्रव्ये असा निर्देश करण्यात आला आहे. आहार्य द्रव्ये मात्र प्रकोपण द्रव्ये नव्हेत अथवा शमन द्रव्येही नव्हेत. त्यांच्यात प्रभावाचा अभावाचा अभाव असतो.] या संबंधीचे विवेचनही दोषानुरोधानेच केलेले आहे.

एवं च, स्वस्थातुरविषयक सर्व विवेचन आयुर्वेदात वायू, पित्त व कफ यांना अनुसरूनच करण्यात आले असल्याने स्वास्थ्यसंरक्षण व व्याधिविनाश साधण्याविषयी प्रयत्नशील असणाऱ्या चिकित्सकांना त्रिदोषांचे सम्यक् ज्ञान होणे अत्यंत अवश्य होय.

हे ज्ञान करून घ्यावयाचे म्हणजे वातादि दोष हे स्थूल आहेत की सूक्ष्म, द्रव्यरूप आहेत की गुणरूप आहेत, त्यांच्या स्निग्धशीतादि गुणांचे आणि श्वसनपचनादि कर्मांचे स्वरूप काय आहे, ते शरीरातील

अनुक्रमणिका

कोणत्या स्थानात कशाप्रकारे राहतात, शारीरिक क्रियांचे कर्तृत्व त्यांच्याकडे कसे असते, त्यांच्यामुळे शरीरधारणा कशी होते, ते कुपित झाले म्हणजे विविध विकार कसे उत्पन्न होतात आणि त्यांच्याच अनुरोधाने विविध रोगांचा परिहार कसा होतो, इत्यादि सर्व जाणून घेतले पाहिजे.

वातादि दोष हे आयुर्वेदाला तत्त्वस्वरूप होत. त्यांचे याप्रमाणे यावच्छक्य संपूर्ण व निःसंदिग्ध ज्ञान प्रथम होणे आवश्यक होय. स्वस्थातुरांच्या हितसाधनार्थ प्रवृत्त झालेल्या आयुर्वेदशास्त्राचे हृद्‌गत यथावत् स्वरूपात आकलन होणे त्याविना शक्य नाही.

अनुक्रमणिका

# पूर्वार्ध

## दर्शन–१ दोष, धातू व मल–संज्ञानिर्णय

स्वस्थ आणि आतुर यांच्या हितासाठी साधनीभूत असणाऱ्या आयुर्वेदाचे यथार्थ ज्ञान व्हावे याकरिता त्रिदोषविज्ञानाची आवश्यकता या प्रकारे निश्चित झाल्यावर शरीराच्या मूलभूत तत्त्वांचे विवरण प्रथम करणे क्रमप्राप्तच होय. शरीरात एकूण मूलद्रव्ये किती व कोणती आहेत, शरीराचे अंगोपांगादि विभाग किती व कोणते आहेत, त्यांची मूलद्रव्ये कोणती आहेत, इत्यादि विवेचन शारीरविज्ञानात अवश्य असते. शरीराची मुख्य उपादान द्रव्ये दोष, धातू आणि मल ही असून निरनिराळी अंगोपांगे आणि विभाग म्हणजे या तिघांचाच विस्तार होय असा आयुर्वेदाचा अभिप्राय आहे. शरीर म्हणजे या मूलद्रव्यांपासून उत्पन्न झालेली एक समुदायस्वरूप वस्तू होय. सुवर्णाच्या अभावी जसा सुवर्णमय अलंकार संभवत नाही तसेच दोषधातुमलांच्या अभावी शरीरेही संभवत नाही व म्हणून ते दोषधातुमलमय होय, असे शारीरशास्त्रवेत्त्यांचे म्हणणे आहे.

सृष्टीतील यच्चयावत् वस्तूंचे उपादानकारण पंचमहाभूतेच होत आणि शरीराची उत्पत्तीही चेतनेसहित पंचमहाभूतांपासूनच होते असे पदार्थवेत्ते व शारीरशास्त्रज्ञ सांगतात. पांच महाभूते आणि सहावी चेतना यांच्या समुदायालाच पुरुष ही संज्ञा आहे, असा उल्लेख चरकसंहितेत आढळतो ['खादयः चेतना षष्ठा धातवः पुरुषः स्मृतः' – च. सं.]. असे असता शरीराचे मूलघटक म्हणून दोषधातुमलांचाच निर्देश का करण्यात यावा ही शंका येणे अस्वाभाविक नाही. परंतु, प्रत्येक सृष्ट वस्तू पंचमहाभूतांपासूनच जरी उत्पन्न होत असली तरी त्या वस्तूची विशिष्ट नामरूपात्मक अभिव्यक्ती पंचमहाभूतांच्या विशिष्ट विकारांमुळेच होत असल्याने हे विकार म्हणजेच वस्तुतः त्या द्रव्यांचे उपादान होत. शरीर हाही एक पंचभूतविकारांचा समुदाय असून ['तत्र शरीरं नाम चेतनाधिष्ठानभूतं पंचभूतविकारसमुदायात्मकम्' – च. सं.] त्याच्या उत्पत्तीला हेतुभूत होणाऱ्या या पंचभूतविकारांनाच आयुर्वेदात दोष, धातू आणि मल या संज्ञा योजिल्या आहेत. "दोषधातुमलमूलं हि शरीरम्" [सुश्रुत–संहिता.] हा सिद्धांतही याच अभिप्रायाला अनुलक्षून सांगण्यात आला आहे.

हात, पाय, मस्तक, नाक, कान, डोळे आदि विविध अंगोपांगे, आमाशयादि सात आशय, त्वचा, कला, स्नायू, धमन्या, स्रोतसे इत्यादि विविध वस्तू शरीरात असल्या तरी त्या सर्वांची, इतकेच नव्हे तर शरीरातील प्रत्येक सूक्ष्मातिसूक्ष्म परमाणुस्वरूप [परमाणू म्हणजे नैय्यायिकांचे नित्य स्वरूपातील द्रव्य येथे अभिप्रेत नाही. शरीरातील सूक्ष्मातिसूक्ष्म अवयव या ठिकाणी विवक्षित आहे. कारण हे शारीर परमाणू सूक्ष्म असतांही त्यात उत्पत्तिविनाशात्मक क्रिया अविरत चालू असते.] अशा अवयवांचीहीं मूलद्रव्ये दोष, धातू आणि मल हीच होत. या तिघांतच शरीरातील प्रत्येक अवयवाचे वर्गीकरण होऊ शकते. अर्थात् शरीरातील प्रत्येक अवयवात त्यांचे अस्तित्व सर्वत्र आणि सतत असते हे उघड होय. दोष, धातू व मल सर्वशरीरव्यापी असतात व शरीर तन्मूलक होय, ["दोषधातुमला मूलं सदा देहस्य" । "ते व्यापिनः" । अ. हृ.] असे सांगण्यातील अभिप्राय हाच आहे.

### दोष–धातू–मल

शरीराला बिघडविणारे अथवा शरीराच्या स्वाभाविक क्रियांत वैषम्य उत्पन्न करणारे ते दोष; आकृती, क्रिया यांच्या द्वारे शरीराचे जे धारण करतात ते धातू आणि शारीर द्रव्यांना मलिन किंवा सत्त्वहीन करतात ते मल, हा दोष, धातू व मल या शब्दांचा धात्वर्थ. शरीरदूषण हेच दोषांचे मुख्य कार्य आहे, रसादि धातू हेच शरीराचे प्रमुख धारक होत आणि मलिनीकरणाहून मलांचे शरीरात अन्य महत्त्वाचे कार्य नाही,

अनुक्रमणिका

असा अभिप्राय त्यावरून व्यक्त होतो. परंतु, तो आयुर्वेदाला अभिप्रेत नाही. दोषादि शद्बांचा असा अभिप्राय स्वीकारणे म्हणजे विपर्यास करणेच होय.

वायू, पित्त आणि कफ हे तीन दोष अविकृत म्हणजे स्वाभाविक अवस्थेत शरीराची जीवनयात्रा चालवितात आणि तेच विकृत झाले की नानाविध व्याधी उत्पन्न करून शरीराला मारक ठरतात, असे त्यांचे वर्णन आहे ['वायुः पित्तं कफश्चेति त्रयो दोषाः समासतः विकृताविकृता देहं घ्नन्ति ते वर्तयंति च' – अ. हृ.]. अर्थात् शरीरदूषण हेच केवळ वातादींचे कार्य नाही. जे दोष विकृतावस्थेत शरीरदूषक ठरतात तेच अविकृतावस्थेत देहधारक असतात. "वातपित्तश्लेष्माण एव देहसंभवहेतवः तैरेवाव्यापन्नैः शरीरमिदं धार्यते" असे म्हणूनच सुश्रुतसंहितेत म्हटले आहे. दोषधातुमलांत तुलनेने दोषांनाच प्राधान्य असल्याचेही यावरून स्पष्ट होते. कारण ते अव्यापन्न म्हणजे अविकृत असण्यावर देहधारणा अवलंबून असते.

दोषांप्रमाणेच मलांचेही केवळ मलिनीकरण इतके कार्य नाही. अवष्टंभादि कार्यांच्या द्वारे तेही शरीरधारणेचे कार्य करतात. अवष्टंभ म्हणजे संरक्षक आवेष्टन. शरीरातील धातूंचे झिजकट अंश म्हणजे हे मलसंज्ञक पदार्थ होत. हे निःसत्त्व अंश धातूंच्याच उपयुक्त अंशांना वेष्टून राहतात. त्यांच्या या संरक्षक आवेष्टनाखाली सुरक्षित असलेल्या उपयुक्त धात्वंशांत वृद्धिक्षयात्मक कार्य निर्वेधपणे चालू असते. शरीराच्या सूक्ष्म घटकात अविरत सुरु असणाऱ्या उत्पत्तिविनाशात्मक कार्याला अश्या रीतीने एकप्रकारे संरक्षण देण्याच्या मलांच्या या विशिष्ट धर्मामुळेच त्यांना देहधारक मानण्यात आले आहे. विकृतावस्थेत हेच मल उपयुक्त धात्वंशांना मलिन करतात. अविकृतावस्थेत मात्र अवष्टंभादि क्रियांच्या योगाने ते देहधारक होतात.

दोषधातुमलांत याप्रमाणे देहधारण हे कार्य साधारण असल्याने त्या तिघांचाही निर्देश धातू या एकाच संज्ञेने करता येईल. तथापि, शरीर म्हणजे दोष, धातू व मल. त्यांच्याविना ते संभवतही नाही, तेव्हा दोषादि शरीराचे धारण करतात म्हणजे एकमेकांचे धारण करतात, असा यातील वास्तविक अभिप्राय असून त्या दृष्टीने धातू ही संज्ञा सर्वांची वाचकही होऊ शकते.

परंतु, हे धातुत्व अथवा देहधारकत्व सामान्य असताही धारकांपैकी प्रत्येकाच्या स्वरूपगुणकर्मांतील वैशिष्ट्याचा बोध व्हावा म्हणून दोष, धातू व मल अशा भिन्न संज्ञा कल्पिण्यात आल्या आहेत. किंबहुना, दोषादींचा पृथक् निर्देश हा स्वरूपगुणकर्मशः त्यांच्यात भेद असल्याचाच स्पष्टपणे सूचक आहे असेही म्हणता येईल. कारण सामर्थ्य, स्वरूप इत्यादि बाबतीत विविध पदार्थांत भिन्नता नसती तर त्यांच्या भिन्न भिन्न संज्ञाही संभवल्या नसत्या. जीवनाधारकत्व सामान्य असताही रसविक्षेपण, हे हृदयाचे, भुक्ताहारपचन हे उदराचे व संज्ञाविवेचन हे मस्तिष्काचे, हा कर्मभेद आणि तदनुसार स्वरूपभेदही हृदय, उदर, मस्तिष्क इत्यादि शारीर अवयवांत दिसून येतो. देहधारणेचे एकच कार्य करणाऱ्या दोषधातुमलांतही तद्वतच भिन्नता असून तद्वत् कर्मस्वरूपाचा बोध होईल अशाच संज्ञांनी त्यांचा व्यवहार करणे योग्य होय.

**धारणात धातवः**

धारण हेच धातूंचे प्रधान कर्म. "धारणात धातवः" अशी व्युत्पत्तीच आहे. आणि धातू या संज्ञेने शरीरात मुख्यतः रसरक्तादींचाच निर्देश करण्यात आला आहे, दोषमलांचा नव्हे. यावरून वातादिदोषांहून रसादि धातूच श्रेष्ठ होत, असे व्युत्पत्यनुसार उपपन्न होते. परंतु, शारीरद्रव्यांचे म्हणजेच रसादि धातूंचे

अनुक्रमणिका

संवर्धन करणारे आणि शरीराची जीवनयात्रा चालविणारे सर्व क्रियांचे कारक म्हणून वातादि दोषांचा उल्लेख करण्यात आला आहे, रसादि धातूंचा नव्हे. अशा स्थितीत देहधारणेच्या कामी प्राधान्य कुणाला हे निर्णीत होण्यासाठी शरीरधारणेची ही क्रिया कशा प्रकारे चालते हे पाहणे साहाय्यक होऊ शकेल. कर्माचे स्वरूप निर्णीत झाले की, कार्याविषयी निर्णय होणारच.

धातू व मल यांच्यापेक्षा वातादि दोष ही तुलनेने विशेषसामर्थ्यसंपन्न अशी द्रव्ये असून शरीरातील सर्व अवयवांच्या स्वाभाविक क्रियांचे कर्तृत्व त्यांच्याकडेच असते. उलटपक्षी रस, रक्त, मांस, मेद, अस्थी, मज्जा व शुक्र ही सात धातुसंज्ञक द्रव्ये आपल्या विशिष्ट द्रव्यरूपाने शरीराच्या आकाराचे धारण करतात. धातूंमुळे शरीराला विशिष्ट आकृतिमत्त्व प्राप्त होते आणि त्यात ज्या विविध क्रिया सुरु असतात त्या वातादि दोषांमुळे घडून येतात.

सृष्टीतील प्रत्येक पदार्थाचे, [या ठिकाणी "पदार्थ" ही संज्ञा विशिष्ट आकृती आणि क्रिया यांनी युक्त असलेली सृष्ट वस्तू या अर्थाने योजिली आहे. ती न्यायादि शास्त्रात सांगितलेल्या सप्तपदार्थांपैकी एखाद्याची वाचक नाही. द्रव्य, गुण, कर्म आदि पदार्थांत संख्याभेद आहे. उदाहरणार्थ, द्रव्ये ९, गुण २४ तर कर्मे ५. प्रस्तुत "पदार्थात" असा प्रकार नाही. वस्तुतः व्यवहारात सृष्ट वस्तूचा निर्देश पदार्थ या शब्दाने करण्यात येतोच. पदाचा म्हणजेच शब्दाचा जो अर्थ तो पदार्थ. मनुष्य, अश्व इत्यादि शब्दांतील अभिप्राय विशिष्टाकृतिधारी अश्वनरादि वस्तूंच्या सम्यक् ज्ञानानेच प्रतीत होत असतो. तथापि, न्यायादिशास्त्रांतील व्यवहारामुळे "पदार्थ" या शब्दाच्या अर्थाविषयी संदिग्धता न राहावी यासाठी पदार्थ म्हणजे सृष्ट वस्तू हा संकेत आयुर्वेदीय व्यवहारात ध्यानी असणे अवश्य होय.] प्रमुख विभाग दोन संभवतात – (१) द्रव्य व (२) शक्ती. त्यांपैकी वस्तूचे विशिष्ट आकृतिमत्त्व द्रव्यामुळे उत्पन्न होते व तीत क्रियाकारिता शक्तीमुळे निर्माण होते. द्रव्य हे पदार्थमात्रांचे आकृतिरूपाने धारक असले तरी त्या पदार्थांचे सचेतनत्व क्रियारूपच असते. ही क्रियात्मकता शक्तिजनित असते आणि तिच्या अभावी हात, पाय इत्यादि अवयव असताही शरीरात जीवभावच मानण्यात येतो. तात्पर्य, द्रव्य आणि शक्ती या दोघांत शक्तीच श्रेष्ठ होय. ती [या ठिकाणीही "अस्मात् पदादयमर्थो बोद्धव्य इति ईश्वरसंकेतः शक्तिः" ही न्यायादिशास्त्रप्रतिपादित शक्तिशब्दाची व्याख्या अभिप्रेत नाही. आयुर्वेदात शक्ती या शब्दाने वीर्यवाचक गुणांचे ग्रहण केले जाते. वीर्य म्हणजे क्रियाकारी सामर्थ्य, असा चरक–सुश्रुतांचा अभिप्राय आहे. मृदु, तीक्ष्ण, गुरु, लघु, स्निग्ध, रूक्ष, उष्ण, शीत, याप्रमाणे वीर्य अष्टविध असते, असे चरकसंहितेत सांगितले आहे, ("मृदुतीक्ष्णगुरुलघुस्निग्धरूक्षोष्णशीतलं वीर्यमष्टविधम् ।") तर आठ गुणांनाच वीर्य ही संज्ञा आहे असा उल्लेख सुश्रुत–संहितेत केलेला आहे. ("वीर्यसंज्ञा गुणा येऽष्टौ") वीर्यासंबंधी विवेचन करताना डल्हणांनीही वीर्य, शक्ती, उत्पत्तिविशेष, सामर्थ्य, प्रभाव, हे पर्यायशब्द होत, असा अभिप्राय प्रकट केला आहे ("वीर्यं शक्तिः उत्पत्तिविशेषः सामर्थ्यं प्रभावः इत्यनर्थान्तरम्" सु. सं. व्याख्या)] द्रव्याच्या आश्रयाने राहते.

द्रव्य हे विशिष्ट आकार, क्रिया व अभिधान यांचे धारक असते. रसरक्तादि सप्त द्रव्यांना योजिलेली धातू ही संज्ञा तदनुसार योग्यच आहे. 'धा' या धातूचे अर्थ धारण व पोषण असे दोन सांगितले आहेत ["डुधाञ् धारणपोषणयोः" सि. कौ.]. धारण म्हणजे अभिवहन व पोषण म्हणजे संवर्धन या दोघात थोडा भेद आहे. धुरंधर हा शब्द जसा अश्वादिकांचा वाचक आहे तसाच विशिष्ट कार्याचा भार धारण करणारे पुरुष असाही अभिप्राय त्यातून व्यक्त केला जातो. अश्वादिकांच्या संबंधात धुरा धारण करणे म्हणजे वहन करणे असा आशय असतो तर पुरुषांच्या बाबतीत कार्याची धुरा धारण करणे म्हणजे कार्याला पोषक होणे असा अभिप्राय असतो. शरीरधारणकर्मातही पोषण व अभिवहन या भेदांनी भिन्नरूपता संभवते. रसरक्तादि धातू अभिवहनरूपाने शरीराचे धारण करतात तर वातादि दोष पोषक स्वरूपात शरीराला धारक होतात.

रसरक्तादि धातू म्हणजे शरीरातील धारक द्रव्ये असून त्यांच्याहून सूक्ष्म पण क्रियाकारी असे वातपित्तकफ त्यांच्याच आश्रयाने राहत असतात. हे वातादि धारक नाहीत कारण धारण किंवा अभिवहन हे त्यांचे कार्य नाही. ते कारक आहेत. कारण ते शक्तिस्वरूप होत. एखादा स्थूलाकार स्तंभ घराचा भार धारण करताना दिसत असला तरी ज्याप्रमाणे तदन्तर्गत विशिष्ट सामर्थ्याच्या योगानेच तो भार सहन करू शकतो आणि ते सामर्थ्य क्षीण झाले की भार सहन न होऊन भंग पावतो त्याचप्रमाणे रसादि धातू सुद्धा

अंतर्निष्ठ सामर्थ्याच्या अभावी आपापली कर्मे करण्यात असमर्थ होऊन नाश पावतात. वातादि दोष धारक असतात याचा अर्थ ते कारक अथवा क्रियाकारी असतात इतकाच. रसादिकांप्रमाणे त्यांचे धारकत्व अभिवहनस्वरूप नसते.

**भिन्न संज्ञाच योग्य**

अशा या वातादींना “धातु” म्हणून संबोधले तर त्यांचे शक्तिस्वरूप व कर्तृत्व यांचा यथावत् बोध होणार नाही. तो व्हावयास हवा असेल तर “धातु” या व्यापक संज्ञेने त्यांचा निर्देश न करणेच इष्ट. वातादि, रसादि व शकृदादि या सर्वांत देहमूलकत्व सामान्य असल्याने “धातु” या एकाच संज्ञेने त्यांचा निर्देश करता येईलही. परंतु, त्यांच्यातील वैशिष्ट्य अथवा भिन्नता मात्र त्यामुळे स्पष्ट होणार नाही. त्यासाठी भिन्न संज्ञा योजणेच योग्य होय.

दोष, धातु व मल या अश्याच प्रकारे योजलेल्या संज्ञा आहेत. त्या धात्वर्थानुसारी नसून विवक्षित अभिप्रायांच्या वाचक आहेत. आयुर्वेदशास्त्राच्या त्या स्वसंज्ञा होत. ‘स्वसंज्ञा’ म्हणजे विशिष्ट अभिप्रायानुसार योजिलेली संज्ञा “अन्यशास्त्रासामान्या स्वसंज्ञा” असे सुश्रुतसंहितेत सांगितले असून अन्य म्हणजे आयुर्वेदेतर व्याकरणादि शास्त्रात या विवक्षित अभिप्रायाची वाचक म्हणून प्रचलित नसलेली आणि स्वशास्त्रातच चरितार्थ ठरणारी अशी संज्ञा, असे त्याचे स्पष्टीकरण टीकाकार डल्हणाने केले आहे.

**दोष, धातु, मल या स्वसंज्ञा**

अविकृत अथवा स्वाभाविक अवस्थेत दूषणकर्माचा अभाव असल्याने वातादींनाही अविकृतावस्थेत धातु म्हणावे, स्वतः विकृत झाले म्हणजे शरीरातही विकृती उत्पन्न करतात म्हणून रसादींनाही विकृतावस्थेत दोष म्हणावे आणि प्रकृतावस्थेत देहधारक होतात म्हणून मलांनाही त्या अवस्थेत धातु म्हणावे, याप्रमाणे या सर्वांना अवस्थाभेदानुसार कधी धातू, कधी दोष तर कधी मल म्हणून संबोधणे, धात्वर्थानुसार शक्य असले तरी वातादींना, रसादींना व शकृदादींना, मग ते कोणत्याही अवस्थेत असोत, नित्य दोष, धातु व मल याच संज्ञा अनुक्रमे योजणे अधिक योग्य होय. कारण त्या स्वसंज्ञा आहेत. आयुर्वेदीय ग्रंथांतही असाच व्यवहार आढळतो. स्वाभाविक वा अविकृत अवस्थेत वातादि व शकृदादि जीवनक्रियेचे कारक असतात. परंतु त्या स्थितीतही त्यांना अनुक्रमे “दोष” व “मल” याच संज्ञा योजिलेल्या आहेत. “दोषधातुमलमूलं हि शरीरम्” [सुश्रुतसंहिता.] या वचनातही दोष व मल शरीराची मूलद्रव्ये असल्याचे सांगून सुद्धा संज्ञा मात्र “दोष” व “मल” याच कायम ठेवल्या आहेत.

सारांश आयुर्वेदीय ग्रंथांतील अभिप्रायाचे ज्ञान यथावत् व्हावयास हवे असेल तर ग्रंथांतर्गत दोषादि संज्ञा ग्रंथोक्त अभिप्रायाशीच सदैव निगडित असावयास पाहिजेत. केवळ धात्वर्थाला अनुसरून निरनिराळ्या द्रव्यांना अवस्थाभेदाने अथवा कार्यभेदाने त्या योजू नयेत. कारण त्या अव्यभिचारी संज्ञा होत. त्यांच्याविषयी कोणत्याही प्रकारे विपर्यास न करता दोष म्हणजे वायु, पित्त व कफ, धातु म्हणजे रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा व शुक्र आणि मल म्हणजे शकृत्, मूत्र व स्वेद [“वायुः पित्तं कफश्चेति त्रयो दोषाः,” “रसासृङ्मांसमेदोऽस्थिमज्जशुक्राणि धातवः” “मला मूत्रशकृत्स्वेदादयः” अष्टांगहृदय.] हा त्यांतील अभिप्रेत अर्थच निर्णीत म्हणून स्वीकारणे समुचित होय.

अनुक्रमणिका

------------------------------------------------------------------------------

टीप १० — ["अन्यानि शास्त्राणि आयुर्वेदादपराणि व्याकरणादीनि तेषु असामान्या असाधारणा तत्र अननुगता स्वशास्त्रेष्वेव प्रयोजनवतीत्यर्थः।" सु. सं. व्याख्या.]

———

**अनुक्रमणिका**

# दर्शन २– दोषादींचे स्वरूप

## द्रव्य व शक्ती भिन्न पण अविभाज्य

शरीराचे प्रमुख विभाग दोन संभवतात. एक विभाग द्रव्यस्वरूप, स्थूल अथवा दृश्य असा असतो तर दुसरा शक्तिस्वरूप, सूक्ष्म अथवा अदृश्य असा असतो. शक्ती म्हणजे क्रियाकारी सामर्थ्य व या सामर्थ्याचे अधिष्ठान अथवा आधार म्हणजे द्रव्य. द्रव्य अथवा शक्ती केवल-स्वरूपात कधीच उपलब्ध होत नाही. कोणतेही कार्य सामर्थ्याशिवाय अथवा शक्तीशिवाय संभवू शकत नाही. आणि ही शक्तीही द्रव्याचा आश्रय केल्याविना कार्यकारी होऊ शकत नाही. द्रव्य स्थूल असो वा सूक्ष्म असो, त्याचा आश्रय करूनच कार्यकारी सामर्थ्य कार्य करीत असते. आणि प्रमाण व स्वरूप यात भिन्नत्व असले तरी कोणत्या ना कोणत्या सामर्थ्यविशेषाचे अधिष्ठान प्रत्येक द्रव्यात असतेच. द्रव्य व शक्ती यांत अशा प्रकारे नित्यसंबंध असतो. त्यांचे अस्तित्व परस्परापेक्षी असते.

शक्ती व द्रव्य यांत अन्योन्यावलंबित्वामुळे अशा प्रकारे अविभाज्यता असली तरी व्यवहाराच्या सोयीसाठी त्यांचा उल्लेख निरनिराळा करण्यात येतो. व जी शक्ती सापेक्षतया सूक्ष्म द्रव्याच्या आश्रयाने राहते तिला (व त्या द्रव्यालाही) शक्ती म्हणण्यात येते, आणि ज्यात शक्ती स्वल्प प्रमाणात असते त्या द्रव्याला द्रव्य म्हणून संबोधण्यात येते. स्थूलद्रव्य व सूक्ष्म द्रव्य असाही निर्देश कधी कधी करण्यात येतो. शक्ती किंवा शक्तिस्वरूप द्रव्य सूक्ष्म अथवा अव्यक्त असून ते व्यक्तस्वरूपी स्थूल द्रव्याच्या आश्रयानेच राहत असते. दृश्य स्वरूपातील स्थूल द्रव्यापासून हे अदृश्य स्वरूपातील सूक्ष्म द्रव्य विभक्त करता येत नाही. अर्थात् शक्ती अथवा सामर्थ्य, स्थूल व दृश्य अशा द्रव्याच्या आश्रयानेच प्रतीत होत असते, हे उघड होय.

द्रव्य आणि शक्ती या शरीराच्या अविभाज्य विभागांपैकी एकाचे म्हणजे द्रव्याचे पुनश्च सामर्थ्ययुक्त व सामर्थ्यहीन असे दोन विभाग संभवतात. सामर्थ्यहीन म्हणून जो विभाग सांगितला त्यातही सामर्थ्य अजिबात नसतेच असे नव्हे. कारण पूर्णपणे सामर्थ्यहीन द्रव्य उपलब्ध होणेच शक्य नाही. ते अत्यल्प प्रमाणात असते इतकाच त्यातील अर्थ.

## शरीराचे त्रिविध वर्गीकरण

शरीरान्तर्गत शक्तीच्या या तारतम्याला अनुसरून शक्तिस्वरूप शक्तियुक्त व शक्तिहीन असे शरीराचे त्रिविध वर्गीकरण होऊ शकते. या तीन विभागांनाच आयुर्वेदात अनुक्रमे दोष, धातु व मल या संज्ञा योजलेल्या आहेत. दोष शक्तिस्वरूप असतात म्हणजे धातुमलांहून सापेक्षतया ते अधिक शक्तिसंपन्न असतात. धातूंत दोषांहून कमी पण मलांहून अधिक सामर्थ्य असते तर मलांत ते न्यूनतम असते.

## जीवनाचे स्वरूप

दोषांचे कार्यकारी सामर्थ्य विशद होण्याकरिता कर्माचे स्वरूप स्पष्ट करणे अवश्य आहे. उत्पत्ती, वृद्धी, उत्क्रांती, ऱ्हास व विनाश ही क्रमानुवर्ती कर्मे म्हणजेच जीवन, असे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. विशिष्ट आकार धारण करून प्रकट होणे म्हणजे उत्पत्ती, स्वतःच्या स्वभावानुसार वाढणे म्हणजे वृद्धी, स्वाभाविक

अनुक्रमणिका

स्थितीहून उच्च किंवा श्रेष्ठ अवस्थेत परिणत होणे ही उत्क्रांती, स्वभावतःच क्षीण होणे हा ऱ्हास, आणि स्वतःचा विशिष्ट आकार लुप्त अथवा अदृश्य होणे म्हणजे विनाश. अव्यक्त अशा पंचमहाभूतांपासून प्रथम व्यक्त स्वरूप निर्माण होते, नंतर त्या अवस्थेत स्वभावधर्मानुसार वाढ होऊ लागते, ही अभिवृद्धी होत असतानाच काही अंश श्रेष्ठ अवस्थेत संक्रमित होतात, आणि कालांतराने क्षीण होत होत शेवटी विनाश पावतात. उत्पत्यादि क्रियांची अशी क्रमशः अनुवृत्ती होणे याचेच नांव जीवन.

पृथ्वी, अप्, तेज, वायु व आकाश ही पांच महाभूते जीवनसृष्टीचे उपादान कारण होय. या मूळद्रव्यांपासूनच सर्व जीवसृष्टी उत्पन्न झाली आहे. पृथ्वी, अप्, तेज व वायु या चार [सृष्टीची उपादान कारणे आकाशसहित पंचभूते असली तरी संयुक्त होणारे परमाणू आकाशरहित चारच भूतांचे असतात. आकाश केवळ नित्यस्वरूप आहे.] भूतांचे परमाणू चेतनेच्या सामर्थ्याच्या योगाने अवकाशरूप आकाशात एकत्रित येऊन एकमेकात विलीन होतात. ही एकरूपता प्राप्त झाली म्हणजे त्यांना एक विशिष्ट आकार येतो, आणि त्यात काही गुण व क्रिया यांचाही प्रादुर्भाव होतो. पृथिव्यादि महाभूतांच्या संमीलित परमाणूंना अशा प्रकारे आकार-गुण-कर्मत्व म्हणजेच पदार्थत्व, व्यक्तत्व अथवा विशिष्ट रूप प्राप्त होते, आणि आकार, गुण व कर्म यातील भिन्नतेला अनुसरून त्या त्या पदार्थांना भिन्न भिन्न नांवांनी संबोधण्यात येते.

पृथिव्यादि चार भूतांच्या परमाणूंचा पारस्परिक संयोग झाला म्हणजे पदार्थमात्राची उत्पत्ती व वृद्धी होते, आणि वियोग झाला म्हणजे त्या त्या पदार्थाचा ऱ्हास व विनाश होतो. 'लोक हा शब्द संयोगापेक्षी आहे. षड्धातूंच्या संयोगानेच सामान्यतः सृष्टीची उत्पत्ती होते आणि त्यांचा एकमेकांपासून वियोग झाला की ती नाश पावते,' असे चरकसंहितेतही सांगितले आहे ['तत्र संयोगापेक्षा लोकशब्दः। षड्धातुसमुदायो हि सामान्यतः सर्वलोकः। षड्धातुविभागो वियोगः। स जीवापगमः।' च. सं.].

## दोषधातुमलांची घडामोड

दोष, धातू व मल हे शारीर पदार्थ आहारादिकांतून प्राप्त होणाऱ्या समानगुणी द्रव्यांनी परिपोषित होतात. उलट, विपरीतगुणी द्रव्ये शरीरात प्रविष्ट झाली तर मात्र त्यांच्यामुळे हे दोषादि क्षीण होतात. 'समानगुणी अथवा समानगुणभूयिष्ठ रसांनी त्या त्या दोषांची वृद्धी होते व विरुद्धगुणी अथवा विरुद्धगुणभूयिष्ठ रसांनी ते ते दोष क्षीण होतात', असे चरकसंहितेत म्हटले आहे ['ये रसाः यैर्दोषैः समानगुणाः समानगुणभूयिष्ठा वा भवन्ति ते तानभिवर्धयन्ति, विपरीतगुणाः विपरीतगुणभूयिष्ठा वा शमयन्ति' च. सं.] वाग्भटांनीही तसाच अभिप्राय व्यक्त केला आहे ['वृद्धिः समानैः सर्वेषां विपरीतैर्विपर्ययः' अ. हृ.]

शरीरातील रसरक्तादि सात धातू व्यक्तरूप अथवा दृश्यस्वरूप असून रसापासून रक्त, रक्तापासून मांस, मांसापासून मेद, मेदापासून अस्थि, अस्थीपासून मज्जा, व मज्जेपासून शुक्र याप्रमाणे ते उत्क्रांत होत असतात. ही उत्क्रांती होत असताना या धातूंची क्रमशः अभिवृद्धी व ऱ्हास होत असतो. अभिवृद्धी आहारामुळे होते आणि क्षीणत्व स्वभावातःच येते. उपभुक्त आहाराचा सारस्वरूप असा रस प्रथम तयार होतो आणि नंतर क्रमाक्रमाने धाग्वग्नींकडून विपाचित होत होत तोच शेवटी शुक्रावस्थेत परिणत होतो. धातूंची ही उत्तरोत्तर उत्क्रांती होत असताना पूर्वधातूतून उत्तर धातूच्या तुलनेने सत्वहीन असे काही अंश पृथक् होत असतात. त्यांनाच मल म्हणतात. (१) कफ (२) पित्त (३) नाक, कान इत्यादि सच्छिद्र इंद्रियांतील मल (४) स्वेद (५) नखे व केस (६) नेत्र, त्वचा इत्यादिकांवर दिसणारा स्नेह आणि (७) ओज याप्रमाणे सात धातूंचे एकूण मलही सातच असल्याचे सांगितले आहे. ['कफः पित्तं मलः खेषु प्रस्वेदो नखरोम च।

अनुक्रमणिका

स्नेहोऽक्षित्वग्विशामोजो धातूनां क्रमशो मलाः' अ. हृ.]. रसरक्तादि सर्वच धातू याप्रमाणे वृद्धिक्षयरूप क्रियासातत्याचा अनुभव अहर्निश उपभोगीत असताना तीन अवस्थांतून जात असतात. स्वरूपावस्था, उत्क्रांतावस्था व किट्टावस्था या त्या ती अवस्था होत. 'स्थूल, सूक्ष्म व मल हे धातूंचे तीन भेद अथवा अवस्थाविशेष आहेत, धातूंची स्वाभाविक अवस्था म्हणजे स्थूलावस्था, उत्क्रांतावस्था म्हणजे सूक्ष्मावस्था व किट्टावस्था म्हणजे मलावस्था', असा उल्लेख डल्हणांनी आपल्या टीकेत केला आहे. ['स्थूलसूक्ष्ममलैः सर्वे भिद्यन्ते धातवस्त्रिधा। स्वः स्थूलोंऽशः परं सूक्ष्मः तन्मलं याति तन्मलः' सु. टीका.]

## जीवनाचा धर्म—क्रांतिशीलता

शारीर द्रव्यांत काही अंश निरंतर नवीन उत्पन्न होत असतात आणि उत्पन्न झालेल्यांपैकी काही ऱ्हास पावत असतात. शरीरातील प्रत्येक अवयव अशा प्रकारे नित्य उत्पद्यमान व क्षीयमाण अवस्थेतून क्रमशः जात असल्याने तो क्रांतिरूप असतो. उत्पत्तिविनाशांचा क्रमशः पण अविरत अनुभव घेत राहणे हीच त्याची नित्यावस्था असते. क्रांतिशीलता हा जीवनाचा धर्मच होय.

हे उत्पत्तिविनाशात्मक कार्य अविरत होत असताना शरीराचा जो अंश उत्पद्यमान अवस्थेत असतो त्याला धातु, व जो क्षीयमाण अवस्थेत असतो त्याला मल अशा संज्ञा देण्यात आल्या आहेत. हे धातुमल द्रव्यरूप, स्थूल व दृश्य असतात. शरीराच्या या द्रव्यरूप भागातच पचन-पोषणादि सर्व क्रिया होत असतात. उत्पत्ति व क्षय या अवस्था तो अनुभवीत असतो आणि शक्तीचा आधार अथवा अधिष्ठानही तोच असतो.

शरीराचा अथवा प्रत्येक शारीर घटकाचा दुसरा विभाग सूक्ष्म, शक्तिस्वरूप व अदृश्य असा असतो. शारीर धातूंच्या पोषणाला उपयुक्त असे अंश आहारातून घेणे, त्या अंशांचे धातुघटकांशी सात्मीकरण करणे, मलांचे उत्सर्जन करणे, रसरक्तादि धातूंत उत्क्रांती घडवून आणणे, इत्यादि सर्व क्रिया त्याच्यामुळेच घडून येत असतात. धातुघटकातील अंतर्निष्ठ व कार्यकारी असलेल्या या सूक्ष्म विभागालाच दोष ही संज्ञा दिलेली आहे.

## शरीरातील त्रिविध क्रिया

एतावता, शक्तिरूप, शक्तियुक्त व शक्तिविहीन असे शरीराचे प्रमुख विभाग तीन असून त्यांनाच अनुक्रमे दोष, धातु व मल या संज्ञा देण्यात आल्या आहेत हे स्पष्ट होय. या तीनही विभागांत शक्तिमत्त्व हे सामान्य असतेच. व म्हणूनच त्यांना शरीराचे मूलघटक मानण्यात आले आहे. तथापि, त्यांतील शक्तीचे तारतम्य स्पष्ट व्हावे यासाठी त्यांचा निर्देश वेगवेगळा करण्यात येतो. सर्व क्रियांचे कारकत्व हे दोषांचे वैशिष्ट्य, तर देहधारकत्व हे धातूंचे वैशिष्ट्य. धातुघटकांना संरक्षण देणे हे मलांचे कार्य आहे.

शरीराच्या जीवनव्यापारात मुख्यतः तीन प्रकारच्या क्रिया सुरु असतात. आहारादिकातून पोषक अंशांचा संग्रह करणे, संग्रहित अंशांतील सारभूत व मलस्वरूप अंशांना एकमेकांपासून विभक्त करणे आणि मलरूप अंशांचे नंतर वियोजन किंवा उत्सर्जन करणे, हे त्या क्रियांचे सर्वसामान्य स्वरूप होय. या तीनही क्रिया सार्वदेहिक असतात म्हणजे शरीराच्या प्रत्येक सूक्ष्म घटकात सुद्धा त्या चालू असतात. संयोजन, विभाजन व वियोजन, अथवा संश्लेषण व विक्षेपण अशी नांवे त्यांना आयुर्वेदात देण्यात आली आहेत. या तीन क्रियांचे कारकही अनुक्रमे संग्राहक, पाचक व विसर्जक असे तीनच असून श्लेष्मा, पित्त व वायु या संज्ञा त्यांच्याच वाचक आहेत. श्लेष्मा हा दोष संश्लेषणाचे, संयोजनाचे अथवा पोषक अंशांचा संग्रह करण्याचे

अनुक्रमणिका

कार्य करतो. पित्तामुळे सारकिट्टविवेचन होते. त्यालाच पचन म्हणतात. आणि किट्टरूप अंशांचे वियोजन अथवा उत्सर्जन करणे हे कार्य वायु या दोषाकडून घडून येते. श्लेष्मा, पित्त व वायु या संज्ञाही या दृष्टीने मोठ्या अर्थसूचक आहेत.

रसरक्तादि धातू म्हणजे विशिष्ट आकारात अभिव्यक्त होणारी द्रव्ये असून ती एकूण सात असल्याचे पूर्वी उल्लेखिलेच. या सात धातूंचेही संक्षेपतः प्रमुख भेद दोनच संभवतात. एक घन आणि दुसरा द्रव. घन व द्रव यांचेही पुनश्च प्रत्येकी दोन भेद संभवतात. कठीण व मृदु हे घनाचे भेद होत. संकोचविकासक्षमता ज्यात संभवत नाही ते द्रव्य कठीण व ती ज्यात संभवते ते मृदू. शरीरातील अशी द्रव्ये म्हणजे अनुक्रमे अस्थि व मांस ही होत. द्रव्यद्रव्याचेही एक जलसदृश किंवा पूर्णद्रवरूप व दुसरा त्याहून थोडा घन म्हणजे तूपमधाप्रमाणे घट्ट असे दोन प्रकार संभवतात. रस, रक्त, मेद, मज्जा व शुक्र या पांच द्रवरूप धातूंपैकी रस व रक्त पहिल्या दोन प्रकारांत मोडतात व उर्वरित मेदप्रभृति धातू दुसऱ्या म्हणजे घृतमधुवत् किंचिद्घन या प्रकारात बसतात.

हात, पाय आदि निरनिराळ्या अवयवांचे निरीक्षण केले तर शरीराला विशिष्ट आकार प्राप्त होण्यासाठी अस्थि आणि मांस ही द्रव्येच मुख्यतः कारणीभूत होतात. कारण त्यांच्याप्रमाणे आकार धारण करण्याचे सामर्थ्य रसरक्तादि द्रवरूप धातूंत स्वभावतःच असत नाही, असा समज होणे अस्वाभाविक नाही. तथापि, रसरक्तादि धातूही विशिष्ट स्वरूपातच अभिव्यक्त होत असल्याने तेही विशिष्ट आकार धारण करतात. आणि शरीराला विशिष्ट आकृतिमत्त्व प्राप्त होण्यासाठी पर्यायाने ते कारणीभूतही होतात असे मानणेच योग्य होय. अस्थि व मांस यांत घनत्व आणि रसरक्तादीत द्रवत्व सामान्य असताही प्रत्येकाचे स्वरूप, सामर्थ्य व कार्य यांत भिन्नता असते व म्हणूनच भिन्नभिन्न नांवे त्यांना देण्यात येतात. शरीरधारणेच्या कामी त्या सर्वांची आवश्यकता आहे.

**शरीरातील सर्व क्रिया धातूंच्या आश्रयाने होतात**

शरीरात या रसरक्तादि धातूंचेच एकप्रकारे प्राधान्य असते. शरीरान्तर्गत सामर्थ्य या धातूंच्या शूक्ष्म अंशांच्या आश्रयानेच निवास करीत असते. अर्थात् ज्यांना दोष म्हणतात ते वातादि म्हणजे या रसादि धातूंचेच शक्त्युत्कर्षसंपन्न असे सूक्ष्म अंश होत. तसेच, ज्यांना 'मल' ही संज्ञा देण्यात आली आहे ते पुरीषादीही या धातूंचे शक्तिहीन व स्थूल असे अंश असतात. क्षय, वृद्धी, उत्क्रांती, विकृती, किंबहुना, शरीरात चालणाऱ्या सर्व शुभाशुभ, इष्टानिष्ट, प्राकृतवैकृत क्रिया रसरक्तादि धातूंच्या आश्रयानेच होत असतात.

अशा या रसरक्तादींना देण्यात आलेली 'धातु' ही धारणार्थी संज्ञाही यावरून अत्यंत अन्वर्थक असल्याचे स्पष्ट होते. कारण हे रसरक्तादि एका अंशाने शक्तिरूप वातादि दोषांचे तर दुसऱ्या अंशाने शकृदादि मलांचे जसे धारण करतात, तसेच शरीरातील विविध अंगोपांगांचे विशिष्ट आकार, तदनुसार त्यांना योजण्यात आलेली नांवे, आणि त्यांच्यात चालणारी श्वसन, पचन, उत्सर्जन आदि कर्मे, या सर्वांचे धारणही तेच करतात. अर्थात् दोष, मल, आकृतिविशेष, विविध कर्मे आणि अभिधाने या सर्वांना आश्रयरूप असणाऱ्या या रसरक्तादि द्रव्यांचा निर्देश धातु या संज्ञेने करणे यथायोग्यच होय.

**मलांचे त्रिविधत्व व सर्वदेहव्यापित्व**

दोष व धातू यांच्या तुलनेने मलांत सामर्थ्य अत्यल्प असते. घनस्वरूप, द्रव्यरूप व बाष्पस्वरूप असे त्यांचे प्रमुख भेद तीन असून त्यांनाच अनुक्रमे पुरीष, मूत्र व स्वेद अशी नांवे दिलेली आहेत. रसरक्तादि धातूंचे जे सात मल पूर्वी उल्लेखिले त्यांचा या तीन प्रकारांतच समावेश होऊ शकतो. त्यांपैकी (१) कफ (२) पित्त [ हे कफ व पित्त म्हणजे धातूंचे शक्त्युत्कर्षसंपन्न व कार्यकारी असे दोषसंज्ञक सूक्ष्म अंश नव्हेत, सामर्थ्यहीन व अकिंचित्कर असे स्थूल अंश होत. मलस्वरूप कफ स्निग्ध असतो कारण तो रसोत्पन्न असतो, व पित्त उष्ण असते कारण ते रक्तोत्पन्न असते. तथापि, या कफपित्तांत दोषस्वरूपी कफपित्तांप्रमाणे धातुसंघटनेचे व धातुपचनाचे सामर्थ्य असत नाही.] (३) नेत्र, त्वचा व पुरीष यांचा स्नेह आणि (४) ओज [अष्टांगहृदयात ओजाला शुक्राचा मल म्हटले आहे. परंतु, शुक्र हे स्वतःच अन्नधातूंचे सारस्वरूप व प्रसादोपम असल्याने अशा निर्मळ शुक्राचा एखादा मल असतो हे म्हणणे उचित वाटत नाही. 'ओजस्तु तेजो धातूनां शुक्रान्तानां परं स्मृतम्', 'निष्पद्यन्ते यतो भावा विविधा देहसंश्रयाः', 'यन्नाशे नियतं नाशो यस्मिंस्तिष्ठति तिष्ठति ।' म्हणजे ओज हे रसादिशुक्रान्त धातूंचे तेज होय, देहाश्रित विविध भावांची उत्पत्ती त्यापासूनच होते, ओज असेल तरच शरीर सजीव राहते आणि त्याचाच नाश झाला की जीविताचाही नाश निश्चित असतो, असे वर्णन त्याच अष्टांगहृदयात केले आहे. चरकसंहितेत सुद्धा 'ओजाचे स्थान हृदय, वर्णाने ते रक्त व किंचित् पिवळसर असते आणि त्याचा नाश झाला म्हणजे जीवितही नष्ट होते' असा एतत्संबंधी उल्लेख आढळतो. ('हृदि तिष्ठति यत् शुद्धं रक्तमीषत् सपीतकम् । ओजः शरीरे संख्यातं तन्नाशान्ना विनश्यति ।') 'ओज म्हणजे सातही धातूंचे श्रेष्ठतम तेजच, बल त्यालाच म्हणतात', (रसादिशुक्रास्तानां धातूनां यत्वरं तेजस्तत्खलु ओजः । तदेव बलमित्युच्यते ।') असे सुश्रुतही सांगतात. चरकसंहितेत पुरीष व मूत्र हा अन्नाचा, कफ हा रसाचा, पित्त हा रक्ताचा, स्रोतसांतील मल हा मेदाचा, केस व लोम हा अस्थीचा आणि नेत्र, त्वचा व पुरीष यांचा स्नेह हा मज्जेचा, याप्रमाणे इतर धातूंचे मल सांगितले आहेत. ('किट्टमन्नस्य विण्मूत्रं रसस्य तु कफोऽसृजः । पित्तं मांसस्य खमलाः मलः स्वेदस्तु मेदसः । स्यात् किट्टं केशरोमास्थ्नो मज्ज्ञः स्नेहोऽक्षिविट्त्वचाम् ।') पण त्यांत शुक्राचा एखादा मल असल्याचा उल्लेख नाही. 'ततः पुनः पच्यमानात् अत्र मलो नोत्पद्यते सहस्रधाष्मातसुवर्णवत्', 'न शुक्रे पच्यमानेऽपि हेमनीवाक्षये मलः' । म्हणजे शेकडो वेळा अग्नीत तापविलेल्या सुवर्णाप्रमाणेच पचनसंस्कार होऊनही शुक्रापासून एखादा मल निघत नाही, शुद्ध सुवर्णाप्रमाणे शुक्रही पचनसंस्कारात अक्षयीच राहते, असे सुश्रुतसंहितेचे व्याख्याकार डल्हणही म्हणतात. तात्पर्य, सर्व धातूंहूनही सामर्थ्यसंपन्न, प्रसादस्वरूप व निर्मलतम असणाऱ्या ओजाला मल म्हणणे समुचित नव्हे. शुक्र इतर धातूंचे सारस्वरूप असले तरी अन्य धातूंचे सारस्वरूप असले तरी अन्य धातूंप्रमाणे त्यापासून एखादा अन्य धातू या देहात उत्पन्न होत नाही, परंतु, ओज तदुत्पन्न असते आणि ते मालिन्यकर नसले तरी अवष्टंभक असते व म्हणून या मर्यादित अर्थाने त्याला शुक्राचा मल मानून वाग्मटाचे वचन स्वीकार्यही होऊ शकेल. परंतु, तत्त्वतः धातुमल एकुण सहाच होत.] हे चार मल अनुक्रमे रस, रक्त, मज्जा व शुक्र यांचे असून ते द्रवरूप होत. नाक, कान आदि स्रोतसांत संचित होणारा मांसधातूचा मल व अस्थिधातूचा नख-रोमस्वरूप मल हे घनस्वरूप होत. मेदोधातूचा मल जो स्वेद तो बाष्पस्वरूप होय.

याच ठिकाणी एका गोष्टीचे स्पष्टीकरण करणे अवश्य आहे. पुरीष व मूत्र हे दोन अन्नमल म्हणून सांगितले आहेत ['किट्टमन्नस्य विण्मूत्रम्' – च. सं. । 'तत्राच्छं किट्टमन्नस्य मूत्रं विद्यात् घनं शकृत् , अ. हृ.] आणि कफादि मल तर धातूंचे होत. त्यांचा अंतर्भाव द्रवरूप मूत्र व घनरूप शकृत् या अन्नमलांत करणे कितपत योग्य होऊ शकेल अशी शंका यासंबंधी उद्‌भवण्यासारखी आहे. पुढीलप्रमाणे तिचे स्पष्टीकरण होऊ शकते. पुरीष व मूत्र हे जे अन्नाचे मल म्हणून सांगितले त्यांचे स्थान अनुक्रमे स्थूलांत्र व मूत्राशय हे आहे. याचाच अर्थ असा की, हे दोन मल सर्वदेहव्यापी नाहीत. परंतु, वाग्भटांनीच जे मूत्रपुरीषांचे कार्य वर्णिले आहे ते सार्वदेहिक असल्याचे दिसून येते. अवष्टंभ हे पुरीषाचे व क्लेदवाहन हे मूत्राचे कार्य होय, असे ते म्हणतात ['अवष्टम्भः पुरीषस्य मूत्रस्य क्लेदवाहनम्' अ. हृ.]. अवष्टंभ म्हणजे देहधारण, असे स्पष्टीकरण व्याख्याकार अरुणदत्ताने या ठिकाणी केले आहे. ['अवष्टंभो देहधारणशक्तिः श्रेष्ठं कर्म पुरीषस्य स्मृतम्' अ. हृ. व्याख्या.] क्लेदाचे अभिवहन करणे हे मूत्राचे कार्यही सार्वदेहिकच होय.

अर्थात् पक्वाशय व मूत्राशय यांत संचित होणाऱ्या उत्सर्जनीय मलमूत्रांचे कार्य देहधारण हे असते, असे म्हणता येणार नाही. संततज्वरात रसादि धातू, मूत्र व पुरीष हे मल आणि वातादि दोष या सर्वांची युगपत् दुष्टी होते, असे चरकसंहितेत सांगितले आहे ['यथा धातूंस्तथा मूत्रं पुरीषं चानिलादयः युगपच्चानुपद्यन्ते नियमात् सतते ज्वरे ।' –च. सं.] या ठिकाणी ज्यांचा उल्लेख आहे ते मलमूत्र सर्वदेहव्यापी होत हे उघड आहे. क्षयी मनुष्य केवळ पुरीषाच्या आधारावरच जीव धरून असतो, ज्याला क्षय झाला आहे त्याच्या पुरीषाचे यत्नपूर्वक रक्षण करावे, पुरीषाचा अतिव्यय होऊ देऊ नये, कारण सर्व धातू क्षीण होऊन त्याला दौर्बल्य येते तेव्हा विड्‌बल

अनुक्रमणिका

हेच त्याचे बल असते, अशा वेळी पुरीषरक्षण हेचत्याचे बलरक्षण होय, असे राजयक्ष्म्याच्या वर्णनात वाग्भटाने म्हटले आहे ['उपस्तब्धः स शकृता केवल वर्तते क्षयी ।' 'पुरीषं यत्नतो रक्षेत् शुष्यतो राजयक्ष्मिणः सर्वधातुक्षयार्तस्य बलं तस्य हि विड्बलम् ।' अ. हृ.] या वर्णनातही देहधारक म्हणून ज्या पुरीषाचा निर्देश करण्यात आला तो पक्वाशयात संचित होणाऱ्या पुरीषाचा नव्हे तर सार्वदेहिक पुरीषाचा म्हणजे घनस्वरूप धातूंच्या मलसंज्ञक सामर्थ्यहीन अंशांचाच वाचक आहे, ही गोष्ट स्पष्ट होय. पक्वाशयात जो संचित होतो तो रक्ष्य नसून त्याज्यच असतो. त्याचा संचय अथवा हंग्रह झाला तर आध्मान, आटोप आदि विकार उद्भवतील, देहधारणा सोणार नाही. तात्पर्य, घन व द्रव याप्रमाणे ज्यांचे प्रमुख भेद दोन संभवतात त्या रसरक्तादि धातूंच्या सामर्थ्यहीन अंशांपैकीच जे अंश घनस्वरूप आहेत त्यांना शकृत् व जे द्रवस्वरूप आहेत त्यांना मूत्र अशी संज्ञा असून धातूंच्याच विपाकावस्थेत जो बाष्पस्वरूप मल उत्पन्न होतो त्यालाच स्वेद असे म्हणण्यात आले आहे. सर्व धातुमलांचा शकृत्, मूत्र व स्वेद या तीनच प्रकारांत समावेश करणे या प्रमाणे समुचित असेच आहे.

धातूंच्या विपाकावस्थेत उत्पन्न होणारा मल म्हणजे स्वेद असे वर म्हटले. पुरीषादि मल म्हणजे दृश्य व द्रव्यरूप रसादि धातूंचेच निःसत्त्व असे अंश असल्याने घनरूप मल घन धातूंचे व द्रवरूप मल द्रव धातूंचे, हे अनुमान सहज करता येण्यासारखे आहे. त्यात विचारणीय बाब आहे ती ही की, स्वेद म्हणून जो तिसरा मल सांगितला त्याची उत्पत्ती कशी होते? यासंबंधी स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

**स्वेद म्हणजे शारीर द्रव्यांची विपच्यमान अवस्था**

शारीर द्रव्यात उत्पत्तिविनाशात्मक क्रिया नित्य अविरत रीतीने चालू असते. या उत्पत्तिविनाशात्मक कर्माचे सातत्य पचनक्रियेवर अवलंबून असते. पचन तैजस म्हणजे तेजामुळे होणारे असून उष्णस्पर्शवत्त्व हे तेजाचे लक्षण सांगण्यात आले आहे. तेजाच्या योगाने विपाचित होणाऱ्या द्रव्यांना अशी एक अवस्था प्राप्त होत असते की, जीत पूर्वीचे स्वरूप तर नष्ट झालेले असते पण नवीन अद्यापि प्राप्त झालेले नसते. पूर्व व उत्तर अश्या उभय स्वरूपांचाही तीत अभाव असतो. अश्या या अवस्थेला स्वेदावस्था किंवा बाष्पावस्था अथवा विपच्यमान अवस्था असे म्हणता येईल. शरीरात उत्पत्तिविनाश अखंड चालू असल्याने सर्व शारीर द्रव्ये नित्य अस्थिर अवस्थेतच राहत असतात. जिवंतपणा म्हणजे क्रांतिशीलता असे पूर्वी एके ठिकाणी म्हटले त्यातील अभिप्राय हाच आहे. जिवंत शरीर म्हणजेच नित्य पच्यमान अवस्थेत असणारी एक वस्तू होय. उत्पत्तिविनाशांचे अथवा अवस्थान्तरकर्माचे सातत्य याचेच नांव जीवन. आणि मूर्त द्रव्यांचे अमूर्तावस्थेत, साकार वस्तूंचे निराकार अवस्थेत व घन द्रव्यांचे द्रव द्रव्यांत परिवर्तन होणे; तसेच, अमूर्तातून मूर्ताचे, निराकार वस्तूतून साकार वस्तूचे व द्रवरूप द्रव्यांतून घन द्रव्यांचे उत्पादन होणें हेच अवस्थांतर. अर्थात् सजीव वस्तूत घन-द्रवांचे साहचर्य नित्य असावयाचे व त्यामुळेच तीत अवस्थान्तरही नित्य होत रहावयाचे हे उघड होय. हे अवस्थान्तर होत असताना उभयस्वरूपी व मध्यम अवस्थेत असणारा स्वेद साहाय्यक होतो. तात्पर्य, क्रांतिशील अथवा परिवर्तनशील अश्या शारीरद्रव्यांत स्वेदावस्था अपरिहार्य असते. अर्थात् शारीरधातू स्वेदावस्थेत किंवा विपच्यमान अवस्थेत असताना त्यांचे जे निःसत्त्व अंश पृथक् होतील ते स्वेदरूपच असणार हे उघड होय. अशा निःसत्त्व अथवा मलरूप अंशांनाच "स्वेद" ही संज्ञा देण्यात आली आहे. "स्विद्यते अनेन इति स्वेदः" या निरुक्तीवरूनही स्वेदाचे उष्णत्व व पचनक्रियाकारित्व व्यक्त होते. त्वचेतील स्रोतसांतून जे जलरूप द्रव्य (घर्मजल-घाम) बाहेर येते तोच स्वेद होय, ही कल्पना अज्ञानमूलक आहे. कारण या द्रवात स्वेदकत्व असत नाही अथवा उष्णस्पर्शत्वही असत नाही.

अनुक्रमणिका

सारांश, रसरक्तादि व्यक्तरूप धातू सात असताहि त्यांचे घन, द्रव व स्वेदरूप असे प्रमुख भेद तीनच असल्याने त्यांच्या निःसत्त्व अंशांचे मुख्य प्रकारही घन, द्रव व स्वेद असे तीनच असून त्यांनाच पुरीष, मूत्र व स्वेद अशी नांवे आयुर्वेदात दिलेली आहेत. मलांचे हे त्रिविधत्व सोपपत्तिक असेच आहे.

रसरक्तादि धातू या मलस्वरूप आवरणाखाली सुरक्षित राहतात व हे संरक्षक अवगुंठन असल्यामुळेच धात्वन्तर्गत पचनपोषणादि क्रिया सम्यक् रीतीने होऊ शकतात. पुरीषादि मल देहमूलक होत असे म्हणूनच सांगण्यात आले आहे. परंतु, नियत प्रमाणापेक्षा त्यांची वाढ झाली म्हणजे मात्र ते धातुघटकांना सुरक्षित राखण्याऐवजी मलीन करतात. देहमूलक असतानाही त्यांना 'मल' म्हणून संबोधण्यात आले ते म्हणूनच.

आतापावेतो देहमूलक असणाऱ्या दोषधातुमलांचे सर्वसामान्य म्हणजे ते देहमूलक कसे होतात यासंबंधी विवरण करण्यात आले. शरीराचे उपादानकारण शक्तिरूप, शक्तियुक्त व शक्तिहीन याप्रमाणे त्रिविध असून सामर्थ्योत्कर्षसंपन्न, मध्यमसामर्थ्ययुक्त व स्वल्पसामर्थ्ययुक्त अशा या देहोत्पादक द्रव्यांनाच अनुक्रमे दोष, धातु व मल या पारिभाषिक संज्ञा शारीर शास्त्रज्ञांनी दिलेल्या आहेत, इतके निश्चित झाल्यावर दोषादींच्या प्रत्येकशः स्वतंत्र विवरणाकडे वळावयास हरकत नाही.

———

अनुक्रमणिका

# दर्शन ३– वातादींचे विशिष्ट स्वरूप, कर्मे, व संज्ञा

## सजीव शरीरातील सहा तत्त्वे

पृथिव्यादि पंचमहाभूते व चेतना ही शरीराची घटकद्रव्ये होत. या सहा वस्तूंच्या समुदायालाच शरीर म्हणतात. प्राचीन आयुर्वेदीय ग्रंथकारांनीही असाच अभिप्राय व्यक्त केला आहे. "पृथिव्यतेजोवायुराकाशं ब्रह्म चाव्यक्तमिति षड् धातवः समुदिताः पुरुष इति शब्दं लभन्ते", असे वचन चरकसंहितेत आहे. "शरीरं नाम चेतनाधिष्ठानभूतं पंचभूतविकारसमुदायात्मकम्" असाही उल्लेख तेथे आढळतो. परंतु, याचा अर्थ असा नव्हे की, स्वाभाविक अवस्थेतील परमाणुस्वरूप महाभूते हीच वस्तुमात्राची उत्पादक होत. कारण सर्व सृष्ट द्रव्यांची उत्पत्ती पचमहाभूतांच्या विकारांपासून म्हणजे द्व्यणुकादिकांपासून अथवा रसादि गुणांपासून होत असते.

ही सहा तत्त्वे शरीरात अथवा कोणत्याही सजीव व साकार वस्तूत आपापल्या भावरूपाने सदैव विद्यमान असातत. स्थूलत्व, द्रवत्व, उष्णत्व व सूक्ष्मत्व; हे अनुक्रमे पृथ्वी, अप्, तेज व वायु या भूतांचे धर्म होत. या चारही भूतांच्या अनुपस्थितीमुळे जो अवकाश निर्माण होतो तोच आकाशाचा भाव होय. चेतनेचा धर्म इंद्रियांना कर्मप्रवृत्त करणे हा आहे. त्यालाच चैतन्य म्हणतात. पृथिव्यादि भूते व त्यांचे स्थूलत्वादि भाव यांच्यांत सूक्ष्मत्व, व्यापकत्व व सामर्थ्य उत्तरोत्तर अधिकाधिक प्रमाणात आढळूत येते. तसेच, पंचभूतांपैकी प्रत्येकात विशिष्ट स्वरूपात व प्रमाणात जी शक्ती आढळून येते ती म्हणजे विशिष्ट स्वरूपातील चेतनाच असते.कारण ही भूते जेव्हा चेतनाश्रित म्हणजे सचेतन होतात तेव्हाच विविध प्रकारच्या कार्यरूपी सृष्टीची त्यांच्यापासून उत्पत्ती होते. "मन हे ज्याचे साधन आहे असा चेतनाधातूच सर्वप्रथम गुणग्रहणार्थ प्रवृत्त होत असल्याने तोच आद्य कारण होय; तसेच एखादा देह धारण करण्यासाठी आत्मा जेव्हा प्रवृत्त होतो तेव्हा प्रथम आकाशतत्त्वात व नंतर, ज्यात गुण अथवा भाव हे उत्तरोत्तर अधिकाधिक स्थूल स्वरूपात अभिव्यक्त होतात, अश्या वायु, तेज, अप् व पृथ्वी या चार भूतांत तो क्रमशः प्रवेश करतो", असा एतत्संबंधी उल्लेख चरकसंहितेत केलेला आहे'. ['तत्र पूर्व चेतनाधातुः सत्त्वकरणो गुणग्रहणाय प्रवर्तते । स हि हेतुः कारणं...... । तथा देहग्रहणेऽपि प्रवर्तमानः पूर्वतरमाकाशमेवोपादत्ते । ततः क्रमेण व्यक्तरगुणान् वाय्दादिकांश्चतुरः ।' च. सं.]

मनुष्ये, पशु, पक्षी, वनस्पती इत्यादि बहुविध पदार्थ पृथिव्यादि द्रव्यांच्या समुदायापासून केवळ नांवारूपाला येतात असे नाही. या पदार्थांच्या ठिकाणी जी विविध कर्मे आढळून येतात त्यांची उत्पत्तीही भौतिक घटकांच्या समवायामुळेच होत असते. पंचभूतोत्पन्न पदार्थात क्रमसंभव होणे याचेच नांव जीवन. निरनिराळ्या पदार्थांच्या ठिकाणी असणारे कार्यकारी सामर्थ्य क्रियानुरूप म्हणजे ज्या पदार्थाकडून जी विशिष्ट क्रिया व्हावयाची तिला अनुसरून असते आणि कर्मभेदानुसार त्यात भिन्नत्वही आढळून येते. हे कार्यकारी सामर्थ्य पदार्थमात्रात जोवर विद्यमान असते तोवरच त्या पदार्थांना जीवमान मानण्यात येते. या कालमर्यादेलाच त्या पदार्थांचे आयुष्य म्हणतात.

## आत्म्याचे प्रेरकत्व

सृष्ट पदार्थांचे उपादान म्हणून ज्या सहा तत्त्वांचा निर्देश केला त्यांतही चेतनेलाच विशेष प्राधान्य असते. चेतना म्हणजे परमात्म्याचा एक अंशच असून तीच आद्य प्रेरक अथवा प्रमुख कर्मप्रवर्तक असते. 'आत्मा चेतनावान् असतो म्हणून त्याला कर्ता म्हणण्यात येते,' असा निर्देश चरकांनीही केला आहे.

अनुक्रमणिका

[“चेतनावान् यतश्चात्मा ततः कर्ता निरुच्यते’—च. सं.] महाभूतांचे अंश त्या चेतनेने प्रेरित झाले म्हणजे एकमेकांशी संयुक्त होतात. हे चैतन्य नसेल तर महाभूतांचे अंश संयोग पावणार नाहीत, पदार्थमात्राची उत्पत्ती होणार नाही आणि उत्पन्न झालेल्या पदार्थात कार्यकारित्वहि प्रादूर्भूत होणार नाही. इच्छा, प्रयत्न आदि जीवित अवस्थेची जी लक्षणे सांगण्यात आली आहे त्यांचाही, चेतनेचा वियोग झाला की, अभावच संभवतो. चरकाचार्य म्हणतात, ‘इच्छा, द्वेष, सुख, दुःख, प्रयत्न, चेतना, धृती, बुद्धी, स्मृती, अहंकार, ही सर्व लक्षणे जीवित अवस्थेतच उपलब्ध होतात; आणि मृत शरीरात आत्म्याच्या अस्तित्वाची कोणतीच लक्षणे आढळून येत नाहीत. अर्थात् इच्छाद्वेषादि लक्षणे परमात्म्याचीच होत असे महर्षींनी सांगितले आहे ते म्हणूनच. ते चैतन्य तो परमात्म्याचा अंश अथवा तो जीवात्मा शरीरातून निघून गेला म्हणजे शून्य गृहाप्रमाणे ते अचेतन होते. अशा वेळी शरीर पंचत्व पावले असे म्हणतात, कारण आता त्यात पांच तत्त्वेच उरलेली असतात, सहावा चेतनाधातु निघून गेलेला असतो”. [“इच्छा द्वेषः सुखं दुःखं प्रयत्नश्चेतना धृतिः । बुद्धिः स्मृतिरहंकारो लिंगानि परमात्मनः । यस्मात् समुपलभ्यन्ते लिंगान्येतानि जीवतः । न मृतस्यात्मलिंगानि तस्मादाहुर्महर्षयः । शरीरं हि गते तस्मिन् शून्यागारमचेतनम् । पंचभूतावशेषत्वात् पंचत्वं गतमुच्यते” । च. सं.]

## पंचमहाभूतांचे स्वरूप व गुणधर्म

बाकीच्या पांच तत्त्वांपैकी आकाश हे तत्त्व इतर चार भूतांच्यामध्ये अवकाशस्वरूपात राहत असते. पृथिव्यादि भूतचतुष्टयाच्या परमाणूंकडून शरीरातील जितकी जागा व्यापली गेली असेल तद्व्यतिरिक्त अवशिष्ट अवकाश म्हणजेच हे आकाश होय. किंवा असेही म्हणता येईल की, पृथ्वी, अप्, तेज व वायु या चार भूतांचे परमाणू ज्या अवकाशात वास्तव्य करीत असतात तो अवकाश म्हणजेच आकाश. त्याचे विभाग संभवत नाहीत, कारण ते विभु व नित्य असते.

पृथ्वी, अप्, तेज व वायु या चार भूतांपैकी पृथ्वी व अप् ही सापेक्षतया स्थूल असून तेज व वायु ही दोन त्यांच्याहून सूक्ष्म आहेत. त्यांतही पृथ्वी अप्हून अधिक स्थूल आहे तर वायु तेजाहून अधिक सूक्ष्म आहे.

स्थूलत्व हा गुण पृथ्वीचा असल्याने सृष्ट पदार्थांपैकी जे पदार्थ दृश्य व स्थूल असतात त्यांना सापेक्षतया पार्थिव पदार्थ म्हणतात. वस्तुतः यच्चयावत् सृष्ट पदार्थ पृथिव्यादि द्रव्यांच्या समवायातूनच उत्पन्न होत असल्याने ‘पार्थिव’ पदार्थात सुद्धा ज्याप्रमाणे अप्, तेज आदि पृथ्वीशिवाय अन्य भूतांचे अस्तित्व असतेच, त्याचप्रमाणे ‘अपार्थिव’ पदार्थांतही इतर द्रव्यांबरोबर पृथ्वीतत्त्व देखील विद्यमान असतेच. किंबहुना, नामरूपात्मक सृष्टीच्या उत्पत्तीत पृथ्वी ही अधिष्ठानस्वरूप आहे. ‘द्रव्य हे पांचभौतिक असते व पृथ्वीतत्त्वाचा आश्रय करूनच त्याची उत्पत्ती होते’, असे सांगण्यात वाग्भटाचा हाच अभिप्राय असावा. [“पंचभूतात्मकं तत्तु क्ष्मामधिष्ठाय जायते” – अ. हृ.]

पार्थिव द्रव्यात जेव्हा इतरांच्या म्हणजे तेज, वायु व आकाश यांच्या तुलनेने आप्य अणूंचे आधिक्य होते तेव्हा त्यात द्रवत्व उत्पन्न होते. तसेच तैजस अणूंच्या आधिक्याने द्रव्य उष्ण व लघु होते तर वायवीय अणूंच्या आधिक्याने सूक्ष्मत्व, लघुत्व हे गुण त्यात उत्पन्न होतात. आकाशतत्त्वाच्या आधिक्याने याच पार्थिव द्रव्यात सुषिरत्व, विरलत्व या गुणांचा प्रादुर्भाव होतो [‘वायुस्तंत्रयंत्रधरः ............. प्रवर्तकश्चेष्टानामुच्चावचानाम्’ । (च. सं.) । “वायु-वात्मकं स्पर्शः स्पर्शनं रौक्ष्यं प्रेरणं धातुव्यूहनं चेष्टाश्च शारीर्यः । ’ म्हणजे, स्पर्श, स्पर्शन, प्रेरण, रूक्षता, धातुव्यूहन व शारिरीक हालचाली या सर्व वायवीय होत असाही उल्लेख या संहितेत आहे.]. अशा प्रकारे सृष्टीतील सर्व पदार्थ पार्थिव असताही पार्थिव, आप्य, तैजस्, वायवीय व आकाशीय असा जो त्यांचा निर्देश करण्यात येतो तो त्या त्या पदार्थातील पृथिव्यादि

तत्त्वांच्या अंशाधिक्याचा वाचक असतो, विभिन्न पदार्थांत आढळून येणारे स्थूलत्व मूर्तत्व इत्यादि विशिष्ट गुणही पृथिव्यादींच्या या आंशिक आधिक्यामुळेच उत्पन्न होत असतात.

विशिष्ट आकार धारण करणाऱ्या अथवा मूर्त अशा पदार्थांना "पार्थिव" ही संज्ञा योजण्यात येते. त्यातही अंशाधिक्याचे हे तत्त्वच अनुस्यूत असते. कारण हे मूर्त पदार्थ पार्थिवांशभूयिष्ठ म्हणजे पृथ्वीचे परमाणू ज्यांत इतरांहून अधिक आहेत असे असतात. साकारत्व आणि घनत्व हे गुण पार्थिव अंशातच विद्यमान असतात. पार्थिव वस्तूंच्या गणनेत गंध, घ्राणेंद्रिय, गुरुत्व, स्थिरत्व यांच्याबरोबरच मूर्तत्वाचा देखील समावेश केलेला आढळतो ["……… पृथिव्यात्मकं गंधो घ्राणं गौरवं स्थैर्य मूर्तिश्चेति" । च. सं.].पार्थिव द्रव्य "संघातोपचयावह" असते, असे सांगण्यात आले आहे ते म्हणूनच. आप्य व तैजस पदार्थ दृश्य असताही त्यांत असे विशिष्टाकृतिमत्व असत नाही.

## पृथ्वीचा 'गंध' गुण

अशा या पार्थिव द्रव्यात स्थूलता व संघातात्मकता हे गुण विशेषत्वाने असल्याचे दिसून येते. पार्थिव द्रव्यात ज्याचे प्राधान्य असते त्या पृथ्वीतत्त्वाच्या आकर्षकत्व अथवा स्थिरत्व या गुणाचा तो परिणाम असतो. स्थिरत्व हे संघातकारी म्हणजे संघातस्वरूपाचे उत्पादक असते. स्थैर्याभावी संघात संभवतच नाही. इतरांना आपल्याकडे आकर्षित करणारी वस्तू स्वतः स्थिर असणचे अवश्य. ती तशी नसेल तर इतरांचे आकर्षण करू शकणार नाही. पार्थिव परमाणूंत अशा प्रकारचे स्थिरत्व असते व म्हणूनच अन्य भूतांच्या परमाणूंचे आकर्षण करण्याचा धर्म त्यांच्या ठिकाणी विद्यमान असतो. पृथ्वीच्या या आकर्षण गुणाचाच प्राचीन शास्त्रज्ञांनी "गंध" या नांवाने उल्लेख केला आहे.

पार्थिव द्रव्ये संघतोपचयकर म्हणजे संघटना करणारी असतात असा उल्लेख आयुर्वेदीय ग्रंथांत केलेला आढळतो. उदा. 'तान्युपचयगौरवसंघातस्थैर्यकराणि' असे चरकाचार्यांचे तर 'तत्स्थैर्यबलहौरवसंघातो-पचयकरम्' असे सुश्रुताचार्यांचे वचन आहे. 'पार्थिव गौरवस्थैर्यसंघातोपचयावहम्' असे वाग्भटानेही म्हटले आहे. पदार्थांतील पार्थिव अंश हे पदार्थगत परमाणूंचा संहतीभाव अथवा संघटितपणा तसेच पदार्थांच्या ठिकाणी असणारे गुरुत्व, स्थिरत्व, व सामर्थ्य यांना कारक होतात, असा या वचनातील आशय आहे. बहुसंख्य परमाणूंचा संहतीभाव म्हणजे संघात, स्थूलता अथवा घनता अशा संघातामुळेच उत्पन्न होते. परंतु, परमाणूंची ही संघटना आकर्षणगुणाशिवाय संभवत नाही. कारण परमाणू परस्परांकडे आकर्षित होतील तरच त्यांच्यात एकीभाव उत्पन्न होऊ शकेल, अन्यथा नाही. आणि संघात, उपचय आदींना कारणीभूत होणारा प्रधान गुण 'गंध' होय, असे प्राचीन शास्त्रज्ञांनी सांगितलेले आढळते. अर्थात् संघातादींचे कारण असणारा 'गंध' हा गुण 'आकर्षण' या अर्थाचाच वाचक असून 'गंधवत्त्व' हे पृथ्वीचे लक्षण होय' ['गंधवती पृथिवी' –त. सं.],पार्थिव द्रव्ये गंधगुणोल्बण असतात ['………गुरुखरकठिनमंदस्थिरविशदसांद्रस्थूलगंधगुणबहुलानि पार्थिवानि'(च.सं.) । 'तत्र स्थूलसारंसांद्रमंदस्थिरगुरुकठिनं गंधबहुलमीषत् कषायं प्रायशो मधुरमिति पार्थिवम्" (सु. सं.) । 'तत्त्र द्रव्यं गुरु स्थूलं स्थिरं गंधगुणोल्बणम्' । अ. हृ.] इत्यादि वचनांतूनही हाच अभिप्राय सुचविण्यात आला आहे असे यावरून स्पष्ट होते.

## 'स्पर्शवान्' वायूचे कार्य

भूतचतुष्टयातील दुसरे प्रमुख तत्त्व म्हणजे वायु. तो चारही भूतांत सर्वांहून सूक्ष्म अत एव अदृश्य असतो. अखिल कर्मांचे कर्तृत्व प्रामुख्याने त्याच्याकडेच असते. वायु हा तंत्रयंत्रधर व सर्वप्रकारच्या क्रियांचा

अनुक्रमणिका

प्रवर्तक असतो, असा निर्देश चरकाचार्यांनीही केलेला आहे ['वायुस्तंत्रयंत्रधरः ............ प्रवर्तकश्चेष्टानामुच्चावचानाम्' । (च. सं.) । "वाय्-वात्मकं स्पर्शः स्पर्शनं रौक्ष्यं प्रेरणं धातुव्यूहनं चेष्टाश्च शारीर्यः ।' म्हणजे, स्पर्श, स्पर्शन, प्रेरण, रूक्षता, धातुव्यूहन व शारिरीक हालचाली या सर्व वायवीय होत असाही उल्लेख या संहितेत आहे.]. भौतिक विज्ञानात या वायूचे वर्णन 'स्पर्शवान्' या शब्दाने करण्यात आले आहे ['स्पर्शवान् वायुः' – त. सं.].उत्क्षेपणादि क्रियांचा प्रवर्तक असलेला वायु ही सर्व कर्मे परमाणुसमुदायात परस्पर स्पर्शभाव उत्पन्न करून साधीत असतो. चलनात्मकता हे कर्माचे स्वरूप असून उत्क्षेपण अपक्षेपण, आकुंचन, प्रसरण व गमन असे त्याचे प्रमुख भेद पांच संभवतात. सर्व कर्मांचा अंतर्भाव या पांचातच होऊ शकतो.

पृथ्वी व वायु या दोन भूतांचे हे स्वरूप पाहिले म्हणजे ध्यानी येईल की पार्थिव परमाणू स्थिर व द्रव्यरूप असतात तर वायूचे परमाणू चल व कर्मस्वरूप असतात. आकर्षण, अपकर्षण वगैरे ज्यांचे होते ते परमाणू पार्थिव असतात, तर या क्रियांचे कर्तृत्व ज्यांच्याकडे असते ते परमाणू वायवीय असतात. पृथ्वी ही गंधवती असून वायु गंधवाह आहे असे भौतिक शास्त्रज्ञ सांगतात. त्यावरूनही ही गोष्ट दिसून येते की, संयोग व वियोग ज्यांचे होतात ते अंश पार्थिव असतात व ते ज्यांच्यामुळे घडून येतात ते अंश वायवीय असतात. गंध हा गुण पृथ्वीचा व त्याचे अभिवहन वायु करतो. याचाच अर्थ असा की गंधगुणोल्बण पार्थिव परमाणूंचे संयोगवियोगात्मक अभिवहन वायुजनित असते. 'क्रम व गुण ज्याच्या आश्रयाने राहत असतात व जे समवायी कारण असते, त्याला द्रव्य म्हणावे', ['यत्राश्रिताः कर्मगुणाः कारणं समवायि यत् यत् द्रव्यम् ।' च. सं.] या द्रव्याच्या लक्षणानुसार द्रव्य व कर्म यात नित्यसंबंध असला तरी पंचभूतविकारांचे समुदाय असणाऱ्या विविध द्रव्यांत काही अंश सापेक्षतया चलस्वभावी व काही स्थिरस्वभावी असतात. चलस्वभावी अंशांच्या ठिकाणी प्राधान्यतः कर्मर्तृत्व असते व स्थिरस्वभावी अंशाच्या ठिकाणी मुख्यतः कर्माधारकत्व असते. किंबहुना, एकूण पांचभौतिक द्रव्यांचे वर्गीकरणच (१) गतिरूप म्हणजे चलस्भावी व (२) स्थितिरूप म्हणजे स्थिरस्वभावी अथवा (१) द्रव्यस्वरूप व कर्मस्वरूप याप्रमाणे मुख्य दोनच प्रकारांत करताही येऊ शकेल. [हे वर्गीकरण मूलतत्त्वरूप पृथिव्यादि द्रव्यांना अनुसरून कल्पिलेले नाही. तर स्थूल व सूक्ष्म किंवा द्रव्यरूप व कर्मरूप अथवा पार्थिव व वायवीय, याप्रमाणे पंचभूतविकार व चेतना यांच्या समुदायापासून उत्पन्न झालेल्या शरीराचे प्रमुख विभाग दोनच संभवतात, हे सुचविण्यासाठी केलेले आहे.]

### परमाणूंचे संयोग–वियोग

परमाणूचा म्हणजे सूक्ष्म भूतविकारांशांचा संग्रह झाला की, पदार्थाची उत्पत्ती व वृद्धी होते आणि तेच एकमेकांपासून वियुक्त झाले की पदार्थांचा ऱ्हास होतो व ते विनाश पावतात. अर्थात् परमाणू संघटित झाले म्हणजे विशिष्ट पदार्थाच्या स्वरूपात अभिव्यक्त होतात व त्या आकारांत त्यांची अभिवृद्धी होऊ लागते. आणि हेच संघीभूत परमाणू एकमेकापासून अलग झाले की, विशिष्ट आकारांतील पदार्थांच्या ठिकाणी क्षीणत्व येते व कालांतराने तो आकारही अदृश्य होतो, नाश पावतो. परमाणूंचे संघटन अथवा संयोग आकर्षण-गुणामुळे अथवा संश्लेषणामुळे होतो व वियोग अपकर्षण गुणामुळे होतो. आकर्षण हा पृथ्वीचा व अपकर्षण हा वायूचा गुण होय. वस्तुतः आकर्षण व अपकर्षण वायूमुळेच संभवते, कारण चलनात्मकता दोघांतही सामान्य असते. तथापि, एकत्र आलेल्या परमाणूंत जो संघीभाव उत्पन्न होतो तो संश्लेषणामुळे व हे संश्लेषकत्व पृथ्वीच्या ठिकाणी असते. या गुणाच्या अभावी समीप आलेल्या परमाणूंचा संघातही होत नाही व संघीभावातूनच उत्पन्न होणारे पदार्थही आकारास येत नाहीत.

परस्पराकृष्ट परमाणू ज्या प्रमाणात एकमेकाशी संश्लिष्ट, समरस अथवा संघटित होतात, त्यांच्या संघटनेत ज्या प्रमाणात दृढता असते, तदनुसार त्या त्या परमाणुसमुदायाला मूर्तत्व अथवा व्यक्तस्वरूपत्व

अनुक्रमणिका

प्राप्त होत असते. अर्थात् अशा विविध समुदायांत म्हणजे पदार्थात स्वरूपगुणकर्मशः भिन्नत्व संभवते आणि ते सूचित करण्यासाठीच विभिन्न अभिधानांनी त्यांना संबोधण्यात येते.

**रसावस्था**

भौतिक परमाणूंच्या संघटनेतून नामरूपात्मक विविध पदार्थांची उत्पत्ती होते व विघटनेमुळे उत्पन्न झालेल्या पदार्थाचा नाश होतो, हे वर सांगितलेच. पदार्थांचे हे उत्पत्तिविनाश एकदम होत नाहीत. त्यांत विशिष्ट क्रम असतो. पदार्थोत्पादक परमाणूंचे मीलन झाले, ते एकत्र आले म्हणजे प्रथम त्यांचे प्रत्येकाचे विशिष्टाकृतिमत्त्व लोप पावून त्यांना द्रवावस्था प्राप्त होते. या अवस्थेलाच रस म्हणतात. मूर्त द्रव्यांचे द्रवरूपात विलयन होणे अथवा व्यक्तरूप पदार्थाचे अव्यक्तावस्थेत स्थित्यन्तर होणे याचेच नांव रस.

पदार्थांच्या उत्पत्तिविनाशात रसाला एकप्रकारे प्राधान्य असते. पदार्थाच्या व्यक्त स्वरूपाचा विनाश प्रथम रसरूपात होतो आणि रसावस्थेततील परमाणू एकत्र समुदित झाले म्हणजे पुनः ते मूर्तत्व पावतात, त्यांना अन्नपदार्थत्व प्राप्त होते. अमूर्तत्वातून मूर्तत्व, अव्यक्तत्वातून व्यक्तत्व अथवा अदृश्यावस्थेतील वस्तूंना दृश्यत्व प्राप्त होणे म्हणजे उत्पत्ती; आणि उलट मूर्त द्रव्यांना अमूर्तत्व, व्यक्त पदार्थांना अव्यक्तत्व व दृश्य वस्तूंना अदृश्यत्व प्राप्त होणे म्हणजे विनाश. मूर्त द्रव्यांचा विनाश म्हणजे रसीभवन होणे, व या रसावस्थेतून अन्य मूर्त द्रव्यांची पुनश्च उत्पत्ती होणे हा क्रम जिवंत द्रव्यात अव्याहत सुरु असतो. अर्थात् उत्पत्ती व विनाश या दोन क्रियांतील मध्यावस्था म्हणजे रस होय. या अवस्थेत उत्पन्न व उत्पत्स्यमान पदार्थांचे परमाणू अमूर्त, विलीन अथवा विद्रुत स्वरूपात विद्यमान असतात.

सजीव सृष्टीत असणाऱ्या सर्व क्रियांचे स्वरूप याप्रमाणे मुख्यतः उत्पत्तिविनाशात्मक अथवा संयोगवियोगात्मक असते. हे संयोगवियोग म्हणजे चलनाचे अथवा गतीचेच दोन प्रकार होत. आकर्षणरूप गती म्हणजे संयोग चलनाचे अथवा गतीचेच दोन प्रकार होत. आकर्षणरूप गती म्हणजे संयोग व अपकर्षणरूप गती म्हणजे वियोग. गतीत आकर्षकत्व असले म्हणजे संयोग संभवतो आणि उत्सर्जकत्व वा अपकर्षत्व असले म्हणजे त्यांचा वियोग होतो.

**वायूचे योगवाहित्व**

चलन अथवा गति हा गुण वायूचा होय. या वायूच्या ठिकाणी अप्तत्त्वाच्या सहयोगाने संयोगकरित्व व तेजाशी संयोग पावल्याने वियोगकरित्व उत्पन्न होते. या संयोगवियोगात चलन हे सामान्य व प्रमुख असल्याने चलनाचा अथवा गतीचा कर्ता असलेला वायु हाच सर्व संयोगवियोगरूपी क्रियांचा प्रधान कर्ता होय. न्यायादि शास्त्रात 'शीतस्पर्शवत्त्व' हे अपचे् व 'उष्णस्पर्शवत्त्व' हे तेजाचे लक्षण सांगितले आहे ['शीतस्पर्शवत्यः आपः' । 'उष्णस्पर्शवत्तेजः' । त. सं.]. या दोघांतही 'स्पर्श' सामान्य असून तो गुण वायूचा होय ['रूपरहितस्पर्शवान् वायुः' । त. सं.]. शीतत्त्व हा अप्चा व उष्णत्व हा तेजाचा विशेष असून स्पर्श गुण मात्र वायूचाच असतो, असे यावरून स्पष्ट होते. 'वायु हा योगवाही आहे, तो तेजसंयोगाने दाहकारी व अप्संयोगाने शीतकारी होतो", असे सांगून आयुर्वेदीयांनीही असाच अभिप्राय व्यक्त केला आहे ['योगवाहः परं वायुः संयोगादुभयार्थकृत् । दाहकृत् तेजसा युक्तः शीतकृत् सोमसंयुतः' । च. सं.]. अर्थात् चलस्वभावी वायूच्याच ठिकाणी तेजःसंयोगाने दाहकारित्व व अप्संयोगाने शीतकारित्व उत्पन्न होते. तात्पर्य, अप्चे शीतस्पर्शवत्त्व व तेजाचे

अनुक्रमणिका

उष्णस्पर्शवत्त्व म्हणजेच अनुक्रमे संयोजक व वियोजक गुण असून दोघांतही सामान्य असणाऱ्या चलनगुणाचाच निर्देश "स्पर्श" या संज्ञेने करण्यात आला आहे, हे उघड होय.

**शीत व उष्ण गुणांचे कार्य**

आकर्षण व अपकर्षण हे जे दोन गतिभेद वर सांगितले त्यांविषयी आणखी असेही म्हणता येईल की, आकर्षण हे आल्हादजन्य असते तर अपकर्षण उद्वेगोत्पन्न असते. आत्मीय भावनेचा द्योतक चेष्टाविशेष म्हणजे आल्हाद. उद्वेग म्हणजे तिरस्कार. हाही एक चेष्टाविशेष. पण तो विरोधी भावनेचा द्योतक असतो. परमाणूंचे संयोगवियोग शीत-उष्ण गुणांमुळेच होत असल्याने आल्हाद व उद्वेग हे शीत व उष्ण यांचे पर्याय होत असेही म्हणता येईल. कारण आल्हाद व उद्वेग हे कार्यस्वरूपी असून शीत व उष्ण हे गुण त्यांची कारणे असले तरी वस्तुतः कार्य व कारण यांत अभेदच असतो.

**'पचन' म्हणजे काय**?

मनुष्य-शरीरातील पदार्थ म्हणजे रसरक्तादि सात धातू. संयोगामुळे त्यांची उत्पत्ती व वृद्धी होते आणि वियोगामुळे ऱ्हास व विनाश होतो. परमाणूंचे संयोजन झाल्यानंतर या संयुक्तावस्थेतील काही परमाणूंचे वियोजन होण्यापूर्वी म्हणजे संयोग व वियोग ह्या दोन क्रियांच्या मध्ये पृथक्करण अथवा विभाजन हे एक तिसरे कर्म संभवत असते. पदार्थांच्या उत्पत्तिविनाशात्मक कार्यात रस ही एक मध्यमावस्था उत्पन्न होत असते आणि तीत पदार्थगत परमाणू अमूर्त अथवा द्रवरूपात विद्यमान असतात, हा उल्लेख मागे आला आहेच. वर सांगितलेली पृथक्करणाची क्रिया याच रसावस्थेत संभवते. आयुर्वेदात तिलाच "पचन" म्हणतात.

**वायु—पित्त—श्लेष्मा शब्दांचे अन्वकर्थत्व**

शारीरद्रव्यांची म्हणजेच रसररक्तादि धातूंची उत्पत्ती, अभिवृद्धी, ऱ्हास व विनाश होण्यासाठी अशाप्रकारे संयोजन, विभाजन व वियोजन या तीन क्रिया कारणीभूत होत असतात, आहारादि द्रव्यांतील पोषक अंशांचा प्रथम संग्रह करणे, संगृहीत द्रव्यांतील सारभूत म्हणजे शारीरद्रव्यांच्या उत्पादनकार्यात सहायभूत होणारे अंश, याच उत्पादनाच्या कामी असमर्थ असणाऱ्या मलरूप अंशांपासून नंतर विभक्त करणे, आणि विभक्त झालेल्या किट्टांशांचे शेवटी उत्सर्जन वा वियोजन करणे, हे या क्रियांचे सर्वसामान्य स्वरूप असून त्यांचे कर्तृत्व ज्यांच्याकडे असते त्यांना म्हणजे संग्राहक, विभाजक व वियोजक अशा कार्यकारी द्रव्यांनाच आयुर्वेदात श्लेष्मा, पित्त व वायु अशा संज्ञा देण्यात आल्या आहेत. या संज्ञा म्हणजे 'श्लिष्', 'तप्', 'वा', या धातूंची साधित रूपे आहेत आणि त्यांपैकी गती व गंध हा 'वा' धातूचा, संताप हा 'तप्' धातूचा व आलिंगन हा 'श्लिष्' धातूचा अर्थ होय, असे स्पष्टीकरण सुश्रुतसंहितेत केलेले आहे ['तत्र वा गतिगंधनयोरिति धातुः, तप संतापे श्लिष आलिंगने। एतेषां कुद्विहितैः प्रत्ययैः वातः पित्तं श्लेष्मेति च रूपाणि भवन्ति।' सु. सं.]

विसर्ग म्हणजे उत्पादन, आदान म्हणजे पचन व विक्षेप म्हणजे उत्सर्जन या तीन क्रियांच्या योगाने चंद्र, सूर्य व वायु जगाचे ज्याप्रमाणे धारण करतात त्याप्रमाणे शरीरातील कफ, पित्त व वायु हे देखील त्याच क्रियांनी शरीराचे धारण करतात, असे वर्णन सुश्रुतांनी केले आहे [विसर्गादानविक्षेपैः सोमसूर्यानिला यथा। धारयंति जगद्देहं कफपित्तानिलास्तथा।'—सु. सं.].आणि; संग्रह, विग्रह व उत्सर्ग किंवा संश्लेषण ववियोजन अथवा आकर्षण,

पृथक्करण व अपकर्षण याप्रमाणे शारीर द्रव्यांत चालणाऱ्या क्रिया मुख्यतः तीनच असून त्याज्यांचेमुळे चालतात ती कारक द्रव्ये म्हणजेच श्लेष्मा, पित्त व वायु हे त्रिदोष होत, असाच त्यांतील अभिप्राय आहे.

हे वातादि दोष धात्वाश्रयी असतात म्हणजे शरीराचे धारक असे जे स्थूल द्रव्यरूप रसादि धातू त्यांच्या आश्रयाने राहत असतात. 'अस्थिधातूत प्रामुख्याने वायूचे, स्वेद व रक्त यांत पित्ताचे व अवशिष्ट द्रव्यांत म्हणजे रस, मांस, मेद, मज्ञा, शुक्र, मूत्र व पुरीष यांत कफाचे वास्तव्य आढळून येत असल्याने धातु—मल आणि दोष यात आश्रयाश्रयीभाव असतो' असे वाग्भटांचे वचन आहे ['तत्रास्थनि स्थितो वायुः पित्तं तु स्वेदरक्तयोः। श्लेष्मा शेषेषु तैर्नषामाश्रयाश्रयिणां मिथः।' -अ. हृ.].

### त्रिदोष म्हणजे सूक्ष्म व अदृश्य द्रव्येच

परंतु, त्रदोषांचे ठायी शरीरातील सर्व क्रियांचे कर्तृत्व असते अथवा सर्व शारीर कर्मांचे संचालन तेच करीत असतात याचा अर्थ असा नव्हे की त्रिदोष केवळ शक्तिस्वरूप होत. कारण द्रव्याधाररहित शक्ती कधीच उपलब्ध होत नाही, ती द्रव्याश्रयानेच राहते. 'सोम हे कफाचे व अग्नी हे पित्ताचे आत्मतत्त्व असून वायु हाच वायुदोषाचा आत्मा होय', या वचनातही वातादींच्या द्रव्यत्वाचाच निर्देश सूचित करण्यात आलेला दिसतो ['तत्र वायोरात्मैवात्मा, पित्तमाग्नेयं श्लेष्मा सौम्यः।' – सु. सं.]. अर्थात् त्रिदोष म्हणजे धातुमलांप्रमाणे स्थूल व दृश्य नसली तरी सूक्ष्म व अदृश्य अशी द्रव्येच होत. रसादि धातूंचे शक्त्यु-त्कर्षसंपन्न परंतु सूक्ष्म असे अंश म्हणजेच वातादि त्रिदोष. त्यांचे वर्णन शक्तिस्वरूप म्हणून करण्यात येते त्याचेही कारण हेच की, ते सूक्ष्म—द्रव्य—रूप असतात आणि धातुमलांहून सामर्थ्य त्यांत आधिक प्रमाणात असते.

---

टीप ५ — [आकाशाचे न्यूनाधिक्य तत्वतः संभवत नाही. कारण ते ज्यामुळे संभवावे असे परमाणूच आकाशाचे असत नाहीत. अर्थात् आकाशाचे न्यूनाधिक्य आकाशेतर भूतांच्या न्यूनाधिक्यावर अवलंबून असते, हे उघड होय.]

———

अनुक्रमणिका

# दर्शन ४ – शारीरधातूंची उत्पत्ती

पृथिव्यादि महाभूते व अव्यक्त ब्रह्म यांच्या समुदायापासून जो देह आकारास येतो त्याचा अत्यंत सूक्ष्म असा आद्य घटकसुद्धा षड्धातुक असतो. सूक्ष्म घटक म्हणजेच परमाणुस्वरूप अवयव. असे अणुस्वरूप अवयव शरीरात केवळ असंख्य असतात. 'शरीरावयवास्तु परमाणुभदेन अपरिसंख्येया भवन्ति' असे चरकांचे वचन आहे.

पृथिव्यादि महाभूते ज्याच्यामुळे एकमेकांशी यंयोग पावतात आणि या संयुक्तावस्थेत उत्पत्तीपासून विनाशापर्यंतच्या सर्व क्रिया जो करतो त्या परमात्म्याच्या अंशाला जीवात्मा म्हणतात. 'प्रलयकाली पुरुष इष्ट भावांपासून वियुक्त होतो आणि पुनश्च अव्यक्त स्वरूपातून व्यक्त स्वरूपात व व्यक्त स्वरूपातून अव्यक्त स्वरूपात प्रवेश करतो. रजस्तमोविष्ट पुरुषाचे चक्रवत् परिवर्तन याप्रमाणे नित्य सुरु असते', असे चरकाचार्य म्हणतात ["पुरुषः प्रलये चेष्टैः पुनर्भावैर्वियुज्यते । अव्यक्ताद् व्यक्ततां याति व्यक्तादव्यक्ततां पुनः । रजस्तमोभ्यामाविष्टश्चक्रवत्परिवर्तत् ।" च. स.]. अर्थात् पृथिव्यादींचा संयोग घडवून आणणारा व या संयुक्तावस्थेत म्हणजेच शरीरात संभवणाऱ्या सर्व क्रियांचा मुख्य प्रेरक रजस्तमोयुक्त पुरुष म्हणजे जीवात्माच होय.

हा पुरुष जी प्रेरणा करतो तिलाच चेतना अथवा चैतन्य म्हणतात. 'परमात्मा स्वतः निर्विकार असतो; सत्त्व, भूतगुण व इंद्रिये यांच्याशी संयोग पावून तो चैतन्याला कारणीभूत होतो आणि नित्य द्रष्टा बनून सर्व क्रियांचे अवलोकन करीत असतो', असे चरकांचे वचन आहे ['निर्विकारः परस्त्वात्मा सत्त्वभूतगुणेंद्रियैः । चैतन्ये कारणं नित्यो द्रष्टा पश्यति हि क्रियाः' च. सं.]. अर्थात् गंधस्पर्शादि भौतिक गुण, मन आणि इंद्रिये यांच्यात परमात्म्याच्या संयोगाने चैतन्याचा प्रादुर्भाव होतो. हे चैतन्य असणे म्हणजेच जिवंतपणा. इच्छा, द्वेष, प्रयत्न इत्यादि आत्मगुण या सचेतन अवस्थेतच विद्यमान असतात. शरीर सचेतन असले म्हणजेच षड्धातुक असते, चेतना लुप्त झाली की तेच पंचत्व पावते. 'शरीर हि गते तस्मिन शून्यागारमचेतनम् । पंचभूतावशेषत्वात् पंचत्वं गतमुच्यते ।' [च.सं.], असे चरकांचे वचन आहे.

अशा प्रकारे जीवात्मा व पंचभूतविकार यांच्या समुदायापासून सापेक्षतया सुसूक्ष्म असा जो शारीर अवयव किंवा शरीराचा आद्य घटक उत्पन्न होतो, त्याची आहारादिकांतून म्हणजे आहार, जल, वायु आदींतून प्राप्त होणाऱ्या पोषक अंशांच्या योगाने क्रमशः अभिवृद्धी होते. शरीराचा हा आद्य अवयव सूक्ष्म असतो म्हणजे परमाणुस्वरूप असत नाही, कारण पृथिव्यादींचा तो समुदाय असतो. शरीराच्या व्यक्तरूप अवयवांच्या तुलनेने तो सूक्ष्मतम असतो. या आद्य अवयवांचे घटक म्हणजे पार्थिवादि अंशच. आहारादिकांतून मिळणाऱ्या पार्थिवादि अंशांनी तेच परिपुष्ट होतात.

### शरीराची वाढ मर्यादित असते

शरीराला पोषक किंवा वृद्धिकर होणारी द्रव्ये अमर्याद असतात. परंतु, शरीराची वाढ मात्र ठराविक मर्यादेपर्यंतच होत असते. नित्य हितकर आहार-विहार सेवन केले, साहसादि कर्मे वर्ज्य केली व आयुष्य कमी करणारी विघ्नेही उद्‌भवली नाहीत तरी सुद्धा विशिष्ट मर्यादेनंतर आयुष्याचा ज्याप्रमाणे शेवट होतोच त्याचप्रमाणे आहारादिकांतून प्राप्त होणाऱ्या पुष्टिकर अंशांचे सेवन यथोचित केले तरी शरीराची वाढही एका विशिष्ट प्रमाणातच होत असते, अमर्याद होत नाही.

अनुक्रमणिका

शरीराच्या वाढीप्रमाणे त्याचे आयुर्मानही मर्यादित असते. किंबहुना, वृद्धी, विकास, उत्क्रांती, सामर्थ्य, विशिष्टाकृतिमत्त्व व आयुष्य हे सर्वच सृष्ट पदार्थांचे प्रतिनियत असते.

आपल्या विशिष्ट आकारातील वाढ पूर्ण झाली की शारीरघटक व रसरक्तादि धातू संततिरूपाने वाढू लागतात. आकाराने आणि गुणाने स्वसदृश पण स्वभिन्न पदार्थांची आपल्याच अंशांपासून होणारी उत्पत्ती म्हणजे संतती. एका उत्पादक घटकापासून अथवा अवयवापासून दुसरा व त्यापासून तिसरा असे शारीर घटक,याप्रमाणे उत्पन्न होत असतात. या संततिपरंपरेतच शरीराला पूर्णता येते.

शारीर अवयवांची व पर्यायाने एकूण शरीराची जी वाढ होत असते ती एकप्रकारे रससक्तादि धातूंची उत्पत्ती अव्याहत व यथावत् रीतीने होण्यावर अवलंबून असते. या धातूत्पत्तीत विशिष्ट क्रम दिसून येतो.

**रसधातु**

निरनिराळी आहार्य द्रव्ये जठरात प्रविष्ट झाली की तत्रस्थ अग्नीकडून त्यांचे मूर्तत्व नष्ट होते. आहार्य द्रव्यांच्या या द्रवरूपालाच आहाररस म्हणतात. या आहाररसाचा पुढे यकृत्प्लीहेत प्रवेश झाला म्हणजे तेथे रंजकपित्ताकडून त्यावर पुनश्च पचनसंस्कार होतो व त्याचा परिणाम म्हणजे शरीरातील सुसूक्ष्म स्रोतसांतूनही संचार करण्याची क्षमता या रसाच्या ठिकाणी उत्पन्न होते. या संस्कारात आहारसाला रंजकत्व-रागिताही प्राप्त होते ['स खलु आप्यो रसः यकृत्प्लीहानौ प्राप्य रागमुपैति'–सुं मं.]. आहाररसाच्या या शुद्ध अथवा संस्कारित अवस्थेलाच "रसधातु" म्हणतात. हा रसधातु शरीरात अविरत भ्रमण करीत असताना कायाग्नीकडून पुनश्च विपाचित होतो, आणि अशा रीतीने तो अधिक शुद्ध झाला म्हणजे त्यालाच "रक्तधातु" ही संज्ञा प्राप्त होते.

आहाररसाला यकृतातील रंजकपित्ताच्या योगाने रक्तवर्णत्व प्राप्त झाले की त्याला "रसधातु" म्हणावे असे वर सुचविले. हे रक्तवर्णी द्रव्य म्हणजेच 'रक्तधातु' होय असे काही लोकांचे म्हणणे असून "शरीरस्थ ऊष्म्याच्या योगाने रसाच्या ठिकाणी रंजितता प्राप्त झाली की त्यालाच रक्त म्हणतात", या सुश्रुतवचनाचा [रंजितास्तेजसा त्वापः शरीरस्थेन देहिनाम् । अव्यापन्नाः प्रसन्नेन रक्तमित्यभिधीयते ।'–सु. सं.] या संबंधात आधार म्हणून उल्लेखही करण्यात येतो. परंतु, ते विचारणीय वाटते.

**रक्तधातूचे विशिष्ट कार्य**

कारण रस, रक्त, मांस, इ. जे सात शारीरधातू सांगण्यात आले ते सर्वदेहव्यापी आहेत. ज्वरादि सर्वशरीरव्यापी विकारांचे रसधात्वाश्रयित्व त्यावरूनच उत्पन्न होऊ शकते. उलट रंजकपित्ताने रक्तवर्णी झालेल्या आहाररसालाच 'रक्त' मानले तर जठरापासून यकृतापर्यंतच्या भागातच केवळ रसधातूचे अस्तित्व असते, तो सर्वदेहव्यापी नसतो, असे स्वीकारणे भाग पडेल, आणि ज्वरादि देहव्यापी विकार रसधात्वाश्रयी होत हे म्हणणेही असंगत ठरेल. 'व्यानवायूकडून शरीरातील सर्व विभागांत एकाच वेळी रसधातूचे विक्षेपण अविरत चालू असते, आणि हा क्षिप्यमाण रसधातु जेथे स्थानवैगुण्यामुळे प्रतिरुद्ध होतो तो विकृति उत्पन्न करतो' ['व्यानेन रसधातुर्हि विक्षेपोचितकर्मणा । युगपत् सर्वतोऽजस्रं देहे विक्षिप्यते सदा । क्षिप्यमाणः स्ववैगुण्यात् रसः सज्जति यत्र सः । तस्मिन्विकारं कुरुते ।' अ. हृ.]; 'शब्द, प्रकाश व जल यांच्या अखंडित प्रवाहाप्रमाणे तो रसधातु समस्त

शरीरात सतत परिभ्रमण करीत असतो' ['स शब्दार्चिर्जलसंतानवत् अणुना विशेषण अनुधावत्येव केवलं शरीरम्'—सु. सं.]; इत्यादि वचनेही, सर्व शरीरात ज्याचे विक्षेपण होते तो धातू रसधातु होय, असेच सांगत आहेत. 'रस' शब्दाची व्युत्पत्ती सुश्रुताने 'रस गतौ अहरहर्गच्छतीति रसः' अशी दिली आहे. प्रत्यही नित्य गमन करीत असतो तो रस. असा याचा अर्थ. अर्थात् या व्युत्पत्तीत रसाचे सर्वदेहसंचारित्वच सुचविलेले दिसते. "रसवह स्त्रोतसे दोन असून हृदय व रसवाहक धमन्या हे त्यांचे मूल होय," असे सुश्रुतसंहितेत ['रसवहे द्वे तयोर्मूलं हृदयम् रसवाहिन्यश्च धमन्यः' – सु सं.] व "रसवह स्त्रोतसांचे मूल हृदय", असे चरकसंहितेत ['रसवहानां स्त्रोतसां हृदयं मूलम्' – च. सं.] म्हटले आहे, त्यांतूनही, हृदयातून जो विक्षेपित होतो तो धातू "रस"होय, असाच आशय व्यक्त होतो. "रंजितास्तेजसा त्वापः .......'' या सुश्रुतोक्तीतही यकृद्गत ऊष्म्याने नव्हे तर शरीरस्थ ऊष्म्याने रंजित झालेल्या रसाला "रक्त" म्हणावे, असे प्रतिपादन केले आहे, ही गोष्ट विसरता कामा नये. याकृत पित्ताकडून आहाररसाचे पचन झाले म्हणजे शरीरातील सूक्ष्मातिसूक्ष्म स्त्रोतसातूनही त्याचे अभिसरम विनायास होऊ शकते. परंतु, या पचनसंस्कारामुळे त्याला रक्तवर्णता आली तरी "रक्तधातु" ही संज्ञा मात्र प्राप्त होत नाही. यकृद्गत उष्णतेने विपक्व झालेला व रक्तवर्णत्व पावलेला आहारस रसधातूच होय. 'रक्त' ही संज्ञा केवळ लाल रंगाची सूचक नाही. रक्तधातूचे वैशिष्ट्य सांगण्यासाठी तिची प्रवृत्ती झाली आहे. रक्तत्व म्हणजे परस्परानुरागित्व. जठराग्नीच्या योगाने विद्रुत झालेले व यकृद्गत उष्णतेच्या संयोगाने विपाचित झालेले आहारांश स्वतःच्या विशिष्ट आकाराचा किंवा मूर्तस्वरूपाचा त्याग करून रसस्वरूपात म्हणजे अमूर्तावस्थेत विलीन होतात. हे निराकारत्व येते तेव्हाच शरीरातील सुसूक्ष्म अवयवांतही प्रवेश करणे त्यांना शक्य होते. आणि अशा रीतीने सर्व शरीरात प्रसृत झालेल्या या आहारांशांपासूनच मूर्त अशा शारीर अवयवांची उत्पत्ती व अभिवृद्धी होते. अर्थात् ती व्हायची तर विश्लिष्ट अथवा रसावस्थेत अवस्थित असलेल्या आहारांशांचा पुनःसंश्लेष व्हावा लागतो. रसस्वरूपात विलीन झालेल्या आहारांशांचे संश्लेषणानुकूल किंवा संयोगोन्मुख अवस्थेत होणारे परिवर्तन म्हणजेच परस्परानुरागी 'रक्तत्व'. रसाचा सर्व शरीरात संचार झाल्यानंतर कायाग्नीच्या योगाने रसाच्या ठिकाणी हे रक्तत्व प्रादुर्भूत होते. प्रव्यक्त किंवा मूर्तस्वरूपी मांसधातूत रक्ताची परिणती त्यानंतरच होते. तात्पर्य, सुसूक्ष्म स्त्रोतसांतूनही अभिसरण विनायास व्हावे एतदर्थ आहाराकृष्ट द्रव्यांशांची विश्लिष्ट, असंयुक्त किंवा विरक्त अवस्था म्हणजे रसधातु, आणि अभिव्यक्तीसाठी किंवा विशिष्टाकृतिमत्व प्राप्त होण्यासाठी उन्मुख करणारी त्याची द्रव्यांशांची संश्लेषक किंवा संयोगकारक अशी परस्परानुरक्तावस्था म्हणजे रक्तधातू आणि हे सर्व ध्यानी घेऊनच यकृत्गत पित्ताने विपक्व झालेला आहाररस म्हणजे रसधातू असे वर म्हटले आहे.

## रक्तोतर मांसधातूची उत्पत्ती

कायाग्नीकडून विपाचित झालेल्या रसधातूलाच "रक्त" म्हणतात हे वर सांगितलेच. शरीराचे पोषण करणारे आहारांश त्यात विलीन झालेले असतात. अशा या रक्तापासूनच नंतर जो घन व विशिष्ट आकारात अभिव्यक्त होणारा धातू उत्पन्न होतो त्याचेच नांव मांस. अर्थात् द्रवरूप रक्तापैकीच काही अंश एकमेकांकडे आकर्षित होऊन घनरूप पावले. विशिष्ट आकारात अभिव्यक्त झाले म्हणजे त्या मूर्त किंवा साकार रक्तांशांनाच "मांस" ही संज्ञा प्राप्त होते.

पूर्व स्वरूपाचा विनाश होणे, आहार्य द्रव्ये अथवा शारीर अवयव यांचे मूर्तत्व किंवा विशिष्टाकृतिमत्त्व विलीन होणे, रसस्वरूपात संक्रमित होणे, हे कार्य वियोजनात्मक अथवा विश्लेषणात्मक होय. संघीभूत अथवा समुदायात्मक मूर्त पदार्थ असमुदित अथवा असंघटित अशा अमूर्त द्रवरूपात अवस्थान्तरित होतो, याचाच अर्थ असा की त्यात संघटित अथवा समुदित झालेली द्रव्ये एकमेकांपासून विश्लिष्ट होत असतात.

अनुक्रमणिका

जिवंत शरीरात घडून येणाऱ्या पदार्थगत परमाणूंच्या या विश्लेषणातूनच उन्नत अतवा उत्क्रांतरूप पदार्थांची निर्मिती होते. हे कार्य संयोजनामत्क अथवा संश्लेषणात्मक होय. द्रवीभूत झालेल्या परमाणूंपैकीच काही परमाणूंचा पुनश्च संयोग होतो, त्यांना विशिष्टाकृतिमत्त्व प्राप्त होते, आणि अश्या रीतीने अन्य पदार्थांचा प्रादुर्भाव होतो. आहारातील पोषक अंशांचा रस झाला की त्यापासून पुढे मांस ही मूर्त वस्तू निर्माण होते, आणि मांसघटकही पुनश्च विद्रुत झाले की त्यांपैकीच काही संघटित होतात व अस्थिनामक धातू आकारास येतो. रसरक्तादि सातही धातूंच्या उत्पतिविनाशात संयोगवियोगात्मकता अशाप्रकारे अनुस्यूत असते. परमाणूंच्या संयोगवियोगात तिसरे विभाजनकर्म मध्यंतरी संभवते. संघटित परमाणू विद्रुत अथवा विश्लिष्ट झाल्यावर होणारे सारकिट्टविवेचन ते हेच. रससक्तादि शारीर द्रव्यांच्या उत्पत्तिविनाशात संयोजन विभाजन व वियोजन या तीनच क्रिया याप्रमाणे प्रमुखत्वाने संभवतात व त्यांचे कर्तृत्व ज्यांचेकडे असते त्यांनाच कफपित्तादि दोष म्हणतात, असे मागील प्रकरणात सांगितले ते याच अभिप्रायाने.

### रसादि संज्ञांची निरुक्ती

रस, रक्त, मांस इ. ज्या संज्ञा शारीर धातूंना योजण्यात आल्या आहेत त्याही मोठ्या स्वरूपबोधक व वास्तवार्थवाची आहेत असे दिसून येते. "रसनात् रसः" अशी "रस" शब्दाची व्युत्पत्ती आहे. रसन म्हणजे विलयन अथवा स्वरूपाचा किंवा विशिष्ट आकाराचा नाश. अर्थात् रस या शब्दावरून अव्यक्तरूपत्व सूचित होते. "रक्त" हा शब्द परस्परानुरागित्वाचा सूचक आहे. 'रंजनात् रक्तम्' अशी त्याची निरुक्ती आहे. 'रंज रागे' या धात्वर्थावरूनही रक्तावस्थेतील द्रव्यांशांचे अथवा अणूंचे परस्परानुरागित्व सूचित होते. मांस म्हणजे परस्परानुक्त अणूंची रक्तोत्तर संभवणारी समुदायस्वरूपी अवस्था. 'मांस' या शब्दातच व्यक्तरूपत्व किंवा अभिव्यक्ती अभिप्रेत आहे. या मांस–संज्ञक संघातात मार्दव असते, अस्थिधातूप्रमाणे काठिण्य नसते, हा विशेष. मांसावस्थेतील संघीभूत परमाणूंपैकी काही पुनश्व विद्रुत झाले म्हणजे त्यांपासून मेदोधातू निर्माण होतो. मेद म्हणजे मांसरसच. मेदापासूनच अस्थिधातू उत्पन्न होतो. हा धातू व्यक्तरूप म्हणजे संघातरूपात, विशिष्ट आकारात अभिव्यक्त होणारा असतो, या संघातात स्थिरत्व व काठिण्य मांसाहून सापेक्षतया [स्थिरत्व व कठिणत्व पूर्णपणे जीत आहे अश्या वस्तूत उत्पत्तिविनाशस्वरूपी चलनात्मक क्रम संभवणेच शक्य नसते. अस्थीत ते संभवते. अर्थात् स्थैर्य व काठिण्य अस्थिधातूत पूर्णपणे असत नाही, मांसधातूहून अधिक प्रमाणात असते, इतकेच.] अधिक असते. अस्थि हा शब्द ज्या 'ष्ठा' धातूपासून तयार झाला आहे त्याचा अर्थ गतिनिवृत्ती, गतिरोध असा आहे ['ष्ठा गतिनिवृत्तौ'–सि. कौ.]. अर्थात् 'अस्थि' या शब्दातूनच स्थैर्य व काठिण्य सूचित होते. अस्थीचे रसीभवन झाले की त्यापासून मज्ञा धातू उत्पन्न होतो. 'मज्ञा' म्हणजे अस्थिगत अणूंची अस्थ्युत्तर संभवणारी रसावस्थाच. या धातूत गर्भबीजे मज्ञित म्हणजे अव्यक्त स्वरूपात अवस्थित असतात. म्हणूनच त्याला 'मज्ञा' म्हणतात. 'मस्जो शुद्धौ' हा धात्वर्थही मज्ञनाचा सूचक असाच आहे. मज्ञेचेच विशुद्ध रूप म्हणजे शुक्र. 'शुक्र' या शब्दात 'शुचिः' हा धातू असून स्वच्छता, पूतत्व असा त्याचा अर्थ आहे ['शुचिः पूतीभावे–सि.कौ.']. आणि पूतत्व, स्वच्छत्व म्हणजे क्लेद ['पूतीभावः क्लेद इति'–सि.कौ.], रसावस्था किंवा द्रवावस्था. अर्थात् अन्य शब्दांप्रमाणे शुक्र ही संज्ञाही शुक्लत्व व स्वच्छत्व यांचीच वाचक आहे. यकृद्गत रंजक पित्त व शरीरोष्मा यांच्याकडून क्रमशः विपाचित झालेल्या आहाररसाला तो अधिक शुद्ध झाल्याने ज्याप्रमाणे रक्तधातू म्हणून संबोधण्यात येते, त्याचप्रमाणे संघातात्मक मांसधातूनंतर अस्थिधातूपासून उत्पन्न होणाऱ्या शुद्धतर धातुरसाला शुक्र म्हणण्यात येते. आहार्य द्रव्यांचा रस झाला व पचनादि संस्कारांमुळे त्यात रक्तत्व अथवा संश्लेषणात्मकत्व प्रादुर्भूत झाले की शरीरातील विविध अंगांचा व अवयवांचा तो ज्याप्रमाणे उत्पादक बनतो, त्याचप्रमाणे विशिष्ट आकार धारण करणाऱ्या मांसास्थीपासून उत्पन्न झालेला विशुद्ध रस गर्भोत्पत्तीला कारणीभूत होतो.

रसरक्तादि धातूंची उत्पत्ती यथावत् विपक्व अशा आहाररसापासून याप्रमाणे होत असते. हे सातही धातू शरीराच्या आद्य म्हणजे शुक्रार्तवसंयोगोत्पन्न अशा सुसूक्ष्म घटकातही सूक्ष्म स्वरूपात विद्यमान असतात. आहारोत्पन्न रसापासून त्यांची अभिवृद्धी होते.

———

अनुक्रमणिका

# दर्शन ५ – शारीर द्रव्यांचे सामर्थ्य

शरीराचे बीज म्हणजे शुक्रार्तवसंयोग. शरीराचा आद्य घटक या बीजापासून निर्माण झाला की स्वभावधर्मानुसार त्याची वाढ होऊ लागते; आणि वृद्धी, विकास, उत्क्रांती, इत्यादि अवस्था उपभोगीत यथासमय तो सर्वांगपरिपूर्ण स्वरूपात अभिव्यक्त होतो. अर्थात् बीज तसा वृक्ष या न्यायाने या सर्व स्थित्यंतरात शरीर बीजानुसारी असते.

संघातत्त्व किंवा विशिष्टाकृतिमत्त्व शरीरात प्रथम मांसरूपाने अभिव्यक्त होते. मांस ही शरीरातील व्यक्तरूपात आविष्कृत होणारी आद्य वस्तू होय. मांसानंतरची अशी साकार सृष्टी म्हणजे अस्थी. या अस्थिसंज्ञक संघातात स्थिरत्व मांसाहून अधिक असते. मांसधातू आहाररसापासून व अस्थी मेदोधातूपासून उत्पन्न होतो. वस्तुतः आहाररस हेच सर्व धातूंचे उत्पत्तिकारण. अस्थीही त्यापासूनच निर्माण होणार हे उघड आहे. तथापि, मेदोवस्था प्राप्त झाल्यानंतरच अस्थिधातूची निर्मिती होत असल्याने मेदाला अस्थीचे उत्पादक मानणे अधिक योग्य. विशिष्ट आकारात अभिव्यक्त होणाऱ्या या दोन धातूंच्या आश्रयानेच सप्तधातुक देहातील रस, रक्त, मेद, मज्जा व शुक्र हे अवशिष्ट द्रवरूप धातू राहत असतात.

उत्पाद्य म्हणजे उत्पन्न होणारी वस्तू ही घन अथवा व्यक्तरूप असते तर उत्पादक म्हणजे उत्पाद्य वस्तूच्या उत्पत्तीला हेतुभूत होणारी वस्तू द्रव किंवा अव्यक्तरूप असते. सात धातूंपैकी मांस व अस्थी हे दोन धातू घन किंवा व्यक्तरूप म्हणजे विशिष्ट आकारात अभिव्यक्त होणारे असे असून बाकीच्यात मात्र असे मूर्तत्व, व्यक्तत्व किंवा साकारत्व नसते. ते द्रवरूप असतात. अर्थात् मांस व अस्थी हे धातू उत्पाद्य व उर्वरित पांच धातू उत्पादक होत असे म्हणता येईल. रस व रक्त यांपासून मांसाची उत्पत्ती होते, मेदापासून अस्थीची निर्मिती होते, तर मज्जा व शुक्र हे गर्भाचे उत्पादक असतात.

रसरक्तादि उत्पादक धातूंत अमूर्तत्व, विशिष्टाकृतिहीनत्व अथवा द्रवत्व सामान्य आहे तर मांस व अस्थी या उत्पाद्य धातूंत मूर्तत्व, विशिष्टाकृतिमत्त्व अथवा घनत्व सामान्य आहे. तथापि या प्रत्येकात कोणता ना कोणता तरी स्वरूपविशेष आहे. आणि तो स्पष्ट व्हावा या हेतूनेच रस, रक्त याप्रमाणे प्रत्येकासाठी संज्ञा निरनिराळी योजण्यात आली आहे. ही स्वरूप भिन्नता पुढीलप्रमाणे आढळून येते.

**धातूंचे स्वरूपविशेष**

रसधातूहून रक्तधातू अधिक शुद्ध असतो. पृथक्करणाचे सामर्थ्य त्यांत अधिक असते. रस व रक्त या दोघांतही अवयवपोषक अंश विद्रुत स्वरूपात विद्यमान असताही विभिन्न अवयवांशी पृथक्तया संयोग पावण्याची वा संश्लिष्ट होण्याची प्रवृत्ती त्या पोषक अंशांच्या ठिकाणी जी उत्पन्न होते ती त्यांना रक्तावस्था प्राप्त झाल्यावरच. रसावस्थेत ही संघीभावोन्मुखता नसते. घनरूप मांसापासून उत्पन्न होणारा मेद रसरक्तांहून अधिक घन व शुद्ध असतो. मेद ही निराळी संज्ञा त्यासाठीच योजिली आहे. मज्जा हा चवथा द्रवधातू. तो अस्थिजनित असल्याने मेदापेक्षाही अधिक घन व शुद्ध असतो. पांचवा व शेवटचा द्रवधातू म्हणजे शुक्र; तो सर्व धातूंत शुद्धतम म्हणजे मलहीन असतो. इतर धातूंप्रमाणे शुक्रधातूचाही मल सांगितला आहे. तो म्हणजे ओज. मात्र रसरक्तादि अन्य धातूंच्या कफपित्तादि मलांप्रमाणे हे ओज उत्सर्जनीय नसते, उलट प्रसादरूप असते. योग्य वेळी उत्सर्जित न झाले तर अन्य धातूंचे मल धातुघटकांना मलिन करतात, परंतु अनुत्सर्जित ओजामुळे असे मलिनीकरण कुणाचेच होत नाही. किंबहुना, ज्याचा विनाश झाला की,

जीविताचा नाशही अटळ असतो, आणि ज्याच्या अस्तित्वावरच जीविताचे अस्तित्वही अवलंबून असते, अशी वस्तु म्हणजे ओज. 'यन्नाशे नियतं नाशो यस्मिंस्तिष्ठति तिष्ठति [अ. हृ.]', अशा शब्दांच ओजाचे जीवनाधारकत्व कथन करण्यात आले आहे.

उत्तरोत्तर अधिकाधिक निर्मल व घनप्राय होत जाणाऱ्या रसादि द्रवरूप धातूंच्या भिन्न संज्ञा अशा प्रकारे स्वरूपभेदाच्या जश्या वाचक आहेत त्याप्रमाणे मांस व अस्थी हे दोन धातू घनरूप असताही त्यात स्वरूपभिन्नता आहे, आणि भिन्न संज्ञांनी त्यांना संबोधण्यात तीच लक्षित आहे. मूर्तत्व हा धर्म मांसाप्रमाणे अस्थीतही आहे. पण घनत्व, कठिणत्व व स्थिरत्व मांसापेक्षा अस्थीत अधिक प्रमाणात आहे.

रसरक्तादि धातूंत अशा प्रकारे स्वरूपभिन्नता असली व तदनुसार त्यांना विभिन्न सज्ञांनी संबोधण्यात आले असले तरी त्यांत मुख्य भेद दोनच पडतात. किंबहुना, सर्व सृष्ट द्रव्यांप्रमाणे रसरक्तादि सप्तधातूंचे वर्गीकरणही स्थूल व सूक्ष्म; व्यक्तरूप व अव्यक्तरूप; दृश्य व अदृश्य [रसरक्तादि धातू द्रवरूप असले तरी दृग्गोचर असतातच. परंतु, विशिष्ट आकृतिरूपात ते दृश्य होत नाहीत, या अर्थानेच त्यांना अदृश्य म्हणावयाचे. मूर्तामूर्तत्व हेही असेच विशिष्टाकृतिमत्त्वावरून ठरवावयाचे.]; मूर्त व अमूर्त; घन व द्रव; आकर्षक व अपकर्षक; संघीभूत व रसीभूत; अभिव्यक्त व अनभिव्यक्त; याप्रमाणे मुख्यतः दोनच विभागांत होऊ शकेल.

### धातूंच्या उत्पत्ति विनाशांची कालमर्यादा

'रसाद्रक्तं ततो मांसं मांसान्मेदः प्रजायते । मेदसोऽस्थि ततो मज्जा मज्जातः शुक्रसंभवः [सु. सं.], या वचनानुसार रसापासून रस, रक्तापासून मांस याप्रमाणे सातही धातूंची आहारापासून जी क्रमशः उत्पत्ती होते ती उत्क्रांतिरूप असते. म्हणजे रसापासून शुक्रापर्यंतच्या धातूंत स्थिरत्व, शुद्धत्व व निर्मलत्व उत्तरोत्तर अधिकाधिक प्रमाणात निर्माण होत असते. आणि हे स्वीकारले म्हणजे रसादि धातूंच्या उत्पत्तिविनाशाला सारखीच समयमर्यादा पुरत नाही, इतकेच नव्हे तर ही कालमर्यादा उत्तरोत्तर धातुगणिक वाढती असते असे मानणे सुसंगत वाटते. परंतु, 'स खलु त्रीणि त्रीणि कलासहस्त्राणि पंचदश च कला एकैकस्मिन्धातौ अवतिष्ठते । एवं मासेन रसः शुक्रीभवति, स्त्रीणां चार्तवम् । ' म्हणजे प्रत्येक धातूत तीन हजार पंधरा कला इतका काल रसाचे वास्तव्य असते, अशा रीतीने एक महिन्यात रसाचे पुरुषशरीरात शुक्र व स्त्रीशरीरात आर्तव बनते; याप्रमाणे सातही धातूंच्या उत्पत्तीची कालमर्यादा सारखीच असल्याचे सुश्रुतसंहितेत सांगितलेले आहे.

वस्तुतः, आहाररसापासून एक दिवसाने रसधातू, त्यापासून दोन दिवसांनी रक्तधातू, रक्तापासून तीन दिवसांनी मांस, त्यापासून चार दिवसांनी मेद, मेदापासून पांच दिवसांनी अस्थी, अस्थीपासून सहा दिवसांनी मज्जा व मज्जेपासून सात दिवसांनी शुक्र; याप्रमाणे एकूण दिवस २८ होतात. आणि यांतच शुक्रावस्थेत स्थैर्य येण्यासाठी अवश्य असणारा अधिक अवधी म्हणून दोन दिवस मिळविले की तीस दिवसांची संख्या पूर्ण होते व एक महिन्याने आहाराचे शुक्र बनते, हे वर्णन यथार्थही मानता येते. परंतु, तरीही आहाररसाची प्रत्येक धातूत म्हणजे त्या त्या धातुस्वरूपात राहण्याची समयमर्यादा तीन हजार पंधरा कला इतकीच असते, हे मात्र चिंतनीयच होय. कारण विपाकक्रियेमुळे रसरक्तादि धातू उत्तरोत्तर अधिकाधिक शुद्ध, निर्मल व चिरजीवी होत असल्याने त्यांच्या उत्पादनाचा कालावधी समान असतो हे म्हणणे सयुक्तिक वाटत नाही.

अनुक्रमणिका

उत्पत्ती, अभिवृद्धी, उत्क्रांती आदि क्रिया शारीर धातूंत ज्या घडून येत असतात त्या सर्वांना संयोगवियोग हे प्रधानतया कारणीभूत होतात. अर्थात् शारीर द्रव्यांत संभविणारी सर्व कर्मे द्विविध म्हणजे संयोगवियोगात्मक अशीच असतात. 'तत्र संयोगापेक्षी लोकशब्दः । षड्धातुसमुदायो हि सामान्यतः सर्वलोकः... । षड्धातुविभागो वियोगः । स जीवापगमः । ' म्हणजे, लोक हा शब्द संयोगापेक्षी आहे, त्या शब्दाने सामान्यतः पंचभूतविकार व चेतना यांचा संयोग अभिप्रेत आहे, हे सहा धातू एकमेकांपासून विभक्त होणे म्हणजे वियोग, यालाच जीवनपगम म्हणतात; या वचनातून उत्पत्तिविनाशात्मक सर्व कर्मांना संयोगवियोगच हेतूभूत असतात, असे चरकाचार्यांनीही सुचविले आहे.

धातूत्पत्तीत पोष्य व पोषक यांचा समागम झाला की प्रथम रसीभवन किंवा विद्रुतीकरण होते. शारीर धातू हे पोष्य व त्यांच्याशी समानगुणी असणारे आहाररसातून प्राप्त होणारे द्रव्यांश हे पोषक; तसेच रसरक्तादि धातूंपैकी पूर्वधातू पोषक व उत्तरधातू पोष्य, असेही म्हणता येईल.

**द्विविध धातुपोषण**

शारीर धातूंचे पोषण शास्त्रकारांनी दोन प्रकारांनी वर्णिलेले दिसते. एक नित्य व दुसरे क्रमानुसारी. आहाररसाने सर्व धातूंचे युगपत् म्हणजे एककालिक पोषण होणे हे नित्यपोषण. 'रसधातू हृदतातून निघून दहा ऊर्ध्वगामी, दहा अधोगामी व चार तिर्यग्गामी अशा एकूण २४ धमन्यांत प्रवेश करून समस्त शरीराचे प्राक्तनकर्मानुसार प्रतिदिन पोषण, वर्धन, धारण व संवहन करतो ['स हृदयाच्चतुर्विंशतिधमनीरनुप्रविश्य ऊर्ध्वगा दश दश चाधोगामिन्यः चतस्रश्च तिर्यग्गाः कृत्स्नं शरीरमहरहस्तर्पयति वर्धयति धारयति यापयति चादृष्टहेतुकेन कर्मणा । ' (सु. सं.)]', अथवा, 'विक्षेपक व्यानवायूकडून रसधातूचे एकाच वेळी समस्त शरीरात विक्षेपण होत असते ['व्यानेन रसधातुर्हि विक्षेपोचितकर्मणा । युगपत्सर्वतोऽजस्रं देहे विक्षिप्यते सदा॥' (अ. हृ.)]', ही वचने या दृष्टीने सूचक आहेत.

रसापासून रक्त, रक्तापासून मांस याप्रमाणे सातही धातूंचे आपापल्या परिमाणानुसार यथाक्रम उत्पादन होणे, हे दुसरे म्हणजे क्रमानुवर्ती पोषण होय.

धातुपोषणाचे हे द्विविध प्रतिपादन परस्परविरुद्ध नाही. कारण त्यांच्या परिणामातही भिन्नता आढळते. एका बाजूने आहाररसाकडून सर्व धातूंचे साक्षात् पोषण होत असते, व ते होत असतानाच दुसऱ्या बाजूने धात्वग्नीकडून विपाचित झालेले पूर्वधातूंचे काही अंश उत्तर धातूंच्या स्वरूपात परिणत होत असतात. आहाररस अवस्थान्तरित होत होत याच क्रमाने शेवटी शुक्रावस्थेत पोहोचतो. आहाररसाकडून नित्य पोषण होत असताही रसादि धातूंची अभिवृद्धी प्रतिनियत असते, याचे कारण हेच की त्या धातूंतील काही अंश उत्तर धातूंत उत्क्रांत होत असतात. असे न होते तर नित्य-पोषणमुळे धातूंची अमर्याद प्रमाणात वाढच होत राहिली असती. काही अंश उत्तरधातूंत परिणत झाल्याने व काही मलरूपाने अलग झाल्याने धातूत्पादन होत असताना प्रत्येक धातू क्षीण होत असतो. ही झीज आहाररसाकडून होणाऱ्या नित्य पोषणाने भरून निघते. आपल्याहून श्रेष्ठ असलेल्या धातूत उत्क्रांत होण्याच्या या स्वभावधर्मानुसार एखादा धातू उत्तरधातूत परिणत न झाला तर आहाररसाकडून होणाऱ्या नित्यपोषणामुळे तो अयोग्य प्रमाणात अभिवृद्ध होतो व त्यापासून विविध विकार उत्पन्न होतात. उदाहरणार्थ, मेदोधातूची पर्याप्त प्रमाणात वाढ झाल्यानंतर अस्थिधातूत त्यातील काही अंश परिणत न झाले तर नित्यपोषणामुळे मेदाची वाढ प्रमाणाबाहेर होते व त्यापासून स्थौल्यादि विकार उद्‌भवतात. एक शुक्रधातूच असा आहे की, इतर धातूंच्या तुलनेने त्याची उत्पत्ती सूक्ष्म प्रमाणात होत असल्याने आणि तो अत्यंत निर्मल व प्रसादरूप असल्याने त्याच्या अभिवृद्धमुळे

अनुक्रमणिका

हानी तर होत नाहीच, उलट सामर्थ्य, उत्साह व संहतत्व यांची वृद्धीच होते. पांचभौतिक षड्रसयुक्त आहाराच्या रसाकडून नित्य पोषण होत असताही बालशरीरात शुक्रधातूची व काही विशिष्ट अस्थींची अभिव्यक्ती होत नाही, आणि षड्रससंपन्न आहारचे सेवन करूनही वार्धक्यात शुक्रधातूची उत्पत्ती होत नाही व तसेच शुक्रक्षय झाल्याने शुक्रपूर्व धातूही क्रमशः क्षीण होतात, इत्यादि गोष्टींवरूनही रसादि धातूंची उत्तरोत्तर धातूंत क्रमशः होत जाणारी उत्क्रांती अनुमानिता येते. 'धातूच धातूंचा आहार होय ['धातवो हि धात्वाहाराः।' (च. सं.)]', असे चरक म्हणतात, ते म्हणूनच. एखाद्या वृक्षाच्या मुळात जलसिंचन केले म्हणजे त्यामुळे त्याच्या शाखा, उपशाखा, पाने आदि सर्व अंगोपांगे जशी एकदमच प्रसन्न, टवटवीत होतात, परंतु पुष्पोद्गम मात्र शाखा, उपशाखा, कलिका या क्रमानेच होतो, त्याचप्रमाणे समस्त शरीरात अविरत भ्रमण करणारा रसधातू सर्व अवयवांच्या ठिकाणी एकाच वेळी प्रसन्नता उत्पन्न करीत असला तरी मांस अस्थी आदि धातूंची उत्पत्ती क्रमशःच होत असते. व म्हणूनच या द्विविध पोषणात परस्परविसंगती आढळत नाही.

### धातूंचे प्रसाद व मल

अशा प्रकारे पोष्य-पोषक अंशांचा समागम झाल्यानंतर प्रथम रसीभवन होतो व तदनंतर धातूंतील सत्त्वयुक्त म्हणजे उत्तर धातूच्या उत्पत्तीला कारणीभूत होणारे अंश व निःसत्त्व म्हणजे अशी क्षमता नसणारे मलरूप अंश यांचे एकमेकापासून पृथक्करण होते. हेच सारकिट्टविभाजन. उत्तरधातूंचे पोषण व उत्पादन पूर्वधातूंतील ज्या सत्त्वसंपन्न अंशांकडून होते त्यांनाच वातादि दोष अशी संज्ञा असून निःसत्त्व म्हणजे सापेक्षतया हीनसत्त्व असलेल्या अंशांनाच मल म्हणून संबोधण्यात येते.

दोष-मलांचे स्वरूप पुढीलप्रमाणे निराळ्या रीतीनेही सांगता येईल-चरकसंहितेत एका ठिकाणी 'ते सर्व एव धातवो मलाख्याः प्रसादाख्याश्च', असे एक वचन आहे. तदनुसार रसरक्तादि सातही धातूंचे प्रत्येकशः प्रकार दोन संभवतात. एक प्रसादरूप व दुसरा मलरूप. 'प्रसाद' ही संज्ञा निर्मलत्वाची सूचक असून 'मल' या शद्बाने हीनशक्तित्व अभिप्रेत आहे. धातूंची उत्पत्ती व अभिवृद्धी होण्यासाठी जे कारणीभूत होतात ते अंश प्रसादसंज्ञक व सामर्थ्यहीनतेमुळे क्षीण झालेले विनाशोन्मुख अंश मलसंज्ञक. यांनाच अनुक्रमे 'दोष' व 'मल' असे म्हणतात.

रसादि धातूंची उत्पत्ती व अभिवृद्धी होण्यासाठी आकर्षणाची व संग्रहाची आवश्यकता असते. विशिष्टाकृतिमत्त्व किंवा संघीभाव त्याविना संभवतच नाही. दूरस्थ अणूंना एकमेकांजवळ आणणे म्हणजे आकर्षण व अशा जवळ आलेल्या अणूंत एकीभाव उत्पन्न होणे याचे नांव संग्रह. संग्रहित म्हणजे एकीभूत परमाणू आपापले स्वतंत्र व्यक्तिमत्व विसरून एकमेकात विलीन होतात, विरून जातात, तेव्हाच मूर्त पदार्थांची उत्पत्ती होते. या मूर्त पदार्थांचे सामर्थ्यानुसार , आकारानुसार व गुणधर्मांनुसार अनंत भेद संभवतात आणि तदनुरोधाने निरनिराळी नामाभिधानेही त्यांना प्राप्त होतात.

मूर्त पदार्थांच्या निर्मितीत संयोग हे प्रधान कारण होय, हा निर्देश पूर्वी करण्यात आलाच आहे. अर्थात् संयुक्त व संयोज्य अशा द्रव्यांत संयोग घडवून आणणारे कोणते तरी सामर्थ्य अंतर्निविष्ट असणे अपरिहार्य असते. कारण एकरूप होण्यापूर्वी एकमेकाजवळ येणे, यामुळेच शक्य होणार हे उघड होय. शारीरद्रव्यांची उत्पत्तीही संयोगजन्यच असते आणि या संयोजनकर्माचे कर्तृत्व ज्याच्याकडे असते त्या संयोजक अथवा संश्लेषक द्रव्यालाच आयुर्वेदात 'श्लेष्मा' म्हणतात.

शारीर पदार्थांच्या उत्पादनात संयोजनाबरोबर विभाजनाचीही आवश्यकता असते. धातूंतील ससत्त्व व निःसत्त्व म्हणजे प्रसादरूप व मलरूप अशा अंशांचे एकमेकांपासून पृथक्करण करणे म्हणजे विभाजन आणि ते ज्या द्रव्याकडून होते त्याचे नांव "पित्त". "पित्त" या संज्ञेने आयर्वेदात विभाजन अपेक्षित आहे. अर्थात् तत्कर्तृक द्रव्य त्यावरून सूचित होतेच.

संयोजन व विभाजन यांच्या सातत्यातून शारीर द्रव्यांची निर्मिती होत असताना तीत चलनात्मक वायूचा अथवा त्याच्या चलनाचा म्हणजे गतीचाही संबंध येतो. धातुसंघटना होण्यासाठी सत्त्वसंपन्न अणूंचे आकर्षण व सत्त्वहीन मलस्वरूप अंशांचे उत्सर्जन जे होते ते गतीमुळे अथवा चलनामुळे. या चलनाचे कर्तृत्व जिच्या ठायी असते त्या वियोजक वस्तूलाच "वायु" या संज्ञेने संबोधण्यात आले आहे. आकर्षणात्मक अथवा संश्लेषणात्मक चलन प्रकारात सुद्धा पूर्वसंश्लिष्ट अथवा पूर्वसंघटित अणूंचे विश्लेषण अथवा वियोजन प्रथम व्हावे लागते. अर्थात् उत्सर्जनाप्रमाणे आकर्षणातही वायूची वियोजनात्मकता अनुस्यूत असते हे उघड होय.

**सुसूक्ष्म शारीर घटकही सप्तधातुक असतो**

सर्व शरीराप्रमाणे शरीराचा प्रत्येक सुसूक्ष्म घटक सुद्धा सातही धातूंनी व्याप्त असतो, हे पूर्वी सांगितलेच. शरीरात ते सुस्पष्ट स्वरूपात अभिव्यक्त होतात तर शरीराच्या अणुस्वरूप घटकात ते अव्यक्त स्वरूपात विद्यमान असतात. सर्व शरीरान्तर्गत रसरक्तात मांसादि धातूंच्या निर्मितीला हेतुभूत होणारे परमाणू ज्याप्रमाणे अव्यक्तावस्थेत विद्यमान असतात त्याचप्रमाणे शरीराच्या सुसूक्ष्म घटकातही त्याच्या उत्पत्तीला कारणीभूत होणारे रसरक्तादि सातही धातू अव्यक्त स्वरूपात राहत असतात. धातूत्पादक रसरक्त व रसरक्तोत्पन्न मांसादिपंचक या सातही द्रव्यांचे अंश, शरीराप्रमाणे शारीर घटकांच्याही उत्पत्तीला कारण होतात. आणि शारीर घटकांच्या उत्पादनावरूनच तदुत्पादक रसरक्तादींचे तदंतर्गत अस्तित्व अनुमित होऊ शकते.

पेशी हा मांससंघात आहे. 'मांसावयवांच्या परस्परविभक्त म्हणजे स्वतंत्र व्यक्तित्व पावलेल्या समुदायाला पेशी म्हणतात,' ['मांसावयवसंघातः परस्परं विभक्तः पेशी इत्युच्यते ।' (सु. सं. व्याख्या)] असे स्पष्टीकरण डल्हणांनीही केले आहे. अर्थात् मांसधातूचे परमाणू ज्या समुदायात्मक रूपाने शरीरात अभिव्यक्त होतात तो समुदाय म्हणजेच पेशी. पेशी हे मांसधातूचे अभिव्यक्त म्हणजेच समुदायात्मक रूप होय. 'पिश अवयवे' [सि. कौ.] हा धात्वर्थही 'पेशी म्हणजे विशिष्ट अवयव, मांसाणूंचा विशिष्टाकृतिसंपन्न समुदाय,' याच अभिप्रायाचा सूचक दिसतो. ही समुदायात्मक पेशी म्हणजे सर्व शरीरातील मांसधातूचे जसे प्रव्यक्त स्वरूप त्याचप्रमाणे शरीराच्या सूक्ष्म अवयवातही त्या अवयवाचे विशिष्ट आकृतिमत्त्व हे तदन्तर्गत मांसधातूचे द्योतक स्वरूप होय. शरीराचा सूक्ष्म घटकही साकार असतो आणि त्या साकारतेवरूनच तदन्तर्गत मांसाचे अस्तित्व समजून येते.

मांसाप्रमाणे अस्थी हा धातूही स्थूल शरीराप्रमाणे सूक्ष्म अशा शारीर घटकात विद्यमान असतो. स्थूल शरीरात तो स्थूल म्हणजे सुस्पष्टतया अभिव्यक्त झालेला असतो तर सूक्ष्म अवयवात तो सूक्ष्म म्हणजे अव्यक्त स्वरूपात असतो. शारीर घटक सूक्ष्म असताही त्यात स्थैर्य असते व त्यावरूनच तदन्तर्गत अस्थीचे अनुमान करता येते.

शरीरान्तर्गत शुक्रधातूत बीजांश ज्याप्रमाणे विद्यमान असतात त्याचप्रमाणे शरीराच्या सूक्ष्म घटकातही घटकोत्पादक बीजांश अवस्थित असतात. सर्वदेहगत शुक्रापासून अन्य देहाची जशी निर्मिती होते तद्वत एका सूक्ष्म घटकातील शुक्रापासून अन्य घटकांची उत्पत्ती होते. हा शारीर घटक सूक्ष्म असला तरी सूक्ष्म अणूंचा समुदायच असल्याने तो एक सूक्ष्माकार देहच असतो.

तात्पर्य, सुसूक्ष्म अशा शारीर घटकात सुद्धा तीनही धातू विद्यमान असतातच. ते स्थूल स्वरूपात उपलब्ध होत नसल्याने त्यांचे अनुमान करावे लागते, इतकेच [अन्य धातूंच्याप्रमाणे मेद व मज्जा हे दोन धातूही सूक्ष्म घटकात कसे विद्यमान असतात याचे निराळे स्पष्टीकरण वर केले नाही. परंतु, पृथक् निर्देश नसला तरी त्यांचे अस्तित्व सहज अनुमित होण्यासारखे आहे. मेद हा मांसाचा व मज्जा हा अस्थीचा रस असल्याचा उल्लेख मागे आला आहेच.].

## स्त्रीशरीरही सप्तधातुक असतेच

शारीरधातूंच्या संबंधी केलेले हे विवरण पुरुषशरीराप्रमाणे स्त्रीदेहालाही लागू होण्यासारखे असले तरी पुरुषशरीराप्रमाणे स्त्रीदेहात देहोत्पादक शुक्र असत नाही, ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. अर्थात् गर्भोत्पत्ती ज्यापासून होते त्या उत्पादक बीजाचा स्त्रीदेहात अभाव असतो. सुश्रुत म्हणतात, “जेव्हा दोन कामातुर स्त्रिया आपसात मैथुनवत् व्यवहार करतात तेव्हा त्यांच्या शुक्रस्रावापासून अस्थिविहीन गर्भ उत्पन्न होतो” ['यदा नार्यावुपेयातां वृषस्यन्तो कथंचन । मुंचंत्यौ शुक्रमन्योन्यं अनस्थिस्तत्र जायते॥, (सु.सं.)]. अस्थिरहित असल्यामुळे या गर्भात स्थिरत्वाचा अभाव असतो व म्हणून त्यापासून धारणचलनक्षम देह संभवत नाही. परंतु, अशा प्रकारे देहोत्पादक शुक्राचा अभाव असताही स्त्रीदेह सप्तधातूक असल्याचे सांगण्यात आले आहे.

स्त्रीशरीरात आर्तव असते आणि ते संततिकर होते. मात्र पुरुषबीजाप्रमाणे संततीला ते बीजधातू होत नाही तर साधनीभूत होते. शुक्र उत्पादक असते तर आर्तव उत्पादनात साहाय्यभूत होते. भूमीत पेरलेले वनस्पतीचे बीज क्षेत्रस्थ वीर्याच्या योगाने, म्हणजे भूमीतील विशिष्ट द्रव्यांचा संयोग झाल्याने जसे वाढीला लागते तसेच स्त्रीशरीरातील वीर्याच्या संयोगाने शरीरोत्पादक बीज वाढीला लागते.

“समागमकाली स्त्रियांचाही पुरुषांप्रमाणे शुक्रस्राव होत असतो, परंतु, गर्भोत्पतीसाठी हे स्त्रीबीज कार्यक्षम नसल्याने त्याचा विचार करण्याचे कारण नाही”, असे एक वृद्धवाग्भटोक्त वचन सुश्रुतसंहितेवरील टीकेत डल्हणांनी उद्धृत केले आहे ['योषितोऽपि स्रवंत्येव शुक्रं पुंसः समागमे । गर्भस्य तु न तत् किंचित् करोतीति न चिंत्यते' ।]. अर्थात् गर्भोत्पादक शुक्राचा स्त्रीदेहात अभावच असतो हे स्पष्ट आहे. परंतु, तरीही स्त्रीशरीर सप्तधातूक असते, हे कथन अयथार्थ नाही. कारण देहोत्पादक नसले तरी अन्य शारीरघटकांच्या उत्पत्तीला हेतुभूत होणारे शुक्र स्त्रीदेहाच्या अवयवांत विद्यमान असतेच.

स्त्रीशरीर व पुरुषशरीर यांतील भेदही यावरून विशद होण्यासारखा आहे. आणि तो असा की, स्वसमान संतती ज्यापासून उत्पन्न होते असे गर्भोत्पादक बीज ज्यात असते तो पुरुषदेह आणि ते ज्यात नसते तो स्त्रीदेह.

‘कर्मणा चोदितो येन तदाप्नोति पुनर्भवे । अभ्यस्ताः पूर्वदेहे ये तानेव भजते गुणान् । ’, असे सुश्रुतसंहितेत एक वचन आहे. त्याचा अर्थ असा की, ज्या कर्माने जीवात्मा या जन्मात प्रचोदित होतो त्याच कर्माची पुढील जन्मात त्याला प्राप्ती होते; पूर्वजन्मी जे गुण अभ्यस्त झाले त्यांचाच आश्रय पुढील जन्मी

अनुक्रमणिका

जीवात्मा करतो. अर्थात् स्त्रीदेह अथवा पुरुषदेह जो उत्पन्न होतो तो देहोत्पादक बीजानुसारच होत असतो. तो जीवात्म्याच्या वासनेचा अथवा निसर्गाचा प्रभाव होय.

पुरुषशरीराची वाढ संततिनिर्माणाच्या आकांक्षेने होत असते, तर स्त्रीदेहाच्या वाढीत गर्भाचे संवर्धन करण्याची आकांक्षा हेतुभूत असते. अर्थात् स्वतःच्या विशिष्ट आकाराने आणि संततिरूपाने असे द्विविध अभिवर्धन पुरुषशरीरात संभवते तर स्त्रीदेह केवळ स्वतःच्या विशिष्ट आकारातच अभिवृद्ध होत असतो. कारण गर्भसंवर्धकत्व असले तरी गर्भोत्पादक सामर्थ्याचा त्याच्या ठिकाणी अभावच असतो.

परंतु, संततिकर शुक्रधातूचा अभाव असला तरी शारीर अवयवांच्या उत्पत्तीला हेतूभूत होणारा उत्पादक धातू स्त्रीशरीरात असतोच. तोच त्या शरीरातील शुक्रधातू होय. स्त्रीदेह देखील सप्तधातुक असतो तो त्यामुळेच 'शुक्रात गर्भः प्रजायते' [अष्टांगहृदय.] म्हणजे शुक्रापासून गर्भोत्पत्ती होते असे शास्त्रवचन आहे. आणि तदनुसार अन्य शरीराप्रमाणे स्वशरीरगत अवयवांचे गर्भोत्पादनही शुक्रहेतुक असते असे मानता येईल. आयुर्वेदीय ग्रंथांत शुक्रधातूचे वर्णन दोन प्रकारांनी केलेले आढळते.

### पुरुषेतर शरीरातील शुक्राचे कार्य

'यथा पयसि सर्पिस्तु गुडश्चेक्षुरसे यथा । शरीरेषु तथा शुक्रं नृणां विद्यात् भिषग्वरः ।', [सुश्रुतसंहिता.], म्हणजे दुधातील तुपाप्रमाणे किंवा इक्षुरसातील गुळाप्रमाणे मनुष्यशरीरात शुक्रधातु राहत असतो असे एक वर्णन आहे. हे शुक्र सर्व शारीर अवयवांत अवस्थित असते. दुसरे असे देहव्यापी असत नाही. ते विशिष्ट स्थानी निवास करीत असते. 'द्व्यंगुले दक्षिणे पार्श्वे बस्तिद्वारस्य चाप्यधः । मूत्रस्रोतःपथात् शुक्रं पुरुषस्य प्रवर्तते । [सुश्रुतसंहिता.]', म्हणजे बस्तिद्वाराच्या खाली उजवीकडे दोन अंगुळे अंतरावर असणाऱ्या स्थानापासून पुरुषाचे शुक्र मूत्रमार्गाच्या द्वारे प्रवर्तित होत असते, असा त्यासंबंधी उल्लेख आहे. पहिल्या म्हणजे सर्वदेहव्यापी शुक्रापासून शरीरातील सर्व अवयवांची उत्पत्ती होते तर दुसऱ्या म्हणजे विशिष्टस्थानाश्रित शुक्रापासून अपत्योत्पत्ती होते, अशी या दोन वर्णनांची परस्परसंगती लावता येण्यासारखी आहे. "यथा पयसि सर्पिस्तु..." या उपर्युक्त वचनात "नृणां" (शरीरेषु तथा शुक्रं नृणां) असा शब्द आहे, तो वाच्यार्थाने म्हणजे केवळ पुरुष या अर्थाने घ्यावयाचा नाही; स्त्री, पुरुष व नपुसंक या सर्वांचा तो सूचक आहे. अर्थात् अवयवोत्पादक शुक्र पुरुषांप्रमाणे स्त्रिया व नपुसंक यांच्या शरीरातही विद्यमान असते असा त्यातील अभिप्राय आहे.

### भिन्न देहोत्पत्तीचे कारण

शरीराची उत्पत्ती ज्यापासून होते त्या बीजात अन्य शरीर उत्पन्न करण्याचे सामर्थ्य नसेल तर त्या बीजापासून निर्माण होणारा गर्भ स्त्रीदेहधारी होतो. याचाच अर्थ असा की, शरीराचा आद्य घटक गर्भावस्थेतच जर अपत्योत्पादक सामर्थ्याने युक्त नसेल तर तदुद्भव गर्भ स्त्रीदेह धारण करतो.

शुक्रार्तवसंयोगात शुक्राचे म्हणजे पुरुषवीर्याचे बाहुल्य असेल तर उत्पन्न होणारा गर्भ पुरुष असतो असे सांगितले आहे, त्यातही हाच अभिप्राय दिसतो. शुक्रबाहुल्यामुळेच अन्य गर्भ उत्पन्न करण्याचे सामर्थ्य गर्भाच्या ठिकाणी निर्माण होत असते. अर्थात् शुक्राचे आधिक्य असणाऱ्या बीजापासूनच पुरुषगर्भ म्हणजे अपत्योत्पादक सामर्थ्य ज्यात आहे असा गर्भ उत्पन्न होतो हे म्हणणे यथार्थच होय.

अनुक्रमणिका

मात्र शुक्राऐवजी जेव्हा आर्तवाचे आधिक्य बीजात होते तेव्हा त्यापासून स्त्रीगर्भ उत्पन्न होतो. आर्तवाचे बाहुल्य असते याचाच अर्थ, शुक्राचे अल्पत्व असते. आणि या शुक्राल्पत्वामुळेच गर्भाला स्त्रीत्व येते. कारण आर्तवाच्या ठिकाणी देहोत्पादक सामर्थ्य असत नाही. अर्थात् अनुत्पादक स्त्रीबीजापासून अनुत्पादक स्त्रीदेह निर्माण व्हावा हे सुसंगतच होय. स्त्रीत्व, पुंस्त्व इत्यादी भाव जे बीजात असताच तेच बीजोत्पन्न देहात संक्रमित व अभिवर्धित होतात. जसे कारण तसे कार्य.

**स्त्रीपुंशरीरांचे कार्यभेद**

सारांश, शुक्रात गर्भ उत्पन्न करण्याची तर आर्तवात गर्भसंवर्धनाची क्षमता असते; पुरुष उत्पादनाकांक्षी असतो तर स्त्री संवर्धनकांक्षिणी असते; उत्पादक बीज पुरुषात अधिक असते तर संवर्धक आर्तव स्त्रीत विशेष असते. उत्पादक सामर्थ्य हे एक विशिष्ट सामर्थ्य असून संवर्धक सामर्थ्यापेक्षा ते केव्हाही श्रेष्ठच होय. कारण आधी वस्तू उत्पादित झाली म्हणजे नंतरच तिचे संवर्धन व्हावयाचे. वृक्षादींचे बीज क्षेत्राचा आश्रय करूनच संवर्धित होत असते; परंतु, क्षेत्रात वृद्धिंगत होणारा प्ररोह हा मात्र बीजाचा असतो. क्षेत्र केवळ साधनीभूत होते. अर्थात् प्ररोहाच्या उत्पत्तीत बीज व क्षेत्र या दोघांचीही आवश्यकता असली तरी प्ररोहाचे उत्पादकत्व बीजाच्याच ठिकाणी असल्याने तेच क्षेत्राहून श्रेष्ठ होय. क्षेत्रसदृश स्त्रीत्वाहून बोजोपम पुरुषत्व असेच श्रेष्ठतर असते.

उत्पादनाकांक्षी पुरुष स्त्रीदेहाच्या आश्रयाने स्वतःच स्वतःला उत्पन्न करतो. अथवा असेही म्हणता येईल की, उत्पादनेच्छू जीव स्त्रीदेहाचा आश्रय करून संततिरूपाने संवर्धित होतो. या उत्पादनात किंवा संवर्धनात स्त्री केवळ अधिष्ठानभूत अथवा आश्रयरूप असते.

"स्त्री" या शब्दाचा धात्वर्थ 'आच्छादक व्यक्ती' असा आहे. ['स्तृञ् आच्छादने' सि. कौ.]. गर्भाचे अथवा गर्भाशयगत बीजाचे आच्छादन म्हणजे संगोपन, पालन अथवा संवर्धन स्त्री करते, असे तदनुसार म्हणता येईल. आणि गर्भाशयात प्रविष्ट झालेले पुरुषबीज शरीररूपाने विस्तार पावू लागते, ही वस्तुस्थिती विचारात घेतली की 'बीजविस्तारक' या अर्थाने 'स्त्री' हा शब्द अत्यंत अन्वर्थक होय, असेही मानावयास प्रत्यवाय नसावा.

पुंबीजाचा गर्भाशयात प्रवेश झाला की, तदन्तर्गत वीर्याच्या योगाने ते बीज प्ररोहित होऊ लागते, आणि ही वाढ सर्वांगपरिपूर्ण झाली म्हणजे त्यालाच 'देह' ही संज्ञा प्राप्त होते. 'देह' हा शब्द 'दिह् उपचये' [सि. कौ.] या धातूपासून तयार झाला आहे. अर्थात् देह म्हणजे मूर्त, सुसंहत अथवा विशिष्टाकृतिसंपन्न अशी वस्तू.

एवं च, काही देहांत उत्पादनाची क्षमता असते तर काहीत संवर्धनाची क्षमता असते. हा प्रभाव बीजाचा किंवा शुक्राचा होय. ज्या देहांत बीजबाहुल्य असते, त्यांत शरीरोत्पादनाची क्षमता असते. त्यांना पुरुषदेह म्हणतात. आणि ज्यांत बीजाचे अल्पत्व वा आर्तवाचे बाहुल्य असते त्यांत संवर्धनाची क्षमता असते. ते देह क्षेत्ररूप होत. स्त्रीदेह त्यांनाच म्हणतात.

शारीरपदार्थांत प्रमुख भेद दोन संभवतात (१) द्रव्य व (२) शक्ती. त्यांपैकी उत्पादक पदार्थ शक्तिरूप असून उत्पत्तीला साधनीभूत होणारे पदार्थ द्रव्यरूप असतात. पुरुष व स्त्री ही नांवे तदनुरोधानेच

योजण्यात येतात. परंतु, जेव्हा विशिष्ट शारीर पदार्थात उत्पादक बीजाचे म्हणजे शक्तीचे, अथवा द्रव्याचे म्हणजे उत्पत्तीला साधनीभूत होणाऱ्या अंशाचे, यांपैकी, कशाचेच आधिक्य असत नाही, तेव्हा त्या द्रव्यात उत्पादनक्षमताही संभवत नाही अथवा संवर्धनक्षमताही असत नाही. हे द्रव्यविशेष आणि पर्यायाने तदुत्पन्न शरीर पुमान्ही नव्हे व स्त्रीही नव्हे, त्याला नपुसंक ही संज्ञा आहे.

**शारीर घटकांतील त्रैविध्य**

शरीराप्रमाणे शरीराच्या प्रत्येक सूक्ष्म घटकात सुद्धा (१) उत्पादनक्षम (२) संवर्धनक्षम व (३) उत्पादकही नाही व संवर्धकही नाही असा तिसरा, असे त्रैविध्य विद्यमान असते. उत्पादक भाग अन्य दोघांच्या तुलनेने सूक्ष्म असून शक्तिरूप असतो. तर शारीर अवयवांच्या उत्पत्तीत साधनीभूत होणरा व शक्तीचे अधिष्ठान असणारा संवर्धनक्षम भाग द्रव्यस्वरूप असतो. या दोन भागांना अनुक्रमे पुरुष व स्त्री अशा संज्ञा देता येतील. तिसरा भाग आकाराने स्थूल असतो. आणि उत्पादक व संवर्धक या दोनही प्रकारच्या सामर्थ्याचा त्यात अभाव असतो. स्वतःची स्थिती सांभाळून राहण्याइतपत सामर्थ्य त्याच्या ठिकाणी असते. हा भाग “नपुसंक” होय. तात्पर्य, एक स्वतःच्या स्थितीत राहत असतानात स्वसमान संतती उत्पन्न करणारा; दुसरा, असे उत्पादक सामर्थ्य नसले तरी उत्पादित संततीचे संवर्धन करणारा; आणि उत्पादकही नाही व संवर्धकही नाही असा तिसरा असे, शरीराप्रमाणे शारीर घटकांचेही प्रमुख विभाग तीन संभवत असून त्यांना अनुक्रमे पुरुष, स्त्री व नपुसंक या संज्ञा योजताही येतील.

शरीरातील वायू, पित्त, व कफ हे तीन दोष शक्तिरूप; त्यांना आधारभूत असणारे रसादि धातू द्रव्यरूप व पुरीषादि मल शक्तिविहीन द्रव्यरूप आहेत. यांपैकी दोष हे उत्पादक असून धातू म्हणजे उत्पादनक्रियेचे अधिष्ठान होत. रसादि धातू व तदुद्भव अवयव यांची उत्पत्ती स्वाभाविक असली तरी त्यांची अभिवृद्धी स्वाश्रयी म्हणजे धात्वाश्रयीच असते. अर्थात् या अभिवृद्धीत दोष हे कारक व धातू हे साहाय्यक म्हणजे आश्रयभूत होतात. वरील विवेचनानुसार दोष-धातूंना अनुक्रमे “पुरुष” व “स्त्री” या संज्ञा देता येतील.

परंतु, मलांत मात्र दोषांप्रमाणे उत्पादनक्षमता असत नाही की धातूंप्रमाणे संवर्धनक्षमताही असत नाही. शरीरातील त्यांचे अस्तित्व एकप्रकारे षंढवतच असते. नपुसंक व्यक्ती जिवंत असते, परंतु पुरुषत्वाचा व स्त्रीत्वाचाही तिच्या ठायी अभाव असतो. स्वशरीर टिकवून धरणे इतकाच जिवंतपणा तीत असतो. संततीचे उत्पादन अथवा संवर्धन ती करू शकत नाही. दोषांचे उत्पादकत्व व धातूंचे संवर्धकत्व या दोघांचाही ज्यांच्या ठिकाणी अभाव असतो ते शारीरमल सुद्धा या दृष्टीने नपुसंकच होत.

———

अनुक्रमणिका

# दर्शन ६—शरीराची समुदायात्मकता

## त्रिविध अभिवृद्धी

शरीरोत्पादक शुक्र किंवा देहबीज ते की ज्यात शरीराच्या सर्व अंगोपांगांची बीजे सूक्ष्म रूपाने निवास करीत असतात. हे देहबीज स्त्रीच्या गर्भाशयात प्रविष्ट झाले की तिच्या आहारोत्पन्न रसातून प्राप्त होणारे पोषक अंश ते आपणाकडे आकृष्ट करून घेते व त्यांना आत्मसात् करून स्वतः विकसित होऊ लागते. त्याची अंगोपांगे या विकासातच क्रमशः आकारास येऊ लागतात आणि अशा प्रकारे त्या देहधारी जीवाची शारीरिक वाढ पूर्ण होते. ही वाढ पूर्ण झाली की स्वतंत्र जीवन जगण्याच्या आकांक्षेने प्रेरित झालेला तो जीवात्मा मातृशरीराच्या बंधनातून बाहेर पडतो व स्वतंत्र देह धारण करून जन्माला येतो. अभिवृद्धीचे प्रकार याप्रमाणे तीन संभवतात—(१) वृद्धी (२) विकास आणि (३) उत्क्रांती. आपल्या विशिष्ट आकारात होणारी वाढ म्हणजे वृद्धी; स्वसमान संततीचे उत्पादन म्हणजे विकास; आणि अशा विकासानंतर नूतन देह धारण करून पुनश्च अभिव्यक्त होणे अथवा गर्भ उत्पन्न झाल्यावर तो सर्वांगपरिपूर्ण होऊन जन्माला येणे याचे नांव उत्क्रांती.

आहाररसातून प्राप्त होणारे पोषक अंश आत्मसात् करून परिपुष्ट होत जाणारा शारीर अवयव स्वतःच्या विशिष्ट आकारात परिणतावस्थेला पोचला की, उत्पादनाच्या आकांक्षेने प्रेरित झालेले अवयवातील काही बीजभूत घटक त्यापासून विभक्त होतात व आपली स्वतंत्र संघटना निर्माण करतात. या नूतन संघात संघटित झालेल्या परमाणूंची वृद्धी व परिणती आहाररसानेच होत असते, आणि कालांतराने त्यांच्यापासून सुद्धा त्यांच्यातीलच काही अंश विभक्त होऊन आपला स्वतंत्र संघ स्थापित करतात. शारीर अवयवांची उत्पत्ती याप्रमाणे सहस्रशः होत असते. अवयव उत्पन्न होणे, आहाररसातील पोषक अंशांनी त्यांची वाढ होणे व ती पूर्ण झाली म्हणजे त्यापासून पुनश्च नवीन अवयव निर्माण होणे हा क्रम अविरत सुरू असतो. हे क्रमसातत्य म्हणजेच जीवन.

चेतना ज्यात अधिष्ठानभूत आहे असा पंचभूतविकारांचा समुदाय म्हणजे शरीर, असे चरकाचार्य म्हणतात ['तत्र शरीरं नाम चेतनाधिष्ठानभूतं पंचमहाभूतविकारसमुदायात्मकम्' ।—च सं.]. अर्थात् शारीर अवयव म्हणजे शरीराची सर्व स्थूलसूक्ष्म अंगोपांगे ही समुदायस्वरूप होत. हे समुदायात्मक अवयवही सुसूक्ष्म अशा घटकांच्या समुदायापासूनच उत्पन्न होत असतात. शरीराचे हे सुसूक्ष्म घटक केवळ असंख्य होत ['शरीरावयवास्तु परमाणुभेदेन अपरिसंख्येया भवन्ति' । च. सं.]. हेच घटक पूर्वोक्त क्रमानुसार संघटित होत असतात.

रसापासून रक्त, रक्तापासून मांस या क्रमाने सातही धातूंची निर्मिती कोणत्या प्रक्रियेने होते यासंबंधी स्पष्टीकरण करताना चरकांनी सांगितले आहे की, 'रक्तधातू स्वाश्रित अग्नीकडून विपाचित झाला व वायूकडून घनीभूत झाला म्हणजे त्यालाच मांस म्हणावे. कारण त्यात आता स्थिरत्व आलेले असते. या मांसधातूलाच पुढे मेद व अस्थी ही रूपे क्रमशः प्राप्त होतात. मेदःस्थित पार्थिव, तैजस, वायवीय आदि अणूंचा मेदोगत उष्णतेच्या योगाने संघात बनतो आणि त्यात खरत्व आलेकी त्या संघालाच अस्थी म्हणतात' ['शोणितं स्वाग्निना पक्वं वायुना च घनीकृतम् । तदेव मांसं जानीयात् स्थिरं भवति देहिनाम् । ', 'पृथिव्यग्न्यनिलादीनां संघातः स्वोष्मणा कृतः । खरत्वं प्रकरोत्यस्य जायतेऽस्थि ततो नृणाम्' ।—च. सं.]. सप्तधातूंपैकी मांस व अस्थी हे दोन धातू मूर्तस्वरूप होत, आणि सर्व शारीर अवयव हे मांसास्थिमयच असल्याने तेही मूर्त म्हणजे घन व स्थिररूपच असावयाचे, असे यावरून उपपन्न होते.

अनुक्रमणिका

### स्रोतोमय शरीर

रस व रक्त या दोन धातूंनी मांस आतून प्रपूरित असते व बाहेरून मेदाने उपलिप्त असते. अस्थिधातूही मज्जेने प्रपूरित असतो. मांस व अस्थी हे दोनही धातू स्रोतोमय असतात, कारण सर्व शरीरच स्रोतोमय असते. 'पुरुष हा एक स्रोतस्‌समुदायच होय', असे चरकाचे एक वचन आहे ['स्रोतसामेव समुदायं पुरुषमिच्छन्ति' । –च. सं.]. अर्थात् रस रक्त यांनी मांसधातू आपूरित असतो, याचा अर्थ असा की मांसगत सूक्ष्म स्रोतसे रसरक्तांनी भरलेली असतात. अस्थिधातूतही मज्जा भरलेली असते ती अस्थिगत स्रोतसांतच; आणि त्यातही सूक्ष्म अस्थीपेक्षा स्थूल अस्थीतच मज्जा विशेषत्वाने राहते, असे सुश्रुत म्हणतात ['स्थूलास्थिषु विशेषेण मज्जा त्वभ्यन्तराश्रितः' । –सु. सं.].

शरीरातील सर्व अवयव मांसास्थिमय असले तरी त्या अवयवांत या दोन धातूंना जे दृश्य व स्थूल स्वरूप प्राप्त होते ते एकसारखे असत नाही. अवययवांच्या विशिष्ट आकारानुसार त्यात भिन्नता असते. किंबहुना, हे शारीर अवयव म्हणजे सुसूक्ष्म घटकांचे विविधाकार समुदायच असल्याने मांस व अस्थी यांना शरीरात जे निरनिराळे आकार प्राप्त होतात त्यांना सुसूक्ष्म घटकांचे हे विविधाकार समुदायच कारणीभूत होतात, असे म्हणता येईल.

शरीराच्या प्रत्येक स्थूल अवयवाला ज्याप्रमाणे स्वतःचा विशिष्ट आकार असतो, त्याप्रमाणे प्रत्येक सूक्ष्म अवयवालाही तो तसा असतोच, आणि तो मांसास्थिमय असतो. म्हणजे अवयव सूक्ष्म असो की स्थूल असो, त्याला जो विशिष्ट आकार प्राप्त होतो तो या दोन धातूंमुळेच. त्यांच्या अभावी विशिष्ट आकृतिमत्त्व संभवतच नाही. एखाद्या वस्तूला असे विशिष्टाकृतिमत्त्व जेव्हा प्राप्त होते तेव्हाच त्या वस्तूची सृष्टी किंवा उत्पत्ती झाली असे म्हणतात; आणि हा आकार अदृश्य झाला की ती वस्तू नाश पावली असे शब्द योजण्यात येतात. नाश म्हणजेच अदृश्यत्व ['नश अदर्शने'–सि. कौ.]. व्यक्त वस्तूला अव्यक्तत्व येणे, दृश्य वस्तू अदृश्य होणे, याचेच नांव नाश. साकार घटक नाश पावले की ते रसरूप पावतात, त्यांचा विशिष्ट आकार अदृश्य होतो.

### शरीरातील द्विविध सृष्टी

विशिष्टाकृतिमत्त्व अथवा मूर्तत्व ज्यांच्या ठायी आहे असे धातू म्हणजे मांस व अस्थी हे पूर्वी पाहिलेच. अर्थात् मांस व अस्थी इतकीच काय ती शरीरातील सृष्टी. कारण विशिष्ट आकारात अभिव्यक्त होणारे असे धातु हे दोनच होत.

भोज्य द्रव्ये शरीरात प्रविष्ट झाली की प्रथमतः ती रसरूपात विलीन होतात, त्यांचा आकार नष्ट होतो. पुढे रक्तधातूच्या अवस्थेत सारभूत व किट्टरूप अंशांचे पृथक्करण होऊन त्यांना अधिक शुद्ध स्वरूप प्राप्त होते. रक्तधातूतील हे सारभूत परमाणू नंतर संघीभूत होतात, त्यांना विशिष्ट आकार प्राप्त होतो. हा संघ अथवा विशिष्ट आकारात अभिव्यक्त झालेले रक्तातील विशुद्ध परमाणू म्हणजे मांस. मांस ही शरीरातील आद्य सृष्टी किंवा मूर्त वस्तू होय असे म्हणावयाचे ते म्हणूनच.

पूर्वरूपाचा विनाश होऊन अधिक श्रेष्ठ असे उत्तररूप प्राप्त होणे म्हणजे उत्क्रांती, हे पूर्वी सुचविलेच. शुक्रार्तव-संयोगरूपी बीजात जे असंख्य निराकार परमाणू असतात, त्यांपासूनच पुढे बीजोत्पन्न

अनुक्रमणिका

देहाची विविध अंगोपांगे आकारास येतात. बीजगत परमाणूंनी शारीर अवयवांचे उत्पादन होते तर आहारातून प्राप्त होणाऱ्या पोषक अंशांनी त्याचे अभिवर्धन होते. या बीजगत उत्पादक परमाणूंची व आहार्य द्रव्यांतील संवर्धक अंशांची आद्य उत्क्रांतावस्था किंवा उत्क्रांतिरूप उत्पत्ती म्हणजे मांस असेही म्हणता येईल.

मांसावस्था प्राप्त झाली की त्यांपैकी काही परमाणू उत्क्रांतीच्या म्हणजे अधिक उन्नत अवस्था प्राप्त करून घेण्याच्या आकांक्षेने प्रेरित होऊन मेदोरूपात विद्रुत होतात. मांसधातूतीलच काही परमाणू रसित झाले म्हणजे त्यांनाच मेद ही संज्ञा प्राप्त होत असल्याने मांसोद्भव मेद हा रसस्वरूपच असतो. या मेदसंज्ञक परमाणूंपैकीच काहींचा पुढे जेव्हा संघात बनतो तेव्हा त्या सुसंहत परमाणूंनाच मांसापेक्षा अधिक कठिण व स्थिररूप असलेल्या अस्थिधातूचे रूप प्राप्त होते. अस्थी ही शरीरातील दुसरी व अंतिम सृष्टी होय. अस्थीची उत्पत्ती झाली की शरीरातील उत्क्रांतीचीही इतिकर्तव्यता होते. त्यानंतर कोणतीच मूर्त वा साकार वस्तू शरीरात उत्पन्न होत नाही.

इतर धातूंपेक्षा अस्थीत दृढत्व अधिक असते. तथापि, त्यातील काही परमाणूंनाही पुढे विद्रुतावस्था प्राप्त होते. या अस्थिजनित रसाला अथवा अस्थ्युत्तर संभवणाऱ्या द्रवधातूलाच मज्जा म्हणतात. शुक्र हे या मज्जेचेच अधिक परिणत किंवा शुद्धतर रूप होय. शुक्र सर्व धातूंत शुद्धतम असते. त्यात मलाचा लेशही नसतो. ते देहोत्पादक असते [शुक्र देहोत्पादक असते याचा स्त्रीदेहापुरता तरी अर्थ, ते अवयवोत्पादक असते इतकाच घ्यावयाचा. कारण स्त्रीदेह पुरुषदेहा-प्रमाणे सप्तधातुक असला तरी स्त्रीदेहांतील शुक्रापासून अन्य देह उत्पन्न होत नाही.]. आणि त्यापासूनच पुढे गर्भसंभव होतो. आहार्य द्रव्यांचा शरीरात प्रवेश झाला की प्रथम त्यांचा रस होतो, पुढे रक्तावस्था प्राप्त होऊन तो अधिक शुद्ध झाला की मांसरूपाने आविर्भूत होण्याची क्षमता त्याच्या ठिकाणी निर्माण होते, आणि शेवटी अस्थीत व्यक्तावस्थेची परिणती होते. तद्वतच मज्जा हा द्रवरूप धातूही शुक्रावस्थेत अधिक विशुद्ध झाला की, अन्य देह उत्पन्न करण्याची अथवा स्वतंत्र–देह–रूपाने आविष्कृत होण्याची क्षमता त्याच्या ठिकाणी प्रादुर्भूत होते, आणि त्यापासून संभवलेला गर्भच पुढे योग्य कालावधीनंर अन्य देह धारण करून जन्माला येतो. परंतु, याप्रमाणे गर्भोत्पादक असताही या देहात मात्र शुक्रापासून कोणत्याच वस्तूची उत्पत्ती होत नाही. अस्थी ही या देहातील अंतिम उत्पत्ती होय असे वर म्हटले ते म्हणूनच.

**समुदायात्मक शरीर**

शरीराच्या निरनिराळ्या अवयवांत विद्यमान असणारे मांसघटक हे समुदायस्वरूपात राहत असतात. निरनिराळे आकार धारण करणारे मांसघटकांचे असे समुदाय शरीरात शेकडो असतात. ['पंच पुंसां पेशीशतानि च' । –अ. हृ.]. पेशी ही संज्ञा त्यांनाच देण्यात आली आहे. ['मांसावयवसंघातः परस्परं विभक्तः पेशी इत्युच्यते' । –सु. सं. व्याख्या.]. त्वचा, कला, स्नायू, धमन्या, स्रोतसे, आंतडी इ. अवयव म्हणजे मांसघटकांचे समुदायच होत. हे समुदाय मांसमय असल्याने कठिण नसतात तर शिथिल असतात.

मांसाप्रमाणे अस्थीचेही कपालास्थी, तरुणास्थी, नलकास्थी, रुचकास्थी व वलयास्थी याप्रमाणे प्रकार अनेक संभवतात. त्यांच्या आकारातही स्थानावस्थानानुसार भिन्नता आढळते. स्थूल अवयवाप्रमाणे सूक्ष्म अवयवातही अस्थीचे अस्तित्व असतेच. स्थूल अवयवांतील अस्थी स्थूल व दृश्य असतात तर सूक्ष्म अवयवांत ते सूक्ष्म व अदृश्य असतात. त्या अवयवांत जे स्थिरत्व असते त्यावरूनच तदन्तर्गत अस्थीचे अनुमान करता येते. कारण स्थिरत्व हे अस्थिजनित होय.

अनुक्रमणिका

अमूर्त अथवा आकृतिहीन अशा सुसूक्ष्म परमाणूंच्या समुदायापासून शरीरातील सूक्ष्म अवयव उत्पन्न होतात. त्यांच्या ठिकाणी विशिष्ट आकृतिमत्त्व आलेले असते. पण स्थूल अवयवांप्रमाणे त्यांत स्पष्टता किंवा प्रव्यक्तता आलेली नसते. अशा सूक्ष्म अवयवांच्या समुदायापासूनच पुढे हात, पाय, मस्तक इत्यादि स्थूल व दृश्य अवयवांची निर्मिती होते. सारांश, शरीरातील सर्व स्थूल अवयव म्हणजे सूक्ष्म अवयवांचे विविध समुदाय असून हे सूक्ष्म अवयवही सुसूक्ष्म परमाणूंचे समुदायच होत.

शरीर हा देखील एक समुदायच आहे. तो स्थूल अवयवांचा समुदाय असतो. तात्पर्य, शरीरातील काही समुदाय स्थूल असतात तर काही सूक्ष्म असतात. परंतु, संपूर्ण शरीर ही अशा लहानमोठ्या समुदायांपासूनच बनलेली एक वस्तू होय. 'शरीरं नाम चेतनाधिष्ठानभूतं पंचभूतविकारसमुदायात्मकम्' अशा शब्दांत शरीराचे वर्णन शास्त्रकार करतात ते म्हणूनच.

———

अनुक्रमणिका

# दर्शन ७ – शारीर धातूंचे सामर्थ्यविशेष

बाल्य, तारुण्य व वार्धक्य या शरीराच्या तीन अवस्था आहेत. शारीर घटकांची वृद्धी व विकास जोपर्यंत होत असतो तोपर्यंत शरीर बाल असते. त्यानंतर त्याला तरुणत्व प्राप्त होते. तारुण्यात विकास अथवा नवीन अवयवांची उत्पत्ती होत नाही. तरुण वयापेक्षा बालवयात अंगोपांगांचा विकास अधिक होतो याचे कारण हेच की बालवयात हे उत्पादक सामर्थ्य सापेक्षतया अधिक प्रमाणात असते. तरुण वयात शारीर अवयव विस्तार पावलेले असतात, त्यांना स्थूलत्व येते; परंतु, उत्पादक सामर्थ्याची मात्र, इतिकर्तव्यता या वयात झालेली असते. यौवनावस्था प्राप्त होते याचाच अर्थ, शरीराचा स्वाभाविक विकास पूर्ण होतो. अर्थात् अवयवांची उत्पत्ती व विकास ज्यामुळे व्हावयाचा त्या सामर्थ्यालाही या वेळी पूर्णत्व येते. गर्भोत्पादक बीज तरुणदेहात अवस्थित असते, त्यात संततिनिर्माणाची क्षमताही आलेली असते, परंतु, स्वशरीरात नवीन अवयवांची उत्पत्ती मात्र त्यापासून होऊ शकत नाही.

कालांतराने हे उत्पादक सामर्थ्य क्षीण होऊ लागते. शारीर घटकांच्या नित्यनूतन उत्पादनावरही त्यामुळे परिणाम होतो. त्यांची उत्पत्ती उत्तरोत्तर कमी प्रमाणात होऊ लागते व परिणामी शरीर क्षीण होऊ लागते. या अवस्थेलाच वृद्धावस्था म्हणतात. ती साधारणः शंभर वर्षांपर्यंत राहते. ज्यांचे आयुर्मान शंभर वर्षांहून कमी अथवा अधिक आहे अशयाही काही व्यक्ती आढळतात. अर्थात् शंभर वर्षे हे आयुर्मान सार्वकालिक व सार्वत्रिक नव्हे. कालप्रभावानुसार त्यात न्यूनाधिक्य होतच असते. चरकाचार्य म्हणतात, “प्रत्येक युगात एक एक धर्मपादाचा व गुणपादाचा क्रमशः क्षय होत होत अखेर सृष्टीचा प्रलय होतो. एकूण कालमर्यादेपैकी एक वर्षशतक संपले की एका वर्षाचा क्षय होतो, आणि देहधारी प्राण्यांची आयुर्मर्यादाही त्या प्रमाणात कमी होते” [“युगे युगे धर्मपादः क्रमेणानेन हीयते । गुणपादश्च भूतानां एवं लोकः प्रलीयते । संवत्सरशते पूर्णे याति संवस्तरः क्षयम् । देहिनामायुषः काले यत्र यन्मानमिष्यते । ”–च. सं.]. अर्थात् यावत्काल शरीर सचेतन असते त्या कालमानालाच आयुष्य म्हणावयाचे हे उघड होय. मात्र ही नियत मर्यादा उलटली की चेतनेचा लोप होतो व शरीर नष्ट होते. उत्पादनसामर्थ्याचा तेव्हा लोप झालेला असतो असेही म्हणता येईल.

### शरीराची अवस्थात्रयी व आयुर्मान

बाल्य, तारुण्य व वार्धक्य या अवस्थात्रयीलाच चरकांनी अनुक्रमे बाल, मध्य व जीर्ण अशी नांवे दिली आहेत. ते म्हणतात, ‘आयुष्याचे स्थूल दृष्टीने विभाग तीन पडतात– बाल, मध्य व जीर्ण. बालवयात कफाचे आधिक्य असते, शारीर धातू अपरिपक्व असतात, त्यांना पूर्ण आकार आलेला नसतो, ते सुकुमार व क्लेश सहन करण्याचे अथवा कोणतेच सामर्थ्य पूर्णपणे प्राप्त न झालेले असे असतात. ही बाल्यावस्था साधारणतः १६ वर्षापर्यंत असते. त्यानंतर ६० व्या वर्षापर्यंतचे आयुर्मान म्हणजे मध्यवय. यात पित्ताचे आधिक्य असते. बल, वीर्य पौरुष, पराक्रम, बुद्धीची ग्राहकता, धारणा, स्मृती, संवेदनक्षमता, वाक्शक्ती आणि सर्व धातूंचे गुण या सर्वांना मध्यवयात साम्यावस्था अथवा परिणतावस्था प्राप्त झालेली असते. हा काल बलशाली व सत्त्वसंपन्न असून शारीर धातूही अद्यापि क्षीण होऊ लागलेले नसतात. साठ वर्षांनंतर मात्र धातू क्षीण होऊ लागतात; इंद्रिये सामर्थ्यहीन होतात; बल, वीर्य पौरुष, पराक्रम, तसेच धृती, स्मृती, इ. मानसिक शक्ती या सर्वांचा ऱ्हास होऊ लागतो; धातूंच्या ठिकाणी असणाऱ्या विशिष्ट गुणांचा लोप होऊ लागतो, आणि वातदोष प्रबल होतो. या अवस्थेलाच जीर्ण वय म्हणतात. ती सामान्यतः शंभराव्या वर्षापर्यंत टिकते. त्यानंतर शरीराचा नाश होतो’ [“तद् वयो यथास्थूलभेदन त्रिविधम् । बालं मध्यं जीर्णमिति । तत्र बालं अपरिपक्वधातुमजातव्यजनं सुकुमारमक्लेशसहनमसंपूर्णबलं श्लेष्मधातुप्रायमाषोडशवर्षम् । मध्यं पुनः समत्वागतबलवीर्यपौरुषपराक्रमग्रहणधारणस्मरणवचनविज्ञानसर्वधातुगुणं बलस्थितमवस्थितसत्त्वमविशीर्यमाणधातुगुणं

अनुक्रमणिका

पित्तधातुप्रायमाषष्टिवर्षमुपदिष्टम् । अतःपरं हीयमानधात्विन्द्रियबलवीर्यपौरुषपराक्रमग्रहणधारणस्मरणवचनविज्ञानं भ्रश्यमानधातुगुण वायुधातुक्रमेण जीर्णमुच्यते आवर्षशतम् ।" च. सं.].

बाल्य, तारुण्य व वार्धक्य यांची सांगितलेले ही कालमर्यादा सर्वसामन्य अशीच समजावयास हवी. कारण सोळाव्या वर्षानंतर सुद्धा विसाव्या वर्षापर्यंत काही व्यक्तींच्या शारीरधातूंची वाढ पूर्ण झालेली नसल्याचे आढळून येते. तरुण वयात सुद्धा पुष्टिकारक आहार-विहारादिकांचा उपयोग केला तर शरीराची वाढ होतच असते. मात्र ही वाढ उंचीत अथवा रुंदीत होत नाही. तारुण्यात रस, रक्त, मेद यांनी मांसपेशीगत स्रोतसे आपूरित होतात व त्यामुळे मांसपेंशींचे व पर्यायाने शरीराचे उपबृंहण होते. उंची, रुंदी इत्यादि वाढते ती मात्र वालवयातच. सर्व अंगोपांगांना वा लहानमोठ्या अवयवांना पूर्णत्व आले म्हणजेच वस्तुतः तारुण्यदशा प्राप्त झाली असे म्हणावयाचे. साधारणतः सोळाव्या वर्षी अंगोपांगांची आकारशः वाढ पूर्ण होते. नंतर त्यांच्या ठिकाणी स्थिरत्व येऊ लागते, ते परिपक्व होऊ लागतात आणि तिसाव्या वर्षापर्यंत हे उपबृंहणही पूर्ण होते. "तिसाव्या वर्षापर्यंत धातुगुणांची अभिवृद्धी पूर्ण झालेली नसते व सत्त्वसंपन्नताही संपूर्णपणे प्राप्त झालेली नसते", असे चरकसंहितेत म्हटले आहे. ['विवर्धमानधातुगुणं पुनः प्रायेण अनवस्थितसत्त्वं आत्रिंशद्वर्षमुपदिष्टमिति' । –च. सं.].

चरकांनी साठ वर्षे ही तारुण्याची चरमसीमा सांगितली आहे. अन्य शास्त्रकार ती ७० वर्षे असल्याचे सांगतात. उदाहरणार्थ, 'बालवयात धातू, इंद्रिये व ओज यांची अभिवृद्धी होते, त्यानंतर म्हणजे सोळाव्या वर्षापासून तो सत्तराव्या वर्षापर्यंतचे जे मध्यवय त्यात अशी वाढ होत नाही, नंतर मात्र धातूंचा वगैरे ऱ्हास होऊ लागतो', असा निर्देश अष्टांगहृदयात करण्यात आला आहे. ['वयस्त्वाषोडशात् बालं तत्र धात्विंद्रियौजसाम् । वृद्धिरासप्ततेर्मध्यं तत्र वृद्धिः परं क्षयः ।'–अ. हृ.]. परंतु सत्तरच काय पण साठ वर्षेही तारुण्य टिकून असल्याचे सांप्रत अनुभवास येत नाही. सत्तर वर्षांचे आयुर्मानच सध्या दुर्लभ झालेले आहे. बहुतेकांना पन्नासाच्या वर्षीच वार्धक्य येते. चरकादिकांनी तरुणवयाची सांगितलेली मर्यादा एकूण आयुर्मान शतसंवत्सरात्मक कल्पून सांगितलेली असून तसा उल्लेखही चरकसंहितेत आढळतो. ['वर्षशतं खलु आयुषः प्रमाणमस्मिन् काले ।'– च. सं.] परंतु, विविध कारणांनी त्या कालानंतर एकूण आयुर्मानच कमी होत गेल्याने तारुण्यकालाची मर्यादाही कमी होत गेली. मध्यवयाची मर्यादा साठ किंवा सत्तर मानणे सद्यःकाळी म्हणूनच योग्य होणार नाही. पन्नाशी हीच सध्याची मध्यवयाची चरमसीमा. शारीर धातू तेव्हाच क्षीण होऊ लागलेले असतात. परंतु, अशाप्रकारे तारुण्याची कालमर्यादा कमी झाली म्हणून बालवयाच्या कालमर्यादेतही न्यूनत्व आले असे समजण्याचे कारण नाही. एकूण शारीर सामर्थ्यात क्षीणता आल्यामुळे बाल्यात होणारी शरीराची वाढही कमी काळात होते असे घडत नाही.

बाल्य, तारुण्य व वार्धक्य या तीन अवस्था ज्याप्रमाणे स्थूल शरीरात आढळून येतात त्याचप्रमाणे शरीराचा प्रत्येक सूक्ष्म घटकही त्या अनुभवीत असतो. उत्पन्न होणे, विकसित होऊ लागणे आणि हा विकास पूर्ण झाल्यावर काही काळ त्याच स्थितीत राहून नंतर क्षीण होत होत शेवटी नाश पावणे, हा क्रम शरीराप्रमाणे शारीर घटकांतही अनुस्यूत असतो. परंतु, हे शरीर घटक धातुमय म्हणजे रसरक्तादि सात धातूंनी तयार झालेले असे असतात. अर्थात् या धातूंची उत्पत्ती व अभिवृद्धी यथावत् होण्यावरच वस्तुतः शारीर अवयवांची व पर्यायाने शरीराचीही अभिवृद्धी अवलंबून असते हे उघड होय.

शरीरातील सर्व साकार अवयव रसाने म्हणजे द्रवद्रव्याने अवलिप्त असतात. रस, रक्त, मेद, मज्जा व शुक्र हे या द्रवद्रव्याचेच प्रकार होत. त्यांचे उत्पादन शरीरात अहर्निश होत असते व त्यापासूनच पुढे मूर्त अवयव उत्पन्न होत असतात. एकापासून दुसरा याप्रमाणे धातूंची उत्पत्ती होत असताना असे आढळून येते

अनुक्रमणिका

की, पूर्व धातू परिपुष्ट होईल तर उत्तर धातूही परिपुष्ट होतो, उलट पूर्व धातू क्षीण झाला तर उत्तर धातूतही क्षीणता येते. पूर्व धातूने उत्तर धातूचे पोषण होते. पूर्व धातू पोषक व उत्तर धातू पोष्य असतो, असा याचा अर्थ. ‘धातवो हि धात्वाहाराः’ हे चरकांचे वचनही या दृष्टीने समर्पक असेच आहे. पूर्व धातू उत्तर धातूंचे आहारच होत.

**धातूंचा जीवितकाल**

रसरक्तादि धातूंचे स्वरूप विशद करताना (दर्शन ५) ही गोष्ट स्पष्ट केली होती की, या धातूंत उत्तरोत्तर निर्मलत्व व चिरजीवित्व वाढत्या प्रमाणात असल्याचे दिसून येते. या सातांपैकी मांस व अस्थी हे दोन घनरूप धातू असून बाकीचे द्रवरूप होत, हेही तेथेच उल्लेखिले होते. एखाद्या वस्तूची दीर्घजीविता कशावर अवलंबून आहे याचा विचार केला तर असे आढळून येते की, सामान्यतः द्रवरूप वस्तूचा जीवितकाल तिच्या विशुद्धतेवर अवलंबून असतो तर घनरूप वस्तूचा तिच्या घनतेवर अवलंबून असतो. द्रव वस्तू जितकी निर्मल अधिक तितके तिचे चिरजीवित्वही अधिक, आणि घन वस्तूंत घनता जितकी अधिक तितके तिचे दीर्घजीवित्वही अधिक. रस, रक्त, मेद, मज्जा व शुक्र या द्रव धातूंत उत्तरोत्तर निर्मलता वाढत्या प्रमाणात असल्याने त्यांचा जीवितकालही तदनुसार वाढत्या प्रमाणात असतो; तर मांस व अस्थी यांपैकी मांसाहून अस्थीत घनत्व अधिक प्रमाणात असल्याने टिकाऊपणाही त्यातच अधिक असतो.

रसापासून शुक्रापर्यंतचे धातू उत्तरोत्तर ज्याप्रमाणे वाढत्या प्रमाणात निर्मल व दीर्घजीवी असतात त्याचप्रमाणे त्यांच्यात उत्पादक सामर्थ्यही उत्तरोत्तर अधिकाधिक प्रमाणात असते. उत्पादक धातूंपासून जे धातू उत्पन्न होतात त्यात उत्तरोत्तर घनता अधिक असते, असा याचा अर्थ होय. उदाहरणार्थ, मांसात रक्ताहून घनत्व अधिक असले तरी अस्थीपेक्षा ते कमीच असते. मांस हा संघातच असला तरी अस्थीप्रमाणे दृढ नसतो. शुक्र या अंतिम धातूत तर उत्पादक सामर्थ्याचा परमोत्कर्ष आढळून येतो. कारण अन्य देह उत्पन्न करण्याची क्षमता त्याच्या ठिकाणी निर्माण झालेली असते. रस, रक्त, मेद, मज्जा, व शुक्र हे द्रव धातू पांच असले तरी रक्त हे रसाचे व शुक्र हे मज्जेचे शुद्धतर रूप असल्याने रक्त, मेद व शुक्र हे तीन द्रव धातूच वस्तुतः घनरूप वस्तूंचे उत्पादक होय. उत्पादक सामर्थ्य या तिघांत उत्तरोत्तर अधिकाधिक असते. कारण मांस, अस्थी व गर्भ या तदुत्पन्न वस्तूंत घनत्व व स्थैर्य अनुक्रमे अधिकाधिक प्रमाणात विद्यमान असते. आणि या दृष्टीने विचांर केला तर सातही धातूंत रस धातू सर्वांत कनिष्ठ व शुक्र सर्वांत वरिष्ठ होय हे दिसून येईल. कारण उत्पादन—सामर्थ्य रसात अत्यल्प असते तर निर्मलतम शुक्रात त्याचा प्रकर्ष झालेला दिसतो.

परंतु, रसरक्तादि द्रव धातूंत उत्तरोत्तर उत्पादनसामर्थ्याचा असा प्रकर्ष जरी आढळून येत असला तरी त्याचे परिमाण मात्र त्याच प्रमाणात वाढते असत नाही, उलट ते व्यस्त असते, म्हणजे उत्तरोत्तर, कमी होत जाते. ‘नऊ अंजली रसाचे, आठ अंजली रक्ताचे, दोन अंजली मेदाचे, एक अंजली मज्जेचे व अर्धांजली हे शुक्राचे प्रमाण होय,’ असे यासंबंधी स्पष्टीकरण चरकसंहितेत केलेले आहे. [‘नवांजलयः पूर्वस्याहारपरिणामधातोर्यं रस इत्याचक्षते । अष्टौशोणितस्य, ......द्वौ मेदसः, एको मज्जायाः । मस्तिष्कस्य अर्धांजलिः, शुक्रस्य तावदेव प्रमाणम् । ’ च. सं.] रसादि धातू उत्तरोत्तर अधिकाधिक विशुद्ध व सामर्थ्यसंपन्न होत जातात, हेच याचे कारण. शारीरधातूंचे उत्पादन या क्रमानुसार जोपर्यंत अव्याहत होत असते तोपर्यंतच शरीर सचेतन असते. या क्रमसातत्यालाच जीवन म्हणतात.

अनुक्रमणिका

**कर्मभेद व गुणभेद**

मूर्त धातूंचे अमूर्तावस्थेत व अमूर्तांचे मूर्तावस्थेत क्रमशः जे स्थित्यंतर होते त्याला संयोगवियोगात्मक कर्म कारणीभूत होते. हे संयोग-वियोग म्हणजे चलनात्मक कर्माचेच दोन प्रकार असून मूर्त पदार्थांच्या उत्पत्तीत ते नेहमी हेतुभूत होत असतात. शीतत्त्व व उष्णत्व हे या संयोगवियोगाचेच साधक गुण होत. विविध प्रकारच्या सृष्ट वस्तूंचे कारण हे गुणच असतात. कारणरूप गुण विविध प्रकारांनी समुदित झाले म्हणजेच कार्यरूप सृष्टीटी निर्मिती होते.

प्रत्येक सृष्ट पदार्थागणिक कर्माचे स्वरूप भिन्न असते. अर्थात् त्या त्या कर्माला कारणीभूत होणाऱ्या गुणांचे स्वरूप सुद्धा पदार्थशः विभिन्न असणार हे स्पष्टच आहे. गुणांचे अनेक भेद सांगण्यात आले आहेत ते म्हणूनच.

परंतु, अनंत प्रकारच्या कर्मांचा अंतर्भाव ज्याप्रमाणे संयोग व वियोग या दोन प्रधान कर्मभेदांतच होऊ शकतो त्याचप्रमाणे या विविध कर्मांचे साधक गुणही कर्मभेदांनुसार अनेक असले तरी ते सर्व शीत व उष्ण या दोन प्रमुख भेदातच अंतर्भूत होऊ शकतात. त्यांपैकी संयोगात्मक कर्माचे कर्तृत्व शीतगुणाकडे असते तर वियोगात्मक कर्म उष्ण गुणामुळे घडून येते.

आणि अशा प्रकारे एकूण सृष्ट वस्तुमात्राचे वर्गीकरण करावयाचे तर ते मुख्यतः तीनच विभागात होऊ शकेल– (१) द्रव्य (२) गुण व (३) कर्म. यांपैकी द्रव्य हे अधिष्ठान केवा आश्रयरूप असून चलनात्मकता हे कर्माचे स्वरूप आहे. पृथ्वी, आप्, तेज, वायू इ. द्रव्याचे व आकुंचन, प्रसरण आदि कर्माचे प्रकार होत. गुण म्हणजे द्रव्याश्रयी सामर्थ्य किंवा चैतन्य कार्यकारी तेच असते.

———

अनुक्रमणिका

# दर्शन ८—शारीरद्रव्यांचे गुणविशेष

शारीरद्रव्ये व आहार्य पदार्थ या सर्वांच्या ठिकाणी जे संयोगवियोगात्मक कर्म सुरु असते ते प्रधानतया शीत व उष्ण या दोन गुणांमुळे. आयुर्वेदात या गुणालाच 'वीर्य' अशी संज्ञा देण्यात आली आहे. वाग्भट म्हणतो, 'व्यक्त अव्यक्त या दोनच प्रकारांत सर्व जगताची विभागणी जशी होऊ शकते, तद्वत सृष्ट द्रव्यांचे प्रकार अनंत असले तरी शीत व उष्ण यांपैकी कोणत्या तरी एका वीर्याचे अथवा गुणाचेच प्राधान्य यच्चयावत् द्रव्यात आढळून येते. कारण अग्नी व सोम म्हणजे तेज व अप् या दोन तत्त्वांपैकी कोणत्या तरी एकात प्रत्येक द्रव्याचा अंतर्भाव होऊ शकतो. ['उष्णं शीतं द्विधैवान्ये वीर्यमाचक्षमतेऽपि च । नानात्मकमपि द्रव्यमग्निषौमौ महाबलौ । व्यक्ताव्यक्तं जगदिव नातिक्रामति जातुचित् ।'—अ. हृ.].'

## अष्टविध वीर्य

शीतवर्य व उष्णवीर्य यांचे प्रत्येकशः तीन तीन भेद सांगितले आहेत. स्निग्ध, गुरु व मृदू हे शीतवीर्याचे आणि रूक्ष, तीक्ष्ण व लघू हे उष्णवीर्याचे भेद होत. वीर्याचे जे आठ प्रकार सांगण्याच आले आहेत त्यांत या पोटभेदांचाच अंतर्भाव करण्यात आला आहे. हे वीर्यभेद म्हणजे कार्यानुमेय गुणांचेच भेद होत.

शीतगुणामुळे परमाणू एकमेकांकडे आकर्षित होतात. हे परस्पराकृष्ट अणू ज्याच्या योगाने आपापले स्वतंत्र व्यक्तित्व विसर्जित करून एकजीव होतात व पुढे त्यांचा एकच पिंड बनतो त्या गुणाचे नांव 'स्निग्धत्व'.'चूर्णादींना पिंडीभाव ज्यामुळे येतो तो गुण म्हणजे स्नेह' असे पदार्थवेत्त्यांचे वचन आहे ['चूर्णादिपिंडीभावहेतुर्गुणः स्नेह'—तर्कसंग्रह].

या पिंडीभावाचाच परिणाम म्हणून मूर्त वस्तूंत गुरुत्व व मृदुत्व उत्पन्न होते. संघीभूत परमाणू एकमेकात चांगल्या प्रकारे विलीन झाले अथवा संपिंडित झाले म्हणजे ते समदेशवर्ती होतात, एका पातळीत येतात. त्यांचा सांघिक स्पर्श म्हणूनच मृदू भासतो.उलट, त्यांची पातळी जेव्हा असमान म्हणजे निम्नोन्नत असते तेव्हा त्यांचा स्पर्श पृथक् पृथक् असा होतो. अशा परमाणूंनी बनलेली वस्तू म्हणूनच हाताला खरखरीत लागते.

शीतगुणाप्रमाणे उष्ण गुणाचे भेदही तीनच असल्याचे वर सांगितलेच. त्यांपैकी एकमेकांपासून वियुक्त होण्याची प्रवृत्ती ज्यांच्या ठिकाणी उत्पन्न झाली आहे अशा परमाणूंना परस्परांचा सहवास ज्यामुळे असह्य वाटू लागतो, तो गुण म्हणजे तीक्ष्णत्व. तीक्ष्णत्व म्हणजे असह्यतेचा द्योतक असा भावविशेषच होय. रूक्षत्व व लघुत्व हे गुण देखील तीक्ष्णत्वाप्रमाणे वियोगोत्मुखतेतूनच उत्पन्न होतात. संघीभूत वस्तूतील काही परमाणू तीक्ष्णत्वामुळे दुरावले की तितकी त्यांची संख्याही कमी होते, ते विरळ होतात. रूक्षत्व ते हेच, आणि त्यामुळेच मूर्त वस्तूला परिणामी लघुत्व येते.

एकत्र आलेल्या परमाणूंचा एकमेकांशी घनिष्ठ संयोग होऊन त्यांचा एक पिंड तयार झाला की त्यात स्निग्धत्व उत्पन्न होते. उलट, एकमेकांपासून वियुक्त होण्याची प्रवृत्ती पिंडीभूत परमाणूंत उत्पन्न झाली की त्यांच्यात रूक्षत्वाचा प्रादुर्भाव होतो. गुरुत्व व मृदुत्व यांच्यामुळे स्निग्धत्व उपलक्षित होते तर तीक्ष्णत्व व लघुत्व यांच्यामुळे रूक्षत्व समजून येते.

अनुक्रमणिका

अशा प्रकारे वीर्यसंज्ञक आठ गुणांचे स्वरूप पाहिले तर असे दिसून येईल की, या आठांपैकी शीत व उष्ण हे दोन साधक किंवा कारणरूप, स्निग्ध व रूक्ष हे दोन कार्यरूप आणि गुरु, मृदू, तीक्ष्ण व लघु हे चार कार्यलक्षणरूप असून त्यांपैकी गुरु व मृदू स्निग्धत्वाचे आणि तीक्ष्ण व लघू हे रूक्षत्वाचे सूचक आहेत.

प्रत्येक सृष्ट द्रव्य हे कार्यरूप असून घटकभूत परमाणूंची संश्लिष्टता अथवा विश्लिष्टता यांपैकी कोणता तरी एक धर्म त्यात विद्यमान असतो. संश्लेष व विश्लेष ही कार्यरूपे ज्यांमुळे संभवतात, ती प्रधान कारणे म्हणजेच शीत व उष्ण हे साधक गुण होत. त्यांच्यामुळेच अनुक्रमे स्निग्धत्व व रूक्षत्व यांचा प्रादुर्भाव कार्यरूप द्रव्यात होतो; आणि गुरुत्व, तीक्ष्णत्व व लघुत्व या लक्षणांवरून त्यांचे अनुमान करता येते. शीत गुणामुळे परमाणू परस्पराकृष्ट होतात व ते संश्लिष्ट झाले की त्यांत स्निग्धत्व उत्पन्न होते, आणि गुरुत्व व मृदुत्व यांच्यामुळे ते सूचित होते. तसेच, परस्परांचा सहवास सहन न झाल्याने संश्लिष्ट अणूंत उष्ण गुणामुळे वियुक्त होण्याची प्रवृत्ती उत्पन्न झाली की त्यांत विरलत्व अथवा रूक्षत्व निर्माण होते, आणि तीक्ष्णत्व व लघुत्व यांच्यामुळे ते समजून येते.

**इतर गुणांचे स्वरूप**

परंतु, या आठ गुणांशिवाय आणखी बारा गुण आयुर्वेदात सांगितले आहेत. हे गुण म्हणजे स्निग्ध व रूक्ष या कार्यरूप गुणांचेच तरतमभावसूचक असे लक्षणात्मक गुण होत. त्यांपैकी मंद, श्लक्ष्ण, सांद्र, स्थिर, स्थूल व आविल हे सहा गुण स्निग्ध गुणाची आणि खर, आशुकारी, द्रव, चल, विशद, व सूक्ष्म हे सहा गुण रूक्ष गुणाची तरतमभावसूचक लक्षणे आहेत. या बारा गुणांचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**मंद** हा गुण मंद क्रियेचा सूचक आहे. अर्थात् तो ज्या द्रव्यात असेल त्याकडून कोणतेही कार्य सत्वर व्हावयाचे नाही. **श्लक्ष्णत्व** स्पर्शावरून समजते. शुष्क द्रव्य मृदुस्पर्शी भासते ते श्लक्ष्णगुणामुळे. **सांद्र** हा गुण द्रवत्वाहून किंचित् घन अश्या अवस्थेचा सूचक आहे. पूर्णपणे घनही नाही व द्रवही नाही अशी जी उभयात्मक अवस्था तिला सांद्र म्हणतात. **स्थिरत्व** म्हणजे चलनाचा अभाव, अर्थात् तो सापेक्षच समजावयाचा. कारण कोणत्याच कार्यरूप द्रव्यात स्थैर्याभाव सर्वथा संभवतच नाही. **स्थूलत्व** हे समुदायस्वरूपाचे सूचक असते. परमाणूंच्या संघातावस्थेवरून त्याची कल्पना येते. **आविलता** हा सांद्रतेचाच एक प्रकार आहे. सांद्रता कमी असली की तिलाच आविलता म्हणतात. **खरत्व** हे श्लक्ष्णत्वाप्रमाणेच स्पर्शानुमेय असते. कित्येक वेळी परमाणू संघीभूत होऊनही योग्य रीतीने संयुक्त झालेले नसतात. त्यांचा स्पर्श पृथक् पृथक् प्रतीत होतो व तो मोठासा सुखकारक वाटत नाही. खरत्व त्यालाच म्हणतात. **आशुकारित्व** म्हणजे शीघ्रकारिता. ती कार्यानुमेय असते. **द्रवत्व** याचा अर्थ स्पष्टच आहे. **वैशद्य** म्हणजे परमाणूंचे विरलत्व. **सूक्ष्मता** त्यामुळेच प्राप्त होते. कारण विरलत्वामुळेच परमाणू एकमेकांपासून विलग झाले की त्यांना सूक्ष्मत्व येते.

आयुर्वेदात जे गुरुमंदादि वीस गुण सांगण्याच आले त्यांचे सामान्यतः स्वरूप हे असे आहे. पदार्थांच्या ठिकाणी स्निग्धत्व व रूक्षत्व हे गुण जे उत्पन्न होतात ते कार्यरूप असून शीतव उष्ण या कारणरूप गुणांपासून त्यांची उत्पत्ती होते. बाकीचे सोळा लक्षणात्मक आहेत. शीत गुणामुळे संयोग होतो व उष्ण गुणामुळे वियोग होतो. या संयोग–वियोगापासून भिन्न स्वरूपाचे व भिन्न अवस्थांचे सूचक असे जे सोळा गुण उत्पन्न होतात तेच हे लक्षणात्मक गुण होत. सर्व सृष्ट द्रव्ये पंचभूतविकारोत्पन्न असली तरी त्यांत

अनुक्रमणिका

भूतविकारांचे अंश भिन्न भिन्न प्रमाणात संयुक्त होत असतात व म्हणूनच उपरिनिर्दिष्ट तारतम्यसूचक गुणांची निर्मिती होत असते.

या गुणांसंबंधी आणखीही एक मुद्दा ध्यानात असणे अवश्य आहे. तो असा की, न्यायशास्त्रात जे गंध, रस आदि २४ गुण सांगण्यात आले आहेत त्यांहून हे आयुर्वेदोक्त गुण भिन्न होत. समुदायात्मक शरीरातील समुदायस्वरूप द्रव्यांच्या ठिकाणी विद्यमान असणारे असे ते आहेत. व म्हणूनच यांच्यापैकी काहींना कारणरूप व काहींना लक्षणरूप मानणे अशास्त्रीय ठरत नाही.

या वीसही गुणांत शीत व उष्ण हे दोनच प्रधान होत हे उल्लेखिलेच. परंतु, ते पूर्णपणे पृथक् स्वरूपात केव्हाच उपलब्ध होत नाहीत. उष्णविवर्जित केवळ शीतगुणी व शीतविवर्जित केवळ उष्णगुणी असे द्रव्य कोणतेच आढळत नाही. कारण एकूण सृष्टी हीच समुदायस्वरूपी असते. आणि ‘व्यपदेशस्तु, भूयसा’ या न्यायाने जीत शैत्य अधिक त्या वस्तूला शीतगुणी व जीत उष्णत्व अधिक तिला उष्णगुणी असे म्हणण्यात येते.

———

अनुक्रमणिका

# दर्शन ९ – गुणांचे स्वरूपविशेष

## द्रव्य व गुण

द्रव्य व गुण यांचा संबंध कसा असतो हे पाहिले तर असे दिसून येते की, गुणांच्या ठीकाणी जे कार्यकारित्व येते ते द्रव्याच्या आश्रयानेच येत असते. पृथ्वी, आप, तेज इ. पंचभूतांपैकी कोणत्या ना कोणत्या द्रव्याचा आश्रय गुणांकडून झाल्याविना कर्मसंभवच शक्य नसतो. इतकेच नव्हे तर गुणांची अभिव्यक्तीही द्रव्याच्याच ठिकाणी होत असते. कारण गुणांचा अनुभव यावयाचा तो क्रियास्वरूपात आणि द्रव्याचे अधिष्ठान प्राप्त झाल्याविना तो येणे शक्य नसते. गुण हे द्रव्यधार होत असे म्हणूनच मानण्यात येते.

पदार्थविज्ञानात पंचभूतांशिवाय काल, दिशा, आत्मा व मन ही चार द्रव्ये आणखी सांगितली आहेत. परंतु, शरीराचे उपादान-कारण मात्र ही पृथिव्यादि पंचभूतेच होत. इंद्रिये व इंद्रियार्थ भौतिक म्हणजे पंचभूतोत्पन्न असून त्यांचेच विवरण आयुर्वेदात करण्यात येते, असे सुश्रुताचार्य म्हणतात ["भौतिकानि चेंद्रियाणि आयुर्वेदे वर्ण्यते तथेन्द्रियार्थाः।" सु. सं.]. गर्भ हा पंचभूतविकारसमुदायात्मक व चेतनाधिष्ठानभूत आहे आणि त्याची जी मातृज, पितृज आदी विविध अंगे, तीसुद्धा महाभूतांचे विकारच होत, असे चरकसंहितेतही सांगितले आहे. ["गर्भस्तु खलु अंतरिक्षवाय्वग्नितोयभूमिविकारश्चेतनाधिष्ठानभूतः। एवमनयां युक्त्या पंचभूतविकारसमुदायात्मको गर्भश्चेतनाधिष्ठानभूतः"। 'मातृजादयोऽप्यस्य महाभूतविकारा एव।' – च. सं.] अर्थात् या ठिकाणी द्रव्ये म्हणजे पंचमहाभूतेच अभिप्रेत आहेत. या द्रव्यांचे जे सूक्ष्य अंश त्यांच्याच आश्रयाने गुण राहतात आणि विविध प्रकारच्या कार्यांवरून त्यांचे अनुमान होऊ शकते. गुणांना कार्यानुमेय म्हणावयाचे कारण इतकेच की, ते यच्चयावत् कर्मांना कारणीभूत होणारे असले तरी नैष्कर्म्यावस्थेत मात्र त्यांचा अनुभव येत नाही. हे गुण म्हणजे विविध प्रकारचे कर्तृत्वविशेष किंवा सामर्थ्यभेदच होत.

ज्याप्रमाणे कर्माचे स्वरूप असते त्याचप्रमाणे त्याला कारणीभूत होणाऱ्या गुणांचे स्वरूप असते. 'द्रव्ये जे करतात ते कर्म व ज्याच्या योगाने करतात ते वीर्य' असे चरकांनी म्हटले आहे. ['यत् कुर्वन्ति तत् कर्म येन कुर्वन्ति तद् वीर्यम्'। –च. सं. ]. अर्थात् वीर्य म्हणजे शक्ती किंवा गुण असाच अर्थ येथे अभिप्रेत दिसतो.

पंचभूतांपैकी आकाश सोडून बाकीच्यांचे नित्य व अनित्य असे प्रत्येकी भेद दोन संभवतात. जो भाग परमाणुस्वरूप असतो त्याला 'नित्य' आणि जो स्थूल व कार्यस्वरूप असतो त्याला 'अनित्य' असे म्हणतात. आकाशाचे मात्र असे कोणतेच भेद संभवत नाहीत. ते केवळ नित्यस्वरूप असते.

वर ज्या गुणाचा निर्देश केला तो गुण म्हणजे पंचभूतांच्या या परमाणुस्वरूप अंशाच्या आश्रयाने असलेले सामर्थ्यच होय. अर्थात् गुण हे नित्यसंज्ञक भागाच्या आश्रयाने राहत असले तरी तश्या स्थितीत ते अभिव्यक्त होत नाहीत, द्रव्यांच्या कार्यस्वरूप स्थूल अंशांच्या ठिकाणीच त्यांचा अनुभव येत असतो. या गुणांनाच आयुर्वेदात 'वीर्य' ही संज्ञा दिलेली आहे. ['तत्र य इमे गुणा वीर्यसंज्ञकाः शीतोष्णस्निग्धरूक्ष-मृदुतीक्ष्णपिच्छिलविशदाः.........'। –सु. सं.]

काही द्रव्ये स्निग्ध तर काही रूक्ष, काही मृदू तर काही तीक्ष्ण, याप्रमाणे गुणांचे भेद अनेक आढळून येतात. आणि याचे कारण असे की, ज्या पंचभूतांच्या मिश्रणापासून सृष्टद्रव्यांची उत्पत्ती होते त्यांचे परमाणुस्वरूप अंश निरनिराळ्या द्रव्यांत भिन्न भिन्न प्रमाणात संयुक्त होत असतात. भूतांशांच्या संयोगातील

प्रमाणाभिन्नता हीच गुणांतराला कारणीभूत असते. ['गुणांच्या विवरणात अन्य भूतांप्रमाणे आकाशाचाही संयोग भिन्न प्रमाणात होत असतो असे वर्णन करण्यात आले आहे. उदा. 'तोयाकाशगुणभूयिष्ठे मृदुत्वम्' म्हणजे अप व आकाश यांच्या आधिक्यामुळे मृदुत्व उत्पन्न होते, असे सुश्रुत म्हणतो. परंतु आकाश वस्तुतः विभू असल्याने अन्य भूतांप्रमाणे त्याचा संयोग होणे शक्य नाही. अर्थात् आकाशाचे आधिक्य म्हणजे आकाशेतर तत्त्वांचे अल्पत्व, असाच यातील अभिप्राय स्वीकारणे योग्य होय.].

### भूतांशांपासून गूणांची उत्पत्ती

स्निग्धरूक्षादि गुणांची उत्पत्ती भूतांशांच्या संयोगापासून कशी होते यासंबंधी स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करता येईल–

शीतत्त्व हा अप्–तत्त्वाचा गुण आहे. ['शीतस्पर्शवत्यः आपः।'–त. सं.] हे अप्तत्त्व जेव्हा पार्थिव परमाणूंशी संयुक्त होते म्हणजे अप्चे शीतगुणोल्बण व पृथ्वीचे गंधगुणभूयिष्ठ परमाणू यांचा जेव्हा संयोग होतो तेव्हा पार्थिव परमाणू एकमेकांकडे आकर्षित होतात व परिणामी रसरूप पावतात, एकमेकांत विलीन होतात. एकरूप झालेल्या पार्थिव परमाणूंना अंती मूर्तत्व येते. हा पिंडीभाव पार्थिव परमाणूंत ज्यामुळे निर्माण होतो तो गुण म्हणजे स्नेह. 'चूर्णादिपिंडीभावहेतुर्गुणः स्नेहः' असे नैय्यायिकही सांगतात. [त. सं.] आयुर्वेदीयांनी सांगितलेला स्निग्ध गुण तो हाच. पार्थिव व आप्य अणूंच्या संयोगापासूनच त्याची उत्पत्ती होते. स्नेह हा गुण 'जलमात्रवृत्ति'. म्हणजे केवळ अप्तत्त्वावरच अधिष्ठात असतो, असे न्यायादि शास्त्रांत सांगितले आहे. [त. सं.] तथापि, आयुर्वेदात तो 'भूम्यम्बुगुणभूयिष्ठ' म्हणजे पृथ्वी व अप् या दोन तत्त्वांच्या संयोगापासून उत्पन्न होतो असे वर्णन आहे. ['पृथिव्यंबुगुणभूयिष्ठः स्नेहः।' – सु. सं.], आणि अप् चे शीतत्त्व पार्थिव परमाणूंशी संयुक्त झाले म्हणजेच ते पिंडीभावोत्पादक होते, ही वस्तुस्थिती विचारात घेता ते अन्वर्थकही आहे असे दिसून येते.

या स्निग्ध गुणाशी जेव्हा तेजःसंयोग होतो तेव्हा पदार्थाचे परमाणू शिथिल होतात व त्यांत द्रवत्व निर्माण होते. द्रवत्व हे स्यंदनाचे समवायी कारण होय असे न्यायशास्त्रात सांगितले असून ['स्यंदनासमवायि कारणं द्रवत्वम्।' – त. सं.]. परमाणूचे विभाजन अथवा पृथक्करण ज्यामुळे होते त्या तेजाच्या गुणालाच 'उष्णता' म्हणतात. या उष्णतेच्या प्रभावाने परमाणूंच्या स्यंदमान अवस्थेत द्रवत्व हा गुण निर्माण होतो. पृथ्वी, जल व तेज या तीन तत्त्वांचा निर्देश द्रवत्वगुणाचे अधिष्ठान म्हणून पदार्थविज्ञानात केलेला आहे. ['पृथिवीजलतेजोवृत्ति।' त. सं.] पृथ्वी जल या दोघांचाच केवळ संयोग झाला की स्निग्धत्व निर्माण होते व त्यांत तेज हे तिसरे तत्त्व अन्वित झाले की द्रवत्व उत्पन्न होते, असा याचा अर्थ असून उष्णता हा तेजोगुण द्रवत्वोत्पादक असतो हे स्पष्ट होय.

उष्णतेच्या योगाने शिथिल झालेले परमाणू पुढे द्रवीभूत होतात व तश्या स्थितीत वियोजनकारी वायूशी संयुक्त झाले की एकमेकांपासून वियुक्त होण्याची प्रवृत्ती त्यांच्यात निर्माण होते. एकमेकांविषयी त्यांना आकर्षण उरत नाही व ते रूक्ष म्हणजे स्नेहरहित होतात. हे रूक्षत्व वायुगुणभूयिष्ठ असते असे सुश्रुत म्हणतात ['वायुगुणभूयिष्ठं रौक्ष्यम्।' – सु. सं.]. ते योग्यच आहे. कारण द्रवत्व हे तेजःसंयोगाने निर्माण होत असले तरी परमाणू एकमेकांपासून वियुक्त झाल्यामुळे त्यांच्यात येणारे रूक्षत्व हे वायुगुणाच्या संयोगानेच यावयाचे हे उघड होय.

तात्पर्य, स्निग्धत्व म्हणजे परमाणूंचा स्नेहभाव किंवा परस्पराकर्षत्व; या स्थितीत त्यांचा सहवास सुखकर होतो, उलटपक्षी रूक्षतेत तो उद्वेगकारक होतो. स्निग्धता म्हणजे आकर्षण व रूक्षता म्हणजे उद्वेजकता असेही म्हणता येईल.

अनुक्रमणिका

स्निग्ध व रूक्ष हे दोनही गुण स्पर्शानुमेय आहेत. मृदुस्पर्शावरून स्निग्धत्वाचे व खरस्पर्शावरून रूक्षत्वाचे अनुमान होते. मृदुस्पर्श हा सुखकारक असतो. तर खरस्पर्श असुखकारक असतो. स्निग्धत्व हे शीतत्त्व, गुरुत्व आदि गुणांत अनुस्यूत असते तर रूक्षत्व हे लघुत्व, उष्णत्व आदि गुणांत सामान्य असते.

पदार्थगत परमाणू स्निग्ध गुणामुळे परस्परांशी सम्यक् रीतीने निगडित झाले की त्या पदार्थात स्थूलता व स्थैर्य हे दोन गुण उत्पन्न होतात. आणि या स्थिरवृत्तीचाच परिणाम म्हणून विहित कर्म शीघ्रतया न होणे हा धर्म त्या द्रव्याच्या ठिकाणी प्रादुर्भूत होतो. या धर्मालाच 'मंदगुण' म्हणून संबोधण्यात आले आहे. उलट, स्निग्धत्वाऐवजी पदार्थगत परमाणूंत रूक्षत्व आले की वियोजनाची क्रिया सुरु होते आणि सूक्ष्मत्व, चलत्व व लघुत्व या रूक्षतेच्या लक्षणरूप गुणांचा प्रादुर्भाव होतो.

'सरत्व' हा गुण द्रवद्रव्यात असतो. द्रवात किंचित् प्रमाणात घनता असली की त्यालाच सांद्र म्हणतात. ही घनता स्थिरसंघातरूप नसते. याही अवस्थेत पृथ्वी, अप्, तेज या तीन तत्त्वांचे परमाणू संमीलित झालेले असतात, परंतु, द्रवावस्थेच्या तुलनेने सांद्र अवस्थेत तैजस अणूंचे प्रमाण अल्प असते.

'तीक्ष्णत्व' म्हणजे विभाजन – कर्माची तीव्रतर अवस्था. तेजोगुणाचे तीत आधिक्य असते व म्हणूनच परमाणूंच्या वियोजनाला ती साधनीभूत होते. तीक्ष्णत्व व उष्णत्व हे गुण आग्नेय असल्याचे सुश्रुतांनी सांगितले आहे. ['तीक्ष्णोष्णौ आग्नेयी।' – सू. सं.] मात्र हे दोनही गुण तैजस असले तरी त्यांत थोडा फरक असतो. उष्णता ही केवळ तैजस असते तर तेज सूक्ष्मानुविद्ध म्हणजे वायुगुणान्वित झाले की तीक्ष्णता उत्पन्न होते.

या तीक्ष्णतेलाच एका विशिष्ट अवस्थेत विस्रता म्हणतात. तेज सूक्ष्मानुविद्ध झाले की उष्णतेच्या आधिक्याने तीक्ष्णत्व उत्पन्न होते असे वर सांगितले. ही सूक्ष्मता दोन प्रकारची असते. एकात वायूचे परमाणू अधिक झाल्याचे द्रवत्व उत्पन्न होत नाही तर दुसऱ्यात अप्संयोगाने ते उत्पन्न होते. या दुसऱ्या प्रकारालाच 'विस्रत्व' म्हणतात. या अवस्थेत द्रवीभूत झालेल्या पार्थिव परमाणूंशी तेजाचा संयोग होतो व त्यामुळे गंधगुणाचे आकर्षणसामर्थ्य कमी होऊन उलट त्यांत उद्वेजकता निर्माण होते. 'आमगंधी' हा विस्र या शब्दाचा पर्याय ['विस्रं स्यादामगंधि यत्' ।अमरकोश.] त्या दृष्टीने मोठा सूचक आहे.

'पदार्थाच्या ठिकाणी रूक्षता असताही जेव्हा मृदुस्पर्शत्व असते तेव्हा त्या रूक्षत्वालाच श्लक्ष्णत्व म्हणतात. नीरस किंवा स्नेहविवर्जित परमाणूंचा मृदुस्पर्श म्हणजे श्लक्ष्णता.'

बाकीच्या गुणांपैकी वैशद्य हा सूक्ष्म–गुणाचाच एक प्रकार आहे. स्नेह व रस यांच्या अभावामुळे विश्लिष्ट अणूंची पृथगात्म अभिव्यक्ती म्हणजे वैशद्य. विकासित्व व व्यवायित्व हे अनुक्रमे तीक्ष्ण व चल या गुणांचे प्रकार होत. तीक्ष्ण गुणाचे आधिक्य म्हणजे विकासित्व व चलनाचे आधिक्य म्हणजे व्यवायित्व.

सारांश, पांचभौतिक द्रव्यात पंचभूतांच्या अंशांचा संयोग तरतमभावाने भिन्न भिन्न प्रमाणात होत असल्याने द्रव्यान्तर्गत भूतगुणांतही तरतमभाव आढळून येतो आणि त्याचाच परिणाम म्हणून त्या त्या द्रव्यात कर्मभिन्नताही आढळून येते. परंतु, या विविध प्रकारच्या कर्मांचा ज्याप्रमाणे संयोग व वियोग या दोनच प्रकारांत अन्तर्भाव करता येतो त्याचप्रमाणे कर्मभेदकारक गुरुमंदादि गुणांचा समावेशही शीत व उष्ण या दोनच गुणांत होऊ शकतो. या गुणांनाच आयुर्वेदात 'वीर्य' म्हणतात.

अनुक्रमणिका

### त्रिविध गुणसमुदाय म्हणजेच त्रिदोष

संयोजन, विभाजन व वियोजन याप्रमाणे शरीरात चालणाऱ्या सर्व क्रियांचे मुख्य प्रकार तीन असल्याचे पूर्वी स्पष्ट केलेच आहे. या सर्व शारीर कर्मांचे कर्तृत्व ज्यांच्याकडे असते त्या गुरुमंदादि गुणांचे प्रमुख भेदही कार्यभेदानुसार तीनच संभवतात. हे तीन भेद म्हणजे तीन प्रकारचे गुणसमुदाय असून त्यांनाच आयुर्वेदात वायु, पित्त व कफ या संज्ञा योजलेल्या आहेत. संयोजनाचे कर्म ज्यामुळे संभवते त्या गुणसमुदायाला श्लेष्मा म्हणतात; विभाजनाची क्रिया ज्याकडून होते त्या गुणसमुदायाला पित्त म्हणतात; आणि ज्याच्याकडे वियोजनाचे कर्तृत्व असते त्या गुणसमुदायाला वायू म्हणतात.

मात्र याचा अर्थ असा नव्हे की, श्लेष्मा, पित्त व वायू हे दोष विशिष्ट गुणांनी युक्त म्हणजेच त्या गुणांहून भिन्न असतात. स्नेह, शैत्य, गुरुत्व, माधुर्य इत्यादि गुणांनी कफसंज्ञक दोष युक्त असतो म्हणजे या स्निग्धदि गुणांहून निराळा असतो असे नाही. स्निग्धदि गुणांचा समुदाय म्हणजेच श्लेष्मा. तो तद्भिन्न नव्हे. 'स्निग्धत्व, शैत्य, शुक्लत्व, माधुर्य, स्थैर्य, पिच्छिलत्व व मृत्स्नत्व हे गुण म्हणजे श्लेष्म्याची आत्मरूपे होत' असे चरकाचार्यांचे वचन असून ['स्नेहशैत्यशौक्ल्यगौरवमाधुर्यस्थैर्यपैच्छिल्यमात्स्र्यानि श्लेष्मणः आत्मरूपाणि ।' –च. सं.]. हे आत्मरूप अपरिणामी असते असेही त्यांनी म्हटले आहे. ['श्लेष्मणः इदमात्मरूपमपरिणामि ।' –च. सं.]. 'आत्मरूप म्हणजे स्वरूप व अपरिणामी म्हणजे सहजसिद्ध, उपाधिजनित नसलेले,' असे स्पष्टीकरण त्यावर व्याख्याकार चक्रपाणी करतात. ['आत्मरूपं स्वरूपं अपरिणामीति सहजसिद्धं नान्योपाधिकृतमित्यर्थः ।' च. सं. व्याख्या.]. अर्थात् दोष हे गुणस्वरूपच होत याविषयी संदेह नाही.

एक गोष्ट येथेच स्पष्ट करावयास हवी. ती ही की, द्रव्य व गुण या वस्तू भिन्न असल्या तरी त्यांच्यात आश्रयाश्रयित्व असल्याने पंचभूतांचे विकार म्हणजेच स्निग्धादि गुण होत, असा आयुर्वेदाचा अभिप्राय आहे. शारीर द्रव्यांचे वर्गीकरण करताना चरक म्हणतात, 'संक्षेपतः शारीर गुणांचे मुख्य प्रकार दोन पडतात, एक मलभूत, दुसरा प्रसादरूप. त्यांपैकी जे शरीराला पीडाकर होतात ते गुण मलरूप होत. शरीराच्या नाक कान, आदि स्रोतसांत उत्पन्न होणारे नाना प्रकारचे उत्सर्जनोन्मुख मल, परिपक्व झालेले धातू, कुपित झालेले वातादि दोष आणि त्याचप्रमाणे शरीराला घातक होणारे आणखी जे जे गुण असतील त्या सर्वांचा अंतर्भाव मलरूप गुणांत करावयाचा. बाकीचे गुण प्रसादभूत होत. रसरक्तादि सात द्रव्ये, गुरुमंदादि वीस गुण, यांचा या प्रसादभूत गुणांत समावेश होतो. ['शरीरगुणाः पुनर्द्विविधाः संग्रहेण । मलभूताः प्रसादभूताश्च । तत्र मलभूतास्ते शरीरस्याबाधकराः स्युः । तद्यथा–शरीरच्छिद्रेषूपदेहाः पृथग्जन्मानो बहिर्मुखाः परिपक्वाश्च धातवः प्रकुपिताश्च वातपित्तश्लेष्माणः ये चान्येऽपि केचिच्छरीरे तिष्ठन्तो भावाः शरीरस्योपघातायोपपद्यन्ते सर्वास्तान्मले संचक्ष्महे । इतरांस्तु प्रसादे । गुर्वादींश्च द्रवान्तान् गुणभेदेन रसादींश्च शुक्रान्तान् द्रव्यभेदेन ।' च. सं.]. चरकांच्या या स्पष्टीकरणात गुणरूप, द्रव्यरूप व मलरूप असे गुणांचे प्रकार तीन सांगितले असून रसरक्तादि धातू आणि स्रोतसांत संचित होणारे मल यांचा निर्देशही गुण या संज्ञेनेच करण्यात आलेला आहे, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. अर्थात् पंचभूतांच्या विकारांनाच गुण ही संज्ञा आयुर्वेदात योजली आहे हे उघड होय.' 'शरीरं नाम चेतनाधिष्ठानभूतं पंचभूतविकारसमुदायात्मकम्' या चरकांच्या वचनावरील व्याख्येत, 'हे पंचभूतांचे रसादि विकार शरीरारंभक आहेत', असे स्पष्टीकरण चक्रपाणींनी केले आहे. ['पंचानां महाभूतानां विकारा रसादयः शरीरारंभकाः ।'–च. सं. व्याख्या]. वातादि दोष हे गुणसमुदाय होत असे का म्हणावयाचे ते या विवेचनावरून स्पष्ट होऊ शकेल.

———

अनुक्रमणिका

# दर्शन १०–त्रिदोषांचे गुणसमुदायत्व

वातादि दोष म्हणजे स्निग्धादि गुणांचे समुदाय होत हे गेल्या प्रकरणात सांगितले. दोषांचे हे गुणसमुदायत्व कसे असते हे या प्रकरणात पाहावयाचे आहे.

### त्रिविध गुणसमुदाय व त्रिदोष

स्निग्धादि गुणांपैकी स्निग्ध, शीत, गुरु, मंद, श्लक्ष्ण, सांद्र, पिच्छिल, स्थूल, स्थिर, मृदू हे दहा श्लेष्मरूप; तीक्ष्ण, उष्ण व द्रव हे तीन पित्तरूप; आणि रूक्ष, सूक्ष्म, चल, विशद, लघू, खर व कठिन, हे सात वायुरूप आहेत.स्निग्धादि दहा गुणांचा समुदाय म्हणजे श्लेष्मा, तीक्ष्णादि गुणत्रयी म्हणजे पित्त व रूक्षादि गुणांचे सप्तक म्हणजे वायू असा याचा अर्थ.

दोष या संज्ञेने ज्यांचा निर्देश केला त्या स्निग्धादि गुणांपैकी काही कार्यरूप, काही कारणस्वरूप व काही लक्षणरूप असून यच्चयावत् सृष्ट पदार्थांत ते परस्परानुबद्ध होऊन निवास करीत असतात. त्यामुळे सर्वत्र सारख्याच प्रमाणात ते उपलब्ध होत नाहीत. त्यांचे प्रमाण कमी अधिक असलेले आढळते. दोष हे गुणसमुदायस्वरूप होत असे म्हणावयाचे ते गुणांच्या या अन्योन्यावलंबी अवस्थितीमुळेच.

आयुर्वेदीय ग्रंथात गुणांची संख्या निरनिराळी दिलेली आढळते. 'स्निग्ध, शीत, गुरु, मंद, श्लक्ष्ण, मृत्स्न व स्थिर हे सात गुणा श्लेष्म्याचे; स्निग्ध, तीक्ष्ण, उष्ण, लघू, विस्र, सर व द्रव हे सात पित्ताचे आणि रूक्ष, लघू, शीत, खर, सूक्ष्म व चल हे सहा गुण वायूचे होत', असे अष्टांगहृदयात सांगितले आहे ["स्निग्धः शितो गुरुर्मदः श्लक्ष्णो मृत्स्नः स्थिरः कफः । पित्तं सस्नेहतीक्ष्णोष्णं लघु विस्र सरं द्रवम् । तत्र रूक्षो लघुः शीतः खरः सूक्ष्मः चलोऽनिलः । " अ. हृ.]; तर स्नेह, शीत, शुक्ल, गुरु, मधुर, स्थिर, पिच्छिल, मृत्स्न हे आठ गुण श्लेष्म्याचे; उण्ण तीक्ष्ण, लघू, द्रव, किंचित् स्निग्ध,पूर्णपणे शुक्लही नव्हे व अरुणही नव्हे असा वर्ण, विस्रगंध, कटू व अम्ल रस आणि सरत्व हे नऊ पित्ताचे; आणि रूक्ष, शीत, लघू, विशद, गती, अमूर्तत्व, अनवस्थितत्त्व हे सात गुण वायूचे आहेत, असा उल्लेख चरकसंहितेत आहे. ['स्नेहशैत्यशोक्ल्यगौरवमाधुर्यस्थैर्यपैच्छिल्यमात्स्यानि । ओष्ण्यं तैक्ष्ण्यं लाघवं द्रवत्वं अनतिस्नेहो वर्णश्च शुक्लारुणवर्ज्यो गंधश्च विस्रो रसौ च कटुकाम्लौ सरत्वम् । रौक्ष्यं शैत्यं लाघवं वैशद्य गतिरमूर्तत्वं अनवस्थितत्त्वम् ।' –च. सं.]. म्हणजे एकूण गुण वाग्भटांनी वीस सांगितले तर चरकांनी चोवीस सांगितले. परंतु शारीर द्रव्यांचे गुण वर्णन करताना मात्र त्यांची संख्या वीसच असल्याचा उल्लेख वाग्भटांप्रमाणे चरकांनी सुद्धा केलेला आहे. 'गुरु, लघू, शीत, उष्ण, स्निग्ध, रुक्ष, मंद, तीक्ष्ण, स्थिर, सर, मृदू, कठिन, विशद, पिच्छिल, श्लक्ष्ण, खर, सूक्ष्म, स्थूल, सांद्र, द्रव याप्रमाणे शारीर द्रव्यांचे गुण वीस असून ते संख्यासामर्थ्यकर आहेत', असे त्यांचे वचन असून ["शरीरधातुगुणाः संख्यासामर्थ्यकराः तद्यथा-गुरुलघुशीतोष्णस्निग्धरूक्षमंदतीक्ष्णस्थिरसरमृदुकठिनविशदपिच्छिलश्लक्ष्णखरसूक्ष्मस्थूलसांद्रद्रवाः । ' च.सं.] वाग्भटांनीही या व इतक्याच गुणांचा निर्देश केला आहे.['गुरुमंदहिमस्निग्धश्लक्ष्णसांद्रमृदुस्थिराः । गुणाः ससूक्ष्मविशदा विंशतिः सविपर्ययाः ।' –अ. हृ.] दोष-गुणांच्या यादीत जे रस, गंध व वर्ण इत्यादि गुण सांगितले त्यांचा वरील गुणांत निर्देश नाही. शारीर धातूंत होणाऱ्या वृद्धीत अथवा ऱ्हासात त्यांचे प्रयोजन नसते, हेच याचे कारण असल्याचा उल्लेख चक्रपाणींनी केला आहे.[शब्दरूपगंधास्तु परादिवत् वृद्धौ ऱ्हासे च नातिप्रयोजनाः इति नोक्ताः । ' –च.सं. व्याख्या.]पित्त-गुणांत विस्रत्व हा एक गुण सांगितला असून आमगंधित्व हे त्याचे लक्षण आहे. तथापि, गंध-संज्ञक गुणांत त्याचा अंतर्भाव केलेला नाही. सुरभी व असुरभी असे गंधगुणाचे प्रकार दोनच सांगितले आहेत. आमगंधित्व हे विस्रतेचे लक्षण असून हे आमत्व म्हणजे तीक्ष्णतेचाच एक प्रकार होय. अर्थात् स्निग्धता व रुक्षता यांच्याप्रमाणेच विस्रता देखील गंधस्वरूप नाही.

**दोषगुण व संग्रहोक्त गुण**

गुरुमंदादि गुणसंग्रहोक्त गुणांचे अवलोकन केले तर असे दिसून येते की या गुणांपैकी सर्वांचाच समावेश दोष-गुणांत करण्यात आला नाही. उदाहरणार्थ, 'स्निग्धः शीतो गुरुर्मंदः श्लक्ष्णो मृत्स्नः स्थिरः कफः । पित्तं सस्नेहतीक्ष्णोष्णं लघु विस्रं सरं द्रवम् । तत्र रूक्षो लघुः शितः खरः सूक्ष्मश्चलोऽनिलः । ', याप्रमाणे अष्टांगहृदयात कफ व पित्त यांचे प्रत्येकी सात व वायूचे सहा असे जे एकूण वीस दोष-गुण सांगण्यात आले आहेत त्यांत सांद्र, मृदू, विशद, कठिन, स्थूल, पिच्छिल, या संग्रहोक्त सहा गुणांचा निर्देश नाही. उलट, मृत्स्न,विस्र व सर हे तीन संग्रहोक्त गुणांत नसलेले गुण दोष-गुणांत अधिकसांगितलेले दिसतात. परंतु, अनिर्दिष्ट सहा गुणांपैकी सांद्र व पिच्छिल या दोघांचा मृत्स्न–गुणात, कठिणत्वाचा स्थिर व खर या दोन गुणांत, स्थूलत्वाचा स्निग्ध व स्थिर या दोघांत, मृदुत्वाचा स्निग्ध–गुणात आणि विशद या गुणाचा सूक्ष्म-गुणात अंतर्भाव होऊ शकतो. आणि अधिक म्हणून जे तीन गुण सांगितले त्यांपैकी मृत्स्न-गुणात सांद्र व पिच्छिल या गुणांचा समावेश होतो, व विस्र हा तीक्ष्ण या गुणाचाच एक प्रकार आहे, हे वर उल्लेखिलेच, राहिलेला तिसरा जो 'सर' तो चलत्वाचाच एक भेद होय. तात्पर्य, गुणसंग्रहोक्त गुण व दोषगुण यांच्या गणनेत संख्याभेद दिसत असला तरी तो परस्परविरोधी नाही. इतकेच नव्हे तर दोषगुणांत काही गुण सामान्य असल्याचेही दिसून येते. शीतत्त्व वायुगुणातही सांगितले आहे व कफाच्या गुणांतही त्याचा पुनश्च निर्देश आहे. वस्तुतः हा शीतगुण एकच होय. लघुत्वाचीही स्थिती तीच आहे. वायू व पित्त या दोघांच्याही गुणांत त्याचा निर्देशस्वतंत्रपणे केलेला आहे. पित्त-गुणांत ईषत्स्नेह हा एक स्वतंत्र गुण सांगितला आहे. परंतु, परिणामभिन्नता अनुभवाला येत असली तरी स्वरूपतः तो स्निग्धगुणाहून निराळा मानण्याचे कारण नाही. वैशद्य, अमूर्तत्व व अनवस्थितत्व हे वायूचे गुण चरकांनी सांगितले ते म्हणजे वाग्भटोक्त सूक्ष्म गुणाचे अवस्थाभेद होत. सारांश, स्निग्धत्व व शीतत्त्व हे कफाचे, उष्णत्व व द्रवत्व हे पित्ताचे आणि सूक्ष्मत्व व रूक्षत्व हे वायूचे स्वरूप आहे ही गोष्ट ध्यानी घेतली की, या प्रमुख गुणानुरोधाने म्हणजे स्निग्धशीतोपलक्षणात्मक गुणांचा कफ-गुणांत; रूक्ष-सूक्ष्मोपलक्षणात्मक गुणांचा वात-गुणांत व द्रवोष्णलक्षणात्मक गुणांचा पित्तगुणांत याप्रमाणे संग्रहोक्त गुणांचा दोष-गुणांत समावेश करणे कसे उचित ठरते ते दिसून येईल. स्निग्धशीतादि दहा गुण म्हणजे श्लेष्मा, रूक्षसूक्ष्मादि सात गुण म्हणजे वायू, आणि उष्ण, तीक्ष्ण, व द्रव ही गुणत्रयी म्हणजे पित्त; असे आरंभी सांगितले ते याच उद्देशाने.

**दोष–गुणांतही मुख्य भेद दोनच**

कफाचे दहा, वायूचे सात व पित्ताचे तीन अशा या एकूण वीस दोषगुणांतही मुख्य भेद दोनच असल्याचे आढळून येते. शरीरात चालणाऱ्या सर्व क्रियांचा अंतर्भाव संयोग व वियोग अथवा उत्पत्ती व विनाश किंवा वृद्धी व क्षय या दोनच प्रकारांत प्रामुख्याने होत असल्याने कार्यकारी गुणांचे मुख्य भेदही दोनच असावयाचे हे ओघानेच प्राप्त होते. गुरु, शीत, स्निग्ध, मंद, स्थिर, मृदू, पिच्छिल, श्लक्ष्ण, स्थूल, सांद्र हे दहा गुण संयोगकारक असून तद्विरुद्ध असे लघू, उष्ण, रूक्ष, तीक्ष्ण, सर, कठिन, विशद, खर, सूक्ष्म, द्रव हे दहा वियोगकारक आहेत. गुणांचे हे द्वैविध्य चरकसंहितेत 'गुरु गुण' व 'लघू गुण' हे शब्द योजून विशद करण्यात आले आहे. त्यांपैकी जे गुरु गुण असतात ते गुरुत्वगुणप्रधान आहार्य द्रव्यांच्या सेवनाने उपबृंहित होतात व लघुगुण क्षीण होतात; उलट लघुत्वगुणप्रधान आहार्य द्रव्यांच्या सेवनाने गुरु गुणांचा ऱ्हास होतो व लघू गुणांचे अभिवर्धन होते असे चरकांचे वचन आहे. ['तेषु ये गुरवः ते गुरुभिराहारविकारगुणैरभ्यस्यमानैः आप्यायन्ते लघवश्च ऱ्हसन्ति । लघवस्तु लघभिराफ्यायन्ते गुरवश्च ऱ्हसन्ति ।' च. सं.]. चरकांच्या या वचनात 'गुरवः' व 'लघवः' असा बहुवचनी प्रयोग आहे. अर्थात् गुरू व लघू या संज्ञा गुरुत्वात म्हणजे संयोगावस्थेत व लघुत्वात म्हणजे वियोगावस्थेत

अनुक्रमणिका

उपलब्ध होणाऱ्या एकाहून अधिक गुणांच्या वाचक असाव्यात असे अनुमान करता येते. गुरु, लघू, शीत, उष्ण याप्रमाणे परस्परविरुद्ध गुणांचा एकत्र निर्देश करण्यातील अभिप्राय हाच असावा. चक्रपाणींनी तसा उल्लेखही एका ठिकाणी केला आहे.['परस्परविपर्ययात्मकान् द्वंद्वान् दशगुणान् दर्शयित्वा तेषां च द्रव्यसंबद्धानाम् शृंगग्राहिकतया कर्माह ।' च. सं. व्याख्या.] शारीरद्रव्यांच्या या वीस गुणांना 'संख्यासामर्थ्यकर' असे विशेषण चरकांनी योजिले आहे. 'संख्या म्हणजे ज्ञान किंवा गणना व तत्संबंधी सामर्थ्यकर होणारे', असे त्याचे स्पष्टीकरण चक्रपाणी करतात.['संख्या ज्ञानं गणना वा तत्र सामर्थ्य कुर्वन्ति' –च. सं. व्याख्या.]. परंतु, त्यापेक्षा 'आपल्या वीस या संख्येला अनुसरून सामर्थ्यकर होणारे म्हणजे ज्यांच्या ठिकाणी वीस प्रकारचे सामर्थ्य आहे असे', अशा प्रकारचे स्पष्टीकरण अधिक अन्वर्थक होऊ शकेल असे वाटते.

वायू, पित्त व कफ हे तीन दोष म्हणजे तीन प्रकारचे गुणसमुदाय होत, हे पूर्वी सांगितलेच. ते केवळ गुणरूप आहेत की केवळ द्रव्यरूप आहेत हेही विचारात घेणे अवश्य आहे.

**दोष द्रव्यरूप की शक्तिरूप?**

पचन, पोषण, श्वसन, उत्सर्जन इत्यादि कर्मे शरीरात जी चालतात त्या सर्वांचे कर्तृत्व वायू, पित्त व कफ या तीन दोषांकडेच असते. आणि जीत कर्मकर्तुत्व आहे अशी कोणतीच वस्तू शक्तिहीन असू शकत नसल्यामुळे त्रिदोष हे शक्तिरूप होत असे उपपन्न होते.

परंतु, वातादि दोष शक्तिरूप असले तरी कोणत्या ना कोणत्या द्रव्याच्या आधाराविना ते कार्यकारी होऊ शकत नाहीत, इतकेच नव्हे तर त्यांचे अस्तित्वही द्रव्याश्रयावरच अवलंबून असते. आयुर्वेदात जे शीत, उष्ण, स्निग्ध, रूक्ष इत्यादि वीस गुण सांगितले आहेत तेही केवळ शक्तिस्वरूप असे नाहीत. गुण म्हणजे शक्तीचे विशिष्ट स्वरूप. अर्थात् संयोग, वियोग आदि कार्ये ज्यांच्यामुळे संभवतात असे सामर्थ्यविशेष म्हणजेच विविध गुण होत. स्निग्ध, शीत, उष्ण ही नांवे सामर्थ्यविशेषांनाच देण्यात येतात. शक्तीत हे जे वैशिष्ट्य निर्माण होते ते द्रव्यानुबंधाने. उदाहरणार्थ, स्निग्धत्व पृथिव्यंबुगुणभूयिष्ठ तर वैशद्य पृथिव्यनिलगुणभूयिष्ठ आणि मृदुत्व जलाकाशगुणभूयिष्ठ. तात्पर्य, दोष गुणरूप असले तरी केवळ शक्तिरूप नव्हेत.

स्निग्ध, शीत इत्यादि गुण हे कार्यरूप सृष्ट द्रव्यांच्या ठिकाणी आढळून येणारे गुण आहेत. कार्यरूप स्ष्टी पंचभूतविकारसमुदायोद्भव असल्याने ते नित्य म्हणजे परमाणुस्वरूप द्रव्यांचे असत नाहीत, तर भूतसंधाताश्रयी असतात.

**नित्यानित्य भूतांश व गुण**

गंध, रस, रूप, स्पर्श व शब्द हे पाचभूतांचे गुण स्वाभाविक आहेत; धिजनित नाहीत. तेही द्रव्याश्रयानेच राहतात. पृथ्वी, अप्, तेज वायू व आकाश हे त्यांचे अनुक्रमे आधार होत. नित्य व अनित्य असे पृथिव्यादींचे भेद प्रत्येकी दोन संभवतात. अर्थात् आकाश याला अपवाद आहे. ते नेहमी नित्यस्वरूपच असते. त्याचे विभाग पडत नाहीत. व म्हणूनच प्रत्येक सृष्ट पदार्थात जे परमाणू आढळून येतात ते पार्थिव, आप्य, तैजस व वायवीय असे चारच प्रकारचे असतात.

अनुक्रमणिका

पृथिव्यादि महाभूतांचे जे नित्य–संज्ञक अंश ते अविनाशी, सूक्ष्म व शक्तिसंपन्न असतात तर अनित्य–संज्ञक अंश विनाशी, स्थूल व 'नित्य' संज्ञक अंशांच्या तुलनेने शक्तिहीन असे असतात. यच्चयावत् सृष्ट द्रव्ये म्हणजे या अनित्या अंशांचीच विकाररूपे असून 'नित्य' अंशांच्या आश्रयाने राहणाऱ्या शक्तीचे जे विकार त्यांनाच 'गुण' ही संज्ञा देण्यात आली आहे.

सृष्ट पदार्थ उत्पन्न झाले असे जेव्हा म्हणण्यात येते तेव्हा वास्तविक विशिष्ट आकारात ते अभिव्यक्त होत असतात आणि तो त्यांचा आकार अदृश्य झाला की त्या पदार्थाचा नाश झाला असे समजले जाते. कार्यरूप द्रव्यांचे उत्पत्तिविनाश म्हणजे त्यांच्या विशिष्ट आकारात होणारी घडामोड असा याचा अर्थ होय. अर्थात् हे उत्पत्तिविनाश पदार्थांच्या अनित्यभूतांशोत्पन्न भागात होत असतात हे उघड आहे.

परंतु, सृष्ट द्रव्यात जो परमाणुस्वरूप सूक्ष्म अंश असतो तो मात्र विनाश पावत नाही. त्याच्याच आश्रयाने त्या द्रव्यातील शक्ती अथवा कार्यसाधक गुण निवास करीत असतो. आयुर्वेदात सांगितलेले स्निग्धशीतादि वीस गुण व याच गुणांचे विशिष्ट समुदाय असलेले वातादि दोष सुद्धा द्रव्यांतर्गत सूक्ष्म अंशाच्या आधारानेच राहत असतात, असे यावरून उपपन्न होते.

तात्पर्य, दोष केवळ शक्तिरूपही नव्हेत अथवा केवळ द्रव्यरूपही नव्हेत. कारण ते जसे सूक्ष्मद्रव्याश्रयी असतात तसेच शक्तिसंपन्नही असतात. ते पंचभूतविकारोद्भव असतात, परंतु, पंचभूतात्मकम्हणजे केवळ द्रव्यस्वरूप नसतात. रसादि धातू व पुरीषादि मल यांच्यापेक्षा शक्त्युत्कर्षसंपन्न व सुसूक्ष्म द्रव्य म्हणजे दोष. पंचभूतविकारांच्या समुदायापासून ज्याची निष्पत्ती होते अशा शरीरात द्रव्य व गुण हे नित्य समवायस्वरूपातच उपलब्ध होतात, त्यांचा पृथगात्म अनुभव येणे शक्य नसते.

पृथिव्यादि महाभूतांचे स्वाभाविक गुण प्रत्येकशः भिन्न असतात. त्यांचा व तदाश्रयभूत पंतभूतांचा जेव्हा परस्पर संयोग होतो तेव्हाच अखिल कार्यरूप सृष्टीची निर्मिती होते. अर्थात् सृष्ट्युत्पादक स्निग्धादि गुण हे संयोग-स्वरूपात राहत असतात.पंचभूतांचे अंश व तदाश्रित गुण यांच्या परस्पर-संयोगापासूनच पदार्थोत्पादक गुणांची निष्पत्ती होते. उदाहरणार्थ, श्लेषकत्व हा गुण संघातोत्पादक आहे, पृथ्वी व अप् या दोन भूतांचा आणि गंध व रस या तदाश्रित गुणांचा संयोग झाला की त्याची उत्पत्ती होते. शारीर द्रव्यांच्या निर्मितीत अवश्य असणारा परमाणु-संयोग या संश्लेषणगुणामुळेच संभवतो.

**भूतसंयोगज त्रिदोष**

भूतांशांच्या समुदायापासून जेव्हा सृष्ट पदार्थांची निर्मिती होते तेव्हा प्रथम परमाणू परस्परांकडे आकर्षित होतात आणि नंतर समुदित अथवा संघीभूत परमाणूंचे रसीभवन होऊन त्यांच्या ठिकाणी एकीभाव उत्पन्न होतो. परमाणूंचे आकर्षण पृथ्वीच्या गंध गुणाने होते तर त्यांचे विद्रुतीकरण अप् तत्त्वाच्या रसगुणाने संभवते. अर्थात् आकर्षण हा गुण नसेल तर त्याच्याअभावी केवळ रसीभवन होऊनही मूर्तत्व संभवणार नाही; उलट, रसन-गुणाभावी परमाणू परस्पराकृष्ट होऊनही ते एकरूप होणार नाहीत. रसता व आकर्षकता हे दोन गुण जेव्हा संयुक्त होतात तेव्हाच पदार्थमात्राची उत्पत्ती होते. या संयुक्त गुणालाच स्नेह किंवा श्लेषकता असे नांव असून पृथ्वी व अप्या दोन तत्त्वांच्या संयोगापासून त्याची निर्मिती होते. आयुर्वेदात सांगितलेला 'श्लेष्मा' असा उभयात्मकच आहे. पृथ्वी व अप् या दोघांपासून त्याची उत्पत्ती होते

अनुक्रमणिका

असे वचनच आहे.['अम्भःपृथिवीभ्यां श्लेष्मा ।' अ. सं.] अर्थात् तो केवळ पार्थिव नव्हे अथवा केवळ आप्यही नव्हे. तो भूजलसंयोगोद्भव आहे व म्हणूनच संयोजक आहे.

पित्तासंबंधीही असेच म्हणता येईल. तेही कफाप्रमाणेच भूतसंयोगजनित आहे. 'वायू हा वायुरूप, पित्त आग्नेय व श्लेष्मा हा सौम्य आहे'. ['वायोरात्मैवात्मा, पित्तमाग्नेयं, श्लेष्मा सौम्य इति ।' सु. सं.], अथवा 'आकाश व वायू यांपासून वायू, अग्नीपासून पित्त आणि पृथ्वी व अप् यांच्यापासून श्लेष्मा उत्पन्न होतो. ['वाय्वाकाशधातुभ्यां वायुः, आग्नेयं पित्तं, अम्भःपृथिवीभ्यां श्लेष्मा ।' –अ. सं.]; इत्यादि वचनांत पित्त हे तैजस असल्याचे सांगण्यात आले तरी तैजस म्हणजे केवळ तेजोद्भव असा त्यातील अभिप्राय नाही. कारण द्रवत्व, विस्रत्व इत्यादि जे पित्त–गुण म्हणून सांगितले आहेत ते केवळ तेजापासून उत्पन्न झालेले नसतात. तेज जेव्हा पृथ्वी व अप् यांच्याशीसंयुक्त होते तेव्हाच ते द्रवोत्पादक होते. 'द्रवत्व हे स्यंदनाचे असमवायी कारण असून पृथ्वी, अप् व तेज या भूतत्रयीच्या आश्रयाने ते राहत असते,' असे पदार्थावेत्तेही सांगतात ['स्यंदनासमवायि कारणं द्रवत्वं पृथिवीजलतेजोवृत्ति ।' –त. सं.]. अर्थात् द्रवत्वादि गुणांचा समुदाय हे ज्याचे स्वरूप आहे ते पित्त तेजःप्रधान असले तरी केवळ तेजोमय असणे शक्य नाही.

केवळ तेज उष्ण असते. ते द्रवत्वानुविद्ध झाले की त्यालाच पित्त म्हणतात. पृथ्वी, अप् व तेज या तीन भूतांचा संयोग झाला की ही द्रवावस्था उत्पन्न होते हे वर सांगितलेच. एकत्र आलेल्या परमाणूंचे तीत रसीभवन झालेले असते; त्यांचे स्वतंत्र स्वरूप नष्ट झालेले असते. या अवस्थेत असलेले परमाणू ज्यामुळे एकमेकांपासून वियुक्त होतात त्याला पित्त म्हणावयाचे. पित्ताचे हे विभाजनकर्म केवळ तेजामुळे होते असे म्हणता येणार नाही. ते जेव्हा अप्शी संयोग पावते तेव्हाच विभाजन संभवते. 'पित्त हे सस्नेह, तीक्ष्ण, उष्ण, लघू, विस्र, सर व द्रव असते,' हे वर्णन ['पित्तं सस्नेहतीक्ष्णोष्णं लघु विस्रं सरं द्रवम् ।' –अ. हृ.] पित्ताच्या याच स्वरूपाचे सूचक आहे. पृथ्वी व अप् यांच्याशी तेजाचा संयोग जेव्हा द्रवावस्थेपेक्षा अधिक प्रमाणात होतो तेव्हा त्या अवस्थेला पित्त म्हणावयाचे, असा याचा तात्पर्यार्थ होय.

कफ-पित्ताप्रमाणे शरीरस्थ वायू देखील केवळ वायुस्वरूप नसतो. 'वायोरात्मैवात्मा' [च. सं.] असे चरकांचे वचन असले तरी वायूचे केवळ गती हेच कार्य शरीरात सांगण्यात आले नाही. रौक्ष्य लघुत्व इत्यादि गुणांबरोबर शीतत्व देखील वातगुण म्हणुन सांगण्यात आले आहे. अर्थात् अन्य भूतविकारांशी अनुबद्ध होऊनच शरीरातील विविध प्रकारची कर्मे वायू करीत असतो हे उघड आहे. 'शरीरातील विविध प्रकारच्या क्रियांचा वायू हा प्रवर्तक असतो, सर्व इंद्रियांना त्याच्यामुळेच स्वकर्मात प्रेरणा मिळते, शारीर द्रव्यांची व शरीराची संधायकताही तदनुविद्धच असते', इत्यादि वर्णन चरकसंहितेत केले आहे.['प्रवर्तकश्चेष्टानामुच्चावचानां........सर्वेन्द्रियाणामुद्योजकः ........ सर्व शरीरधातुव्यूहकरः संधानकरः शरीरस्य ... ।' च. सं.], तर 'प्रस्पंदन, उद्वहन, पूरण, विवेक व धारण या लक्षणांनी युक्त असलेला वायू पांच प्रकारांनी शरीराचे धारण करतो', असे सुश्रुतसंहितेत सांगितले आहे ['प्रस्पंदनोद्वहनपूरणविवेकधारणलक्षणो वायुः पंचधा प्रविभक्तः शरीरं धारयति ।' – सु. सं.]. कर्माचे हे विविध प्रकार केवळ गतिस्वरूप होत असे म्हणता येणार नाही. संयोग व वियोग हे सर्व कर्मांचे प्रमुख भेद; त्यांना कारणीभूत होणारे आकर्षण व अपकर्षण म्हणजे केवळ गती नव्हे तर ते गतिविशेष किंवा गतिभेद होत. कर्मकारी वायू अप्–संयोगाने आकर्षण–कर्म करतो तर तेजःसंयोगाने अपकर्षण कर्म करतो त्याला योगवाही म्हणूनच म्हणतात ['योगवाहः परं वायु संयोगादुभयार्थकृत् । दाहकृत् तेजसा युक्तः शीतकृत् सोमसंश्रयात् ।' च. सं.].

अनुक्रमणिका

### शरीरस्थ वायूचा शीतगुण

सृष्ट पदार्थाची उत्पत्ती पंचभूतविकाराच्या समुदायापासून होते. अशा पदार्थात वायू हे सूक्ष्म तत्त्व इतर स्थूल तत्त्वांनी आवृत होऊन निवास करीत असते. यच्चयावत् सृष्ट द्रव्ये संयोगोद्भव संयुक्तावस्थावस्थित असल्याने ['तत्र संयोगापेक्षी लोकशब्दः' – च. सं.] अशा सृष्ट पदार्थात अवस्थित असणारा कर्मकारी वायू संयोगसहचारी असणे अपरिहार्यच होय. हा संयोग शीतगुणामुळे होतो. शरीर ही सुद्धा पंचभूतविकारोत्पन्न म्हणजे संयुक्तावस्थावस्थित अशी एक वस्तू आहे. आणि म्हणूनच शरीरस्थ वायू शीतगुणी असतो असे आयुर्वेदात सांगितले आहे.

केवळ वायूचा गुण उष्णत्वही नव्हे अथवा शीतत्त्वही नव्हे. तो 'अनुष्णाशीत' व 'स्पर्शवान्' असतो, असे त्याचे वर्णन न्यायशास्त्रात आढळते. तो जेव्हा अप्संयुक्त होतो तेव्हाच त्याच्या ठिकाणी संयोजकता उत्पन्न होते. असा हा अप्संयुक्त वायूच पदार्थांच्या निर्मितीला कारणीभूत होतो. कारण संयोगापासूनच सर्व सृष्ट पदार्थांची उत्पत्ती होत असते. तात्पर्य, शरीरस्थ वायू हा केवळ वायू नसतो तर तो अप्संयुक्त असतो 'तत्र रूक्षो लघुः शीतः खरः सूक्ष्मश्चलोऽनिलः' [अ. हृ.] इत्यादि वचनांतून शरीरगत वायूच्या इतर गुणांबरोबर शीतगुणाचाही निर्देश करण्यात हाच अभिप्राय असावा.

———

अनुक्रमणिका

# दर्शन ११–त्रिदोषांचे सामर्थ्यविशेष

पंचमहाभूते ही सृष्टीची उपादान–कारणे असून त्यांच्या विकारसमुदायापासूनच सृष्ट्युत्पत्ती होते. जरायुज, अंडज, स्वेदज आदि नानाविध भेद तीत आढळतात. कारण पृथिव्यादि भूतांचे अंश विभिन्न प्रमाणांत व स्वरूपांत त्यांत समुदित झालेले असतात.

### देहातील चैतन्यांश

गतप्राण देह म्हणजे शून्य गृह, असे चरक म्हणतात. ['शरीरं हि गते तस्मिन् शून्यागारमचेतनम् । पंचभूतावशेषत्वात् पंचत्वं गतमुच्यते । -' च.सं.] अर्थात् पंचमहाभूते स्वभावतः जड असतात. त्यांत कार्योत्पादक सामर्थ्याचा अभाव असतो. हे सामर्थ्य त्यांच्यात तदाश्रित चेतनांशामुळे उत्पन्न होते. व त्यामुळेच पंचमहाभूतांत विकार निर्माण होऊन विविध प्रकारची कार्यरूप सृष्टी आकारास येते. सर्व क्रियांचे आद्य कारण म्हणजे ही चेतनाच होय. 'आत्मा सचेतन असतो म्हणून त्याला कर्ता म्हणतात, उलटपक्षी मनाच्या ठिकाणी क्रियावत्त्व असूनही त्याला तसे म्हणत नाहीत, कारण ते सचेतन नसते', असा उल्लेख चरकांनीच एका ठिकाणी केला आहे. ['चेतनावान् यतश्चात्मा ततः कर्ता निरुच्यते । अचेतनत्वाच्च मनः क्रियावदपि नोच्यते । ' च. सं.]

हे कार्यकारी चैतन्य भूतमात्रात विद्यमान असले तरी ते इंद्रियगोचर असत नाही. ते अनुमानानेच समजून घ्यावे लागते. चरक म्हणतात, 'कुंभकाराशिवाय केवळ मृत्तिका, दंड, व चक्र यांच्यापासूनच घट निष्पन्न होतो, अथवा माती, गवत, लाकूड यांच्यापासूनच म्हणजे गृहकार नसला तरी सुद्धा घर तयार होते, असे जो अज्ञानामुळे समजत असेल तोच असे म्हणेल की, सजीव देह सुद्धा चेतना या कर्त्याशिवाय केवळ पंचमहाभूतांपासूनच उत्पन्न होतो. परंतु ते निराधारच नव्हे तर युक्तिसंगतही नाही. ['कृतं मृद्दण्डचक्रैश्च कुंभकारादृते घटम् । कृतं मृत्तृणकाष्ठैश्च गृहकाराद्विना गृहम्॥ यो वदेत् स वदेत् देहं संभूय करणैः कृतम् । विना कर्तारमज्ञानात् युक्त्यागमबहिष्कृतः॥' च. सं.'] सारांश, कार्यकारी चैतन्यांश अनुमेय असला तरी सृष्ट द्रव्यांतील त्याचे अस्तित्व संदेहातीत असेच आहे.

पृथिव्यादि भूतांपैकी पृथ्वीच्या ठिकाणी स्थूलत्व सर्वांत अधिक प्रमाणात असते, आणि अप्, तेज वायू यांच्या ठिकाणी उत्तरोत्तर ते कमी प्रमाणात असलेले आढळते. आकाशात मात्र स्थूलता अल्प प्रमाणातही असत नाही. इतर भूतांप्रमाणे त्यात विकृतीही होत नाही. कारण ते अवकाशस्वरूप असते. एक, नित्य व विभू अशी त्याची लक्षणेच सांगितली आहेत. ['तच्चैकं विभु नित्यं च । ' त. सं.]

या पंचभूतांपैकी ज्याच्या ठिकाणी चेतनेचे वास्तव्य अधिक प्रमाणात असते असे तत्त्व म्हणजे वायू. तेज, अप् व पृथ्वी ही तत्त्वे त्या मानाने क्रमशः कमी प्रमाणात सचेतन असतात. वायू हा विश्वकर्मा, विश्वरूप, सर्वगामी, सर्त्रतंत्रविधाता, विभू व भगवान विष्णूच होय, हे चरकांचे शब्द ['विश्वकर्मा विश्वरूपः सर्वगः सर्वतंत्राणां विधाता ...... विभुर्विष्णुः ...... वायुरेव भगवान् । ' च. सं.] वायूच्या या चैतन्याधिक्याचेच सूचक आहेत.

सचेतन व अचेतन हे शुद्ध सापेक्ष आहेत. चेतना ज्यात अधिक ते द्रव्य सचेतन व ज्यात ती अल्प ते द्रव्य अचेतन असे मानण्यात येते. वस्तुतः कमी अधिक प्रमाणात सर्वच द्रव्यांत चेतना निवास करीत असते. सचेतन अचेतन या संज्ञा योजावयाच्या त्या शास्त्रीय व्यवहार सुकर व्हावा या उद्देशाने. एके ठिकाणी चक्रपाणींनीच असे म्हटले आहे की, वास्तविक सचेतन कोणी असेल तर तो आत्माच आहे; शरीरही नव्हे अथवा मनही नव्हे; उष्णतेचा संयोग झाला म्हणून पाणी उष्ण आहे असे म्हणण्याप्रमाणेच शरीरादींना

सचेतन म्हणावयाचे ते उपचाराने, आत्म्याशी त्यांचा समवायसंबंध असतो म्हणून. इंद्रियसंयोगोत्तर ज्ञान होणे हेच आत्म्याचे सचेतनत्व होय. वृक्षादींनाही म्हणूनच सचेतन म्हणावयास हवे. कारण त्यांच्यात सेंद्रियत्व असते. [‘यद्यपि चात्मैव चेतनो, न शरीरं नापि मनः, ..... तथापि सलिलौष्ण्यवत् संयुक्तसमवायेन शरीराद्यपि चेतनम् । इदमेव चात्मनश्चेतनत्वं यदिंद्रियसंयोगे सति ज्ञानशालित्वम् ........... सेंद्रियत्वेन वृक्षादीनामपि चेतनत्वं बोद्धव्यम्’ । च. सं. व्याख्या.].

उत्पत्ती, वृद्धी, क्षय, विनाश इ. कर्मे सृष्ट पदार्थांत जी घडून येतात ती तदाश्रित चेतनांशामुळे; त्यालाच सामर्थ्य म्हणतात. उलटपक्षी ज्यात सामर्थ्य अल्प असते, म्हणजे विशिष्ट कार्यकारित्व ज्यात नसते, असा पदार्थमात्रातच अनुभवास येणारा जो अन्य विभाग त्याला द्रव्य ही सांकेतिक संज्ञा व्यवहाराच्या सोयीसाठी देण्यात येते. गुण व कर्म यांचे अस्तित्व प्रत्येक द्रव्यात असतेच. तथापि, सृष्ट-पदार्थान्तर्गत जो विभाग सामर्थ्यसंपन्न असतो त्याला शक्ती व जो त्याहून सामर्थ्यहीन असतो त्याला द्रव्य म्हणून संबोधावे असा संकेतच असून तदनुसार यच्चयावत् सृष्ट पदार्थांचे शक्ती व द्रव्य या दोन विभागांत वर्गीकरणही होऊ शकते. शक्ती व द्रव्य यांत नित्य-संबंध असल्याने केवळ शक्तिरूप व केवळ द्रव्यरूप असे हे विभाग असत नाहीत. एकात सामर्थ्य प्रकर्षाने असते तर दुसऱ्यात ते स्वल्प असते.

या विभागणीनुसार मानवी देहाचे विभागही दोन संभवतात. त्यांपैकी रसरक्तादि सात धातू हे द्रव्यरूप असून वातादि शक्तिरूप होत.

**धात्वाश्रयी सामर्थ्य**

रसरक्तादि हे स्थूलद्रव्यस्वरूपी व हात, पाय इत्यादि अवयवांनाच नव्हे तर एकूण शरीरालाच विशिष्ट आकृतिमत्त्व त्यांच्यामुळे येत असल्याने त्यांना धातू म्हणतात. उत्पत्ती, वृद्धी, विकास, उत्क्रांती इत्यादि ज्या क्रिया या धातूंत सुरु असतात, त्या सर्वांना तदन्तर्निष्ठ सूक्ष्मभागाश्रित सामर्थ्य हे प्रवर्तक असते. अर्थात् रसादि धातू विशिष्ट आकार धारण करीत असले तरी त्यांची उत्पत्ती होणे, ते परिपुष्ट होणे इत्यादि गोष्टी मात्र त्यांच्या स्वाधीन नसतात.

धातूंची उत्पत्ती, वृद्धी आदि ज्यामुळे होते ते क्रियाकारी सामर्थ्य धातूंहून भिन्न असते ही गोष्ट अनेक उदाहरणांवरून स्पष्ट होते. बाहेरून मिळणाऱ्या षड्रसयुक्त आहारामुळे रसरक्तादींची वाढ होते हे एकप्रकारे खरे असले तरी धातू सामर्थ्यहीन झाले म्हणजे बाहेरून मिळणारा आहार निष्फळ होतो हेही तितकेच सत्य आहे. एखाद्या रोगामुळे एखादा धातू शक्तिहीन झाला की षड्रससंपन्न पोषक आहाराचे सेवन करूनही त्याचे अभिवर्धन होत नाही. दृश्य स्वरूपात विद्यमान असताही जे शारीरधातू निष्क्रियत्वामुळे निर्जीव झालेले असतात. त्यांचेही पोषण आहाराने होत नाही. बालवयात ज्यामुळे शरीराची वाढ होते तोच आहार तरुण वयात शरीराचे स्थैर्य टिकवून धरण्यासाठी कारणीभूत होतो; आणि शरीर जराजर्जर झाले की आहार तोच असला तरी त्यापासून अभिवर्धन मात्र होत नाही. पौष्टिक आहाराचे सेवन करूनही धातुघटक क्षीण होत जाणेच या वयात अपरिहार्य असते. तसेच एखादा अवयव अजिबात नसणे अथवा विकृत स्वरूपात असणे याप्रमाणे कित्येकांच्या ठिकाणी जन्मापासून जी शारीरिक वैगुण्ये आढळूच येतात ती आहाराने नष्ट होत नाहीत. निरनिराळ्या प्राण्यांची शारीरिक वाढ एकाच प्रकारच्या आहाराने सारख्याच स्वरूपात होत नाही तर त्या त्या प्राण्याच्या देहानुसार होते, हेही पाहण्यात येतेच. जो रसधातू पुरुषशरीरात शुक्रत्व पावतो तोच स्त्रीशरीरात मात्र स्तन्य व आर्तव यांत उत्क्रांत होतो. तात्पर्य, शारीरधातूंत तदन्तर्निष्ठ पण तद्भिन्न असे कार्यकारी सामर्थ्य विद्यमान असते हे निश्चित. मात्र हे सामर्थ्य धातुगत असले तरी

धातूप्रमाणे दृश्य असत नाही. रसादि धातूंच्या सूक्ष्मतम भागांच्या आश्रयाने ते निवास करीत असते, व त्यांच्या समवायसंबंधामुळे त्या सूक्ष्मतम भागालाच सामर्थ म्हणतात.

**सामर्थ्यामध्ये अवस्थांतर नसते**

वृद्धी, ऱ्हास, उत्क्रांती, विकास इत्यादि अवस्थांतरे रसरक्तादि धातूंत अनुभवाला येतात; परंतु, ती ज्या अंतर्वर्ती सामर्थ्यामुळे घडून येतात त्यात मात्र कोणत्याही प्रकारचे स्थित्यंतर घडून येत नाही. सामर्थ्यसंपन्न गुणसमुदायरूपी दोषही वाढतात व क्षीण होतात असे वर्णन ग्रंथांतरांत आढळते. क्षयावस्था, वृद्धावस्था व समानावस्था याप्रमाणे दोषांच्या तीन अवस्था असल्याचे चरकसंहितेत सांगितले आहे. ['क्षयः स्थानं च वृद्धिश्च दोषाणां त्रिविधा गतिः ।' – च. सं.] क्षीण झालेल्या दोषांचे बृंहण करावे व वाढलेल्या दोषांचे कर्शन करावे, असाही सुश्रुतांचा आदेश आदेश आहे. ['क्षीणा बृंहयितव्याः..... वृद्धाः निर्हर्तव्याः ।' – सु. सं.] तसेच, दोषांची वाढ झाली की आपापल्या सामर्थ्याला व स्थितीला अनुसरून त्यांच्या लक्षणांत वाढ होते, तीव्रता येते; उलट, ते क्षीण झाले की त्यांची लक्षणेही क्षीण होतात, असे वर्णन अष्टांगहृदयात आढळते. ['यथाबलं यथास्वं च दोषा वृद्धा वितन्वते । रूपाणि जहति क्षीणाः ।' - अ. हृ.] परंतु, आहारादिकांनी साकार अवयवांप्रमाणेच वातादि दोषांतही वृद्धिक्षय होतात असा याचा अर्थ नव्हे. त्यांच्या प्रमाणात न्यूनाधिक्य संभवते इतकेच. गुणरूपी दोषांची रसादि धातूंप्रमाणे घटकशः वाढ होत नाही अथवा घटही होत नाही. त्यांत उत्क्रांती अथवा अवस्थांतरही संभवत नाही. रसरक्तादि द्रवधातूंत मांसाप्रमाणे अथवा अस्थी प्रमाणे स्थिरता नसते; परंतु, तरीही रसापासून रक्त, रक्तापासून मांस याप्रमाणे त्यांत अवस्थांतर होत असते. स्निग्ध, रूक्ष इत्यादि दोष-गुणांत मात्र असा प्रकार संभवत नाही. स्निग्धगुणाचे रूक्षगुणात किंवा रूक्षगुणाचे स्निग्धगुणात अथवा शैत्याचे उष्णतेत वा उष्णतेचे शैत्यात याप्रमाणे स्थित्यंतर कधीच होत नाही.

**त्रिविध बल**

हे कार्यकारी सामर्थ्य बालवयात म्हणजे सामान्यतः १६ व्या वर्षापर्यंत सापेक्षतया अक्षीण असते. त्यामुळेच हात, पाय इत्यादि अवयवांचा पूर्ण विकास होऊन लघुकाय बालकाचा सर्वांगपरिपूर्ण असा सुदृढ युवक होतो. तारुण्यात मात्र हे सामर्थ्य असूनही शारीर अंगांचा विकास स्थगित होतो. आणि तेच क्षीण होऊ लागले, आहारादिकांच्या द्वारेही पुनः वाढेनासे झाले की शरीराला जठरत्व येते व विकसित अथवा परिपुष्ट शरीरही क्रमशः क्षीण होऊ लागते. ते जेव्हा पूर्णपणे नष्ट होते तेव्हा देहाचाही नाश होतो. शरीराची वाढ, विकास, उत्क्रांती, आयुर्मान इत्यादि सर्वच गोष्टी प्रतिनियत असल्याने देहाचे हे सामर्थ्यही मर्यादितच असते. हे सामर्थ्य म्हणजे शरीराचे स्वाभाविक सामर्थ्य होय. शारीर धातूंची अभिवृद्धी समानगुणी आहारादिकांच्या द्वारे होत असली तरी तीतही या नैसर्गिक सामर्थ्यालाच महत्त्व असते. निरनिराळ्या अवयवांची व धीधैर्यादि गुणांची वाढही तदनुसारीच असते. हे सामर्थ्य म्हणजेच आयुर्वेदात वर्णिलेल्या त्रिविध बलांपैकी 'सहज बल' होय. शरीर व सत्त्व यांचे प्राकृतिक बल म्हणजे सहज बल; ऋतुभेदानुसार व वयोमानानुसार संभवणाऱ्या बलाला कालकृत बल म्हणतात; आणि आहारविहारादिकांमुळे जे प्राप्त होते त्याला युक्तिकृत बल असे म्हणतात. ['त्रिविधं बलमिति । सहजं कालजं युक्तिकृतं च । सहजं यच्छरी रसत्त्वयोः प्राकृतं, कालकृतं ऋतुविभागजं वयःकृतं च, युक्तिकृतं पुनस्तद्यदाहारचेष्टायोगजम् ।' – च. सं.]

हे शरीरस्थ सामर्थ्य शरीराच्या आश्रयानेच राहते. आणि शरीर म्हणजे रसरक्तादि धातूच. कारण शरीरात असणारे विविध अवयव जसे धातुनिर्मित असतात तद्वत् शरीराचा विशिष्ट आकारही धातुघटित असाच असतो. अर्थात् हे सामर्थ्य शरीराश्रयी म्हणजे धात्वाश्रयीच असते. शक्ती व द्रव्य यांत

अन्योन्यावलंबित्व असते. तथापि, दोघांचे स्वरूप स्पष्ट व्हावे म्हणून आश्रयभूत धातू म्हणजे द्रव्य व त्याच्या आश्रयाने राहणारे वीस गुण म्हणजे सामर्थ्य याप्रमाणे त्यांचे वर्णन वेगवेगळे करण्यात येते. चरकांनीही अशाच धोरणाने शारीर धातूंचे मुख्य प्रकार दोन सांगितलेले दिसतात. गुरुत्वापासून द्रवत्वापर्यंतचे वीस गुण हा एक व रसापासून शुक्रापर्यंतचे सात धातू हा दुसरा ['गुर्वादीश्च द्रवान्तान् गुणभेदेन रसादींश्च शुक्रान्तान् द्रव्यभेदेन'। च.सं.].

शक्ती किंवा सामर्थ्य जेव्हा द्रव्याचा आश्रय करते तेव्हाच सामर्थ्यविशेष अथवा शक्तिभेद यांचा संभव होतो. पांचभौतिक सृष्ट द्रव्यात द्रव्यागणिक जी कर्मभिन्नता आढळते तीसुद्धा या द्रव्याश्रयी सामर्थ्यभेदामुळेच उत्पन्न होते. शक्त्युत्कर्षसंपन्न अशा सूक्ष्म द्रव्याला 'सामर्थ्य' या नांवाने संबोधण्यांत येते ते म्हणूनच.

शरीराची जीवनयात्रा चालविणारे असे सामर्थ्य किंवा शक्तिस्वरूप द्रव्य म्हणजे दोष. ते त्रिविध असते व तीन प्रकारच्या कर्मांचे प्रवर्तक असते. कार्यकारी जीवनद्रव्याच्या या तीन प्रकारांनाच आयुर्वेदात श्लेष्मा, पित्त व वायू अशा संज्ञा असून अनुक्रमे संयोजन, विभाजन व वियोजन या तज्जन्य कर्मत्रयीच्याच त्या वाचक आहेत.

———

अनुक्रमणिका

# दर्शन१२– वातादींचे “दोष”त्व

शरीराची जीवनयात्रा वातपित्तकफांवर अवलंबून असते. कारण शरीर जीवन म्हणजे संयोजन, विभाजन व वियोजन ही कर्मत्रयी, व तिचे कर्तृत्व कफादींच्याकडे असते. परंतु, असे असतानाही या जीवनाधार वातादींना आयुर्वेदात ‘दोष’ ही संज्ञा योजलेली आहे. [‘वायुः पित्तं कफश्चेति त्रयो दोषाः समासतः–’ अ. हृ., ‘वायुः पित्तं कफश्चोक्तः शारीरो दोषसंग्रहः।’ - च. सं.] तिची यथार्थताच मुख्यतः या प्रकरणात विचारात घ्यावयाची आहे.

वातादि दोषांत विकृती उत्पन्न झाली की ते शरीराला दूषित करतात हे खरे असले तरी अविकृत स्थितीत तेच शरीराला उपकारक होतात, शरीराची आजीविका चालवितात.‘दोष विकृत झाले की देहाचा घात करतात. पण अविकृत असले की तेच शरीराचे व्यापार संचालित करतात; ते समावस्थेत शरीराच्या वाढीला कारणीभूत होतात पण विषमावस्थेत देहनाशाला प्रवृत्त होतात; हितकारक आचरण ठेवून त्यांच्यात क्षय अथवा वृद्धी न होऊ देता त्यांना समावस्थेत सुरक्षित ठेवणे म्हणूनच अवश्य आहे; वातादि दोष हेच देहोत्पत्तीला वस्तुतः कारण आहेत, शरीराच्या निम्न, मध्य व ऊर्ध्व भागात राहून अविकृत अवस्थेत तेच शरीराचे धारण करतात, देहरूपी घराला सुस्थित ठेवणारे ते जणू तीन स्तंभच असल्याने शरीराला कोणी त्रिस्थूण असेही म्हणतात; तेच विकृत झाले की देहनाशाला कारणीभूत होतात’, याप्रमाणे ग्रंथांतरांत दोषांचे वर्णन केलेले आढळते. [‘विकृताविकृता देहं घ्नंति ते वर्तयन्ति च।’ अ. हृ,’ ‘य एव देहस्य समा विवृध्दै त एव दोषा विषमा वधाय। यस्मादतस्ते हितचर्ययैव क्षयात् विवृद्धेरिव रक्षणीयाः।’ अ. हृ.,’ ‘वातपित्तश्लेष्माण एव देहसंभवहेतवः। तैरेवाव्यापन्नैः अधोमध्योर्ध्वसंनिविष्टैः शरीरमिदं धार्यते अगारमिव स्थूणभिस्तिसृभिश्च त्रिस्थूणमाहुरेके। त एव च व्यापन्नाः प्रलयहेतवः।’ – सु. सं.]

## दोषादि संज्ञा पारिभाषिक आहेत

आर्थात् ‘दोष’ ही संज्ञा धात्वर्थानुसारी नसून विशिष्ट अभिप्रायाने प्रचलित करण्यात आलेली ‘स्वसंज्ञा’ आहे हे उघड होय. ‘स्वसंज्ञा’ म्हणजे पारिभाषिक संज्ञा. उदाहरणार्थ, ‘मिथुन’ या शब्दाचा अर्थ आयुर्वेदात ‘तूप व मध’ असा आहे. ‘दोष’ हा शब्दही असाच पारिभाषिक आहे. केवळ दूषित करणारे असा त्यातील अभिप्राय नाही. ‘दोष’ म्हणजे वायू, पित्त व कफ; मग ते समावस्थेत म्हणजे अविकृतावस्थेत असोत की विषमावस्थेत म्हणजे विकृतावस्थेत असोत.

‘उत्पादन, पृथक्करण व उत्सर्जन या तीन क्रियांच्या द्वारे चंद्र, सूर्य व वायू ज्याप्रमाणे जगताचे धारण करतात त्याप्रमाणे श्लेष्मा, पित्त व वायू शरीराचे धारण करतात’, अशा शब्दांत दोषांचे देहधारकत्व वर्णिले आहे. [‘विसर्गादानविक्षेपैः सोमसूर्यानिला यथा। धारयन्ति जगद्देहं कफपित्तानिलास्तथा।’ सु. सं.] धातू व मल यांच्याबरोबरच दोष हेही देहमूलक असल्याचा उल्लेख आहे [‘दोषधातुमलमूलं हि शरीरम्।’ सु. सं.]. अर्थात् वातादि दोष केवळ देहदूषकच होत असा धात्वर्थानुगामी अभिप्राय आयुर्वेदाला संमत नाही हे स्पष्टच होय.

परंतु, असे असताही हेच वात-पित्त–कफ जेव्हा कुपित होतात, जेव्हा त्यांच्यात अस्वाभाविकता अथवा वैषम्य उत्पन्न होते, तेव्हा विविध विकार उत्पन्न करून तेच शरीराला पीडाकर होतात. आणि हे त्यांचे वैशिष्ट्य लक्षात यावे हाच त्यांना ‘दोष’ ही संज्ञा देण्यातील प्रमुख हेतू होय.

वस्तुतः केवळ वातादि तीन दोषच नव्हेत तर रसादि सात धातू आणि पुरीषादि तीन मल हे सुद्धा देहधारकच होत. तिघांच्या देहधारणकर्मात मात्र फरक आहे. आणि तो स्पष्ट व्हावा याच उद्देशाने केवळ ‘धातु’ ही एकच संज्ञा न योजता ‘दोष, धातु व मल’ अशा तीन संज्ञा योजण्यात आल्या आहेत.

अनुक्रमणिका

या एकूण तेरा पदार्थांपैकी वात, पित्त व कफ हे तीन सामर्थ्योत्कर्षसंपन्न व अत्यंत सूक्ष्म असून शरीरातील सर्व कर्मांचे कर्तृत्व त्यांच्याकडेच असते. अपथ्यकर आहारविहारामुळे विकृत अथवा कुपित होऊन शरीरातील विविध प्रकारच्या विकृती तेच उत्पन्न करतात. 'दोष' ही संज्ञा त्यांनाच दिली आहे.

**दोष सूक्ष्मच आहेत**

स्थानभेदांनुसार दोषांचे जे भेद सांगितले आहेत त्यांपैकी क्लेदक कफ, रंजक पित्त अशा काही प्रकारांचे स्वरूप द्रव्यद्रव्यात्मक, स्थूल व दृश्य असे आहे. उलट, साधक, आलोचक हे पित्ताचे भेद अनुमानगम्य असल्याने सूक्ष्मरूपी होत. दोष हे स्थूल व सूक्ष्म याप्रमाणे उभयविध आहेत, असा यावरून सकृद्दर्शनी समज होण्याचा संभव. परंतु, तो योग्य नाही. प्राण, अपान आदि वायूचे पांचही भेद सूक्ष्मच आहेत. बृहदंत्रात संचित होणारा व बस्ती आदि अवयवांच्या द्वारे उत्सर्जित होणारा वायू हा अन्नमलोद्भव असल्याने मलरूपच होय. परंतु, उत्साह, श्वासोच्छ्वास, चेष्टा, वेग आदि चलनात्मक कर्मांचा कर्ता वायू मात्र सूक्ष्मच आहे. 'तत्र रूक्षो लघुः शीतः खरः सूक्ष्मश्चलोऽनिलः' अशा प्रकारच्या वचनांतून तसा उल्लेखही आढळतो. [अ. हृ.] श्लेषक कफ, रंजक पित्त असे काही दोषभेद स्थूलद्रव्याश्रयी आहेत हे खरे, परंतु, शक्तिरूप दोष स्थूल आहेत असा याचा अर्थ नाही. ही स्थूलता शक्त्याधार द्रव्याची असते. ज्यात उष्णत्वादि गुण उरले नाहीत असे पाचक अथवा रंजक पित्त म्हणजे कार्यकारी पित्तदोष नव्हे. शक्तिहीनतेमुळे मलत्व प्राप्त झालेले ते उत्सर्जनयोग्य द्रव्य होय. बोधक, क्लेदक इत्यादि कफभेदही गुणहीनता प्राप्त झाली की मलरूप अत एव त्याज्य होतात. अर्थात् दृश्य व स्थूल अशा या द्रव्यांचा, श्लेष्मा व पित्त या शब्दांनी जेव्हा निर्देश करण्यात येतो तेव्हा तो तदाश्रित कफसंज्ञक वा पित्तसंज्ञक सामर्थ्याचा वाचक असतो, हे ध्यानात ठेवले म्हणजे कफपित्तांचे स्थूल व सूक्ष्म असे भेद करणे अतात्त्विक होय हे स्पष्ट होईल.

आणखीही एक मुद्दा यासंबंधी विचारात घेणे अवश्य आहे. तो असा की, वातादी दोष सर्वदेहव्यापी होत असे शास्त्रकार सांगतात. अर्थात् 'शरीरावयवास्तु परमाणुभेदेन अपरिसंख्येया भवंति' या चरकांच्या वचनानुसार अपरिमेय अशा अणुस्वरूपी शारीर घटकांपैकी प्रत्येकात वातादि दोषांचे अस्तित्व अवश्यंभावी होय. शरीराचा असा हा अवयव सुसूक्ष्म असला तरी त्यातसुद्धा उत्पत्ति–विनाशात्मक कर्म सतत सुरु असते व त्यामुळेच तो जीवमान असतो. ही उत्पत्ति–विनाशात्मकता संयोजन, विभाजन व वियोजन यांच्या अभावी संभवत नाही. ही कर्मे ज्यांच्यामुळे व्हावयाची त्या कफादींचे वास्तव्यही या सुसूक्ष्म घटकात असणे म्हणूनच अपरिहार्य ठरते. हे अवयव स्वभावतःच सूक्ष्म असल्याने तदाश्रित वातपित्तकफ सुद्धा त्याहून सुसूक्ष्म असणार हेही उघड आहे. अशा सर्वदेहव्यापी दोषांना स्थूल मानणे म्हणूनच अयुक्त ठरते.

वातापित्तकफांसाठी जशी 'दोष' ही संज्ञा निश्चित केली तशी रसरक्तादींच्यासाठी धातु या संज्ञेची योजना करण्यात आली आहे. शरीराचे विशिष्टाकृतिमत्त्व त्यांच्यावरच निर्धारित असते. त्यांच्या सूक्ष्म भागाचा आश्रय करून दोषरूपी सामर्थ्य निवास करीत असते तर पुरीषादि सामर्थ्यहीन द्रव्ये या रसादींच्याच बहिर्भागाचा आश्रय करून राहतात.

या धातूंत वृद्धिक्षयात्मक कार्य अविरत सुरु असते. त्यामुळे धातूंचे काही अंश सामर्थ्यहीन होतात. अशा निःसत्त्व अंशांनाच 'मल' ही संज्ञा देण्यात आली आहे.

दोष, धातू व मल हे अशा प्रकारे मानवी शरीराचे प्रमुख विभाग होत. शरीराची विविध अंगोपांगे आणि त्वचा, कला, स्नायू, धमन्या, पेशी इत्यादि विविध पदार्थ या सर्वांचा अंतर्भाव या तीनच विभागात होऊ शकतो. त्यांपैकी सूक्ष्मद्रव्यरूप व शक्त्युत्कर्षसंपन्न असलेल्या वातादींना दोष, दोषरूपी शक्तीला आधारभूत व स्थूलद्रव्यस्वरूप असलेल्या रसरक्तादींना धातू व धातूंच्याच सत्त्वहीन अशा पुरीषादी स्थूल अंशांना मल म्हणतात. उत्पादकत्व हे दोषांचे, उत्पाद्यत्व हे धातूंचे व क्षीयमाणता हे मलांचे लक्षण होय, असेही म्हणता येईल. कारण रसरक्तादींची उत्पत्ती दोषकर्तृक असते व या उत्पादनकर्मातच धातूंचे जे अंश सामर्थ्यहीन होतात. त्या विनाशोन्मुख अथवा क्षीयमाण अंशांनाच मल म्हणतात.

———

अनुक्रमणिका

# सारांश (पूर्वार्ध)

वातादि दोषांसंबंधी आतापावेतो केलेल्या विवेचनात मुख्यतः पुढील गोष्टींना अनुलक्षून स्पष्टीकरण करण्यात आले आहे–

(१) शारीर द्रव्यांचे प्रमुख विभाग–दोष, धातू मल (२) दोषसंज्ञक शक्तिरूप विभाग (३) धातुसंज्ञक शक्तियुक्त विभाग (४) मलसंज्ञक शक्तिहीन विभाग (५) दोष, धातू व मल या शब्दांचे पारिभषिक अर्थ (६) त्यांचा विपर्यास केल्याने संभवणारा अर्थविपर्यास (७) शरीराचे पांचभौतिकत्व (८) पंचभूतांचे गुण व शारीर द्रव्यांत आढळणारे गुण (९) गुणांचे लक्षण (१०) गुण व पंचभूते यांचा संबंध (११) गुणसमुदायात्मकत्व (१२) दोषांचे कार्यकारित्व (१३) दोषांचे द्रव्यत्व (१४) दोषांचे सूक्ष्मत्व (१५) दोष केवळ शक्तिरूप नव्हेत (१६) कर्माचे तीन भेद (१७) कफाचे सार्वदेहिक कार्य–संयोजन (१८) पित्ताचे सार्वदेहिक कार्य–विभाजन (१९) वायूचे सार्वदेहिक कार्य–वियोजन (२०) श्लेष्मादि संज्ञांची अन्वर्थकता (२१) संयोगादि क्रियांच्या द्वारे सुरु असणारा जीवनव्यापार (२२) शारीर पदार्थांची उत्पत्ती (२३) वृद्धी (२४) विकास (२५) उत्क्रांती (२६) विनाश (२७) जीवात्मा (२८) त्याचा देहाशी असलेला संबंध (२९) त्याचे श्रेष्ठत्व (३०) रसादि धातूंचा उत्पत्तिक्रम (३१) पुरुषाच्या व स्त्रीच्या शरीरातील सप्त धातूंचे अस्तित्व (३२) धातूंचे सामर्थ्याश्रयत्व (३३) धातूंचे स्थूलद्रव्यत्व (३४) मलांचे स्थूलद्रव्यत्व व शक्तिहीनत्व.

आयुर्वेदीय ग्रंथ प्रमाण मानून व तदन्तर्गत वचनांची अर्थसंगती विचारात घेऊनच हे सर्व विवेचन यावच्छक्य बोधक स्वरूपात केले आहे. आणि दोषधातुमलांच्या सार्वदेहिक कर्मांचे म्हणजे मानवी देहात चालू असणाऱ्या जीवनव्यापाराचे सर्वसामान्य स्वरूप यथावत् अवगत होण्याच्या दृष्टीने ते पर्याप्त होईल असा विश्वास आहे.

(वाताहि दोष शरीरातील विभिन्न स्थानांच्या आश्रयाने राहत असतात आणि स्थानानुरोधाने त्यांच्या स्वाभाविक व अस्वाभाविक कर्मांतही विभिन्नता उत्पन्न होते. स्थानभेदांनुसार संभवणाऱ्या या दोषभेदांचे आणि तज्जन्य कर्मविशेषांचे विवरण पुढील भागात करण्यात येईल.)

———

अनुक्रमणिका

# उत्तरार्ध

## दर्शन १३– दोषगुणांची आश्रयस्थाने

पूर्वार्धात वातादि दोषांच्या स्वरूपगुणकर्माविषयी सर्वसामान्य विवेचन करण्यात आले. आता शरीराच्या विविध स्थानांत घडून येणाऱ्या त्यांच्या स्वाभाविक व अस्वाभाविक क्रियांसंबंधी विवरण या भागात करावयाचे आहे.

विसर्ग, आदान व विक्षेप या तीनच [दोषानुबंध व दूष्यानुबंध यांना अनुसरून क्रियाभेद अनेक संभवत असले तरी प्रमुख क्रिया तीनच.] शरीराच्या स्वाभाविक क्रिया असून त्यांचे कर्तृत्व अनुक्रमे श्लेष्मा, पित्त वायू यांचेकडे असते हे पूर्वी सांगितलेच. या तीनही क्रियांत गतीला किंवा चलनाला एकप्रकारे प्राधान्य असते. कारण शरीराच्या निरनिराळ्या अवयवांत चालणाऱ्या आकुंचनप्रसरणरूप क्रिया म्हणजे वस्तुतःचलनाचेच भेद होत. गती हीच त्या सर्वांना साधक किंवा हेतुभूत असते. पदार्थवेत्त्यांनी तर कर्म म्हणजे चलनात्मकता अशी व्याख्याच केली आहे. ['चलनात्मकं कर्म'– त. सं.] तीनही दोषांत वायूला जे प्राधान्य देण्यात आले आहे ते म्हणूनच. कारण चलनाचे कर्तृत्व त्याकडेच असते. 'वायू हा तंत्रयंत्रधर ····असून सर्व प्रकारच्या क्रियांचे प्रवर्तकत्व त्याच्याकडेच असते···· सर्व इंद्रियांना त्याच्यामुळेच प्रेरणा मिळते ···· शारीरद्रव्यांची व शरीराची संधायता तदनुविद्धच असते ···· सर्व कर्मांचे संचालन करणारा तोच असतो'.['वायुस्तंत्रयंत्रधरः ...... प्रवर्तकश्चेष्टानामुच्चावचानां..... सर्वेन्द्रियाणामुद्योजकः...... सर्वशरीरधातुव्यूहकरः संधानकरः शरीरस्य..... सर्वतंत्राणां विधाता । ' च. सं.], इत्यादि वचनांतून वायूचे सर्वक्रियाकारित्व व प्राधान्य याविषयी चरकसंहितेत जसा उल्लेख आढळतो तद्वत 'वायू हा विभू, आशुकारी, बलवान्, अन्य दोषांना प्रकुपित करणारा, स्वतंत्र व अन्य अनेक रोगांना उत्पन्न करणारा असल्याने अन्य दोषांहून तोच अधिक बलवान होय' ['विभुत्वादाशुकारित्वात् बलित्वादन्यकोपनात् । स्वातंत्र्याद् बहुरोगत्वात् दोषाणां प्रबलोऽनिलः ।'......अ. हृ.], असे वर्णन अष्टांग-हृदयातही केलेले आढळते.

शरीरात चालू असणाऱ्या सर्व क्रिया चलनात्मक असतात. यामुळे चलनात विकृती उत्पन्न झाली की सर्व क्रियांतही विकृती म्हणजे क्रियावैषम्यच. अर्थात् सर्य क्रियांत व विक्रियांत चलन हेच हेतुभूत असून ते असून ते वायुजनित असते हे स्पष्ट होय. [वातादि दोषांतील वायूचे हे प्राधान्य विचारात घेऊनच प्राचीन शास्त्रकारांनी वायू, पित्त व कफ असा क्रम दोषविवेचनात स्वीकारलेला असावा असे वाटते. प्रस्तुत ग्रंथाच्या पूर्वार्धात समुदायात्मक शरीराचे वर्णन करताना समुदायकारी कफाचे प्राधान्य विचारात घेऊन श्लेष्मा, पित्त व वायू असा क्रम स्वीकारला होता. परंतु, आता उत्तरार्धात कर्माच्या विकारांसंबंधी विचिकित्सा करावयाची असल्याने कर्मकारी वायूच्या प्राधान्याला अनुसरून वायू, पित्त व कफ हा क्रन अनुसरला आहे.]

### दोषांचे भेद व स्थूलमानाने प्राधान्य

शरीराच्या सर्व स्थूल–सूक्ष्म अवयवांत गत्यात्मक, पचनात्मक व पोषणात्मक असे त्रिविध कर्म सतत सुरू असते. हृदय, आमाशय, पक्वाशय आदि विभिन्न स्थानांत हे कर्म होतच असते. फरक इतकाच की, स्थानभेदानुसार त्या त्या स्वरूपातही फरक पडतो. या सर्व क्रिया दोषांच्याकडूनच घडून येत असतात. त्यामुळे स्थानभिन्नतेमुळे संभवणाऱ्या क्रियाभेदांना अनुसरून क्रियाकारी दोषांचेही भेद कल्पिण्यात आले आहेत. प्राण, अपान आदि वायूचे, पाचक, रंजक आदि पित्ताचे व श्लेषक, अवलंबक आदि कफाचे हे प्रकार पुढे सांगण्यात येणारच आहेत.

अनुक्रमणिका

गती, पचन व पोषण या तीनही क्रिया शरीराच्या सर्वच भागांत सुरू असल्या तरी जेथे जी क्रिया विशेषत्वाने चालू असते तिला अनुसरूनच त्या त्या भागात ती ती क्रिया करणाऱ्या दोषाचे प्राधान्य मानण्यात येते. ज्या भागात प्रामुख्याने गत्यात्मक क्रिया सुरू असतात तेथे वाताचे, तर मुख्यतः पचनात्मक कार्य चालू असणाऱ्या भागात पित्ताचे आणि पोषणात्मक क्रिया ज्या ठिकाणी प्रधानतया होतात त्या ठिकाणी कफाचे प्राधान्य असते, असा अभिप्राय आयुर्वेदीयांनी व्यक्त केला आहे.

**अविकृत स्थितीतील दोषांची कार्ये**

वातादि दोषांची शरीरातील स्वाभाविक कार्ये संक्षेपतः पुढीलप्रमाणे सांगता येतील. शरीराला पोषक होणाऱ्या रसधातूचे खालच्या, वरच्या व तिर्यक् भागांत प्रक्षेपण, श्वसन, मलमूत्र व शुक्रार्तव इत्यादींचे उत्सर्जन, वाक्प्रवृत्ती, हस्तपादादि अवयवांचे संचालन, या व अशा स्वरूपाच्या सर्व क्रिया गतिस्वरूप वायूच्या होत. त्या सर्वांत चलनात्मकता ही सामान्य आहे.

उपभुक्त आहाराचे पचन करणे, रसरक्तादि धातूंतील सारभूत व किट्टरूप अंशांचे पृथक्करण करणे आणि शरीराच्या सुसूक्ष्म अवयवात सुद्धा प्रसादरूप व मलरूप अंश एकमेकांपासून वियुक्त करणे, इत्यादि कार्यांचे कर्तृत्व पचनाचे कार्य करणाऱ्या विवेचक पित्ताकडे असते.

आणि पित्तविपाचित आहारातील पोषक अंशांचे रसधातूच्या स्वरूपात ग्रहण करणे, अस्थींचे संधी वगैरे सुदृढ राखणे, आपल्या संधायक गुणाने सर्व लहानमोठ्या शारीर अवयवांचे उपबृंहण करणे इत्यादि कर्मे संश्लेषक श्लेष्म्याकडून होत असतात.

आयुर्वेदीय ग्रंथांत वातपित्तकफांची नानाविध कार्ये पुढीलप्रमाणे वर्णिलेली आहेत. 'प्रस्पंदन, उद्वहन, पूरण, पृथक्करण व धारण ही ज्याची लक्षणे आहेत असा वायू पांच प्रकारे विभक्त होऊन शरीर धारण करतो; रंजन, पचन, ओज, तेज, मेधा व उष्णता यांना कारण असणारे पित्तही पांच प्रकारचे असून उपर्युक्त अग्निकर्मांच्या योगाने ते शरीराला उपकारक होते; कफाचे सुद्धा भेद पांच संभवतात; संधिसंश्लेषण, स्नेहन, रोपण, पूरण, बल व स्थैर्य या सर्वांना तोच कारणीभूत होतो;त्याच्या या उदककर्मामुळे वातपित्तांप्रमाणे तोही शरीराला पोषक होतो' ['प्रस्पंदनोद्वहनपूरणविवेकधारणलक्षणो वायुः पंचधा प्रविभक्तः शरीरं धारयति । रागपक्त्योजस्तेजोमेधोष्मकृत्पित्तं पंचधा प्रविभक्तं अग्निकर्मणा अनुग्रहं करोति । संधिसंश्लेषणस्नेहनरोपणपूरणबलस्थैर्यकृत् श्लेष्मा पंचधा प्रविभक्तः उदककर्मणानुग्रहं करोति' । सु. सं.], हे वर्णन सुश्रुतसंहितेत केलेले आहे. अष्टांगहृदयातील वर्णन असे आहे. 'उत्साह श्वासोच्छ्वास मलमूत्रादींची प्रवृत्ती, धातूंचे अभिवहन योग्य रीतीने होणे इत्यादि शरीरातील सर्व प्रकारच्या हालचाली करणे आणि इंद्रियांची कार्यक्षमता राखणे ही कार्ये वायूची आहेत, तर अन्न पचन करणे, उष्णता राखणे, भूक व तहान यांची प्रवृत्ती, शरीराची कांती, मृदुता, दृष्टी, रूची, धारणा, बुद्धी, शौर्य या गोष्टींची जोपासना करणे ही पित्ताची आणि शरीर सुदृढ, सस्नेह, सुसंहत व सक्षम राखणे ही कफाची कार्ये होत, अविकृत अथवा स्वाभाविक अवस्थेतील या कार्यांच्या योगाने वायू, पित्त व कफ हे त्रिदोष शरीराच्या जीवनव्यापारास साहाय्य करतात'.['उत्साहोच्छ्वास-निःश्वासचेष्टावेगप्रवर्तनैः । सम्यग्गत्या च धातूनामक्षाणो पाटवेन च । अनुगृण्हात्यविकृतः पित्तं पक्त्यूष्मदर्शनैः । क्षुतृड्रुचिप्रभामेधाधी-शौर्यतनुमार्दवैः । श्लेष्मा स्थिरत्वस्निग्धत्वसंधिबंधक्षमादिभिः । ' अ. हृ.]चरकसंहितेत देखील जवळजवळ असेच वर्णन आहे['उत्साहोच्छ्वासनिःश्वासचेष्टा धातुगतिः समा । समो मोक्षो गतिमतां वायोः कर्माविकारजम् । दर्शनं पक्तिरूष्मा च क्षुत्तृष्णादेहमार्दवं । प्रभा प्रसादो मेधा च पित्तकर्माविकारजम् । स्नेहो बंधस्थिरत्वं च गौरवं वृषता बलम् । क्षमा धृतिरलोभश्च कफकर्माविकारजम् ।' च. सं.] या सर्व विवेचनाचा साकल्याने विचार केला म्हणजे असे दिसून येते ती गती, पचन व पोषण हीच अनुक्रमे वायू, पित्त व कफ यांची कार्येरूपे होत. पित्त अग्निकर्माने. श्लेष्मा

अनुक्रमणिका

उदककर्माने व वायू आत्मरूपाने शरीराची जीवनयात्रा चालवितो असे सांगण्यात हाच अभिप्राय अभिप्रेत आहे. 'विसर्ग, आदान व विक्षेप या तीन क्रियांच्या योगाने चंद्र, सूर्य व वायू ज्याप्रमाणे जगाचे धारण करतात त्याचप्रमाणे शरीरातील कफ, पित्त व वायू हे देखील त्याच क्रियांनी शरीराचे धारण करतात' ['विसर्गादानविक्षेपैः सोमसूर्यानिला यथा । धारयंति जगद्देहं कफपित्तानिलास्तथा ।' सु. सं. ।], या सुश्रुतवचनात तर विक्षेपण, विश्लेषण व संश्लेषण हीच वातादींची प्रधान कर्मे असल्याचा स्पष्टपणे उल्लेखच आहे.

शरीराच्या निरनिराळ्या अवयवांपैकी काहीत वाताचे प्राधान्य असते तर काहीत पित्ताचे व काहीत कफाचे प्राधान्य असते, असे वर्णन वर दिलेल्या दोषांच्या या कार्यभेदांना अनुसरूनच करण्यात आले. हे दोष गुणसमुदायस्वरूप होत हे पूर्वी उल्लेखिलेच (पूर्वार्ध दर्शन १०). तथापि, याचा अर्थ असा नव्हे की त्रिदोषांचे हे स्निग्धरूक्षादि गुण शरीराच्या सर्व स्थानांत सर्वच्या सर्व व सारख्या प्रमाणात विद्यमान असतात. उदाहरणार्थ, कफाची जी स्थाने सांगितली आहेत त्या सर्वांत कफाचे सर्वच गुण सारख्याच प्रमाणात असत नाहीत.

कोणत्या स्थानात कोणत्या दोषाचे प्राधान्य असते हे पाहताना दोष ज्याच्या आश्रयाने राहतात त्या धातुमलांचे स्वरूपही विचारात घेणे इष्ट होईल. रसरक्तादि धातूंपैकी रस व रक्त हे द्रवरूप, मांस व अस्थी घनरूप व बाकीचे उभयस्वरूपी म्हणजे पूर्णपणे घनही नव्हेत व द्रवही नव्हेत असे आहेत. पुरीष, मूत्र व स्वेद या मलांतही स्वरूपतः सारखेपणा नाही. या एकूण दहा आश्रयस्थानांपैकी वायूचे वास्तव्य अस्थीच्या ठिकाणी असते;पित्त स्वेद व रक्त यांच्या आश्रयाने राहते आणि उर्वरित सात स्थानांचा आश्रय करून कफ असतो असे वर्णन केलेले आहे.['तत्रास्थनि स्थितो वायुः पित्त तु स्वेदरक्तयो । श्लेष्मा शेषेषु ।' अ. हृ.]

धातू व मल आणि वातादि दोष यांच्यातील आश्रयाश्रयी भावाचे स्वरूप कसे असते याची कल्पना त्यांच्या सर्वसामान्य कार्यावरून करता येण्यासारखी आहेच. थोडा विचार केला तर आणखीही काही गोष्टी यासंबंधी पुढीलप्रमाणे दिसून येतात.

### दोषांची धातूंतील आश्रयस्थाने

रसधातू हे कफदोषाचे एक स्थान सांगण्यात आले आहे. निरनिराळी आहार्य द्रव्ये जठरातील अग्नीने विपाचित झाल्यानंतर त्यांच्यापासून जो द्रवरूप सारभाग निर्माण होतो तोच हा रस होय.सुश्रुताचार्य म्हणतात, 'खाद्य, पेय, चोष्य व लेह्य याप्रमाणे ज्यांचे प्रकार चार संभवतात; गोड, आंबट, खारट, तिखट, कडू व व तुरट या सहा रसांनी जी युक्त असतात; ज्यांच्या ठिकाणी द्विविध (वा अष्टविध) वीर्य विद्यमान असते आणि ज्यांच्या ठिकाणी गुरुमंदादि गुण निवास करीत असतात अशा शरीरोपयोगी पांचभौतिक आहार्य द्रव्यांचे योग्य रीतीने पचन झाले म्हणजे त्यांच्यापासून जो परमसूक्ष्म व तेजोभूत असा सारभाग निर्माण होतो त्यालाच रस असेम्हणतात. द्रवरूपअसलेल्या या रसाला त्याच्या स्नेहन, जीवन, तपर्ण, धारण इत्यादि कार्यांमुळे सौम्यगुणीच मानण्यात येते'.['तत्र पांचभौतिकस्य चतुर्विधस्य षड्रसस्य द्विविधवीर्यस्य अष्टविधवीर्यस्य वा अनेकगुणस्य उपभुक्तस्याहारस्य सम्यक्परिणतस्य यस्तेजोभूतः सारः परमसूक्ष्मः स रस इत्युच्यते । ...... स खलु द्रवानुसारी स्नेहनजीवनतर्पणधारणादिभिर्विशेषैः सौम्य इत्यवगम्यते ।' सु. सं.] विविध द्रव्यांचे द्रवीभूत झालेले सूक्ष्म अंश या रसधातूत संमिश्र अवस्थेत विद्यमान असतात आणि निरनिराळ्या शारीर अवयवांशी समानगुणी असणाऱ्या या द्रव्यांशांपासून पुढे रसरक्तादि धातूंची अभिवृद्धी होते. रसधातू हा द्रवरूप असताही त्यात एकीभूत झालेले नानाविध द्रव्यांचे परमाणू आपापले स्वतंत्र अस्तित्व विसरून एकमेकांशी एकजीव झालेले असतात. अर्थात् त्यांच्या ठिकाणी संश्लेषकता अथवा समरसता निर्माण झालेली असते आणि त्याला संधायक श्लेष्माच

कारण असतो. रस हे कफाचे एक स्थान होय असे म्हणूनच सांगण्यात आले असावे [रसधातू द्रवरूप असून द्रव्यांशांना द्रवत्व तेजामुळे वा उष्णतेमुळे प्राप्त होत असते, आणि तेजःप्रधान दोष तर पित्त आहे, कफ नव्हे; तेव्हा रसधातूचा उल्लेख कफाऐवजी पित्ताचे स्थान म्हणून असावयास हवा होता, असे, यावर मनात येण्यासारखे आहे. परंतु, ते योग्य नाही. कारण आहारातील परमाणूंना द्रवावस्था प्राप्त होण्यासाठी तेज अथवा तैजस पित्त कारणीभूत होत असले तरी या द्रवावस्थेत ते परमाणू परस्परांशी एकरूप होऊन राहतात ते मात्र संश्लेषक कफामुळेच.]

मेद, मज्जा, शुक्र व मांस यांचाही निर्देश कफाची स्थाने म्हणून करण्यात आला आहे. त्यांपैकी पहिले तीन धातू स्वभावतःच स्निग्ध आहेत आणि मांस हे समुदायात्मक आहे. अर्थात् स्निग्धस्वभावी व समुदायकारी कफाचे वास्तव्य त्यांच्या ठिकाणीच विशेषत्वाने असावयाचे हे उघड होय.

पित्ताचे रक्ताश्रयित्वही असेच सोपपत्तिक असल्याचे दिसून येते. रक्त हा धातू रसाप्रमाणे द्रवरूपच आहे. परंतु, जे आहारगत परमाणू रसावस्थेत एकमेकांत विलीन अथवा विद्रुत झालेले असतात त्यांच्या ठिकाणी रक्तावस्थेत विभक्तता निर्माण झालेली असते. शारीर अवयवांना पोषक होणारे सारभूत अंश उत्सर्जनीय अशा किट्टरूप अंशांपासून विभक्त होऊ लागलेले असतात. हे विभाजन अथवा पृथक्करण म्हणजेच पचन. ते पूर्ण झाले म्हणजे मगच रक्तातील सारभूत परमाणू मांसरूपाने आकारास येतात. अर्थात् एकरूप झालेल्या परमाणूंना विभज्यमानावस्था प्राप्त होणे हे उष्णतेशिवाय शक्य नसते. ही रक्ताश्रयी उष्णता म्हणजे पित्त. रक्तधातू हे पित्ताचे स्थान आहे हे म्हणणे याप्रमाणे यथार्थच होय.

अस्थी हे वायूचे स्थान सांगण्यात आले आहे. वस्तुतःकफाचे स्थान म्हणून त्याचा निर्देश करावयास हवा असे वाटण्याचा संभव. कारण हा धातू संघातरूप असून संघातनिर्मिती संयोजक श्लेष्म्यामुळे होत असते. परंतु, हा समज बरोबर नाही. कारण अस्थीत मांसाप्रमाणे संहतत्त्व अथवा विशिष्टाकृतिमत्त्व असले तरी दृढता अथवा कठिणता मात्र मांसाहून अधिक प्रमाणात असते. हे काठिण्य केवळ संश्लेषणामुळे संभवत नाही. परस्पराकर्षणामुळे एकत्र आलेले परमाणू चांगले एकजीव झाले की त्यांच्यातील स्नेह कमी होऊ लागतो व ते शुष्क होतात. याचाच परिणाम म्हणजे त्यांच्या ठिकाणी शेवटी काठिण्य व स्थैर्य निर्माण होते. अर्थात् अस्थिधातूच्या अवस्थेतील परमाणू केवळ समुदित वा संघटित झालेले नसतात तर त्यांच्यांतील स्नेह नाहीसा होऊन त्यांना कठिणता व दृढता प्राप्त झालेली असते. आणि हे घडून येते ते वायूमुळे. अस्थी हे वायूचे स्थान होय असे सांगण्यात म्हणूनच औचित्य आहे. वरील अभिप्रायच सूचित करणारे 'स्वतेजोम्बुगुणस्निग्धोद्रिक्तं मेदोऽभिजायते। पृथिव्यग्न्यनिलादीनां संघातः श्लेष्मणा वृतः (स्वोष्मणा कृतः)। खरत्वं प्रकरोत्यस्य जायतेऽस्थि ततो नृणां। करोति तत्र सौषिर्यमस्थ्नां मध्ये समीरणः।' हे चरकार्यांचे वचन या दृष्टीने ध्यानात ठेवण्यासारखे आहे.

**मलांतील स्थाने**

रसरक्तादि धातूंच्या प्रमाणे शकृदादि मल देखील दोषांची आश्रयस्थाने होत. हे मल म्हणजे धातूंचेच शक्तिहीन असे अंश असून शकृत्, मूत्र व स्वेद असे त्यांचे प्रकार त्रिविध संभवतात. (यासंबंधी विशेष विवरण पूर्वार्धात येऊन गेले आहेच.) त्यांपैकी शकृत् हे घन म्हणजे संघातरूप असून मूत्र द्रवरूप आहे. हे दोन मल कफाची आश्रयस्थाने होत असे म्हणूनच मानण्यात आले. तिसरा मल स्वेद. त्याला पित्ताचे स्थान मानले आहे. स्वेद हा उष्ण असतो हे त्याचे कारण.

अनुक्रमणिका

वातादि दोष शरीरात सर्वत्र व्यापून राहिलेले असल्याने धातू व मल यांचे पोषण होणे, त्यांत सारकिट्टपृथक्करण घडून येणे आणि पूर्व धातूचे उत्तर धातूत व मलांचे शरीराबाहेर वियोजन होणे या त्यांच्या क्रिया शरीराच्या सर्व विभागांत सामान्यतः सारख्याच रीतीने अविरत चालू असतात. परंतु, तरीही आहार्य द्रव्यांचे पचन करणे, त्यांतील पोषक अंशांचा संग्रह करून शारीर धातू सुसंघटित राखणे, आणि मलरूप द्रव्ये शरीराबाहेर फेकून देणे, या क्रिया शरीराच्या आमाशयादि विशिष्ट स्थानांतच विशेषतः घडून येतात.

## अवयवविशेषांतील दोषांची अधिष्ठाने

पक्वाशय, श्रोणिमंडल, सक्थी (म्हणजे पाय व हात) [सक्थी म्हणजे मांड्या—पाय, परंतु, लक्षणेने त्याचा अर्थ हात असाही करावयास प्रत्यवाय नसावा.], कान, अस्थी आणि त्वचा ही स्थाने वाताची, तर नाभी [नाभी म्हणजे नाभी ज्या ठिकाणी असते तेथील पोटाचा आतला भाग, ग्रहणी—कला या नांवाने शास्त्रात ज्याचा उल्लेख करण्यात आला आहे तो अवयव असून बृहदंत्राला जोडलेला लघ्वंत्राचाच हा शेवटचा विभाग होय. ज्याला व्यवहारात नाभी म्हणतात तो पोटाचा विशिष्ट भाग येथे अभिप्रेत नाही. पचनादि कर्मांशी त्याचा संबंधही नसतो.], आमाशय (म्हणजे लघ्वंत्र) [ज्याचा आकार पखालीसारखा असतो आणि खाल्लेले अन्न ज्यात प्रथमतः संचित होते तो अवयव या ठिकाणी अभिप्रेत नाही. कारण एक तर त्याचा उल्लेख कफाचे स्थान म्हणून करण्यात आला आहे, आणि दुसरे म्हणजे जठराग्नीचे प्रधान स्थान क्षुद्रांत्र अथवा लहान आतडे हे आहे. या ठिकाणी खाल्लेले अन्न पच्यमान अवस्थेत विद्यमान असते.], स्वेद (म्हणजे बाष्पावस्थेतील द्रव्य) [ज्याच्यापासून स्वेदन होते—स्विद्यते अनेम इति—ही निरूक्तीही बाष्पावस्थेचीच सूचक आहे, जलावस्थेची नव्हे.], लसीका (म्हणजे पेशींच्या वर राहणारा पाण्यासारखा एक विशिष्ट उपधातू), रक्त, रस [शरीरातील सूक्ष्मातिसूक्ष्म स्रोतसांतून संचार करण्याचीक्षमता, द्रवत्व व प्रवाहित्व हे धर्म रसधातूच्या ठिकाणी जे उत्पन्न होतात ते तदाश्रित तेजोरूप पित्तामुळेच.], दृगिंद्रिय आणि त्वचा [त्वचेचा समावेश वातस्थानात देखील करण्यात आला आहे. तेथे तिची संकोचविकासशीलता अभिप्रेत आहे तर या ठिकाणी तिची उष्णता अभिप्रेत आहे.], ही स्थाने पित्ताची होत; तसेच उरोभाग [उरोभाग म्हणजे उरोभागात असलेले हृदय. अवलंबक कफाचे हे स्थान असून त्यासंबंधी विवरण पुढे येणारच आहे.], कंठप्रदेश (म्हणजे श्वासवह व अन्नवह स्रोतसे), तर्पक कफाचे स्थान म्हणून ज्याचा निर्देश पुढे करण्यात आला आहे ते मस्तिष्क, क्लोम [क्लोम हे पिपासास्थान होय, असे वर्णन आयुर्वेदीय ग्रंथांत आढळते. अन्नाचे क्लेदन अथवा द्रवीभवन करणाऱ्या एका द्रव पदार्थाचे या ठिकाणी वास्तव्य असते. म्हणजे आमाशयाच्या एका बाजूला असलेला हा अवयव त्याचाच एक भाग होय. भोजनोत्तर आमाशयातील जलांशाचे प्रमाण कमी झाल्यामुळे तहान लागते, ही वस्तुस्थिती विचारात घेता आमाशयाचा एक अवयव म्हणजेच हे पिपासास्थान होय, हे अनुमान सहज करता येण्यासारखे आहे.], निरनिराळे संधी, आमाशय, रस, मेद, घाणेंद्रिय आणि जीभ ही कफाची स्थाने आहेत. शिवाय त्यांतही वायूचे अस्तित्व विशेषत्वाने पक्काशयात असते, पित्ताचे नाभिप्रदेशात असते, तर कफाचे उरोभागात असते ['पक्वाशयकटीसक्थिश्रोत्रास्थिस्पर्शनेंद्रियम् । स्थानं वातस्य तत्रापि पक्वाधानं विशेषतः नाभिरामाशयः स्वेदे लसीका रूधिरं रसः । दृक् स्पर्शनं च पित्तस्य नाभिरत्र विशेषतः । उरः कंठशिरःक्लोमपर्वाण्यामाशयोः रसः । मेदो घ्राणं च जिव्हा च कफस्य सुतरामुरः' ।अ. हृ.] वातादि दोषांची अधिष्ठाने याप्रमाणे त्यांच्या गुणाकर्मांनुसार निरनिराळी असतात असे अष्टांगहृदयात सांगितले आहे.

## वायूची पंचविध स्थाने

वातादि दोषांची कार्ये शरीराच्या निरनिराळ्या भागांत निरनिराळी घडून येतात. वायूची जी स्थाने पूर्वी सांगितली त्यांपैकी पक्वाशयात राहणारा वायू पुरीषाचे उत्सर्जन करतो;[मोठ्या आतड्याच्या अंतर्भागात संचित होणारा अन्नमलोद्भव वायू येथे अभिप्रेत नसून बृहदंत्राच्या पेशींतील सुसूक्ष्म स्रोतसांत वास्तव्य करणाऱ्या वातदोषाचे हे वर्णन आहे. उलट तो स्वतःच मलस्वरूप अत एव उत्सर्जनीय असतो. वायूच्या प्राण, अपान आदि पांच भेदांपैकी अपानसंज्ञक वातदोष येथे अभिप्रेत आहे. स्थूलांत्रातील पुरीषादींचे तो उत्सर्जन करीत असला तरी त्याचे वास्तव्य मात्र उदराच्या खालच्या प्रदेशात मोठ्या आतड्याच्या बाह्य भागाला असलेल्या कलेतील स्रोतसांत असते. अर्थात् हा वायू म्हणजे अंत्रगत मलरूप वायू नव्हे.] तर कटिप्रदेश व हातपाय यांतील स्नायूंच्या आश्रयाने राहणारा वायू त्या त्या स्नायूंच्या हालचालीला कारणीभूत होतो. श्रोत्राश्रित वायूमुळे शब्दाचे ज्ञान होते. तर अस्थिगत म्हणजे अस्थीतील स्रोतसांत राहणाऱ्या वायूमुळे अस्थीत काठिण्य उत्पन्न होते. बाह्य पदार्थांचे स्पर्शज्ञान त्वचागत वायूमुळेच होते. आणि अंतर्गत भावनांच्या संवेदनाही वायूमुळेच जाणवतात. हा वायू

अनुक्रमणिका

कलेच्या म्हणजे अंतरवयवांना आवरणरूप असलेल्या अंतस्त्वचेच्या आश्रयाने राहतो [अंतःकरणात भावभावनांचा उद्‌भव झाला की त्यांच्यामुळे संज्ञावह स्रोतसांशी संबद्ध असलेले स्नायू स्पंदित होतात व त्यायोगाने भावभावनांचा अनुभव येतो. हे स्पंदन अर्थातच वायुजनित असते.] सर्व वातस्थानांत पक्काशयाला प्राधान्य असल्याचा उल्लेख वर आला आहे. पक्काशयात संचित होणारा पुरीषसंज्ञक अन्नमल हा इतर मलांहून तुलनेने अधिक प्रमाणात संचित होतो व त्यात घनताही अधिक असते. अशा मलाचे उत्सर्जन करणारा वायू हा अधिक वेगवान् व सामर्थ्यवान् असणार हे उघड होय. व म्हणूनच असा वेगाधिक वायू जेथे राहतो त्या पक्काशयाला वाताचे प्रधानस्थान मानण्यात येते.

पक्काशय हे जसे वाताचे तसे नाभी हे पित्ताचे प्रमुख स्थान आहे. पक्काशय व आमाशय म्हणजे स्थूलांत्र व लघ्वंत्र यांच्या मध्यभागी असणारी ग्रहणीकला म्हणजेच प्रस्तुत नाभी होय. द्रवरहित—केवळ उष्णरूप—असे जे पाचक पित्त, त्याचे हे स्थान आहे. उपभुक्त आहाराचे पचन अथवा सारकिट्टविवेचन या ठिकाणी होते. व म्हणूनच ग्रहणीला पित्तस्थानात प्रमुख मानतात.

**ग्रहणीचे स्थान**

आमाशय म्हणजे लघ्वंत्र असा अर्थ स्वीकारून ग्रहणाचे जे स्थान वर सुचविले त्याऐवजी अन्नाचा जेथे प्रथम संचय होतो तो पखालीच्या आकाराया अवयव म्हणजे आमाशय असा अर्थ स्वीकारून ह्या आमाशय आणि पक्काशय यांच्यातील अवयवाला म्हणजे लघ्वंत्रालाच ग्रहणी म्हणावे असे वाटण्याचा संभव. ‘दोषधातुमलांचा अग्नी हा अन्नाचे पचन करतो असे आत्रेयवचन आहे. परंतु, अन्नपचनाचे कार्य वस्तुतःपाचक पित्ताकडून होते, हे पाचक पित्त जेथे राहते त्या स्थानाला ग्रहणी म्हणतात कारण तेथे अन्नाचे ग्रहण केले जाते’[‘अन्नस्य पक्ता पित्तं तु पाचकाख्यं पुरेरितम् । दोषधातुमलादीनां ऊष्मेत्यात्रेयशासनम् । तदधिष्ठानमन्नस्य ग्रहणाद् ग्रहणी मता॥’—अ.हृ.], हे अष्टांगहृदयातील वचनही या समजाला सकृद्दर्शनी पोषक वाटते. कारण आमाशयातील अन्न ज्याकडून ग्रहण म्हणजे स्वीकृत वा आकर्षित केले जाते ते क्षुद्रांत्र म्हणजेच ग्रहणी होय असा अभिप्राय त्यावरून व्यक्त होतोसा वाटतो. परंतु, तो बरोबर नाही. खुद्द वाग्भटाचार्यांचाच त्याला विरोध आहे. ‘पक्काशयाच्या प्रवेशद्वारालगत असलेली ही ग्रहणी म्हणजे अन्नमार्गातील एक अर्गलाच होय, ती बलवती असली म्हणजे उपभुक्त अन्नाला आमाशयात थांबवून धरून व ते योग्य तऱ्हेने पचवून नंतरच त्याला खाली जाऊ देते; उलट तीत दुर्बलता आली म्हणजे मात्र अपक्क अर्थात् न पचलेल्या अन्नाचे तिच्याकडून निःसरण होते’, असे स्पष्टीकरण ग्रहणीच्या वर्णनात त्यांनीच केले आहे.[‘स्थिता पक्काशयद्वारि भुक्तमार्गार्गलेव सा । बलवत्यबलात्वन्नमाममेव विमुंचति॥’अ. हृ.]ग्रहणी या शब्दाची यथार्थताही तिच्या या कार्यावरूनच सूचित होते. ग्रहण म्हणजे अवरोध अथवा प्रतिबंध असा अर्थ येथे अभिप्रेत दिसतो; स्वीकार अथवा आकर्षण नव्हे. ‘भुक्तमार्गार्गलेव सा’, ‘भुक्तमामाशये रूद्‌ध्वा’ या वर्णनात तर अवरोध हेच ग्रहणीचे कार्य असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. सुश्रुताचार्यांचेही मत तसेच दिसते. ‘पित्तधरा नांवाची जी सहावी कला असते ती आमाशयातून निघून पक्काशयात जाणारे चतुर्विध अन्न धारण करते—त्याला प्रतिबंध करते’, असे ते म्हणतात.[‘षष्ठीपित्तधरा नाम या चतुर्विधमन्नपानं उपभुक्तं आमाशयात् प्रच्युतं पक्काशयोपस्थितं धारयति । ’ सु. सं. व्याख्या]‘पक्काशयाच्या द्वारप्रदेशी स्थित असलेली’ (स्थिता पक्काशयद्वारि) हे वाग्भटांचे व ‘पक्काशयात प्राप्त होणाऱ्या अन्नाला धारण करणारी’ (पक्काशयोपस्थितं धारयति) हे सुश्रुतांचे, या दोनही वचनांवरून ग्रहणीकला ही स्थूलांत्राला लागून असते, हे स्पष्ट होते. ‘भुक्तमामाशये रूद्‌ध्वा सा विपाच्य नयत्यधः । बलवत्यबला त्वन्नमाममेव विमुंचति । ’, या वचनात अन्नाचे जे पचन सांगितले त्याचे स्थान क्षुद्रांत्र आहे, आमाशय नव्हे. पाचक पित्त‘पक्कामाशयमध्यस्थ’ असते या सुश्रुताच्या म्हणण्याचे स्पष्टीकरण करताना ‘पक्कामाशयमध्यस्थ म्हणजे नाभिस्थ’ असे विवरण टीकाकार डल्हण करातत.[‘पक्कामाशयमध्यस्थं इति नाभिस्थम् ।’ सु. सं. व्याख्या] ते याच हेतूने. तात्पर्य, बृहदंत्राशी

संलग्न असलेला लघ्वंत्राचा अंतिम विभाग म्हणजे ग्रहणी हे स्पष्ट होय. तदंतर्गत कलेलाच, ती ग्रहणीच्या आश्रयाने राहत असल्याने ग्रहणीकला म्हणतात. ही ग्रहणी हेच पाचक पित्ताचे स्थान होय.

**पाचक पित्त**

'हे पाचक पित्त पांचभौतिक असले तरी तेजोगुणाच्या आधिक्यामुळे त्यात द्रवत्व मुळीच नसते. ते केवळ उष्णरूप असते, आणि त्याच्या पचनादि कार्यांमुळे त्याला अग्नीच म्हणतात', असे वर्णन अष्टांगहृदयात व अष्टांगसंग्रहात केलेले आहे['तत्र पक्वामाशयमध्यगम् । पंचभूतात्मकत्वेऽपि यत्तैजसगुणोदयात् । त्यक्तद्रवत्वं पाकादिकर्मणाऽनलशब्दितम्॥अ.हृ; ... 'यदामपक्वाशयमध्यस्थं पंचभूतात्मकत्वेऽपि तेजोगुणोत्कर्षात् क्षपितसोमगुणं ततश्च त्यक्तद्रवस्वभावम्......... ।' अ.सं.'] चरकसुश्रुतांनी मात्र पाचक पित्ताचा त्यक्तद्रवत्व हा विशेष उल्लेखिलेला नाही. स्वेद, रस, लसीका, रक्त व आमाशय ही पित्तस्थाने चरकाचार्यांनी सांगितली असून आमाशय हे स्थान त्यांत प्रमुख मानले आहे. ['स्वेदे रसो लसीका रूधिरमामाशयश्च पित्तस्थानानि । तत्राप्यामाशयो विशेषेण पित्तस्थानमिति ।' च.सं.] यांत नाभीचा उल्लेख नाही. परंतु, यांतील आमाशय म्हणजे आमाशयाचा अधोभाग, असे स्पष्टीकरण त्यावर चक्रपाणींनी केले आहे ['पित्तस्थानेषु आमाशय इति आमाशयाधोभागः । ' च.सं. व्याख्या.]. सुश्रुतसंहितेतील वर्णन पुढीलप्रमाणे आहे– 'पक्वाशय व आमाशय यांच्या मध्यभागी असणारे पित्त, ज्याचे स्वरूप अज्ञात आहे अशा हेतूने प्रेरित होऊन चतुर्विध अन्नपानाचे पचन करते आणि दोष, रस, मूत्र व पुरीष यांचे पृथक्करण करते. हे पित्त आपल्या विशिष्ट सामर्थ्याने स्वस्थानी राहूनच अग्नीची कार्ये करून अन्य पित्तस्थानांच्या व सर्व शरीराच्या उपयोगी पडते. पाचकाग्नी ही संज्ञा त्यालाच देण्यात आली आहे'['तच्चादृष्टहेतुकेन विशेषेण पक्वामाशयमध्यस्थं पित्तं चतुर्विधमन्नपानं पचति, विवेचयति च दोषरसमूत्रपुरीषाणि । तत्र स्थाने चात्मशक्त्या शेषाणां पित्तस्थानानां शरीरस्य च अग्निकर्मणा अनुग्रहं करोति । तस्मिन् पित्ते पाचकोऽग्निरिति संज्ञा ।'–सु.सं.]'पक्वाशय व आमाशय यांच्यामध्ये म्हणजे नाभीच्या ठिकाणी' असे स्पष्टीकरण डल्हणांनी याही ठिकाणी केले आहे ['पक्वामाशयमध्यस्थं इति नाभिस्थम् ।'–सु. सं. व्याख्या.]. तथापि वर म्हटल्याप्रमाणे 'त्यक्त- द्रवत्व' हा विशेष या दोनही संहितांत नाही.

क्लेदक कफाच्या योगाने अन्नाशयात अथवा आमाशयात द्रवीभूत झालेले अन्न पुढे लहान आंतड्यातील द्रवरूप पित्ताकडून विपाचित होते. अर्थात् वरील चरकवचनात आमाशय हा शब्द क्षुद्रांत्राचा पर्याय म्हणून योजला आहे हे स्पष्ट असून हा आमाशय पित्ताचे प्रमुख स्थान मानणे योग्यच होय. द्रवरूप पित्तामुळे अन्नाचे स्वेदन योग्य प्रकारे झाले म्हणजे त्यातील सारभाग किट्टापासून अलग होणे व तो शोषला जाणे, हे ज्यात घडून येते तो लघ्वंत्राचा अंतिम भाग म्हणजेच ग्रहणी. अन्नातील सारभागाचे या ठिकाणी शोषण होत असल्याने हे स्थान अर्थातच द्रवविहीन असावयाचे. पचनाचे अंतिम फलित जे सारकिट्टविवेचन ते ज्यामुळे साधते ते त्यक्तद्रवरूप पित्त ग्रहणीत राहते व ही ग्रहणी हेच पित्ताचे प्रधान स्थान होय असे म्हणूनच सांगितले आहे.

**महास्रोतसाचे तीन विभाग**

कंठापासून गुदद्वारापर्यंत आम व पक्व अन्नाचे अभिवहन करणारी जी अखंड नलिका असते तिला महास्रोतस् म्हणतात. या महास्रोतसाचे प्रमुख विभाग तीन पडतात. (१) आमाशय (२) क्षुद्रांत्र व (३) बृहदंत्र. आमाशयाचा आकार पखालीसारखा असून उपभुक्त आहाराचा संचय प्रथमतः याच ठिकाणी होतो. या आमाशयाच्या खाली क्षुद्रांत्र म्हणजे लहान आतडे असून त्याचा आकार बृहदंत्राहून लहान असतो. तिसरा विभाग म्हणजे स्थूलांत्र अथवा बृहदंत्र. पक्वाशय त्यालाच म्हणतात.

अनुक्रमणिका

महोस्रोतसाच्या या तीन भागांपैकी पहिल्या दोघांचा म्हणजे आमाशय व क्षुद्रांत्र यांचा निर्देश आमाशय या एकाच संज्ञेने करण्यात आला आहे. 'नाभीपासून स्तनापर्यंतच्या भागाला आमाशय म्हणतात, चतुर्विध आहाराचे पचन या भागात होते'; असे चरकाचार्य एका ठिकाणी म्हणतात. ['नाभिस्तनान्तरं जंतोरामाशय इति स्मृतः। आशितं खादितं पीतं लीढं चात्र विपच्यते॥'—चसं.] या भागात आहार अपक्व स्थितीत म्हणजेच आमावस्थेत राहत असल्याने या दोनही विभागांना आमाशय ही संज्ञा अन्वर्थकच होय. तथापि, त्या प्रत्येकाचे कार्य निराळे असल्याने त्यांच्या संज्ञाही निरनिराळ्याच हव्यात. पहिल्या विभागात आहाराचे क्लेदक कफाच्या योगाने केवळ क्लेदन म्हणजे द्रवीभवन होते तर क्षुद्रांत्रसंज्ञक दुसऱ्या विभागात द्रवरूप पित्ताच्या संयोगामुळे त्याच आहाराचे नंतर स्वेदन होते. हे स्वेदन योग्य प्रकारे झाले म्हणजेच पुढे अन्नातील सारभाग किट्टापासून विभक्त होतो. पहिल्या भागात अन्न द्रवीभूत झाले तरी आमावस्थेतच असते; त्याचे सारकिट्टविवेचन तेथे होत नाही. ते दुसऱ्या विभागात होते. कारण तेथे त्या अन्नाला पच्यमान अवस्था प्राप्त होते. पहिल्या विभागाला आमाशय व दुसऱ्याला म्हणजे क्षुद्रांत्राला पच्यमानाशय म्हणणे अधिक बोधक होईल.

**पांच पित्त स्थाने**

या पच्यमानाशयात आहाराचे पचन करणारे जे द्रव द्रव्य राहते त्याला पाचक पित्त म्हणतात. 'डुपचष् पाके' या धात्वर्थानुसार पचन म्हणजे वस्तुतःपृथक्करण अथवा सारकिट्टविवेचन. अर्थात् ते ज्यामुळे साधते ते ग्रहणीतील अद्रवरूप पित्त हेच खरे पाचक पित्त होय. आणि पाचक पित्त ही संज्ञाही ग्रहणीगत पित्तालाच प्राधान्याने योजलेली आहे. परंतु, त्याबरोबरच क्षुद्रांत्रांतील द्रवरूप पित्तालाही, ते या पृथक्करणाला साहाय्यक होते म्हणून पाचक पित्त या नावाने संबोधण्यास हरकत नाही.

नाभी व आमाशय म्हणजे ग्रहणी व क्षुद्रांत्र यांव्यतिरिक्त जी पित्तस्थाने आहेत त्यांपैकी स्वेदातील पित्ताची कल्पना त्याच्या स्वभावावरूनच येते. स्वेदातील उष्णता म्हणजेच हे पित्त असून स्वेदावस्थेला म्हणजे बाष्पावस्थेला तेच हेतुभूत असते. लसिका व रक्त यांतील पित्त द्रवरूप असून रक्तगत व लसीकाश्रित द्रव्यांचे पचन त्यामुळेच घडून येते.

उरलेल्या पित्तस्थानांपैकी रसधातू हा वस्तुतःशीतगुणी होय. 'रसधातूच्या द्रव्यत्वावरून आणि त्याच्या स्नेहन, जीवन, तर्पण, धारण आदि निरनिराळ्या कार्यांवरून तो सौम्य म्हणजे शीतगुणी असल्याचे दिसून येते', असे सुश्रुताचार्य स्पष्टपणे म्हणतात ['स खलु द्रवानुसारी स्नेहनजीवनतर्पणधारणादिभिर्विशेषैः सौम्य इत्यवगम्यते।' सु. सं.] कफस्थानांत त्याचा निर्देश म्हणूनच करण्यात येतो. परंतु, तरीही त्यात पित्त असतेच. रसाचे द्रवत्वच त्याचे सूचक आहे. कारण द्रवत्व हे पित्तोद्भव असते.

डोळ्यात म्हणजे बाहुलीत जे पित्त असते ते रसरक्तादींतील पित्ताप्रमाणे द्रवरूपी व विस्रगुणी असत नाही तर तेजोरूप असते. पदार्थमात्राचे दर्शन आपणाला त्यामुळेच घडते. त्वचागत पित्ताची प्रतीती त्वचेच्या उष्णस्पर्शावरून येऊ शकते. हे त्वचागत पित्तवस्तुतःरस, रक्त व लसीका यांच्याच आश्रयाने राहणारे असते. परंतु, त्वगिंद्रियामार्फत स्पर्शज्ञान होण्याला त्याचे साहाय्य होते म्हणूनच त्याचा निर्देश स्वतंत्रपणे करण्यात येतो.

अनुक्रमणिका

**पंचविध कफ—स्थाने**

उरोभाग, कंठ, मस्तक, क्लोम इत्यादि पूर्वोक्त अवयवांच्या ठिकाणी अधिक प्रमाणात जे स्निग्ध व शीतगुणी द्रव्य राहत असते, त्याला श्लेष्मा म्हणतात. यांपैकी उरोभागात राहणाऱ्या कफाला अवलंबक ही संज्ञा आहे. कफाच्या अन्य प्रकारांची कार्यक्षमता त्याच्यावर अवलंबून असल्याने कफाच्या पांचही भेदात त्यालाच प्रमुख मानतात.

वायू, पित्त व कफ या दोषांची प्रमुख स्थाने म्हणून ज्यांचा निर्देश करण्यात आला आहे ते म्हणजे रसरक्तादि धातू, पुरीषादि मल आणि पक्वाशयादि निरनिराळे अवयवच होत. अर्थात् कोणत्या ठिकाणी कोणत्या प्रकारची कर्मे चालतात आणि तेथे कोणत्या प्रकारचे गुण वास्तव्य करीत असतात हे विचारात घेऊनच त्या त्या स्थानी त्या त्या दोषाचे वास्तव्य प्रामुख्याने मानण्यात आले आहे.

वातादि दोषांचे स्वाभाविक गुण शरीरात सर्वत्र सारख्याच संख्येत आढळत नाहीत आणि त्यांच्या क्रियाही सर्व ठिकाणी सारख्या प्रमाणात घडत नाहीत. उदाहरणार्थ, वायूच्या निरनिराळ्या स्थानांत चालू असणाऱ्या क्रिया आणि तेथे वास्तव्य करणारे वायूचे स्वाभाविक गुण हे सर्वत्र सारखेच नसतात, त्यांच्यात स्थानपरत्वे भिन्नता आढळून येते. अर्थात् वियोजन, विभाजन व संयोजन ही वातपित्तकफांची सर्वसामान्य व प्रधान कार्ये सर्व स्थानांत सामान्यत्वे अनुभवाला येतच असतात.

आमाशय, पक्वाशय आदि विभिन्न स्थानांमुळे ज्याप्रमाणे पचन, उत्सर्जन आदि विविध प्रकारच्या क्रिया संभवतात त्याचप्रमाणे गुणांच्या भिन्नतेमुळेही विविध प्रकारच्या कर्मांचा संभव होतो. हे विविध गुण जेथे जेथे राहतात ती स्थाने म्हणजेच वातादि दोषांची निरनिराळी आश्रयस्थाने होत.

———

अनुक्रमणिका

## उत्तरार्ध

## दर्शन १४– दोषांचे भेद व त्यांची कार्ये

वातादि दोषांच्या सर्वसामान्य क्रिया शरीराच्या निरनिराळ्या स्थानांत निरनिराळ्या स्वरूपांत होत असतात. त्यांना अनुसरून स्थानपरत्वे संभवणाऱ्या दोषभेदांसंबंधी विवेचन गेल्या प्रकरणात करून झाले. या प्रकरणात शरीरातील जीवनव्यापाराला साधनीभूत होणाऱ्या विशिष्ट स्थानातील क्रियांना अनुसरून दोषांचे जे भेद पडतात, त्यांचा विचार करावयाचा आहे.

शीतगुणी श्लेष्मा, उष्णस्वरूप पित्त व गतिशील वायू यांचे असे प्रमुख भेद प्रत्येकी पांच संभवतात. प्राण, उदान, व्यान, समान, अपान हे वायूचे; पाचक, रंजक, साधक, आलेचक, भ्राजक हे पित्ताचे आणि अवलंबक, क्लेदक, बोधक, तर्पक, व श्लेषक हे कफाचे भेद होत.

**वायूचे पांच भेद**

वायूच्या पांच भेदांपैकी प्राणसंज्ञक वायू मस्तिष्कात राहतो. 'प्राणाचे स्थान मस्तिष्क. उरोभाग व कंठ यांत तो संचार करतो, आणि बुद्धी, हृदय, इंद्रिये व मन यांचे धारण करतो', असे अष्टांगहृदयात म्हटले आहे. ['प्राणोऽत्र मूर्धगः। उरःकंठचरो बुद्धिहृदयेन्द्रियचितधृक्।' –अ. हृ.] अष्टांगसंग्रहातील वर्णन असेच असून 'बुद्धि, हृदय इत्यादींच्या बरोबर धमनींचेही तो धारण करतो आणि ष्ठीवन (थुंकणे), क्षवथू (शिंकणे), उद्‌गार (ढेकर), श्वासोच्छ्वास, अन्नाचा घशाखाली प्रवेश होणे इत्यादि क्रियांचे कर्तृत्वही त्याच्याकडेच असते', असे त्यात आणखी सांगितले आहे ['तत्र प्राणो मूर्धन्यवस्थितः। ........ बुद्धीन्द्रियहृदयमनोधमनीधारणष्ठीवनक्षवथूद्‌गारश्वासोच्छ्वासान्नप्रवेशादिक्रियः। ' –अ, सं.]. चरकाचार्यांनी मस्तिष्काप्रमाणेच उरोभाग, कंठ, जिव्हा, मुख व नासिका यांचा देखील प्राणवायूची स्थाने म्हणून उल्लेख केला आहे ['स्थानं प्राणस्य मूर्धोरःकंठजिव्हास्यनासिकाः।' च. सं.]. परंतु, अशा रीतीने प्राणवायूचे स्थान मूर्धा असल्याचे सांगितले असले तरी संज्ञावह व प्राणवह स्रोतसांचे स्थान मात्र हृदय होय असे वर्णन त्याच ग्रंथात आढळते ['तत्र प्राणवहानां स्रोतसां हृदयं मूलं महास्रोतश्च।'– चं. सं.]. सुश्रुताचार्यांनीही 'उध्वगामी धमन्या हृदयात पोहोचल्या म्हणजे त्यांना प्रत्येकी तीन शाखा फुटतात', 'रक्त व श्लेष्मा यांच्या सारभूत अंशांपासून हृदयाची उत्पत्ती होते आणि तेच प्राणवाह धमनींना आश्रयभूत असते' [ 'तास्तु हृदयमभिप्रपन्नाः त्रिधा जायन्ते', 'शोणितकफप्रसादजं हृदयं यदाश्रया हि धमन्यः प्राणवहाः।' – सु. सं.], इत्यादि वचनांतून शब्दस्पर्शादि इंद्रियार्थांचे अभिवहन करणारी धमनी शेवटी हृदयात जाऊन पोहोचते असेच सुचविले आहे. प्राणवह स्रोतसांप्रमाणे रसवह स्रोतसेही हृदयमूलक होत असे वर्णन आढळते. 'हृदय व दहा धमन्या हे रसवह स्रोतसांचे मूळ होय', असे चरकसंहितेत म्हटले आहे ['रसवहानां स्रोतसां हृदयं मूलं दश च धमन्यः।'– च. सं.] 'हृदय हे रसधातूचे स्थान होय, हा हृदयस्थ रस अज्ञातहेतुक कर्माने प्रवृत्त होऊन हृदयातून निघणाऱ्या उर्ध्वगामी दहा, अधोगामी दहा व तिर्यग्गामी चार अशा एकूण चोवीस धमन्यांत प्रवेश करतो व सर्व शरीराला प्रतिदिनी तोषवितो, वाढवितो, धारण करतो व पोषवितो' ['तस्य च हृदयं स्थानं। स हृदयात् चतुर्विंशतिधमनीरनुप्रविश्य ऊर्ध्वगा दश दश चाधोगामिन्यः चतस्रश्च तिर्यग्गाः कृत्स्नं शरीरं अहरहस्तर्पयति वर्धयति धारयति यापयति चादृष्टहेतुकेन कर्मणा।' सु. सं.], या सुश्रुत–वचनातही हेच सुचविले आहे. वाग्भटाचार्यांनी व्यान वायूचे स्थान हृदय असून त्याकडूनच सर्व शरीरात रसधातू अविरत फेकला जातो, असे वर्णन करून ठेवले आहे ['व्यानो हृदि स्थितः', 'व्यानेन रसधातुर्हि विक्षेपोचितकर्मणा युगपत् सर्वतोऽजस्रं देहे विक्षिप्यते सदा। – अ. हृ.].

अनुक्रमणिका

### दोन प्रकारची हृदये

तात्पर्य, प्राणवाहिनींच्या प्रमाणेच रसवाहिन्यांचेही मूलस्थान म्हणून हृदयाचाच निर्देश करण्यात आला आहे. परंतु, हा प्राण मस्तिष्कात राहतो असे सांगणारे 'प्राणोऽत्र मूर्धगः' असे वाग्भटाचे वचन असल्याचे वर पाहिलेच. यावरून प्राणवह स्रोतसांचे मूल म्हणून सांगितलेले हृदय म्हणजे मस्तिष्क (मेंदू) असून रसवह स्रोतसांचे मूल म्हणून ज्याचा निर्देश केला ते हृदय उरोभागातील होय हे स्पष्ट होते. हृदय हा शब्द हृ व दय या दोन धातूंपासून झाला आहे. हृ म्हणजे घेणे व दय म्हणजे सोडणे ['हृञ् हरणे', 'दय दानगतिरक्षणहिंसादानेषु'—सि. कौ.], तदनुसार हृदय या शब्दाने 'ग्रहणपुरस्सर त्याग करणे' या गुणाचा व कर्माचा बोध होतो. आदान व प्रदान अथवा संग्रहण व विक्षेपण हे कार्य मस्तिष्क व हृदय या दोनही अवयवांत चालू असते. मस्तिष्कात संवेदनांची आयात-निर्यात होते तर हृदयात ती रसधातूची होते. अर्थात् यावरून हृदय या एकाच शब्दाने शिरोगत मस्तिष्क व उरोगत हृदय या दोनही अवयवांचा निर्देश करण्यात आला असून तो असा अनुचितही ठरत नाही हे उघड होते. आणि हे विचारात घेऊनच संज्ञावाहिनींच्या उगमस्थानी असलेल्या हृदयात म्हणजे मस्तिष्कात प्राणाचे वास्तव्य असते, असे 'प्राणोऽत्र मूर्धगः' या वाग्भटवचनाधारे आरंभी सांगण्यात आले.

### प्राणवायू

हा प्राण सूक्ष्म असतो. अर्थात् मन, बुद्धी आदि अनुबंधांमुळे त्याचे अनुमान करता येते. मन, बुद्धी, इंद्रिये यांचा तो ज्याप्रमाणे धारक असतो त्याप्रमाणे हृदयादि ज्ञानेंद्रियांना [कर्मेंद्रियांचा प्रेरक व्यान वायू असतो.] ते ते अभीष्ट विषय ग्रहण करण्याच्या कामी मुख्य प्रेरणाही या प्राणवायूनेच मिळत असते. त्याला प्राण असे म्हणूनच म्हणतात. याशिवाय उरोभाग व कंठप्रदेश यांत त्याचा संचार होत असल्याने श्वसन, अन्नाचा घशाखाली प्रवेश होणे, ष्ठीवन (थुंकणे), उद्गीरण (ढेकर), क्षवथुप्रवर्तन (शिंकणे) इत्यादि कार्ये यथावत् पार पाडण्यातही तो साहाय्यक होत असतो.

### उदानवायू

उरोभागातील फुफ्फुसात राहणारा वायू त्याच्या आकुंचन-प्रसरणामुळे वर नाकापर्यंत व खाली नाभीपर्यंत संचार करीत असतो. अर्थात् या भागातील कर्मे तत्कर्तृकच असतात. वाक्प्रवृत्ती, प्रयत्न, उत्साह, बल, वर्ण व स्मृती या सर्वांना तोच कारण होतो. वायूच्या या प्रकाराला उदान म्हणतात.

वाग्वह धमन्यांना उदान वायूकडून प्रेरणा मिळाली की वाक्प्रवृत्ती होते. शारीर अवयवांच्या ठिकाणी, मग ते स्थूल असोत वा सूक्ष्म असोत, ती ती विशिष्ट कर्मे करण्याची प्रवृत्ती स्वभावतःच असते. ही प्रवृत्ती म्हणजेच प्रयत्न. तिलाच विशिष्ट अवस्थेत उत्साह म्हणून संबोधण्यात येतेय उत्साह म्हणजे वेगान्वित अथवा वेगसंपन्न असा प्रयत्नच. शारीर अवयव जेव्हा कार्यप्रवृत्त होतात तेव्हा त्यांना प्रथम वायूकडून प्रेरणा मिळावी लागते. व म्हणूनच प्रयत्न आणि उत्साह यांचा उत्पादक हा वायू असतो असे म्हणावयाचे.

शारीर घटक प्रयत्नशील व उत्साही होऊन आपापली स्वाभाविक कार्ये करीत असले आणि अन्नरसाकडून त्यांचे पोषणही नियमितपणे होत असले म्हणजे ते सम्यक् प्रमाणात बलशाली अथवा कार्यक्षम

राहतात व रसपूर्णतेमुळे त्यांच्या ठिकाणी नैसर्गिक वर्णसंपत्तीही प्रादुर्भूत होते. अर्थात् हे सर्व उदानामुळे घडून येते. तो बलवर्णकर असतो असे म्हणूनच वर म्हटले.

**व्यानवायू**

वायूचा तिसरा प्रकार जो व्यान त्याचे वास्तव्य हृदयात म्हणजे रसविक्षेपणाचे कार्य करणाऱ्या उरोगत अवयवात असते. तो अत्यंत वेगवान असून शरीराच्या सर्व विभागात त्याचा संचार होत असतो. सर्व अवयवांच्या ठिकाणी चालू असणाऱ्या चलनात्मक क्रिया, हस्तपादादि अवयवांची खालीवर होणारी हालचाल, पापण्यांची उघडझाप, तात्पर्य, शरीरातील सर्व लहानमोठ्या क्रिया तोच घडवून आणतो, असे त्याचे वर्णन करण्यात आले आहे. आहाराचे सारस्वरूप असलेला व यकृत्प्लीहान्तर्गत रंजक पित्ताकडून विपाचित झालेला रसधातू हृदयातून निघून शरीराच्या सर्व विभागांत संचार करीत असतो. हृत्पेशींच्या स्रोतसांत भरून राहिलेला व्यानवायूही या रसधातूशी मिश्र होऊन सर्व शरीरात फिरत असतो. त्यामुळे एकीकडे रसधातूने शारीर अवयवांचे पोषण होते तर दुसरीकडे त्याचवेळी अवयवांच्या हालचालीला हेतुभूत होणाऱ्या तदन्तर्गत वायूचे उपबृंहण रसधातूबरोबर आलेल्या व्यानवायूकडून होते. शरीरातील सर्व क्रियांचे कर्तृत्व त्यामुळेच त्याकडे देण्यात येते.

प्राण, उदान, व्यान यांच्या विभिन्न क्रियांचे वर्णन वर करण्यात आले पण त्याचा अर्थ असा नव्हे की, त्यांच्यात पारस्परिक संबंध काहीच असत नाही. उलट, त्या परस्परानुबद्ध असतात. चलनाचे किंवा गतीचे स्वरूप त्रिविध असल्याचे दिसून येते. जिला प्रयत्न म्हणून संबोधण्यात येते ती प्रवृत्ती, उत्साह या संज्ञेने ज्याचा निर्देश करण्यात येतो तो वेग आणि आकुंचन–प्रसरण, ही गतीची तीन स्वरूपे, प्रकार अथवा अवस्था होत. प्रवृत्ती किंवा प्रयत्न कोणत्याही अवयवाच्या ठिकाणी आढळून येणारा चैतन्यमूलक व कार्यारंभकारक असा स्वाभाविक उद्योग. त्यात उत्कटता आली की त्यालाच उत्साह म्हणतात. प्रवृत्ती अथवा प्रयत्न हे गतीचे अव्यक्तावस्थेतील स्वरूप असते, ईषदभिव्यक्त अवस्थेत ती उत्साहशील बनते, आणि व्यक्तावस्थेत आकुंचनप्रसरणरूप होते; ही त्रिविध गतीच शरीरीतील यच्चयावत् कर्मांना प्रधानतया कारणीभूत होत असते; आणि या गतिभेदांचे कर्तृत्व ज्याच्याकडे असते ते वायूचे भेद म्हणजेच उपरिनिर्दिष्ट प्राण, उदान व व्यान होत, असेही यावरून म्हणता येईल. प्राणामुळे प्रवृत्ती होते, उदानाने ती उत्साहित होते व शेवटी व्यानवायूमुळे आकुंचनप्रसरणरूपाने ती अभिव्यक्त होते. प्राणाचा संबंध मुख्यत्वे मन, बुद्धी, इंद्रिये इत्यादींच्याशी असतो. संवेदनांचा अनुभव त्याच्यामुळेच येतो. त्याची उत्पत्ती सहज म्हणजे जन्मतःच होते व तो अत्यंत सूक्ष असतो. उदानाचे वास्तव्य उरोभागात असते. श्वासमार्गावाटे मिळणाऱ्या बाह्य वायूकडून तो उपबृंहित होतो. वेग तोच उत्पन्न करतो. तिसरा वायू व्यान; तो हृदयात राहतो हे पूर्वी सांगितलेच. आहारातील वायवीय अंशांच्या रूपाने तो रसधातूशी मिश्र होऊन हृदयात प्रवेश करतो. व याच कारणामुळे म्हणजे पार्थिवादि द्रव्यांशी मिश्र झाल्याने प्राण व उदान यांच्यापेक्षा तो सापेक्षतया स्थूल असतो. आकुंचनप्रसरणरूपी प्रव्यक्त गती त्यामुळेच साधते.

**समान वायू**

वायूच्या चवथ्या प्रकाराला समान म्हणतात. लघ्वंत्रातील पेशींची स्रोतसे हे त्याचे संचारक्षेत्र होय. क्षुद्रांत्राचे प्रसरण झाले की, आमाशयातील अन्नाचा त्यात प्रवेश होतो. तर संकोचन झाले की तदंतर्गत द्रवरूप पाचक पित्ताचे उदीरण होते. ही सर्व कार्ये समानवायूचीच होत. इतकेच नव्हे तर पित्तविपाचित

आहारातील रसरूपी सारभाग व मूलमूत्ररूपी किट्टभाग यांचे पृथक्करण करून योग्यप्रकारे अथवा योग्य मार्गाने त्यांचे वियोजन करणे हेही काम हा समानवायूच करतो. द्रवरूपी सारभाग यकृत्प्लीहानुगामी स्रोतसांत फेकला जातो तर किट्टभागांपैकी पुरीषाचे पक्वाशयात व मूत्राचे मूत्रवह स्रोतसांत विगमन होते.

**अपान वायू**

अपान हा वायूचा पांचवा भेद होय. उदराच्या अपानसंज्ञक अधोभागात म्हणजे नाभीच्या खालील प्रदेशात त्याचे वास्तव्य असते. शुक्र व आर्तव, पुरीष व मूत्र आणि गर्भ यांचे अभिवहन करणे हे त्याचे कार्य होय. शुक्रादि द्रव्यांचे मार्ग म्हणजेच अपानसंज्ञक भागातील स्रोतसे तो प्रेरित करतो म्हणून त्याला अपान म्हणतात.

चलस्वभावी वायूचे कार्य चलनात्मक असते. त्याचा सर्वत्र सामान्यत्वाने प्रत्ययही येतो. तथापि, स्थानभेदानुसार याच चलनात निरनिराळे प्रकार संभवतात. व म्हणूनच तदनुसार चलनकर्तृक वायूचेही भेद मानण्यात येतात. वायूचे उपरिकल्पित प्राणादि पांच प्रकार याच धोरणाने सांगण्यात आले आहे.

**पंचविध पित्त**

वायूप्रमाणे पित्ताचेही पांच प्रकार सांगितले आहेत. त्यांपैकी पाचक पित्ताचे वास्तव्य आमाशय व पक्वाशय यांच्या मध्यभागी म्हणजे ग्रहणीसंज्ञक अवयवात असते. हे पित्त द्रवरहित म्हणजे केवळ तेजोरूप असून पचनादि कर्मे करीत असल्याने त्याला जठराग्नीही म्हणतात. 'शरीरात पित्ताव्यतिरिक्त दुसरा अग्नीच नाही, पित्त आग्नेय असल्यामुळे दहन, पचन आदि क्रियांत त्याला अंतरग्नी अथवा अपराग्नीच मानतात', असे सुश्रुतांचे वचन आहेच ['न खलु पित्तव्यतिरेकादन्योऽग्निरुपलभ्यते । आग्नेयत्वात् पित्ते दहनपचनादिषु अभिप्रवर्तमानेषु अग्निवदुपचारः क्रियते अंतरग्निरिति' । सु. सं.].

**पाचक पित्त**

या पाचक पित्ताचे कार्यस्वरूप पुढीलप्रमाणे सांगतां येईल. खाल्लेले अन्न क्लेदक कफाकडून आमाशयात प्रथम पातळ होते. नंतर हा अन्नद्रव खाली म्हणजे पच्यमानाशयात उतरतो. त्यात तेथील स्रोतसांतून पाझरणारे द्रवरूप पाचक पित्त मिसळते व त्यामुळे त्या अन्नद्रवाचे स्वेदन होते. अन्नातील रसरूप सारांश व मलमूत्ररूप किट्टांश यांचे पृथक्करण होण्याची क्रिया यानंतर घडून येते. ती ग्रहणीत होते. पक्वाशयाशी जोडलेला क्षुत्रांत्राचा अंतिम भाग म्हणजेच ही ग्रहणी होय हे पूर्वी पाहिलेच. सारकिट्टमिश्रणातील सारस्वरूप रस येथे स्रोतसांत शोषून अथवा आकर्षून घेण्यात येतो हे कार्य तेथील पाचक पित्तामुळे घडून येते. पाचक पित्त साररूप अन्नरसाशी मिश्र होते व त्याच्याबरोबर सर्व शरीरात परिभ्रमण करीत हृदयादि अन्य स्थानात राहणाऱ्या इतर पित्त भेदांना देखील उपबृंहित करते. 'त्याच स्थानात (म्हणजे ग्रहणीत) राहणारे पित्त अग्नीची सर्व कर्मे करून आपल्या सामर्थ्याच्या योगाने अन्य पित्तस्थानांच्या व पर्यायाने सर्व शरीराच्या उपयोगी पडते', असे सुश्रताचार्यांनीच म्हटले आहे ['तत्रस्थमेव चात्मशक्त्या शेषाणां पित्तस्थानानां शरीरस्य च अग्निकर्मणा अनुग्रहं करोति' –सु.सं.].

अनुक्रमणिका

**पित्ताचे रंजकादि इतर प्रकार**

पित्ताचा दुसरा भेद म्हणजे रंजक पित्त. यकृत् [सुश्रुतसंहितेत यकृताबरोबर प्लीहेचाही निर्देश करण्यात आला आहे – 'यत्तु यकृप्लीन्होः पित्तं तस्मिन् रंजकोऽग्निरिति संज्ञा ।' सु. सं.] हे त्याचे आश्रयस्थान असून लघ्वंत्रातून आलेल्या आहाररसात रंजकता निर्माण करणे हे त्याचे कार्य होय. हाही एक पचनसंस्कारच असून जठराग्नीकडून आधीच विपाचित झालेल्या अन्नरसात आणखी निर्मलता अथवा विशुद्धता यावी हा त्यातील हेतू असतो. हे पित्त द्रवस्वरूप असते.

अष्टांगहृदयात, अन्नरसाला रंजित करणारे पित्त आमाशयाश्रयी असते असे म्हटले आहे ['आमाशयाश्रयं पित्तं रंजकं रसरंजनात् ।' – अ. हृ.]. परंतु, आमाशयात म्हणजे महास्रोतसाच्या दृतिसदृश आद्यविभागातच काय पण आमाशय या नांवाने ज्याचा क्वचित निर्देश करण्यात येतो त्या लघ्वंत्रातसुद्धा अन्नरसाचा अभाव असतो. आणि म्हणून वाग्भटाच्या वरील वचनातील आमाशय या शब्दाचा अर्थ आमाशय अथवा लघ्वंत्र असा न करता या शब्दाने त्याला यकृत् व प्लीहा अभिप्रेत आहेत असे अनुमान करणे उचित वाटते. रंजनपूर्व अवस्थेत म्हणजेच एकप्रकारे अपक्व स्थितीत अन्नरसाचे वास्तव्य काही काळ तरी यकृत्प्लीहेत असतेच. अर्थात् अपक्व स्थितीतील अथवा आमावस्थेतील अन्नरसाची आश्रयस्थाने म्हणून यकृतप्लीहांचा निर्देश करण्यासाठी आमाशय हा शब्द योजणे अगदीच अयोग्यही म्हणता येणार नाही.

तिसरे साधक पित्त संज्ञावाहिनींचे उगमस्थान असलेल्या हृदयात म्हणजे मस्तिष्कात राहते. प्रवृत्तिकारक प्राणवायूशी सहकार्य करून प्रज्ञा, धारणा, अभिमान इत्यादींच्या योगाने त्या त्या इंद्रियांना त्यांचे विषय प्राप्त करून देण्यात ते साधनीभूत होते. त्याला साधक असे म्हणूनच म्हणतात. 'हृदयस्थित (म्हणजे मेंदूत राहणाऱ्या) पित्ताला साधकाग्नी म्हणतात व ते ईप्सित मनोरथांच्या प्राप्तीत साधनीभूत होते', असे स्पष्टीकरण यासंबंधात सुश्रुतांनी केले आहे ['यत् पित्तं हृदयसंस्थं तस्मिन् साधकोऽग्निरित संज्ञा सोऽभिप्रार्थितमनोरथसाधनकृत् उक्तः ।' सु. सं.].

पित्ताच्या चौथ्या प्रकाराला आलोचक म्हणतात.ते तेजोरूप असून डोळ्यांतील कनीनिकांत त्याचे वास्तव्य असते.

भ्राजक पित्त हा पित्ताचा पांचवा प्रकार. रस, रक्त हे धातू, लसीका नांवाचे पेशीसंश्रित जलसदृश द्रवद्रव्य आणि त्याचा यांतील उष्णतेला हे नांव देण्यात आले आहे. रस व रक्त या धातूंतील उष्णतेमुळे त्यांची विशिष्ट द्रवावस्था कायम राहते व त्यामुळे परिणामी त्वचेचा वर्ण तेजस्वी राहण्यासही मदत होते. या पित्तभेदाला भ्राजक ही संज्ञा योजण्यात ही कांतिकरताच प्रामुख्याने अभिप्रेत आहे.

द्रवस्वरूपी व अद्रवस्वरूपी असे पित्ताचे भेद मूलतः दोनच संभवतात. लघ्वंत्र, यकृत् इत्यादींतील पित्त द्रवरूप असते तर मेंदू, ग्रहणी इत्यादींतील अद्रवरूप असते. तथापि, भिन्न भिन्न स्थानांत त्यांची जी भिन्न भिन्न कार्ये घडून येतात त्यांना अनुसरून वर दिल्याप्रमाणे त्याचे प्रमुख भेद पांच कल्पिण्यात आले आहेत.

**कफांचे अवलंबकादि पांच भेद**

वातपित्तांप्रमाणेच कफाचेही भेद पांचच संभवतात. त्यांपैकी उरोगत हृदयात राहणाऱ्या कफाला अवलंबक म्हणतात. त्रिक म्हणजे मान व खांदे यांतील संधिप्रदेश [त्रिक शब्दाचा हा अर्थ डल्हणांनीही या संदर्भात असाच केला आहे. 'त्रिकं शिरोबाहुद्वयसंधानस्थानम्' असे ते म्हणतात. आणि तेच बरोबर आहे. कारण श्रोणिमंडलांतर्गत त्रिक हृदयापासून दूर असल्याने हृदयाश्रित कफाकडून त्याचे वरीलप्रमाणे अवलंबन होणे शक्य नाही.] आणि हृदय यांचे पोषण या कफामुळे विशेषत्वाने केले जाते. कारण हा त्रिकसंज्ञक भाग हृदयाच्या जवळ असल्याने हृदयाश्रित रसधातूच्या स्निग्धादि गुणांनी त्याला जशी दृढता येते तद्वत हृत्पेशी रसाने प्रपूरित झाल्यामुळे त्याही बळकट होतात. शरीराच्या इतर भागांत राहणाऱ्या कफभेदाचे धारण अथवा अवलंबनही याच कफामुळे होत असते. शारीर घटकांना उपबृंहीत करणाऱ्या रसधातूचा आश्रय केल्याने ते साधते. शरीराचे पोषण सम्यक् रीतीने होण्याकरिता स्निग्धशीतादि गुणांनी युक्त असलेल्या द्रव्यांची आवश्यकता असते. आहारातून मिळणारी ही द्रव्ये प्रथम अन्नरसाच्या आश्रयाने राहतात आणि नंतर हृदयातून विक्षेपित होणाऱ्या रसधातूबरोबर समस्त शरीरात प्रसृत होतात. इतर अवयवांप्रमाणे अन्यान्य कफस्थानांतही त्यांचा प्रवेश होतो व त्या योगाने त्या त्या स्थानात राहणाऱ्या श्लेष्म्याचे गुण उपबृंहित होतात. हृदयाश्रित कफाचे हे धारणकर्म लक्षात घेऊनच त्याला अवलंबक हे नांव योजण्यात आले आहे.

या कफभेदाचे वर्णन करताना 'अन्यान्य स्थानांतील कफभेदांचे उदककर्माने तो धारण करतो व म्हणून त्याला अवलंबक म्हणतात', असे वाग्भटाचार्यांनी सांगितले आहे. ['तत्स्थ एवांबुकर्मणा। कफधाम्नां च शेषाणां यत् करोत्यवलंबनम्। अतोऽवलंबकः श्लेष्मा।' –अ. हृ.] परंतु, अन्य स्थानांतील कफभेदांचे उपबृंहण ज्याच्यामुळे होते त्या रसाश्रित अवलंबकात स्निग्धशीतादि गुणांचेच प्राधान्य आढळते, जलत्वाचे नव्हे. ज्यात द्रवत्व सापेक्षतया अधिक प्रमाणात असते तो श्लेष्मा आमाशयात राहतो. आणि उदककर्म करून अन्य कफस्थानांच्या व समस्त शरीराच्याही उपयोगी पडणे हे कार्य त्याचेच असते. सुश्रुताचार्यांनी तसे म्हटलेही आहे. ['स तत्रस्थ (आमाशयास्थ) एव स्वशक्त्या शेषाणां श्लेष्मस्थानानां शरीरस्य च उदककर्मणाअनुग्रहं करोति।' सु. सं.]. अशा स्थितीत वाग्भटाचार्यांचे वरील वचन विचारणीय वाटते.

कफाच्या दुसऱ्या प्रकाराला क्लेदक म्हणतात. हे द्रव्य जलप्राय असते. आमाशय हे त्याचे स्थान असून त्यात संचित झालेल्या घनरूप अन्नाचे क्लेदन करणे म्हणजे त्याला पातळ करणे हे त्याचे कार्य होय. त्याला क्लेदक असे म्हणूनच म्हणतात.

यावर एक शंका उद्‌भवण्यासारखी आहे. ती अशी की, श्लेष्मा हा स्निग्धगुणी वा श्लेषणकारी असल्याने तो पिंडीभावाला अथवा संघटनेला कारणीभूत होतो. आणि क्लेदनासाठी तर विश्लेषणाची अथवा विघटनेची जरुरी असते. अर्थात् क्लेदक हा संश्लेषकारी कफाचाच एक प्रकार असून तो क्लेदनाचे विश्लेषणात्मक कार्य करतो हे म्हणणे कफाच्या स्वभावधर्माशीच विरुद्ध आहे.

यावर उत्तर असे की, क्लेदक कफामुळे आहारातील अंशांचे क्लेदन होते हे खरे, तथापि, या रसावस्थेत अथवा विद्रुत स्थितीत देखील अन्नांश परस्परांशी मिसळूनच राहतात, त्यांच्यांत पृथक्‌भाव उत्पन्न होत नाही. अर्थात् त्यामुळे क्लेदक कफालाही संधायक मानणेच योग्य ठरते, विघातक नव्हे.

बोधक कफ हा श्लेष्म्याचा तिसरा प्रकार. जिभेतील सूक्ष्म स्रोतसे हे त्याचे आश्रयस्थान आहे. तोंडात टाकलेले द्रव्य विरघळवून त्यातील स्वादुतिक्तादि रसांचा बोध करून देणे हे त्याचे कार्य होय.

अनुक्रमणिका

म्हणूनच त्याला बोधक म्हणतात., 'रसनाश्रित श्लेष्मा रसबोध करून देतो म्हणून त्याला बोधक म्हणावे', असे वाग्भटाचे वचनच आहे ['रसबोधनात् । बोधको रसनास्थायी ।' – अ. हृ.]. याही ठिकाणी हे ध्यानात ठेवावयास हवे की विद्रुत झालेले अन्नांश जेव्हा जिभेवर समुदित अथवा संगृहीत होतात तेव्हाच त्यातील रसाचा बोध होतो व म्हणूनच येथे होणारे अन्नाचे ईषत् विद्रावण श्लेष्मगुणविरोधी ठरत नाही.

कफाच्या चवथ्या प्रकारचे नांव तर्पक असे आहे. तो मस्तिष्कात राहतो. हे मस्तिष्क म्हणजे ज्ञानेंद्रियांशी संबद्ध असलेली संज्ञावह स्रोतसे व प्राणवायूची वाहक असलेली वातावह स्रोतसे यांचे उगमस्थान होय. तेथे राहणारा हा श्लेष्मा आपल्या शीतगुणाने ज्ञानेंद्रियांना आणि मस्तिष्काला प्रसन्न व शांत राखतो म्हणून त्याला तर्पक म्हणतात.

कफाच्या पांचव्या प्रकाराला श्लेषक म्हणतात. स्नायू, पेशी आदींच्या व मुख्यतः अस्थींच्या संधिस्थानांत राहणारे स्निग्धगुणभूयिष्ठ द्रव्य म्हणजेच हा श्लेषक कफ होय. संधिस्थाने सुश्लिष्ट राखणे हे त्याचे कार्य. श्लेषक या संज्ञेत तेच अभिप्रेत आहे.

———

अनुक्रमणिका

# दर्शन १५—शरीरकर्मांचे दोषानुसारी त्रैविध्य

हात, पाय, मस्तक व मध्यभाग ही शरीराची प्रधान अंगे होत. या प्रत्येकाचे विभाग अनेक संभवतात. त्यांना उपांगे म्हणतात. पाऊल, जंघा, मांडी इत्यादि पायाची, तर बोटे, मनगट, कोपर इत्यादि हाताची उपांगे आहेत. त्याचप्रमाणे हनुवटी, गाल,नाक, डोळे इत्यादि अवयव हे मस्तकाचे आणि हृदय, यकृत,प्लीहा, आंतडी आदि अवयव हे मध्यभागाचे पोटभाग होत. मस्तक, अंतराधी, दोन हात व दोन पाय ही प्रमुख षडंगे असून डोळे, हृदय इत्यादि त्यांची प्रत्यंगे होत. असे अष्टांगहृदयात म्हटले आहे ['शिरोंऽतराधिर्द्वौ बाहू सक्थिनीच समासतः । षडंगमंगप्रर्त्यगं तस्याक्षिहृदयादिकम्॥' अ. हृ.].सुश्रुतसंहितेत हाच अभिप्राय थोड्या विस्ताराने व्यक्त झालेला दिसतो. चार शाखा (म्हणजे हात पाय), पांचवा मध्यभाग व सहावे शिर ही षडंगे होत; मस्तक, पोट, पाठ, नाभी, ललाट, नाक, हनुवटी, बस्ती, ग्रीवा हे प्रत्येकी एकेक अवयव; कान, डोळे, भुवया, कानशिले, खांदे, गाल, कांखा. स्तन, वृषण, पार्श्वभाग, नितंब, गुडघे, दंड, मांड्या याप्रमाणे प्रत्येकी दोन दोन असलेले अवयव; वीस बोटे आणि स्रोतसे ही सर्व प्रत्यंगे होत, असे आचार्य म्हणतात ['तच्च षडंग शाखाश्चतस्रो मध्यं पंचमं षष्ठं शिर इति । अतःपरं प्रत्यंगानि वक्ष्यन्ते । मस्तकोदरपृष्ठनाभिललाटनासाचिबुकबस्तिग्रीवा इत्येता एकैकाः, कर्णनेत्रभ्रूशंखांसगंडकक्षस्तनवृषणपार्श्वस्फिग्जानुबाहूरुप्रभृतयो द्वे द्वे, विंशतिरंगुलयः, स्रोतांसि वक्ष्यमाणानि, एष प्रत्यंगविभाग उक्तः'— सु. सं.] शरीराची ही अंगोपांगे सूक्ष्म घटकांच्या समुदायापासून उत्पन्न होतात. आणि हे सूक्ष्म घटक किंवा अवयवसुद्धा पांचभौतिक परमाणूंचे अतिसूक्ष्म असे विभिन्न समुदायच होत.

शारीर अवयवांना कारणीभूत होणाऱ्या घटकांची उत्पत्ती होणे, त्यांचा नाश होणे, त्यांच्यात वाढघट होणे, हे अहर्निश चालू असते. किंबहुना, उत्पत्त्यादि कर्मांच्या या सातत्यालाच जीवन म्हणतात.

जीवनकर्माला साधनीभूत होणाऱ्या क्रिया पांच संभवतात. आहाराचे यथावत् पचन, श्वसन, शरीरपोषण रसधातूचे समस्त शरीरात विक्षेपण, सातही, धातूंची क्रमशः अभिवृद्धी आणि शकृदादि मलांचे शरीराबाहेर व पूर्वपूर्व धातूंचे उत्तरोत्तर धातूंत प्रक्षेपण या त्या पांच क्रिया असून त्यांचे कर्तृत्व ज्यांच्याकडे असते त्यांनाच वायू, पित्त व कफ अशा संज्ञा देण्यात आल्या आहेत.

**संवेदनामूलक चलन**

जीवनाला साधनीभूत होणाऱ्या क्रियापंचकाची निष्पत्ती, पचन, पोषण व उत्सर्जन या कर्मत्रयीपासून होते; हे त्रिविध कर्म आकुंचनप्रसरणरूपी द्विविध कर्मामुळे संभवते आणि आकुंचनप्रसरणाला चलन हे कारणीभूत होते. तात्पर्य, सर्व प्रकारच्या कर्माचे चलन हे प्रमुख कारण होय. कर्म चलनात्मक असते, असे म्हणूनच सांगण्यात आले आहे ['चलनात्मकं कर्म' —त. स.]

चलनाच्या दोन प्रमुख प्रकारांपैकी आकुंचनामुळे पोषक द्रव्यांचा शरीरात संग्रह अथवा प्रवेश होतो. एखादी वस्तू आपल्याकडे ओढून घेणे याचे नांव आकुंचन, उलट एखाद्या वस्तूविषयी दूरत्व उत्पन्न करणारी क्रिया म्हणजे प्रसारण. मलादींचे उत्सर्जन अथवा विक्षेपण याच क्रियेमुळे घडून येते. आकुंचनप्रसरणाच्या योगानेच पचनादि क्रिया करणारे पित्तादींचे सर्व स्राव प्रादुर्भूत होतात. एक भाग आकुंचित झाला की त्यामुळे दुसरा भाग प्रसारित होतो व अशी क्रिया जेव्हा सतत काही काळ चालते तेव्हा स्रावांचा संभव होतो.

सर्व प्रकारची कर्मे चलनहेतुक असतात असे वर म्हटले. परंतु, हे चलनच मूलतः कुणामुळे संभवते याचा विचार केला तर असे दिसून येईल की स्वभाविक [स्वाभाविक या शब्दाचे अर्थ दोन होतात (१) नैसर्गिक आणि (२) स्व

अनुक्रमणिका

म्हणजे आत्मा, त्याच्या भावापासून म्हणजे चैतन्यापासून उद्भवलेली. शरीराचे सर्व विभाग चेतनाश्रित पंचभूत विकारांपासून उद्भवलेले असतात असे मानण्यात आले आहेच. आत्मा चेतनावान् असतो म्हणून त्याला कर्ता म्हणतात (चेतनावान् यतश्चात्मा ततः कर्ता निरुच्यते), चेतनेला अधिष्ठानभूत असणारी पंचभूतविकारांच्या समुदायापासूतउद्‌भवलेली आणि समयोगवाही म्हणजे धारक धातूंच्या प्रमाणोचित संयोगाने निरोगी राहणारी अशी वस्तू म्हणजे शरीर होय (तत्र शरीरं नाम चेतनाधिष्ठानभूतंपंचमहाभूतविकारसमुदायात्मकं समयोगवाहि ) असे चरकसहितेत म्हटले आहे.]संवेदना हेच ते कारण होय.

संवेदनादिकांच्या योगाने शरीरात ज्या निरनिराळ्या क्रिया सुरु असतात त्याची आश्रयस्थाने अथवा अधिष्ठाने म्हणजे शरीराचे बहुतेक सर्व लहान मोठे अवयव अथवा अंगोपांगे. त्यांच्या ठिकाणीच नानाप्रकारच्या क्रिया अभिव्यक्त होत असतात. या अवयवांचे आकार विविध प्रकारचे असून त्यांच्या अवस्थानांतही वैचित्र्य आढळून येते. पेशी, कला, सिरा, स्नायू, स्रोतसे याप्रमाणे विभिन्न नांवानी ज्यांचा उल्लेख करण्यात आला आहे त्या ह्या अवयवांत स्वरूपतः व गुणकर्मशः भिन्नता बरीच असली तरीत्या सर्वांची उत्पत्ती मात्र मांसघटकांच्या संघातापासून म्हणजेच पेशीपासून झालेली असते. हे सर्व अवयव परस्परांशी संबद्ध असतात व त्यामुळेच त्यांना विविध प्रकारच्या क्रिया करण्याची क्षमता प्राप्त होते.

## कला, सिरा, इ.

कला, सिरा इत्यादि अवयवांचे स्वरूप संक्षेपतः पुढीलप्रमाणे सांगता येईल. दोन अथवा दोघांहून अधिक अवयवांच्या मध्ये त्या त्या अवयवांची मर्यादा दर्शविणारे असे जे पातळ कपड्याप्रमाणे एक आवरण अथवाअस्तरण असते त्याला कला म्हणतात. ‘दोन अथवा दोनहून अधिक धातूंतील अथवा आशयांतील मर्यादारूप प्रांतविभाग म्हणजे कला; त्या सात संभवतात’, असे सुश्रुताचार्यांचे वचनच आहे [‘कलाः खलु अपि सप्त सभवंति धात्वाशयान्तरमर्यादाः’ । सु. सं.] खरोखर कला म्हणजे अंतर्गत त्वचाच होत. सिरा म्हणजे विविध द्रव्यांचे ज्यांतून अभिवहन होते त्या प्रणालिका. त्यांतही सिरा ही संज्ञा मुख्यतः द्रवद्रव्याचे अभिवहन करणाऱ्या वाहिनींना देण्यात येते; आणि वातवह स्रोतसांचा उल्लेख धमनी या शद्बाने करण्यात येतो. पेशी आणि संधी यांच्याशी निबद्ध असलेल्या मांसतंतूंना अथवा सूत्ररूप अवयवांना स्नायू म्हणतात. ते जसे सूक्ष्म असतात तसेच स्थूलही असतात. निरनिराळ्या अवयवांच्या आकुंचनप्रसरणरूप संचलनाला ते साहाय्य करतात. सिरा व धमन्या यांच्या व्यतिरिक्त शरीरात आणखीही काही प्रणालिका अथवा अभिवहनाचे मार्ग आढळून येतात. त्यांना सामान्यतः स्रोतसे म्हणतात. ‘विविध द्रव्यांचे अभिवहन करणाऱ्या आणि हृदयादि छिद्रांपासून निघून शरीराच्या अंतर्भागात पसरलेल्या निरनिराळ्या प्राणालिका म्हणजे स्रोतसे; मात्र त्यात सिरा व धमन्या यांचा अंतर्भाव होत नाही’, असे सुश्रुताचार्यांचे वचनच आहे [मूलात् खादन्तरं देहे प्रसृतं त्वभिवाहि यत्. । स्रोतस्तदिति विज्ञेयं सिराधमनिवर्जितम्’॥सु. सं.] पेशीसंबंधी विवरण यापूर्वी करण्यात आले आहेच. वर ज्यांचा उल्लेख केला त्या कलासिरादि अवयवांच्या व्यतिरिक्त ‘मांसघटकांचे जे समुदाय शरीरात आढळून येतात त्यांनाच पेशी म्हणतात. ‘मांसावयवसंघातः परस्परविभक्तः पेशी इत्युच्यते’ हे डल्हणाचे वचन स्पष्टच आहे. [सु. सं. व्याख्या.]

## संवेदना

शरीरातील सर्व चलनात्मक कर्मे संवेदनामूलक असतात असे वर सूचित केले. ही संवेदना बाह्य वस्तूंच्या स्पर्शाने अथवा आंतरिक प्रेरणेच्यायोगाने उद्दीपित होते. नंतर संज्ञावाहिनीतून तिचा संचार सुरु होतो आणि संस्पृष्ट अवयवांपर्यंत अथवा प्रेरणासंबद्ध स्थानांपर्यंत ती येऊन पोहोचली म्हणजे स्नायूंशी संबद्ध असलेल्या तेथील वातवाहिन्यांच्या योगाने स्नायूंत आकुंचनप्रसरणरूप हालचाल उत्पन्न होते. हे स्नायू निरनिराळ्या पेशींशी जोडलेले असतात. व त्यामुळे पेशींतही विविध प्रकारच्या चलनात्मक क्रियांचा प्रदुर्भाव

अनुक्रमणिका

होतो. आणि अशा प्रकारे पेशी हालचाल करू लागल्या म्हणजे मगच मलादींचे विक्षेपण होणे, पोषक द्रव्यांचे ग्रहण केले जाणे, सूक्ष्म स्रोतसांच्या मुखांतून निरनिराळे स्राव पाझरू लागणे, निरनिराळी अगोपांगे उत्क्षेपणादि हालचाल करू लागणे इत्यादि क्रिया होऊ लागतात. उपरिनिर्दिष्ट क्रमाने पेशींत संचलनाचा प्रादुर्भाव झाल्यानंतरच शरीरातील निरनिराळ्या कर्मांचा आरंभ होतो, असा याचा अर्थ.

शरीरातील जीवनकर्म पचनादि तीन अथवा पांच प्रमुख क्रियांच्याकडून संपादित होत असते. या पचनादि क्रियांना म्हणजेच पर्यायाने जीवनक्रियेला हेतुभूत होणारी प्रमुख कर्मे संभवतात. संवेदना, गती,स्राव, पचन, पोषण, व उत्सर्जन ही ती कर्मे होत.

**पचनक्रियेचे महत्त्व**

जीवन म्हणजे उत्पत्तिविनाशांचे सातत्य. पचन, पोषण व उत्सर्जन ही त्याची प्रधान साधक कर्मे. त्यांतही पचनाचे महत्त्व विशेष. आहाराने शरीरातील रसरक्तादि धातूंची अभिवृद्धी होते हे खरे, परंतु, त्यासाठी तो केवळ षड्रससंपन्न आणि सात्म्य होणारा असून भागत नाही. तर त्याचे जठराग्नीकडून यथावत् पचन होणे अवश्य असते. त्याविना धातू पुष्ट होणे तर दूरच, उलट नाना व्याधी मात्र उत्पन्न होण्याचा संभव. पचनक्रियेचे महत्त्व यातच आहे.

या पचनकर्माचे चर्वण, क्लेदन, संवेदन व सारकिट्टविवेचन असे प्रमुख विभाग चार संभवतात आणि ही संपूर्ण क्रिया ज्यांत घडून येते त्या स्थानांना पचनसंस्थान असे म्हणतात. मुख, आमाशय, लघ्वंत्र, ग्रहणी व पक्वाशय ही ती स्थाने होत. त्यांत राहणाऱ्या वातादि त्रिदोषांकडूनच मुखापासून पक्वाशयापर्यंत आहाराचे क्रमशः पचन होत असते.

या आहाराचे अथवा अन्नाचे भक्ष्य, पेय चोष्य व लेह्य असे प्रकार चार संभवतात. त्यांपैकी जे चर्वणयोग्य असते त्याला भक्ष्य म्हणतात, द्रवरूप अन्न हे पेय होय, ज्यातील रस ओठांनी चोखून घ्यावा लागतो त्याला चोष्य म्हणावयाचे आणि सूक्ष्म प्रमाणात चूर्ण केलेले व आर्द्र असे जे अन्न त्याला लेह्य म्हणतात. लेह्य अन्नाचे ते आर्द्र असताही पान करता येत नाही. तथापि, त्याचे चर्वण करण्याची आवश्यकता असत नाही. मुखस्रावा बरोबर ते तसंच उदरात प्रवेश करते. या चतुर्विध अन्नाचेही घन व द्रव असे दोन भाग पडू शकतात. त्यांपैकी घनस्वरूप अथवा भक्ष्यरूप द्रव्यात विरलता म्हणजे सूक्ष्मता येण्यासाठी त्याचे चर्वण होणे अवश्य असते. पेय, चोष्य, लेह्य या द्रव्यांच्या बाबतीत मात्र अशा चर्वणाची अपेक्षा नसते.कारण ती स्वभावतःच द्रवरूप असतात. या चतुर्विध अन्नाचे पचन कसे व कोणत्या क्रमाने होते ते आता पहावयाचे.

**पचनाची प्रक्रिया**

मुखांतर्गत संज्ञावाहिन्या अन्नाचा स्पर्श झाला म्हणजे उद्बुद्ध होतात आणि जिव्हादि अवयवांतील पेशींत आकुंचनप्रसरणरूपी हालचाल उत्पन्न करतात. पेशींच्या या संचलनामुळे त्यातील स्रोतसांतून एकप्रकारचा स्राव पाझरू लागतो. हाच बोधक श्लेष्मा होय. त्याच्या योगाने अन्न द्रवीभूत होते व कंठातील अन्नवह स्रोतसांत ते सुखाने आकर्षिले जाते. द्रवीभूत अन्नातील काही अंश रसनागत स्रोतसांत प्रवेश करतात व त्यामुळे रसनेला त्या द्रव्यातील मधुराम्लादि विशिष्ट रसाचा प्रत्यय येतो. जिव्हदि अवयवांच्या स्रोतसांतून स्रवणाऱ्या या स्रावाला म्हणूनच बोधक श्लेष्मा म्हणतात.

अनुक्रमणिका

कंठांतर्गत अन्नवहस्रोतोमार्ग हा नलिकाकार असून मांसपेशीपासून तयार झालेला असतो. या मार्गाचे आकुंचनप्रसरण होते तेव्हाच द्रवावस्थावस्थित अन्न—मग ही अवस्था स्वभावसिद्ध असो, अथवा बोधक कफामुळे प्राप्त झालेली असो—आत आकर्षिले जाते. अन्नमार्गाच्या या आकुंचनप्रसरणामुळे तत्रस्थ स्रोतसांतून जो स्निग्धगुणी द्रवपदार्थ बाहेर पडतो आणि ज्याचा योगाने अन्नाचा संचार कंठनलिकेतून सुखाने होऊ लागतो त्याला श्लेष्मा म्हणतात. कंठ हे एक श्लेष्मस्थान का मानण्यात आले हेही यावरून स्पष्ट होण्यासारखे आहे.

वर सांगितल्याप्रमाणे कंठातून खाली उतरलेल्या अन्नाचा आमाशयात प्रवेश झाला की तेथे त्याचे क्लेदन होते, म्हणजे त्याला अधिक द्रवावस्था प्राप्त होते. आमाशयात राहणाऱ्या क्लेदक कफाचे हे कार्य होय. आमाशयाच्या पेशींतील स्रोतसांत राहणारे व पेशींच्या हालचालीमुळे स्रोतसांतून बाहेर स्रवणारे द्रव्य म्हणजे हा क्लेदक कफ होय. 'कफाचा जो प्रकार आमाशयात राहतो व तेथे प्राप्त झालेल्या अन्नाचे क्लेदन अथवा द्रवीकरण जो करतो त्याला क्लेदक म्हणतात', असे अष्टांगहृदयात म्हटलेच आहे ['यस्त्वामाशसंस्थितः। क्लेदकः सोऽन्नसंघातक्लेदनात्।' अ. हृ.].

## आमाशयातील कार्य

आमाशय या शब्दाचा अर्थ येथे लक्षात ठेवणे इष्ट होईल. अन्ननलिकेवाटे आत प्रविष्ट झालेले अन्न सर्वप्रथम ज्यात राहते तो आशय येथे अभिप्रेत आहे. त्याची निर्मिती लहानमोठ्या मांसपेशींपासून झालेली असते. 'आमाशय हा चतुर्विध अन्नाचा आधार होय. तेथे असणाऱ्या द्रवत्व, स्निग्धत्व इत्यादि उदकगुणांच्या योगाने आहारातील घनत्व नाहीसे होऊन तो विद्रावित होतो आणि त्यामुळे त्याचे पचन सुखाने होऊ शकते', असे सुश्रुतसंहितेत म्हटलेही आहे ['स चतुर्विधस्य आहारस्य आधारः। स च तत्र औदकैर्गुणैः आहारः प्रक्लिन्नः भिन्नसंघातः सुखजरश्च भवति'। सु. सं.]

अन्नाचा आमाशयात प्रवेश झाला की, त्याचे फेसाळ द्रवात रूपांतर होते हे वर आलेच. त्यशिवाय त्यात आणखीही एक बदल घडून येतो तो म्हणजे कटु, अम्ल, लवण आदि षड्रसांनी ते युक्त असताही त्यात मधुरीभाव अथवा माधुर्य उत्पन्न होते. मात्र याचा अर्थ असा नव्हे की अन्नातील उर्वरित रसांचे मधुर रसात विलयन होते. कटुक्षारादि रसांच्या स्पर्शाने आमाशयात जो क्षोभ होतो तो न व्हावा इतपत त्या त्या रसात सौम्यता येणे, इतकाच मधुरीभावाचा अर्थ येथे अभिप्रेत आहे.

आमाशयात अन्नाचे विद्रावण होते व त्याच ठिकाणी त्यात मधुरीभाव उत्पन्न होतो असे वर म्हटले. परंतु, विक्लेदन व मधुरीकरण ही कार्ये भिन्न आहेत. अर्थात् ती ज्यांच्यामुळे संभवतात ती द्रव्येही विभिन्नच असावयाची. कारण क्लेदनाचे कार्य तेजोगुणभूयिष्ठ द्रव्यांमुळे होणार तर पार्थिव व आप्य गुणांचे आधिक्य ज्यात आहे त्या द्रव्यांमुळे मधुरीभावाची निर्मिती होणार. ही द्रव्ये भिन्नगुणी असल्याने त्यांचा स्राव एकाच स्थानातून होणे शक्य नाही. परंतु तो एकाच आमाशयातून होतो असे वर्णन आहे. अर्थात् एकाच आमाशयाच्या भिन्नभिन्न विभागातून ही भिन्नगुणी द्रव्ये पाझरतात असे यावरून उपपन्न होते. या दोन विभागांपैकी अन्नविक्लेदन करणारा श्लेष्मा ज्यातून पाझरतो त्याला आमाशय ही संज्ञा आहेच, परंतु त्याचबरोबर मधुरीभाव उत्पन्न करणारे द्रव्य ज्यातून स्रवते तो भागही या उपरिनिर्दिष्ट भागाशी जोडलेला असल्याने त्यालाही आमाशयाचाच एक अवयव मानणे वस्तुतः इष्ट होय.

अनुक्रमणिका

**लघ्वंत्रातील पचनकार्य व सारकिट्टविवेचन**

आमाशयात द्रवीभूत झालेल अन्न तेथून खाली म्हणजे लघ्वंत्रातअथवा पच्यमानाशयात उतरते. ही क्रिया एकदम होत नाही. म्हणजे अन्नातील सर्व अंश पूर्णपणे विद्रावित झाला म्हणजे नंतरच ते लघ्वंत्रात येते असे घडत नाही. अन्नातील जितका अंश आमाशयात विद्रावित झाला तितका लघ्वंत्रात उतरतो आणि अन्नाचे क्लेदन पूर्ण होईपर्यंत ही क्रिया चालूच राहते. आमाशयातून लघ्वंत्रात याप्रमाणे अन्नाचे अधोगमन होत असताना त्यात यकृतोद्भव पित्त येऊन मिळते [आहारपचनोपयोगी असे हे द्रव्य म्हणजे यकृतातील रंजक पित्त नव्हे आयुर्वेदीय ग्रंथांत त्याचा स्वतंत्रपणे उल्लेख केलेला नाही. तथापि त्याचा प्रत्यय प्रत्यक्षपणे येण्यासारखा आहे.] या याकृत पित्तासह द्रवीभूत अन्न पच्यमानाशयात प्राप्त झाले म्हणजे तेथील पित्ताकडून त्याचे स्वेदन होते. क्षुद्रांत्रातील हे पित्त द्रवरूप असते व पेशींच्या आकुंचनप्रसरणामुळे त्यातील स्रोतसांतून ते बाहेर येते. लघ्वंत्रातील या स्वेदनसंस्कारानंतर ते अन्न ग्रहणीत म्हणजे लघ्वंत्राच्या शेवच्या भागात येते व त्या ठिकाणी त्यातील द्रवरूप सारभाग व मलरूप किट्ट एकमेकांपासून पृथक् होतात.सारकिट्टांच्या पृथक्करणाचे हे कार्य ग्रहणीगत पाचक पित्तामुळे घडून येते. अन्नाचे संस्वेदन यथावत् होण्याकरिता द्रवरूप पित्ताची आवश्यकता असतेपरंतु, ते तसे संस्विन्न झाले म्हणजे मात्र त्यातील सारभागाचे शोषण करण्यासाठी ज्यात द्रवत्व नाही असे केवळ उष्मारूप पित्तच अवश्य होय.ग्रहणीगत पित्त असेच असते. इतर सृष्ट वस्तूंप्रमाणे तेही पांचभौतिक असले तरी त्यात तेजोगुणाचा प्रकर्ष असतो व म्हणूनच त्यात द्रवत्व असत नाही.

ग्रहणीतील पाचक पित्ताने अन्नातील साररूप अंश वेगळा झाला म्हणजे अंत्रपेशीगत स्रोतसांकडून त्याचे शोषण होते व नंतर सर्व शरीराला उपबृंहक होणारा हा रस लघ्वंत्रातून यकृताकडे जाणाऱ्या रसवाहिन्यांच्या द्वारे यकृतात जातो. अन्नातील किट्टांशाचीही अशी दुसरीकडे व्यवस्था होते. या किट्टाचे प्रकार दोन, एक पुरीष व दुसरे मूत्र. पैकी बस्तीत मूत्राचा संचय होतो तर स्थूलांत्रात पुरीष संचित होते. हे किट्ट, पक्वाशयाच्या आरोही भागातील पेशी आकुंचित झाल्या म्हणजे वर आकर्षिले जाते, आणि स्थूलांत्राच्या अवरोही भागातील पेशींचे प्रसारण झाले की तेच शरीराबाहेर उत्सर्जित होते. मलोत्सर्जनाचे हे कार्य पक्वाशयाच्या पेशींतील स्रोतसांत राहणाऱ्या अपानसंज्ञक वायूमुळे घडून येते. हा अपान मूत्रोत्सर्जनातही सहायभूत होतो. परंतु, त्या कामी मुत्राशयाच्या पेशींतील स्रोतसांत राहणारा वायू मुख्यतः कारणीभूत होतो.

येथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. ती ही की पक्वाशयाच्या अंतर्भागात म्हणजे बृहदंत्राच्या नलिकेत संचित होणारा अन्नमलोद्भव वायू मलस्वरूप असतो. आहारातील वायवीय अंशांच्या मलरूपापासून त्याची उत्पत्ती होत असते. 'स्वेद, मूत्र, पुरीष, वात, पित्त, कफ; कान, डोळे, नाक, तोंड, रोमकूपे यांत उद्भवणारे मल आणि केस, श्मश्रू, लोम, नखे, इत्यादि अवयव या सर्वांची किट्टामुळे वाढ होते', असे चरकसंहितेत म्हटलेच आहे ['किट्टात् स्वेदमूत्रपुरीषवातपित्तश्लेष्माणः कर्णाक्षिनासिकास्यलोमकूपप्रजननमलः केशश्मश्रुला मनखादयश्चावयावाः पुष्यन्ति' – च सं.] अर्थात् हा वायू पुरीषाप्रमाणे उत्सर्जनयोग्यच होय. पक्वाशयाच्या पेशींत वास्तव्य करणारा वायू त्याहून निराळा आहे. तो पक्वाशयाला प्रेरित करून तेथील संचित मल–वायुरूप मलसुद्धा–उत्सर्जित करण्याचे कार्य करतो.

अशा रीतीने सम्यग् विपाचित आहारापासून जो सारभूत द्रव तयार होतो त्यालाच आहाररस म्हणतात. रसरक्तादि सर्व धातू त्याच्यामुळे परिपुष्ट होतात. कारण या धातूंचे पोषण ज्यामुळे होऊ शकेल अशी द्रव्येआहारात संगृहीत झालेली असतात आणि आहाररस हा त्याचाच सारांश असतो.

अनुक्रमणिका

शरीरातील नानविध अवयव, रसरक्तादि धातू आणि पुरीषादि मल या सर्वात स्वरूपतः विसदृशता दिसून येत असली तरी त्यांच्यात एका बाबतीत साम्य आहे, आणि ते म्हणजे त्या सर्वांची उत्पत्ती पंचभूतांच्या विकारांपासून होते. शरीराच्या आहार्य द्रव्यांतही अशीच स्थिती आढळून येते. या द्रव्यांत वैविध्य बरेच असते. काही द्रव्ये घन असतात तर काही द्रवरूप असतात. मधुरादि रसांनुसार त्यांत जसे भेद संभवतात तद्वत् प्राणिज,वानस्पतिक असेही त्यांचे प्रकार पडतात. केवळ वनस्पतिजन्य द्रव्यांतही फळे, मुळे, धान्य, इत्यादि भेद दिसून येतात. परंतु, एक गोष्ट खरी की ही द्रव्ये पांचभौतिक असतात. 'पृथ्वी, अप्, तेज, वायू व आकाश यांच्या समुदायापासूनच सर्व द्रव्यांची उत्पत्ती होते', असे सुश्रुताचार्य म्हणतातच ['पृथिव्यप्तेजोवाय्वाकाशानां समुदायात् द्रव्याभिनिवृत्तिः' । सु. सं.] चरकसंहितेतही 'या अर्थाने सर्व द्रव्ये पांचभौतिक होत' असे म्हटले आहे ['सर्व द्रव्यं पांचभौतिकमस्मिन् अर्थे' –। च. सं.]

### शरीरातील पांचभौतिक द्रव्यांची अभिवृद्धी

पांचभौतिक देहात आकाश हे तत्त्व अवकाशरूपाने विद्यमान असते. अवकाश म्हणजे परमाणुरहित असा सुषिर प्रदेश. 'शब्द, कर्णेद्रिय, सर्व छिद्रसमूह, पोकळी ही सर्व आकाशीय होत' ['आंतरिक्षास्तु शद्बः शद्बेंद्रियं सर्वच्छिद्रसमूहो विविक्तता च' –सु. सं.], 'शब्द, श्रोत्रेंद्रिय, लघुत्व, सूक्ष्मत्व, व विवेक या वस्तू आकाशात्मक होत' ['अवकाशात्मकं शद्बः श्रोत्रं लाघवं सौक्ष्म्यं विवेकश्च । ' – च. स.] अशी आचार्यांची वचने आहेत. बाकीच्यांचे म्हणजे पृथिव्यादि तत्त्वांचे परमाणू असतात आणि आहारातील तत्तद्गुणभूयिष्ठ अंशांनी शरीरातील त्या त्या परमाणूंची अभिवृद्धी होते. शरीरातील मांस व अस्थी ही द्रव्ये पार्थिव होत तर रसादि द्रवद्रव्ये आप्य म्हणजे जलगुणभूयिष्ठ होत. पांचभौतिक आहारातील पार्थिव अंशानी, मांस, अपूप, ओदन इत्यादि द्रव्यांनी मांसास्थींचे अभिवर्धन होते तर पाणी, दूध, फळांचे रस इत्यादि द्रवद्रव्यांनी रसादींचे पोषण होते. सुंठ, मिरी, पिंपळी, असली कटुरसप्रधान द्रव्ये, चिंच, आवळा अशी अम्लरसोल्बण द्रव्ये ही उष्णवीर्य असतात. त्यांच्या योगाने शरीरातील रक्तादि तैजस द्रव्यांची वाढ होते. ही तैजस द्रव्येच पित्तदोषाची आश्रयस्थाने होत. सूर्याच्या उष्णतेनेही या तैजस द्रव्यांची वृद्धी होते. शरीरातील वायूचे उपबृंहण रूक्षगुणी व तिक्तरसप्रधान आहाराने होते. परंतु, त्याहीपेक्षा त्याचे पोषण खरेखुरे कशाने होत असेल तर ते श्वसनाकृष्ट वायूमुळे. आहार्य द्रव्यांतून मिळणाऱ्या वायवीय अंशांहून श्वसनमार्गाने मिळणारा हा वायू अधिक विशुद्धही असतो.

शरीरातील पांचभौतिक द्रव्यांची अभिवृद्धी अशाप्रकारेआहारातील तत्समान द्रव्यांनी होत असते हे खरे असले तरी त्यांतही तेज व वायू यांचेच महत्त्व विशेष आहे.

रसरक्तादि धातूंच्या वाढीला पुरेसे होईल इतक्या प्रमाणात अन्नपानाचे सेवन करूनही त्यातून जर वायू व तेज यांना वगळण्यात आले तर मनुष्याला जगणेच अशक्य होईल. अर्थात् त्याबरोबर हेही खरे की पांचही महाभूतांत स्थूलतम तत्त्व पृथ्वी असून तेच नानाविध द्रव्यांचे अधिष्ठान असते. शारीर अवयव स्थूल म्हणजे विशिष्ट आकारात अभिव्यक्त होणारे असल्याने त्यांतही प्राधान्य पार्थिव अंश ज्यात अधिक प्रमाणात विद्यमान असतो असाच आहार शरीराला पोषक होतो.

अनुक्रमणिका

**श्वसनाचे स्वरूप**

पचनक्रियेइतकीच श्वसन ही दुसरी महत्त्वाची क्रिया होय. तिचे स्वरूप आता पाहावयाचे. शरीराचे जीवन म्हणजे त्याचे कर्मवत्त्व अथवा क्रियारूपातील अस्तित्त्व. सर्व लहानमोठ्या अवयवांत चालणाऱ्या या चलनात्मक कर्माचे संचालकत्व वायूकडे असते. पांचभौतिक देहातील पार्थिव परमाणू हेच या वायूचे शरीरातील अधिष्ठान होय. कारण तो ज्याचे संचालन करतो ते परमाणू पार्थिवच असतात. 'परमाणूभेदाने शरीरातील अवयव हे केवळ असंख्य असून त्या परमाणूंचा संयोग व वियोग होण्यात कर्मस्वभावी वायू कारणीभूत होतो', हे चरकसंहितेतील वचन ['शरीरावयवास्तु परमाणुभेदेन अपिरिसंख्येया भवन्तिं.... तेषां संयोगविंभागें परमाणूनां कारणं वायुः कर्मस्वभावश्च' च. सं.] या ठिकाणी लक्षातठेवण्यासारखे आहे.

शरीरात संचार करणाऱ्या या वायूचे पोषण वायूनेच होते. याचा अर्थ असा की, शरीरातील अवयवांना पोषक होणाऱ्या आहारात ज्याप्रमाणे विविधता आढळून येते त्याप्रमाणे ती शरीरांतर्गत वायूच्या बाबतीत असत नाही. श्वसनमार्गाने मिळणारा बाहेरचा वायू हाच त्याचा एकमात्र आहार असतो.

बाहेरील शुद्ध वायूनासिकेच्या मार्गाने शरीराच्या अन्तर्भागात म्हणजे फुफ्फुसात प्रवेश करतो आणि सर्व शरीरात परिभ्रमण केल्याने दूषीत झालेला वायू त्याच मार्गाने शरीराबाहेर उत्सर्जित होतो. वायूची ही यातायात अथवा जाणेयेणे म्हणजेच श्वसन. आणि ते होण्यासाठी जे अवयव साधनीभूत होतात त्या सर्वांना मिळून श्वसनसंस्थान असे म्हणतात. नासिकेची दोनही पुडे, घशातील श्वासनलिका, आणि फुफ्फुसे यांचा या श्वसनसंस्थानात समावेश होतो.

हे श्वसन अखंडपणे चालू असते आणि ते तसे राहावे यासाठीच नासिका, श्वासनलिका व फुफ्फुसे यांचे आकुंचनप्रसरण अविरतपणे सुरु असावे लागते. फुफ्फुसपिंडांचे स्वरूप पाहिले तर तेही श्वसनकर्मानुकूल असल्याचे दिसून येते. पेशींच्या पासून बनलेली ही फुफ्फुसे आतून सच्छिद्र असतात. त्यांच्या अंतर्गत पेशींना सर्व बाजूनी बुद्‌बुदाकार कोश अथवा पिशव्या लागलेल्या असतात. या पिशव्या पातळ त्वचेच्या बनलेल्या असून त्यांत बुडबुड्याप्रमाणे वायु भरलेला असतो. फुफ्फुसांच्या पेशींना अहर्निश आकुंचनप्रसरण करण्याची क्षमता त्यामुळेच प्राप्त होते. त्या जेव्हा प्रसरण पावतात तेव्हा श्वासमार्गाने अंतःप्रविष्ट झालेला वायू फुफ्फुसात संचित होतो आणि त्याच पेशी आकुंचित झाल्या की सर्व शरीरात संचार करून आल्याने दूषित झालेला फुफ्फुसांतील वायू श्वासमार्गावाटे बाहेर उत्सर्जित होतो. श्वसनक्रियेत अशा प्रकारे नासिका, श्वासमार्ग व फुफ्फुसे या सर्वांचे आकुंचनप्रसरण कारणीभूत होत असून ते वायूमुळे घडून येत असल्याने त्याच्याकडेच अखेर श्वसनाचे कर्तृत्व येते हे स्पष्ट होय.

नासिकेच्या मार्गाने आत ओढलेल्या वायूचे प्रथम फुफ्फुसात आगमन होते. नंतर तेथील रक्ताशी मिश्र होऊन त्याच्यासह तो हृदयात गमन करतो, व पुढे हृदयातून निघून शरीरातील सर्व विभागांत जाणाऱ्या रसवाहिनींतून तो सर्व शरीरात प्रसृत होतो. निरनिराळ्य अवयवांत वास्तव्य करणाऱ्या वातविशेषांचे त्या योगे उपबृंहण होते [उदानवायूचा संचार सर्व शरीरात होत असतो असे या ठिकाणी ध्वनित केले असून ते शास्त्रविरोधी वाटण्याचा संभव. कारण उदानाचे संचारक्षेत्र नासा, नाभी व कंठप्रदेश इतकेच असल्याचे वर्णन आहे (नासानाभिगलांश्चरेत् अ. हृ.) तथापि, 'वाक्प्रवृत्ती, प्रयत्न, ऊर्जा, बल, वर्ण, स्मृती इत्यादीचे कर्तृत्व उदानाकडे असते', अशा अर्थाच्या वचनातून (वाक्प्रवृत्तिप्रयत्नोर्जाबलवर्णस्मृतिक्रियः – अ. हृ.) उदानाचे जे ऊर्जाकरत्व सांगण्यात आले आहे ते मात्र सार्वदेहिक होय. उदानाचा सर्वशरीरव्यापी संचार त्यावरून प्रतीत होऊ शकेल.]

अनुक्रमणिका

**धातुपोषणातही दोषांचा संबंध असतोच**

पचन व श्वसन या कर्मांत याप्रमाणे जसे दोषकर्तृत्व आढळून येते तसेच शारीर धातूंच्या पोषणातही दोषांचाच संबंध असल्याचे दिसून येते.

आहारोद्भव रस यकृताकडे जाणाऱ्या स्रोतसांतून यकृप्लीहेत आला म्हणजे तेथील रंजक पित्ताच्या योगाने त्याला रंजकता—रक्तवर्णत्व—प्राप्त होते ['स खलु आप्यो रसः यकृत्प्लीहानौ प्राप्य रागं उपैति।' सु. सं.] पुढे तो हृदयात येतो व शरीराच्या सर्व विभागांत त्याचे अभिसरण होते. हृत्पेशींच्या स्रोतसांत वास्तव्य करणाऱ्या व्यानवायूमुळे हे कार्य घडून येते [व्यानाचे हृदयाश्रयित्व अष्टांगहृदयात जसे स्पष्टपणे सागितलेले आढळते तसे ते चरकसंहितेत अथवा सुश्रुतसंहितेत आढळत नाही. व्यान हा हृदयात राहतो, सर्व शरीरात संचार करतो आणि तो अत्यंत वेगवान आहे, असे वाग्भटाचार्य म्हणतात. ('व्यानो हृदि स्थितः कृत्स्नदेहचारी महाजवः'). व्यानाचे सर्व देहव्यापित्व व गती, प्रसरण आदि क्रियांतील कर्तृत्व याविषयी मात्र चरकसुश्रुतांनी उल्लेख केला आहे. 'शिघ्रगती व्यान समस्त शरीराला व्यापून राहतो आणि गती, प्रसरण, आक्षेप, निमेष आदि क्रिया सदैव करीत असतो', ('देहं व्याप्नोति सर्व तुं व्यानः शीघ्रगतिर्नृणाम् । गतिप्रसारणाक्षेपनिमेषादिक्रियः सदा') असे चरकसंहितेत तर 'व्यानवायू हा सर्व देहात संचार करतो, रसाचे विक्षेपण करण्याच्या कामी उद्युक्त झालेला असतो, स्वेद व रक्त यांचा स्राव तोच घडवून आणतो; उत्क्षेपणादि पांचही प्रकारांनी तो कार्यान्वित होतो आणि तो कुपित झाला म्हणजे प्रायः सार्वदेहिक रोगांची उत्पत्ती होते', (कृत्स्नदेहचरो व्यानो रससवहनोद्यतः । स्वेदासृक्स्रावणश्चापि पंचधा चेष्टयत्यपि । कुद्धश्च कुरुते रोगान् प्रायशः सर्वदेहगान्) असे सुश्रुतसंहितेत म्हटले आहे.] त्याच्या योगाने पेशींचे आकुंचनप्रसरण होते व त्यामुळे हृदयस्थ रसधातूचे रसवाहिनीत विक्षेपण होते. 'व्यानेन रसधातुर्हि विक्षेपोचितकर्मणा । युगपत् सर्वतोऽजस्रं देहे विक्षिप्यते सदा॥' [अ.हृ.], यावाग्भटवचनात हेच सांगितले आहे.

हा रसधातू हृदयातून निघालेल्या व शाखोपशाखांच्या योगाने समस्त शरीरात पसरलेल्या रसवाहिन्यांतून परिभ्रमण करीत असतो आणि त्यामुळे धातूंचे व अंगोपांगांचे उपबृंहण होते. ' हृदय हे रसधातूचे स्थान होय. हा हृदयस्थ रस अज्ञातहेतुक कर्माने प्रवृत्त होऊन हृदयातून निघणाऱ्या उर्ध्वगामी दहा, अधोगामी दहा व तिर्यग्गामी चार अशा एकूण २४ धमन्यांत प्रवेश करतो व शरीराला प्रतिदिनी तोषवितो, वाढवितो, धारण करतो व पोषवितो', या वचनात ['तस्य च हृदयं स्थानं स हृदयाच्चतुरविंशतिधमनीरनुप्रविश्य ऊर्ध्वगा दश दश च अधोगामिन्यः चतस्रश्च तिर्यग्गाः कृत्स्नं शरीरं अहरहस्तर्पयति वर्धयति धारयति यापयति चादृष्टहेतुकेन कर्मणा । ' —सु. सं.]सुश्रुताचार्यांनी हाच अभिप्राय व्यक्त केला आहे.

शरीराच्या लहान मोठ्या भागांत रसधातूचे अभिवहन ज्यांच्या योगाने होते त्या रसवाहिन्या शेवटी शेवटी अत्यंत सूक्ष्म होत जातात. 'सर्व अवयवांना रसधातूचा पुरवठा ज्यांच्या द्वारे होतो ती रसवह स्रोतसांची मुखे बिसतंतूप्रमाणे सूक्ष्मातिसूक्ष्म होत होत सर्व शरीरात सर्वदूर प्रसृत झालेली असतात', असा एतत्संबंधी उल्लेख अष्टांगहृदयात आढळतो ['बिसानामिव सूक्ष्माणि दूरं प्रविसृतानि च। द्वाराणि स्रोतसां देहे रसो यैरुपचीयते'। —अ. हृ.] हृदयातून उगम पावलेल्या व सर्व शरीरात पसरलेल्या अशा रसवाहिन्यांतून अहर्निश संचार करणाऱ्या या रसधातूकडूनच सर्व अवयवांचे व धातूंचे पोषण होते. त्याच्या या अहर्निश भ्रमणामुळेच 'जो सदैव भ्रमण—गमन—करतो तो रस' अशी रस शब्दाची निरुक्ती सुश्रुताचार्यांनी निर्देशिली असावी ['रस गतौ अहरहर्गच्छतीति रसः ।' —सु. सं.]

**रसधातू**

हा रसधातू म्हणजे आहाररस नव्हे. तो तद्भिन्न होय. अन्नाचा सम्यक् पाक झाल्यानंतर त्यापासून तयार होणाऱ्या साररूप द्रवाला आहाररस म्हणतात; तर रंजक पित्ताकडून पुनश्च विपाचित झालेल्या आणि

रक्तवर्णता प्राप्त झालेल्या आहाररसाला रसधातू म्हणतात. तो सर्व शरीरात व्यापलेला असतो. उलट आहाररस मात्र तसा असत नाही.

हा रक्तवर्णी रसधातू पुढे हृदयात प्रवेश करतो व तेथील व्यानवायूकडून त्याचे शरीरात विक्षेपण होते. अर्थात् त्याचा वर्ण लाल असला तरी तो धातू रसच होय, रक्त नव्हे. 'विक्षेपण हेच ज्याचे विहित अथवा अभ्यस्त कर्म आहे त्या व्यानाकडून शरीराच्या सर्व विभागांत एकसमयावच्छेदेकरून ज्याचे अखंड व नित्य विक्षेपण होत असते तो धातू रसच होय ['व्यानेन रसधातुर्हि विक्षेपोचितकर्मणा। युगपत् सर्वतोऽजस्रं देहे विक्षिप्यते सदा'। अ हृ.], असे अष्टांगहृदयात स्पष्टपणे म्हटलेच आहे. त्याचप्रमाणे 'शरीराच्या विभिन्न विभागांना रसाचा पुरवठा ज्यांतून होतो त्या स्रोतसांची तोंडे बिसतंतूंप्रमाणे सूक्ष्म असून ती शरीराच्या अंतर्भागात दूरवर पसरलेली असतात' ['बिसानामिव सूक्ष्माणि दूरं प्रविसृतानि च। द्वाराणि स्रोतसां देहे रसो यैरुपचीयते' –। अ. हृ], या वचनातून रसाचे सर्वदेहगामित्व जसे सूचित होते तसेच, 'रसवह स्रोतसांचे उगमस्थान हृदय होय', असेही विधान आर्षग्रंथात आढळून येते ['रसवहानां स्रोतसां हृदयं मूलं दश च धमन्यः' –च. सं.]

या रसधातूत नानाविध आहार्य पदार्थांतून घेतलेले आणि शारीर धातूंच्या वाढीला साहाय्यक होणारे असे द्रव्यांश विद्रुतावस्थेत विद्यमान असतात. त्याला रस असे म्हणूनच म्हणावयाचे. रसत्व म्हणजे विलीनत्व अथवा विद्रुतत्व, विशिष्ट आकारात अभिव्यक्त झालेल्या द्रव्यांचे अनभिव्यक्तअशा सारभूत द्रवरूपात अवस्थान्तर होणे म्हणजे रसन. या अवस्थेला रस ही संज्ञा अन्वर्थक अशीच आहे.

हा रस सर्व शरीरात प्रसृत झाला हणजे कायाग्नीकडून[शारीर धातूंच्या ठिकाणी कायाग्नीचे आंशिक अस्तित्व असते या अंशांत मांद्य आले की तदाश्रयी धातूंची अभिवृद्धी होते आणि ते अंश उद्दीप्त झाले की धातू क्षीण होतात. ('स्वस्थानस्थस्य कायाग्नेरंशा धातुषु संश्रिताः। तेषां सादातिदीप्तिभ्यां धातुवृद्धिक्षयोद्भवः' ।अ. हृ.)हे वचन या ठिकाणी ध्यानात ठेवण्यासारखे आहे.] त्याच्यावर पुनश्च पचनसंस्कार होतो. असा संस्कारित अथवा विपाचित रसधातू म्हणजेच रक्त. रक्तत्व म्हणजे अनुरक्तता, परस्परानुरागिता. रक्त ही संज्ञा येथे केवळ रक्तवर्णाची वाचक नाही तर तत्तत् द्रव्यातील परमाणूंचे परस्पराकर्षकत्व तीत अभिप्रेत आहे. आहार्य द्रव्यांतील परमाणूंना जठराग्नीच्या संयोगाने आधी रसावस्था अथवा विद्रुतावस्था जरी प्राप्त होत असली तरी शेवटी त्या अमूर्तावस्थेतील परमाणूंपासूनच मूर्तरूप मांसधातू वा मांसमय अवयव साकार होत असतात. परंतु, तसे होण्यापूर्वी रसावस्थावस्थित परमाणूंच्या ठिकाणी विशिष्ट पचनसंस्काराच्या योगाने परस्पराकर्षण अथवा संहतीभाव उद्भूत व्हावा लागतो. आणि रसधातू जेव्हा या अवस्थेत येतो तेव्हाच त्याला रक्त या संज्ञेने संबोधण्यात येते.

रस ही संज्ञा स्पंदनावस्थेतील द्रवाला देण्यात येते. स्पंदन म्हणजे विस्रावण. द्रवत्व हे त्याचे कारण असून ['स्यंदनासमवायिकारणं द्रवत्वम्'। त. सं.] या अवस्थेतील द्रव्याच्या परमाणूंत परस्परांपासून विभक्त होण्याची प्रवृत्ती उद्भवलेली असते. रसरूप द्रव्ये विश्लेषणगुणी असतात असे याचे तात्पर्य. उलट पिंडीभावाला उत्पन्न करणारी संश्लेषकता रक्तसदृश द्रव्यात आढळून येते. रक्तातील काही परमाणू तिच्या योगाने एकमेकांकडे आकर्षित होऊन एकजीव झाले की त्यांच्या त्या एकीभूत अवस्थेला अथवा पिंडीभावालाच मांस असे म्हणतात. मांस या शद्बात व्यक्तत्व म्हणजे मूर्तत्व अथवा विशिष्टाकृतिमत्व अभिप्रेत असून त्या शद्बाचा धात्वर्थही तसेच सुचवितो ['माङ् माने' – सि. कौ.] त्या दृष्टीने कोणत्याही मूर्त द्रव्याला मांस ही संज्ञा देताही येईल. मांसधातू ही शरीरातील अशी पहिलीच मूर्त अथवा साकार वस्तू होय. साराश, आहार्य द्रव्ये रसावस्थेत विद्रुत झाल्यानंतर ती पुनश्च मांसरूपात अभिव्यक्त होण्याच्या पूर्वी रसावस्थेतील विद्रुत परमाणूंत संघीभावोत्पादक गुणाचा प्रादुर्भाव ज्या अवस्थेत होतो त्या अवस्थेला रक्तधातू ही संज्ञा असून ती

अनुक्रमणिका

अर्थसूचकही आहे. अशा या रक्तात सूक्ष्मातिसूक्ष्म सोतसांतून संचार करण्याची क्षमता स्वभावतःच असत नाही, ती रसात संभवते. अर्थात् अभिसरण होते ते रसाचे, रक्ताचे नव्हे.

**शरीराच्या जीवन–व्यापारात त्रिदोषांचा संबंध**

अशा प्रकारे उत्सर्जन, श्वसन, पचन, पोषण इत्यादि सर्व शारीरिक क्रिया दोषानुबद्ध म्हणजे वातादि त्रिदोषांमुळेच घडून येणाऱ्या असतात हे आतापावेतो केलेल्या विवेचनावरून स्पष्ट होईल. शकृत्, मूत्र, स्वेद हे प्रमुख व नासानेत्रादिकांतील बाकीचे अशा सर्व मलांच्या उत्सर्जनाला वायूच कारणीभूत होतो. त्या त्या स्थानातील स्रोतसांना प्रेरित करून तो हे कार्य घडवून आणतो. तसेच हस्तपादादींचे आकुंचन–प्रसरण, अन्नाचे चर्वन, त्याचा अंतःप्रवेश, वाक्प्रवृत्ती, त्याचप्रमाणे निरनिराळ्या आशयांच्या स्रोतसांच्या नानाविध हालचाली या सर्व क्रियांचे चालकत्वही वायूकडेच असते. इतकेच नव्हे तर शरीरातील परमाणुस्वरूप सूक्ष्म अवयवांना जी संवेदनात्मक आद्य प्रेरणा मिळते–जिला उत्साह असे म्हणतात–तीतही वायूचेच कर्तृत्व असते. कारण तेही एकप्रकारचे चलनात्मक कर्मच होय. ते अव्यक्तरूप असते इतकाच त्यातील विशेष. निरनिराळ्या अवयवांत चालू असणाऱ्या नानाविध क्रिया हे चलनाचे व्यक्त स्वरूप होय. व्यक्त व अव्यक्त या दोन प्रकारांत सर्व चलनात्मक कर्मांचा अंतर्भाव होऊ शकतो हेही यावरून उघड होते.

शरीराच्या जीवनव्यापारात वातदोषाप्रमाणे पित्तकफांचाही असाच संबंध असल्याचे दिसून येते. सर्व चलनात्मक कर्मे जशी वातकर्तृक असतात तशी यच्चयावत् तैजस कर्मे पित्तामुळे आणि संश्लेषणात्मक कर्मे कफामुळे घडून येतात. रसधातूतील द्रव्यांशांचे सारकिट्टविवेचन ज्यामुळे घडून येते ते रक्ताश्रित द्रव्य, रसरक्तादि धातूंना पोषक होणाऱ्या द्रव्यांशांचे सम्यक् पचन करणारे धातुपाचक द्रव्य, अन्न, अन्नरस, रक्त आणि इतर देहधातू या सर्वांचा यथावत् पाक ज्यामुळे घडून येतो ते द्रवरूप द्रव्य, शरीराची कांती, विशिष्ट वर्ण आणि ठराविक उष्णता ज्यामुळे प्राप्त होते आणि बुद्धी, मेधा, अभिमान इत्यादींच्या द्वारे ईप्सित अर्थप्राप्तीत जे साहाय्यक होते, असे केवल उष्मारूप द्रव्य; ही पित्ताचीच नानाविध रूपे होत. तसेच निरनिराळी संधिस्थाने संश्लिष्ट राखणे, अंगोपांगांतील दृढता टिकवून धरणे, शारीर घटकांची निर्मिती करणे, शरीरात शैत्य व सहिष्णुत्व राखून ते सुसंहत ठेवणे, देहपोषक द्रव्यांचे ग्रहण करणे इत्यादि कार्ये सोमगुणी कफामुळे घडून येतात.

तात्पर्य, शरीराच्या विभिन्न स्थानांत ज्या ज्या म्हणून क्रिया संभवतात त्या सर्वांचा अंतर्भाव चलन, पचन, पोषण या प्रमुख अशा तीनच क्रियांत होत असून या कर्मत्रयीचे कर्तृत्व अनुक्रमे वायू, पित्त व कफ यांच्याकडे असल्याने शरीरातील यच्चयावत् कर्मे ही त्रिदोषकर्तृक असतात हे उघड होय.

———

अनुक्रमणिका

# दर्शन १६—शारीरिक कर्मांतील त्रिविध विकृती

वातादि दोष अविकृत स्थितीत असले म्हणजे शरीराला उपकारक होतात. परंतु, त्यांत विकृती उद्भवली म्हणजे त्यांच्यामुळेच नानाविध रोगांचा प्रादुर्भाव होतो. 'वायुः पित्तं कफश्चेति त्रयो दोषाः समासतः । विकृताऽविकृता देहं घ्नंति ते वर्ययन्ति च । '[अ. हृ.] या वचनातून वाग्भटाचार्य हेच सांगतात. विकृती म्हणजे वैषम्य, स्वभावविरोधी कर्म. दोष विकृत झाल्याने शरीराच्या स्वाभाविक कर्मांत जी विकृती उत्पन्न होते तिचे सामान्यतः तीन प्रकार संभवतातः (१) ऱ्हास (२) वृद्धी व (३) वैपरीत्य. स्वाभाविक क्रियेत न्यूनत्व निर्माण होणे म्हणजे ऱ्हास, आधिक्य उत्पन्न होणे म्हणजे वृद्धी आणि स्वाभाविक क्रियेच्या विरुद्ध क्रिया होणे म्हणजे वैपरीत्य. या प्रकारांनाच आयुर्वेदीय ग्रंथांत अनुक्रमे हीनयोग, अतियोग व मिथ्यायोग या नांवांनी संबोधण्यात आले आहे. वातादि दोष हीनातिमिथ्यायोगांनी अभिभूत झाले की शारीर कर्मांतही ते हीनातिमिथ्यायोग उत्पन्न करतात असे तदनुसार म्हणता येईल. दोषांच्या हीनामिथ्यादि योगांमुळे शारीर क्रियांत पुढीलप्रमाणे वैषम्य आढळून येते.

### ऱ्हास

वायू क्षीण झाला म्हणजे शरीरातील उत्साह कमी होतो व सर्व प्रकारच्या गतिस्वरूप कर्मांतही क्षीणता उत्पन्न होते; पित्त क्षीण झाले की अग्निमांद्य उद्भवते व समस्त शरीरातील उष्णताही कमी होते आणि कफदोषात क्षीणता उद्भवली म्हणजे मुख्यतः संधींच्या व पर्यायाने समस्त गात्रांच्या ठिकाणी शैथिल्य निर्माण होते.

### वृद्धी

या उलट, वायूची अभिवृद्धी झाली की रूक्षता म्हणजे त्वचादिकांत शुष्कता उत्पन्न होणे, स्निग्ध गुणांचा ऱ्हास झाल्याने सामर्थ्याचा क्षय होणे, शरीर कृश होणे, झोप कमी येणे, ग्लानी वाटू लागणे, त्वचेवर काळेपणा येणे, मलबद्धता उत्पन्न होणे, इत्यादि विकार उद्भवतात तर पित्ताच्या अभिवृद्धीमुळे मल, मूत्र व डोळे यांवर पिवळेपणा येतो व मुख्यतः सर्व अवयवांत दाह उत्पन्न होतो. दाह म्हणजे अनवस्थितत्व अथवा एक प्रकारची असहिष्णुता. सुसंघटित होऊन राहणाऱ्या शारीर घटकांत उष्णतेची व तीक्ष्णतेची अमर्याद प्रमाणात वाढ झाली म्हणजे एकमेकांचा सहवास त्यांना असह्य होतो, ते संत्रस्त होतात. या त्यांच्या संतापालाच दाह म्हणतात. पित्त अधिक प्रमाणात वाढले म्हणजे तो उद्भवतो हे वर आलेच. कफाची वाढ झाली की, अग्निमांद्य, अनुत्साह, तंद्रा [उत्साह कमी झाल्यामुळे जागृत अवस्थेतही निद्रिताप्रमाणे जी अकर्मण्यता उत्पन्न होते तिला तंद्रा म्हणतात. (इंद्रियार्थेष्वसंप्राप्तिर्गौरवं जृंभणं क्लमः । निद्रार्तस्येव यस्येहा तस्य तंद्रां विनिर्दिशेत् ॥ सु. सं.)], शीतगात्रत्व, निद्राधिक्य, त्वचादिकांवर पांढरेपणा येणे. इत्यादि विकार उद्भवतात.

### वैपरीत्य

वैपरीत्य हा विकृतीचा तिसरा प्रकार आहे. दोषांची वाढ अयथावत् प्रमाणात झाली की विभिन्न ठिकाणी जे क्रियावैषम्य संभवते तेच हे वैपरीत्य होय. व्याधी त्यालाच म्हणतात. अर्थात् दोषांच्यावाढीप्रमाणे त्यांची क्षीणताही क्रियावैषम्याची उत्पादक असली तरी रोगकर्तृत्व मात्र वृद्ध दोषांकडेच असते. दोषांत

अनुक्रमणिका

क्षीणता आली की, त्यांच्याकडून आपापली स्वाभाविक कर्मेही जेथे यथावत् होत नाहीत तेथे त्यांच्याकडून रोगांची उत्पत्ती होणे शक्यच नसते.

वातादि दोषांच्या रूक्षस्निग्धादि गुणांत व उत्सर्जनादि कर्मांत न्यूनता आली अथवा आधिक्य उद्‌भवले म्हणजे अनारोग्य अथवा अस्वास्थ्य निर्माण होते. परंतु, ज्यात पीडा किंवा वेदना होते असा रोग होण्यासाठी दोषांच्या गुणकर्मात वैपरीत्यच उत्पन्न व्हावे लागते. रोग या शब्दाची निरुक्तीही त्या दृष्टीने सूचक आहे. जो रुजा म्हणजे पीडा देतो तो रोग ['रुजंतीति रोगाः']. वातादि दोष क्षीण झाले म्हणजे त्यांच्या गुणकर्मांचाहीक्षय होतो. उलट दोषांची प्रमाणाबाहेर वाढ झाली म्हणजे त्यांच्या गुणकर्मांचीही वृद्धी होते. उदाहरणार्थ, पचनकर्तृक पित्त क्षीण झाले तर पचनक्रियेत क्षीणता येते आणि तेच अयथावत् प्रमाणात वाढले म्हणजे पचन अधिक शीघ्र अथवा अतिरिक्त प्रमाणात होऊ लागते. परंतु, दोषांच्या विभिन्न स्थानांतील गुणकर्मांत वैपरीत्य अथवा विपर्यस्तता तेव्हाच निर्माण होते की, जेव्हा वातादींचा प्रकोप होतो. कोप म्हणजे आपले स्थान सोडून अन्यत्र गमन करण्याची प्रवृत्ती वाग्भटाचार्यांनी उन्मार्गगामिता या शब्दाने तिचा निर्देश केला आहे ['कोपस्तून्मार्गगामिता' अ. हृ.] दोष कुपित झाले असे जेव्हा म्हणण्यात येते तेव्हा त्यांच्यात हीच प्रवृत्ती उत्पन्न झालेली असते. 'असे प्रकुपित दोष शरीराच्या निरनिराळ्या भागांत जाऊन निरनिराळे विकार उत्पन्न करतात'['एवं प्रकुपितास्तांस्तान् शरीरप्रदेशानागम्य तांस्तान् व्याधीन् जनयन्ति' सु. सं.] आणि 'प्रकोपणविशेष व दूष्यविशेष यांच्या योगाने त्यांच्यात प्रकारही बरेच संभवत असल्याने ते खरोखर अपरिसंख्येयच होत'['प्रकुपितास्तु खलु प्रकोपणविशेषात् दूष्यविशेषाच्च विकारविशेषानभिनिर्वर्तयन्ति अपरिसंख्येयान्'–च. सं.], असे आर्ष ग्रंथांत आणखी सांगितले आहे [हा सर्व विषय चरकसंहितेत पुढीलप्रमाणे आढळून येतो. 'वातादि दोषांची वाढ झाली की त्यांची लक्षणे स्वशक्त्यनुसार प्रव्यक्त रूपे धारण करतात, उलट ते क्षीण झाले त्यांच्या लक्षणांतही अस्फुटता येते, परंतु, दोष साम्यावस्थेत असले म्हणजे मात्र आपापली स्वाभाविक कर्मे योग्य रीतीने करीत असतात. पित्त स्वाभाविक अवस्थेत पचनाचे कार्य करते, परंतु तेच प्रकुपित झाले म्हणजे मात्र विविध विकार त्यापासून निर्माण होतात. प्रकृतावस्थेत श्लेष्मा शक्तिस्वरूप असतो पण विकृतावस्थेत तोच मलरूप होतो. स्वाभाविक स्थितीत ज्याला ओज म्हणतात त्यालाच विकृतावस्थेत पाप्मा म्हणजे पाप म्हणून संबोधतात. वायूचीही स्थिती अशीच आहे. शरीरातील सर्व हालचाली त्याच्याचमुळे घडून येतात. प्राणिमात्रांचा प्राण तोच मानण्यात आला आहे. तथापि, शरीरातील समस्त विकारांच्या निर्मितीला इतकेच नव्हे तर मृत्यूलाही तोच कारणीभूत होतो.' ('दोषा. प्रवृद्धाः स्वं लिंगं दर्शयन्ति यथाबलं । क्षीणा जहति लिंगं स्वं समाः स्वं कर्म कुर्वते' । .......... 'पित्तादेवोष्मणः पक्तिर्नराणां उपजायते । तच्च पित्तं प्रकुपितं विकारान् कुरुते बहून् । प्राकृतस्तु बलं श्लेष्मा विकृतो मल उच्यते । स चैवोजः स्मृतः काये स च पाप्मोपदिश्यते । सर्वा हि चेष्टा वातेन स प्राणः प्राणिनां स्मृतः । तेनैव रोगा जायते तेन चैवोपरुध्यते' । च. स.)].

### प्रत्येक दोषजन्य विकृतीतील समानता

दोषांचा कोप झाल्याने उद्‌भवणारे विकार याप्रमाणे अनेक आणि अनेकविध असले तरी त्यांतही एक प्रकारची समानता आढळून येते. सुईने टोचल्यासारख्या वेदना होणे (तोदन), अंग फुटल्यासारखे वाटणे (भेदन), सळईने किंवा दाभणाने टोचल्याप्रमाणे पीडा होणे (व्यधन), स्नायुपेशी आदींना ओढ लागल्यासारखी वाटणे (संकोच), हातपाय वगैरे वळल्यासारखे वाटणे (वेष्टन), कंप सुटणे, पापण्यांचे वगैरे स्फुरण होणे (स्पंदन), निरनिराळे अवयव आखडणे (स्तंभन), मलमूत्रादिकांचा अवरोध होणे (विबंध), इत्यादि विविध विकारांचा प्रादुर्भाव वायूच्या प्रकोपामुळे होत असला तरी त्या सर्वांत शूल सामान्यत्वाने विद्यमान असतोच. सर्व वातविकार शूलाचेच विविध प्रकार होत असेही म्हणता येईल. वातकोपोद्‌भव विकृतीत शूलाचे प्राधान्य असते असे म्हणूनच मानण्यात येते.

पित्तकफोद्‌भव विकारांतही असाच प्रकार आढळून येतो. पित्तविकारांत दाहाचे प्राधान्य असते तर श्लेष्मविकारांत शोथ प्रमुख असतो. सर्व शरीरात अथवा शरीराच्या एखाद्या विशिष्ट भागात दाह होणे, दाहाचाच अतिरेक झाल्याने मांसादि द्रव्यांत सडण्याकुजण्याची क्रिया सुरु होणे (कोथ), रक्तादिकांचा

स्राव होणे, स्वेदोद्‌गम होणे, शरीराच्या अन्यान्य विभागांचा पाक होणे [पित्तप्रकोपामुळे निरनिराळ्या अवयवांतील मांसादि घटकांत पिकण्याची व फुटून विशीर्ण होण्याची क्रिया होऊ लागते. हाच पाक.] इत्यादी विकार पित्ताचा प्रकोप झाल्यामुळे संभवतात तर श्लेष्मा प्रकुपित झाला की शोध, विबंध, कठिणता, उपलेप, शैत्य इत्यादि विकार उद्‌भवतात ['शोथ' म्हणजे सूज; मांसादि धातूंचा एकाच ठिकाणी अयथावत् संचय झाला की त्या जागी उत्सेध–उंचवटा– उत्पन्न होतो. हाच शोथ. संचयामुळे रसादिकांच्या स्वाभाविक अभिसरणात जो अडथळा निर्माण होतो त्याला 'विबंध' म्हणतात. 'कठिणता' म्हणजे कठिणस्पर्शवत्त्व. शोथावस्थेत संचयाचा अतिरेक झाला म्हणजे त्याचा उद्‌भव होतो. 'उपलेप' म्हणजे लिप्तता. सुजलेल्या जागी स्निग्धगुणाचे आधिक्य झाले की ती उत्पन्न होते. परंतु, असे असले तरी पित्तप्रकोपोद्‌भव दाहकोथादि विकार हे जसे दाहाचे तसेच श्लेष्मप्रकोपोत्पन्न शोथविबंधादि विकार हे शोथाचेच विविध आविष्कार होत.

शरीरात चालणाऱ्या प्रमुख स्वाभाविक क्रिया चलन, पचन व पोषण याप्रमाणे त्रिविध असून उपरिनिर्दिष्ट शूल, दाह व शोथ म्हणजे अनुक्रमे त्यांच्याच विक्रिया किंवा विकृती होत. शरीराच्या निरनिराळ्या विभागांत जी नैसर्गिक कर्मे चालू असतात त्या सर्वांचा समावेश चलन, पचन व पोषण या तिघांतच होतो. आणि म्हणूनच अन्यान्य स्थानांत उद्‌भवणाऱ्या विविध व्याधींचा अंतर्भावही शूल, दाह व शोथ या तीन प्रमुख विकारांत करता येते. 'वायूविना शूल, पित्ताविना दाह व कफाविना शोथ संभवत नाही', हे वाग्भटांचे वचन ['शूलं नर्तेऽनिलात् दाहः पित्तात् शोफः कफोदयात्' –अ. हृ.] या संदर्भात अवश्य ध्यानात ठेवण्याजोगे आहे.

### कुपित दोषांचे परिणाम

सर्व विकारांचा ज्यांत अंतर्भाव होतो त्या शूलादिकांचे थोडे सूक्ष्म अवलोकन करणे येथे इष्ट होईल. वायूची गती अविकृत अवस्थेत अप्रतिहत असते. त्या स्थितीत निरनिराळ्या स्रोतसांना म्हणजे अभिवहनमार्गांना तो संचालित करतो; त्यांना आकुंचनप्रसरणरूप हालचाल करण्यास प्रवृत्तकरतो आणि त्यायोगे उत्सर्जनादि विविध क्रिया सम्यक् रीतीने घडून येतात. कित्येक वेळी असे होते की, स्रोतसांत शुष्कता उत्पन्न झाल्यामुळे त्यांचा एक तर संकोच तरी होतो अथवा त्यांतून अभिवहन करणारी द्रव्ये त्यांत अधिक प्रमाणात संचित तरी होतात. यांपैकी काहीही घडले तरी त्यामुळे स्रोतसांचा अवरोध होतो आणि परिणामी त्यांतून अव्याहत संचार करणाऱ्या वायूला प्रतिबंध निर्माण होतो. चलनस्वभावी अथवा गतिशील वायूला हा अडथळा सहन होत नाही; तो कुपित होतो आणि स्वाभाविक मार्गातील स्रोतसांत प्रतिबंध झाल्याकारणाने आपल्या हालचालीसाठी तो अस्वाभाविक मार्गाचा अवलंब करतो. वायूची उन्मार्गगामिता ती हीच, तीमुळे ज्याच्यापासू स्रोतसांची निर्मिती होते त्या पेशींत म्हणजेच निरनिराळ्या मांससंघातांतच पीडा अथवा वेदना उत्पन्न होते. शूल तिलाच म्हणतात. हा शूल अथवा ही वेदना अनेक रूपांनी आविष्कृत होते, कारण ती ज्यात उद्‌भवते त्या पेशी स्वरूपशः अनेकविध असतात.

शूल जसा वायूच्या वैषम्यामुळे उद्‌भवतो तसा पित्ताच्या वैषम्यामुळे दाह संभवतो. उपयुक्त आहाराचे व रसरक्तादि धातूंचे आपल्या विशिष्ट गुणांनी पृथक्करण करून त्यांतील सारभाग मलभागापासून वेगळा करणे हे अविकृत स्थितीतील पित्ताचे कार्य होय. पचन त्यालाच म्हणतात. परंतु, हेच पित्त जेव्हा दूषित होते तेव्हा ते आहाराला व धातूंनाही दूषित करते. पित्त दूषित अथवा कुपित झाले की पचनात तीक्ष्णता येते. ज्या ठिकाणी अशी स्थिती निर्माण होते तेथील मांसादिकांच्या घटकांत एकमेकांपासून फुटून निघण्याची प्रवृत्ती उत्पन्न होते. परस्परांचा सहवास त्यांना तापदायक होतो. त्यांच्या या संतापालाच दाह म्हणतात. निरनिराळ्या स्थानांत पाक होणे, कोथ होणे, तसेच धात्वादिकांत विदग्धता व अतिताप उत्पन्न होणे इत्यादि विकार म्हणजे या दाहाचेच विविध आविष्कार होत.

अनुक्रमणिका

आता शोथ म्हणजे काय ते पाहू. आहारातून घेतलेल्या पोषक द्रव्यांशाचा यथावत् प्रमाणात संग्रह करणे आणि पोष्य द्रव्ये व पोषक अंश यांतील संश्लेषण अवश्य तोपावेतो टिकवून धरणे हे कफाचे स्वाभाविक कार्य. त्याचे पोषणकर्म ते हेच. परंतु, कित्येक वेळी त्यात विपरीतता संभवते. कधी पोषक द्रव्यांचा संग्रह अवश्यकतेहून अधिक प्रमाणात होतो तर कधी त्यांतील किट्टांश शरीराबाहेर योग्य प्रमाणात उत्सर्जित होत नाहीत, अथवा रसादि धातूंचे एका स्थानाहून अन्य ठिकाणी जे प्रक्षेपण व्हावयाचे तेच एखाद्या प्रसंगी उचित प्रमाणात होत नाही. आणि यांपैकी काहीही घडून आले म्हणजे अतिरिक्त प्रमाणात संगृहीत झालेल्या पोषक अंशांचा विशिष्ट ठिकाणी संचय होतो. हा संचय म्हणजेच शोथ. पोषक अंशांचेवास्तव्य कोणत्याही ठिकाणी मर्यादित काळ असणे हेच केव्हाही उचित. तो काळ उलटला की तेच अंश तेथे भारभूत व्हावेत हे स्वाभाविकच होय.

तात्पर्य, शरीराच्या निरनिराळ्या भागांत मिळून अनेक व अनेकविध रोगांचा प्रादुर्भाव होतो; त्यांच्या लक्षणांतही विभिन्नता आढळते; आणि स्थानलक्षणादि भेदांना अनुसरून ज्वर, राययक्ष्मा इत्यादि निरनिराळ्या नांवांनी त्यांचा निर्देशही करण्यात येतो, हे खरे असले तरी शूल, दाह व शोथ या प्रमुख अशा तीन विकारांतच ते सर्व अंतर्भूत होतात. त्यांपैकी शूलात्मक विकृतीत वायूचा प्रकोप हे कारण असते, पित्ताच्या प्रकोपातून दाहात्मक विकारांचा उद्भव होतो आणि शोथप्रधान रोग हे श्लेष्मकोपजनित असतात. शूलप्रधान, दाहप्रधान व शोथप्रधान विकृतींचा अनुक्रमे वातोद्भव, पित्तोद्भव व कफोद्भव विकृती असा उल्लेख म्हणूनच करण्यात येतो. अर्थात् असे असले तरी शूलात्मकता, दाहात्मकता व शोथात्मकता हेच या विकारांचे वास्तविक स्वरूप असते हे यावरून उघड होय. शरीरात चालू असणाऱ्या सर्व क्रियांप्रमाणे समस्त विक्रिया म्हणजे विकृती देखील त्रिदोषमूलक असतात, हेही यावरून स्पष्ट होते.

शरीरात उद्भवणाऱ्या नानाविध रोगांचे शूलात्मक, दाहात्मक व शोथात्मक असे प्रमुख भेद ज्याप्रमाणे तीन संभवतात त्याचप्रमाणे प्रत्येक रोगात आमावस्था, पच्यमानावस्था व पक्वावस्था अशा तीन अवस्था आढळून येतात. अर्थात् त्यांतही वातपित्तकफांचाच संबंध असतो.

**आमाचे स्वरूप**

रोगांच्या आमादि अवस्था विशद करण्यापूर्वी आम म्हणजे काय हे पाहिले पाहिजे. आम म्हणजे अपक्व, विकृत असे द्रव्य. आहार्य द्रव्यांचे जठराग्नीकडून व रसादि धातूंचे धात्वग्नींकडून पचन होत असताना त्यांतील काही अंश अपाचित राहतात. अपचनाचा अथवा अयोग्य पचनाचा परिणाम म्हणून या अंशांत विकृती उत्पन्न होते. व त्यामुळे निरनिराळ्या रोगांचा प्रादुर्भाव होतो. या अपाचित व रोगकारक द्रव्यांशांनाच आम या संज्ञेने उल्लेखिण्यात येते [रोगांची उत्पत्ती आमापासून होते असे येथे म्हटले. वातादि दोष हेच वस्तुतः रोगोत्पादक होत हे खरे असले तरी चलन, पचन व पोषण या त्यांच्या क्रियांत वैषम्य उत्पन्न झाले म्हणजे त्यापासून जे आमद्रव्य निरनिराळ्या स्थानांत तयार होते त्याच्याच योगाने निरनिराळ्या स्थानी निरनिराळे रोग अभिव्यक्त होतात.] अर्थात् पचनसंस्थानातील अपक्व व विकृत अन्नाप्रमाणे शरीरातील कोणतेही अपक्व व विकृत द्रव्यसुद्धा आमच होय. अपक्व आहाराप्रमाणे विपाचित न झालेले व म्हणूनच विकृत झालेले धातू देखील विकारोत्पादक होतात. रसरक्तादि धातू दुषित झाले की, कोणकोणते विकार उत्पन्न होतात त्यांचे वर्णन म्हणूनच करण्यात आले आहे.

अन्नाविषयी अश्रद्धा होणे, अरुची म्हणजे पदार्थाची रुची विपरीत भासणे, मुखवैरस्य म्हणजे तोंड कडू, खारट वगैरे होणे, अरसज्ञता म्हणजे तोंड बेचव होणे, हृल्लास (मळमळ), जाड्य, सुस्ती (तंद्रा), अंगमर्द, ज्वर आदि विकार रसदोषापासून उद्भवतात; कुष्ठ, विसर्प, पिडका, रक्तपित्त, प्रदर इत्यादी

अनुक्रमणिका

रक्तदोषापासून संभवतात; मांसदुष्टीमुळे अग्निमांद्य, अर्बुद, कीलक, गलशालूक, शुंडिका इत्यादी विकार होतात. प्रमेहादि विकार मेदोदुष्टीपासून होतात; अस्थिदोषामुळे अध्यस्थी, अधिदंत आदि विकार होतात; पर्वपीडा, भ्रम, मूर्च्छा आदि विकार मज्ञादुष्टीमुळे प्रादूर्भूत होतात तर क्लैब्य, निरुत्साह वगैरेंचा उद्‌भव शुक्रदोषामुळे होतो, असे चरकसंहितेत सांगितले आहे. ['अश्रद्धा चारुचिश्चास्यवैरस्यमरसज्ञता। हृल्लासो गौरवं तंद्रा सांगमर्दो ज्वरस्तमः : .......... कुष्ठवीसर्पपिडकारक्तपित्तमसृक्दरः। ......... अधिमांसार्बुदं कीलं गलशालूकशुंडिके। ......... निंदितानि प्रमेहाणां पूर्वरूपाणि यानि च। ...अध्यस्थिदंतौ दंतास्थिभेदशूलं विवर्णता। ... रुक् पर्वणां भ्रमो मूर्च्छा दर्शनं तमसस्तथा। ...... शुक्रस्य दोषात् क्लैब्यमहर्षणम् ......।'च. सं.]

आम म्हणजे काय ते सांगताना वाग्भटाचार्य म्हणतात—'आमाशयात आद्य असा जो रसधातू त्याचे अग्नीच्या क्षीणतेमुळे पचन योग्य तऱ्हेने न झाले म्हणजे तो दूषित होतो. अशा अविपाचित व दुष्ट रसधातूलाच आम म्हणतात' ['ऊष्मणोऽल्पबलत्वेन धातुमाद्यमपाचितम्। दुष्टमाशयगतं रसमासं प्रचक्षते।।'—अ. हृ.] या वचनातील आमाशय या शब्दाचा अर्थ आमाचे म्हणजे अविपक्व द्रव्याचे आश्रयस्थान असा करावयास हवा. कारण, आमाशयगत हे विशेषण रसाला अन्वर्थक ठरणारे नाही. रसधातू आमाशयात नसतोच. 'हृदयात राहणाऱ्या व्यानवायूकडून रसधातूचे समस्त शरीरात सर्वत्र व सदैव विक्षेपण होत असते' ['व्यानेन रसधातुर्हि विक्षेपोचितकर्मणा। युगपत् सर्वतोऽजस्त्रं देहे विक्षिप्यते सदा॥' —अ. हृ.], हे वाग्भटांचे वचन लक्षात घेता रसधातूचे स्थान हृदय सांगितले असल्याचे स्पष्ट होते. उपरिनिर्दिष्ट वचनातील 'आद्यरस' याचा अर्थ आहाराचा रस अथवा अन्नरस असा स्वीकारला तरी तो देखील आमाशयगत असतो असे म्हणता येणार नाही. इतकेच नव्हे तर आमाशय या शब्दाने कधी कधी ज्याचा निर्देश करण्यात येतो ते क्षुद्रांत्र म्हणजेही अन्नरसाचे स्थान नव्हे. कारण क्षुद्रान्त्राच्या सूक्ष्म स्रोतसांतून आहारातील अंश प्रसृत झाले म्हणजे मगच त्यांना आहाररसत्व प्राप्त होते. महास्रोतसाचा जो कोणत्याही प्रकारे अवयव नव्हे त्या अवयवाचाही निर्देश वाग्भटाचार्यांनी आमाशय या शब्दाने केलेला आहे. 'रसात रंजकता उत्पन्न करणारे आमाशयाश्रयी पित्त म्हणजे रंजकपित्त होय' ['आमाशयाश्रयं पित्तं रंजकं रसरंजनात्' —अ. हृ.] असे ते म्हणतात. रसरंजनाचे हे कार्य यकृत्प्लीहेत घडून येते. 'आप्य रस यकृत्प्लीहेत आला की त्याला रंजकता प्राप्त होते' ['स खलु आप्योरसः यकृत् प्लीहानौ प्राप्य रागमुपैति' सु. सं.] हे सुश्रुतांचे वचनच त्याला प्रमाण आहे अर्थात वरील वचनातील आमाशय म्हणजे यकृत् व प्लीहा हे अवयव होत. सुश्रुतसंहितेत विषमज्वराच्या वर्णनात आणखी एक आमाशय सांगितलेला दिसतो. 'तो दोष दिन प्रतिदिन एका ठिकाणाहून अन्य ठिकाणी जात असताना आमाशयात आला म्हणजे ज्वर उत्पन्न करतो' ['अहोरात्रादहोरात्रात् स्थानात् स्थानं प्रपद्यते। ततश्चामाशयं प्राप्य दोषः कुर्यात् ज्वरं नृणाम्' —सु. सं.] असे सुश्रुताचार्य जेव्हा म्हणतात तेव्हा आमाशय या शब्दाने आमसंज्ञक द्रव्यांचे वास्तव्य ज्यात प्रसंगोपात्त संभवते असा रसरक्तादिकांपैकी कोणता तरी एखादा धातू त्यांना अभिप्रेत आहे. कारण विषमज्वराची उत्पत्ती आमाशयगत दोषामुळे होत नाही. तो धातुगत दोषामुळे संभवतो. 'जिचा ज्वर निघून गेला आहे अशा व्यक्तीच्या शरीरात अवशिष्ट राहिलेला अल्प दोषही, अहितकारक आहारविहारामुळे अभिवृद्ध होतोव सप्तधातूंपैकी कोणत्या तरी धातूत प्रवेश करून विषमज्वर उत्पन्न करतो' ['दोषोऽल्पोऽहितसंभूतो ज्वरोत्सृष्टस्य वा पुनः। धातुमन्यतमं प्राप्य करोति विषमज्वरम्' —सु. सं.]'हा दोष धातुगत असला म्हणजे सूक्ष्मतेमुळे सहजासहजी ध्यानात येत नाही' ['धान्वन्तरस्थो लीनवात् न सौक्ष्म्यादुपलभ्यते'। सु. सं.] ही सुश्रुतसंहितेतील वचनेच तसे सुचवीत आहेत. अर्थात् सुश्रुतोक्त विषमज्वराच्या वर्णनातील आमाशय म्हणजे योग्य पचनाच्या अभावी आमत्व प्राप्त झालेल्या द्रव्याला आश्रयभूत होणारा विशिष्ट धातू अथवा विशिष्ट स्थान होय, हे स्पष्ट आहे. परंतु, असे न मानता वरील वचनातील आमाशय म्हणजे विशिष्ट अवयव होय असे स्वीकारले तर ज्यात कोष्ठाची विकृती नसते अशा रोगांची आमावस्था कशी संभवते याचे स्पष्टीकरण करता येणार नाही. अर्थात् आम म्हणजे अपाचित द्रव्य, मग ते शरीराच्या कोणत्याही भागात असो, हे यावरून उघड होते.

अनुक्रमणिका

**आद्य व रसरूप धातू**

'आम म्हणजे आद्य व रसरूप असा अपाचित धातू'['........धातुमाद्यमपाचितम्। ... ... ...रसमामं प्रचक्षते'।–अ. हृ.], असे वाग्भटाचार्य म्हणतात. 'आद्य' व 'रसरूप' ही यातील दोन विशेषणे अर्थपूर्ण आहेत. रसापासून रक्त, त्यापासून मांस या क्रमाने धातूंची उत्पत्ती होत असताना पूर्व धातूचे स्वरूप नष्ट झाल्यानंतर आणि उत्तर धातूचे स्वरूप प्राप्त होण्यापूर्वी प्रत्येक पूर्वधातूतून जो रसरूप सारभाग तयार होतो – जो परिणत रूपातील उत्तर धातूचा आद्य किंवा पूर्वभागच असतो – तोच वाग्भटाचार्यांना या ठिकाणी अभिप्रेत असला पाहिजे. किंबहुना, ही कल्पना स्पष्ट व्हावी यासाठीच आद्य व रसरूप हे दोनही शब्द त्यांनी योजलेले दिसतात. अन्यथा रसादि सात धातूंतील आद्य धातू रसच असल्याने कोणताही एक शब्द योजणे पुरेसे असताना दोनही शब्द योजणे निरर्थकच मानावे लागेल.

**विकारोत्पादक द्रव्य**

अविपाचित अथवा अयथाविपाचित अशा आहाररसाला आम म्हणतात हे वर पाहिलेच. शरीरातील कोणतेही विकृत वा विकारोत्पादक द्रव्य, मग ते धातुरूप असो वा उपधातुरूप असो, त्यालाही आम हीच संज्ञा देण्यात आली आहे. 'जठराग्नीच्या अथवा धात्वग्नीच्या क्षीणतेमुळे योग्य तऱ्हेने विपाचित न झालेला व म्हणूनच ज्यात दूषितता उत्पन्न झाली आहे असा आमाशयगत आद्य रसधातू म्हणजे आम होय'['ऊष्मणोऽल्पबलत्वेन धातुमाद्यमपाचितम्। दुष्टमामाशयगतं रसमामं प्रचक्षते॥–' अ. हृ.], असे अष्टांगहृदयात म्हटले आहे. यापूर्वीही त्याचा निर्देश करण्यात आला असून आम ही संज्ञा या ठिकाणी अपक्व असा आहाररस आणि रसरक्तादि धातूंचे अविपाचित अंश यांची वाचक होय, हेही स्पष्ट करण्यात आले होते. आमासंबंधी आणखीही एका मताचा उल्लेख वाग्भटाचार्यांनी केला आहे. तदनुसार, 'भिन्नजातीय हरिकांच्या मिश्रणापासून विषाची उत्पत्ती व्हावी त्याप्रमाणे अत्यंत प्रकुपित झालेल्या वातादि दोषांच्या मिश्रणापासून आमाची निर्मिती होते, असे काही आचार्यांचे म्हणणे आहे'['अन्ये दोषेभ्य एवातिदुष्टेभ्योऽन्योन्यमूर्च्छनात्। कोद्रवेभ्यो विषस्येव वदन्त्यामस्य संभवम्॥' – अ. हृ.]सारांश, शारीर धातू ज्यामुळे दूषित होतात, नानाविध व्याधींचा ज्याच्या योगाने प्रादुर्भाव होतो आणि शरीराच्या पोषणाला ज्याचा काही उपयोग होत नाही, उलट मलरूपामुळे अथवा मलोत्पादकतेमुळे ज्याचे उत्सर्जन करणेच इष्ट व अवश्य असते, असे कोणतेही द्रव्य म्हणजे आम होय. मग ते अयोग्य पचनामुळे विदग्धता प्राप्त झालेले पण शरीरगत म्हणजे शारीर द्रव्यांपासून शरीरातच तयार झालेले असो, किंवा क्षारशुक्तादि वस्तु अथवा दुर्जर दूषित अन्न याप्रमाणे शरीराला स्वभावतःच अपथ्यकर होणारे एखादे शरीरबाह्य द्रव्य असो. ज्याच्या योगाने रसरक्तादि धातूंची उत्पत्ती वा अभिवृद्धी होत नाही, उलट नानाविध रोगांचा मात्र ज्यामुळे प्रादुर्भाव होतो, त्या अपकारक वा विकारोत्पादक द्रव्याला आम म्हणावे असा शास्त्रज्ञांचा अभिप्राय आहे.

'समानगुणी द्रव्यांनी शारीर घटकांची अभिवृद्धी होते पण विपरीत गुणी द्रव्यांनी मात्र त्यांत वैपरीत्य निर्माण होते'['वृद्धिः समानैः सर्वेषां विपरीतैर्विपर्ययः' – अ. हृ.], असे वाग्भटाचार्य म्हणतात. 'मधुर, अम्ल, लवण, कटु, तिक्त, कषाय हे सहा रस यथोचित रीतीने सेवन केले तर शरीराला उपकारक होतात. पण अनुचित उपयोगाने तेच दोषांचा प्रकोप होण्याला कारणीभूत होतात'['रसाः तावत् षट् मधुराम्ललवणकटुतिक्तकषायाः। ते सम्यगुपयुज्यमानाः शरीरं यापयन्ति। मिथ्योपयुज्यमानास्तु दोषप्रकोपाय उपकल्प्यन्ते'–। च. सं.], असे चरकाचार्यांचेही वचन आहे. अर्थात् विरुद्धगुणी द्रव्यांनी शारीर कर्मांत वैपरीत्य उत्पन्न होते हे निश्चित. वर ज्याचे वर्णन केले तो आम

म्हणजेही एक विरुद्धगुणी द्रव्यच असल्याने त्याच्या योगानेही शरीराच्या स्वाभाविक कर्मांत विषमताच उद्‌भवते.

हे आमद्रव्य उपभुक्त आहार्य द्रव्यांच्या गुणधर्मांना अनुसरून दोषांना प्रकुपित करते. म्हणजे असे की, रूक्षादिगुणभूयिष्ठ अशा दूषित आहाराने वायूचा प्रकोप होतो, उलट दूषित आहार उष्णतीक्ष्णादि गुणांनी युक्त असला तर पित्त प्रकुपित होते. दोषांचा प्रकोप करणारा हा आम शरीरात सर्वत्र संचार करीत असतो आणि या संचारात स्थानवैगुण्यामुळे जेथे त्याला प्रतिबंध होतो तेथे रसरक्तादि धातू दूषित करून निरनिराळे विकार तो उत्पन्न करतो.

**सामदोष**

आमद्रव्याची उत्पत्ती जेथे होते तेथील वातादि दोष आमद्रव्य त्यात मिश्र झाल्याने दूषित होतात व त्यांचा संचार शरीरात सर्व ठिकाणी होत असल्याने अन्य दोषभेदांना व धातूंनाही ते दूषित करतात. व्याधिविज्ञानात योजलेली दोष ही संज्ञा स्वाभाविक अवस्थेतील वातादींची नव्हे तर उपरिनिर्दिष्ट आमयुक्त व दूषित अशा वातादींची वाचक होय हे यावरून स्पष्ट होते. उदाहरणार्थ, 'प्रत्येक दोषापासून स्वतंत्रशः, तीनही दोष मिळून आणि भयामुळे व शोकापासून याप्रमाणे सहा प्रकारचा अतिसार संभवतो' ['दोषैर्व्यस्तैः समस्तैश्च भयात् शोकाच्च षड्विधः। अतीसारः' –अ. हृ.] अशा प्रकारच्या वचनातील दोष म्हणजे आमयुक्त दोषच समजावयास हवेत. संचय, प्रकोप, प्रसर, स्थानसंश्रय आदि अवस्था ज्या रोगकारक दोषांच्या म्हणून सांगण्यात आल्या आहेत त्या वस्तुतः सामदोषांच्या होत. निराम अवस्थेतील दोषांपासून रोगाचा उद्‌भव होतच नाही. वमनविरेचनादि उपायांनी ज्यांचे निर्हरण शरीरातून करण्यात येते, त्या विजातीय व अपकारक आमद्रव्यांचा उल्लेख कफपित्तादि दोषांच्या नांवानीच करण्यात येतो. इतकेच काय पण रूक्षगुणी व शूलकारक असे जे आमद्रव्य त्याचे नांव वात; तीक्ष्ण, उष्ण आदि गुण ज्यात आहेत असा विदाहोत्पादक आम म्हणजे पित्त आणि स्निग्धगुणी व शोथोत्पादक असा जो आम त्याचे नांव श्लेष्मा, याप्रमाणे आम व दोष हे शब्द व्याधिविज्ञानात तरी एकाच अभिप्रायाने योजण्यात आले असल्याचे दिसून येते.

**यत्र संगः तत्र व्याधिः**

रोग उत्पन्न करणारे हे आमद्रव्य शरीरातील विविध अंगोपांगांपैकी एखाद्यात अवरुद्ध झाले म्हणजे तेथे संचित होते. शोथविकारात अशा प्रकारे ज्यांचा संचय होतो त्या दूषित रसरक्तादींचाही निर्देश विकृतिविज्ञानात दोष या संज्ञेने करण्यात आला आहे. 'शरीरातील कोणत्या तरी विशिष्ट भागात त्वचा व मांस यांच्या आश्रयाने दोष जेव्हा संचित होतात तेव्हा त्या प्रादेशिक वा एकदेशीय संचयाला शोथ म्हणतात' ['त्वङ्मांसस्थायी दोषसंघातः शरीरैकदेशोत्थितः शोफ इत्युच्यते'। –सु सं.] असे सुश्रुताचार्यांनी म्हटले आहे. अर्थात् व्याधिविज्ञानात तरी आमदूषित दोष व दूषित रसरक्तादि या दोघांचाही निर्देश एकाच संज्ञेने करण्यात आल्याचे दिसून येते. 'आकाशात सर्वत्र संचार करणारा मेघ अडथळा निर्माण होतो तेथे ज्याप्रमाणे जलवृष्टी करतो त्याचप्रमाणे शरीरसंचारी रसधातू स्थानवैगुण्यामुळे एखाद्या ठिकाणी अवरुद्ध झाला म्हणजे तेथे विकृती उत्पन्न करतो. एखाद्या ठिकाणी दोषांचा जेव्हा कोप होतो तेव्हा त्याचीही तऱ्हा हीच असते' ['क्षिप्यमाणः स्ववैगुण्यात् रसः सज्जति यत्र सः। करोति विकृतिं तत्र खे वर्षमिव तोयदः। दोषाणामपि चैव स्यात् एकदेशप्रकोपणम्' – च. सं.], असे चरकाचार्य म्हणतात. 'प्रकुपित होऊन सर्व शरीरात संचार करणारे वातादि दोष स्थानवैगुण्यामुळे जेथे

अनुक्रमणिका

अवरुद्ध होतात तेथे रोगांची उत्पत्ती होते'['कुपितानां हि दोषाणां शरीरे परिधावताम् । यत्र संगः स्ववैगुण्यात् व्याधिस्तत्रोपजायते' – सु. सं.], हे सुश्रुतसंहितेतील वचनही याच आशयाचे आहे.

प्रकुपित दोषाचा अथवा आमद्रव्याचा अशा प्रकारे एखाद्या ठिकाणी संचय झाला म्हणजे तेथील रक्तमांसादि धातूंत त्यांचा क्रमशः प्रवेश होतो. कुपित दोषांचा रसरक्तादि धातूंत होणारा हा प्रवेश विचारात घेऊनच ज्वर, कुष्ठ आदि विकारांत रसगत, रक्तरस वगैरे प्रकार सांगण्यात आले आहेत. धातुप्रविष्ट आमाचा धातुगत उष्णतेच्या योगाने नंतर विपाक होऊ लागतो. अर्थात् त्या धातूंच्या पासून आमाचे पृथक्करण होऊ लागते. ते पूर्ण झाले म्हणजे वियुक्त झालेले हे आमद्रव्य शरीराबाहेर उत्सर्जित होते. आणि परिणामी विकाराचा उपशम होतो.

### विकृतीतील विशिष्ट क्रम

विषम आहारादिकांच्या योगाने एखाद्याचे रसरक्तादि धातू दूषित व्हावेत, शरीरातून त्यांचा संचार होत असताना स्थानवैगुण्यामुळे एखाद्या ठिकाणी ते प्रथम अवरुद्ध नंतर संचित होऊ लागावेत, तेथील रक्तमांसादिकांत त्यांचा प्रवेश व्हावा, तत्स्थानीय उष्णतेच्या योगाने नंतर त्या स्थानी सारकिट्टविवेचन सुरु व्हावे आणि पूयावस्था प्राप्त होऊन वियुक्त झालेली ही दूषित द्रव्ये अखेर व्रणमार्गाने किंवा मलमार्गाने शरीरातून निघून जावीत व रोग नाहीसा व्हावा, अशा प्रकारे आम द्रव्य संचित झाल्यापासून ते उत्सर्जित होईपर्यंतच्या क्रिया एका विशिष्ट क्रमाने घडून येतात आणि हा क्रम सर्वच विकारांत आढळून येतो.

### आमादि अवस्था

शरीराच्या कोणत्याहीस्थानातील रक्तमांसादि धातूंत आमसंज्ञक द्रव्याचा संचय होऊ लागणे ही रोगाची आमावस्था असून धातुघटकांत मिश्र झालेले आमद्रव्य धात्वग्नीच्या योगाने विभक्त होऊ लागणे ही पच्यमानावस्था होय. हे विभाजन पक्वावस्थेत पूर्णपणे घडून आलेले असते. धातुघटकांपासून वियुक्त झालेले हे रोगोत्पादक द्रव्य नंतर शकृदादि मलांच्या स्वाभाविक उत्सर्जनमार्गातूनच सामान्यतः उत्सर्जित होत असते. कित्येकदा मात्र हा उत्सर्ग अस्वाभाविक रीतीनेही होतो. त्यालाच व्रण म्हणतात. शोथाच्या रूपाने एखाद्या ठिकाणी संचित झालेला दोष तेथील त्वचेचा भेद करून बाहेर येणे याचेच नांव व्रण.

### विकारातील प्रमुख लक्षणे

शरीरात चालणाऱ्या स्वाभाविक क्रिया चलन, पचन व पोषण याप्रमाणे मुख्यतः तीनच असल्याने त्यांत उद्भवणाऱ्या नानाविध विकृतीतही त्रैविध्यच आढळून येते. तसेच, या सर्व विकारांत संभवणाऱ्या आमादि अवस्थाही तीनच असून निरनिराळ्या विकारांत आढळणाऱ्या लक्षणांचाही अंत र्भाव शूल, दाह आणि शोथ या तीनच प्रमुख लक्षणांत होऊ शकतो. अर्थात् निरनिराळ्या स्थानांत आणि निरनिराळ्या स्वरूपांत आविर्भूत होणारे विकार अनेक आणि अनेकविध असल्याचे दिसत असले तरी त्या सर्वांच्या उत्पत्तीला वायू, पित्त आणि कफ हे तीन दोषच प्रधानत्वाने कारणीभूत आहेत हे उघड होय. 'स्वधातुवैषम्य हे निमित्त घडून आले म्हणजे शरीरात विकारांचा प्रादुर्भाव होतो, हे विकार अनेकविध असतात, परंतु तरीही ते वातपित्तकफांना सोडून असत नाहीत'['स्वधातुवैषम्यनिमित्तजा ये विकारसंघा बहवः शरीरे । न ते पृथक् पित्तकफानिलेभ्य

……’च. सं.; ‘तथा स्वधातुवैषम्यनिमित्तमपि सर्वदा । विकारजातं त्रीन् दोषान्………. (नातिवर्तते)’ । अ. हृ.] असे आचार्यांनी स्पष्टपणे म्हटलेच आहे.

———

अनुक्रमणिका

# दर्शन १७–दोषकोपोद्भव विविध विकार व त्यांचे स्वरूप

प्रकुपित अथवा आमयुक्त असे वातादि दोष समस्त शरीरात संचार करू लागले म्हणजे त्यांच्यापासून निरनिराळ्या स्थानी निरनिराळ्या लक्षणांनी युक्त असे विकार नानाविध संभवतात. त्यांपैकी ८० विकार वातोद्भव, ४० पित्तोद्भव आणि २० श्लेष्मोद्भव होत अशा प्रकार त्यांची दोषानुरूप परिगणनाही प्राचीन ग्रंथांत केलेली आढळते. ['अशीतिवर्तातविकारःचत्वारिंशत् पित्तविकाराः विंशतिः श्लेष्माविकारा इति' –च.सं.]

**८० वातविकार**

चरकसंहितेत वर्णिलेले ८० वातविकार पुढीलप्रमाणे आहेत– (१) नखभेद (नखे फुटणे) (२) पादशूल (पायांच्या तळव्यांचा शूल) (३) पादभ्रंश (एक अथवा दोनही पावले चालताना अपेक्षित ठिकाणी न पडणे ) (४) विपादिका (हात व पाय यांची त्वचा फाटणे असा याचा अर्थ चक्रपाणींनी दिला आहे.) ['बिपादिका पाणिपादस्फुटनम्' –च. सं. व्याख्या] (५) पिंडिकोद्वेष्टन (पोटऱ्या वळणे) (६) सुप्तपादता (पायांच्या तळव्यांना स्पर्श न जाणवणे) (७) वातखुड्डता (पायांच्या तळव्यांना अनेक व्रण होणे) (८) गृध्रसी (या विकारात कटिप्रदेशाचा मागील भाग, कंबर, पाठ, मांड्या, गुडघे, पाय व पावले यांच्या ठिकाणी क्रमशः आखडणे, वेदना होणे, टोचल्याप्रमाणे दुखणे व वरचेवर कंप पावणे ही लक्षणे असतात.) ['स्फिक्पूर्वकटिपृष्ठोरूजानुजंघापदं क्रमात्। गृध्रसीस्तंभरुक्तोदैः गृण्हाति स्पंदते मुहुः' –मा.नि.] (९) जानुभेद (गुढघ्यांच्या सांध्यांत फुटल्याप्रमाणे वेदना होणे) (१०) जानुविश्लेषण (गुडघ्यांचे सांध शिथिल वाटणे (११) ऊरुस्तंभ (मांड्या जड व चलनाक्षम वाटणे) (१२) ऊरुसाद (मांड्यांतील स्पर्शज्ञान कमी वा नष्टप्राय वाटणे) (१३) गुदभ्रंश (गुदद्वारातील पेशी शिथिल होऊन मलोत्सर्जनाचे वेळी बाहेर येणे) (१४) पंगुता (१५) गुदार्ती (गुदद्वारात पीडा होणे ) (१६) वृषणोत्क्षेप (वृषणांचे ऊर्ध्वगमन) (१७) वंक्षणानाह (अंडसंधींचा भाग वायूने फुगणे) (१८) शेफःस्तंभ (जनेंनिद्रय स्तब्ध वा चैतन्यहीन होणे) (१९) उदावर्त (वायूचे ऊर्ध्वगमन) (२०) विड्भेद (मलात पातळपणा येणे) (२१) श्रोणीभेद (श्रोणीभागात फुटल्याप्रमाणे वेदना होणे) (२२) खंजत्व (लंगडेपणा) (२३) वामनत्व (अवयवांच्या संकोचामुळे शरीराला येणारी ऱ्हस्वता) (२४) कुब्जत्व (स्नायूंच्या संकोचामुळे शरीराला येणारी वक्रता) (२५) त्रिकग्रह (त्रिकसंज्ञक भागात आखडणे) (२६) पृष्ठग्रह (पाठ आखडणे) (२७) हृन्मोह (हृदयाची कार्यक्षमता कमी होणे.) [या ठिकाणी हृदय म्हणजे मस्तिष्कसमजणे उचित होय.] (२८) पार्श्वावमर्दक (दोनही बाजूच्या फासळ्यांच्या जागी दाबल्यागत पीडा होणे) (२९) हृद्राव (हृदयाच्या पेशी शिथिल होणे) (३०) उदरावेष्ट (पोट आवळल्या सारखे वाटणे (३१) वक्ष उद्धर्ष (छाती उडणे) (३२) ग्रीवास्तंभ (मानेतील स्नायू आखडणे) (३३) बाहुशोष (हात शुष्क होणे ) (३४) वक्षउपरोध (छाती भरल्यासारखी वाटणे) (३५) कंठोध्वंस (घशात रूक्षता व शुष्कता उद्भवणे) (३६) मन्यास्तंभ (मानेच्या शिरा आखडणे व तेथील संवेदना कमी होणे) (३७) हनुभेदन (हनुवटीच्या जागी फुटल्यागत वेदना होणे) (३८) मूकत्व (शद्बोच्चारातील अक्षमता)(३९) दंतशैथिल्य (दात हलू लागणे) (४०) ओष्ठभेद (ओठ फाटणे) (४१) अरसज्ञता (मधुरादि रसांची संवेदना नाहीशी होणे (४२) दंतभेद (दात फाटणे) (४३) वाक्संग (वाचा बसणे) (४४) कषायास्यत्व (तोंड तुरट होणे) (४५) वक्षस्तोद (उरोभागात टोचल्याप्रमाणे दुखणे) (४६) अक्षितोद (डोळ्यात टोचल्याप्रमाणे दुखणे) (४७) मुखशोष (४८) घ्राणनाश (वास न येणे) (४९) कर्णशूल (५०) अशब्दश्रवण (खोटे शब्द ऐकू येणे) (५१) उच्चैःश्रुती (उच्चस्वरातील ध्वनीच ऐकू येणे) (५२) बाधिर्य (५३) वर्त्मस्तंभ (पापण्यांची उघडझाप न होणे ) (५४) अर्दित (तोंडाचा अर्धा भाग ज्यात वाकडा होतो असा विकार (५५) तिमिर (प्रकाशात देखील अंधाराचा आभास होणे) (५६) वर्त्मसंकोच (पापण्या संकुचित होणे) (५७) अक्षिशूल (डोळे दुखणे) (५८) अक्षिव्युदास (डोळे उघडेच राहणे) (५९)

अनुक्रमणिका

ग्लानी (सर्व गात्रांतील शक्ती गळून गेल्यागत वाटणे) (६०) भ्रूव्युदास भुवया विस्फारित होऊन राहणे) (६१) वेपथुः (कापरे भरणे) (६२) शंखभेद (शंखास्थींच्या जागी फुटल्याप्रमाणे पीडा होणे) (६३) केशभूमिस्फुटन (मस्तकाच्या केसांखालील त्वचेत फुटल्यासारखी पीडा होणे) (६४) शिरोरुजा (मस्तकशूल) (६५) ललाटभेद (कपाळात फुटल्यासारखी वेदना होणे) (६६) एकांगरोग (पक्षाघात) (६७) जृंभा (६८) रौक्ष्य (गात्रे रूक्ष होणे) (६९) सर्वांगरोग (सर्व शरीर लुळे होणे) (७०) आक्षेपक (हस्तपादादि अवयवांना ज्यात आचके बसतात असा विकार) (७१) श्रम (कारणाभावी गळून जाणे) (७२) दंडक (शरीर वा शरीराचा एखादा अवयव दंडवत् ताठ होणे) (७३) विषाद (निरुत्साह) (७४) अतिप्रलाप (बडबडणे) (७५) भ्रम (शरीर वा अंगोपांगे भ्रमल्यागत वाटणे) (७६) श्यावारुणावभासत्व (त्वचा वगैरे काळसर तांबुस होणे) (७७) पारुष्य (त्वचा वगैरे खरखरीत, शुष्क होणे) (७८) हिक्का (उचकी) (७९) अस्वप्न (निद्रानाश) (८०) अनवस्थिती (उभे राहणे, बसणे, झोपणे आदि क्रिया करण्याविषयी एका क्षणात इच्छा तर लगेच दुसऱ्या क्षणात अनिच्छा उत्पन्न होणे).

अर्थात् दूष्यादि भेदांनुसार वातविकारांचे प्रकार असंख्य संभवत असले तरी चरकाचार्यांच्या मतानुसार स्पष्ट स्वरूपात आविष्कृत होणारे वाताविकार वर दिल्याप्रमाणे ऐंशीच होत.

**वातविकारांचे स्वरूप**

या ऐंशी वातविकारांचे स्वरूप सामान्यतः पुढीलप्रमाणे असल्याचे दिसून येते. भेद (फुटल्यागत वाटणे वा फाटणे), तोद (सुया टोचल्याप्रमाणे वाटणे), शूल उद्धर्ष (स्पर्श सहन न होणे), संवेष्ट (आवळल्यासारखे वाटणे) आणि आर्ती अशा प्रकारे ज्यांचा निर्देश वातविकारांत अलग अलग करण्यात आला ते विकार म्हणजे शूलसंज्ञक विकृतीचेच ६ विभिन्न प्रकार होत. ही विभिन्नता स्थानभेदानुसार संभवते. विकारांच्या वरील यादीत काहींचा निर्देश आवेष्ट या संज्ञेने करण्यात आला आहे. उदा. उदरावेष्ट तर काहींचा उल्लेख अवमर्द या नांवाने करण्यात आला आहे. उदा. पार्श्वावमर्द. तसेच, उत्क्षेप आणि संकोच याही आणखी दोन संज्ञा काही रोगात सामान्यपणे आढळून येतात. उदा. वृषणोत्क्षेप व वर्त्मसंकोच. हे चारही प्रकार आकुंचनोद्भूत होत. पेशी आदींच्या संकोचातून त्यांची उत्पत्ती होते.

मुखशोषासारख्या शोषस्वरूप विकारांची उत्पत्ती रूक्षगुणाची वाढ अधिक झाल्याने होते तर मन्यास्तंभासारखे स्तंभरूप, त्रिकग्रहासारखे ग्रहरूप, वक्षोपरोधासारखे उपरोधस्वरूप आणि वर्त्मसंकोचासारखे संकोचस्वरूप विकार या सर्वांत स्नायूव पेशी यांच्या ठिकाणी उद्भवलेली स्तब्धता ही सामान्यत्वाने विद्यमान असते. आक्षेप आदि विकारांचा संभव क्षोभातून म्हणजे अस्वाभाविक व वेगयुक्त गतीतून किंवा अतियोगातून म्हणजे अतिप्रवृत्तीतून होतो. गंधादि विषयांचे ग्रहण करण्याच्या बाबतीत इंद्रियांची क्षमता कमी होणे, त्यांच्या ठिकाणी सुप्तता किंवा मांद्य उत्पन्न होणे हे विकार संज्ञावाहिनींच्या विकृतीतूत उद्भवतात.

वातविकारांच्या उपरिनिर्दिष्ट सूचीत काही विकारांचा उल्लेख भेद या संज्ञेने करण्यात आला आहे. शूलस्वरूप आणि विदारणरूप असे दोन प्रकार त्यांतही संभवतात. जानुभेद श्रोणिभेद इत्यादि विकार शूलस्वरूप म्हणजे ज्यांत फुटल्यागत वेदना होते अशा स्वरूपाचे असून नखादिकांचा भेद हा विदारणरूप असतो. नखे वगैरेंचे त्यात विदारण होते.

अनुक्रमणिका

### एक वातविकार—विड्भेद

या भेदसंज्ञक विकारांत विड्भेद नांवाने एका विकाराचा उल्लेख करण्यात आला आहे. विड्भेद म्हणजे मल पातळ होणे. हा पातळपणा मलात द्रवद्रव्यांचे आधिक्य झाल्याने उद्भवतो. वस्तुतः वायु हा रूक्षगुणी असून त्याच्या योगाने द्रवद्रव्यांचे शोषण होते. अर्थात् वायूमुळे मलात द्रवत्व उत्पन्न होणारे नाही, उलट गाढता म्हणजे घट्टपणा येईल. वातप्रधान अतिसाराचे स्वरूप या दृष्टीने लक्षात घेण्यासारखे आहे. वरचेवर व थोड्या थोड्या प्रमाणात आणि फेसाळ [फेस हे वायूचेच एक स्वरूप होय. थोड्या द्रवाशी जास्त वायूचा संयोग झाला म्हणजे तो वायूच फेनरूप होतो.]स्वरूपात मलप्रवृत्ती होणे इत्यादि शद्बांत त्याचे वर्णन केले आहे ['अरुणं फेनिलं रूक्षमल्पमल्पं मुहुर्मुहः। शकृदाम सरुक्शब्दं मारुतैनातिसार्यते।' मा. नि.]. गुदमार्गाने पुष्कळ प्रमाणात व द्रवरूपात मलाचे अतिसरण होणे हे अतिसाराचे सामान्य लक्षण. ['गुदेन बहुद्रवसरणं अतिसारः' – मा.नि.व्याख्या.]. त्यात वाताचा संबंध आला म्हणजे मलातील द्रवता कमी होते.

या उदाहरणावरूनही ही गोष्ट स्पष्ट होते की, रूक्षगुणी वायूची अभिवृद्धी झाली म्हणजे मलात शुष्कता निर्माण होईल व परिणामी बद्धविट्कत्व संभवेल. अर्थात् वातविकारांच्या पूर्वोक्त यादीत जेथे विड्भेदाचा उल्लेख आहे तेथे त्याऐवजी विड्ग्रह असा पाठ असणे अधिक सुसंगत वाटते. विड्भेद हा निर्देश लिपिकाच्या प्रमादामुळे झाला असणे अशक्य नाही. चरकसंहितेचे व्याख्याकार चक्रपाणी यांनी विड्भेदाची अन्वर्थकता सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. 'वातज अतिसारात सुद्धा विड्भेद हा वातज असतो'['वातजातीसारेऽपि विड्भेदो वातज एव' च. सं व्याख्या.], असा युक्तिवाद ते करतात. परंतु, हे म्हणणे विशेष समाधानकारक वाटत नाही. कारण, अतिसार विकारात वाताचा अनुबंध असला म्हणजे विड्भेद संभवतो, हे म्हणणेच मुळात अतिसाराच्या संप्रातीला धरून नाही. अभिवृद्ध अप्धातू हे अतिसाराचे कारण. त्याचे म्हणजे वाढलेल्या अप्धातूचे मिश्रण झाल्यानेच मलात द्रवत्व येते, आणि त्यात वाताचा संबंध आला म्हणजे त्या तशा वातज अतिसारात थोडे थोडे, वरचेवर व फेसाळ असे मलोत्सर्जन होते इत्यादि वर्णन विचारात घेतले म्हणजेही मलातील द्रवाचे प्रमाण वायूमुळे कमी होते, तो द्रवत्वाला कारणीभूत होत नाही, हे स्पष्टपणे दिसून येते. अतिसारातील द्रवत्व वायूच्या विड्भेदकर्तृत्वामुळे संभवते, हे चक्रपाणीचे म्हणणे अप्रस्तुत होय. वातविकारांच्या वरील यादीत विड्भेदाच्या जागी विड्ग्रह अशी सुधारणा करणे त्यापेक्षा योग्य होईल.

### शूलाचे स्वरूप

समस्त वातविकार शूलप्रधान वा शूलात्मक असल्याचे मागे उल्लेखिले आहेच. या शूलाचे सामान्य पुढीलप्रमाणे सांगता येईल :—शरीरात जे निरनिराळे अभिवहनमार्ग आढळून येतात त्यांना स्रोतसे म्हणतात. हृदयादि मूलस्वरूप छिद्रांपासून देहाच्या अंतर्भागात पसरलेला सिरा व धमनी यांना वगळून असलेला कोणताही मार्ग म्हणजे स्रोतस्, अशी त्यांची व्याख्या करण्यात आली आहे ['मूलात् खात् अंतरं देहे प्रसृतं त्वभिवाहि यत्। स्रोतस् तदिति विज्ञेयं सिराधमनिवर्जितम्' –सु.सं.] यांपैकी काहीतून घनद्रव्याचे तर काहीतून द्रवद्रव्याचे आणि काहीतून सूक्ष्म वायूचे अभिवहन होत असते.या सर्व स्रोतसांतून वायूचा संचार सदैव होत असतो. आणि त्याच्या या संचारात तो जेव्हा एखाद्या ठिकाणी अवरुद्ध होतो तेव्हा आपला स्वाभाविक मार्ग सोडून तो निराळ्या मार्गाने जाऊ लागतो. अवरोधाचा परिणाम म्हणून त्याचा वेगही आता वाढलेला असतो. वायूच्या या वेगयुक्त व अस्वाभाविक मार्गाने जाण्याच्या प्रवृत्तीने संबद्ध स्रोतसांचे व तदाश्रयभूत पेशींचे अवमर्दन होते आणि परिणामी त्यांच्यात पीडा उद्भवते. तिलाच शूल म्हणतात. वायूची स्वाभाविक गती कुंठित होण्याची प्रमुख कारणे दोन. स्रोतसांत रसरक्तादींचा संचय प्रमाणाबाहेर होणे हे पहिले आणि काही कारणाने

अनुक्रमणिका

स्रोतसांत रूक्षता वाढून त्यांचा संकोच होणे हे दुसरे. दोघांचाही परिणाम वायूची गती प्रतिरुद्ध होण्यात होतो.

उपर्युक्त वाताविकारांत ग्रीवास्तंभ, मन्यास्तंभ इत्यादि प्रकारे काहींचा उल्लेख स्तंभरूप व्याधी म्हणून करण्यात आला असून, पृष्ठग्रह, त्रिकग्रह याप्रमाणे काहींना ग्रहरूप विकार म्हणून संबोधण्यात आले आहे. शरीराच्या निरनिराळ्या भागांत उद्‌भवणाऱ्या या स्तंभाख्य आणि ग्रहसंज्ञक विकारांच्या उत्पत्तीला अनुक्रमे त्या त्या ठिकाणचा स्नायुगत आणि पेशीगत शोथ कारणीभूत होतो. तसेच वरील यादीत कुब्जत्व, वामनत्व आदि जे आकुंचनात्मक विकार निर्दिष्ट करण्यात आले आहेत, त्यांची उत्पत्ती त्या त्या स्थानातील स्नायूंत शुष्कता आल्याने होते. स्तंभरूप अशा अन्य वातविकारांची निर्मिती सुद्धा, मग ते सार्वदेहिक असोत वा प्रादेशिक असोत, अनुक्रमे शोथातूनच होते. तात्पर्य, वरील पैकी काही विकार शोथोद्‌भव असतात व काही शोषोद्‌भव असतात.

कंप, भ्रम आदि विकारांचा प्रादुर्भाव चलनात किंवा गतीत वैषम्य उद्‌भवल्याने होतो.

रसरक्तादि धातूंचा क्षय झाला की, वायूची अभिवृद्धी होते आणि त्याची गती प्रतिरुद्ध झाली की कोप म्हणजे अस्वाभाविक मार्गाने जाण्याची प्रवृत्ती त्याच्या ठिकाणी निर्माण होते. वायूच्या गतीला होणारा हा अवरोध एक संचयजन्य तरी असतो व संकोचजन्य तरी असतो हे वर उल्लेखिलेच.

वाताची अभिवृद्धी झाली की शरीरात रूक्षता वाढते. तिचा परिणाम म्हणून मांसादि धातू शुष्क होतात. अंगोपांगांच्या ठिकाणी त्यामुळे पारुष्य म्हणजे खरस्पर्शत्व उद्‌भवते. आणि फलतः त्वचा, ओठ, दांत इत्यादींचे विदारण, तसेच कुब्जत्व, वामनत्व आदि आकुंचनस्वरूपी वातविकार यांचा प्रादुर्भाव होतो.

स्निग्ध व द्रवस्वरूप अशा द्रव्यांचे उदा. रस, रक्त, मेद इत्यादि धातूंचे काही अंश प्रमाण अधिक झाल्यामुळे अथवा पर्याप्त प्रमाणात असूनही त्यांचे पचन न झाल्याकारणाने एखाद्या ठिकाणी संचित होतात. त्यांच्या योगाने तद्‌वह स्रोतसांत प्रतिबंध निर्माण होतो. व तोच स्रोतःसंचारी वायूच्या गतीला कुंठित करतो. वायूची गती अश्या रीतीने प्रतिहत झाली की अंगोपांगांचे आकुंचनप्रसरणरूपी संचालन करण्याच्या कामी तो असमर्थ होतो आणि परिणामी स्तंभ, शोथ, शूल इत्यादि विकार प्रादुर्भूत होतात.

उपर्युक्त विकारांपैकी शोथ आणि स्तंभ ही लक्षणे ज्यांत विद्यमान असतात अशा ऊरुस्तंभादि बहुतेक सर्व विकारात शूल हे लक्षणही विद्यमान असतेच. शोथस्तंभात्मक [वातविकारांच्या सूचीत शोथस्वरूप विकारांचा पृथक् उल्लेख केलेला नाही. तथापि, ऊरूस्तंभादि विकारांत ही शोथात्मकता प्रत्यंतराला येते. म्हणूनच तिचा येथे उल्लेख केला.] विकार, मग ते वरील यादीत सांगितलेले असोत अथवा वातरक्तादिकांच्या सारखे तीत उल्लेखिलेले नसोत, ते सर्व प्रायः ['प्रायः' असे मुद्दामच म्हटले. काही विकारांतशोथ किंवा स्तंभ हे लक्षण असते, पण शूलाचा मात्र अभाव असतो. कारण त्या विकारांत मुळी विशिष्ट ठिकाणची संवेदनाच नाहीशी झालेली असते. अर्थात् हे विकार शोथस्तंभात्मक असले तरी सशूल मात्र नव्हेत.] शूलच असतात असा याचा अर्थ.

एखाद्या ठिकाणी स्रोतसांत अवरोध उत्पन्न झाला की त्या ठिकाणी आकुंचनप्रसरणरूप हालचाल होईनाशीहोते. आणि अशा वेळी संज्ञावह स्रोतसांत अडथळा निर्माण होऊन त्या ठिकाणच्या संवेदनेतही केव्हा केव्हा मांद्य निर्माण होते. कधी कधी तर शोषणाचा अथवा संचयाचा परिणाम म्हणून संज्ञाहानीही

संभवते. शरीराच्या त्या विशिष्ट व्याधिग्रस्त विभागातील स्पर्शज्ञान नाहीसे होण्यावरून या संज्ञाहानीचा प्रत्यय येतो.

**वातविकारांचे प्रमुख प्रकार—संकोच व स्तंभ**

तात्पर्य, वातोद्भव विकार वर दिल्याप्रमाणे अनेकविध सांगण्यात आले असले तरी त्या सर्वांचे त्यांच्या स्वरूपानुसार प्रमुख प्रकार सामान्यतः दोनच संभवतात. (१) संकोचरूप व (२) स्तंभरूप. पेशी, स्नायू इत्यादींचा अथवा विशिष्ट अंगोपांगांचा संकोच होणे हे पहिल्या प्रकारात आढळून येते तर ग्रीवामन्यादि अवयवांचा स्तंभ होणे हे लक्षण दुसऱ्यात विद्यमान असते. यांच्या व्यतिरिक्त भेदस्वरूप व सुप्तिस्वरूप अशा आणखी प्रकारांचाही उल्लेख वातविकारांत केलेला आढळतो. तथापि, तेही वरील दोन प्रकारांतच समाविष्ट होण्यासारखे आहेत. कारण त्यांत देखील स्रोतोरोधामुळे उद्भवणाऱ्या वातविकारांचे संकोचस्तंभरूपी द्वैविध्य दिसून येतेच. ज्या ठिकाणी स्निग्धता कमी होऊन शुष्कता निर्माण होते त्या ठिकाणी त्वचादि भाग फाटल्याकारणाने वायूचे उन्मार्गगमन म्हणजे कोप संभवत नाही. उलट, मार्गावरोधामुळेच कोपोद्भव वातविकारांत विशेष पीडा जाणवते. आणि हे लक्षात घेऊनच संकोचात्मक व स्तंभात्मक असे वातविकारांचे प्रधान भेद दोनच असल्याचे वर सांगितले. शोथलक्षणात्मक विकारांचा अंतर्भावही तदनुरोधाने स्तंभात्मक विकारांत करणेच योग्य होय.

या द्विविध विकारांपैकी संकोचात्मक विकारांत प्रायः शूल नसतो. स्रोतोमार्ग शुष्क झाल्याने त्यात वायूचा संचारच संभवत नाही व परिणामी शूल उद्भवत नाही. अर्थात् सर्वच संकोचात्मक विकारांत शूल नसतो असे नव्हे. संधिसंकोचादिकांत तो आढळून येतो. स्तंभरूप विकारांत स्थिती उलट असते. त्यांत शूल सामान्यतः विद्यमान असतोच. संचयामुळे स्रोतोमार्गात वायू अवरुद्ध होतो व परिणामतः त्याच्या ठिकाणी उन्मार्गप्रवृत्ती उत्पन्न होते. शूल तीतूनच उद्भवतो. हा शूलही सर्वच स्तंभरूप विकारांत असतो असे नाही. सुप्ती हे लक्षण ज्यांत आढळते अशा विकारांत, ते स्तंभरूप असताही, शूल जाणवत नाही. कारण त्यांत संवेदनाच क्षीण झालेली असते.

**अरुणत्व व श्यावत्व**

वातविकारांत सांगितलेली अरुणत्व व श्यावत्व म्हणजे त्वचा लालसर व काळसर होणे ही लक्षणे कशी उद्भवतात हे पाहण्यासारखे आहे. पेशीगत स्रोतसांत अवरोध झाल्याने प्रकुपित झालेल्या वायूकडून तत्स्थानीय पेशी पीडिल्या जातात, जोराने दाबल्या वा घासल्या जातात. त्यामुळे तेथील सूक्ष्म रक्तवाहिन्यांवरही दाब पडतो आणि त्यांतून रक्त अल्प प्रमाणात बाहेर म्हणजे स्रोतसांच्या बाह्य भागावर येते. परिणामी त्या ठिकाणची त्वचा लाल झालेली दिसते. वातप्रकोपजन्य विकारांत शरीराच्या बाह्य भागावर विशिष्ट ठिकाणी जी लाली दिसून येते तिचे वास्तविक स्वरूप हे असे असून शोथरूप व स्तंभरूप विकारांत तिचे प्रत्यंतरही येते.

दुसरे लक्षण श्यावत्व.त्याचेही काहीसे असेच आहे. शोषणामुळे अथवा अतिसंचयामुळे विकृत झालेल्या व्याधिस्थानात, शारीर अवयवांना पोषक असणारा रसधातू, रसवहस्रोतसांचा अवरोध झाल्याकारणाने पोहोचू शकत नाही. विकृतिस्थानातील रक्तमांसादि धातूंचे पोषण त्यामुळे अर्थातच बंद

अनुक्रमणिका

पडते आणि पोषणाभावी हे धात्वंश सत्त्वहीन होत जाऊन शेवटी त्यांना मलरूप प्राप्त होते. आणि त्याचाच परिणाम म्हणून त्या ठिकाणच्या त्वचेवर काळसरपणा दिसू लागतो.

अर्थात् उपरिवर्णित वस्तुस्थिती विचारात घेऊनच श्यावत्व व अरुणत्व या प्रकारांचा उद्भव वातप्रकोपातून होतो असे सांगण्यात आले आहे. आणि ते अगदी योग्य होय. अन्यथा स्वतः रूपरहित असलेला वायू ['रूपरहितस्पर्शवान् वायुः' – त. सं.] वर्णोत्पत्तिला कारणीभूत होणे शक्यच नाही.

## ४० पित्तविकार

आता यापुढे पित्तविकारांचा विचार करावयाचा. चरकसंहितेत पुढील चाळीस विकारांचा उल्लेख स्पष्ट स्वरूपात आविष्कृत होणारे पित्तविकार म्हणून करण्यात आला आहे– (१) ओष (अग्नीने भाजल्याप्रमाणे दाह होणे. पार्श्वस्थित वन्हीने व्हावी तशी पीडा होणे ['पार्श्वस्थितेनेववन्हिना पीडा' च. सं. व्याख्या.], असे स्पष्टीकरण चक्रपाणी करतात.) (२) प्लोष (एखाद्या विशिष्ट भागात होणारा सर्वसामान्य दाह. चक्रपाणी प्लोषाला किंचित् दाह मानतात ['प्लोषः किंचित् दहनमिव' च. सं. व्याख्या.].(३) दाह (सर्वांगदाह)(४) धूमक (घशातून धूर निघाल्यागत वाटणे) (५) दवथू (विशिष्ट ठिकाणी तीव्र दाह होणे. धक्धक् होणे या शब्दांनी लोकात प्रचलित असलेला विकार म्हणणे दवथू असे चक्रपाणींनी म्हटले आहे ['धकधकिकेति लोके ख्याता' – च. सं. व्याख्या.]. (६) अंतर्दाह (कोष्ठान्तर्गत दाह) (७) अंसदाह (खांद्यांत दाह होणे) (८) विदाह (उपभुक्त अन्न विदग्धहोणे. आमाशयात होणाऱ्या दाहावरून याचे अनुमान होते) (९) अम्लक (आंबट ढेकर येणे) (१०) अंगगंध (शरीराची तीव्र दुर्गंधी) (११) अतिस्वेद (१२) ऊष्माधिक्य (शरीराचा स्पर्श अधिक उष्ण भासणे) (१३) मांसक्लेद (मांसधातूतील द्रवता वाढणे) (१४) शोणितक्लेद (रक्त अधिक पातळ होणे) (१५) अंगावदरण (हातपाय आदि अवयवांची त्वचा फाटणे) (१६) त्वग्दाह (१७) त्वग्विदारण (त्वचा फाटणे) (१८) रक्तपित्त (नाक, डोळे, गुद, शिस्न, आदि मार्गांतून रक्ताचा स्राव होणे. रक्तपित्त म्हणजे पित्तदूषित रक्ताचा स्राव. 'पित्त ही रक्ताची विकृती असल्याने, त्याच्याशी रक्तांचा संसर्ग होत असल्याने, अशा रक्ताकडून ते दूषित होत असल्याने आणि त्याचा गंध व वर्णही रक्तसदृश होत असल्याने अशा पित्ताला रक्त म्हणजे रक्तपित्त म्हणतात ['पित्तं रक्तस्य विकृतेः संसर्गात् दूषणादपि गंधवर्णानुवृत्तेश्च रक्तेन व्यपदिश्यते'। अ. हृ.], असे स्पष्टीकरण आचार्य वाग्भट यांनी केलेले आहे.) (१९) रक्तकोठ (ठिपक्या ठिपक्याप्रमाणे दिसणारी रक्तवर्णी सूज) (२०) चर्मावदरण (त्वचा सोलवटणे. पूर्वोक्त त्वग्विदारण निराळे. त्यात त्वचा फाटते, भेगाळते, प्रस्तुत विकारात त्वचेचे पापुद्रे सोलल्याप्रमाणे निघून जातात) (२१) हरितत्व (शरीर हिरवट होणे) (२२) रक्तमंडल (रक्तवर्णी मंडलाकार कोठ) (२३) हरिद्रता (शरीर हळदीप्रमाणे पिवळसर होणे) (२४) कक्षा (विस्फोटाचा–फोडाचा–एक प्रकार. बाहू, पार्श्व, खांदे, फासळ्या व कक्षा या भागांत होणारा उष्णवर्णी, वेदनायुक्त व पित्तप्रकोपजन्य फोड म्हणजे कक्षा असे सुश्रुतसंहितेत क्षुद्ररोगांच्या वर्णनात सांगण्यात आले आहे ['बाहुपार्श्वांसकक्षासु कृष्णवर्णा सवेदनाम् । पित्तप्रकोपसंभूतां कक्षामिति विनिर्दिशेत्' – । सुं. सं.].)(२५) तिक्तास्यता (तोंड कडू होणे) (२६) पूतिमुखता(मुखदुर्गंधी) (२७) नीलिका (शरीरावर उठणारे निळसर डाग. काहींच्या मतानुसार नीलिका म्हणजे निराळ्या ठिकाणी होणारे व निराळ्या वर्णाने युक्त असणारे व्यंगच होय, असा उल्लेख टीकाकार डल्हणांनी केला आहे ['व्यंगमेव स्थानांतरेण च नीलिकेत्यन्ये' सु. सं. व्याख्या.] आणि शरीरावर वा तोंडावर उद्भवणाऱ्या कृष्णवर्णी व्यंगालाच नीलिका म्हणतात असे आचार्य माधवांनी म्हटले आहे ['कृष्णमेवंगुणं गात्रे मुखे वा नीलिकां विदुः' – मा. नि.].) (२८) अतृप्ती (पर्याप्त आहार सेवन करूनही पित्ताच्या आधिक्यामुळे तृप्ती न वाटणे) (२९) आस्यपाक (तोंड येणे, मुखान्तर्गत कलेचा पाक होऊन ती फाटणे) (३०) तृष्णाधिक्य (३१) कामला (कावीळ) (३२) गलपाक (मुखपाकाप्रमाणे घशातील कलेचा पाक होणे)

अनुक्रमणिका

(३३) अक्षिपाक (डोळ्यांच्या पापण्यांचा आतून होणारा पाक) (३४) गुदपाक (३५) मेढ्रपाक (३६) तमःप्रवेश (अंधारात प्रवेश केल्यागत वाटणे, अंधारी वाटणे) (३७) जीवादान (कोठेही राहावे, बसावे असे न वाटणे, अतिग्लानी (३८) हरितपीतता (त्वचा, डोळे, मूत्र, व पुरीष यांच्या ठिकाणी हिरवट, पिवळट वर्ण उद्‌भवणे) (३९) लोहितगंधास्यता (तोंडात रक्तासारखी दुर्गंधी येणे) (४०) रक्तविस्फोटक (रक्तवर्णी फोड). या चाळीसही विकारांत उष्णता आणि तीक्ष्णता या दोनही गुणांची अभिवृद्धी सर्वत्र सारखीच आढळून येते. समस्त पित्तविकार हे उष्णतीक्ष्णगुणांच्या अभिवृद्धीतून उद्‌भवतात, असा याचा अर्थ.

**पित्तविकारांचे स्वरूप**

वर वर्णिलेल्या पित्तविकारांचे स्वरूप सामान्यतः पुढीलप्रमाणे असल्याचे दिसून येते :— कोठ्यात प्रविष्ट झालेल्या अन्नाचे पचन यथावत् झाले नाही तर त्यात अम्लता उत्पन्न होते. आंबट ढेकर येणे आणि घशात अम्लता व जळजळ जाणवणे हे विकार या अन्नगत अम्लतेतूनच उद्‌भवतात. कोठ्यात होणारा दाह आहारातील विदग्धतेमुळे उद्‌भवतो, तर रक्तातील उष्णता म्हणजे पित्त वाढले की, सार्वदेहिक दाह प्रादुर्भूत होतो. कटु, अम्ल, तीक्ष्ण, उष्ण अशा आहाराचा परिणाम रक्त दूषित होण्यात होतो. वाग्भटाचार्यांनी म्हटल्याप्रमाणे ‘शुद्ध स्वरूपातील रक्ताची रुची मधुर व किंचित खारट असते, त्याचा स्पर्श अनुष्णाशीत भासतो आणि ते द्रवरूप असते [‘मधुरं लवणं किंचिदशीतोष्णमसंहतम्’अ. हृ.]. अशा रक्तात तीक्ष्णोष्णादि आहाराच्या योगाने ज्याप्रमाणे विदग्धता निर्माण होते त्याचप्रमाणे त्यात तीक्ष्णत्व व अम्लत्वही अस्वाभाविक प्रमाणात वृद्धिंगत होते. रक्तात उद्‌भवणाऱ्या या विकृतीमुळेच मग ते अधिक दाहक बनते. अंगावदरण, रक्तमांसाचे क्लेदन, रक्त कोठ,रक्तमंडळे हे विकार या रक्तगत दाहातूनच प्रादुर्भूत होतात. रक्तातील तीक्ष्ण गुणाच्या आधिक्याचा परिणाम रक्तवह स्रोतसांचे विदारण होऊन त्यांतून रक्ताचा स्राव होण्यात होतो. या रक्ताचा, अर्थात् पित्तयुक्त अशुद्ध रक्ताचा,स्राव नाक, डोळे, कान, व तोंड या ऊर्ध्वगत आणि योनी, गुद व शिस्न या अधोगत भागांपैकी कोणत्याही मार्गाने होऊ लागला म्हणजे त्यालाच रक्तपित्त म्हणतात. नाक, तोंड आदि अवयवांतील पेशींच्या आवरणस्वरूप असणाऱ्या विभिन्नस्थानीय कलांचा पाक होणे हा या रक्तगत तीक्ष्णतेचाच परिणाम होय. मुखपाक, गुदपाक आदि विकार म्हणजे या पाकाचे प्रकार होत. पित्ताचे रक्तातील प्रमाण वाढले म्हणजे रक्तात ते दाह उत्पन्न करते. हे विदग्ध रक्तच त्वचा आदि ठिकाणी पिवळटपणा निर्माण करण्याला कारण होते. दूषित रक्तात तीक्ष्णतेचे प्रमाण अधिक झाले की रक्तवह स्रोतसांचे विदारण होऊन रक्तपित्तउद्‌भवते, तर हीच तीक्ष्णता तुलनेने कमी प्रमाणात असली म्हणजे त्वचा आदि ठिकाणी पीतवर्णता संभवते. कित्येक वेळी त्वचा हिरवट व निळसर दिसू लागते. तदन्तर्गत रक्ताचा कोथ होऊन ते सत्त्वहीन अत एव मलस्वरूप झाल्याचे ते सूचक असते. सारांश, दाह, कोथआणि उष्णतेचे आधिक्य हीच लक्षणे समस्त पित्तविकारांत सामान्यत्वाने दिसून येतात. काहीत दाह दिसतो, काहीत कोथ संभवतो तर काहीत उष्णता वाढलेली आढळून येते.

शरीरातील उष्णतेची म्हणजे द्रवहीन पित्ताची वाढ अधिक झाली की गात्रे संतप्त होतात. तथापि, हा ऊष्मा विदग्धता अथवा कोथ मात्र उत्पन्न करीत नाही. यावर अशी एक शंका उद्भवू शकेल की शरीर स्वभावतः आर्द्र असल्याने शरीरगत द्रवद्रव्याची वाढ न होता केवळ तदाश्रयी पित्ताची वाढ होणे कसे शक्य आहे? परंतु, या शंकेचे उत्तर कठिण नाही. शरीरगत पित्त द्रवद्रवाच्या आश्रयानेच राहते हे खरेच होय. हे द्रवत्व म्हणजे जलांशाचे आधिक्य. ते उणावले की तदाश्रयी उष्णतेचेच आधिक्य संभवते, द्रवद्रव्याची वाढ होत नाही. उष्णतीक्ष्णादि गुणांचे बाहुल्य असणाऱ्या द्रव्यांचा उपयोग प्रचुर प्रमाणात केल्याने जेव्हा पित्ताची वाढ होते तेव्हा उष्णतेबरोबर द्रवद्रव्याचे प्रमाणही वाढते. द्रवाश्रित उष्णतेपासूनच विदग्धतेची उत्पत्ती होत

असल्याने द्रवरहित उष्णतेपासून विदग्धता संभवणे शक्य नाही. स्वाभाविक प्रमाणात असलेले द्रवद्रव्याश्रित पित्त आपले सारकिट्टविभाजनाचे कार्य एकीकडे करीत असताना या आपल्या पचनक्रियेच्या योगानेच ते दुसरीकडे पच्यमान द्रव्यातील काही अंशांचे संधान करीत असते. परंतु, या द्रवाश्रित पित्ताच्या प्रमाणात जेव्हा वैषम्य उद्‌भवते तेव्हा मात्र उपरिनिर्दिष्ट संधानकार्यात खंड पडतो व पच्यमान द्रव्यातील सर्व अंश परस्परांपासून विभक्त होतात आणि अधिक प्रमाणात दग्ध होतात. विदग्धता ही संज्ञा या अवस्थेलाच देण्यात आली आहे. ही विदग्धताच तिच्या विश्लेषणात्मकतेमुळे पुढे विनाशक होते. अर्थात् द्रवहीन पित्ताच्या अभिवृद्धीतून ही विदग्धता उद्‌भवत नाही हे वर सांगितलेच. आणि विदग्धताउद्‌भवली नाही की कोथही संभवत नाही. कारण कोथ म्हणजे धातूंच्या ठिकाणी निर्माण होणारी विनाशोन्मुख प्रवृत्ती. ती धात्वंशांच्या विदाहातूनच उदयाला येते. द्रवाश्रित पित्त विकृत झाले की तीक्ष्णता उत्पन्न होते. आणि तीतूनच दाह (विदग्धता), कोथ व क्लेद (म्हणजे मांसादि घनद्रव्यांतून यांतील द्रवांश पृथक् होणे) यांचा उद्‌भव होतो. विदाह, क्लेद, धातूंचे व स्रोतसांचे विदारण, कामला, रक्तपित्त, कुष्ठ, पांडू भ्रम आदि ज्या नानाविध विकारांचा उल्लेख ४० पित्तविकारांत करण्यात आला आहे ते सर्व या दाहक्लेदकोथांतूनच उद्‌भवतात. अर्थात् त्यांपैकी काही दाहात्मक असतात, काही क्लेदोत्पन्न असतात तर काही कोथजनित असतात. किंबहुना, आहार्यद्रव्ये आणि रसरक्तादि धातू यांच्या पचनात पित्तप्रकोपामुळे उद्‌भवणाऱ्या विकृतीलाच दाह म्हणतात, ही वस्तुस्थिती विचारात घेता, असेही म्हणावयास हरकत नाही की, पचनक्रियेच्या वैषम्यातून उद्‌भवणारे प्रायः सर्वच पित्तविकार हे दाहस्वरूप असतात. कारण दाह हे लक्षण त्यांत सामान्यत्वाने विद्यमान असते.

आणखी एक गोष्ट येथेच ध्यानात घेण्यासारखी आहे. ती ही की पित्तप्रकोपजन्य म्हणून ज्या चाळीस विकारांचा उल्लेख चरकसंहितेत करण्यात आला आहे त्यांतील काही पुनरुक्त असल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ, दाहनामक विकार सांगितल्यानंतर पुनः अंगदाह स्वतंत्रविकार म्हणून उल्लेखिणे ही पुनरुक्ती होय. दवथू हा अंगदाहाचाच एक प्रकार असल्याने अंगदाहाचा उल्लेख करून पुनः दवथूचाही निर्देश स्वतंत्रपणे करणे हाही पुनरुक्तीचाच एक प्रकार मानावा लागतो. परंतु, स्वरूपतः सारखे असलेले पण स्वतंत्रतया परिगणित केलेले आणखीही कित्येक विकार या पित्तविकारांच्या यादीत उल्लेखिलेले दिसून येतात. उदाहरणार्थ, त्वग्विदारण व मांसविदारण सांगितल्यावर पुनः चर्मविदारण सांगणे, किंवा हरितत्व व हारिद्रता यांचा उल्लेख केल्यानंतर पुनश्च नेत्र, मूत्र, पुरीष यांच्या ठिकाणी संभवणाऱ्या हरिततेचा व हारिद्रतेचा निर्देश स्वतंत्रपणे करणे. अर्थात् स्वरूपतः अभिन्न असूनही स्थानादि भेदांमुळे विभिन्न भासणाऱ्यांना स्वतंत्र विकार कल्पून परिगणना केली तरच उपरिवर्णित ४० या संख्येची पूर्ती होऊ शकते हे उघड होय.

**२० श्लेष्मविकार**

यापुढे श्लेष्मविकारांचा विचार करावयाचा. पुढील वीस विकारांचा निर्देश, स्पष्ट रूपात अभिव्यक्त होणारे श्लेष्मविकार म्हणून चरकसंहितेत करण्यात आला आहे– (१) तृप्ती (आहार न घेताच तो घेतल्याप्रमाणे वाटणे) (२) तंद्रा (झोपेच्या अभावीही झोपल्यागत निश्चेष्टता संभवणे) (३) निद्राधिक्य (४) गुरुगात्रता (अंग जड होणे) (५) स्तैमित्य (त्वचेच्या बाह्य भागावर शैत्याधिक्य प्रतीत होणे) (६) आलस्य (७) मुखस्राव (तोंडाला पाणी सुटणे) (८) मुखमाधुर्य (तोंडात नित्य मधुररसच जाणवणे) (९) मलाधिक्य (नासानेत्रादि स्रोतसांत अधिक मल संचित होणे) (१०) बलास (बलक्षय, मंदज्वर आणि अंगस्थौल्य असे तीन अर्थ चक्रपाणींनी या शब्दाचे दिले आहेत ['बलासःबलक्षयो....मंदज्वरित्वं स्थूलांगता वा' – च.सं. व्याख्या]. त्यांपैकी

अनुक्रमणिका

बलक्षय हा वातविकार असल्याने आणि अंगस्थौल्य हे पुढे सांगण्यात येणाऱ्या अतिस्थौल्य नामक विकाराहून निराळे नसल्याने बलास या शब्दाचा मंदज्वर हा अर्थच ग्राह्य वाटतो.) (११) श्लेष्मोद्गिरण (मुखावाटे श्लेष्मस्राव होणे) (१२) कंठोपलेप (घसा कफाने चिकट होणे) (१३) हृदयोपलेप (हृदयात कफ चिकटल्यागत दाटणे) (१४) श्वेतावभासता (त्वचा पांढुरकी होणे) (१५) धमनीप्रतिचय (धमन्यांचा म्हणजे वातवाहिनींचा अवरोध झाल्यागत वाटणे) (१६) उदर्द (त्वचेवर दिसणाऱ्या कंडुयुक्त व मंडलकार गांधी) (१७) शीताग्निता (अग्निमांद्य) (१८) गलगंड (घशात उद्‌भवणारी गंडरूप लांबट सूज) (१९) अतिस्थौल्य (स्तन, उदर आदि अवयवांच्या स्थूलतेवरून उपलक्षित होणारे स्थौल्याधिक्य) (२०) नेत्रमूत्रपुरीषश्वेतता [श्वेतावभासता व नेत्र–मूत्र–पुरीष–श्वेतता यांचा उल्लेख भिन्न भिन्न विकार म्हणून करण्यात आला असला तरी श्वेतता भासमान होणे, हे लक्षण उभयत्र समान असल्याने या दोन विकारांना वस्तुतः एकरूप मानावयास हरकत नाही.] (नेत्रादि ठिकाणी श्वेतत्त्व प्रत्याला येणे).

पित्तविकारांप्रमाणे श्लेष्मविकारांच्या वरील यादीतही पुनरुक्ती आढळते. उदा. श्वेतावभासता आणि नेत्रमूत्रपुरीष-श्वेतता हे विकार निरनिराळे सांगण्यात आले आहेत. श्वेतावभासता हे स्वरूप वस्तुतः दोघांत सारखेच आहे.

या सर्व कफविकारांत शैत्य, विशिष्ट शारीर द्रव्याचा अधिक प्रमाणात होणारा संचय आणि अग्निमांद्य ही तीन लक्षणे सामान्यपणे विद्यमान असतातच असे दिसून येते. काहीत ती सर्वच्या सर्व आढळतात तर काहीत त्यांपैकी एक व दोन लक्षणांचा आढळ होतो.

**विकारांतील रुचिवैषम्य**

वातादिदोषोद्‌भव विकारांत जे रुचिवैषम्य उत्पन्न होते, त्याचेही स्वरूप विचारात घेण्यासारखे आहे. वातदोषोत्पन्न विकारांत तोंड तुरट, व बेचव होते, पित्तप्रकोपजन्य विकारांत सर्व द्रव्यांची रुची तिखट व कडवट भासते आणि कफोद्‌भव विकारांत सर्वच पदार्थ गोड लागतात. याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

बोधक कफ या नांवाचे द्रव्य रसनागत स्रोतसांत विद्यमान असते. आहारादि द्रव्यांची वास्तविक रुची त्याच्या योगानेच ज्ञात होते. या द्रव्यात म्हणजे बोधक कफात अयोग्य प्रमाणात वाढलेल्या पित्तकफाचे मिश्रण झाले की, तोंडात टाकलेल्या पदार्थाची स्वाभाविक रुची प्रतीत न होता सर्व पदार्थ अनुक्रमे कडवट, तिखट आणि गोड वाटू लागतात. अर्थात् पित्तमिश्रणाचा परिणाम तोंड कडवट, तिखट होण्यात होतो तर कफमिश्रणाने सर्वच द्रव्यांची रुची मधुर प्रतीत होते. उलटपक्षी, वातदोषातील रूक्ष गुणाची वाढ झाली की, क्लेदनात म्हणजे बोधक कफाच्या स्रावात अल्पता उद्‌भवते. तिचा परिणाम म्हणून रसनेंद्रियाच्या ठिकाणी ज्याप्रमाणे शुष्कता निर्माण होते त्याचप्रमाणे याच क्लेदनाच्या अभावी आहार्य द्रव्यातील रसाचे ज्ञानही प्रव्यक्त रूपात होत नाही [क्लेदन योग्य प्रमाणात झाले म्हणजेच त्यात विलीन वा विद्रुत झालेल्या आहार्यद्रव्यातील अंशांचा रसनागत स्रोतसांत प्रवेश होऊन त्यांची रुची रसनेंद्रियाला प्रतीत होते.]. अर्थात् आहारादिकांतील रसांच्या या अव्यक्त वा अस्फुट ज्ञानानेच तोंड तुरट होते [आम्रादि फळांचा मधुररस त्यांच्या परिपक्व दशेत व्यक्त वा प्रकट होतो. अपक्व दशेत अव्यक्त अथवा अप्रकट असतो. त्याच्या या अप्रकट अवस्थेतील आस्वादालाच व्यवहारात कषाय म्हणजे तुरट रस म्हणतात.]. तसेच काही कारणाने मधुरादि रसांची जाणीव करून देणाऱ्या संज्ञावाहिनीचाच नाश झाला तर मग मात्र कोणतीच चव कळत नाही व तोंड बेचव होते.

### तत्त्वशून्य परिगणन

वातोद्भव ८०, पित्तोद्भव ४० व कफोद्भव २० याप्रमाणे चरकसंहितेते सांगितलेल्या विकारांचे वर वर्णन केलेले स्वरूप पाहता एक गोष्ट उघड होते की, दूष्यभेद, स्थानभेद, क्रियाभेद इत्यादि प्रकारे एखाद्या विशिष्ट तत्त्वाला अनुसरून ही गणना केली असावी असे निदान दिसत तरी नाही. अस्थीत वायूचे वास्तव्य असते, स्वेद व रक्त यांत पित्त निवास करते ['तत्रास्थनि स्थितो वायुः पित्तं तु स्वेदरक्तयोः'अ. हृ.], इत्यादि वर्णनात सांगितलेली अस्थी, रक्त, स्वेद इत्यादि द्रव्ये म्हणजे दूष्ये होत. पक्वाशय, कटी, सक्थी इत्यादि वाताची स्थाने होत ['पक्वाशयकटीसक्थि....'अ. हृ.], अशा प्रकारच्या वर्णनात वातादिकांच्या स्थानांचा निर्देश करण्यात आला आहे. तसेच, दोषांच्या श्वसनपचनादि क्रियाही सांगण्यात आल्या आहेत. परंतु, द्रव्यगत, स्थानगत व क्रियागत भेदांना अनुसरून उपर्युल्लिखित विकारांची परिगणना केलेली दिसत नाही. वर्णिलेले विकार आविष्कृततम म्हणजे स्पष्ट रूपात व्यक्त होणारे असल्याचे सांगण्यात आले आहे. परंतु, त्यातही विशेष सयुक्तिकता प्रतीत होत नाही. कारण नखभेद, दंतभेद आदींचा सुद्धा समावेश ज्यात करण्यात आला आहे, त्या ८० वातविकारांत वातरक्त, आमवात अशा सारखे कष्टप्रद विकार देखील जसे आढळत नाहीत तसेच अंगदाह, दवथू, प्लोष यांचा देखील निर्देश ज्यांत आहे अशा पित्तविकारांत कुष्ठ, मसूरिका आदि विकार मात्र उल्लेखिलेले नाहीत. श्लेष्मविकारही याला अपवाद नाहीत. वीस विकारांच्या यादीत अंगगौरव, आलस्य इत्यादींचा सुद्धा अंतर्भाव आहे, परंतु, त्यात राजयक्ष्मा, प्रमेह आदि कृच्छ्साध्य विकारांचा मात्र उल्लेख नाही. तात्पर्य, ८०, ४०, २० ही संख्यानिश्चिती कोणत्या धोरणानुसार करण्यात आली आणि विकारांची आविष्कृततमता म्हणजे काय? याचा खुलासा योग्य तऱ्हेने होत नाही, हे खरें.

### त्रिविध वैषम्य

वातादि दोष स्वाभाविक स्थितीत असताना जी कृती करतात ती शरीराला उपकारक होते. परंतु, तीत विपरीतता संभवली म्हणजे तीच शरीराला अपकारक होते. तिलाच मग विकृती म्हणतात. गती, पचन, व पोषण हे अनुक्रमे वातपित्तकफांचे स्वाभाविक कार्य. त्यात उद्भवणारे वैषम्य तदनुरोधानेच त्रिविध असते. समस्त विकारांचा उद्भव त्यातूनच होतो. गती हे वायूचे कार्य. शारीर धातूंच्या ठिकाणी ती सम्यक् स्थितीत असली म्हणजे देहोपकारक होते. ती विपरीत झाली म्हणजे नानाविध विकृतींना जन्म देते. अशा स्थितीत तिलाच शूल म्हणतात. पचनाचेही तसेच. पचन हे पित्ताचे कार्य. धातुपचनाचे कार्य योग्यतया होत असले म्हणजे ते शरीराला हितकर होते. त्यात वैषम्य संभवले म्हणजे मात्र त्या पचनालाच दाह ही संज्ञा दिली जाते. त्यातूनच बहुविध विकार पुढे उद्भवतात. कफाच्या पोषणात्मक वा संश्लेषणात्मक क्रियेची स्थितीही अशीच असते. धातुघटकांची संघटना करणे हे कार्य जोवर यथावत् होत असते, तोवर ते देहाला उपकारक असते. त्यात विकृती उद्भवली म्हणजे मात्र तेच शरीराला अपायकारक ठरते. या विकृत संश्लेषणालाच शोथ म्हणतात. तात्पर्य, गती, पचन व पोषण ही अनुक्रमे वातादि दोषांची तीन स्वाभाविक कर्मे असून अनुक्रमे शूल, दाह व शोथ ही त्यांचीच विकृत वा विषम कर्मे होत. नानाप्रकारच्या शूलात्मक, दाहात्मक व शोथात्मक विकारांची उत्पत्ती या त्रिविध वैषम्यातूनच होते.

### रोगांतील वैविध्य

प्रकुपित झालेले वातादि दोष अथवा आमद्रव्ये शरीराच्या निरनिराळ्या भागांत प्रवेश करून निरनिराळे रोग उत्पन्न करतात. व्याध्युत्पादक दोष हे कारण तेच असले तरी स्थाने, दूष्ये, क्रिया

इत्यादीकांच्या भिन्नतेला अनुसरून तदुत्पन्न कार्यांत म्हणजेच नानाविध रोगांत मात्र वैविध्य संभवते. शास्त्रकारांनी याचा उल्लेख केलेला आहे. 'एकच प्रकुपित दोष भिन्न भिन्न कारणांना अनुसरून भिन्न भिन्न रोग उत्पन्न करतो'['स एव कुपितो दोषः समुत्थानविशेषतः। स्थानांतराणि च प्राप्य जनयंत्यामयान् बहून्'।—च.सं.], 'प्रकुपित झालेले दोष प्रकोपण द्रव्यांतील आणि दूष्यांतील वैशिष्ट्याला म्हणजेच विभिन्नतेला अनुसरून असंख्येय विकार उत्पन्न करतात'['प्रकुपितास्तु खलु ते प्रकोपणविशेषात् दूष्यविशेषात् च विकारविशेषानभिनिर्वर्तयन्ति अपरिसंख्येयत्वात्—च.सं.'], असे आचार्य चरकांनी म्हटले आहे. आचार्य सुश्रुतांचाही अभिप्राय असाच दिसतो. ते म्हणतात:— अशा पूर्वोक्त प्रकारे प्रकुपित झालेले दोष शरीराच्या त्या त्या भागात जाऊन ते ते रोग उत्पन्न करतात. ते जेव्हा उदरात प्रवेश करतात तेव्हा गुल्म, विद्रधी, उदर, अग्निसंग, आनाह, विषूचिका, अतिसार इ. रोग उत्पन्न करतात; बस्तीत प्रवेश करतात तेव्हा प्रमेह, अश्मरी, मूत्राघात, मूत्रदोष आदि रोगांची उत्पत्ती करतात. वृषणांत प्रवेश करून वृद्धीसंज्ञक विकारांना निर्मितात; मेढ्रात प्रवेश करून निरुद्धप्रकश, उपदंश, शुक्रदोष आदि विकारांची निर्मिती करतात, आणि गुदभागात जाऊन भगंदर अर्श प्रभृतींची तर शरीराच्या ऊर्ध्व भागात जाऊन ऊर्ध्वजत्रुगत विकारांची निष्पत्ती करतात. तसेच, कुपित दोष जेव्हा त्वचा, मांस, रक्त यांत प्रवेश करतात तेव्हा क्षुद्र रोग, कुष्ठे व विसर्प विकार यांचा उद्‌भव होतो. आणि तेच मेदोधातूत प्रविष्ट झाले म्हणजे ग्रंथी, अपची, अर्बुद, गलगंड, अलजी आदि रोग जन्माला येतात ['एवं प्रकुपिताः तांस्तान् शरीरप्रदेशानागम्य तांस्तान् व्याधीन् जनयंति । ते यदा उदरसंनिवेशं कुर्वन्ति तदा गुल्मविद्रध्युदराग्तिसंगानाहविसूचिकातिसारप्रभृतीन् जनयन्ति । बस्तिगताः प्रमेहाश्मरीमूत्राघामूत्रदोषप्रभृतीन्। वृषणगता वृद्धीः, मेढ्रगता निरुद्धप्रकशोपदंशशूकदोषप्रभृतीन्, गुदगता भंगदरार्शःप्रभृतीन्, ऊर्ध्वजत्रुगतास्तू-र्ध्वजान्। त्वङ्मांसशोणितस्थाः क्षुद्ररोगान् कुष्ठानि विसर्पांश्च। मेदोगता ग्रंथ्यपच्यर्बुदगलगंडाजीप्रभृतीन्।' – सु. सं.].

हेतु—स्थानादिकांतील वैविध्याला अनुसरून विविध रूपांत उत्पन्न होणाऱ्या या असंख्य विकारांपैकी काही साध्य आणि काही असाध्य असे असतात. सुखसाध्य विकार हे सौम्य होत. कारण त्यांत पीडा असली तरी ती अल्प असते. असाध्य विकारांत मात्र ती तीव्रतेने जाणवते. रोगांत उद्‌भवणारी ही साध्यासाध्यता अथवा तीव्रातीव्रता प्रकुपित दोषाच्या विशिष्ट बलाबलावरच अवलंबून असते.

### अपथ्य हेच दोषप्रकोपण

नानाविध रोगांची उत्पत्ती प्रकुपित दोषांपासून होते. दोषांना कुपित करणाऱ्या द्रव्यालाच अपथ्य असे म्हणतात. ही अपथ्ये वा दोषप्रकोपण द्रव्ये मुख्यत्वे चार आहेत— (१) आहार (२) विहार (३) काळ, आणि (४) मानसिक कर्म. आहारविहारातील विपरीततेप्रमाणेच वर्षा ऋतूत शीतता, शीत ऋतूत उष्णता याप्रमाणे कालगत विपरीतताही दोषांच्या कोपाला कारणीभूत होते. मानसकर्महीअसेच दोषप्रकोप उत्पन्न करते. मनात विकृती उद्‌भवली की तत्सहकारी असलेल्या मनोवह वातवाहिन्यांत म्हणजेच संज्ञावह स्रोतसांत विकृती उत्पन्न होते आणि परिणामी धातूंत विषमता उद्‌भवून तीतून निरनिराळे विकार संभवतात.

### रोगोत्पत्तीची प्रक्रिया

विकारांची उत्पत्ती दोषांच्या प्रकोपातून होते आणि हे दोष सर्व शरीरव्यापी असतात. परंतु, रोगांचा उद्‌भव मात्र सर्व शरीरात न होता एखाद्या विशिष्ट स्थानातच होतो. असे घडते याला कारण आहे. विशिष्ट आहारादिकांनी विशिष्ट दोष प्रकुपित होत असला तरी हा प्रकोप विशिष्ट स्थानीच व्याध्युत्पादक व्हावा हा त्या आहारादिकांतील विशेष गुणाचाच परिणाम होय. विशिष्ट स्थानीच विशिष्ट क्रिया करणाऱ्या या द्रव्यान्तर्गत गुणालाच प्रभाव म्हणतात. रोगाचा आविर्भाव विशिष्ट ठिकाणीच होण्याचे दुसरेही एक कारण आहे. ते म्हणजे स्थानिक वैगुण्य. प्रकुपित दोषांचे साहचर्य सहन करण्यास जी स्थाने असमर्थ ठरतात त्याच

अनुक्रमणिका

स्थानांत रोगांचा आविष्कार होतो. 'प्रकुपित झालेले दोष शरीरात संचार करीत असताना स्थानवैगुण्यामुळे जेथे प्रतिबद्ध होतात तेथे रोग उद्‌भवतो ['कुपितानां हि दोषाणां शरीरे परिधावताम्। यत्र संगः स्ववैगगुण्यात् व्याधिस्तत्रोपजायते'। – सु. सं.]', असे सुश्रुतसंहितेतही उल्लेखिले आहेच.

अर्थात् केवळ दोषप्रकोप झाल्यानेच व्याध्युत्पत्ती होते असे नाही. कित्येकदा असेही घडते की, नित्यक्रमानुसार दोष विकृत वा प्रकुपित होतात. परंतु, दोषांचा प्रतिकार करणाऱ्या शरीरान्तर्गत सामर्थ्यामुळे त्यांचा आपोआप उपशम होऊन जातो व रोगाचा आविर्भाव होत नाही. बलसंपन्न व्यक्तींना अपथ्यसेवनही व्याधिकार होत नाही, याचे कारण हेच. 'व्यायाम करणाऱ्या, मेदमज्जादि स्निग्ध धातूंनी संपन्न असणाऱ्या, प्रदीप्त जठराग्नीच्या, तारुण्यसंपन्न आणि बलशाली अशा व्यक्तींना अपथ्यसेवनही पीडाकर होत नाही', असे वाग्भटाचार्यांनीही म्हटले आहे ['व्यायामस्निग्धदीप्ताग्निवयस्थबलशालिनाम्। विरोध्यपि न पीडायै'। अ. हृ.].

अर्थात् शरीरातील प्रतिकारशक्ती कुपित दोषांचा उपशम करण्यास जेव्हा असमर्थ ठरते तेव्हाच नानाविध व्याधींचा संभव होतो हे उघड होय. एकाच परिस्थितीत असणाऱ्या व्यक्तींपैकी विशिष्ट रोगांचा प्रादुर्भाव काहींच्याच ठिकाणी होतो, आणि इतरांच्या ठिकाणी तो होत नाही, यात उपरिनिर्दिष्ट बलाबलच हेतूभूत असते हेही यावरून स्पष्ट होईल.

**साध्य, कष्टसाध्य, असाध्य**

ही जी रोगोत्पत्तीची प्रक्रिया वर सांगितली, तिच्या अनुषंगाने व साध्यासाध्यतेला अनुसरून रोगांचे प्रमुख प्रकार तीन संभवतात. सुखसाध्य, कष्टसाध्य व असाध्य, हे ते तीन प्रकार होत. सुखसाध्य विकार स्वल्पदोषोकद्‌भव व म्हणूनच सौम्य म्हणजे कमी त्रासदायक आणि उपद्रवरहित असून औषधादि चिकित्सेशिवायच बरे होतात. कष्टसाध्य विकारांत जोडीला उपद्रवही संभवतात. त्यांतील दोषांचे प्रमाण मध्यम असते आणि योग्य चिकित्सा केली तरच त्यांचा उपशम होतो. असाध्य गणलेले रोग मात्र बरेच त्रासदायक असतात.त्यांतील दोषांचे प्रमाण तर तीव्र असतेच पण त्यांत संभवणारे उपद्रवही तीव्र स्वरूपाचे असतात. अर्थात् योग्य चिकित्सा करूनही ते बरे होत नाहीत. 'ज्याची कारणे, पूर्वरूपे व रूपे ही साधारण आहेत, ज्यात उपद्रव नाहीत आणि द्रव्य, देश, ऋतू, प्रकृती हे ज्याचे समान आहेत तो विकार सुखसाध्य समजावा, ज्या विकारात शस्त्र, क्षार वगैरे साधनांचा उपयोग करावा लागतो आणि ज्यात लक्षणादिकांची संकीर्णता उत्पन्न होते तो रोग कष्टसाध्य समजावा आणि ज्यात सर्वच लक्षणे अत्यंत विपरीत स्वरूपात आढळतात तो असाध्य समजून त्याची चिकित्सा करू नये', असे यासंबंधी अष्टांगहृदयात म्हटले आहे ['....अल्पहेत्वग्ररूपरूपोऽनुपद्रवः। अतुल्यदूष्यदेशर्तुप्रकृतिः ...।.... सुखः। शस्त्रादिसाधनः कृच्छ्रः संकरे च ततो गदः।.... अनुपक्रम एव स्यात् स्थितोऽत्यंतविपर्यये। –अ.हृ.'].

---

# दर्शन १८—विविध विकारांचे शूलदाहशोथात्मक त्रैविध्य

## रोग म्हणजे दोषवैषम्य

वातादि दोष आणि त्यांच्या क्रिया यांतील वैषम्य विविध विकारांना कारणीभूत कसे होते, ते आता पाहावयाचे. शारीर धातूंची आणि शरीरबलाची वृद्धी श्वसन, पचन, आदि स्वाभाविक क्रियांच्या योगाने होत असते. या क्रियांत उद्भवणाऱ्या वैषम्यालाच व्याधी म्हणतात. दोषवैषम्य म्हणजे रोग, असा अष्टांगहृदयात उल्लेखही आहे. ['रोगस्तु दोषवैषम्यम्—' अ. हृ.]. चरकसंहितेत दोषवैषम्याऐवजी धातुवैषम्याला रोग म्हटले आहे ['रोगस्तु धातुवैषम्यम्'— च. सं.]. अर्थात् विकृत दोषांपासून रोगोत्पत्ती होण्यासाठी त्यांच्या क्रियांतही विषमता उद्भवावी लागते. 'रोगस्तु दोषवैषम्यम्' असे म्हणणाऱ्या वाग्भटाचार्यांचा अभिप्राय सुद्धा दोष उन्मार्गगामी झाल्यानंतर मगच रोगोत्पत्ती होते, असाच असल्याचे दिसते. 'दोषांच्या उन्मार्गगामितेलाच कोप म्हणतात, या कोपावस्थेतच दोषांची ती ही लक्षणे प्रकट होतात आणि अस्वस्थता व रोग यांचा उद्भव होतो', असे ते म्हणतात ['कोपस्तून्मार्गगामिता । लिंगानां दर्शनं स्वेषां अस्वास्थ्यं रोगसंभवः' । अ. हृ.]. तीन प्रकारच्या क्रियावैषम्यातून उद्भवणारे विकार आमाशयादि स्थाने आणि ज्वरादि लक्षणे यांना अनुसरून अनेक आणि अनेकविध संभवत असले तरी शरीरगत धातूंचा आणि क्रियांचा ऱ्हास होणे हा परिणाम सर्वांत सामान्यत्वाने आढळून येतो. सार्वदेहिक व प्रादेशिक विकारांच्या बलाबलानुसार या ऱ्हासक्रियेत न्यूनाधिक्य दिसले तरी हा ऱ्हास सर्व विकारांत घडून येतोच.

## सार्वदेहिक व प्रादेशिक रोग

शारीर धातूंपैकी काहींचा ऱ्हास काही रोगांत सार्वदेहिक स्वरूपात होतो तर काही रोगात विशिष्ट अवयवांपुरताच तो मर्यादित असतो. सर्वच धातू सर्वदा ऱ्हास पावतात असे नव्हे. रसरक्तादि सातही धातू काही रोगात ऱ्हास पावतात तर काहीत विशिष्ट धातूच क्षीण होतात. सर्व शरीराप्रमाणे शरीराच्या एखाद्या अवयवातही असा प्रकार घडतो. म्हणजे त्यातही कधी समस्त धातूंचा तर कधी काहींचाच क्षय होतो. शरीरातील समस्त धातूंचा अथवा सर्व शरीरातील कोणत्याही एका धातूचा ज्या विकारात ऱ्हास घडून येतो त्यांना सार्वदेहिक रोग म्हणतात तर विशिष्ट भागात उद्भवणाऱ्या रोगांना प्रादेशिक रोग म्हणतात. काही रोगांत त्यांच्या असाध्यावस्थेत धातूंचा क्षय सर्वांशाने होतो तर काहीत तो अंशतःच घडून येतो. हे न्यूनाधिक्य दोषांच्या बलाबलावर अवलंबून असते.

## साध्यासाध्यता

शारीर धातूंच्या ठिकाणी असणाऱ्या स्वाभाविक सामर्थ्याकडून आमयुक्त व दुष्ट दोषांचा ज्या वेळी प्रतीकार करण्यात येतो त्यावेळी रोगविनाश होऊन धातूंचीही अभिवृद्धी होते. परंतु, हेच धातू दुष्ट दोषांचा उपमश करण्याच्या कामी ज्या वेळी असमर्थ ठरतात तेव्हा त्यांचा ऱ्हास होतो आणि विकारही असाध्य अवस्थेस प्राप्त होतात. अर्थात् शरीरगत सामर्थ्याकडून दोषांचा प्रतीकार झाला तर चिकित्सा न करताही रोगपरिहार होतो. उलटपक्षी दोषांचा उपमश करण्यासाठी चिकित्सेचे साहाय्य घेऊन सुद्धा धातुगत सामर्थ्यच जर उणे ठरले तर रोग असाध्य होतात.

अनुक्रमणिका

**धातूंचा द्विविध ऱ्हास**

शारीर धातूंचा ऱ्हास दोन कारणांनी घडून येतो. धातूंची उत्पती नित्यापेक्षा जेव्हा कमी प्रमाणात होते तेव्हा, आणि उत्पत्तिविनाशात्मक स्वाभाविक क्रम सोडून धातूंचा ऱ्हासच अधिक प्रमाणात घडून येतो तेव्हा. पचनपोषणादि क्रियांतील वैषम्याला अनुसरूनच हे घडून येते.

धांतूंची उत्पत्ती कमी प्रमाणात होण्याला पचनादि शारीर क्रियांतील वैषम्यच कारण असते. त्यामुळे हितकर आणि धातुपोषक आहार सेवन करून सुद्धा धातूंची उत्पत्ती पर्याप्त प्रमाणात होऊ शकत नाही.

याउलट, शारीर क्रियांच्या अतियोगातून म्हणजे त्या अतिरिक्त प्रमाणात झाल्यानेही धातूंचा क्षय होऊ शकतो. दैहिक कर्माचा हा अतियोग दोन प्रकारचा असतो. एक स्वाभाविक आणि दुसरा अस्वाभाविक. श्रम, व्यायाम, व्यवाय आदि कर्मांचा अतियोग हा स्वाभाविक असतो तर रोगोत्पादक आणि क्लेशदायक अतियोग अस्वाभाविक असतो. शारीर क्रियांच्या या अतियोगामुळे श्रांत, क्लान्त झालेले रसादि धातूंचे अंश सत्त्वहीन होतात आणि परिणामी मलस्वरूप पावतात. अतियोगामुळे संभवणारा धातुक्षय असा घडून येतो.

**धातुघटकांचा त्रिविध क्षय**

वातादि दोषांच्या स्वाभाविक क्रियांत वैषम्य उद्‌भवले म्हणजे धातुघटकांच्या उत्पादनातही वैषम्य उत्पन्न होते. अतिश्रमामुळे रूक्ष, शुष्क असा आहार सेवन केल्याने सुद्धा शारीर धातूंतील स्निग्धता व द्रवता कमी होते, ते रूक्ष व शुष्क होतात. धातू रूक्ष व शुष्क होण्याचा परिणाम स्रोतसे संकुचित होण्यात होतो. आहारातील धातुपोषक अंशांचे अभिवहन या संकुचित झालेल्या स्रोतोमार्गांतून पर्याप्त प्रमाणात होऊ शकत नाही. आणि अशा प्रकारे त्या अंशांचे ग्रहण करण्यास अक्षम ठरलेल्या शारीर धातूंचे पोषणही फलतः मंदावते. मात्र याही स्थितीत त्यांना नित्याच्या चलनादि क्रिया कराव्या लागतातच. त्यामुळे ते क्षीणसार होतात आणि आपापली नित्याची कर्मे यथावत् करण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठायी उरत नाही. शारीर धातूंत संभवणारी ही क्षयरूपी विकृती वातजनित म्हणजे वातदोषाच्या वैषम्यातून निर्माण होत असते.

धातूंच्या उत्पादनात अन्य कारणानेही खंड पडू शकतो. स्निग्ध व द्रवरूप द्रव्यांचे प्रमाण शरीरात वाजवीपेक्षा अधिक झाले की, त्यांच्या योगाने स्रोतसांचा अवरोध होतो आणि त्यामुळे पोषक द्रव्यांचे अंश आत्मसात् करून घेण्याच्या कामी धातू अक्षम ठरतात. स्निग्ध व द्रवरूप द्रव्यांचां स्रोतसांच्या ठिकाणी प्रमाणाहून अधिक संचय होण्याच्या या अवस्थेला अभिष्यंद असे नांव असून हा अभिष्यंदच शोथ आणि स्यंद यांना कारणीभूत होतो. धातूंचे पोषण न होणे हा परिणाम त्यामुळेही घडून येतो व ते सत्त्वहीन होतात. या प्रकारे होणारा धातुक्षय श्लेष्मविकृतीतून उद्‌भवतो.

वायू आणि कफ यांच्याप्रमाणेच विकृत पित्तही धातुक्षयाला कारणीभूत होऊ शकते. तीक्ष्ण, उष्ण आदि आहाराचे सेवन केल्याने धातूंत विदग्धता उत्पन्न होते. विदग्धता म्हणजे पचनातील वैषम्यच. या विदाहामुळे धातूंचे पोषण तर नीट होत नाहीच परंतु, त्यांच्या ठिकाणी कोथ निर्माण होतो. विदग्धतेचा परिणाम म्हणून धातुघटकांच्या ठिकाणी जी विनाशोन्मुख अवस्था प्राप्त होते तिलाच कोथ म्हणतात. धातुक्षयाचा हा प्रकार अर्थातच विकृतपित्तजनित असतो.

अनुक्रमणिका

विदाहामुळे पित्तज विकृतींत ज्याप्रमाणे कोथ उत्पन्न होतो त्याप्रमाणे वातज व कफज विकृतींतही कोथाचा प्रादुर्भाव होतो. रूक्ष, शुष्क आहारामुळे धातुघटक शुष्क होवोत अथवा द्रवप्राय व स्निग्धगुणी आहाराच्या अतियोगाने त्यांच्यात क्लेद उत्पन्न होवो, ते शेवटी सत्त्वहीन व म्हणूनच मलस्वरूप होतातच. या मलप्राय अंशांना पुढे कोथावस्था प्राप्त होते.

शोष, क्लेद व कोथ ही तीन याप्रमाणे धातुक्षयाची प्रमुख कारणे असून नानाविध रोगांचे प्रकारही तदनुसार तीनच संभवतात. स्थाने, लक्षणे आणि नांवे यांना अनुसरून रोगांचे प्रकार अनेक होत असले तरी त्या सर्वांचा अंतर्भाव वरील तीन प्रकारांत होऊ शकतो. चलन, पचन व पोषण या क्रिया स्वाभाविक अथवा अविकृत स्थितीत असल्या म्हणजे त्यांचा परिणाम शारीर धातूंचे सम्यक् पोषण होण्यात घडून येतो. परंतु, त्यांच्यात विकृती उद्‌भवली म्हणजे मात्र धातुसंवर्धनाऐवजी धातुक्षय होणे हा परिणाम घडून येतो. अशा स्थितीतील या पचनादि क्रियांनाच विकार म्हणजे विक्रिया या संज्ञेने संबोधण्यात येते. अर्थात् स्थानभेदांनुसार आणि रोगी व रोग यांच्या बलाबलानुसार विकारांत भेद अनेक संभवत असले तरी प्रत्येक विकाराचे पर्यवसान शेवटी धातुक्षयातच होते हे निर्विवाद. शरीरातील प्रमुख क्रियांच्या त्रैविध्याला अनुसरून त्यांच्या विक्रियांत सुद्धा त्रैविध्यच संभवते, आणि हे शोषादिरूप त्रैविध्यच सर्व व्याधींना कारणीभूत असल्याने सर्व विकारांचेही प्रमुख भेद तीनच संभवतात. त्यांपैकी काही शोषोद्‌भव असतात, काही क्लेदोत्पन्न असतात तर काही कोथजनित असतात. शोषावस्थेतील व क्लेदावस्थेतील विकारांची उपेक्षा झाली तर कालान्तराने त्यांतही शेवटी कोथावस्था प्राप्त होते, हेही येथेच ध्यानात ठेवण्यासारखे आहे.

**कोथ म्हणजे विकृत पचनच**

संश्लेषण अथवा एकीभाव हे धातूंच्या अभिवृद्धीचे प्रधान कारण असून विश्लेषण अथवा पृथक्‌भाव हे सुसंहत अथवा एकीभूत झालेल्या धातुघटकांचा ऱ्हास होण्याचे प्रमुख कारण होय. धातुघटकांचे विश्लेषण अर्थात्‌च पचनक्रियेमुळे होत असते. ज्याच्या योगाने अवश्यकतेहून अधिक शीघ्रतेने ते घडून येते, त्या पचनवैषम्याला अथवा विकृत पचनालाच कोथ म्हणतात. धातुघटकांच्या विश्लेषणाला प्राधान्याने तोच कारणीभूत होतो. ही कोथावस्था जोवर उत्पन्न होत नाही, तोवर, शोषणामुळे सत्त्वहीन व क्षीण झालेल्या धात्वंशांचे सुद्धा विशीरण होत नाही. धातुघटक क्षीण व मलस्वरूप झाले की, त्यांत क्लेद उत्पन्न होतो व नंतरच त्यांना कोथावस्था प्राप्त होते. क्लेदाविना कोथ संभवतच नाही [विश्लेषणात्मक स्यंदनाला प्रथम द्रवत्व कारणीभूत व्हावे,हे सुसंगतच होय.]. तसेच धातुघटकांत अभिष्यंद अथवा क्लेद उत्पन्न होऊन सुद्धा जोवर त्यांत कोथ उद्‌भवत नाही तोवर ते विशीर्ण होत नाहीत.

रसरक्तादि धातूंच्या ठिकाणी या शोषादि अवस्था वर सुचविल्याप्रमाणे आधी शोष, नंतर क्लेद व मागून कोथ या क्रमानुसार जश्या निर्माण होतात तश्याच त्या हा क्रम सोडून देखील उत्पन्न होऊ शकतात. अर्थात् विकृतीच्या कारणानुसार कधी क्लेद तर कधी कोथ सुद्धा आरंभी उद्‌भवू शकतो. एक गोष्ट मात्र खरी की, यच्चयावत् सर्व विकार, मग ते शोषादि क्रमानुसार निर्माण झालेले असोत वा तो क्रम सोडून त्यांची उत्पत्ती झालेली असो, ते जेव्हा धातुक्षयात परिणत होतात तेव्हा त्याला प्राधान्याने कोथच कारणीभूत होत असतो कारण होत मुख्यतः विश्लेषणकारी असतो.

अनुक्रमणिका

**शोषाचे स्वरूप**

शोष व कोथ यांचे वैशिष्ट्य काही उदाहरणांवरून आणखी विशद होऊ शकेल. व्यवायादि कर्मे आणि अतिश्रमादि साहसपूर्ण गोष्टी यांचा अतिरेक झाल्याने धातू शुष्क होतात. धातूंच्या या शुष्कतेलाच शोष असे नाव आहे. राजयक्ष्म्याचा पर्यायवाचक म्हणून उल्लेखिण्यात आलेला शोष हा विकार मात्र प्रस्तुत धातुक्षीणतारूपी शोषाहून भिन्न होय. आणि म्हणूनच क्षय हा राजयक्ष्म्याचा, एक हेतू म्हणून सांगण्यात आला आहे. 'अतिरिक्त श्रम, वेगसंधारण, क्षय आणि विषमाशन ही राजक्ष्म्याची चार कारणे होत,' असे चरकाचार्यांनी म्हटले आहे ['अयथाबलमारंभं वेगसंधारणं क्षयम् । यक्ष्मणः कारणं विद्यात् चतुर्थं विषमाशनम्' । च. सं.]तर 'शोष (म्हणजे राजयक्ष्मा) या विकाराला क्षय देखील कारणीभूत होतो', असे आचार्य माधवांनी निर्देशिले आहे ['क्षयो रोगस्य हेतुत्वे शोषस्याप्युपजायते' । मा. नि.]. शोषनामक विकारांच्या यादीत सांगितलेले रोगही राजयक्ष्म्याहून भिन्नच आढळतात. उदाहरणार्थ, 'व्यवाय, शोक, वार्धक्य, व्यायाम, दीर्घ मार्गक्रमण, उपवास या कारणींनी तसेच व्रण उरःक्षत यांमुळे संभवणाऱ्या रोगांनाही कित्येकजण शोषच मानतात', असे सुश्रुताचार्यांनी म्हटले आहे [व्यवायशोकस्थाविर्यव्यायामाध्वोपवासतः । व्रणोरःक्षतपीडाभ्यां शोषानन्ये वदन्ति हि । ' सु. सं. ।]. तसेच, 'व्यवायादिकांच्या अतिरेकातून उद्भवणारे आणि रक्तक्षय, मांसक्षय याप्रमाणे त्या त्या धातूचा क्षय सुचविणाऱ्या नांवांनी उल्लेखिण्यात आलेले विकार हे क्षयाचेच प्रकार होत', असेही त्यांचे वचन आहे ['क्षया एव हि ते ज्ञेयाः प्रत्येकं धातुसंचिताः'सु. सं.]. इतकेच नव्हे तर 'त्या क्षयसंज्ञक विकारांची चिकित्साही पूर्वी धातुक्षय चिकित्सेत सांगण्यात आली आहे', असे सांगून ['चिकित्सितं तु तेषां हि प्रागुक्तं धातुसंक्षये' । सु. सं.] उपरिनिर्दिष्ट क्षयनामक विकारांची चिकित्सा राजयक्ष्म्याच्या चिकित्सेहून भिन्न असल्याचेही सुश्रुताचार्यांनी सुचविले आहे.

अशा प्रकारे कोणत्याही कारणाने का होईना पण धातू शुष्क वा क्षीण झाल्यानंतर त्यांच्यात जेव्हा क्लेद म्हणजे अभिष्यन्द उत्पन्न होतो तेव्हा उत्पत्ती, वृद्धी, पचन, पोषण या क्रिया त्या धातुघटकांत मग घडेनाश्या होतात. कारण क्लेदाच्या म्हणजे द्रवद्रव्यांच्या अभिवृद्धीमुळे अवरुद्ध झालेल्या स्रोतसांत रसाचा प्रवेशच होऊ शकत नाही. 'रक्ताचाच मार्ग अवरुद्ध झाल्याने पुढे मांसादिकांची उत्पत्तीही होऊ शकत नाही', असे चरकसंहितेत ['रक्तं विबद्धमार्गत्वात् मांसादीन् नानुपद्यते'.. च. सं.] तर 'स्रोतसांचा अवरोध झाला की रस रक्ताचीच उत्पत्ती करू शकत नाही, मग पुढे मांसाची काय करणार?', असे अष्टांगहृदयात ['रसोऽप्यस्य न रक्ताय मांसाय कुत एव च' – अ. हृ.] यासंबंधी म्हटले आहे. सुश्रुतसंहितेत[कफप्रधानैः दोषैस्तु रुद्धेषु रसवर्त्मसु .. । क्षीयन्ते धातवः सर्वे ...' । सु. सं.] देखील 'कफप्रधान दोषांनी रसवह स्रोतसे अवरुद्ध झाली की, सर्व धातू क्षीण होऊ लागतात', असेच सांगितले आहे. अशाप्रकारे अभिष्यंदामुळे स्रोतसांचा अवरोध होऊन धातूंचे उत्पादन, पोषण वगैरे बंद झाले की नंतर त्यांचा कोथ होऊ लागतो आणि परिणामी ते विशीर्ण होतात. या धातुविनाशक अवस्थेलाच राजयक्ष्मा हे नांव देण्यात आले आहे. राजयक्ष्म्याचे जे कासश्वासादि उपद्रव सांगण्यात आले आहेत त्यांची उत्पत्ती क्लेदकोथातूनच होत असते. राजयक्ष्म्याची जी त्रिदोषोद्भव अकरा लक्षणे सांगण्यात आली आहेत त्यांत कास, श्वास व रक्तपित्त ही प्रधान आहेत. इतर लक्षणे नसताही केवळ हीच तीन असली तरी देखील प्रस्तुत विकारात असाध्य अवस्था प्राप्त होते असा निर्देशही आढळतो. उदाहरणार्थ, 'कास, श्वास, रक्तपित्त या लक्षणांनी पीडिलेल्या शोषग्रस्त म्हणजे राजयक्ष्मी रोग्याला सोडून द्यावे' म्हणजे त्याची चिकित्सा करू नये, असे आचार्य सुश्रुतांचे सांगणे आहे ['त्रिभिर्वा पीडितं लिंगैः कासश्वासासृगामयैः । जह्यात् शोषर्दितं जन्तुं' ... । सु. सं.]. श्लेष्मविकृतिस्वरूप क्लेदापासून व पित्तविकृतिस्वरूप कोथापासून या लक्षणत्रयीचा उगम होतो. 'ज्वर, दाह, अतिसार व रक्तपित्त हे विकार प्रकुपित पित्तापासून तर मस्तक भरल्यासारखे वाटणे, अनन्नाभिलाष, कास आणि कंठोध्वंस हे विकार कफप्रकोपासून संभवतात', असा सुश्रुतसंहितेत उल्लेखही आहे ['ज्वरो दाहोऽतिसारश्च पित्तात् रक्तस्य चागमः । शिरसः परिपूर्णत्वमभक्तश्छंद एव च । कासः कंठस्य चोध्वंसो विज्ञेयः कफकोपतः' । सु.सं.].

अनुक्रमणिका

राजयक्ष्म्याच्या अकरा लक्षणांपैकी सामान्यतः धातुक्षयसूचक असलेली स्वरभेद, शूल, अंसपार्श्वसंकोच ही तीन लक्षणे वायूची म्हणून उल्लेखिण्यात आली आहेत ['स्वरभेदोऽनिलात् शूलं संकोचश्चांसपार्श्वयोः' –सु. सं.]. ज्वर, कास, रक्तपित्त इत्यादि जे उपद्रव श्लेष्मपित्तोद्‌भव म्हणून सांगण्यात आले आहेत ते क्लेदकोथोद्‌भवच होत. हे क्लेद व कोथ ज्यांत नसतात आणि जे केवळ शोषस्वरूप असतात, अशा रोगांतील उपद्रवही तीव्र स्वरूपाचे नसतात. शोष या संज्ञेने अशाच विकारांचा निर्देश करण्यात आला आहे. ता पर्य, शरीराच्या कोणत्याही एका भागात अथवा रसादिकांपैकी कोणत्याही एका धातूत संभवणारा क्लेदकोथविवर्जित क्षय म्हणजे शोष.

### कोथाचे स्वरूप

शरीराचे स्वाभाविक कर्म संश्लेषणात्मक असते. अर्थात् अभिवृद्धिकर द्रव्यांचे संश्लेषण होण्यानेच शारीर घटकांची वाढ होत असते. या संश्लेषणकर्मात हीनयोग संभवला म्हणजे शरीरातील धातुघटकांत शोष निर्माण होतो. उलट, त्याच क्रियेच्या अतियोगाने पोषक द्रव्यांचा शारीर धातूंत अधिक प्रमाणात व म्हणूनच अस्वाभाविक संचय होतो. संश्लेषणात्मक कर्म होण्याऐवजी धातुघटकांच्या विनाशाला कारणीभूत होणारे विश्लेषणात्मक कर्म होणे हा मिथ्यायोग. हे कर्म अस्वाभाविक असते. याप्रमाणे शारीर द्रव्यांच्या स्वाभाविक उत्पादनकर्मात हीनयोग, अतियोग व मिथ्यायोग अशी तीन प्रकारची विकृती संभवते. त्यांपैकी हीनयोगाचा परिणाम धातुघटकांच्या ऱ्हासात होतो. तर अतियोगाने याच धातुघटकांची नको इतक्या अधिक प्रमाणात वाढ होते. मिथ्यायोगामुळे तर धातुघटकांचा नाशच होतो. या तिघांपैकी हीनयोग आणि अतियोग हे स्वाभाविक कर्मांचेच असल्याने ते विशेषसे उपद्रवकारक होत नाहीत. परंतु, मिथ्यायोग हे कर्मच अस्वाभाविक असल्याने त्यातील उपद्रव विशेष तीव्र असतात. हीनयोग व अतियोग या दोघांतूनही विकारांची उत्पत्ती होत असतेच. कारण रसादि धातूंपैकी एखाद्याचे उत्पादन प्रमाणापेक्षा कमीवा अधिक होणे हे क्रियावैषम्यच होय. परंतु, मिथ्यायोगरूपी क्रियावैषम्यात तीव्रता विशेष असून ते विनाशकही होते. कारण स्वाभाविक उत्पादनकर्माच्या अभावी त्यात विश्लेषणात्मकता असते. अशा या मिथ्यायोगालाच कोथ म्हणतात.

हा कोथ धातूंच्या क्षीणावस्थेत उत्पन्न होतो. पोषणाच्या अल्पतेमुळे सत्त्वहीन व मलस्वरूप झालेले अंश यथावत् प्रमाणात उत्सर्जित न झाले की, त्यांचा संचय होतो. त्यांचे उत्सर्जन झाले तर पुढे क्लेदादि विकृती उद्‌भवतच नाहीत. या संचयातूनच पुढे क्लेद म्हणजे अस्वाभाविक व विकारोत्पादक आर्द्रत्व व कोथ यांचा उद्‌भव होतो. अर्थात् धातूंचा शोष हा अशा प्रकारे रोगांना प्रत्यक्षतया हेतुभूत होत नाही. तर क्लेदकोथांना तो कारणीभूत होतो. तसेच, धातुघटकांचे विनाशकारी विश्लेषण म्हणजे रोग, या लक्षणानुसार शोष हा नानाविध रोगांचे कारण असला तरी तो एक स्वतंत्र व्याधी नव्हे, हेही ध्यानात ठेवण्यासारखे आहे.

### क्लेदावस्था–व शोथ कोथ

धातूंच्या ठिकाणी क्लेदावस्था उत्पन्न होण्याची प्रमुख कारणे दोन संभवतात. पैकी केवळ द्रवपाय व स्निग्ध पदार्थांचे नव्हे तर पथ्यकर व हितावह अशा आहार्य द्रव्यांचे देखील सेवन जर अधिक प्रमाणात झाले तर त्यांचे व फलतः धातूंचे पचन योग्यतया होत नाही. क्लेदोत्पत्तीचे हे एक कारण असून पचनक्रियेतील

वैषम्य अथवा मिथ्यायोग हे दुसरे कारण होय. त्याचाही परिणाम मलस्वरूप झालेल्या धात्वंशांच्या ठिकाणी आर्द्रता निर्माण होण्यात होतो.

या क्लेदावस्थेतूनच पुढे शोथ व कोथ यांची उत्पत्ती होते. क्लेदामुळे क्लेदस्थानातील स्रोतसांचा अवरोध होतो आणि संक्लिन्न धात्वंशांच्या ठिकाणी स्रवणोन्मुखता निर्माण होते, पेशी व स्नायू यांच्या चलनक्रियेत मांद्य येते आणि धात्वंशांचे अभिवहनही यथावत् प्रमाणात होईनासे होते. यातूनच शोथ उद्भवतो. एकाच जागी धातुघटक अधिक प्रमाणात संचित होण्याचा तो परिणाम असतो. 'शरीराच्या कोणत्याही एका भागात उत्सेधरूपाने दिसून येणारा त्वङ्मांसाश्रयी असा (साम) दोषसंचय म्हणजे शोफ (शोथ)', असे सुश्रुतसंहितेत म्हटले आहे ['त्वङ्मांसस्थायी दोषसंघातः शरीरैकदेशोत्थितः शोफ इत्युच्यते' –सु. सं.]. चरकांनीही उत्सेधसामान्य हेच शोथाचे लक्षण सांगितले आहे ['पुनश्चैक एव उत्सेधसामान्यात्' – च. सं.]. 'त्वचा व मांस यांच्या आश्रयाने उत्पन्न होणारा कठिण असा जो उंचवटा त्याला त्याच्या संचयात्मकतेमुळेच शोफ (शोथ) म्हणतात', या वचनात [त्वङ्मांससंश्रयम् । उत्सेधसंहतं शोफं तमाहुर्निचयादतः' । अ. हृ.]वाग्भटांनीही शोथाची संचयात्मकताच उल्लेखिलेली आहे. तात्पर्य, अयथावत् संचय म्हणजे शोथ. स्तंभ (स्तब्धता अथवा संचाराक्षमता), गुरुता (जडता), उत्सेघ (उंचवटा), शीतस्पर्शवत्त्व [ही अवस्था आरंभी म्हणजे शोथाच्या आमावस्थेत उत्पन्न होत असते. पच्यमान अवस्थेत मात्र दाह उद्भवतो. 'तत्र मंदोष्मता त्वक्सवर्णता शीतशोफता स्थैर्य मंदवेदनता अल्पशोफता च आमलक्षणं उदिद्ष्टम्...... दहयते पच्यते इव अग्निक्षाराभ्यां ओषचोषपरिदाहश्च भवन्ति ..... ज्वरदाहपिपासाभक्तारुचिश्च पच्यमानलिंगमिति' (सु. सं.) म्हणजे दाह कमी, त्वक्सवर्णता, शैत्ययुक्त सूज, स्थैर्य, वेदना मंद, सूज अल्प ही लक्षणे आमावस्थेची सूचक असून अग्नीने भाजल्यासारखे वाटणे, क्षाराने अभितप्त केल्यासारखे वाटणे, एकाच बाजूने आग होणे, उष्णतेमुळे शोष वा ओढ वाटणे, सर्व बाजूने आग होणे ज्वर, दाह, तहान, अन्नाविषयी अरुची ही पच्यमान अवस्थेची लक्षणे होत', असे सुश्रुताचार्यांनी म्हटले आहे.] अविपाक (सारकिट्टविवेचनरूपी पचनाचा अभाव) आणि शूल इत्यादि विकार या शोथापासून पुढे उत्पन्न होतात.

शोथकोथांना कारणीभूत होणाऱ्या क्लेदाची उत्पत्ती दोन प्रकारांनी होते. तगनुसार अविपाकोद्भव व मिथ्यापाकोद्भव असे त्याचे प्रकार दोन संभवतात. आहारादींचे स्वाभाविक पचन न होणे म्हणजे अविपाक. आणि धातूंच्या ठिकाणी विदग्धता उत्पन्न होणे हा मिथ्यापाक. अविपाकोद्भव क्लेद प्रायः शोथकर असतो तर मिथ्यापाकातून उद्भवणाऱ्या क्लेदापासून प्रायः [प्रायः असे मुद्दामच म्हटले. कारण अविपाकात जर तीक्ष्णता उद्भवली तर त्यापासूनही ज्याप्रमाणे कोथ संभवतो त्याचप्रमाणे मिथ्या विपाकात जर तीक्ष्णत्व उणावले तर त्यापासूनही प्रथम शोथ उत्पन्न होऊन नंतरच कोथावस्था निर्माण होते.] कोथ संभवतो.

या शोथकोथांना अनुसरून समस्त विकारांचे वर्गीकरणही दोन प्रकारांत करता येईल. कारण स्थानादि भेदांना अनुसरून रोगांचे प्रकार अनेक संभवत असले तरी त्यांपैकी काहीत शोथ तर काहीत कोथ हे लक्षण समान असल्याचे दिसून येते. शोथात्मक व कोथात्मक या दोन प्रकारांत म्हणूनच संपूर्ण रोगांचा समावेश होऊ शकतो. आणि या शोथकोथांची उत्पत्ती क्लेदापासून होत असल्याने सर्व रोग हे क्लेदहेतुक होत असेही म्हणता येईल. शोषावस्थेत सुद्धा जेव्हा उपद्रव तीव्र नसतात तेव्हा कोथाची उत्पत्ती क्लेदानंतरच होत असल्याने कोथाचेही कारण क्लेदच होय. प्रत्येक रोगाला हेतुभूत होणाऱ्या या क्लेदालाच अभिष्यंद म्हणतात. समस्त विकार अभिष्यंदोद्भव असतात असे सामान्यतः म्हणूनच मानण्यात येते.

### क्लेद आणि मूत्रमल

क्लेदाचे स्वरूप विशद करणे या ठिकाणी इष्ट होईल. आहारातून घेतलेली पोषक द्रव्ये जेव्हा द्रवरूप पावतात तेव्हाच त्यांचे शारीर धातूंत अभिसरण वा शोषण होऊ शकते. रसरक्तादि धातूंच्या

अनुक्रमणिका

उत्क्रांतीतही हेच तत्त्व अनुस्यूत आहे. म्हणजे पूर्व धातूचे विशिष्ट स्वरूप नष्ट होऊन त्याला द्रवावस्था प्राप्त झाल्यानंतर मगच उत्तर धातूच्या विशिष्ट रूपात तो उत्क्रांत होऊ शकतो. आहारद्रव्ये आणि शारीर धातू यांत घडून येणारे पचन म्हणजे सारकिट्टविवेचन हे सुद्धा द्रवावस्थेतच संभवू शकते. अर्थात् आहार व धातूंचा येणेप्रमाणे अशंतः ऱ्हास होणे व अंशतः त्यांची वृद्धी होणे या क्रिया शरीरात अखंडपणे पण क्रमशः चालूच असतात.

शरीरातील रसरक्तांच्या आश्रयाने राहणारा आणि त्यांच्यापेक्षा सत्त्वहीन पण आपल्या परीने देहधारणकर्मात साहाय्यभूत होणारा असा जो मलरूप द्रव त्यालाच मूत्र अशी संज्ञा आहे.

हा मूत्रसंज्ञक द्रव केवळ मूत्राशयातच असत नाही, तर तो सर्व शरीरव्यापी असतो. 'अवष्टंभ हे पुरीषाचे, क्लेदवाहन हे मूत्राचे वक्लेदविधृती हे स्वेदाचे कार्य होय'['अवष्टंभः पुरीषस्य मूत्रस्य क्लेदवाहम् । स्वेदस्य क्लेदविधृतिः ।' अ. हृ.] इत्यादि वचनांतून शारीर धातूंच्या ठिकाणी क्लेदाचे अभिवहन करणे हे मूत्रमलाचे कार्य निर्देशिण्यात आले असून ते शरीराला उपकारकही असते. मूत्राशयात संचित होणाऱ्या द्रवाचे हे कार्य अर्थातच नव्हे. कारण तो द्रव उत्सर्जनयोग्य असतो. त्वचादिकांच्या ठिकाणी आर्द्रता उत्पन्न करणाऱ्या व ती कायम ठेवणाऱ्या द्रवद्रव्यालाच उपरिनिर्दिष्ट मूत्र ही संज्ञा देण्यात आली आहे. हेच मूत्र देहकारक असते. 'शरीर हे दोषधातुमलमूलक होय'['दोषधातुमलमूलं हि शरीरम्'—सु. सं.] इत्यादि वचने, मलही देहधारक असल्याचे सांगतात. परंतु, ही देहधारणा बस्ती व पक्वाशय यात अनुक्रमे संचित होणाऱ्या उत्सर्जनीय अशा मूत्रपुरीषांच्याकडून होऊ शकणार नाही. अवष्टंभ हे पुरीषाचे व क्लेदवाहन हे मूत्राचे कार्य सांगणाऱ्या आयुर्वेदीय ग्रंथकारांनाही त्या ठिकाणी पक्वाशय व बस्ती यांत संचित होणारी उत्सर्जनीय द्रव्ये अभिप्रेत नाहीत. क्लेदविधृती करणाऱ्या स्वेदाबद्दलही असेच म्हणता येईल. रसरक्तांतील द्रव यथाकाल सत्त्वहीन व मलस्वरूप झाल्यानंतर बस्तीत संचित होतो व तो जलांश पुढे मूत्रमार्गाने उत्सर्जित होतो. शरीरान्तर्गत पेशी वगैरेतील आर्द्रतेला कारणीभूत होणारा स्वेदरूपी वा बाष्पावस्थावस्थित जलांशही कालान्तराने सत्त्वहीन झाला म्हणजे स्वेदवाहिनींच्याकडून त्याचे स्वेदरूपाने उत्सर्जन होते.

क्लेदाचे अभिवहन करणाऱ्या या मूत्रसंज्ञक जलांशाची शरीरात जेव्हा प्रमाणाबाहेर वाढ होते तेव्हा क्लेदाचीही अस्वाभाविक म्हणजे रोगोत्पत्तीला कारणीभूत होईल इतक्या प्रमाणात अभिवृद्धी होते. आहारादिकांत द्रवप्रधान द्रव्यांचे प्रमाण अधिक होण्याचा तो परिणाम असतो. उलटपक्षी, क्लेदाचा ऱ्हास करणाऱ्या रूक्ष व शुष्क अशा आहारादिकांनी क्लेदाचे शोषण होऊन परिणामी शरीरातही शोष संभवतो.

**मेहविकार**

उपरिनिर्दिष्ट मूत्राची म्हणजेच देहव्यापी जलांशाची वाढ प्रमाणाबाहेर झाली की यातून जे नानाविध मूत्रविकार उत्पन्न होतात त्यांनाच मेहविकार म्हणतात. मेहविकारातील सामान्य लक्षण म्हणजे मूत्राच्या अतिवृद्धीने धातूंच्या ठिकाणी, विशेषतः मांसधातूत, अभिष्यंद म्हणजे स्यंदनावस्था उत्पन्न होते. रस व रक्त हे धातू द्रवरूप असल्याने त्यांत होणारी क्लेदाची वाढ अस्वाभाविकता उत्पन्न करू शकत नाही. उलट, अस्थींच्या कठिणत्वामुळे आणि मेद, मज्जा व शुक्र या धातूंच्या स्निग्धतेमुळे या चारही धातूंत क्लेदाची वाढ होऊच शकत नाही. मांसधातू मात्र क्लेदाच्या वाढीला अनुकूल असतो. कारण त्याचे स्वरूप घन व मृदु असते. त्यातच अभिष्यंद संभवतो. मांसधातूची सुश्लिष्टता त्यामुळे नष्ट होते. त्याचे घटक वा अणू शिथिल होतात. शराविकादि प्रमेहपिडकांची उत्पत्तीही या मांसगत अभिष्यंदातूनच होते. प्रमेहविकारातील व्रणही

अनुक्रमणिका

या अभिष्यंदामुळेच कष्टसाध्य होतात. कारण अभिष्यंदामुळे शिथिल झालेल्या मांसाणूंचे पुनःसंधान कष्टानेच घडून येत असते. सर्वशरीरव्यापी जलांश म्हणजे क्लेद दूषित झाल्याने मांसघटकांतील संहतत्व कमी होते, हा विचार चरकसंहितेतही सूचित केलेला दिसतो. 'बहु व अबद्ध स्वरूपातील मेद, मांस, शरीरज क्लेद, शुक्र, शोणित, वसा, मज्जा, लसीका, रस व ओज ही प्रमेहातील दूष्ये होत', असे चरकचार्यांचे वचन असून [बहु अबद्धं मेदोमांसं शरीरजः क्लेदः शुक्रं शोणितं वसा मज्जा लसीका रसश्चौजः संख्याताः इति दूष्यविशेषाः'. –च. सं.], 'अबद्ध म्हणजे असंहत (शिथिल)', असे स्पष्टीकरण व्याख्याकार चक्रपाणींनी तेथे केले आहे [अबद्धमिति असंहतम्' –च. सं. व्याख्या ।]. प्रमेह विकारात शरीर शिथिल होते, हेही चरकाचार्यांनी उल्लेखिलेले आहे. 'प्रकुपित झालेला श्लेष्मा, शरीर शिथिल झाल्याकारणाने सर्व शरीरात त्वरीत प्रसृत होतो, आणि प्रथमतः तो मेदाशी मिश्र होतो', असे ते म्हणतात ['सः प्रकुपितः क्षिप्रमेव शरीरे विसृप्तिं लभते, शरीरशैथिल्यात्, स विसर्पन्, शरीरे मेदसैवादितो मिश्रीभावं गच्छति' – च. सं.]. हा प्रकुपित श्लेष्मा दूषित झालेल्या मांसधातूत शराविकादि पूययुक्त मांसपिडका उत्पन्न करतो ['स मांसे मांसप्रदोषात् पूतिमांसपिडकाः शराविकाद्याः संजनयति' –च. सं.], या वचनात प्रमेहातील मांसदुष्टीही चरकाचार्यांनी निर्देशिली आहे. या सर्व लक्षणांवरून प्रमेहविकार हे सर्वदेहव्यापी असतात आणि त्यांना कारणीभूत होणारा अभिष्यंद हा मुख्यतः मांसगत असतो, हे अभिव्यक्त होऊ शकते. पुष्कळ व गढूळ मूत्रप्रवृत्ती हे प्रमेहविकारांचे सामान्य स्वरूप सांगण्यात आले असले ['सामान्यं लक्षणं तेषां प्रभूताविलमूत्रता' । – अ. हृ.] तरी प्रमेहविकार केवळ वृक्क वा बस्ती यांच्याच आश्रयाने उद्‌भवणारे नसतात तर ते सर्वदेहव्यापी असतात. सर्व शरीरात संचार करणाऱ्या मूत्रसंज्ञक क्लेदाच्या दुष्टीमुळे ते संभवतात. म्हणूनच त्यांना मूत्रविकार म्हणतात. शारीर अवयवांची (कधी सर्व तर कधी काही) प्रमाणातिरिक्त वा अस्वाभाविक क्लिन्नावस्था अथवा सजलस्थिती, हे त्याचे थोडक्यात स्वरूप होय.

**क्लेदोत्पन्न विकारांचे प्रकार**

शरीराच्या ज्या ज्या भागात क्लेदाची अभिवृद्धी होते त्या त्या भागात नानाविध रोग उत्पन्न होतात. वातादि दोष व रसादि दूष्ये यांना अनुसरून ज्याप्रमाणे क्लेदाचे प्रकार संभवतात त्याचप्रमाणे या क्लेदाची अभिवृद्धी शरीराच्या कोणत्याही भागात होऊ शकत असल्यामुळे क्लेदोत्पन्न विकारांचे स्थानभेदानुसार देखील अनेक प्रकार संभवू शकतात.

सार्वदेहिक मांसधातूत ज्यावेळी अभिष्यंद उत्पन्न होतो तेव्हा जलांशाची अभिवृद्धी होऊन प्रमेहविकार उत्पन्न होतो. पुष्कळ व गढूळ मूत्रप्रवृत्ती हे या विकारातील लक्षण, विकृतिचा संचार सर्व शरीरात झाल्यानंतर प्रत्यन्तराला येते. रसधात्वाश्रित क्लेदाची वाढ झाली की, रसरक्तवह स्रोतसे त्या योगे अतिपूरित होतात व आमवात हा विकार उत्पन्न होतो. आमयुक्त वायू हा या विकृतीला कारणीभूत होतो. 'अन्नज रस वातपित्तकफांच्या योगाने अधिकच दूषित, अनेक वर्णयुक्त व बुळबुळीत होऊन स्रोतसांच्या ठिकाणी अभिष्यन्द उत्पन्न करतो', असे माधवचार्यांनी आमवाताच्या वर्णनात सांगितले आहे ['वातपित्तकफैर्भूयो दूषितः सोऽन्नजो रसः । स्रोतांस्यभिष्यंदयति नानावर्णोऽतिपिच्छिलः' । मा. नि.]. अतिप्रमाणात वाढलेला क्लेद जेव्हा मूत्राशयानुगामी स्रोतसांच्या कडून बस्तीत संचित होतो तेव्हा मूत्रमार्गाने अतिप्रमाणात त्याचे उत्सर्जन होऊ लागते. अतिमूत्र वा बहुमूत्र यालाच म्हणतात. क्लेदाचा अतिरिक्त संचय जेव्हा उदरात म्हणजे उदरान्तर्गत कलेत होतो तेव्हा उदर [या ठिकाणी उदर म्हणजे जलोदर समजावयाचे. कारण वातोदरादि अन्य प्रकारांत जलसंचय नसतो.] होते. आणि तोच क्लेद अंडकोशात संचित झाला म्हणजे मूत्रवृद्धी हा विकार उद्‌भवतो. अंडकोश पाण्याने पखालीप्रमाणे भरलेला वाटणे, त्यात क्षोम व पीडा जाणवणे आणि त्याचा स्पर्श मुदु भासणे ही मूत्रवृद्धिची लक्षणे माधवचार्यांनी सांगितलेली आहेत ['अंभोभिः पूर्णदृतिवत् क्षोभं याति सरुक् मृदुः' । मा. नि.].

अनुक्रमणिका

उपरिनिर्दिष्ट विकारांत क्लेदाची अभिवृद्धी अशाप्रकारे समान असताही स्थानभेदांनुसार तीत वैविध्य उत्पन्न होते. आणि ते स्पष्ट व्हावे या उद्देशानेच या सर्व क्लेदोत्पन्न विकारांना आमवात, उदर, मूत्रवृद्धी इत्यादि निरनिराळी नांवे देण्यात आली आहेत.

रसधात्वाश्रयी क्लेदाची वाढ शरीराच्या सर्व विभागांत मिळून झाली की सर्वांगशोथ (सर्व शरीरावर सूज येणे) हा विकार उत्पन्न होतो. उलट, हात, पाय, पोट, पाठ याप्रमाणे एखाद्या अवयवात ती घडून आली तर प्रादेशिक शोथ (त्या त्या अवयवाची सूज) उद्‌भवतो. हा प्रादेशिक शोथच परिपक्व झाला म्हणजे व्रणरूप पावतो. 'विशिष्ट जागी उद्‌भवलेला शोथ हे व्रणाचे पूर्वलक्षण होय', असे माधवाचार्यांचे वचन आहेच ['एकदेशोत्थितः शोथो व्रणानां पूर्वलक्षणम्' । – मा. नि.]

रसधातूप्रमाणे मांसधातूतील क्लेदाचीही दुष्टी होते. ग्रंथी, अबुर्द, अपची, गंडमाळा, विद्रधी इत्यादि विकार त्यातूनच उद्‌भवतात. ते सर्व मांसविकृतिजनित असतात. निरनिराळ्या ठिकाणच्या पण मांसधात्वाश्रयी क्लेदाच्या अतिवृद्धीतूनच या सर्वांची उत्पत्ती होते.

**श्लेष्मविकारांची शोथलक्षणात्मकता**

सर्व क्लेदोत्पन्न विकारांत शोथ हे लक्षण सामान्यत्वाने विद्यमान असतेच. रस, रक्त, मांस, क्लेद इत्यादि द्रव्यांचा एखाद्या ठिकाणी अधिक काळ आणि अधिक प्रमाणात संचय झाला म्हणजे त्यातून शोथ उद्‌भवतो. किंबहुना, हा संचय म्हणजेच शोथ. संचय अथवा संग्रह हे कार्य कफाचे आहे. कफाच्या या स्वाभाविक कार्यात वैषम्य आले की शोथ उद्‌भवतो. तो अर्थात् श्लेष्मोद्‌भव असतो. म्हणूनच सार्वदेहिक आणि प्रादेशिक असे शोथलक्षणात्मक सर्व विकार स्वरूपशः व स्थानांनुसार विभिन्न असले तरी ते सर्व श्लेष्मोत्पन्नच होत. वाग्भटाचार्यांनी म्हणूनच म्हटले आहे की, 'वायूशिवाय शूल, पित्ताशिवाय दाह आणि कफाशिवाय शोफ (शोथ) संभवत नाही' ['शूलं नर्तेऽनिलात् दाहः पित्तात् शोफः कफोदयात् – अ. हृ.].

**कोथोत्पन्न विकार**

क्लेदानंतर आता कोथाचा व तदुत्पन्न विकारांचा विचार करावयाचा. देहाचे पोषण करणाऱ्या आहारांशांतील सारभाग व मलभाग यांचे एकमेकांपा सूनपृथक्करण होणे, हे पचनाचे स्वाभाविक स्वरूप. परंतु, या पचनकार्यात जेव्हा अस्वाभाविकता उद्‌भवते तेव्हा शरीरगत द्रव्यांतील म्हणजेच धातूंतील घटकांचे पृथक्करण होऊ लागते. पित्तप्रकोपक अशा तीक्ष्णोष्ण आहाराचा परिणाम क्लेदात दाहकता उत्पन्न होण्यात होतो. या दाहामुळे संघटित धातुघटकांना एकमेकांचा सहवास त्रासदायक वाटू लागून ते विघटित होऊ लागतात. आणि परिणामी त्यांच्यात कोथावस्था म्हणजे विशीर्णता उत्पन्न होते. हा कोथ कधी रस व रक्त या द्रवधातूंत संभवतो तर कधी मांस, अस्थी या घन धातूंतही संभवतो. मेद, मज्जा आणि शुक्र या उभयस्वरूपी धातूंत देखील तो कित्येकदा घडून येतो. अर्थात् ज्यांत कोथावस्था सामान्यत्वाने विद्यमान आहे, अशा विकारांतही दूष्ये व स्थाने यांना अनुसरून विभिन्नस्वरूपता संभवतेच.

कोथ जेव्हा रसरक्ताश्रित असतो तेव्हा पांडू रोग, कामला इ. विकार उद्‌भवतात. पांडुरोगाच्या वर्णनात चरकाचार्य सांगतात की, 'प्रकुपित झालेले हृदयस्थ पित्त बलवान् वायूकडून प्रथम हृदयसंबंधी धमनींमध्ये व नंतर त्यांच्या द्वारे सर्व शरीरात विक्षेपित होते. नंतर ते त्वचा व मांस यांच्यामध्ये आश्रय करून राहते व कफ, वायू, रक्त, त्वचा, मांस यांना दूषित करून फिक्कट, हिरवा इत्यादि बहुविध वर्ण त्वचेच्या

अनुक्रमणिका

ठिकाणी उत्पन्न करते. यालाच पांडुरोग म्हणतात'['समुदीर्ण यदा पित्तं हृदये समवस्थितम् । वायुना बलिना क्षिप्तं संप्राप्य धमनीर्दश । प्रपन्नं केवलं देहं त्वङ्मांसान्तरमाश्रितम् । प्रदूष्य कफवातासृक्त्वङ्मांसानि करोति तत् । पांडुहारिद्रहरितान् वर्णान्बहुविधांस्त्वचि । स पांडुरोग इत्युक्त.' । – च. सं.]. कामला रोगाची उत्पत्ती दूषित पित्ताकडून रक्त व मांस यात विदग्धता निर्माण झाल्यानंतर होते, असेही त्यांनीच सांगितले आहे ['तस्य पित्तं असृक्मांसं दग्ध्वा रोगाय कल्पते' – च. सं.]. कोथाचा प्रादुर्भाव रक्तधातूतच जेव्हा विशेषत्वाने होतो तेव्हा रक्तपित्त हा विकार उद्भवतो. आचार्य चरक म्हणतात, 'अशा प्रकारचे आचरण करणाऱ्या व्यक्तीचे पित्त प्रकुपित होते व रक्ताचीही प्रमाणाबाहेर वाढ होते. हे प्रकुपित पित्त वाढलेल्या रक्तासह सर्व शरीरात संचार करीत असताना जेव्हा यकृत् व प्लीहा यांतून निघणाऱ्या रक्तवह स्रोतसांच्या मुखांत अवरुद्ध होते तेव्हा ते रक्ताला दुषित करते'['तस्यैवमाचरतः पित्तं प्रकोपमापद्यते । लोहितं च स्वप्रमाणं अतिवर्तते । तस्मिन् प्रमाणातिवृत्ते पित्तं प्रकुपितं शरीरं अनुसर्पत् यदैव यकृत्प्लीहप्रभवाणां लोहितवहानां च स्रोतसां ... ... ...मुखान्यासाद्य प्रतिरुंध्यात् तदैव लोहितं दूषयति' – च. सं.]. बाह्य त्वचा व लसीला यांत उद्भवलेल्या कोथापासून विस्फोट, मसूरिका इत्यादि रोगांची उत्पत्ती होते. कोथावस्था विशेष तीव्र स्वरूपाची नसली म्हणजे मुखपाक (तोंड येणे), गुदपाक, मेढ्रपाक इत्यादि, तसेच श्वित्र (पांढरे कोड) आणि केवळ त्वचेच्याचआश्रयाने संभवणारी नानाविध क्षुद्रकुष्ठे यांचा प्रार्दुभाव होतो. उलट कोथाच्या तीव्रावस्थेतून महाकुष्ठे उद्भवतात. रक्त व मांस या धातूंची दुष्टी यांत होत असल्याने त्यांना महाकुष्ठे म्हणतात. 'त्वचा, मांस, रक्त व लसीका ही चार द्रव्ये दोषप्रकोपामुळे विकृत होतात', असे चरकांचे वचन आहे ['त्वङ्मांसशोणितलसीकाश्चतुर्धा दोषोपघातविकृताः' –च. सं. ।]. अर्थात् त्यांच्या मतानुसार कुष्ठ विकाराची उत्पत्ती या दूष्यचतुष्टयातील वैषम्यामुळे होते. शोथ शरीराच्या बाह्य भागात असो वा अन्तर्भागात असो, त्या ठिकाणी संचित झालेला रक्तादि धातुघटकांचा कोथ झाला की, त्यातून पुढे व्रण उत्पन्न होतो. विदाहकारी दूषित पित्तामुळे धातुघटक विश्लिष्ट होतात, त्यांचा कोथ होऊ लागतो आणि परिणामी ते नाश पावतात. धातूंचा विनाश घडवून आणणाऱ्या या कोथालाच कुष्ठविकार म्हणतात. या विकारात धातुघटक कुषित म्हणजे विशीर्णच होत असतात. किंबहुना, कुष्ठत्व वा धातुविशीरण हे सर्व कोथात्मक विकारांचे एक स्वरूपच होय. हे कुष्ठत्व समान असताही स्थानलक्षणांनुसार त्यांचे भेद अनेक संभवतात व त्यांचा निर्देशही तदनुसार निरनिराळ्या नांवांनी करण्यात येतो, हे निराळे.

## पित्तविकारांची कोथलक्षणात्मकता

कोथ हे लक्षण सर्व दाहोत्पन्न विकारांतसामान्यत्वाने विद्यमान असते. हा दाह मिथ्यापाकातून म्हणजे पचनवैषम्यातून उद्भवतो आणि मिथ्यापाकाची उत्पत्ती दूषित पित्तापासून होते. तात्पर्य, कोथलक्षणात्मक समस्त विकार, मग ते सार्वदेहिक असोत वा प्रादेशिक असोत, कोणत्याही स्थानी वा कोणत्याही स्वरूपात उत्पन्न होवोत, ते सर्व पित्तोद्भवच होत.

## विकारांची प्रमुख कारणे–शोष, कोथ, क्लेद.

सर्व विकारांची, याप्रमाणे, प्रमुख कारणे तीनच संभवतातः शोष, कोथ, आणि क्लेद. क्षयात्मक, कोथात्मक आणि क्लेदात्मक असे समस्त विकारांचे प्रमुख प्रकारही तदनुसार तीनच मानता येतील. शोष वातवृद्धीतून, कोथ दूषित पित्तापासून आणि क्लेद कफप्रकोपातून उत्पन्न होत असल्याने प्रकुपित वातादि त्रिदोषच सर्व रोगांची मूलभूत कारणे होत यात संशय नाही.

अविकृत वा स्वाभाविक स्थितीतील वायू शरीरातील यच्चयावत् स्वाभाविक हालचालींचे संचालन करीत असतो. परंतु, स्रोतसांचे संशोषण वा अतिपूरण झाल्यामुळे रुद्ध झालेला वायू विकृत होतो आणि

त्यापासून शूलसंज्ञक नानाविध पीडा उत्पन्न होतात. विशिष्ट ठिकाणी अवरुद्ध झाल्यामुळे वायू जेव्हा उन्मार्गगामी होतो तेव्हा त्याच्या क्षोभक व पीडादायक अशा वेगाला शूल म्हणतात. पित्त अविकृत स्थितीत पचनाचे म्हणजे आहार आणि धातू यांतील सार—किट्ट पृथक् करण्याचे कार्य योग्य प्रकारे करीत असते. पण तेच जेव्हा विकृत होते तेव्हा तीक्ष्णतेमुळे ते विदाहाला कारणीभूत होते. संघटित परमाणूंना ज्याच्या तीक्ष्णतेमुळे परस्परांचा स्पर्श देखील सहन होईनासा होतो आणि त्यांच्या विश्लेषणाला जे कारणीभूत होते, असे तीव्र वा विकृत पचन म्हणजे विदाह. धातुविनाशक कोथ त्यातूनच उद्‌भवतो. कफाच्या बाबतीतही असेच आहे. तो जेव्हा अविकृत असतो तेव्हा शरीरातील सर्व संचयात्मक वा पोषणात्मक कार्ये योग्य रीतीने पार पाडीत असतो. पण तोच विकृत झाला की संचय अधिक प्रमाणात व अधिक काळ झाल्याने तोच श्लेष्मा शोथोत्पादक होतो. वातपित्तकफांची स्वाभाविक कार्ये म्हणजे अनुक्रमे गती, पचन व पोषण. शूल, दाह व कोथ ही त्यांची अस्वाभाविक कर्मे होत. शरीराच्या भिन्न भिन्न स्थानांत चालणाऱ्या अनेक प्रकारच्या स्वाभाविक क्रियांचा समावेश ज्याप्रमाणे गत्यादि तीन क्रियांत होऊ शकतो त्याचप्रमाणे शरीरात निरनिराळ्या ठिकाणी संभवणाऱ्या नानाविध व्याधींचा म्हणजे अस्वाभाविक क्रियांचा अंतर्भावही शूल, दाह, शोथ या तिघांतच करता येतो. अर्थात्, अविकृत स्थितीत शरीराची जीवनयात्रा चालविणारे वातादि दोषच विकृत झाले म्हणजे मात्र नानाविध रोगांच्या उत्पत्तीला याप्रमाणे कारणीभूत होत असतात. आचार्य वाग्भट म्हणूनच म्हणतात की, ‘सम स्थितीत असले म्हणजे जे शरीराच्या वाढीला कारणीभूत होतात तेच दोष विषम स्थितीत शरीराचा घात करण्यास प्रवृत्त होतात. म्हणून आचरण हितकर ठेवावे, आणि त्या योगेच वृद्धी व क्षय यांच्यापासून दोषांचे संरक्षण करावे’ [‘य एव देहस्य समा विवृध्यै त एव दोषा विषमा वधाय । यस्मादतस्ते हितचर्ययैव क्षयात् विवृद्धेरिव रक्षणीयाः ।’ अ. हृ.]

———

अनुक्रमणिका

# दर्शन १९ – दोषांचे संसर्ग आणि सन्निपात

## संसर्ग आणि सन्निपात

अयोग्य अशा आहारविहारादिकांनी वातादि दोष दूषित झाले की, ते कधी एकेकटे तर कधी दोन मिळून आणि कधी तीनही एकत्र येऊन नानाविध विकार उत्पन्न करतात. दोषांचा प्रकोप करणाऱ्या आहारादिकांच्या स्वरूपानुसार काही रोगांत एखाद्या दोषाचा प्रकोप होतो तर काहीत दोघांचा. ज्यात तीनही दोष प्रकुपित होतात असेही काही रोग असतात. एकदोषोद्भव, द्विवदोषोद्भव आणि त्रिदोषोद्भव असे रोगांचे भेद तदनुसार तीन संभवतात. कोणते विकार एकदोषोद्भव आहेत व कोणते संसर्गज म्हणजे द्विदोषजन्य आणि कोणते सन्निपातज म्हणजे त्रिदोषोद्भव होत, हे त्या त्या विकारांत दिसून येणाऱ्या त्या त्या दोषांच्या लक्षणांवरून समजू शकते. 'कोणत्याही दोन दोषांच्या क्षयापासून वा कोपापासून संसर्ग संभवतो तर तीनही दोषांचा क्षय वा कोप झाला की सन्निपात उद्भवतो', असे आचार्य वाग्भटांनी म्हटलेही आहे ['संसर्गः सन्निपातश्च तद्द्वित्रिक्षयकोपतः' । अ. हृ.].

## एक शंका

कोणत्याही दोन दोषांची एकाच ठिकाणी एकदम दुष्टी होणे म्हणजे संसर्ग आणि तीनही दोष अशा प्रकारे एकाच वेळी एकाच स्थानी दूषित होणे म्हणजे सन्निपात, असे म्हणण्यावर एक शंका उपस्थित होऊ शकेल. ती अशी–

वातादि दोषांचे गुण शीत–उष्ण, स्निग्ध–रूक्ष याप्रमाणे परस्परविरुद्ध असल्याने दोन अथवा तीनही दोषांचा प्रकोप एकाच वेळी कसा होऊ शकेल? रूक्ष गुण स्निग्ध गुणाशी विरुद्ध तर उष्ण गुण शीत गुणाला विरोधी. त्यांची एकत्र एककाल अभिवृद्धी होणारच नाही. पित्तश्लेष्मसंसर्गात उष्णता व शीतता यांची अथवा कफवातसंसर्गात स्निग्धता व रूक्षता या परस्परविरोधी गुणांची वाढ एकाच ठिकाणी एकाच वेळी होऊ शकणार नाही. अन्योन्यविरुद्ध अशा दोषलक्षणांचा संकरही अर्थातच तेथे संभवणार नाही. सन्निपाततही विरूद्ध गुणांची वाढ वा विरोधी लक्षणांचा संकर अशक्यच. स्निग्धता–रूक्षता, शीतत्त्व–उष्णत्व, गौरव–लाघव, द्रवता–घनता, मंदता–तीक्ष्णता इत्यादि प्रकारे दोषांची लक्षणे परस्परविरुद्ध आहेत. ती एकाच विकारात एककाल संमीलित होणे शक्य नाही.

वरील शंका काही उदाहरणांवरून अधिक स्पष्ट होऊ शकेल. ज्वराचा वेग एकाच वेळी मंद व तीक्ष्ण असा द्विविध वा मंद, तीक्ष्ण व विषम असा त्रिविध असू शकणार नाही. कफानुबंधामुळे ज्वराचा वेग मंद असतो, ['नात्युष्णगात्रता छर्दिः अंगसादोऽविपाकिता' म्हणजे शरीर फार उष्ण नसणे, छर्दी, गात्रे गळून गेल्याप्रमाणे वाटणे, अविपाक ही कफज्वराची लक्षणे सुश्रुताचार्य सांगतात (सु. सं.). आचार्य माधवही उष्णता अधिक न जाणवणे या अर्थी 'स्तैमित्यं स्तिमितो वेगः ।' (मा. नि.) या वचनात वेगाची स्तिमितता म्हणजे मंदताच उल्लेखितात.], तर पित्तज्वरात पित्तानुबंधामुळे तो तीक्ष्ण असतो ['वेगस्तीक्ष्णोऽतिसारश्च निद्राल्पत्वं तथा वमिः' (सु. सं.),. म्हणजे तीक्ष्ण वेग, अतिसार, निद्रावस्था, वांती इ. लक्षणे पित्तज्वरवर्णनात सुश्रुतांनी सांगितली आहेत.]. हे दोन प्रकारचे वेग एकाच वेळी एकाच ठिकाणी म्हणजे कफपित्तसंसर्गात कसे संभवू शकतील? सान्निपातिक ज्वराबद्दलही असेच म्हणता येईल. 'त्रिदोषोद्भव ज्वरात तिघांचीही लक्षणे असतात', असे या ज्वराचे सामान्य लक्षण सुश्रुताने सांगितले ['सर्वजे सर्वलिंगानि' – सु. सं.]. परंतु, मंद, तीक्ष्ण व वातानुबंधामुळे उद्भवणारा विषम ['वेपथुर्विषमो वेगः कंठौष्ठपरिशोषणम्' (सु. सं.). म्हणजे कंप, विषमवेग घसा व ओठ सुकणे ही वातज्वराची लक्षणे सुश्रुत सांगतात.], हे त्रिविध वेग एकाच वेळी कसे संभवणार?

अनुक्रमणिका

अतिसारात सुद्धा स्थिती अशीच असते. अतिसारात कफानुबंधामुळे शीतता उद्‌भवते ['शुक्लं सांद्रं श्लेष्मणा श्लेष्ममिश्रं विस्रं शीतं हृष्टरोमा मनुष्यः' (मा. नि.) , म्हणजे कफाच्या अनुबंधामुळे शुक्ल, सांद्र, बुळबुळीत, अम्लगंधी आणि शीत अशी मलप्रवृत्ती होते आणि शरीरावर रोमांच उभे राहतात, असे आचार्य माधव म्हणतात.], तर पित्ताच्या संबंधाने उष्णता उत्पन्न होते ['पित्तात् पीतं नीलमालोहितं वा तृष्णामूर्च्छादाहपाकज्वरार्तः' (सु. स.) , म्हणजे पित्तामुळे मळ पिवळसर, निळसर वा रक्तवर्णी होतो, आणि तृष्णा, मूर्च्छा, दाह, पाक, गुदपाक, ज्वर यांमुळे रुग्ण पीडित होतो, असे सुश्रुत म्हणतात.]. अतिसारात हे दोनही प्रकार एकाच वेळी संभवणार नाहीत. याचप्रमाणे घन, द्रव व थोडी थोडी [हे लक्षण 'वातानुबंधामुळे उद्‌भवते. 'वर्चो मुंचत्यल्पमल्पं सफेनं रूक्षं श्यावं सानिलं मारुतेन' (सु. सं.) म्हणजे वातामुळे मळ थोडा थोडा, फेसाळ, काळसर व सशब्द होतो, असा उल्लेख सुश्रुतांनी केला आहे.] अशी तीन प्रकारची मलप्रवृत्तीही एकदम एकाच ठिकाणी संभवणार नाही. निळसर, लालसर, पांढुरका, पिवळसर या सर्व वर्णांनी युक्त असा मल एकाच वेळी उत्सर्जित होणेही शक्य नाही. कारण एक नसेल तेव्हाच दुसरा असणार. घनत्व आणि सुषिरत्व तसेच मृदुत्व आणि घनत्व हे परस्परविरुद्ध गुणही अतिसारात एकाच वेळी विद्यमान असू शकणार नाहीत.

परंतु, असे असताही, 'कोणत्याही दोन दोषांच्या क्षय–कोपांपासून संसर्ग व तीनही दोषांच्या क्षयकोपांतून सन्निपात होतो,' असे आचार्य वाग्भटांनी उल्लेखिले आहे ['संसर्गः सन्निपातश्च तद्द्वित्रिक्षयकोपतः' अ. हृ.]. 'वातज्वर, पित्तज्वर व श्लेष्मज्वर यांची सांगण्यात आलेली लक्षणे निरनिराळ्या प्रकारे जेव्हा मिश्र स्वरूपात आढळतात तेव्हा त्या विशिष्ट मिश्रणाला अनुसरून त्या ज्वराला त्या प्रकारचा द्वंद्वज वा सान्निपातिक समजावे', असे चरकाचार्यांचेही वचन आहे ['तत्र तथोक्तानां मिश्रीभावविशेषदर्शनात् द्वांद्विकमन्यतम् ज्वरं सान्निपातिकं वा विद्यात्'–च. सं.].

तथापि, कोणत्याही विकारात दोन अथवा तीनही दोषांची लक्षणे एकाच वेळी संकारावस्थेत दिसून येणे अथवा संसर्ग आणि सन्निपात या अवस्थांमध्ये दोन अथवा तीनही दोष एकाच वेळी प्रकुपित होणे संभवनीय मात्र दिसत नाही.

**शंकेचे निरसन**

वरील शंकेचे निरसन पुढीलप्रमाणे होऊ शकते. दोषांचे स्निग्धरूक्षादि गुण परस्परविरुद्ध असल्याने त्यांची उपस्थिती एकाच वेळी संभवू शकत नाही हे खरेच आहे. परंतु, संसर्ग व सन्निपात यांचा असा अर्थच नाही. तीन दोषांच्या तीन कर्मांपैकी दोन व तीनही कर्मांतील वैषम्य म्हणजे अनुक्रमे संसर्ग व सन्निपात होय. रोगांच्या उत्पत्तीला मुख्यतः कारणीभूत होते, वातादींच्या चलनादि क्रियांतील वैषम्य. या क्रियांपैकी कित्येकदा दोन तर कित्येकदा तीनही कर्मांत विपरीतता उद्‌भवते. उदाहरणार्थ, कधी एकटे चलनच विकृत होते तर कधी चलन व पचन ही दोन आणि कधी तर चलन, पचन व पोषण ही तीनही कर्मे एकदम विकृत होतात आणि त्यांतून रोगांची उत्पत्ती होते. एकदोषज, द्विदोषज, त्रिदोषज हे रोगांचे प्रकार या क्रियावैषम्याला अनुसरूनच संभवू शकतात. एकदोषोद्‌भव म्हणजे एकाच क्रियेच्या विपरीतेतून उद्‌भवलेला व्याधी. संसर्गज व्याधी म्हणजे दोन क्रियांच्या वैषम्यातून उत्पन्न होणारा. आणि तीनही क्रियांच्या विकृतींतून उत्पन्न होणारा तो सन्निपातज.

गती, पचन व संग्रह ही अनुक्रमे वातपित्तकफांची स्वाभाविक कर्मे. वातज, पित्तज व श्लेष्मज या संज्ञा त्यांच्या वैषम्यातून उत्पन्न होणाऱ्या विकारांना अनुक्रमे देण्यात येतात. शूल, दाह, व शोथ ही लक्षणे त्या त्या विकारांत अनुक्रमे प्रधान असतात.

अनुक्रमणिका

### सांसर्गिक विकृती

संसर्ग आणि सन्निपात यांचे स्वरूप यावरून विशद होऊ शकेल. पोषण आणि पचन ही दोन कर्मे विकृत होणे हा श्लेष्मपित्तसंसर्ग. तो शोथदाहकर होतो. आणि त्यापासून शोथदाहात्मक विकारांची उत्पत्ती होते. याचप्रमाणे पोषण व गती ही दोन कर्मे विकृत होणे हा श्लेष्मवातसंसर्ग आणि चलन व पचन ही कर्मे विकृत होणे हा वातपित्तसंसर्ग. संसर्गाचे हे तीन प्रकार अनुक्रमे शोथशूलकर आणि शूलदाहकर होतात आणि त्यांपासून अनुक्रमे शोथशूलात्मक आणि शूलदाहात्मक विकार उत्पन्न होतात. सन्निपाताची तऱ्हाही अशीच. पोषण, पचन आणि गती या तीनही क्रियांत एकदम वैषम्य उद्‌भवणे म्हणजे सन्निपात. शोथ, दाह, शूल या सर्वांची त्यात उत्पत्ती होते. सन्निपातोत्पन्न विकारांत तीनही दोषांची लक्षणे दिसतात ती म्हणूनच. तीनही कर्मे विकृत होण्याचा तो परिणाम असतो

### सान्निपातिक विकृती

वातादि दोषांच्या क्रिया जेव्हा साम्यावस्थेत असतात तेव्हा सर्व शारीर धातूंची अभिवृद्धी होत असते. उलट, याच क्रियांत वैषम्य उद्‌भवले की शारीर धातूंचा ऱ्हास होऊ लागतो. शारीर अवयवांतील सुसूक्ष्म घटकांचे उत्पादन व अभिवर्धन क्रियासाम्यामुळे होत असते. परंतु, जिला सान्निपातिक विकृती म्हणतात तीत तीनही क्रियांच्या विषमतेमुळे शारीर घटकांचे उत्पादन व अभिवर्धन हेच केवळ थांबत नाही तर शारीर धातू या अवस्थेत ऱ्हास पावू लागतात व अखेर त्यांचा नाश होतो. जीवनाला साधनीभूत होणाऱ्या गत्यादि तीनही कर्मांत विकृती उद्‌भवली की धातुघटकांचे अभिवर्धन होण्याऐवजी त्यांचा ऱ्हासच होणार. सन्निपातोद्‌भव विकार म्हणूनच क्षयकारी होतात.

रोगोत्पत्ती करणाऱ्या द्रव्याला आम म्हणतात हे पूर्वी उल्लेखिलेच. दूषित झालेले शरीरस्थ दोषही रोग उत्पन्न करतात. अर्थात् दूषित झालेले वातपित्तकफ आणि आमद्रव्य यांत तत्त्वतः भेद नाही. तेही आमस्वरूपच होत. तसेच, रोगोत्पादकता आलेले कोणतेही बाह्य द्रव्य सुद्धा—ज्याचा निर्देश विष या संज्ञेने करण्यात येतो असे—शरीरात प्रविष्ट झाले की, शारीर द्रव्यांना म्हणजे रसरक्तादि धातूंना ते दूषित करते. हे द्रव्य असात्म्य म्हणजे शरीराला विरुद्धगुणी असल्याने तेही व्याधिकर होते. या रोगोत्पादक बाह्य द्रव्याला आगंतु कारण आणि तदुत्पन्न रोगांना आगंतुरोग असे म्हणतात. आमद्रव्य व दूषित दोष यांच्यापासून जे रोग उद्‌भवतात त्यांना शरीरान्तर्गत रोग अशी संज्ञा आहे.

ज्या द्रव्याच्या योगाने पोषणकर्म दूषित होते त्याला कफप्रकोपण म्हणतात. मग हे द्रव्य आमसंज्ञक शरीरस्थ असो अथवा बाह्य असो. याचप्रमाणे पचनकर्माला दूषित करणाऱ्या द्रव्याला पित्तप्रकोपण आणि चलनकर्मात दूषितता उत्पन्न करणाऱ्या द्रव्याला वातप्रकोपण म्हणण्यात येते. जे द्रव्य पोषणादि तीनही कर्मांना दूषित करून धातुघटकांचाही विनाश घटवून आणते त्या द्रव्याला त्याच्या विनाशकतेमुळेच विषरूप मानण्यात येते. असे द्रव्य सन्निपातप्रकोपण होय.

विष ते की जे शारीर द्रव्यांच्या नाशाला कारणीभूत होते. तीनही वातादि दोष एकदम प्रकुपित झाले म्हणजे विषरूपच होतात. कारण त्यांच्या तीनही कर्मांत एकदम विकृती उद्‌भवल्याने ते शरीराचा नाशच करतात. सन्निपातोद्‌भव विकारात, मग तो सर्वांगव्यापी असो वा विशिष्ट स्थानी उद्‌भवलेला असो, तीनही

दोषांचे देहनाशकर वैषम्य सामान्यत्वाने विद्यमान असल्याने त्या सर्वच विकारांत विषाची लक्षणेही उत्पन्न होतातच.

तीन प्रकारच्या विकारांपैकी एकदोषोद्‌भव व्याधी साध्य असतात तर द्विदोषज व्याधी कष्टसाध्य असतात. सन्निपातोद्‌भव अथवा त्रिदोषज व्याधी मात्र असाध्यच मानण्यात आले आहेत. एक, दोन व तीन कर्मांतील वैषम्य हेच अनुक्रमे या साध्यतेचे वगैरे कारण होय.

**संसर्ग व सन्निपात यांचे भेद**

संसर्ग आणि सन्निपात यांचे तरतमभावानुसार भेद अनेक संभवतात. 'दोषांचे प्रत्येकशः तीन, संसर्ग नऊ, सन्निपात तेरा, असे वृद्ध दोषांचे पंचवीस; क्षीण दोषांचे तितकेच; तीनही दोषांच्या सन्निपातात एकाची वृद्धी, दुसऱ्याची समता, तिसऱ्याची क्षीणता असे सहा, तसेच एकाचा क्षय व दोघांची वृद्धी आणि दोघांचा क्षय व एकाची वृद्धी असे सहा; याप्रमाणे एकूण भेद बासष्ट आणि त्रेसष्टावा आरोग्यकर', असे एकूण त्रेसष्ट प्रकार आचार्य वाग्भटांनी उल्लेखिले आहेत ['पृथक् त्रीन् विद्धि संसर्गः त्रिधा तत्र तु तान् नव । .. त्रयोदश समस्तेषु– । पंचविंशतिमित्येवं वृध्दैः क्षीणैश्च तावतः । एकैकवृद्धिसमताक्षयैः षट् ते पुनश्च षट् । एकक्षयद्वंद्ववृध्या सविपर्ययापि ते । भेदा द्विषष्टिर्निर्दिष्टाः त्रिषष्टः स्वास्थ्यकारणम् ।' अ. हृ.]. परंतु, ते फार सूक्ष्म असून त्यांची लक्षणेही स्पष्ट नसल्याने या ठिकाणी त्यांचा निर्देश केला नाही.

———

# दर्शन—२० विशिष्ट विकारातील अन्य दोषांचा संबंध

दोषवैषम्यातून उद्‌भवणाऱ्या भिन्न भिन्न विकारांना भिन्न भिन्न प्रकारचे दोषाधिक्य कसे कारणीभूत होते हे आता पाहावयाचे आहे.

**स्थानवैशिष्ट्य**

ज्वर, अतिसार, कुष्ठ इत्यादि विविध विकार शरीराच्या निरनिराळ्या स्थानांतील विकृतीला अनुसरून उत्पन्न होत असतात. विशिष्ट स्थानी होणाऱ्या विशिष्ट विकृतीलाच व्याधी म्हणतात. 'प्रकुपित झालेले दोष शरीराच्या भिन्न भिन्न ठिकाणी जाऊन भिन्न भिन्न व्याधी उत्पन्न करतात', असे सुश्रुतांचे वचन आहे ['एवं प्रकुपितास्तांस्तान् शरीरप्रदेशानागम्य तांस्तान् व्याधीन् जनयन्ति' – सु. सं.]. 'एकच दोष कुपित होऊन उत्पत्तिविशेषानुसार आणि निरनिराळ्या स्थानांत जाऊन अनेक प्रकारचे विकार उत्पन्न करतो', असे वाग्भटही सांगतात ['स एव कुपितो दोषः समुत्थानविशेषतः । स्थानांतराणि च प्राप्य विकारान् कुरुते बहून्' । अ. हृ.]. या विकारांचा निर्देश वातप्रधान, पित्तप्रधान, कफप्रधान अशा प्रकारे त्यांतील दोषाधिक्याला अनुसरून निरनिराळ्या प्रकारे करण्यात येतो.

**उत्पादक दोषांचे प्राधान्य**

विशिष्ट दोष हाच विकाराचा उत्पादक असल्याने विकाराचे विशिष्ट स्वरूपही उत्पादक दोषाला अनुसरून असते. ज्वर, अतिसार इ. पैकी कोणत्याही रोगाची उत्पत्ती ज्या दोषाच्या कोपातून होते त्या दोषाचेच त्या रोगात प्राधान्य असते. उदाहरणार्थ, रक्तपित्त, ज्वर, कुष्ठ इत्यादि जे पित्तदुष्टिजन्य विकार होत त्या सर्वांत पित्ताचेच प्राधान्य असते, वातकफांचे नव्हे.

ज्वराच्या संबंधात 'उष्णतेविना ज्वर नाही आणि पित्ताविना उष्णता नाही', असे वाग्भटांचे वचनच आहे ['ऊष्मा पित्तादृते नास्ति ज्वरो नास्त्यूष्मणा विना' । अ. हृ.]. पित्तच कुपित व उन्मार्गगामी होऊन ज्वर उत्पन्न करते. आमाशयातून बाहेर पडून रसधातूकडे गमन करणे हे पित्ताचे ज्वरातील उन्मार्गगमन. 'आपापल्या कारणांनी कुपित झालेले दोष आमाशयात आले की, तत्रस्थ उष्णतेसह पुढे रसधातूत मिश्र होतात. नंतर ते रसवह व स्वेदवह स्रोतसांत अवरोध आणि पाचक अग्नीत मांद्य उत्पन्न करून व पचनस्थानातील उष्णतेला बाहेर काढतात आणि ज्वर उत्पन्न करतात', असे सुश्रुतांनी यासंबंधी सांगितले आहे ['दुष्टाः स्वहेतुभिर्दोषाः प्राप्यामाशयमूष्मणा । सहिता रसमागत्य रसस्वेदप्रवाहिणाम् । स्रोतसां मार्गमावृत्य मंदीकृत्य हुताशनम् । निरस्य बहिरूष्माणं पक्तिस्थानाच्च केवलम् । ... ज्वरागमं । जनयन्ति...' । सु. सं.].

रक्तपित्ताचेही कारण विदग्ध पित्तच. सुश्रुताचार्य म्हणतात, 'स्वकारणांनी विदग्ध झालेले पित्त रक्तालाही लवकरच विदग्ध करते. हे विदग्ध रक्त नंतर ऊर्ध्व मार्गाने (नाक, तोंड इत्यादींमधून) वा अधोमार्गाने (मलमूत्रादि मार्गाने) अथवा कधी दोन्ही मार्गांनी उत्सर्जित होते'['विदग्धं स्वगुणैः पित्तं विदहत्याशु शोणितम् । ततः प्रवर्तते रक्तं ऊर्ध्वं चाधो द्विधापि वा । – सु. सं.'].

कुष्ठविकारांत पित्ताबरोबर वायू व कफ या दोषांचा तसेच त्वचा, लसीका, रक्त, मांस इत्यादि दूष्यांचाही अनुबंध असल्याचे सांगण्यात आले आहे. परंतु, कुष्ठाच्या सर्व प्रकारांत पाककोथात्मकता समान

अनुक्रमणिका

असते ['कालेनोपेक्षितं यस्मात् सर्वं कुष्णाति तद् वपुः । प्रपद्य धातून् व्याप्यान्तः सर्वान् संक्लेद्य चावहेत् । सस्वेदक्लेदसंकोथान् कृमीन् सूक्ष्मान् सुदारुणान्' । – (अ. हृ) म्हणजे 'कुष्ठाची उपेक्षा झाली की कालांतराने ते सर्व शरीरात कोथ (सडण्या कुजण्याची क्रिया) घडवून आणते. या विकारात कुपित झालेले दोष सर्व धातूंना आतून व्यापून टाकतात आणि त्या सर्वांत क्लिन्नता उत्पन्न करून स्वेद, क्लेद व कोथ यांनी युक्त असे सूक्ष्म पण दारुण कृमी उत्पन्न करतात', असे वाग्भटांनी म्हटले आहे.]. आणि हे पाककोथ पित्तोत्पन्न असल्याने कुष्ठविकारांत पित्तच प्रधान असते.

## अन्य दोषांचा अनुबंध

कोणत्याही विकारात अन्य दोषांच्या अनुबंधामुळे विकारोत्पादक मुख्य दोषाच्या लक्षणांहून वेगळी वा भिन्न अशी लक्षणे उत्पन्न होत नाहीत. उदा. पित्तप्रधान दाहात्मक रक्तपित्तादि विकारांत कफाचा संबंध आला तरी दाहविरोधी शैत्य त्यात उद्‌भवत नाही. उत्पादक दोषाच्या लक्षणांत सौम्यता अथवा तीव्रता संभवणे, इतकाच फरक अशा वेळी घडून येतो. ज्वरातील संतापात कफानुबंधांमुळे सौम्यता येते म्हणजे त्याची वृद्धी अधिक होत नाही. वातानुबंधामुळे ज्वरवेगात विषमता म्हणजे अनिश्चितता संभवते. 'ज्वर येणे, जाणे, वाढणे, कमी होणे तसेच वेदना आणि उष्णता या सर्वांत नियमितपणा नसणे, त्या त्या अवयवास थांबून थांबून वेदना होणे', इत्यादि वातज्वराची लक्षणे वाग्भटांनी सांगितलीही आहेत ['आगमापगमक्षोभमृदुतावेदनोष्मणाम् । वैषम्यं तत्र तत्रांगे तास्ताः स्युर्वेदनाः चलाः' । अ. हृ.]. परंतुज्या वेळी अनुबंधरहित म्हणजे कफवातांचा ज्यात संबंध नाही अशा केवळ पित्तापासून ज्वर उत्पन्न होतो, त्यावेळी तो विशेष तीक्ष्ण असतो. 'पित्तज्वरात वेग तीक्ष्ण असतो, अतिसार संभवतो,' इत्यादि वर्णन माधवाचार्यांनीम्हणूनच केलेआहे.['वेगस्तीक्ष्णोऽतिसारश्च' । मा. नि. । ].अनुबंधरहितकेवळपित्त कुष्ठातही तीव्रपाककर अथवा विशेषत्वाने कोथकर होते.

रक्तपित्तात जेव्हा वाताचा अनुबंध असतो तेव्हा रक्ताचा स्राव थोडा थोडा होतो. कफानुबंधाचा मात्र या विकारातील दाह कमी वा सौम्य होण्यावर परिणाम होत नाही. कारण तीव्र विदाहातूनच रक्तपित्ताची उत्पत्ती होत असल्याने विदाह सौम्य होईल तर रक्तपित्त संभवणारच नाही. कफयुक्त रक्तपित्त सांद्र, पांढुरके, सस्नेह (ओषट) व बुळबुळीत असते, असे चरकाचार्यांनी सांगितले आहे ['सांद्रं सपांडु सस्नेहं पिच्छिलं च कफान्वितम्' – च. सं.]. हे खरे. तथापि, हे सांद्रत्वादि गुण कफानुबंधातून उद्‌भवतात, विदाह सौम्य असतो म्हणून नव्हे.

## विकृतिसूचक लक्षणे

पूर्वी सांगितलेच आहे की, व्याधी किंवा रोग म्हणजे विशिष्ट स्थानात उत्पन्न होणारी विशिष्ट विकृती. या विकृतीचे अनुमान ज्यावरून होऊ शकते त्याला लिंग अथवा लक्षण म्हणतात. उदा. संताप, हे ज्वराचे, द्रवद्रव्याचे गुदमार्गाने अधिक उत्सर्जन होणे हे अतिसाराचे, विशिष्ट प्रकारची सूज हे गुल्माचे इत्यादि लक्षणे त्या त्या रोगस्वरूपाची निदर्शक होत.

आयुर्वेदीय ग्रंथांत उपद्रवस्वरूप असलेल्या अनेक विकारांचाही उल्लेख लक्षणे म्हणूनच केलेला आढळतो. उदाहरणार्थ, 'सांधे फुटणे, मांड्या आखडणे, कानांत आवाज होणे, शंखास्थीजवळ पीडा होणे, तहान, हृदयग्रह, कोरड्या शिंका, कोरडा खोकला, थुंकी आणि ढेकर यांचा अवरोध', इत्यादींचा सुद्धा उल्लेख वातज्वराच्या लक्षणांतच चरकांनी केला आहे ['संधीना विश्लेषः, ऊर्वोः सादः... स्वनश्च कर्णयोः, शंखयोः निस्तोदः... पिपासा, हृदयग्रहः, शुष्कछर्दिः, शुष्ककासः, क्षवथूद्‌गारविनिग्राहः... । च. सं.]. वस्तुतः विशिष्ट प्रकारचा दाह हाच प्राधान्याने

अनुक्रमणिका

ज्वरातील वातानुबंधाचे लक्षण असून बाकीचे सर्व उपद्रव होत. अतिसारवर्णनातही वातादि अनुबंध त्यातही चरकांनी पुढीलप्रमाणे दर्शविला आहे. 'विज्जल (जलहीन) आमसहित, विप्लुत (प्रसरणशील), अवसादी (जमिनीवर पडल्यावर लीन होऊन राहणे, रूक्ष, द्रव, सशूल, आमगंधी, कधी सशब्द तर कधी शब्दरहित, इत्यादि प्रकारे मलाचे उत्सर्जन वातानुबंधामुळे होत असते, वायू व मूत्र यांचा त्यात अवरोधही असतो.' 'कफानुबंधामुळे स्निग्ध, पांढुरके, बुळबुळीत, तंतुयुक्त, आमयुक्त, जड, दुर्गंधी, कफयुक्त, शूल कमी असलेले, वरचेवर पण थोडे थोडे आणि प्रवाहिकेसहित असे मलोत्सर्जन होते'['विज्जलमानं विप्लुतमवसादि रूक्षं द्रवं सशूलमामगंधमीषत् शब्दं अशब्दं वा विबद्धमूत्रवातं अतिसार्यते पुरीषं ... ... वातात्'; 'स्निग्धं श्वेतं पिच्छिलं तंतुमत् आमं गुरु दुर्गंधं श्लेष्मोपहितं अनुबद्धशूलं अल्पाल्पं अभीक्ष्णं अतिसार्यते सप्रवाहिकं.. श्लेष्मातिसारः । च. सं.]. गुल्मभेदांचे वर्णन करताना वातगुल्मात 'प्लीहावृद्धी, आटोप (एक प्रकारचा शूल), पोटात शब्द होणे, अपचन, उदावर्त, अंगमर्द, मान, मस्तक, चाळे (शंखास्थी) यांत शूल, ब्रध्न (एकप्रकारची गाठिळ सूज) हे उपद्रव संभवतात', असे चरकाचार्यांनी सांगितले आहे ['प्लीहाटोपांत्रकूजनाविपाकोदावर्तांगमर्दमन्याशिरः शंखशूलब्रघ्नरोगांश्चैनं उपद्रवंति' – च. सं.]. तसेच, 'ज्वर, भ्रम, दवथू (विशिष्ट ठिकाणी होणारा तीव्र दाह), तहान, गळा, टाळू, तोंड यांचा शोष, मोह (ग्लानी), विड्भेद (मलद्रवता)' या पित्तगुल्मातील उपद्रवांच्या माहितीत तर ज्वर, भ्रम इत्यादींचाही उपद्रव म्हणूनच उल्लेख करण्यात आला आहे ['ज्वरभ्रमदवथुपिपासागलतालुमुखशोषप्रमोहविड्भेदाश्चैनं उपद्रवन्ति' – च. सं.].

व्याधींची उपलक्षणेसांगत असताना वाग्भटांनी असे म्हटले आहे की, 'व्याधी दोन प्रकारचे असतात, स्वतंत्र व परतंत्र. पैकी परतंत्राचेही भेद दोन संभवतात, पूर्वरूप आणि उपद्रवरूप'['द्विधा स्वपरतंत्रत्वात् व्याधयोऽन्त्याः पुनर्द्विधा । पूर्वजाः पूर्वरूपाख्या जाताः पश्चात् उपद्रवाः' अ. हृ.]. यावरूनही हे स्पष्ट होते की, ज्वरादि रोगांच्या लक्षणांत दाहादिकांव्यतिरिक्त इतर विकारांचा समावेश केला असला तरी वस्तुतः ते उपद्रवरूपच होत. पित्ताच्या वैषम्यातून 'उद्भवलेल्या ज्वरात वातानुबंधामुळे दाह अनियमित असेल, कफानुबंधामुळे सापेक्षतया तो मंद होईल आणि अनुबंधरहित केवळ पित्तामुळे हा दाह तीक्ष्ण होईल. मात्र हा वातकफांचा अनुबंध केव्हाही पित्तविरोधी लक्षणांची निर्मिती ज्वरात करू शकणार नाही. कारण हा रोग पित्ताच्या दुष्टीतून उत्पन्न होत असतो. तात्पर्य, दाहाची अभिवृद्धी हे ज्वराचे तर गुदमार्गाने अतिद्रवसरण हेच अतिसाराचे वास्तविक लक्षण होय. शूल, शोष इत्यादि बाकीचे विकार हे उपद्रवस्वरूपच होत.'

**काही आणखी उदाहरणे**

प्रकुपित दोषांपैकी ज्याच्यापासून विशिष्ट विकाराची उत्पत्ती होते तोच त्या रोगाचे प्रधान कारण. अन्य दोषांचा अनुबंध त्या विशिष्ट विकाराच्या स्वरूपात न्यूनाधिक्य वा तारतम्य उत्पन्न करीलही. परंतु, ते दोष त्यांची कारणे होऊ शकत नाहीत.

मागे सांगितलेच की, रोगोत्पादक दोषांची जी लक्षणे असतात त्यांच्या विरुद्ध अशी लक्षणे अन्य दोषांचा अनुबंध असताही त्या विशिष्ट विकारात उद्भवू शकत नाहीत. आणखी काही उदाहरणे त्यासाठी विचारात घेऊ.

कोष्ठसंचित द्रवाचे गुदमार्गाने अतिसरण होणे, हे आहे अतिसाराचे लक्षण. वातानुबंधामुळे या द्रवाचे अतिसारण सापेक्षया अल्प होईल. पण मुख्य लक्षणाच्या विरुद्ध अशी घनता मात्र त्यायोगे मलात निर्माण होणार नाही. कफानुबंधामुळे अतिसारातील द्रवामध्ये जी सांद्रता उत्पन्न होते, तीही याप्रमाणे सापेक्षच होय. दुसरे उदाहरण शोथाचे. श्लेष्मा हा सर्व शोथविकारांचे प्रधान कारण. आणि उत्सेध (उन्नतत्व) हे सर्व प्रकारच्या शोथांचे प्रमुख लक्षण. या शोथविकारांत जेव्हा वाताचा अनुबंध संभवतो तेव्हा उत्सेधात सापेक्षतेने

अल्पता येते. मुख्य लक्षणाला विरोधी अशी शुष्कता निर्माण होत नाही. हीच गोष्ट प्रमेहविकारांची. क्लेदाची अभिवृद्धी हे सर्व मेहांतील सामान्य लक्षण. आणि कफदोष हे प्रमुख कारण. तोच क्लेदाची उत्पत्ती करतो. वाताच्या अनुबंधामुळे क्लेदात अल्पता उद्‌भवेल पण उष्णता संभवणार नाही. तसेच, पित्ताचा अनुबंध होईल तर प्रमेहविकारात दाह उद्‌भवेल पण पाक संभवणार नाही. पिडकांचा पाक होणे हे लक्षण प्रमेहाचे नव्हे तर ते त्यांचे म्हणजे पिडकांचेच होय.

**दूष्यभेद आणि स्थानभेद**

विशिष्ट रोगाचा जो उत्पादक दोष असतो त्याच्या लक्षणांत धातू आणि मल या दूष्यांना आणि अन्यान्य अवयवांना अनुसरून सुद्धा तरतमभाव संभवू शकतो. परंतु, दूष्ये आणि स्थाने यांतील भेदाला अनुसरून देखील उत्पादक दोषाला विरोधी अशी लक्षणे त्या रोगात उत्पन्न होत नाहीत. उदाहरणार्थ, शोथ, रस व रक्त या द्रव धातूंत मृदू ['द्रवस्वरूपी असलेला रस वा रक्त एका ठिकाणी संचित होणे हे या सुजेचे स्वस्वरूप असल्याने दाबल्याने ती दबते पण पुनश्च वर येते.]. तरमांसात तो घनस्वरूप असतो [दाबल्याने न दबणारा असा]. तसेच स्नायुगत शोथ गाठिळ तर अस्थिधातूत तो कठिण असतो. मांसल भागातील सूज पृथुल म्हणजे फुगीर वा भरदार असते तर जेथे मांस कमी व पेशी पसरट असतात अशा ललाटादि जागी सूजही फारशी वर न आलेली अशी असते.

दूष्यभेद आणि स्थानभेद यांच्यामुळे शोथाचे प्रकार अनेक संभवत असले तरी ते सर्व श्लेष्मोत्पन्नच होत. दूषित श्लेष्मा हाच संचयाचे कारण होय. पित्ताच्या अनुबंधामुळे शोथाच्या ठिकाणी तीव्र दाह आणि पाक लवकर होणे ही लक्षणे उत्पन्न होतात तर वातानुबंधामुळे शोथस्थानी संचय अल्प प्रमाणात होतो. उत्सेधाच्या स्वल्प आकारमानावरून त्याची कल्पनाही येते. वायू हा स्वतः संचयकारी वा शोथोत्पादक नाही. अर्थात् व्याधिविवेचनात शास्त्रज्ञांनी जेथे वातप्रधान शोथाचा उल्लेख केला आहे तेथे त्याचा अर्थ इतकाच समजावयाचा की, मूलतः दुष्टश्लेष्मोद्‌भव असूनही या विशिष्ट शोथातील संचय वातानुबंधामुळे अल्प प्रमाणात आहे. पित्ततही वाताप्रमाणेच संचयकारिता अथवा शोथोत्पादकता नसते. म्हणूनच विशिष्ट शोथ पित्तप्रधान आहे, या म्हणण्यातील अर्थ इतकाच की, दुष्टश्लेष्मोत्पन्न असूनही पित्तानुबंधामुळे त्यात दाह विशेष आहे.

**रोगलक्षणांचे सविशेष ज्ञान अवश्य**

वायू, पित्त आणि कफ यांच्यापासून उद्‌भवणाऱ्या शोषात्मक, कोथात्मक आणि शोथात्मक रोगांत अन्य दोषांच्या अनुबंधामुळे येणेप्रमाणे जे श्लेष्मप्रधान, पित्तप्रधान, वातप्रधान इत्यादि भेदप्रभेद संभवतात, ते विचारात घेणे अर्थातच अवश्य असते. विशिष्ट रोगातील लक्षणांचे सविशेष म्हणजे तरतमभावदर्शक ज्ञान होणे हा त्यातील उद्देश होय. उदाहरणार्थ शोथ हे लक्षण ज्यात मुख्य असते, अशा कफोत्पन्न विकाराता वातानुबंध उद्‌भवतो तेव्हा क्षीण धात्वंशांचाच मुख्यतः संचय होतो. आणि परिणामी उत्सेध स्वल्पच संभवतो. उलट, पित्तानुबंधामुळे शोथात दाह जाणवतो आणि पाकही लवकर होतो. त्याचप्रमाणे कोथलक्षणात्मक पित्तोद्‌भव रोगात जेव्हा वातानुबंध असतो तेव्हा कोथावस्था विशेषतः क्षीण झालेल्या धात्वंशांतच संभवते व परिणामी क्लेदही सापेक्षतया अल्पच असतो. उलट, याच कोथविकारात कफाच्या अनुबंधामुळे क्लेदाचे प्रमाण तुलनेने अधिक असते. कफाच्या स्निग्धतेचा तो परिणाम होय. वातोद्‌भव विकारांत शोष हे लक्षण प्रधान असते. त्यात पित्तानुबंधाने विदाह तर कफानुबंधाने शोथ उत्पन्न होतो. शुष्क झालेल्या धातुघटकांचा

अनुक्रमणिका

संचाराभावी एकत्रसंचय होतो व त्यालाच पुढे शोथाचे स्वरूप येते. अन्य दोषांच्या अनुबंधामुळे रोगाच्या स्वरूपात याप्रमाणे निरनिराळे भेद उद्‌भवत असतात. परंतु, ज्या वेळी एखाद्या रोगात अन्य दोषांचा अनुबंध असत नाही त्यावेळी मात्र त्या रोगात त्याच्या उत्पादक दोषाची शोथादि लक्षणे पूर्ण प्रमाणात प्रकट झालेली दिसून येतात. अर्थात् यावरूनही हीच गोष्ट स्पष्ट होते की, व्याधिविवेचनात उल्लेखिलेल्या अन्य दोषांचा अनुबंध हा विरुद्ध लक्षणांचा नव्हे तर उत्पादक दोषांच्या लक्षणांत उद्‌भवणाऱ्या न्यूनाधिक्याचाच सूचक असतो.

**स्थानविशेष व दुष्टिविशेष**

प्रकुपित झालेले वातादि दोष अथवा शोष, कोथ व शोथ या त्यांच्या तीन विकृती रोगांना सामान्यतः हेतुभूत असून रोगांचेही प्रमुख प्रकार या विकृतींना अनुसरून तीनच संभवतात. तथापि, स्थानभेदांनुसार त्यांत आणखीही बरेच भेदप्रभेद आढळून येतात. ज्वर, अतिसार, कुष्ठ, रक्तपित्त, उदर, गंड, अर्बुद, अपची, ग्रंथी, विद्रधी, श्लीपद, आयाम, संकोच इत्यादि सार्वदेहिक वा प्रादेशिक विकार, तसेच राजयक्ष्मा, कास, श्वास, वातरक्त इत्यादि विविध स्थानांतील आणि नानाविध लक्षणांनी युक्त असे हे सर्व रोग अनेक प्रकारच्या स्थानवैगुण्यांतूनच उत्पन्न होत असतात. विशिष्ट रोग विशिष्ट स्थानात आणि विशिष्ट प्रकारच्या दुष्टीतूनच उत्पन्न होत असतो. पुढे दिलेल्या काही उदाहरणांवरून हा मुद्दा अधिक विशद होऊ शकेल.

अस्वाभाविक आणि पीडाकर असे विशिष्ट प्रकारचे चलन म्हणजे क्षोभ. हा क्षोभ क्लेदाच्या अभिवृद्धीमुळे जेव्हा आमाशयात उद्‌भवतो तेव्हा छर्दी (वांती) हा विकार उत्पन्न होतो ['वायुर्महास्रोतसि संप्रवृद्ध उत्क्लेश्य दोषांस्तत ऊर्ध्वमस्यन् । आमाशयोत्क्लेशकृतां च मर्म प्रपीडयन् छर्दिमुदीरयेत्तु', (च. सं.) । म्हणजे, महास्रोतसात वायू अभिवृद्ध झाला की, तो दोषांना उत्क्लेशपूर्वक वर फेकू लागतो आणि मर्माच्या ठिकाणी पीडा उत्पन्न करीत आमाशयाचा उत्क्लेश करणाऱ्या छर्दीला उत्पन्न करतो, असे चरकांनी सांगितले आहे.]. परंतु, द्रवद्रव्यांचे प्रमाण वाढल्याने तोच जेव्हा अंत्रात उत्पन्न होतो तेव्हा अतिसार होतो ['संशम्यापां धातुरन्तः कृशानुं वर्चोमिश्रा मारुतेन प्रणन्नः । वृद्धोऽतीवाधः सरत्येष यस्मात् व्याधिं घोरं तं त्वतीसारमाहुः' । (सु. सं.) म्हणजे, अधिक प्रमाणात वाढलेला अप्धातु जेव्हा अंतरग्नीला प्रशमित करतो व पुरीषाशी मिश्र होऊन वायूकडून अधःक्षेपित केला जातो तेव्हा मलमार्गाने त्याचे अधःसरण होते. या घोर व्याधीला म्हणूनच अतिसार म्हणतात, असे आचार्य सुश्रुतांचे वचन आहे.]. श्वासमार्गात—श्वासवहस्रोतसांत-वैगुण्य उद्‌भविल्याविना खोकला होत नाही ['अधः प्रतिहतो वायुः ऊर्ध्वस्रोतःसमाश्रितः । उदानभावमापन्नः कंठे सक्तः तथोरसि । ... शुष्को वा सकफो वापि कसनात् कास उच्यते' । (च. सं.) म्हणजे, 'ज्याला खालून प्रतिबंध झाला आहे असा वायू वर जाण्याच्या इच्छेने ऊर्ध्वगामी स्रोतसांत येतो आणि कंठ वा उरोभाग यांत अवरुद्ध होतो. उरप्रभृती अवयवांना त्रास देत देत कधी शुष्क तर कधी कफयुक्त अशा स्वरूपात तो पुढे बाहेर पडतो म्हणून याला कास म्हणतात.' 'कसन म्हणजे त्रासदायक चलन', असे चरकाचार्यांनी विवेचिले आहे.], आणि फुफ्फुसात वैगुण्य निर्माण झाल्याशिवाय श्वास संभवत नाही [फुफ्फुसाश्रयी वायूलाच उरस्थ म्हणून उल्लेखिण्यात आले असून त्याच्या वैगुण्यामुळे श्वासाची उत्पत्ती होते, असे वर्णनही आहे. 'मारुतः प्राणवाहीनि स्रोतांस्याविश्य कुप्यति । उरस्थः कफमुद्धूय हिक्काश्वासान् करोति सः । ' (च. सं.) म्हणजे, उरस्थवायू प्राणवह स्रोतसांत प्रविष्ट होऊन जेव्हा कुपित होतो तेव्हा कफाला चाळवून उचकी आणि श्वास उत्पन्न करतो, असे चरकाचार्य सांगतात.]. ज्वराची उत्पत्ती स्वेदवह स्रोतसांचा [ही स्रोतसे त्वचेत असतात. तसेच 'ज्यामुळे स्वेदन होते तो स्वेद, या निरुक्तीनुसार जठराग्निसंज्ञक पित्ताचे अभिवहन करणारी स्रोतसे सुद्धा स्वेदवह स्रोतसेच होत. कारण त्यांचा अवरोध झाल्याने कमी प्रमाणात कोठ्यात स्रवलेले पित्त तेथील आहाराचे पचन करण्यास असमर्थ ठरते व आमाची उत्पत्ती होते. पित्ताच्या उन्मार्गगामितेमुळे शरीरोष्मा वाढलेला असतो आणि त्वचेतील स्रोतसांच्या अवरोधामुळे तो शरीराच्या बाहेरही निघू शकत नाही. त्यामुळे शारीर धातूंत तो अधिक दाह उत्पन्न करतो. अर्थात् आहारपाचक पित्त आणि मलस्वरूप स्वेद ही दोनही द्रव्ये ज्वरोत्पादक स्वेदावरोधात अभिप्रेत आहेत.' 'रसस्वेदवहानि स्रोतांसि पिधाय अग्निं उपहत्य पक्तिस्थानादूष्माणं बहिर्निरस्य' (च. सं.) म्हणजे, 'रसवह आणि स्वेदवह स्रोतसे बंद होतात, अग्नी मंद होतो, पचनस्थानातून उष्णता बाहेर पडते', इत्यादि वर्णन चरकांनी वातज्वरोत्पत्तीच्या प्रसंगी केलेही आहे.] अवरोध झाल्याशिवाय होत नाही. मांसपेशीतील सूक्ष्म स्रोतसे अवरुद्ध झाल्याशिवाय शोथ संभवत नाही ['स्रोतसांच्या अवरोधामुळे संचित झालेली द्रव्येच उत्सेधकर होतात.' 'बाह्याः शिराः प्राप्य यदा कफासृक्पित्तानि सदूषयतीह वायुः । तैर्बद्धमार्गः स तदा विसर्पन् उत्सेधलिंगं श्वयथुं करोति । ' (च. सं.) म्हणजे, 'वायू जेव्हा बाह्य स्रोतसांत प्रवेश करून तेथील कफ, रक्त व पित्त यांना दूषित करतो तेव्हा त्याचा मार्ग या दूषित कफादिकांनी अवरुद्ध होतो. अशा रीतीने रुद्धगती झालेल्या या वायूच्या विसर्पणातून पुढे उत्सेधलक्षणात्मक श्वयथू नांवाचा विकार निर्माण होतो', असे श्वयथुचिकित्सेत आचार्य चरक म्हणतात.]. पांडुरोगही रस आणि रक्त या धातूंत विदाह झाल्याशिवाय

उत्पन्न होत नाही ['समुदीर्णं यदा पित्तं हृदये समवस्थितम् । वायुना बलिना क्षिप्तं संप्राप्य धमनीदर्श । प्रपन्नं केवलं देहं त्वङ्मांसांतरमाश्रितम् । प्रदूष्य कफवातासृक्त्वङ्मांसानि करोति तत । पांडुहारिद्रहरितान् वर्णान् बहुविधांस्त्वचि । स पांडुरोग इत्युक्तः' (च. सं.) – म्हणजे, 'प्रकुपित झालेले हृदयस्थ पित्त वायूकडून प्रक्षेपित झाले की, धमनींच्या द्वारे समस्त शरीरात पसरते आणि त्वचा व मांस यांच्या आश्रयाने कफ, वात, रक्त, त्वचा, मांस, यांना दूषित करते, आणि त्वचेच्या ठिकाणी पांडुरका, हिरवट इत्यादि विविध वर्ण उत्पन्न करतो. या विकाराला पांडुरोग म्हणतात', असे चरकांनी सांगितले आहे. पांडुरोगाच्या या वर्णनात हृदयस्थ पित्ताचा उल्लेख आहे. आणि हृदय हे रसधातूचे आश्रयस्थान आहे. अर्थात् प्रकुपित झालेले हृदयस्थ पित्त रसधातूलाही दूषित करते असे येथे अभिप्रेत दिसते.].

कुष्ठ सुद्धा मांसादि धातूंत कोथ होत नाही तोवर उद्‌भवत नाही ['कुष्ठ ही संज्ञाच या अभिप्रायाची सूचक आहे. कारण कोथ – कुजणे, विशीरण– हे तिचे उपलक्षणच होय.]. रक्त व पित्त यांत विदग्धता उत्पन्न होऊन सुद्धा जेव्हा महास्रोतसाच्या अंत्रनामक भागात दाह होऊ लागतो तेव्हाच रक्तातिसार उत्पन्न होतो. अंत्रगत रक्तच गुदमार्गाने या विकारात उत्सर्जित होते ['पित्तातिसारी यस्त्वेतां क्रियां मुक्त्वा निषेवते । पित्तलान्यन्नपानानि तस्य पित्तं महाबलम् । कुर्यात् रक्तातिसारं तु' (च. सं.), म्हणजे 'जो पित्तातिसारी मनुष्य आहारादिकांच्या सेवनासंबंधी सांगितलेला क्रम सोडून पित्तकारक अन्नपानांचे सेवन करतो त्याचे पित्त प्रबल होऊन रक्तातिसार उत्पन्न करते', असे चरकाचार्य सांगतात. या वचनात अन्त्राचा निर्देश नसताही हे पित्त संदर्भावरून कोष्ठगतच मानावे लागते. शोकातिसारातील रक्ताचे अतिसारण कोष्ठविकृतीमुळेच होत असते, असा उल्लेख सुश्रुताचार्यांनी केला आहे. 'तैस्तैर्भावैः शोचतोऽल्पाशनस्य बाष्पावेगः पक्तिमाविध्य जंतोः कोष्ठं गत्वा क्षोभयेत् तस्य रक्तम्' (सु. सं.), म्हणजे 'त्या त्या कारणांनी शोक करणाऱ्या अल्पाशी मनुष्याचा बाष्पवेग पचनाला, पित्ताला–दूषित करून व अंत्रात प्रवेश करून त्याच्या रक्तात क्षोभ उत्पन्न करतो', असे त्यांचे वचन आहे.].

अशा प्रकारे आपापल्या कारणांनी विकृत झालेले दोष अथवा वैषम्यावस्था प्राप्त झालेली त्यांची पचनादि कर्मे, ज्यांच्यात वैगुण्य उद्‌भवलेले असते अशा नानाविध स्थानांत निरनिराळ्या ज्वर, अतिसार वगैरे व्याधींना उत्पन्न करतात. वाग्भटाचार्य म्हणूनच म्हणतात की, कुपित झालेला दोष तोच असला तरी हेतुभेद आणि स्थानभेद यांना अनुसरून तो बहुविध रोग उत्पन्न करतो ['स एव कुपितो दोषः समुत्थानविशेषतः । स्थानान्तराणि च प्राप्य विकारान् कुरुते बहून्'–अ. हृ.].

**रोगांचे स्थानभेदांनुसार भेद**

स्थानभेदांनुसार रोगांचे तीन प्रकार होतात. सर्वांगज अथवा सर्वदेहव्यापी, एकागंज अथवा प्रादेशिक आणि उभयस्वरूपी. धातुशोष, प्रमेह, कुष्ठ हे रोग सार्वदेहिक होत तर कास, श्वास, अतिसार, गुल्म विद्रधी, अर्बुद, अश्मरी, छर्दी, अर्श इत्यादि रोग प्रादेशिक आहेत. शोथ कधी सर्व शरीरात होतो तर कधी विशिष्ट ठिकाणीही होतो. गंड, अर्बुद, अपची, ग्रंथी, विद्रधी, श्लीपद हे रोग शोथाचेच भेद असून ते विशिष्ट स्थानी आणि विशिष्ट धातूंतच संभवतात. शोथाप्रमाणे दाह आणि पाक हे सुद्धा कधी सर्वांगात तर कधी एखाद्याच स्थानात उद्‌भवतात. विसर्प, व्रण, विस्फोट हे कोथाचे प्रकार म्हणजे प्रादेशिक दाहभेद असून रसधातूच्या आश्रयाने उद्‌भवणारा ज्वर हा सार्वदेहिक दाह होय.

'प्रकुपित झालेला वायू आमाशयात प्रवेश करून तेथील उष्णतेशी मिश्र होतो आणि तेथून पुढे आहारातून परिणत झालेला जो रसनामक आद्य धातू त्यात जाऊन आणि रसवह व स्वेदवह स्रोतसांचा अवरोध करून, तसेच अग्नीला मंद करून आणि उष्णतेला म्हणजे पाचक अग्नीला त्याच्या स्थानातून बाहेर काढून सर्व शरीरात व्यापून टाकतो त्यावेळी तो (वात) ज्वर उत्पन्न करतो', असे या संबंधात चरकांचे वचन आहेच ['स यदा प्रकुपितः प्रविश्यामाशयमूष्मणा सह मिश्रीभूय आद्यं आहारपरिणामधातुं रसनामानमन्वेति रसस्वेदवहानि स्रोतांसि पिधाय अग्निं उपहत्य पक्तिस्थानादूष्माणं बहिर्निरस्य केवलं शरीरं अनुप्रपद्यते तदा ज्वरं अभिनिर्वर्तयति' । (च. सं.)]. आस्यपाक, गुदपाक, नासापाक इत्यादि पाकभेद हे प्रादेशिक वा एकांगज होत. प्रकुपित झालेले वातादि दोष येणेप्रमाणे आपापल्या शूलादि लक्षणांनी युक्त असे सर्वांगसंश्रयी आणि एकांगसंश्रयी रोग उत्पन्न करीत असतात.

अनुक्रमणिका

**मुख्य प्रकार तीनच**

निरनिराळ्या रोगांची उत्पत्ती निरनिराळ्या स्थानी होत असली आणि त्यांना नांवेही निरनिराळी देण्यात येत असली तरी त्यांपैकी काहीत शूल तर काहीत दाह आणि काहीत शोथ ही प्रकुपित वातादींची लक्षणे समान असतात. तदनुसार वातज, पित्तज आणि श्लेष्मज या तीनच प्रकारांत सर्व विकारांचा अंतर्भाव होऊ शकतो.

वातादि दोषांपासून उद्‌भवलेल्या या विकारांत अन्य दोषांचा अनुबंध संभवतो तेव्हासुद्धा उत्पादक वातादि दोषाला अनुसरून विकृतीचे सूचक शूलादि प्रमुख लक्षण त्यांत सामान्यत्वाने विद्यमान असतेच. तथापि, या लक्षणाच्या ठिकाणी निरनिराळ्या विकारांमध्ये जे तारतम्य वा न्यूनाधिक्य आढळून येते त्याचेही स्वरूप यथावत् रीतीने ज्ञात होणे अवश्य असते. मुख्य उत्पादक दोषाबरोबरच अन्य दोषांचा अनुबंधही व्याधिविज्ञानात म्हणूनच विचारात घेतला जातो. उदाहरणार्थ, संताप हे ज्याचे लक्षण आहे अशा पित्तप्रधान ज्वरात कफानुबंधाचा उल्लेख करण्यात येतो तेव्हा त्या विशिष्ट ज्वरात संताप अधिक तीव्र नाही, हे सुचवावयाचे असते.

———

अनुक्रमणिका

# दर्शन २१—चिकित्सेतील दोषानुबंध

वातादि दोषांची रोगोत्पादकता गेल्या प्रकरणात सांगून झाली आता त्यांच्या चिकित्सेतील दोषानुबंध विचारात घ्यावयाचा.

## चिकित्सेचे सामान्य स्वरूप

शरीरात उद्‌भवणाऱ्या समस्त विकारांना प्रकुपित दोषच कारण असल्याने [वातादींचा प्रकोप हे शरीरज रोगांचे कारण असले तरी मानस रोगांचे मात्र कारण ते नव्हे. रजस् आणि तमस् या दोषांपासून मनोविकारांची उत्पत्ती होते. बाह्य कारणांपासून उद्‌भवलेल्या आंगतुस्वरूपी अशा शरीर विकारांच्याही उत्पत्तीला वातादींचा प्रकोप कारण होत नाही. 'आगन्तुर्हि व्यथापूर्वसमुत्पन्नो जघन्यं वातपित्तश्लेष्मणां वैषम्यमापादयति' (च.सं.) म्हणजे 'आगंतू विकारात पीडा आधी उद्‌भवते आणि वातपित्तकफातील वैषम्य नंतर संभवते', असे तरकाचार्यांनी सुचविलेही आहे.] दोषप्रशमन हेच चिकित्सेचे सामान्य स्वरूप होय. विशिष्ट विकारावरील चिकित्सेत व्याधिविपरीत औषधादींचे प्राधान्य असते. 'दोषांना जेव्हा अनुबंध प्राप्त होतो म्हणजे स्वतंत्र व्याधिस्वरूपात जेव्हा ते अभिव्यक्त होतात, तेव्हा, अपतर्पणात्मक उपचार केलेल्या रोगावर, त्याचा निग्रह व्हावा म्हणून, हेतुविपरीत औषधे न देता व्याधिविपरीत औषधेच उपयोजावीत', असे चरकांनी म्हटले आहे ['सति त्वनुबंधे कृतापतर्पणानां व्याधींना निदानविपरीतमपास्य औषधमातंकविपरीतमेव अवचारयेत् यथास्वम् । – च. सं.]. चिकित्सा करणे म्हणजे धातुसाम्य उपन्न करणाऱ्या उपायांची योजना करणे. आचार्य चरकांनी चिकित्सेचे ते लक्षण म्हणूनच सागितले आहे. 'चिकित्सा म्हणजे विकृत पावलेल्या धातूंना सम स्थितीत आणण्यासाठी वैद्य, परिचारक, रोगी व औषध या चौघांकडून होणारी प्रवृत्ती', असे ते म्हणतात ['चतुर्णा भिषगादीनां शस्तानां धातुवैकृते । प्रवृत्तिर्धातुसाम्यार्था चिकित्सेत्यभिधीयते ।' च. सं.].

वातादि दोष त्यांच्या स्वाभाविक प्रमाणापेक्षा वाढले अथवा क्षीण झाले म्हणजे त्यांच्या स्वाभाविक क्रियांत वैषम्य उद्‌भवते. अर्थात् वाढलेल्या दोषांचे ऱ्हसन व क्षीण दोषांचे अभिवर्धन करून त्यांच्या स्वाभाविक क्रियांतील वैषम्य नष्ट करणे याचेच नांव चिकित्सा, असे थोडक्यात म्हणता येईल. 'क्षीण झालेल्या दोषांचे बृंहण करावे, कुपित झालेल्यांचे प्रशमन करावे, वाढलेल्यांचे निर्हरण करावे आणि समस्थितीतील दोषांचे परिपालन कराचे', हे सुश्रुतांचे वचन या संदर्भात उल्लेखनीय होय ['दोषाः क्षीणा बृंहयितव्याः कुपिताः प्रशमयितव्याः, वृद्धाः, निर्हर्तव्याः समाः परिपाल्याः ।' – सु. सं.].

## वृद्ध दोषच रोगोत्पादक

दोषांच्या वाढीप्रमाणे त्यांचा क्षयसुद्ध शरीराच्या अस्वास्थ्याला सामान्यतः कारणीभूत होतो. तथापि, ज्वर, कुष्ठ इत्यादि नानविध रोगांची उत्पत्ती मात्र मुख्यतः दोष वृद्ध झाल्यानेच होते. वातादिकांपैकी कोणताही दोष जेव्हा क्षीण होतो म्हणजे त्याचे शरीरातील स्वाभाविक प्रमाण उणावते, तेव्हा त्याची जी उत्साहादि स्वाभाविक कर्मे असतात त्यांत फक्त यूनता संभवते. दोष प्रकुपित होतात तेव्हाच रोगोत्पत्ती करतात, असे ज्याप्रमाणे शास्त्र सांगते त्याचप्रमाणे 'संचय, प्रकोप, प्रसर, स्थानसंश्रय, व्यक्ती आणि भेद या दोषांच्या सहा अवस्था जो जाणतो तोच खरा वैद्य होय', इत्यादि वचनांतून [संचयं च प्रकोपं च प्रसरं स्थानसंश्रयम् । व्यक्तिं भेद च योवेत्ति दोषाणां स भवेत् भिषक् ।' (सु. सं.)] दोषांचा कोप संचयानंतर संभवतो, असेही सुचविलेले आढळते. आपली स्वाभाविक कर्मे करण्यासाठीही जे असमर्थ ठरतात ते क्षीण दोष विशिष्ट विकार उत्पन्न करूच शकणार नाहीत. एक दोष क्षीण झाल्यामुळे तद्विरुद्ध दुसऱ्या दोषाची अभीवृद्धी होऊन त्यापासून रोगोत्पत्ती व्हावी हे अर्थातच अशक्य नाही. किंबहुना, याच हेतूने दोषांच्या वृद्धीबरोबर त्यांची क्षीणावस्था सुद्धा

अनुक्रमणिका

रोगोत्पत्तीचे कारण म्हणून उल्लेखिण्यात आली आहे. तथापि, हे तितकेच खरे की, विशिष्ट लक्षणांनी युक्त असलेली कोणतीही व्याधी क्षीण झालेल्या नव्हे तर वाढलेल्या दोषापासूनच संभवू शकतो.

दोषभेद, दूष्यभेद व स्थानभेद यांना अनुसरून रोगांचे प्रकार अनेक संभवत असले तरी त्या सर्वात वातादि दोषांच्या चलन, पचन, पोषण या स्वाभाविक कर्मांतील वैषम्याची सूचक असलेली शूल, दाह, शोथ ही लक्षणे सामान्यत्वाने विद्यमान असतातच. त्यांची उत्पत्ती दोषांच्या वृद्धीतूनच होते. वातवृद्धीतून शूल उत्पन्न होतो तर पित्तवृद्धीमुळे दाह संभवतो. श्लेष्मवृद्धी शोथाला कारणीभूत होते. रोगोत्पत्तीला दोषांची वृद्धीच कारण होते हे यावरूनही दिसून येईल.

क्षीण दोषांपासून संभवणाऱ्या विकृती आणि वृद्ध दोषांपासून उद्‌भवणाऱ्या विकृती यांत फरक आहे. चलनस्वभावी वायू क्षीण होतो तेव्हा त्याच्या उत्साहादि शरीरोपकारक कार्यात मांद्य वा क्षीणता येते. परंतु,स्वाभाविक प्रमाणाहून त्याची वृद्धी अधिक झाली म्हणजे मात्र शूल, शोष इत्यादि नानाविध विकार उद्‌भवतात. पित्त क्षीण झाले की, आहाराचे व धातूंचे पचन यथावत् होत नाही. पण तेच जेव्हा वृद्ध पावते तेव्हा दाहपाकादि विविध विकारांना जन्म देते. त्याचप्रमाणे कफ जेव्हा क्षीण होतो तेव्हा संश्लेषकतेच्या स्वल्पतेमुळे धातूंची अभिवृद्धी योग्य प्रमाणात होत नाही. उलट, त्याची वृद्धी झाली म्हणजे क्लेदशोथादि विकार उत्पन्न होतात. अर्थात् रोगांची उत्पत्ती दोषांच्या अभिवृद्धीतूनच होते, क्षयातून नव्हे, हे स्पष्ट होय.

एखादा दोष क्षीण झाला की, तद्विरुद्धगुणी दुसरा दोष वृद्ध होतो. आणि त्यापासून पुढे विविध रोगही उद्‌भवतात. परंतु, ते वृद्ध दोषाच्या लक्षणांना अनुसरूनच संभवतात. एखादा दोष एखाद्या वेळी दुसऱ्या दोषाच्या क्षीणतेमुळे वाढलेला असला तरी तो वाढतो तेव्हाच रोगोत्पादक होतो, असा याचा अर्थ. त्याचबरोबर हेही खरे की, ज्याची स्वतःची चलनादि स्वाभाविक कर्मेच क्षीण झाली आहेत अशा क्षीण दोषाच्या ठिकाणी शूलादि विकृती उत्पन्न करण्याचे सामर्थ्य असूच शकत नाही.

**चिकित्सेतील तत्त्व—निदानपरिवर्जन**

अभिवृद्ध झालेले वातादि दोषच पुढे विकृत होतात. त्यांची ही विकृती कधी समस्त शरीरात तर कधी एखाद्या स्थानातच उद्‌भवते. ती कोठेही संभवली तरी विकृत वा प्रकुपित झालेल्या दोषांचा शोधन, शमन, इत्यादि उपाग्रांनी उपशम करणे, हेच अशा प्रसंगी चिकित्सेचे सर्वसामान्य स्वरूप असते. ‘रोगाचे मूलकारण दूर करणे हीच थोडक्यात क्रिया वा चिकित्सा’, असे सुश्रुताचार्य म्हणतात [‘संक्षेपतः क्रियायोगो निदानपरिवर्जनम्’ – सु. सं.]. वाग्भटाचार्यांनीही रोगांची चिकित्सा’ निदानविपरीत म्हणजे त्यांचे मूल कारण दूर करणारी असावी’, असेच सांगितले आहे [‘एवमन्यानपि व्याधीन् स्वनिदानविपर्ययात् । चिकित्सेत् ....’ अ. हृ.]. निदान या शब्दातून येथे, प्रकुपित झालेले वातपित्तकफ अभिप्रेत आहेत. ‘प्रकुपित मल (दोष) हेच सर्व रोगांचे आदि कारण’ [‘सर्वेषामेव रोगाणां निदान कुपिता मलाः’ – मा. नि.], ‘सर्व रोगांचे एकमात्र कारण दोषच’ [‘दोषां एव हि सर्वेषां रोगाणामेककारणम्’ –अ.हृ.], इत्यादि वचने तसे सुचवितातही. विशिष्ट स्थानी उद्‌भवलेल्या विशिष्ट विकारात ज्या वेळी व्याधिविपरीत चिकित्सा केली जाते तेव्हा तीतही व्याधिस्थानी कुपित झालेल्या दोषांचे प्रशमन व्हावेच लागते. अर्थात् रोगोत्पादक दोषांचा उपमश करणे हे तत्त्व चिकित्सेच्या सर्व प्रकारांत सामान्यत्वाने विद्यमान असतेच.

अनुक्रमणिका

**चिकित्सेचे प्रकार—बृंहण व लंघन**

या चिकित्सेचे प्रमुख प्रकार आयुर्वेदीयांनी दोन मानले आहेत. एक लंघन व दुसरा बृंहण. आचार्य वाग्भट म्हणतात, 'विकारांचेच मुख्य प्रकार दोन. तदनुसार चिकित्सेचे प्रमुख प्रकारही दोनच. एक संतर्पण आणि दुसरा अपतर्पण. बृंहण आणि लंघन हे अनुक्रमे त्यांचेच पर्याय होत' ['उपक्रम्यस्य हि द्वित्वात् द्विधैवोपक्रमो मतः। एकः सतर्पणस्तत्र द्वितीयश्चा पतर्पणः। बृहणं लंघनं चेति तत्पर्यायावुदाहृतौ।' – अ. हृ.]. यापैकी बृंहण चिकित्सा शरीराच्या अभिवृद्धीसाठी योजली जाते. एखाद्या विशिष्ट रोगाचा नाश करणे हे तिचे उद्दिष्ट नसते. 'क्षीण, क्षतयुक्त, कृश, वृद्ध, दुर्बळ, नेहमी फिरतीवर असणारे आणि स्त्री व मद्य यांचे नित्य सेवन करणारे या सर्वांना बृंहण अवश्यक द्यावे. ग्रीष्मऋतूत तर ते इतरांनाही हितावह होय. तसेच, शोष, अर्श, ग्रहणीदोष आणि इतर रोग यांनी कृश झालेल्याना बृंहण म्हणून मांसाहारी प्राण्यांच्या मांसाचे लघुरस उपयुक्त ठरतात', असे आचार्य चरकांचे सांगणे आहे ['क्षीणाः क्षताः कृशा वृद्धा दुर्बला नित्यमध्वगाः। स्त्रीमद्यनित्या ग्रीष्मे च बृंहणीया नराः स्मृताः। शोषार्शोग्रहणीदोषैः व्याधिभिः कर्शिताश्च ये। तेषा क्रव्यादमांसानां बृंहणा लघवो रसाः।' च. स.]. स्वभावतः कृश असलेल्यांना आणि नाना प्रकारच्या रोगांनी कृश झालेल्यांनाच बृंहण इष्ट, असा याचा अर्थ. अष्टांगहृदयकारांचा अभिप्रायही असाच दिसतो. 'व्याधी, औषध, मद्य, स्त्री, शोक यांच्या योगाने कृश झालेल्यांना, तसेच, भारवहन करणारे, नित्यगमनशील, उरःक्षती, रूक्षदेही, दुर्बल व वातुळ शरीराच्या व्यक्ती, त्याचप्रमाणे गर्भिणी, सूतिका, बाल आणि वृद्ध या सर्वांना बृंहण हितकर असून ग्रीष्म ऋतूत तर ते इतरांनाही द्यावे', असे ते म्हणतात ['बृंहयेद् व्याधिभैषज्यमद्यस्त्रीशोककर्शितान्। भाराध्वोरःक्षतक्षीणरूक्षदुर्बलवातलान्। गर्भिणीसूतिकाबालवृद्धान् ग्रीष्मेऽपरानपि।'अ. हृ.]. अर्थात् बृंहण चिकित्सा ही क्षीण आणि व्याधिक्षीण व्यक्तींच्यासाठीच उपयोगी होय. व्याधितांच्याकरिता म्हणजे त्यांचे रोग घालविण्यासाठी ती सांगण्यात आली नाही.

चिकित्सेचा दुसरा प्रकार म्हणजे लंघन. रोगोत्पादक दोषाचा नाश वा उपशम करण्यासाठी हा उपाय योजण्यात येतो. शोधन व शमन असे त्याचे भेद दोन संभवतात. या दोन प्रकारांनी लंघन रोगाचा विनशा घडवून आणते. चिकित्सेचे थोडक्यात लक्षणही यावरून पुढीलप्रमाणे सांगता येईल. विकृत दोषाचे अथवा रोग अत्पन्न करणाऱ्या आमसंज्ञक [विकृतदोष आणि आमसंज्ञक द्रव्य यांची लक्षणे निराळी नाहीत.] द्रव्याचे नानविध उपायांनी शरीराच्या बाहेर निर्हरण करणे म्हणजेच चिकित्सा. तीच दोषांचा उपमश वा नाश घडवून आणते.

**लंघनाचे भेद—शोधन व शमन**

शोधन हा लंघनचिकित्सेचा एक प्रकार असल्याचे वर उल्लेखिलेच. वातादि दुष्ट दोषांचे शरीराबाहेर उत्सर्जन करणे म्हणजे शोधन. निरूह, वमन, कायरेक, शिरोरेक आणि रक्तमोक्ष याप्रमाणे त्यांचे पाच प्रकार सांगण्यात आले आहेत. पैकी निरूह [सामान्यतः सर्व वातविकारांवर बस्ती ही प्रधान चिकित्सा होय, असे सांगण्यात आले आहे. बस्तीचे प्रकार दोन : निरूह व अनुवासन. अनुवासन बस्तीचेच दुसरे नांव स्नेहबस्ती. वाताचे त्याच्यायोगे शमन होते. निरूह बस्ती वायूचे शोधन करतो. शोधन चिकित्सेत त्याचा उल्लेख म्हणून करण्यात आला आहे.] हा एक बस्तीचाच प्रकार होय.कायरेक म्हणजे विरेचन आणि शिरोरेक म्हणजे नस्य.

शमन हा लंघन चिकित्सेचा दुसरा प्रकार. वाढलेल्या दोषांचे वमन, विरेचन इत्यादिकांनी शरीराबाहेर जसे उत्सर्जन करण्यात येते तसे न करता त्यांचा उपशम करून पुनश्च दोषांचे साम्य प्रस्थापित करणे म्हणजे शमन. त्याचे प्रकार सात सांगितले आहेत. दीपन (जठरादिकांतील अग्नीचे अभिवर्धन करणारे औषध), पाचन (अपक्व आहारादिकांचे पचन करणारे औषध), क्षुधेचा अवरोध (उपवास), तृष्णावरोध (पाणी वगैरे द्रवद्रव्ये न पिणे), व्यायाम (रोगाच्या अवस्थांना अनुसरून सर्व शरीराला वा

अनुक्रमणिका

शरीराच्या विशिष्ट अंगप्रत्यंगांना श्रम देणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या हालचाली), आतप (सूर्यकिरणांचे सेवन) आणि मारुत (शुद्ध वायू सेवन करणे), हे ते सात प्रकार होत. शमन चिकित्सा या सात प्रकारांनी रोगकारक दोषांचा उपशम करते.

रोगोत्पादक द्रव्य—आम अथवा दुष्ट दोष—जेव्हा शरीरातून पूर्णतया उत्सर्जित होते तेव्हाच रोगाचा उपशम होतो. मग हे उत्सर्जन शोधनाने होवो वा शमनाने. वमन, विरेचन इत्यादि शोधनोपायांनी दोषांचे उत्सर्जन तत्काल घडून येते. शमन उपायांनी तसे होत नसले तरी मलोत्सर्जनाच्या स्वाभाविक मार्गांनी आणि क्रमशः ते याही चिकित्सेने घडून येतेच.

रोगोत्पादक द्रव्याचे प्रमाण शरीरात जेव्हा अधिक होते तेव्हा ते वमनादि शोधन उपायांनी शरीरातून एकाच वेळी काढून टोकणे योग्य असते. ते अल्प प्रमाणात असेल तेव्हा मात्र दीपनादि शमन उपायांचीच योजना करावी. त्यायोगे शारीर धातूंच्यापासून हे द्रव्य वेगळे होते. आणि नंतर मलमूत्रादिकांच्या सह स्वाभाविक उत्सर्जनमार्गांनी शरीरातून त्याचे थोड्या थोड्या प्रमाणात पण क्रमशः उत्सर्जन होते. हाच अभिप्राय वाग्भटाचार्यांनी पुढील शब्दांत व्यक्त केला आहे. 'रोगोत्पादक द्रव्याचे प्रमाण अल्प असेल तर लंघन आणि मध्यम असेल तर लंघन व पाचन हितकर होते. परंतु, तेच प्रमाण पुष्कळ असेल तर मात्र शोधनच योग्य. मलांचे समूळ उन्मूलन तेच करू शकते' ['तत्राल्पे लघनं पथ्यं मध्ये लंघनपाचम् । प्रभूते शोधनं तध्दि मूलादुन्मूलयेन्मलान्' ।—अ. हृ.].

चिकित्सेचे हे शोधनादि प्रकार याप्रमाणे दोषांच्या प्रमाणाला अनुसरून सांगण्यात आले आहेत. शोधन आणि शमन या दोनही उपायांचे फळ मात्र एकच. ते म्हणजे दुष्ट दोषांचे निर्हरण.

शोधनाचे जे पांच प्रकार सांगितले त्या प्रत्येकाचे कार्य निरनिराळे आहे. अति प्रमाणात साठविलेल्या दुष्ट कफाचे निर्हरण किंवा शोधन वमनाने होते. विरेचनाने अतिसंचित पित्ताचे निर्हरण होते. आणि**निरूह बस्ती**चा उपयोग दूषित वाताचे शोधन करण्यासाठी केला जातो. शिरोभागात साचलेल्या कफाचे निर्हरण करण्यासाठी नस्य योजतात. **नस्य** विशिष्ट स्थानातील एक विरेचन होय. त्याचा पृथक् निर्देश म्हणूनच करण्यात आला आहे. विरेचनाचाच आणखी एक प्रकार म्हणजे सिरावेध किंवा रक्तमोक्ष. त्याने रक्ताश्रयी दोषांचे अपहरण होते. म्हणूनच त्याचाही निर्देश स्वतंत्रपणे करण्यात येतो.

## दुष्ट दोषांचे निर्हरण

आमाशय, पच्यमानाशय व पक्वाशय यांत संचित झालेल्या कफ, पित्त व वायू यांचे वमन, विरेचन व निरूह क्रियांनी निर्हरण केल्याने सर्व शरीरात पसरलेल्या दुष्ट दोषांचे निर्हरण कसे होते, अशी शंका या ठिकाणी उत्पन्न होणे स्वाभाविक आहे. तिचे निरसन पुढीलप्रमाणे करता येईल.

सर्व शरीरात पसरलेले आमसंज्ञक रोगोत्पादक द्रव्य स्नेहन आणि स्वेदन या क्रियांच्या द्वारे धातुघटकांच्या पासून प्रथम वेगळे केले जाते. नंतर आमाशयादि अवयवांत ते गेले की पुढे वमनादिकांच्या कडून मुखादि मार्गांनी त्याचे यथाक्रमा उत्सर्जन होते. रोगकारक द्रव्ये अथवा दुष्ट दोष धातुघटकांच्याशी मिसळूनच असतात. आणि तश्याच स्थितीत आपापल्या शक्तीला आणि प्रमाणाला अनुसरून निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रोग ते उत्पन्न करतात. स्नेहनाने आणि स्वेदनाने त्यांचे धातूंपासून पृथक्करण होते.

'कोष्ठ, धातू, स्रोतसे, हात, पाय, अस्थी यांत खोलवर जाऊन बसलेले दोष स्नेहनाने प्रथम ओलसर होतात व नंतर स्वेदनाने द्रवीभूत होतात. पुढे ते कोठ्यात आणले जाऊन शोधनक्रियांच्या द्वारे शरीराबाहेर उत्सर्जित केले जातात', असे वाग्भटाचार्यांनी यासंबंधी सांगितले आहे. ['स्नेहक्लिन्ना कोष्ठगा धातुगा वा स्रोतोलीना ये च शाखास्थिसंस्थाः । दोषाः स्वेदैस्ते द्रवीकृत्य कोष्ठं नीताः सम्यक् शुध्दिभिर्निर्हियन्ते ।' – अ. हृ.].

## दुष्ट दोषांचा धातूंत प्रवेश

आरोग्य अशा आहारादिकांचे सेवन केल्याने दुष्ट वा कुपित झालेले वातादि दोष रसधातूबरोबर सर्व शरीरात प्रसृत होतात आणि शारीर धातूंत प्रविष्ट होऊन अखेर नानाविध रोगांना उत्पन्न करतात. हे प्रकुपित दोष म्हणजेच आमसंज्ञक द्रव्य. तेच रोगोत्पादक असते. आहारातील रूक्षतीक्ष्णादि द्रव्याला अनुसरून या आमद्रव्यातही वातभूयिष्ठ, पित्तभूयिष्ठ आणि कफभूयिष्ठ असे प्रकार संभवतात. त्यात अनेकदा द्विदोषप्रधान्य तर कित्येकदा त्रिदोषप्रधान्य सुद्धा आढळून येते. शूलदाहादि निरनिराळी लक्षणे या आमभेदामुळेच निरनिराळ्या रोगांत प्रादूर्भूत होतात. शोधनशमनात्मक निरनिराळ्या उपायांचा अवलंब निरनिराळ्या रोगांत म्हणूनच करण्यात येतो. कारण शारीर धातूंत मिसळलेले आमद्रव्य त्यांच्यापासून वेगळे काढून ते शरीराबाहेर उत्सर्जित करणे हेच त्यांचे मुख्य प्रयोजन असते. हे आमद्रव्य धातूंशी मिश्र झालेले असते तेव्हा ते शरीराबाहेर काढून टाकणे दुष्कर जाते. इतकेच नव्हे तर त्या प्रयत्नात धातूंचा नाशही होतो. वाग्भटाचार्यांनी हा मुद्दा एका दृष्टांताद्वारे पुढीलप्रमाणे विशद केला आहे. ते म्हणतात, 'सर्व देहात प्रसृत झालेले, धातूंत खोल गेलेले आणि स्वस्थानापासून च्युत न झालेले असे दुष्ट दोष शरीराबाहेर काढण्याचा प्रयत्न करू नये. अपक्व फळातून रस पिळून काढण्यासारखे ते दुष्कर होय. त्यायोगे रस न निघता आश्रयभूत फळाचा मात्र नाश व्हावा, त्याचप्रमाणे दोषांचे निर्हरण न होता धातूंचाच त्यात नाश होतो' ['सर्वदेहप्रविसृतान् सामान् दोषान्न निर्हरेत् । लीनान् धातुष्वनुत्क्लिष्टान् फलादामात् रसानिव । आश्रयस्य हि नाशाय ते स्युर्दुर्निर्हरत्वतः ।' अ. हृः].

## स्नेहन आणि स्वेदन यांची योजना

धातूंत लीन झालेल्या दोषांचे त्यांच्यपासून पृथक्करण करण्यासाठीच स्नेहस्वेदांचा निर्देश शास्त्रात करण्यात आला आहे.

स्नेहन आणि स्वेदन यांच्या द्वारे दुष्ट दोषांचे पृथक्करण धातूंपासून कसे होते, याबद्दल चरकसंहितेत पुढीलप्रमाणे वर्णन आढळते–'उष्ण, तीक्ष्ण, सूक्ष्म, व्यवायी आणि विकासी औषधे आपापल्या सामर्थ्याच्या जोरावर प्रथम हृदयात प्रवेश करतात आणि पुढे धमनींच्या द्वारे समस्त शरीरात संचार करतात. त्यांची योजना युक्तिपूर्वक केली तर ही औषधे शरीराच्या समस्त स्थूल आणि सूक्ष्म स्रोतसांत प्रवेश करून निरनिराळ्या ठिकाणी संचित झालेल्या दुष्ट दोषांना प्रथम आपल्या उष्ण गुणाने पाझरवून स्वतःच्याच तीक्ष्ण गुणाने धातूंपासून अखेर विच्छिन्नही करतात.

'याप्रमाणे पृथक्भूत झालेल्या दुष्ट दोषांचा समुच्चय, तेल वा तूप लावलेल्या पात्राला ज्याप्रमाणे मध चिकटत नाही, त्याप्रमाणे स्नेहनविधीने अंतःस्निग्ध झालेल्या शरीराला न चिकटता स्वतःच्या सूक्ष्म आणि अधोवाही स्वभावाला अनुसरून, आमाशयात येतो. तत्रस्थ उदानवायूकडून त्याचे पुढे तेथून प्रक्षेपण होते. त्यापैकी काही अंश औषधातील ऊर्ध्वप्रभावी अशा अग्निवाय्वात्मक गुणांमुळे शरीराच्या ऊर्ध्व भागात फेकला जाऊन ऊर्ध्व मार्गाने–वमनावाटे–त्याचे उत्सर्जन होते तर काही अंश औषधातील अधःप्रभावी अशा

अनुक्रमणिका

पृथ्वीजलात्मक गुणांच्या योगाने शरीराच्या अधोभागात फेकला जाऊन अधोमार्गाने म्हणजे विरेचनावाटे– त्याचे निर्हरण होते. त्यातील काही भाग तर उभयगुणी औषधांच्या योगाने खाली व वर दोहोकडे प्रक्षिप्त होऊन उभय मार्गांनी उत्सर्जित होतो’ [‘तत्रोष्णतीक्ष्णसूक्ष्मव्यवायिविकासीनि औषधानि स्वयीर्येण हृदयमुपेत्य धमनीरनृसृत्य सम्यक्युक्त्या स्थीलाणुस्रोतोभ्यः केवल शरीरगत दोषससंघातं आग्नेयत्वात् विष्यन्दयन्तिं तैक्ष्ण्यात् विच्छिन्दन्ति । स विच्छिन्नः परिप्लवः स्नेहभाविते काये स्नेहाक्तभाजनस्थमिव क्षौद्रं असज्जन् अणुप्वणस्वभावात् आमाशयमागत्य उदानप्रणुन्नः अग्निवाय्वात्मकत्वात ऊर्ध्वमागप्रभावादौषधस्य ऊर्ध्व उद्भिद्यते, सलिलपृथिव्यात्मकत्वात् अधोभागप्रभावादौषधस्य अधः प्रवर्तते, उभयतश्च उभयगुणत्वात् ।’ – च. सं.].

स्नेहन आणि स्वेदन यांनी वेगळे झालेले रोगकारक द्रव्य पुनश्च कोठ्यात येते ते स्वाभाविक आकर्षणक्रियेमुळे. रोगोत्पादक दोषांचे प्रसरण कोठ्यातून शरीरात होणे आणि धातूघटकांतून विभक्त झाल्यानंतर त्यांचे पुनश्च कोठ्यात आगमन होणे या क्रिया, विक्षेपण आणि आकुंचन ही कर्मे करणाऱ्या वायूकडूनच होत असतात. आहारोत्पन्न रसाचे सूक्ष्मातिसूक्ष्म वाहिनींच्या द्वारे हृदयातून समस्त शरीरात विक्षेपण होणे आणि मलरूप प्राप्त झालेल्या त्याच रसाचे वाहिनींच्याच द्वारे हृदयात पुनश्च प्रत्यागमन होणे ही कार्ये ज्याप्रमाणे प्रक्षेपण आणि आकुंचन ही कर्मे करणाऱ्या वायूकडूनच होत असतात त्याचप्रमाणे कोष्ठगत दुष्ट दोषांचे शरीरात प्रसरण होणे आणि शरीरात प्रसरण पावलेल्या दुष्ट दोषांना पुनश्च कोठ्यात आणणे ही दोन कर्मेही त्याच वायूकडून घडून येत असतात. आणि ही क्रिया ध्यानात घेऊनच शरीरात प्रसृत झालेले दुष्ट दोष प्रथम कोठ्यात आणले जातात आणि नंतर त्यांचे वमनविरेचनादि शोधनोपायांनी शरीराबाहेर निर्हरण केले जाते. किंबहुना, दोषांचा उपशम करण्याची ही शोधन चिकित्सा याच उद्देशाने सांगण्यात आली आहे.

शरीरातील धातूंच्या अथवा अंगोपांगांच्या ठिकाणी ज्या वेळी दुष्ट दोष अथवा आमसंज्ञक रोगोत्पादक द्रव्य अतिरिक्त प्रमाणात संचित होते तेव्हा त्याचे उत्सर्जन मलोत्सर्जनाच्या स्वाभाविक वा नित्याच्या क्रियेकडून होऊ शकत नाही. म्हणूनच स्नेहन आणि स्वेदन यांनी हा दोष धातूंपासून प्रथम वेगळा काढून आणि त्याला कोठ्यात आणून नंतर शोधनोपायांनी त्याचे निर्हरण करावे लागते. ‘दुष्ट दोषांचे प्रमाण अधिक झाले की, त्यांचे शोधन करणेच योग्य, तेच त्यांचे उन्मूलन करते’, हे वाग्भटांचे वचन याच अभिप्रायाचे वाचक होय [‘प्रभुते शोधनं तद्वि मूलादुन्मूलयेन्मलान्’ – अ. हृ. ।].

**दीपनादि शमनोपाय**

रोगोत्पादक आमद्रव्याचे प्रमाण जेव्हा कमी असते तेव्हा पूर्वी सांगितलेल्या दिपनपाचनादि शमनोपायांची योजना हितकर होते. त्यांच्या योगेच धातूंपासून या आमद्रव्यांचे पृथक्करण होते. ते प्रायः द्रवस्वरूपच असते. आणि म्हणूनच मूत्र आणि स्वेदवह स्रोतसांच्या मार्गांनी स्वाभाविकरीत्या पण थोड्या थोड्या प्रमाणात ते शरीराबाहेर निघून जाते. अर्थात् रोगांचा पूर्णपणे उपशम होण्यासाठी तत्कारणीभूत दुष्ट दोषांचे निर्हरण व्हावेच लागते. मग ते शोधनाने होवो वा शमनाने. अष्टांगहृदयातील शमनाची व्याख्याही या संदर्भात विचारात घेण्यासारखी आहे. ‘दुष्ट दोषांचे शोधन न करता आणि सम स्थितीतील दोषांची वाढही न होऊ देता दोषांना विषम स्थितीतून पुनश्च सम स्थितीत आणणे म्हणजे शमन’, असे आचार्य वाग्भटांनी म्हटले आहे [‘न शोधयति यत् दोषान् समान् नोदोरयत्यपि । शमीकरोति विषमान् शमनम् .... ।’ – अ. हृ.]. दोषांचे शोधन न करणे म्हणजे वमनविरेचनादिकांनी दुष्ट दोषांचे बलपूर्वक व एकदमच निर्हरण न करणे, इतकाच अर्थ या ठिकाणी स्वीकारणे योग्य. अन्यथा प्रकुपित दोष शरीरात कायम ठेवूनच शमनचिकित्सा रोगांचा उपशम करते असे मानावे लागेल. आणि ते तर असंगत होय.

## शमन चिकित्सेचे काही विशेष

शमन चिकित्सेचे आणखी काही विशेषही विचारात घेण्यासारखे आहेत. शरीराच्या निरनिराळ्या भागांत राहणाऱ्या म्हणजेच एकदेशज अशा दुष्ट दोषांचा आणि तदुत्पन्न विकारांचा नाश करण्यासाठी दीपनादि शमन उपायांचा उपयोग होतो. उलट, सार्वदेहिक अथवा सर्वशरीराश्रयी दोष आणि तदुद्‌भूत रोग शोधनोपायांनी नष्ट होतात.

विशिष्ट ठिकाणी परिणाम करणाऱ्या व्याधिविपरीत उपायांचा अंतर्भावही शमन चिकित्सेतच करण्यात येतो. विशिष्ट स्थानातील दोषांचे विशिष्ट द्रवाच्या प्रभावाने प्रशमन करणे, याचा अर्थ, त्या स्थानातील वैगुण्याचा नाश करून तदाश्रयी दोषांचे तेथून उत्सर्जन करणे. मात्र ते शोधन नव्हे तर शमनच होय. शमन हे दोन प्रकारचे असल्याचे यावरून उघड होते. सर्व देहात प्रसृत झालेल्या आणि म्हणूनच अल्प प्रमाणात असलेल्या दोषांचे निर्हरण करणे हे एकाचे उद्दिष्ट तर विशिष्ट स्थानातील दोषांचे निर्हरण हे दुसऱ्याचे. त्यापैकी शरीरव्यापी दोषांचे निर्हरण करणाऱ्याला हेतुविपरीत म्हणतात तर विशिष्ट स्थानी आणि विशिष्ट द्रव्याच्या प्रभावाने कार्यान्वित होणाऱ्या शमनाला व्याधिविपरीत म्हणतात. या भिन्न संज्ञा भिन्न परिणाम सुचविण्यासाठीच देण्यात आल्या आहेत.

## शोधनाची प्रक्रिया

वमनादि उपायांनी कफादिकांचे प्रशमन पुढील प्रमाणे घडून येते:—

कफ, पित्त व वायु यांची प्रमुख स्थाने म्हणजे आमाशय, लघ्वंत्र आणि पक्वाशय. त्यांच्या या स्थानांतूनच दूषित झालेल्या कफादिकांचे समस्त शरीरात म्हणजे शारीर धातूंत प्रसरण होत असते. वमनाने आमाशय शुद्ध वा निर्मळ होतो, विरेचनाने लघ्वन्त्र संशोधित होते आणि पक्वाशयाची शुद्धी निरूह बस्तीने होते. कफ, पित्त आणि वायु यांचे फलतः शमन होते.चरकाचार्यांनी यासंबंधी पुढीलप्रमाणे सागून ठेवले आहे. ‘कफजन्य विकारांवर सर्व उपक्रमांत वमन हे प्रधानतम होय. कारण ते प्रथम आमाशयातच प्रवेश करते आणि अनेक विकार उत्पन्न करणारे तेथील दुष्ट कफाचे मूळच बाहेर खेचून काढते. दुष्ट कफाचा अशा रीतीने मुळातच नाश झाला म्हणजे शरीरात नंतर उद्‌भवणारे नानाविध श्लेष्मविकार आपोआपच शांत होतात. हीच गोष्ट विरेचनाची. पित्तजन्य व्याधींवरील उपक्रमांत सर्वश्रेष्ठ तेच आहे. ते सुद्धा सर्वप्रथम आमाशयात (म्हणजे क्षुद्रांत्रात) शिरते आणि अनेक विकारांना उत्पन्न करणाऱ्या तेथील दूषित पित्ताचे उन्मूलन करते. आस्थापन अनुवासन बस्तीही याचप्रमाणे वातविकारांवरील सर्वश्रेष्ठ उपाय होय. तो प्रथम ‘पक्वाशयातच प्रवेश करतो आणि अनेक विकारांना मूलभूत असणाऱ्या वाताचे निर्मूलन करतो’ [‘वमन तु सर्वोपक्रमेम्यः प्रधानतमं श्लेष्मणि मन्यन्ते भिषजः। तद्धि आदित एव आमाशयमनुप्रविश्य केवलं वैकलं वैकारिकं श्लेष्ममूलं आकर्षति। तत्रावजिते श्लेष्मण्यपि शरीरान्तर्गताः श्लेष्मविकाराः प्रशान्तिमापद्यन्ते। विरेचनं तु सर्वोपक्रमेभ्यः पित्ते प्रधानतमं मन्यंते भिषजः। तध्दि अदित एव आमाशयमनुप्रविश्य केवलं वैकारिक पित्तमूलं चापकर्षति। आस्थापनानुवासनं तु खलु सर्वोपक्रमेभ्यो वाते प्रधानतमं मन्यन्ते भिषजः। तदादित एव पक्वाशयमनुप्रविश्य केवलं वैकारिकं वातमूल चापकर्षति।’ – च. सं.]. वमनादि उपायांनी कफादि दोषांची त्यांच्या उत्पत्तीस्थानातच याप्रमाणे परिशुद्धी झाली म्हणजे शरीरात होणाऱ्या त्यांच्या प्रसाराला आणि त्यापासून नानाविध व्याधी उत्पन्न होण्याला आपोआपच प्रतिबंध होतो.

अनुक्रमणिका

**शमन क्रिया**

शमन चिकित्सेचे दीपनपाचनादि प्रकार दोषांचे प्रशमन पुढील प्रमाणे घडवून आणतात. अतिप्रमाणात वा अयोग्य रीतीने आहाराचे सेवन केल्याने ज्या वेळी आहार व धातू यांचे अजीर्ण होते, त्यावेळी उपवास करणे अथवा आहाराचे प्रमाण कमी करणे हितकर होते, आहाराचे प्रमाण कमी करणे अथवा लघु, रूक्ष आदि द्रव्यांची आहारात योजना करणे ही गोष्ट अजीर्णाच्या तारतम्यानुसार करावयाची असते. आहार्य अथवा औषधस्वरूपी पाचन द्रव्यांचेसेवनही अशा वेळी केले जाते. सुमठ, मिरी, पिंपळी, हिंग इत्यादि काही द्रव्ये अशी आहेतही. दीपन पाचन औषधे म्हणून ती योजली जातातच पण त्यशिवाय रुचकर आहार्य पदार्थांतही त्यांचा समावेश झालेला आहे. तात्पर्य जठराग्नी जेव्हा मंद नसतो तेव्हा आहाराच्या अतिसेवनातून उद्‌भवलेले अपचन दूर करण्यासाठी अल्पाशन, अनशन अथवा पाचन द्रव्यांचे सेवन हितावह होते. परंतु, हेच अपचन जेव्हा जठपाग्नीच्या अथवा धात्वग्नीच्या मांद्यातून उद्‌भवते तेव्हा अग्निवर्धक अशी दीपन औषधे योजावयाची असतात. द्रव्यद्रव्यांचे सेवन अति प्रमाणात केल्याने जे अजीर्ण उद्‌भवते, त्यावर तहानेचा निरोध करणे म्हणजे कोणतेही द्रवद्रव्य वर्ज्य करणे हितावह होते. अपाचित अंशाचे त्या योगे पचन होते. व्यायाम, सूर्यकिरण आणि शुद्ध वायु यांचे सेवन केल्याने रक्तादि धातूंचे योग्य पचन होते. रोग, रोगी, देश, ऋतू इत्यादिकांचा विचार करून त्यांची योजना मात्र उचित रीतीने केली पाहिजे. अर्थात् धातूंचे पचन करण्यासाठीच या व्यायामादिकांचा उपयोग होतो. कोष्ठगत अजीर्णात व्यायाम वर्ज्य मानला आहे. ‘वातपित्ताचे रोगी, बाल, वृद्ध, आणि अजीर्ण झालेले यांनी व्यायामाचा त्याग करावा’, असा वाग्भटांचा आदेश आहे [‘वातपित्तामयी बालो वृद्धोऽजीर्णी च त त्यजेत्’ –अ. हृ.]. अर्थात्, व्यायाम केल्याने शरीरात लाघव व कर्मसामर्थ्य प्राप्त होते, अग्नी प्रदीप्त होतो आणि मेदाचा क्षय होतो’, हे व्यायामाचे गुणवर्णनही वाग्भटांनीच केले आहे [‘लाघवं कर्मसामर्थ्य दीप्तोऽग्निर्मेदसः क्षयः’ ।–अ. हृ.]. अग्नी शद्बाने येथे कोठ्यातील नव्हे तर धातुगत अग्नी अभिप्रेत मानावयास हवा. किंबहुना, तसे स्विकारले तरच वाग्भटांच्या उपरिनिर्दिष्ट आदेशाशी त्यांच्याच प्रस्तुत वचनाचा विरोध येत नाही. व्यायामादिकांचा उपयोग धातूंचे पचन होण्यासाठी मुख्यतः होतो, असे जे सांगितले ते म्हणूनच.

**एक स्वभाविक प्रवृत्ती : रोगप्रतीकार**

रोगांना हेतुभूत होणाऱ्या आमद्रव्याचे उत्सर्जन शोधनादि उपायांनी करण्यात येतेच. परंतु सर्व शरीराच्या निरनिराळ्या स्थानांत राहून निरनिराळी कर्मे पार पाडणारे वातादींचे भेदप्रभेदही आपापल्या स्वाभाविक सामर्थ्याला अनुसरून समस्त शरीरांत व शरीराच्या निरनिराळ्या स्थानांत संचित झालेल्या आमद्रव्याचे निर्हरण करून शारीर धातू निर्मळ राखण्यासाठी प्रयत्न करीत असतात. किंबहुना, शारीर धातूंच्या अभिवृद्धिप्रमाणे त्यांची परिशुद्धी करणे हेही दोषांचे एक स्वभावसिद्ध कर्मच होय.

रोगोत्पादक द्रव्याचे उत्सर्जन करून धातूंची परिशुद्धी करण्यासाठी वातादि दोष ज्यावेळी प्रवृत्त होतात त्यावेळी त्यांच्या पचनोत्सर्जनादि कर्मांत अस्वाभाविकता प्रादुर्भूत होते. दुष्ट द्रव्यांचे पचन होणे म्हणजे धात्वंशापासून त्यांचे पृथक्करण होणे, तसेच त्यांचे पुढे उत्सर्जन होणे इत्यादि कर्मे देहस्वभावाशी विरोधी तर असतातच पण नित्याची वा परिचित देखील नसतात. परिणामी ती दाह, शूल आणि शोथ यांना आणि तदुत्पन्न नानाविध व्याधींना कारणीभूत होतात. रोगोत्पादक द्रव्याचे अस्वाभाविक पचन दाहाला कारणीभूत होते तर त्यांचेच अस्वाभाविक उत्सर्जन शूल उत्पन्न करते. तसेच त्याच्याच अस्वाभाविक

संचयातून शोथ उद्‌भूत होतो. अर्थात् व्याध्युत्पादक द्रव्याचा प्रतिकार करण्याच्या अवस्थेतूनच दाहादि अस्वाभाविक कर्मे प्रादुर्भूत होतात.

शरीराला पीडा देणारे अथवा त्याच्या पचनेत्सर्जनादि स्वाभाविक कर्मात विषमता उत्पन्न करणारे कोणतेही द्रव्य हे रोगकारकरच होय. मग ते बाह्य असो वा आभ्यन्तर असो [बाह्य म्हणजे विषादिकांप्रमाणे स्वभावतःच रोगोत्पत्ती करणारे आणि आभ्यन्तर म्हणजे आमसंज्ञक अपाचित आहारादि द्रव्य.]. विकृत झालेले वातपित्तादि दोष, आमसंज्ञक द्रव्य आणि मल हे शब्द या दृष्टीने समानार्थक असून व्याधिविज्ञानात तरी त्यांचा वापर तशाच अर्थाने करण्यात आला आहे.

**चिकित्सोपाय केवळ साहाय्यक**

रोगांचा विनाश करणे हे शरीराचे स्वभावसिद्ध कर्मच होय शरीराच्यास्वाभाविक सामर्थ्याकडूनच हा विनाश घडून येत असतो. शरीराचे जीवन चालविणारे वातपित्तकफच त्याच्या विकारांचा उपशमही करतात. इतकेच नव्हे तर हे दोषसंज्ञक स्वाभाविक सामर्थ्य जेव्हा क्षीण होते तेव्हा प्रभावी औषधे सुद्धा कार्यक्षम होऊ शकत नाहीत. अर्थात् चिकित्सेचे नानाविध भेद हे वस्तुतः शरीराच्या स्वाभाविक सामर्थ्याला केवळ सहायभूतच होत असतात.

**चिकित्सेतील त्रैविध्य**

रोग अनेक असले तरी प्रमुख लक्षणे आणि कारणे यांना अनुसरून त्यांचे प्रमुख भेद ज्याप्रमाणे तीनच संभवतात त्याचप्रमाणे चिकित्सेला अनुसरूनही त्यांच्यात त्रैविध्यच आढळून येते. शूल, दाह, आणि शोथ ही विकारांची प्रमुख लक्षणे आणि विकृत झालेले वात, पित्त, कफ ही त्यांची प्रधान कारणे. तदनुसार वातशामक आणि कफशामक याप्रमाणे रोगांना उपशम करणारी चिकित्साही मुख्यतः तीनच प्रकारची असावयाची.

**शोधनातील तत्त्व—विरेचन**

रोगोत्पादक दोषांना अनुसरून समस्त चिकित्साप्रकारांचे येणेप्रमाणे त्रिविध वर्गीकरण होत असले तरी त्या प्रत्येकात स्वरूपतः पुनश्च दोन भेद आढळून येतात. ते म्हणजेच शोधन आणि शमन. वमनादि पांच प्रकारांनी शोधनाचा तर दीपनादि सात प्रकारांनी शमनाचा उल्लेख पूर्वी आला आहेच. हे दोन चिकित्साप्रकार लंघनाचे भेद म्हणून सांगितले असून संपूर्ण चिकित्लेचे बृंहण आणि लंघन असे प्रमुख भेद दोन संभवतात, असाही उल्लेख आहेच. यांपैकी बृंहण चिकित्सेचा उपयोग धातुक्षीणतेमुळे क्षीण झालेल्या शरीराच्या संवर्धनासाठी करण्यात येतो. त्यामुळे धातूंचे अभिवर्धन होत असले तरी दुष्ट दोषांचे निर्हरण करून व्याधिविनाश करण्याच्या कामी तिचा उपयोग होत नाही. अर्थात् बृंहण ही तत्त्वतः चिकित्साच नव्हे लंघनाचा एक भेद म्हणून सांगितलेल्या शोधन चिकित्सेचे जे वमनादि पांच प्रकार सांगितले आहेत त्या सर्वांत दुष्ट दोषांचे वियोजन अथवा निर्हरण समान असल्याचे दिसून येते. बस्ती, विरेचन आणि वमन यांनी तर वातादींचे विरेचनच होत असते. परंतु सिरामोक्षाने रक्तगत दुष्ट पित्ताचे आणि नावन कर्माने म्हणजे नस्याने मस्तकात सांचलेल्या कफाचे देखील विरेचनच करण्यात येते. अर्थात् शोधनाचे पांच प्रकार नामतः

भिन्न असतांही दोष-विरेचन-कर्म त्या सर्वांत समान असल्याने स्त्रव प्रकारचे शोधन म्हणजे तत्त्वतः विरेचनच होय.

चिकित्सेचा दुसरा प्रकार म्हणजे शमन. क्षुधानिग्रह, तृष्णानिग्रह इत्यादि त्याचे भेद सात सांगितले आहेत. तथापि, वाढलेल्या दोषांचे प्रशमन करणे हे कर्म त्या सर्वात समान असल्याने त्या सातही भेदांना शमन ही एकच संज्ञा तत्त्वतः योग्य होय.

### प्रमुख शमन द्रव्ये

वाढलेल्या वातादि दोषांचे शमन करण्यासाठी जी द्रव्ये योजिली जातात त्यांत अनुक्रमे तेल, तूप व मध ही प्रधान मानली जातात. रूक्षगुणी वायूचे शमन स्नेहगुणोत्कट तोलाने होते तर तीक्ष्णगुणी पित्त मंदगुणोल्बण तुपाने प्रशमित होते. कफ हा स्निग्धगुणी असतो. रूक्षगुणी मध हे त्याचे सर्वश्रेष्ठ शमन होय. वातपित्तकफांचे प्रशमन करणारी तेल, तूप व मध ही द्रव्ये कशी श्रेष्ठ होत, हे सांगताना वाग्भटाचार्यांनी असे उद्‌गार काढले आहेत की, 'वायू,पित्त आणि कफ यांचे प्रशमन करण्यात अनुक्रमे तेल, तूप, व मध ही द्रव्ये पथ्थकर होत, असे ब्रह्मदेव सांगो वा त्याचा मुलगा सांगो, त्याचा अर्थ एकच. मंत्रात्मक नसलेल्या बोलण्यात बोलणाराची योग्यता विचारात घेण्याचे प्रयोजनच काय'? ['वाते पित्ते श्लेष्मशांती च पथ्यं तैलं सर्पिर्माक्षिकं च क्रमेण । एतद् ब्रह्मा भाषतेब्रह्मजो वा का निर्मन्त्रे वक्तृभेदोक्तिशक्तिः' । – अ. हृ.].

### चिकित्सेचे प्रधान लक्षण

शरीराच्या निरनिराळ्या अवयवांत वातादि दोषांच्या रूक्षस्निग्धादि गुणांचे प्रमाण निरनिराळे आढळते. कुठे रूक्ष गुणाचे आधिक्य असते तर कुठे स्निग्ध गुण अधिक असतो. इतर काही ठिकाणी शीतादि गुण अधिक असतात. अवयवांची घटकद्रव्ये, त्यांचे आकार आणि त्यांची कार्ये यांतील भिन्नतेचा हा परिणाम असतो. अर्थात् निरनिराळ्या अवयवांतील दुष्ट दोषांचा उपशम करण्यासाठी जे उपाय योजण्यात येतात त्यांतही प्रकार अनेक संभवतात. परंतु स्थाने आणि लक्षणे यांना अनुसरून व्याधींचे प्रकार अनेक होत असले तरी कुपित झालेले वातादि दोष ही तीनच त्यांची प्रमुख कारणे होत. दुष्ट दोषांचे शोधन-आणि शमन करण्यासाठी वमनविरेचनादि आणि दीपनपाचनादि उपायही असेच अनेक सांगण्यात आले आहेत. आणि दीपनपाचनादि उपायही असेच अनेक सांगण्यात आले आहेत. तथापि, सर्व रोगांना कारणीभूत होणाऱ्या तीन दोषांचा उपशम तीन प्रकारे करणे आणि त्यायोगे तदुत्पन्न रोगांचा नाश करणे, हेच त्या सर्वांचे स्वरूप असते. या सर्व व्याधिविनाशक उपायांचा अंतर्भावही तदनुसार प्रमुख अशा तीनच प्रकारांत होऊ शकतो. आणि रोगोत्पादक दोषांचा उपशम करणे हे तर चिकित्सेचे प्रधान लक्षणच होय. रोगचिकित्सेत दोषांनुबंधाचा विचार करणे म्हणूनच अवश्य असते.

———

अनुक्रमणिका

# दर्शन २२ – विशिष्ट चिकित्सेतील वातादींचा अनुबंध

निरनिराळे रोग निरनिराळ्या स्थानांच्या रसरक्तादि दूष्यांच्या वैगुण्यातून उत्पन्न होत असले तरी सामान्य कारणरूप दोषांचा संबंध प्रत्येक रोगाच्या चिकित्सेत विचारात घ्यावाच लागतो. त्याचे स्वरूप आता पाहावयाचे.

## विशिष्ट चिकित्सेचे स्वरूप

'स्थान आणि धातू यांच्या वैषम्यातून सर्व रोग उत्पन्न होत असले तरी तीन दोषांना सोडून त्यांपैकी एकही असू शकत नाही ['तया स्वधातुवैषम्यनिमित्तमपि सर्वदा । विकारजातं त्रीन् दोषान् (नातिवर्त ते) ....' अ. हृ.]', असे अष्टांगहृदयात तर 'स्थानवैषम्य आणि धातुवैषम्य यांतून जे अनेक रोगसमुदाय प्रादुर्भूत होतात ते वायुपित्तकफांना सोडून असू शकत नाहीत ['स्वधातुवैषम्यनिमित्तजा ये विकारसंघा बहवः शरीरे । न ते पृथक् पित्तकफानिलेभ्यः....' च. सं.]', असे चरकसंहितेत सांगितले आहे. सर्वरोगव्यापी वातादि दोष हे त्या रोगांचे सामान्य कारण असले तरी दोषभेदांना अनुसरून रोगांतही नानाविध भेद आढळतात. ज्वर, कुष्ठ इत्यादि रोगांत दोषभेदानुसारच विभिन्न अवस्था उद्‌भवत असतात. रोगागणिक सांगण्यात आलेले चिकित्सोपायही याप्रमाणे अनेक आणि अनेकविध असले तरी त्या सर्वांचे वर्णन सुद्धा त्रिदोषांना अनुसरूनच करण्यात आलेले आहे. विशिष्ट रोग आणि त्यावरील विशिष्ट चिकित्सा यांच्यात याप्रमाणे दोषांचा अनुबंध कायमच असतो.

दोषांचा प्रकोप झाल्यानंतरही एखाद्या विशिष्ट स्थानात ज्या वेळी ते अवरूद्ध होतात त्याच वेळी रसरक्तादि विशिष्ट धातूत ज्वर, गुल्म आदि विकार आपापल्या लक्षणांनी स्पष्टपणे अभिव्यक्त होतात. विशिष्ट स्थानाची दुष्टी अथवा वैगुण्य हा सर्व रोगांचा प्रधान हेतू म्हणूनच सांगण्यात आला आहे. त्याचा म्हणजे विशिष्ट स्थानांतील विकृतीचा उपशम झाला की विशिष्ट विकारही नाश पावतो. ज्वरादि विकारावर सांगण्यात आलेल्या चिकित्सोपायांचे स्वरूपही, त्या त्या व्याधींच्या विशिष्ट स्थानातील वैगुण्याचा नाश करणे, असेच आहे. चिकित्सा करणे म्हणजे धातूंत साम्य निर्माण करणे. 'चिकित्सक, परिचारक, औषध आणि रुग्ण या चारांच्या कडून, शारीर धातूंत विकृती उत्पन्न झाल्यावर ती दूर करून धातूंत साम्य निर्माण करण्यासाठी होणारी जी प्रवृत्ती, तिचे नांव चिकित्सा', अशी चिकित्सेची व्याख्या चरकांनी केली आहे. ['चतुर्णामिषगादीनां शस्तानां धातुवैकृते । प्रवृत्तिर्धातुसाम्यार्था चिकित्सेत्यभिधीयते । - च. सं. ।]. अर्थात् विशिष्ट रोगावरील चिकित्सा म्हणजे विशिष्ट व्याधिस्थानातील वैगुण्याचा नाश करणे, हे उघड होय.

## चिकित्सेचे प्रकारः हेतुविपरीत आणि व्याधिविपरीत

चिकित्सेचे मुख्य प्रकार दोन सांगण्यात आले आहेत. हेतुविपरीत आणि व्यधिविपरीत. विकृत झालेले वातादि दोष, त्यांची उपेक्षा केल्याने म्हणजे त्यांची चिकित्सा न केल्याने नानाविध रोग उत्पन्न करतात. विकारांना हेतुभूत असणाऱ्या या प्रकुपित दोषांचा उपशम जीमुळे होतो त्या चिकित्सेला हेतुविपरीत म्हणतात [विकारहेतूंचे प्रकारही दोन सांगितले आहेत. एक सन्निकृष्ट आणि दुसर विप्रकृष्ट. मिथ्याहारविहार हे रोगांचे विप्रकृष्ट कारण. दोषांचा प्रकोप त्यामुळेच होतो. अशा रीतीने कुपित झालेले दोषच पुढे रोगोत्पत्ती करतात. रोगांचे सन्निकृष्ट कारण हे प्रकुपित दोषच होत. 'सर्वेषामेव रोगाणां निदानं कुपिता मलाः । तत्प्रकोपस्य तु प्रोक्त विविधाहितसेवनम्' (मा.नि.) म्हणजे, सर्व रोगांचे मूळ कारण प्रकुपित मल (दोष) आणि दोषप्रकोपाचे कारण विविध प्रकारचे अहितकर सेवन, असे माधवाचार्यांनी सांगितलेही आहे.].

अनुक्रमणिका

परंतु प्रकुपित दोषांचा उपशम होऊनही विशिष्ट स्थानी उद्‌भवलेल्या रोगांचा नाश हेतुविपरीत चिकित्सेने होत नाही. तो व्हावा यासाठी शास्त्रज्ञांनी जे उपाय सांगितले आहेत त्यांनाच व्याधिविपरीत चिकित्सा म्हणतात. 'विकृतीत अनुबंध उत्पन्न झाल्यानंतर म्हणजे रोगाचे विशिष्ट स्वरूप स्पष्टपणे व्यक्त झाल्यानंतर हेतुविपरीत चिकित्सेची योजना करण्याचे सोडून देऊन विशिष्ट व्याधिविपरीत चिकित्सा चिकित्सकाने उपयोगात आणावी [...... अनुबंधे तु सति हेतुविपर्ययम् । त्यक्त्वा यथायथं वैद्यो युंज्यात् व्याधिविपर्ययम् ।' अ. हृ.], ही वाग्भटाचार्याची सूचना या संदर्भात ध्यानात ठेववण्यासारखी आहे. ज्वरासारख्या पित्तजनित विकारावर नागरमोथा व पित्तपापडा ही द्रव्ये योजण्यात व्याधिविपरीत चिकित्सेचे हे तत्त्वच अवलंबिण्यात येत असते.

पचन, उत्सर्जन आणि पोषण हे दोषांचे सार्वदेहिक स्वाभाविक कार्य. आहारादिकांचे पचन हे पित्ताचे, मलमूत्रश्वासादींचा उत्सर्ग हे वायूचे आणि धातुपोषण हे कफाचे सार्वदेहिक कार्य होय. वातादि दोषांची ही उत्सर्जनादि सामान्य कर्मेच शरीराच्या निरनिराळ्या स्थानांत श्वसनादि निरनिराळी रूपे धारण करीत असतात. शूल, दाह आणि शोथ या वात–पित्त–कफांच्या देहव्यापी आणि सर्वसामान्य विकृती देखील शरीराच्या निरनिराळ्या स्थानी निरनिराळ्या रूपांनी, आविर्भूत होतात. विशिष्ट स्थानी विशिष्ट रूपांनी अभिव्यक्त होणाऱ्या दोषांच्या या विकृतींनाच ज्वर, कुष्ठ इत्यादि संज्ञा देण्यात येतात. स्निग्धशीतादिगुणयुक्त औषधांची तसेच व्यायाम, उपवास इत्यादींची योजना करून ज्यावेळी वातादि दोषांच्या शूलादि सार्वदेहिक विकृतींचे शमन करण्यात येते, तेव्हा या उपक्रमाला हेतुविपरीत म्हणतात. रोगहेतुक दुष्ट दोषांचा उपशम या रीतीने होत असतो. परंतु, अन्यान्य स्थानांत उद्‌भवलेल्या ज्वर, अतिसार इत्यादि रोगांचा नाश त्या त्या व्याधींचा नाश करणारी प्रभावी औषधे योजून जेव्हा करण्यात येतो तेव्हा त्या उपक्रमाला व्याधिविपरीत म्हणतात. दोषांचा प्रकोप होऊन सुद्धा एखाद्या व्याधीच्या म्हणजे विशिष्ट विकृतीच्या रूपाने तो जोवर प्रकट होत नाही तोवर हेतुविपरीत म्हणजे दोषनाशक चिकित्सा करणे योग्य असते. परंतु, विशिष्ट व्याधीची उत्पत्ती होण्यात दोषप्रकोपाचा परिणाम जेव्हा घडून येतो तेव्हा विशिष्ट स्थानातील वैगुण्याचा उपशम करणारी व्याधिविनाशक चिकित्साच उपयुक्त होते.

### व्याधिविपरीत चिकित्सेतील अन्यदोषानुबंध

व्याधिविपरीत चिकित्सेत अन्य दोषांच्या अनुबंधाचा विचार करणेही अवश्य असते. रोगोत्पादक स्थानवैगुण्यात कित्येकदा उत्पादक दोषाव्यतिरिक्त अन्य दोषांचा अनुबंधही विद्यमान असतो. आणि चिकित्सा करतेवेळी हा विशेष विचारातही घ्यावा लागतो. अर्थात् व्याधिविपरीत चिकित्सा करताना सुद्धा स्थानवैगुण्याबरोबरच त्या वैगुण्याला कारणीभूत होणाऱ्या दोषाचे बलाबल विचारात घेणे अवश्य असते. काही उदाहरणांवरून हा मुद्दा अधिक विशद होऊ शकेल.

### काही उदाहरणे

पित्तप्राधान्यामुळे ज्वरात तीक्ष्णता जेव्हा अधिक असते, अर्थात् ज्वरवेग जेव्हा तीव्र असतो तेव्हा तीक्ष्णविरोधी मंदगुणान्वित पित्तशामक औषधे उपयुक्त होतात. 'श्रीपर्णी, चंदन, वाळा, फालसा, जेष्ठिमध यांचा शर्करायुक्त कषाय पित्तज्वराचा नाश करतो' अथवा, 'सारिवादि कषाय साखरेसह सेवन केल्यानेही पित्तज्वर नष्ट होतो ['श्रीपर्णीचंदनोशीरपरूषकमधूकजः । शर्करामधुरो हन्ति कषायः पैत्तिकं ज्वरम् । ', पीतं पित्तज्वरं हन्यात् सारिवाद्य सशर्करम्' । सु. सं.], इत्यादि सुश्रुताने सांगितलेली पित्तज्वरनाशक औषधे मंदगुणीच [मंद म्हणजे यात्राकर – 'मंदोयात्राकरः स्मृतः', असे सुश्रुतांनी सांगितलेआहे. 'यात्राकर इति शरीरस्थायित्वात् देहस्य यात्रां वर्तन करोतीति' (सु. सं. व्यख्या), अर्थात् यात्राकर म्हणजे शरीराची जीवनयात्रा चालविणारा स्थायीभूत गुण असे डल्हणाचार्यांचे स्पष्टीकरण आहे.] आहेत. परंतु, ज्वरात

कफानुबंधामुळे जेव्हा शैत्यादि लक्षणे उद्‌भवतात तेव्हा योजावयाचे ज्वरहर औषध तीक्ष्णोष्णगुणीच हवे. 'गौरव, शैत्य, उत्क्लेश, रोमांच, अतिनिद्रा' ['गौरवं शीतमुत्क्लेदो रोमहर्षोऽतिनिद्रता' सु. सं. सं.]इत्यादि कफज्वराची लक्षणे सुश्रुताचार्यांनी उल्लेखिली असून त्याच्या उपशमार्थ तीक्ष्णोष्णगुणी औषधांचा प्रयोगच त्यांनी सांगितलेला आहे. 'हरिद्रा, चित्रक, निंब, उशीर, अतिविष, वचा, कोष्ठ, इंद्रजव, मूर्वा, पटोल यांचां काढा मिरी व मध यांच्यासह श्लेष्मज्वरात सेवन करावा' [हरिद्रां चित्रकं निंबं उशीरातिविषे वचाम् । कुष्ठमिंद्रयवान् मूर्वां पटोलं चापि साधितम् । पिबेन्मरिचसंयुक्तं सक्षौद्रं कफजे ज्वरे' । सु. सं.], असे ते कफज्वरचिकित्सेत म्हणतात. शीतगुणाची वाढ झाल्याने उत्पन्न होणारे शरीरजाड्य दूर करण्यासाठी उष्ण, तीक्ष्ण ['शीतगुण आल्हादक व स्तंभक आहे, उष्ण त्याच्या विपरीत असून मुख्यतः पाचक आहे. तसेच तीक्ष्ण गुण दाहपाककर आणि स्रावण आहे', इत्यादि उपरिनिर्दिष्ट गुणांचे स्पष्टीकरण सुश्रुतसंहितेत केलेले आहे – 'ल्हादनः स्तंभनः शीतः', 'उष्णस्तद्विपरीतः स्यात् पाचनश्च विशेषतः','दाहपाककरः तीक्ष्णः स्रावणः' सु. सं.]गुणाची ज्वरनाशक औषधे श्लेष्मज्वरात उपयुक्त ठरतात.

कासरोगात वाताच्या अनुबंधामुळे रूक्षता आणि शुष्कता उत्पन्न होते. 'शुष्क कासामुळे उरोभाग, घसा, तोंड यांत कोरड पडते, शरीरावर रोमांच उभे राहतात, श्वास घुसमटून डोळ्यापुढे अंधारी येते, कफात कोरडेपणा येतो आणि कष्टानेच तो बाहेर पडतो, तो तसा पडून गेला म्हणजे मग कासाचा जोर कमी होतो' ['शुष्कोरःकंठवक्त्रस्य हृष्टलोम्नः प्रताम्यतः । ..... सुष्ककासः कफं शुष्कं कृच्छ्रात् मुक्त्वाल्पतां व्रजेत् ' – च. सं.], इत्यादि वातकासाची लक्षणे चरकाचार्यांनी सागितली आहेत. या वातकासावर कासहर पण रूक्ष गुणाला विरोधी म्हणजे स्निग्ध असे उपचार हितकर होतात. 'रूक्ष मुष्याच्या वातज कासावर सर्वप्रथम स्निग्धोपचार करावेत, वातनाशक द्रव्यांनी सिद्ध केलेले स्नेह, धूम लेह इत्यादींचाही उपयोग युक्तिपूर्वक करावा, रिंगणी आणि गुळवेल यांच्या रसात सिद्ध केलेले घृतही वातकासाचा नाश करून अग्निदीपन करते ['रूक्षस्यानिलजं कासं आदौ स्नेहैरूपाचरेत् । वातघ्नसिद्धैः स्नेहाद्यैः धूमैर्लेपैश्च युक्तितः । कंटकारीगुडूचिभ्यां पृथक् त्रिशत्पलाद्रसे । प्रस्थः सिद्धो घृतात् वातकासनुद' वन्हिदीपनः । '– च. सं.]', इत्यादि वातकासावरील चरकोक्त चिकित्सा अशीच आहे. परंतु, याच कासविकारात पित्ताच्या अनुबंधामुळे जेव्हा दाह आणि पाक संभवतो तेव्हा मंद आणि शीत या गुणांनी युक्त असलेले कासघ्न उपाय अवलंबावे लागतात.

'छातीत धुरकटल्यासारखे वाटणे (जळजळ), तसेच, तहान, दाह, मोह, अरुची, भ्रम' ['उरो धूमायनं तृष्णा, दाहो, मोहोऽरुचिर्भ्रमः । ' च. सं.], इत्यादि पित्तकासाची लक्षणे उल्लेखिणाऱ्या चरकाचार्यांनीच खजूर, वंशलोचन, गोखरू इत्यादिंचे तूप व मध यांनी युक्त असे लेह सेवन करण्यास सांगितले आहे ['खर्जूरं पिप्पली वांशी श्वदंष्ट्रा चेति पंच ते । घृतक्षौद्रयुतैर्लेहाः श्लोकार्धैः पित्तकासिनाम्' च. सं.]. ही सर्व द्रव्ये मंदशीतगुणीच होत.

पित्ताच्या अनुबंधामुळे कोठ्यात जेव्हा दाह होत असतो तेव्हा मंदशीतगुणी आणि मधुर व तुरट असे विरंचन उपयुक्त होते. उलट, वातानुबंधामुळे कोठ्यात रूक्षता उद्‌भवली म्हणजे त्या प्रसंगी विरेचन स्निग्धगुणी द्यावे लागते. आणि तोच कोठा कफाच्या अनुबंधामुळे मंद झाला म्हणजे त्यावर देण्याचे विरेचन तीक्ष्णगुणी असावे लागते. पित्तात कषायमधुर, कफात कटु आणि वातात स्निग्धोष्णलवण असे विरेचन देण्यास अष्टांगहृदयात सांगितलेही आहे ['कषायमधुरैः पित्ते विरेकः कटुकैः कफे । स्निग्धोष्णलवणैर्वायौ......' । – अ. हृ.]. पित्तानुबंधावर द्राक्षात्रिफलादींचे, वातानुबंध असताना एरंडेल वगैरे औषधांचे आणि कफानुबंध असेल तेव्हा स्नुहिक्षीरादिकांचे विरेचन या दृष्टीनेच प्रशस्त होय. अर्थात् कोष्ठदुष्टीत विरेचन सामान्य असताही चिकित्सा करताना वातादि दोषांचा अनुबंध विचारात घ्यावा लागतो आणि विरेचनद्रव्येही तदनुसार वेगवेगळी योजावी लागतात.

वातानुबंधामुळे शोथविकारात जेव्हा क्षीणधातूंचा संचय होतो तेव्हा शोथनाशक पण धातुवर्धक औषध योजावे लागते. उलट, पित्तानुबंधामुळे धातुगत दाह जेव्हा शोथकर होतो तेव्हा शीतगुणी आणि दाहशामक अशा शोथघ्न औषधाची योजना करावी लागते. आणि कफाच्या अनुबंधामुळे स्निग्धता अधिक असली म्हणजे शोथहर औषध रूक्षगुणी योजणे इष्ट असते. वातादि दोषांच्या अनुबंधानुसार शोथाच्या चिकित्सेत संभवणारे भेद चरकसंहितेत पुढीलप्रमाणे सांगितले आहेत –

'स्निग्धगुणी शोथाची चिकित्सा रूक्षगुणी द्रव्यांनी करावी आणि रूक्षगुणी शोथावर स्निग्ध उपचार योजावेत… पित्तवातोद्भव शोथावर तिक्त औषधांनी युक्त अशा घृताची योजना करावी… कफोत्पन्न शोथावर क्षार आणि कटु व उष्णगुणी द्रव्ये यांचा प्रयोग करावा ['उपाचरेत् स्नेहविधिं विरूक्षणैः। प्रकल्पयेत् स्नेहविधिं च रूक्षजे। … … घृत तु पित्तानिलजे सतिक्तकम्। … … कफोत्थितं क्षारकटूष्णसंयुतैः।' च. सं.].

तात्पर्य, कोणत्याही रोगाची चिकित्सा करताना तिचे विशिष्ट स्वरूप सम्यक्तया स्पष्ट व्हावे म्हणून त्या रोगातील अन्य दोषांचा अनुबंध विचारात घेणे अवश्यच असते.

**रोगचिकित्सेतील महत्त्वाचे तत्त्व**

विशिष्ट रोगाचा उपशम करणारा प्रभावसंज्ञक गुण ज्यात असत नाही असे केवळ दोषनाशक औषध रोगाचा नाश करू शकत नाही. त्याच बरोबर हेही खरे की दोषानुबंधाची उपेक्षा व्याधिविपरीत चिकित्सेत देखील करता येत नाही.

विशिष्ट स्थानात वैगुण्य उत्पन्न झाल्याशिवाय कोणताही रोग संभवूच शकत नाही. परंतु त्या रोगातील तारम्यसूचक अवस्था वा भेद दर्शविणारी लक्षणे मात्र विशिष्ट दोषाच्या अनुबंधातूनच उत्पन्न होत असतात.

कोणत्याही रोगाच्या विशिष्ट अवस्थेचे सम्यक् ज्ञान होण्यासाठी त्यातील विशिष्ट दोषाचा अनुबंध विचारात घेणे ज्याप्रमाणे अवश्य असते, त्याप्रमाणे चिकित्सेतही ते तितकेच अनुपेक्षणीय असते. कारण, विशिष्ट स्थानातील वैगुण्याचा नाश झाला की त्या स्थानातील रोगाचाही उपशम होत असला तरी दोषसंबंध विचारात घेऊन तदनुसार केलेली व्याधिविपरीत चिकित्सा कोणत्याही रोगावर शीघ्रफलप्रद होते हेही तितकेच महत्त्वाचे. अशी चिकित्सा करणे हेच केव्हाही श्रेयस्कर.

तात्पर्य, प्रकुपित वातादि दोष हेच ज्वर, अतिसार आदि विविध रोगांना आणि त्यांच्या मंदतीक्ष्णादि अवस्थांना हेतुभूत असल्याने चिकित्सा करतेवेळी–अगदी व्याधिविपरीत चिकित्सेत सुद्धा–त्यांचा संबंध विचारात घेणे अवश्य व इष्ट असते.

———

अनुक्रमणिका

# दर्शन२३– द्रव्यगुणवर्णनातील दोषानुबंध

जी द्रव्ये शरीराच्या अभिवृद्धीला कारणीभूत होतात तीच त्याला दूषितही करतात. आहारादिकांतून योजण्यात येणाऱ्या अशा द्रव्यांचे गुणवर्णनही शास्त्रात दोषानुरोधानेच करण्यात आले आहे.

## द्रव्याची पांचभौतिकता

पंचभूतांच्या अंशांपासून शरीराची उत्पत्ती होते. शरीराचे पोषण करणारा आहारही पंचभूतांच्या अंशांपासून उत्पन्न होतो. दोघांतही पांचभौतिकत्व समान असल्याने आहारातील द्रव्ये शारीर द्रव्यांच्या वाढीला सहायभूत होतात. 'समानगुणी द्रव्यांनी सर्वांचीच वाढ होते' ['वृद्धिः समानैः सर्वेषाम्' – अ. हृ.], असे अष्टांगहृदयात म्हटलेही आहे. आहारात योजिली जाणारी द्रव्येही अनेकविध आहेत. धान्य, मूळ, फळ, आदि उद्भिजे, तसेच दूध, मांस वगैरे प्राणिज द्रव्ये ही सर्व पंचभूतोत्पन्नच होत. 'द्रव्य पंचभूतात्मक असते'['पंचभूतात्मकं तत्तु' – अ. हृ.], असे वाग्भटांचे वचन आहेही.

## मधुरादि षड्रस

तांदूळ, गहू वगैरे धान्ये, तसेच फलमूलशाकादि आहार्य द्रव्ये अगणित आहेत. रसभेदांनुसार त्यांचे प्रमुख प्रकार सहा संभवतात. गोड, आंबट, खारट, तिखट, कडू आणि तुरट हे सहाच रस रसनेंद्रियाला स्पष्टपणे जाणवतात. निरनिराळ्या द्रव्यांत पंचभूतांच्या अंशांचे मिश्रण निरनिराळ्या प्रकारे होत असल्याने संमिश्र स्वरूपाचे रस अनेक संभवत असले तरी ते वरील सहा रसांइतके स्पष्टपणे प्रतीत होत नाहीत. सर्व द्रव्ये पांचभौतिक असल्याने मधुरादि सहाही रस प्रत्येक द्रव्यात विद्यमान असतातच. काही स्पष्टपणे जाणवतात तर काही अस्फुट असतात इतकेच. या नियमाला अपवाद हरीतकी. हरीतकीत पांचच रस असतात. लवण रस तीत नसतो, असे वर्णन आहे. परंतु, यावरून द्रव्यांचे सर्वरसत्व असिद्ध मानण्याचे कारण नाही. नियम हे सर्वसामान्य तत्त्वाचेच वाचक असतात. सहापैकी जो रस ज्या द्रव्यात प्राधान्याने प्रत्यंतराला येतो तोच त्या द्रव्याचा रस मानला जातो आणि तदनुसार त्या द्रव्याचाही निर्देश मधुर, अम्ल, लवण इत्यादि संज्ञांनी करण्यात येतो.

## प्रत्येक द्रव्याचे वैशिष्ट्य

रस, रक्त, मांस, मेद, अस्थी, मज्जा आणि शुक्र हे शारीर धातू पंचभूतात्मक असले तरी पंचभूतांचे अंश त्या प्रत्येकात वेगवेगळ्या प्रमाणात असल्याने या सातही धातूंत स्वरूपतः आणि गुणकर्मशः भिन्नता आढळून येते. उदा. रक्त द्रव असते, मांस घन असते तर अस्थिधातू कठिण असतो. आहार्य आणि औषधी द्रव्यांची स्थितीही अशीच असते. पंचभूतांच्या अंशांचे प्रमाण प्रत्येक द्रव्यात निरनिराळे असल्याने त्यातही विभिन्नता आढळते. घनद्रवादि स्वरूप, शीतोष्णादि गुण, तसेच, दीपन, पाचन, स्वेदन, वमन, विरेचन, ज्वरादिरोग-विनाशकता इत्यादि कर्मे या सर्वांत प्रत्येक द्रव्य दुसऱ्यापासून निराळे असते.

रसमांसादि धातूंची अभिवृद्धी त्यांच्याशी समान असणाऱ्या आहार्य द्रव्यांनी होते तर विरुद्ध गुणकर्मांच्या आणि विसदृश द्रव्यांनी धातू ऱ्हास पावतात. 'दोष, धातू आणि मल या सर्वांची समान द्रव्यांनी

अनुक्रमणिका

वाढ होते तर विरोधी द्रव्ये त्यांचा ऱ्हास करतात ['वृद्धिः समानैः सर्वेषां विपरीतैर्विपर्ययः' – अ. हृ.]', असे वाग्भटांचे वचनच आहे.

वर सांगितल्याप्रमाणे शारीर धातूंत विभिन्नता आढळून येत असली तरी त्या सर्वांत घडून येणारी वृद्धिक्षयात्मक आणि विकृतिस्वरूप कर्मे सारखीच असतात. त्या सर्वांचे कर्तृत्व वातपित्तकफांच्याकडे असते. 'वायु, पित्त आणि कफ हे देहोत्पत्तीला हेतुभूत होतात, अविकृत स्थितीत तेच शरीराचे धारण करतात'['वातपित्तश्लेष्माण एव देहसंभवहेतवः । तैरेवाव्यापन्नैः शरीरमिदं धार्यते – सु. सं.], 'जे दोष सम स्थितीत देहाच्या वाढीला कारणीभूत होतात तेच विषम झाले की देहाचा नाश करतात' ['य एव देहस्य समा विवृध्यै त एव दोषा विषमा वधाय' – अ. हृ.], इत्यादि वचनांतून दोषांचे सर्वक्रियाकारित्व सांगितलेही आहे.

**दोषगुण आणि द्रव्यगुण**

वातादि दोषांचे शीतोष्णादि गुण आहार्य द्रव्यांच्या गुणांशी वस्तुतः समान होत. दोषांचे स्निग्धशीतादि गुण अथवा शरीरातील स्निग्धशीतादि गुण हेच ज्यांचे स्वरूप आहे, असे वातादि दोष, रसरक्तादि धातूंच्या आश्रयानेच राहत असतात. 'अस्थीत वायू, स्वेद आणि रक्त यांत पित्त आणि इतरांच्या ठिकाणी कफ राहत असल्याने धातु–मल आणि दोष यांत परस्पर–आश्रयाश्रयी भाव आहे' ['तत्रास्थनि स्थितो वायुः पित्तं तु स्वेदरक्तयोः । श्लेष्मा शेषेषु तेनैषां आश्रयाश्रयिणां मिथः' अ. हृ.], असे वाग्भटांनी म्हटलेही आहे.

अर्थात रसरक्तादि शारीर धातू आणि तत्पोषक आहार्य द्रव्ये या दोघांच्याही ठिकाणी स्निग्धादि गुण वस्तुतः समानच होत.

**स्वस्थहित द्रव्ये**

ज्याच्या योगाने शारीर धातूंची आपापल्या स्वाभाविक प्रमाणात अभिवृद्धी होते, त्या द्रव्याला 'स्वस्थहित' म्हणतात. स्वास्थ्याच्या वाढीला ते कारणीभूत होते. स्वस्थ शरीरात धातूंचे वगैरे प्रमाण किती असते या संबंधी पुढीलप्रमाणे उल्लेख आढळतो. 'मज्जा, मेद, वसा, मूत्र, पित्त, कफ, पुरीष, रक्त, रस आणि पाणी यांपैकी मज्जेचे प्रमाण एक अंजली असून मेदापासून पाण्यापर्यन्तची द्रव्ये उत्तरोत्तर एकेका अंजलीने अधिक असतात. ओज, मस्तिष्क (मेंदू), यांचे प्रमाण स्वतःच्या हाताने प्रत्येकी एक एक प्रसृत (पसाभर– अर्धी ओंजळ) असून स्तन्याचे प्रमाण दोन ओंजळ आणि आर्तवाचे चार ओंजळी असते' ['मज्जमेदोवसामूत्रपित्तश्लेष्मशकृन्त्यसृक् । रसो जलं च देहेऽस्मिन् एकैकांजलिवर्धितम् । पृथक् स्वप्रसृतं प्रोक्तभोजो मस्तिष्करेतसाम् । द्वावंजली तु स्तन्यस्य चत्वारो रजसः स्त्रियः ।' – अ. हृ.]. स्वस्थहित द्रव्यांनी धातूंची वाढ या मर्यादेपर्यन्त होत असते. उलट, कोणत्याही धातूच्या अयथावत् वाढीला वा क्षीणतेला जे कारणीभूत होते ते द्रव्य धातूंत वैषम्य निर्माण करून विविध विकारांचे उत्पादकही होते. 'रोग म्हणजे धातुवैषम्य' ['रोगस्तु धातुवैषम्यम्' च. सं.], असे चरकांनीच उल्लेखिले आहे.

धातूंची वाढ अथवा क्षय अस्वाभाविक प्रमाणात झाल्याने तदाश्रयी दोषही विकृत होतात. उपभुक्त द्रव्यांच्या गुणांचाच तो परिणाम असतो. आहार्य द्रव्यांतील रूक्षस्निग्धादि गुणच धात्वाश्रयी दोषगुणांच्या अस्वाभाविक वाढीला वा क्षयाला कारणीभूत होतात. 'रसांनी दूषित झालेले दोष धातूंना दूषित करतात आणि ते दोघे मिळून पुढे मलांना दूषित करतात' ['दोषा दुष्टा रसैर्धातून् दूषयन्त्युभये मलान्' । – अ. हृ.], हे वाग्भटांचे वचन या संदर्भात ध्यानात घेण्यासारखे आहे.

अनुक्रमणिका

**कोपन आणि शमन द्रव्ये**

आहार्य द्रव्यांतील गुणवैषम्य दोषांच्या गुणवैषम्याला कारणीभूत होते. अशा गुणवैषम्यकारी द्रव्यालाच दोषप्रकोपण म्हणतात. आणि वैषम्य प्राप्त झालेल्या धातूंना, गुणांना वा दोषांना जे स्वाभाविक वा समस्थिती प्राप्त करून देते, त्याला 'शमन' द्रव्य म्हणतात. त्यालाच आरोग्यदायक मानतात. कारण दोषधातुमलांची साम्यावस्था म्हणजेच आरोग्य.

पंचभूतांच्या अंशांपासून उत्पन्न झालेल्या द्रव्यांचे, अशा प्रकारे तीन प्रकार संभवतात. स्वस्थहित, प्रकोपण आणि शमन. आहारभूत आणि औषधिस्वरूप द्रव्ये अनेक असली तरी परिणामाला अनुसरून त्यांपैकी प्रत्येकाचा अन्तर्भाव वरीलपैकी कोणत्या तरी एका प्रकारात होऊ शकतो. यांपैकी आहारस्वरूपात जी द्रव्ये सेवन केली जातात त्यांना सामान्यतः स्वस्थहित म्हणतात. आणि स्वस्थ स्थितीत धातूंच्या वा शरीराच्या सम्यक् वाढीला जो कारणीभूत होतो तोच आहार वस्तुतः हितकर. शमन व कोपन या संज्ञा औषधी द्रव्यांच्या वाचक आहेत. क्षीण झालेल्या दोषधातूंची वाढ करून आणि वाढलेल्या दोषधातूंचा क्षय घडवून आणून स्वास्थ्य प्रस्थापित करणे, हेच चिकित्सेचे साफल्य. 'क्षीण दोषांचे अभिवर्धन करावे, कुपित झालेल्यांचे शमन करावे, वाढलेल्यांचे निर्हरण करावे आणि ते सम स्थितीत असतील तर त्यांचे परिपालन करावे' ['दोषाः क्षीणा बृंहयितव्याः, कुपिताः प्रशमयितव्याः, वृद्धा नर्हर्तव्याः, समाः परिपाल्याः ।' –सु. सं.], असे सुश्रुताचार्यांनी म्हटले आहे.

**गुणांची उभयत्र अवस्थिती**

पूर्वी सांगितले की, रूक्ष, स्निग्ध, शीत, उष्ण इत्यादी गुण हे वातादि दोष, आहार्य पदार्थ आणि औषधी द्रव्ये या तिघांच्याही ठिकाणी समानत्वाने विद्यमान असतात. गुणस्वरूपी दोष हेच निरनिराळ्या धातूंतील सर्व क्रियांचे कारक असून त्या दोषांचे वृद्धि-क्षय आहार्य आणि औषधी द्रव्यांच्यामुळे घडून येत असतात. रसरक्तादि धातूंची जी वाढघट होते ती ते गुणयुक्त असतात म्हणूनच होऊ शकते. गुणहीन धातूंत वृद्धिक्षयात्मक कार्ये होऊच शकत नाहीत. अर्थात् गुण हेच सर्व क्रियांचे कारक होत. धातूंचे वृद्धि-क्षय ज्यांच्यामुळे होतात ती द्रव्येही गुणयुक्तच असावी लागतात. गुणहीन अथवा हीनवीर्य द्रव्यांत कार्यक्षमता असत नाही.

**धात्वंश आणि द्रव्यांश : दोष आणि रस**

रसरक्तादि धातूंच्या सूक्ष्मातिसूक्ष्म अंशांच्या ठिकाणी ज्याप्रमाणे स्निग्धरूक्षादि गुण निवास करीत असतात त्याचप्रमाणे आहार्य आणि औषधी द्रव्यांच्या परमसूक्ष्म अंशांतही हे स्निग्धादि गुण विद्यमान असतात. धातूंचा हा जो सूक्ष्मातिसूक्ष्म गुणस्वरूपी (म्हणजे गुणमय वा गुणप्राय) अंश त्यालाच दोष अशी संज्ञा असून आहार्यादि द्रव्यांच्या तशाच प्रकारच्या अंशाला रस म्हणतात. द्रव्य आणि गुण हे पदार्थ वस्तुतः भिन्न होत. तथापि, प्रचुर प्रमाणात गुणाला आश्रयभूत होणारा धातूंचा वा द्रव्यांचा जो सूक्ष्मतम अंश, त्याला गुणच म्हणतात. गुण आणि गुणी यांतील अभेदोपचार तो हाच.

अनुक्रमणिका

### द्रव्यांची समानगुणकर्मता

वातादि दोषांची गत्यादि कर्मे सर्व शरीरात समान असताही धातू आणि स्थाने यांना अनुसरून त्या कर्मांत निरनिराळे भेद संभवतात. हरीतकी, द्राक्षे, इत्यादि अनेक द्रव्ये सुद्धा सामान्यतः एकाच म्हणजे मधुरादि रसाची आणि म्हणूनच सारख्या गुणांची आणि सदृशप्राय कार्ये करणारी असली तरी त्यांपैकी प्रत्येकाचे स्वरूप वेगवेगळे असल्याने त्यांचे व्यक्तिशः वेगवेगळे कार्यही घडून येते. 'तूप, सोने, गुळ, अक्रोड, केळे, नारळ, फालसा ['घृतहेमगुडाक्षोटभोचचोचपरूषकम्' –अ. हृ.]' आदि मधुर वर्ग, 'आवळा, चिंच, महाळुंग, अम्लवेतस ['...... धात्री फलाम्लिका मातुलुंगाम्लवेतसम्'–अ. हृ.],' इत्यादि अम्लवर्ग, 'सैंधव, पादेलोण, काळे मीठ, बिडलोण, सामुद्रमीठ, खनिज लवण ['वरं सौवर्चलं कृष्ण बिडं सामुद्रमौद्भिदम्'–अ. हृ.]' इत्यादि लवणवर्ग, 'कडू पडवळ, त्रायमाण, सुगंधी वाळा, काळा वाळा, चंदन ['...... पटोली त्रायंती वालकोशीरचंदनम्'अ. हृ.]', इत्यादि तिक्तवर्ग, 'हिंग, मिरे, पंचकोल' (सुंठ, चवक, चित्रक, पिंपळी, पिंपळीमूळ) ['...... हिंगुमरिचकृमिजित्पंचकोलम्'–अ. हृ.], इत्यादि कटुवर्ग तसेच, 'हिरडा, बेहेडा, शिरस, खैर, मध' ['...... पथ्याक्षं शिरीषं खदिरो मधु'–अ. हृ.], इत्यादि कषायरसवर्ग, याप्रमाणे समानरसभूयिष्ठ अशा द्रव्यांचे वर्ग सांगण्यात आले आहेत. प्रत्येक वर्गातील द्रव्ये गुणकर्मशः बरीचशी समान असल्याचाही उल्लेख आढळतो. 'मधुर रसाची द्रव्ये प्रायः कफकर असतात', 'अम्लद्रव्ये बहुधा पित्तजनक होतात', 'लवणरस डोळ्यांना सामान्यतः अपथ्यकर होतो', 'कडू आणि तिखट द्रव्ये बह्वंशी अवृष्य आणि वातप्रकोपक असतात' 'तुरट रस प्रायः शीतगुणी आणि स्तंभक असतो' ['मधुरं श्लेष्मलं प्रायः', 'प्रायोऽम्लं पित्तजननम्', 'अपथ्यं लवणं प्रायः चक्षुषोः', 'तिक्तं कटु च भूयिष्ठं अवृष्यं वातकोपनम्', 'कषायं प्रायशः शीतं स्तंभनं च।'–अ.हृ.], असे आचार्य वाग्भटांनी सांगितले आहे. अर्थात् एकाच वर्गातील समानगुणी द्रव्यांच्याकडून त्यांच्या स्वरूपानुसार वेगवेगळी कार्ये वेगवेगळ्या ठिकाणी घडून येत असतात, हाही मुद्दा शास्त्रज्ञांनी उल्लेखिलेला आढळतो. 'द्रव्य कधी स्वतःच्या प्रभावाने, कधी स्वगुणांच्या प्रभावाने, कधी स्वतःच्या आणि स्वगुणांच्या अशा उभयात्मक प्रभावाने, त्या त्या काळी त्या त्या ठिकाणी, त्या त्या युक्तीचा अवलंब करून आणि तो उद्देश साधण्यासाठी जे कर्म करते ते त्याचे कर्म, ज्याच्या द्वारे ते घडते, ते वीर्य, ज्या ठिकाणी घडते ते त्याचे अधिकरण, ज्या वेळी घडते तो त्या कर्माचा काळ, ज्या उपायाने केले जाते तोच त्याचा उपाय, आणि त्या योगे जे प्राप्त होते तेच त्याचे फल' ['द्रव्याणि हि द्रव्यप्रभावात् गुणप्रभावात् द्रव्यगुणप्रभावाच्च तस्मिन् तस्मिन् काले तत्तदधिकरणमासाद्य तां तां च युक्तिमर्थं च तं तमभिप्रेत्य यत्कुर्वन्ति तत्कर्म, येन कुर्वन्ति तद् वीर्यं, यत्र कुर्वन्ति तदधिकरणं यदा कुर्वन्ति स कालः यथा कुर्वन्ति स उपायः यत्साधयन्ति तत्फलमिति।' – च. सं.], असे चरकाचार्य सांगतात.

### द्रव्याचे वैयक्तिक विशिष्ट कार्य–प्रभाव

वरील विवेचनात उल्लेखिलेले द्रव्याचे वैयक्तिक कार्य म्हणजेच चरकोक्त द्रव्यप्रभाव. सुश्रुताचार्यांनी स्वगुण या संज्ञेने त्याचा निर्देश केला आहे ['स्ववीर्यगुणयुक्तानि द्रव्याणि कार्मुकाणि च भवन्ति' –सु. सं.]. 'रस, विपाक आणि वीर्य यांच्या बाबतीत अन्य द्रव्यांच्याशी समानता असताही प्रत्येक द्रव्याचे विशिष्ट म्हणजे केवळ त्याचेच असे एक कार्य असते आणि तेच प्रभावजनित होय' ['रसादिसाम्ये यत्कर्म विशिष्टं तत् प्रभावजम्' –अ. हृ.], हे वाग्भटांचे वचन प्रस्तुत संदर्भात अत्यंत उद्बोधक होय.

### प्रभावाचे स्वरूप

काही उदाहरणे विचारात घेतल्यास द्रव्यप्रभावाचे स्वरूप अधिक विशद होऊ शकेल. तूप हे स्निग्धगुणी आहे. 'मधुर, सौम्य, मृदु, शीतवीर्य, दोषादिकांत अल्प प्रमाणात अभिष्यन्द उत्पन्न करणारे, स्निग्ध' ['घृतं तु मधुरं सौम्यं मृदु शीतवीर्यं अल्पाभिष्यंदि स्नेहनं ......' सु. सं.], इत्यादि त्याचे गुण सांगण्यात आले आहेत.

अनुक्रमणिका

असे तूप समानगुणी धातूंचीच अभिवृद्धी घडवून आणणार. मेद, मज्जा व शुक्र हे धातू तुपाशी या दृष्टीने तुल्यगुणी आहेत. तुपाचे शुक्रमेदोवृद्धिकरत्व चरकांनी स्पष्टपणे उल्लेखिलेही आहे. ‘स्मृती, बुद्धी, अग्नी, शुक्र, ओज, कफ, मेद यांचे अभिवर्धन तूप करते’ [‘स्मृतिबुध्यग्निशुक्रोजःकफमेदोऽभिवर्धनम् —च. सं.’], असे ते म्हणतात. रक्त, मांस, मेद यांच्याही बाबतीत तुपाप्रमाणेच सांगता येईल. रक्ताने विशेषतः रक्ताचीच वाढ होते, मांसाचा उपयोग मुख्यतः मांसवृद्धीसाठीच होतो, आणि मेदाने प्राधान्यतः मेदाचीच वाढ होते. चरकांनी स्पष्टच सांगून ठेवले आहे की, ‘मांसाने इतर धातूंपेक्षा मांसधातूचीच वाढ अधिक होते, रक्त, मेद, वसा, अस्थी, मज्जा, शुक्र, यांच्या वाढीलाही अनुक्रमे तीच द्रव्ये मुख्यतः कारणीभूत होतात. गर्भही मुख्यतः आमगर्भाने म्हणजे अंड्यानेच वाढीला लागतो’ [‘मांसमाप्यायते मांसेन भूयस्तरमन्येभ्यः शारीरधातुभ्यः। तथा लोहितं, लोहितेन, मेदो मेदसा, वसा वसया, अस्थि तरुणास्थ्ना, मज्जा मज्ना, शुक्रं शुक्रेण, गर्भस्त्वामगर्भेण’ —च. सं.]. धातूंचे स्वरूपसादृश्य हेच या अभिवृद्धीचे कारण होय.

मांसादि प्राणिज द्रव्याप्रमाणे उद्‌भिज्ज द्रव्यांतही प्रभाव असतो. शतावरी, द्राक्षा आणि विदारी या तीनही द्रव्यांत मधुर रस समान आहे. तथापि शतावरी दूध उत्पन्न करणारी वा वाढविणारी आहे, द्राक्षा विरेचन आहे तर विदारी मांसवर्धक आहे. ही विशेष कार्ये प्रभावजनितच होत.

एखादे द्रव्य विरेचक असते तर एखादे वामक असते. तसेच एखादे स्वेदल असते तर एखादे मूत्रल असते. तीक्ष्ण गुणामुळे घडून येणारे उत्सर्जन कर्म या चारही द्रव्यांत समान असले तरी त्या त्या द्रव्याच्याच विशिष्ट स्वरूपाला अथवा प्रभावाला अनुसरून या उत्सर्जनकर्मात विभिन्नता उद्‌भते आणि भिन्न भिन्न ठिकाणी वमन, विरेचन, मूत्रविरेचन, स्वेदन इत्यादि रूपांनी ती आविर्भूत होते.

**द्रव्याचे स्थानविशिष्ट कार्य प्रभावजनित**

आहार्यादि द्रव्यांतील स्निग्धरूक्षादि गुणांनी शरीरातील तत्सदृश स्निग्धादि गुणांची सार्वत्रिक अभिवृद्धी होणे हे कार्य सर्वशरीरव्यापी असते. निरनिराळ्या स्थानी आणि निरनिराळ्या धातूंत मात्र द्रव्यगुणांचे हे कार्य वेगवेगळ्या स्वरूपात आविर्भूत होते. त्या त्या द्रव्याचे वैशिष्ट्य हे याचे कारण होय. त्यामुळेच ज्यांचे गुण आणि रस समान आहेत अशी द्रव्ये निरनिराळ्या स्थानी निरनिराळ्या स्वरूपाची कार्ये करीत असतात.

वातादि दोषांपैकी एखाद्या दोषाचा आपल्या विशिष्ट गुणांनी जे प्रकोप करते ते द्रव्य केवळ तेवढ्यानेच विशिष्ट रोगाची उत्पत्ती करू शकत नाही. त्याप्रमाणे एखाद्या प्रकुपित दोषाचे जे शमन करते ते द्रव्यही केवळ तेवढ्याने तदुत्पन्न रोगाचे शमन करू शकत नाही. दोषांचा प्रकोप होऊन सुद्धा स्थानवैगुण्य संभवते तेव्हाच रोग उद्‌भवतो; आणि दोषांचा उपशम होऊनही स्थानवैगुण्याचा उपशम होतो, तेव्हाच विकाराचाही उपशम होतो. स्निग्धशीतादि गुणांनी कफाचा प्रकोप होऊनही श्वास, कास, इत्यादि रोग सर्वदा उद्‌भवतीलच असे नाही. श्वासमार्गादि स्थाने दूषित होतील तेव्हाच त्यांची उत्पत्ती व्हावयाची. तसेच, तीक्ष्णोष्णगुणी औषधांची योजना करून कफाचा उपशम झाला तरी श्वासकासादिकांचा नाश करण्यासाठी निराळे प्रभावी औषध योजावेच लागते. तात्पर्य, दोषांच्या केवळ प्रकोपातूनच विशिष्ट रोगाची ज्याप्रमाणे उत्पत्ती होत नाही, त्याचप्रमाणे केवळ दोषाचा उपशम झाल्यानेच विशिष्ट रोगाचा उपशमही होत नाही.

अनुक्रमणिका

विशिष्ट स्थानी वैगुण्य जोवर उत्पन्न होत नाही तोवर प्रकुपित झालेला दोषही एखाद्या विशिष्ट रोगाची उत्पत्ती करू शकत नाही. सुश्रुताचार्य म्हणतात की, 'प्रकुपित झालेले दोष शरीरात संचार करीत असताना स्थानवैगुण्यामुळे ज्या ठिकाणी अवरुद्ध होतात, त्या ठिकाणी रोग उद्‌भवतो' ['कुपितानां हि दोषाणां शरीरे परिधावताम् । यत्र संगः स्ववैगुण्यात् व्याधिस्तत्रोपजायते । –सु. सं.']. तसेच, विशिष्ट स्थानी एखाद्या द्रव्यामुळे वैगुण्य उत्पन्न होणे वा दुसऱ्या एखाद्या द्रव्यामुळे त्या वैगुण्याचा उपशम होणे, अथवा विशिष्ट रोगाची उत्पत्ती होणे वा नाश होणे हे कार्य देखील त्या त्या द्रव्याच्या ठिकाणी असणाऱ्या विशिष्ट गुणामुळेच घडून येत असते. 'प्रभाव' ही संज्ञा या गुणाचीच वाचक असून त्याचे मूळही द्रव्याच्या विशिष्ट स्वभावात वा स्वरूपातच अन्तर्हित असते.

द्रव्याच्या आश्रयाने राहून दोषांच्या वृद्धिक्षयाला कारणीभूत होणाऱ्या स्निग्धशीतादि गुणांना 'वीर्य' अशी संज्ञा असून विशिष्ट रोगाचा उद्‌भव अथवा उपशम ज्यामुळे घडून येतो, अशा द्रव्याच्या विशिष्ट स्वभावाला प्रभाव म्हणतात.

'ज्यामुळे द्रव्य कार्यकारी होते, त्या गुणाला वीर्य म्हणतात' ['येन कुर्वन्ति तत् वीर्यम्' –च. सं., सु. सं.], या चरक-सुश्रुतांच्या वचनांवरून सकृत्‌दर्शनी अशी शंका उपस्थित होते की, द्रव्याचे सार्वदेहिक आणि विशिष्ट स्थानातील देखील कार्य जर वीर्यसंज्ञक गुणानेच घडून येत असेल तर वीर्य आणि प्रभाव यांचा वेगवेगळा निर्देश करणे समुचित नाही. परंतु ही शंका निराधार आहे. कारण, चरकसंहितेतच सांगितले आहे की, 'द्रव्ये केवळ गुणप्रभावानेच कार्यकारी होतात असे नाही तर ती कधी द्रव्यप्रभावाने, कधी गुणप्रभावाने आणि कधी द्रव्य व गुण या दोघांच्याही प्रभावाने कार्यकारी होत असतात'['न केवलं गुणप्रभावादेव द्रव्याणि कार्मुकाणि भवन्ति द्रव्याणि हि द्रव्यप्रभावात् गुणप्रभावात् द्रव्यगुणप्रभावाच्च... ...' –च. सं.]. गुणप्रभावाहून द्रव्याचा प्रभाव निराळा असल्याचे येथे स्पष्टपणे सांगितले आहे. इतकेच नव्हे तर'द्रव्याचा जो परिणाम ते त्याचे कर्म' ['यत् कुर्वन्ति तत् कर्म' –च. स., सु. सं.], असे सांगून पुढे, 'तो ज्या ठिकाणी होतो ते त्याचे स्थान' ['यत्र कुर्वन्ति तदधिकरणम्' –च. स., सु. सं.], असेही चरकसुश्रुतांनी निर्देशिले आहे. द्रव्याच्या शीतोष्णादि गुणांनी शरीरातील ते ते गुण वृद्धी पावतात, हे सांगितल्यानंतर पुनश्च, ज्या ठिकाणी द्रव्याचे कार्य घडते, तेच त्याचे अधिष्ठान, असा आणखी निराळा उल्लेख करण्यातील उद्देशही, स्थानविशिष्ट कार्य द्रव्याच्या प्रभावसंज्ञक गुणानेच होत असते, हेच सुचविण्याचा असावा. मृदुतीक्ष्णादि गुणांचा उल्लेख 'वीर्य' या संज्ञेने करण्यात येतो. 'मृदु, तीक्ष्ण, गुरु, लघु, स्निग्ध, रूक्ष, उष्ण, शीत, याप्रमाणे काहीजण वीर्य आठ प्रकारचे मानतात' ['मृदु–तीक्ष्ण–गुरु–लघु-स्निग्ध–रूक्षोष्णशीतलं वीर्यमष्टविधं केचित्' –च.सं.], 'असे चरकसंहितेत उल्लेखिलेले आहे, तर शीत, उष्ण, स्निग्ध, रूक्ष, मृदु, तीक्ष्ण, पिच्छिल, विशद हे गुण वीर्यसंज्ञक होत' ['तत्र य इमे गुणाः वीर्यसंज्ञकाः शीतोष्णस्निग्धरूक्षमृदुतीक्ष्णपिच्छिलविशदाः' –सु. सं.], असे सुश्रुतसंहितेतही सांगितले आहे. प्रभाव हे कर्म मात्र रसवीर्यविपाकांहून वेगळे असते, 'विशेषः कर्मणां चैव प्रभावस्तस्य स स्मृतः' म्हणजे विशिष्ट कर्माला प्रभाव म्हणतात, असे चरकसंहितेत म्हटलेच आहे. 'वीर्य म्हणजे द्रव्याची वा गुणाची शक्ती'['वीर्यं शक्तिः सा द्रव्यस्थ गुणस्य वा' च. स. च. पा. व्याख्या.], हे चक्रपाणीचे म्हणणे अर्थातच समुचित नाही. कारण वीर्य ही संज्ञा गुणांनाच देण्यात आली आहे. शीतोष्णादि गुण आणि गुणस्वरूप वातादि दोष हे सर्वदेहव्यापी असल्याने वीर्यसंज्ञक गुणांचे कार्य हे सर्वसामान्य अथवा सार्वदेहिक स्वरूपाचे असते. परंतु तेच जेव्हा विशिष्ट स्थानात विशिष्ट रूपाने घडून येते तेव्हा तत्कर्तृक विशिष्ट गुणाला प्रभाव म्हणतात.

### प्रभाव अचिंत्य

हा प्रभावसंज्ञक गुण द्रव्याच्या ठिकाणी स्वभावतःच विद्यमान असतो, आणि शरीराच्या निरनिराळ्या ठिकाणी होणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या रोगांचा उपशमही तोच करीत असतो. स्निग्धौष्णादि वीर्यसंज्ञक गुणांच्याकडून हे कार्य होऊ शकत नाही. 'कृमिघ्न द्रव्यांत वावडिंग, कुष्ठघ्न द्रव्यांत खैर, वातहरद्रव्यांत रास्ना; हिक्का, श्वास, कास पार्श्वशूल हे विकार घालविणाऱ्या औषधांत पुष्करमूळ, रक्तसंग्राहक आणि रक्तपित्तशामक द्रव्यांत काश्मरी फल, मूत्रकृच्छ्रनाशक आणि वातहर द्रव्यांत गोखरू ही द्रव्ये सर्वश्रेष्ठ होत' ['विडंगं कृमिघ्नानां ..... खदिरः कुष्ठघ्नानां, रास्ना वातहराणां ..पुष्करमूलं हिक्काश्वासकासपार्श्वशूलहराणां, काश्मर्यफलं रक्तसांग्राहिकरक्तपित्तप्रशमनानां ... गोक्षुरको मूत्रकृच्छ्रानिलहराणाम्... ...' –च. सं.], इत्यादि विवेचन चरकांनी एके ठिकाणी केले आहे. वर उल्लेखिलेले प्रभाव गुणाचे रोगनाशकत्वच त्यांना येथे अभिप्रेत असल्याचे दिसून येते. 'ज्यांच्या विशिष्ट गुणांची कल्पना उपपत्तीने करता येत नाही परंतु, विशिष्ट कार्य करणारी म्हणून स्वभावतःच जी प्रसिद्ध असतात अशया औषधींची योजना करताना सुज्ञांनी आगमाला अथवा परंपरेला अनुसरणेच इष्ट असते' ['अमीमांस्यान्यचिंत्यानि प्रसिद्धानि स्वभावतः । आगमेनोपयोज्यानि भेषजानि विचक्षणैः । –सु. सं.'], हा सुश्रुताचार्यांचा आदेशही प्रस्तुत अभिप्रायाचाच वाचक होय. अर्थात् प्रभाव म्हणजे शरीराच्या विशिष्ट भागात विशिष्ट रोगाचा उद्भव वा उपशम घडवून आणणारा विशिष्ट गुणधर्म. रसवीर्यादि काही गुण अनेक द्रव्यांत समान असताही हा विशिष्ट गुण मात्र विशिष्ट द्रव्यातच आढळून येतो. आणि त्या द्रव्याच्या विशिष्ट स्वभावातूनच त्याची उत्पत्ती होत असते.

### द्रव्यगुणांचा दोषगुणांवर होणारा परिणाम

हितकर अथवा पथ्यकर आहार्य द्रव्ये सेवन केली म्हणजे त्या द्रव्यांतील रसांच्या आश्रयाने राहणारे स्निग्धादि गुण शरीरातील क्रियाकारी दोषांचे म्हणजे दोष-गुणांचे योग्य प्रमाणात उपबृंहण करतात आणि परिणामी शरीरात चालणारी यच्चयावत् स्वाभाविक कार्येही समुचित रीतीने घडवून आणतात. उलट, अहितकर अथवा अपथ्यकर ['स्वभावतः, विशिष्ट संस्काराने, एखाद्या अन्य द्रव्याशी मिश्र केल्याने अथवा अन्य कारणांनी, जे द्रव्य शारीर धातूंना दूषित करते त्याला अपथ्यकर म्हणतात.]द्रव्यांचे सेवन केले तर त्यांचे रसाश्रित गुण वातादि दोषांत अथवा त्यांच्या गुणांत वैषम्य निर्माण करून शरीरातील स्वाभाविक कर्मेही फलतः दूषित करतात. पथ्यकर अशा आहार्य द्रव्यांचा उपयोग कमी अथवा अधिक प्रमाणात करण्यात आला तरी सुद्धा असेच घडते. दोषांचे प्रमाण अनुक्रमे कमी अथवा अधिक होण्याचा तो परिणाम असतो.

### दोषानुरोधी द्रव्यगुणवर्णन

शरीराच्या पचनादि स्वाभाविक कर्मात वैषम्य उद्भवले की ज्वर, राजयक्ष्मा आदि नानाविध व्याधींचा निरनिराळ्या ठिकाणी प्रादुर्भाव होतो. सर्व क्रियांचे एकमात्र कारण दोषच होत. साम्यावस्थेत म्हणजे आपापल्या स्वाभाविक प्रमाणात असले की ते आरोग्याला कारणीभूत होतात. उलट वैषम्यावस्थेत [दोषधातुमलांचे परिमाण प्रत्येकाच्या शरिरात वेगवेगळे असते. कारण प्रत्येकाची उंची वगैरे निरनिराळी असते. 'वैलक्षण्यात् शरीराणां अस्थायित्वात् तथैव च । दोषधातुमलादीनां परिमाणं न विद्यते' । (सु. सं.), म्हणजे, प्रत्येकाचे शरीर वेगवेगळे आणि अस्थायी असल्याने दोषधातुमलांचे शरीरातील निश्चित प्रमाण सांगता येत नाही, असे सुश्रुताचार्यांनी म्हटले आहे. 'मज्जभेदोवसामूत्रपित्तश्लेष्मशकृन्त्यसृक् । रसो जलं च देहेऽस्मिन एकैकांजलिवर्धितम्' –(अ. हृ.) म्हणजे मज्जा, मेद, वसा, मूत्र, पित्त, श्लेष्मा, पुरीष, रक्त, रस आणि पाणी यांचे शरीरातील प्रमाण उत्तरोत्तर एकेक अंजलीने अधिक असते. इत्यादि वचनांतून शारीर द्रव्यांची जी परिमाणे सांगितली आहेत ती सर्वसामान्यच समजावयास हवीत. वस्तुतः प्रत्येक शरीरात ती निरनिराळीच असतात. परंतु असे असले तरी प्रत्येक स्वस्थ शरीरात या दोषादींचे जे स्वाभाविक प्रमाण असते त्याच्या अपेक्षेनेच त्या त्या शरीरातील दोषांच्या वृद्धिक्षयाची वा वैषम्याची कल्पना करावयाची असते.]तेच निरनिराळ्या रोगांची उत्पत्ती

अनुक्रमणिका

करतात. आणि दोषांची स्थिती सम असणे वा विषम होणे हे आहार्यादि द्रव्यांच्या रसाश्रयी गुणांवरच अवलंबून असते. द्रव्यांतील गुणांचे विवरण म्हणूनच दोषानुरोधाने करण्यात आले आहे.

काही द्रव्ये वाताचे शमन करतात तर काही त्याच्या प्रकोपाला कारण होतात. पित्तकफांचा उपशम आणि प्रकोप करणारी द्रव्येही आहेतच. इतकेच काय, पण द्रव्यातील विशिष्ट भूतांशसंयोगाला अनुसरून कोणत्याही दोन अथवा तीनही दोषांच्या प्रकोपाला वा उपशमाला कारण होणारी अशीही काही द्रव्ये आढळतात. आपापल्या विशिष्ट गुणाला अनुसरून एक, दोन, अथवा तीनही दोषांचा प्रकोप वा उपशम याप्रमाणे द्रव्यांकडून घडून येत असतो.

**द्रव्यगत गुणकर्मांचे अनुमान दोषानुरोधाने**

द्रव्यांच्या ठिकाणी असणारे सर्वसामान्य गुण आणि त्यांच्याकडून घडून येणारी सार्वदेहिक कर्मे यांचे अनुमान दोषांच्या अनुरोधाने म्हणजे त्यांच्या क्षयवृद्धीवरून सामान्यतः होऊ शकते. परंतु, या चलनादि सार्वदेहिक कर्मांतच श्वसन, मलमूत्रोत्सर्जन आदि जे नानाविध भेद विभिन्न स्थानांना अनुसरून आढळून येतात त्यांना द्रव्यातील विशिष्ट गुणच कारणीभूत होत असतात. विशिष्ट स्थानी विशिष्ट कार्य घडवून आणणे हा विशिष्ट द्रव्याचा स्वभावच होय. त्यालाच प्रभाव म्हणतात.

द्रव्ये अनेक प्रकारची असतात आणि त्यांच्या ठिकाणी गुणही नानाविध असतात. दोष, धातू आणि मल यांच्या अनुरोधाने त्यांच्यापैकी काहींचे विवरण ज्याप्रमाणे करण्यात आले आहे, त्याचप्रमाणे ज्वर, श्वास, कास इत्यादि विशिष्ट विकारांवर उपयोगी म्हणूनही काहींचा निर्देश करण्यात आला आहे. उदा. सुंठीचे कफवातघ्नत्व दोषांनुसार उल्लेखूनही हृद्यत्व हा तिचा आणखी एक गुण सांगण्यात आला आहे. हृदयसंज्ञक विशिष्ट स्थानी सुंठीचे जे विशिष्ट कार्य घडून येते, त्याचा तो बोधक असून सुंठीचा विशिष्ट स्वभाव हे त्याचे कारण होय. पिंपळीचे वर्णनही असेच करण्यात आले आहे. दोषांच्या अनुरोधाने ती कफवातघ्न असल्याचे सांगून पुनश्च रोगानुसार तिचे वर्णन श्वासकासघ्न म्हणूनही करण्यात आले आहे. विदारीच्या गुणवर्णनात देखील ती दोषानुसार पित्तवातनाशक आणि धातूंच्या दृष्टीने मांसशुक्रवर्धक असल्याचे सांगून शिवाय ती मूत्रल आणि रक्तपित्तनाशक असल्याचाही उल्लेख आढळतो. औषधादि द्रव्यांच्या दोषशामक, धातुवर्धन आणि विशिष्टव्याधिनाशक इत्यादि गुणांचे वर्णन शास्त्रात याप्रमाणे करण्यात आलेले आहे.

**शरीराच्या स्वास्थ्यास्वास्थ्याला कारण द्रव्यगुणच**

हे द्रव्यगुणच शरीराच्या स्वास्थ्याला वस्तुतः कारणीभूत होतात. नानाविध विकृतींचा उपशमही तेच घडवून आणतात. दोषांच्या स्निग्धशीतादि गुणांचे सम्यक् उपबृंहण करून शरीराचे आरोग्य ज्याप्रमाणे ते कायम राखतात त्याचप्रमाणे दोषांचे वैषम्य निर्माण करून आणि आपापल्या स्वभावानुरूप विशिष्ट स्थाने व दूष्ये यांत दुष्टी उत्पन्न करून नानाविध विकारांचीं उत्पत्तीही तेच करीत असतात. इतकेच नव्हे तर निरनिराळ्या स्थानी उद्भवलेल्या विकारांची जेव्हा चिकित्सा करण्यात येते तेव्हा हेतुभूत दोषांचा आणि विशिष्ट रोगाला कारणीभूत होणाऱ्या विशिष्ट अनुबंधाचा नाश करून व्याधिविनाश घडवून आणण्याचे कार्य देखील या द्रव्यगुणांच्या कडूनच होत असते.

**दोषानुसारी गुणवर्णन सहेतुक**

आहार्य पदार्थ आणि औषधी द्रव्ये यांच्या ठिकाणी असलेल्या अशा या गुणांचे विवरण आयुर्वेदात म्हणूनच दोषांना अनुसरून करण्यात आले आहे. अर्थात् निरोगी आणि रोगी दोघांच्याही हिताची इच्छा करणाऱ्यांना, विशेषतः चिकित्सकांना, या द्रव्यगुणांचे स्वरूप यथावत् समजून घेणे अत्यंत अवश्य होय. कारण स्वस्थ आणि आतुर यांना हितकर होणाऱ्या उपायांचे यथावत् ज्ञान होण्यानेच आरोग्यरक्षण आणि व्याधिविनाश हा चिकित्साशास्त्राचा द्विविध उद्देश होऊ सफल शकेल.

---

टीपे ३६ : व्याधिप्रत्यनीक चिकित्सेत हेतुभूत दोषाचा उपशम द्रव्याच्या वीर्यसंज्ञक गुणाने होतो, आणि विशिष्ट व्याधीचा नाश प्रभावसंज्ञक गुणाने घडून येतो.

———

अनुक्रमणिका

# दर्शन २४ – त्रिदोषाविज्ञानातील विज्ञेय विषयांचे दिग्दर्शन

वातादींचे स्वरूप आणि शरीरात चालणाऱ्या क्रियाविक्रियांतील त्यांचे कर्तृत्व एतद्विषयक सविस्तर विवरण आतापावेतो करण्यात आले. त्यांच्या संबंधी ज्ञात असणे अवश्य अशा गोष्टींची माहिती थोडक्यात पुढील प्रमाणे सांगता येईल:–

### १) मुख्य शारीर द्रव्ये : दोष-धातू–मल

शरीराची मूलभूत द्रव्ये तीन–दोष, धातू आणि मल. वायू, पित्त आणि कफ हे तीन दोष; रस, रक्त, मांस, मेद, अस्थी, मज्जा, शुक्र हे सात धातू तसेच पुरीष, मूत्र आणि स्वेद हे तीन मल मिळून त्यांची संख्या एकूण तेरा होते. [वातादि दोषांचे प्रत्येकशः पांच भेद, वसा लसीका इत्यादि उपधातू, धातूंचे कफपित्तादि मल इत्यादि प्रकारे गणना केल्यास या संख्येचा विस्तार आणखीही होऊ शकेल. वरील परिगणन संक्षेपतः करण्यात आले आहे]. शरीराच्या सर्व स्थूल आणि सूक्ष्म अवयवांचा अन्तर्भाव या तिघांतच होऊ शकतो. तेच सर्व अवयवांचे उपादान कारण होत. शरीर हे दोषधातुमलमूलक असल्याचे सुश्रुताने सांगितले आहे ['दोषधातुमलमूलं हि शरीरम्' सु. सं.].

### २) दोषधातूमलांचे स्वरूप

वातादि दोष हे सूक्ष्म असून धातुमलांच्यापेक्षा अधिक सामर्थ्यसंपन्न असतात. रसरक्तादि धातू हे दोषांचे आधार होत. त्यांच्याच आश्रयाने वातादि राहत असतात. वायू अस्थीच्या ठिकाणी, पित्त स्वेद आणि रक्त यांच्या आधारे आणि कफ इतरांच्या आश्रयाने शरीरात वास्तव्य करीत असल्याचे ['तत्रास्थनि स्थितो वायुः पित्तं तु स्वेदरक्तयोः । श्लेष्मा शेषेषु... ...' अ. हृ.]. अष्टांगहृदयात सांगितले आहे. धातूंच्या शक्तिहीन वा हीनसत्त्व अंशांना मल म्हणतात. उत्पत्तिविनाशात्मक जीवन सातत्याने अनुभविण्याच्या प्रक्रियेतच या धात्वंशांची शक्ती कालांतराने क्षीण झालेली असते. घनरूप द्रवरूप व स्वेदरूप असे त्यांचे प्रकार तीन संभवतात.

### ३) शरीरातील प्रमुख क्रिया आणि तत्कर्तृक द्रव्ये

शरीरात अनेक प्रकारच्या क्रिया निरनिराळ्या स्थानी होत असल्या तरी त्या सर्वांचा अन्तर्भाव प्रमुख अशा तीनच क्रियांत होऊ शकतो. गती किंवा चलन, आहार आणि धातू यांचे पचन, आणि पोषण वा पोषक द्रव्यांचे आकर्षण या त्या तीन क्रिया होत. त्यांचे कर्तृत्व अनुक्रमे वायू, पित्त आणि कफ यांच्याकडे असते. या वातादींचेच प्राणादि भेद निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळी कार्ये करीत असतात. वायू, पित्त आण कफ ही तीन शरीरातील प्रमुख कार्यकारी द्रव्ये होत. 'वायू, पित्त आणि कफ हेच शरीरोत्पत्तीला कारण असून अविकृत स्थितीत त्यांच्याकडून शरीराचे धारण होत असते' ['वातपित्तश्लेष्माण एव देहसंभवहेतवः । तैरेवाव्यापनैः ... ... शरीरमिदं धार्यते' – सु. सं.], असे सुश्रुतसंहितेत उल्लेखिलेही आहे.

### ४) दोषांचे विशिष्ट आधार

सर्वशरीरव्यापी असूनही प्रत्येक दोष मुख्यत्वेकरून विशिष्ट धातुमलांच्या आधारेच राहत असतो. धातूंच्या पैकी अस्थी हा वायूचा व रक्त हा पित्ताचा आधार असून बाकीचे रस, मांस, मेद, मज्जा व शुक्र हे पांच कफाचे आधार होत. मलांपैकी मुख्यतः स्वेदाच्या आधारे पित्त राहते तर मूत्र व पुरीष यांच्या आधाराने

कफ राहत असतो. वायूचा मात्र असा एखादा विशिष्ट आधारभूत मल सांगण्यात आला नाही. कारण एकही मल रूक्षादिगुणस्वरूपी वायूशी समानगुणी नाही.

### ५) दोषांची विशिष्ट स्थाने

धातू आणि मल यांच्याप्रमाणे दोषांच्याशी समानगुणी असलेली त्यांची प्रमुख स्थानेही सांगण्यात आलेली आहेत. हात, पाय, कटी, पक्वाशय, त्वचा, श्रवणेंद्रिय, अपानदेश, क्षुद्रान्त्र, हृदय, उरोभाग, मस्तक ही वायूची प्रमुख स्थाने होत ['पक्वाशयकटीसक्थिश्रोत्रास्थिस्पर्शनेन्द्रियम। स्थानं वातस्य तत्रापि पक्वाधानं विशेषतः' – या अष्टांगहृदयोक्त वातस्थानांत क्षुद्रांत्राचा उल्लेख नाही. तथापि, समानवायूच्या वर्णनात 'समानोऽग्निसमीपस्थः' म्हणजे समानवायू अग्निसमीप असतो, असे सागूंन वाताचा हा एक प्रकार क्षुद्रांत्रात असल्याचे वाग्भटांनीच सुचविले आहे.].ग्रहणीकला, क्षुद्रान्त्र, यकृत्, नेत्र, हृदय, स्पर्शनेंद्रिय ही पित्ताची प्रधान स्थाने आहेत ['नाभिरामाशयः स्वेदो लसीका हृदयं रसः– दृक् स्पर्शनं च पित्तस्य नाभिरत्र विशेषतः' (अ. हृ.) या वाग्भटोक्त पित्तस्थानांत उल्लेखिलेल्या आमाशय या शब्दाचा अर्थ क्षुद्रान्त्र असा करणे योग्य होय. कारण आहाराचे पचन करणाऱ्या पित्ताचे स्थान ते आहे. क्षुद्रान्त्राच्या वर असलेला पखालीच्या आकाराचा आमाशयसंज्ञक अवयव हे कफाचे स्थान आहे, पित्ताचे नव्हे.]. तसेच, मस्तक, कंठ, उरोभाग, क्लोम, रसनेंद्रिय, संधी, आमाशय, घ्राणेंद्रिय ही मुख्यतः कफाची स्थाने होत ['उरःकंठशिरःक्लोमपर्वाण्यामाशयो रसः। मेदो घ्राणं च जिह्वा च कफस्य सुतरामुरः' – अ. हृ.]. सर्वशरीरव्यापी असताही वातादि दोष या उपरिनिर्दिष्ट स्थानांत [वातादींची विशिष्ट स्थाने सांगताना वाग्भटांनी वरील स्थानांव्यतिरिक्त धातूंचा व मलांचाही निर्देश केला आहे. परंतु त्यांचा उल्लेख पूर्वी स्वतंत्रतया दोषांचे आधार म्हणून करण्यात आला असल्याने येथे त्याचा निर्देश पुनश्च केला नाही.]विशेषत्वाने निवास करीत असतात.

### ६) अविकृत आणि विकृत दोषांची प्रधानतम स्थाने

दोषांची प्रमुख स्थाने वर सांगितली. त्यांतही प्रत्येकाचे एकेक प्रधानतम स्थान असल्याचे दिसून येते. त्यांपैकी प्राणवायूचे स्थान म्हणून उल्लेखिलेले मस्तिष्क हे प्रकृतिस्थ वायूचे सर्वप्रमुख स्थान असून स्थूलान्त्र वा पक्वाशय हे दूषित वाताचे प्रधानतम स्थान होय. ग्रहणी हे अविकृत पित्ताचे आणि क्षुद्रान्त्र हे विकृत पित्ताचे स्थान. तसेच, प्रकृतिस्थ कफाचे हृदय हे सर्वप्रमुख स्थान असून विकृत कफाचे आमाशय हे मुख्य स्थान आहे.

शास्त्रकारांनी पक्वाशय, लघ्वन्त्र आणि उरोभाग ही अनुक्रमे वातपित्तकफांची प्रमुख स्थाने असल्याचे सांगितले आहे. 'वायूचे प्रधान स्थान पक्वाशय', 'नाभी (लघ्वन्त्र) हे पित्ताचे','उरोभाग हे कफाचे', असे अष्टांगहृदयकार म्हणतात ['तत्रापि पक्वाधानं विशेषतः', 'नाभिरत्र विशेषतः', 'कफस्य सुतरामुरः' अ. हृ.]. 'वायू हा कटी आणि पक्वाशय यांच्या आश्रयाने राहतो, त्यांपैकी वातस्थानाच्या वर आणि नाभीच्या खाली पक्वाशय असतो, पित्ताचे स्थान पक्वाशय आणि आमाशय यांच्या मध्यभागी असून आमाशय हे कफाचे स्थान होय', असे सुश्रुताचार्यांचेही वचन आहे ['वातः श्रोणिगुदसंश्रयः। तदुपर्यधोनभिः पक्वाशयः। पक्वामाशयमध्यं पित्तस्य। आमाशयः श्लेष्मणः'। सु. सं.]. असे असता मस्तक, ग्रहणी आणि हृदय ही वात–पित्त–कफांची अविकृत अवस्थेत तरी प्रमुख स्थाने कशी मानावयाची अशी शंका सहज उद्‌भवू शकते. तिचा परिहार पुढीलप्रमाणे होऊ शकतो.

बस्ती, विरेचन आणि वमन हे उपाय पक्वाशय, लघ्वन्त्र आणि आमाशय यांत संचित झालेल्या दूषित वात–पित्त–कफांचे शोधन करण्यासाठी सांगण्यात आले आहेत. ही स्थाने संशोधित झाली म्हणजे पुढे दोषवैषम्योद्‌भव व्याधींचा परिहार होतो, असेही वर्णन शास्त्रात आणखी करण्यात आले आहे. 'आस्थापन, अनुवासन बस्ती हा वातविकारांवरील सर्वश्रेष्ठ उपाय होय, प्रथमतः पक्वाशयातच प्रवेश करून अनेक

अनुक्रमणिका

विकारांना मूलभूत असणाऱ्या वाताचे तो उन्मूलन करतो ['आस्थापनानुवासनं तु खलु सर्वोपक्रमेभ्यो वाते प्रधानतमं मन्यन्ते भिषजः। तदादित एव पक्वाशयमनुप्रविश्य केवलं वैकारिकं वातमूलं छिनत्ति'। च. सं.]'; पित्तजन्य व्याधींवरील उपक्रमांत विरेचन श्रेष्ठतम होय, ते सर्वप्रथम आमाशयात म्हणजे क्षुद्रान्त्रांत प्रवेश करते आणि विकारांना उत्पन्न करणाऱ्या तेथील दूषित पित्ताला बाहेर ओढून काढते ['विरेचनं तु सर्वोपक्रमेभ्यः पित्ते प्रधानतमं मन्यन्ते भिषजः। तद् हि आदित एव आमाशयमनुप्रविश्य केवलं वैकारिकं पित्तमूलं चापकर्षति'। च. सं.]'; तसेच, 'कफोद्भव विकारांवरील सर्व उपायांत प्रधानभूत उपाय म्हणजे वमन. ते प्रथम, आमाशयात प्रवेश करते आणि अनेक विकारांची उत्पत्ती करणाऱ्या तत्रस्थ दुष्ट कफाला बाहेर खेचून काढते' ['वमनं तु सर्वोपक्रमेभ्यः श्लेष्मणि प्रधानतमं मन्यन्ते भिषजः। तद् हि आदित एव आमाशयमनुप्रविश्य केवलं वैकारिक श्लेष्ममूलं अपकर्षति।' च. सं.]; याप्रमाणे एतत्संबंधी विवेचन चरकसंहितेत आढळते. पक्वाशय, लघ्वन्त्र आणि आमाशय हे अवयव विकृत वात-पित्त-कफांची प्रमुख स्थाने असल्याचे यावरून उघड होते.

परंतु प्राणवायू, पाचक पित्त आणि अवलंबक श्लेष्मा यांची जी स्वाभाविक कार्ये सांगण्यात आली आहेत त्यांचे महत्त्व जीवनव्यापारात विशेष आहे. आणि मस्तिष्क, ग्रहणी व हृदय हे अवयव म्हणजे या प्राणादिकांचीच अनुक्रमे स्थाने होत. अर्थात् त्यांनाच वात-पित्त-कफांची स्वाभाविक अवस्थेतील प्रमुख स्थाने मानणे योग्य होय.

### ७) वातादींचे भेद

वातादि दोष सर्वदेहव्यापी आणि शरीरातील सर्व क्रिया करणारे असले तरी त्यांची ही सर्वसामान्य चलनादि कर्मेच आमाशयादि विभिन्न ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारे घडून येत असतात. त्यांनाच अनुसरून वातादींचे प्रत्येकी पांच पांच भेद कल्पिण्यात आले आहेत.

### ८) वातभेदांची नांवे व स्थाने

प्राण, उदान, व्यान, समान आणि अपान हे पांच वायूचे भेद होत. मस्तिष्क आणि फुफ्फुस ही अनुक्रमे प्राण व उदान यांची स्थाने आहेत. उरोभागातील रसविक्षेपण-यंत्र म्हणजे हृदय हे व्यान वायूचे आणि आमाशय [या ठिकाणी आमाशय म्हणजे लघ्वन्त्र असा अर्थ अभिप्रेत आहे. समान हा अग्निसमीपस्थ असतो, असे वर्णनही आहेच.]हे समानाचे स्थान होय. अपान वायू अपानस्थानात म्हणजे उदराच्या अधोभागात असतो [अपान म्हणजे गुद. परंतु, शुक्र, आर्तव, पुरीष, मूत्र आणि गर्भ यांचे उत्सर्जन करणे हे कार्य केवळ गुदभागातील अथवा सुश्रुताने उल्लेखिलेल्या पक्वाशयाश्रयी वायूकडून (पक्वाधानानलयोऽपानः' – सु. सं.) होऊ शकणार नाही. अपान या शब्दाचा अर्थ या संदर्भात, उदराचा अधोभाग असा करणे, म्हणूनच योग्य होय.].

### ९) पित्तभेदांची नांवे व स्थाने

पाचक, रंजक, साधक, आलोचक आणि भ्राजक ही नांवे पित्तभेदाची असून ग्रहणी, यकृत्, हृदय, नेत्र आणि त्वचा ही अनुक्रमे त्यांची स्थाने होत.

अनुक्रमणिका

## १०) कफाचे प्रकार आणि त्यांची नांवे

कफाचे प्रकार अवलंबक, बोधक, क्लेदक, तर्पक आणि श्लेषक याप्रमाणे सांगण्यात आले आहेत. हे पांच प्रकार अनुक्रमे हृदय [शास्त्रकारांनी अवलंबक कफाचे स्थान म्हणून उरोभागाचा उल्लेख केला असला तरी हृदय हा त्यातील अभिप्राय असल्याचे यापूर्वी म्हणजे शा. त. द. उत्तरार्ध दर्शन १४ मध्ये स्पष्ट केले आहे.], रसना, आमाशय, मस्तिष्क आणि संधी या ठिकाणी प्राधान्यतः आढळून येतात.

## ११) दोषांचे सार्वदेहिक सामान्य कार्य

दोषांची सर्वसामान्य सार्वदेहिक कर्मे पुढीलप्रमाणे आहेत. वायू हा गतिमान असल्याने अविकृत स्थितीत सर्व प्रकारचे चलनात्मक कर्म तो करीत असतो. तैजस पित्त अविकृत स्थितीत सर्व प्रकारचे पचनात्मक कार्य करीत असते. आणि सर्व प्रकारचे संश्लेषणात्मक कार्य अविकृत स्थितीतील कफाकडून होत असते.

## १२) प्राणवायूची कार्ये

वायूचा जो प्राणसंज्ञक भेद आहे, त्याचे कार्य आहे संज्ञांचे म्हणजे संवेदनांचे अभिवहन करणे. सर्व अवयवांत जी विविध प्रकारची चलनात्मक कार्ये चालतात ती संवेदनामूलकच असतात. या संवेदनांचे अभिवहन प्राणवायू करीत असतो. 'बुद्धिहृदयेन्द्रियचित्तधृक्' (अ. हृ.) म्हणजे बुद्धी, हृदय, इंद्रिये आणि चित्त यांना धारण करणारा, असे त्याचे वर्णन याच उद्देशाने करण्यात आले आहे. ढेकर देणे, खोकणे, निश्वास सोडणे, थुंकणे, अन्न तोंडातून खाली प्रविष्ट होणे इत्यादि गतिस्वरूपाची अन्य कार्येही या प्राणवायूचीच होत.

## १३) उदानवायूची कार्ये

उदानाचे प्रमुख कार्य उत्साह. शरीरातील सर्व लहान मोठ्या अवयवांना त्यांच्या कर्मांत प्रोत्साहन वा प्रेरणा उदानामुळेच मिळत असते. शरीराची निरनिराळी अंगोपांगे ही सूसूक्ष्म घटकांच्या समुदायापासून बनलेली असतात. यांपैकी प्रत्येक अवयवात जे विशिष्ट स्वरूपाचे चलनात्मक कार्य चालू असते ते त्याला घटकभूत असलेल्या सुसूक्ष्म परमाणूंतील चलनामुळे घडून येत असते. अंगोपांगाच्या सुसूक्ष्म घटकांतील हे चलनात्मक कर्म अव्यक्त स्वरूपाचे असते. त्यालाच उत्साह म्हणतात. त्याचे कर्तृत्व ज्याच्याकडे असते तो वायूचा प्रभेद म्हणजेच उदान.

## १४) व्यानवायूची कार्ये

व्यानसंज्ञक वायू मुख्यतः गतिप्रद असतो. शरीराच्या निरनिराळ्या अंगोपांगांत जी निरनिराळी चलनात्मक कर्मे घडून येत असतात त्यांचे कर्तृत्व त्याच्याकडे असते. 'गती, उत्क्षेपण, अपक्षेपण, निमेष, उन्मेष इत्यादि प्राणिमात्रांच्या प्रायः सर्व क्रिया तदायत्त असतात' ['गत्यपक्षेपणोत्क्षेपनिमेषोन्मेषाणादिकाः । प्रायः सर्वाः क्रिया तस्मिन् प्रतिबद्धाः शरीरिणाम्' – अ. हृ.], असे अष्टांगहृदयात म्हटले आहे.

**१५) समानवायूचे कार्य**

आहाराचे पचन करण्यात सहायभूत होणे हे समान वायूचे कार्य. आहाराचे पचन करणाऱ्या पाचक पित्ताचा स्त्राव क्षुद्रांत्राचे आकुंचन आणि प्रसरण झाल्याने घडून येत असतो. हे आकुंचन–प्रसरण समान वायूकडून होत असते.

**१६) अपानवायूचे कार्य**

शरीराच्या अधोभागातील स्त्रोतसांना प्रेरित करून शुक्र, आर्तव, पुरीष्, मूत्र, गर्भ यांचे उत्सर्जन करणे हे अपान वायूचे कार्य आहे.

**१७) पाचक पित्ताचे कार्य**

पाचक पित्ताचे कार्य मुख्यतः आहाराचे पचन करणे.

**१८) रंजक पित्ताचे कार्य**

आहाररसाचे रंजन करण हे रंजक पित्ताचे कार्य. आहाररस यकृतात प्राप्त झाला म्हणजे तेथे असलेल्या रंजक पित्ताकडून त्यात रंजकता उत्पन्न होते.

**१९) रंजक पित्ताचा रक्तधातूतील एक प्रकार**

रक्त धातूच्या अणुस्वरूप अवयवांत परस्परांविषयी अनुराग अथवा संघटितपणा उत्पन्न करणे हे कार्य रक्ताच्या ठिकाणी असलेल्या पित्ताकडून होत असते. रक्तगत पित्ताला सुद्धा म्हणून रंजकच म्हणावयास हवे.

**२०) साधक पित्ताचे कार्य**

साधक पित्ताचे विशिष्ट कार्य आहे संज्ञाजागृती. 'साधक पित्त, हृदयात राहते. आणि बुद्धी, धारणा, अहंकार इत्यादिकांच्या कडून ते अभिप्रेत अर्थ मिळवून देते, म्हणजे त्या त्या विषयाचे यथावत् ज्ञान करून देते', असे अष्टांगहृदयात म्हटले आहे ['बुध्दिमेधाभिमानाद्यैरभिप्रेतार्थसाधनम् । साधकं हृदगतं पित्तम् ।' अ. हृ. या वर्णनातील हृदय या शब्दाचा अर्थ मस्तिष्क असा घेणे, या संदर्भात उचित होय.]. प्राणवायूचे स्थान म्हणून सांगण्यात आलेल्या या मस्तिष्कात असलेले हे उष्णगुणी साधक पित्त आपल्या स्वभावानुसार त्या त्या इंद्रियार्थाविषयी संज्ञा जागृत करीत असते.

**२१) आलोचक पित्ताचे कार्य**

रूपावलोकन करणे हे आलोचक पित्ताचे कार्य होय.

**२२) भ्राजक पित्ताचे कार्य**

त्वचेच्या ठिकाणी विशिष्ट तेज आणि वर्ण कायम राखणे वा निर्माण करणे हे भ्राजक पित्ताचे कार्य. रक्त, लसीका, आदिमध्ये निर्मलता निर्माण केल्याने हे कार्य त्याच्याकडून साधले जाते.

**२३) अवलंबक कफाचे कार्य**

कफाच्या प्रकारांपैकी आद्य असा अवलंबक कफ हृदयात असतो हे पूर्वी सांगितलेच. तो हृदयातून रसधातूबरोबर धमनींच्या द्वारे सर्व शरीरात संचार करतो आणि निरनिराळ्या ठिकाणी असलेल्या कफाच्या इतर प्रकारांत स्निग्धादि गुणांनी पोषण करीत असतो. त्याला म्हणूनच अवलंबक म्हणतात. अन्य कफप्रकारांचे तो एक प्रकारे आलंबनच असतो.

**२४) क्लेदक कफाचे कार्य**

क्लेदन म्हणजे द्रवीभवन करतो तो क्लेदक. त्याचे वास्तव्य आमाशयात असते. त्या ठिकाणी प्राप्त झालेल्या धन, द्रव, शुष्क, आर्द्र वगैरे सर्व प्रकारच्या उपभुक्त द्रव्यांचे द्रवीभवन करणे हे कार्य आमाशयात असलेल्या ज्या द्रव्याकडून होते, त्यालाच क्लेदक कफ म्हणतात.

**२५) बोधक कफाचे कार्य**

बोधक कफाचे स्थान रसना असून तोंडात टाकलेल्या द्रव्याच्या रसाचा बोध करून देणे हे त्याचे कार्य होय.

**२६) तर्पक कफाचे कार्य**

आपल्या विशिष्ट शीत गुणाने सर्व इंद्रियांच्या ठिकाणी तृप्ती अथवा समाधान उत्पन्न करणे, हे कार्य तर्पक कफाचे आहे.

**२७) श्लेषक कफाचे कार्य**

श्लेषक कफ संधींच्या ठिकाणी असतो. या संधीत विशेषतः अस्थिसंधींत संश्लिष्टता म्हणजे सुदृढता उत्पन्न करणे वा कायम राखणे हे या कफाचे कार्य आहे.

**२८) प्रकृतिभेद**

शुक्र आणि आर्तव म्हणजे पुरुषबीज आणि स्त्रीबीज यांतील वातादि दोषांच्या अवस्थितीला अनुसरून प्रत्येक शरीराची प्रकृती आपापल्या परीने आगळी असते. वातप्रकृती, पित्तप्रकृती आणि कफप्रकृती याप्रमाणे या देहप्रकृतीचे प्रमुख प्रकार दोषांनुसार तीन संभवतात.

**अनुक्रमणिका**

**२९) वातप्रकृतीची लक्षणे**

त्वचा रूक्ष म्हणजे खरखरित वा फुटीर असणे, अंगोपांगे एखाद्या विकाराने नव्हे तर स्वभावतःच कृश असणे, गात्रे असंहत म्हणजे विश्लिष्टशी भासणे, हस्तपादादि अवयव व हातापायांची बोटे किंबहुना, सर्व शरीरच प्रदीर्घ असणे, शरीराचा वर्ण मलिन, काळसर असणे, धैर्यवा बल कमी असणे, खाण्यापिण्यात विशेष आसक्ती असणे, तसेच झोप कमी असणे इत्यादि वातप्रकृतीची लक्षणे आहेत.

**३०) पित्तप्रकृतीची लक्षणे**

जठराग्नी तीक्ष्ण असणे, अवयवात शैथिल्य म्हणजे सुदृढतेचा अभाव असणे, डोळे आणि हातापायांचे तळवे आरक्त असणे, आणि शरीर विशेषतः उष्ण आणि गौरवर्णी असणे ही पित्तप्रकृतीची थोडक्यात लक्षणे होत.

**३१) श्लेष्मप्रकृतीची लक्षणे**

योग्य प्रमाणात उपबृंहित झाल्यामुळे ज्याची गात्रे सुश्लिष्ट म्हणजे सुसंहत आहेत, ज्यांचे संधी कफप्रभावामुळे स्थिर आणि मांसलत्वामुळे दृढ आणि गूढ आहेत, ज्याचे बाहू दीर्घ आहेत, ज्याचे शरीर एकंदरीत विशाल आणि पुष्ट आहे, ज्याच्या शरीरात बल आहे आणि जो तेजस्वी व शुक्लवर्णी आहे असा पुरुष श्लेष्मप्रकृतीचा समजावा.

**३२) प्रकृतीचे संसर्गसन्निपातोत्पन्न भेद**

दोन अथवा तीन दोषांच्या आधिक्यामुळे म्हणजेच संसर्ग आणि सन्निपात यांच्यामुळे प्रकृतीचे जे आणखी प्रकार संभवतात त्यांची लक्षणेही संमिश्र स्वरूपाची असतात. अशा प्रकृतींचे ज्ञान शरीराच्या ठिकाणी प्रकट झालेल्या लक्षणांवरून आणि त्यातील दोषांच्या तारतम्याला अनुसरूनच करून घ्यावयाचे असते.

**३३) वयोमानानुसार वातादींचे प्राधान्य**

बाल्य, तारुण्य आणि वार्धक्य यांत अनुक्रमे कफ, पित्त आणि वायू यांचे आधिक्य असते आणि तेही स्वभावतःच असते.

**३४) अहोरात्रातील वातादींचे प्राधान्य**

दिवस आणि रात्र यांच्याही पूर्व भागात कफ, मध्य भागात पित्त आणि उत्तर भागात वायू हा बलवान असतो. यांपैकी प्रत्येक भाग हा पंचमुहूर्तात्मक असतो.

अनुक्रमणिका

### ३५) आहारपचनाच्या अवस्थांतील दोषांचे प्राधान्य

आमाशय हा आहाराचा प्रथमाधार. उपभुक्त अन्न या आमाशयात जोवर विद्रुत स्थितीत आणि आमावस्थेत म्हणजे अपक्व रूपात विद्यमान असते तोवर कफाचे आधिक्य असते. कफ वाढलेला असतो. पुढे त्याच अन्नाला पाचक पित्ताच्या मिश्रणामुळे पच्यमान अवस्था प्राप्त झाली की पित्ताची अभिवृद्धी होते. आणि शेवटी सार आणि किट्ट यांचे पृथक्करण पूर्ण झाल्यावर त्या अन्नाला जेव्हा पक्वावस्था प्राप्त होते तेव्हा वायूची अभिवृद्धी होते.

### ३६) अहोरात्रादिकांतील दोषांच्या वाढीची स्वाभाविकता

वयोमान, अहोरात्र तसेच आहारपचनाच्या अवस्था यांना अनुसरून होणारी वातादि दोषांची वृद्धी ही स्वाभाविकच असते. ती विकृतिस्वरूप नसल्याने कोणताही रोग तीपासून उद्‌भवत नाही.

### ३७) दोषांच्या वैषम्याची कारणे

आहार, विहार, चिंताशोकादि मानसिक कर्मे, तसेच वसंतादि ऋतू या चार [पूर्वजन्मी केलेले कर्म (प्राक्तन) हे देखील शास्त्रकारांनी दोषवैषम्याचे आणखी एक कारण सांगितले आहे. परंतु ते मुख्यतः प्रकृतिभेदाचे कारण असल्याने येथे त्याचा उल्लेख केला नाही.], गोष्टीदोषांच्या वैषम्याला म्हणजे त्यांत वृद्धी, क्षय अथवा प्रकोप उद्‌भवण्याला कारणीभूत होतात.

### ३८) दोषांचा चय, प्रकोप आणि प्रशम करणारे ऋतू

ग्रीष्म, वर्षा, शरद या तीन ऋतूंत अनुक्रमे वायूचा संचय, प्रकोप व प्रशम होतो. पित्ताचा संचय, प्रकोप व प्रशम अनुक्रमे वर्षा, शरद, हेमंत या ऋतूंत होतो, आणि शिशिर, वसंत, ग्रीष्म या ऋतूंत अनुक्रमे कफाचा संचय, प्रकोप व प्रशम होतो. वाग्भटाचार्यांनीच अष्टांगहृदयात एका श्लोकात हे सांगितले आहे ['चयप्रकोपप्रशमा वायोर्ग्रीष्मादिषु त्रिषु । वर्षादिषु तु पित्तस्य श्लेष्मणः शिशिरादिषु' अ. हृ.].

### ३९) चयप्रकोपाला कारणीभूत होणाऱ्या ऋतूंचे स्वभाव

वातादि दोष ग्रीष्मादि ऋतूंत संचित होऊन देखील त्यांचा प्रकोप मात्र त्याच ऋतूंत न होता अन्य ऋतूंत का होतो, याचेही कारण आचार्य वाग्भटांनी अष्टांगहृदयात पुढीलप्रमाणे सांगितले आहे. ते म्हणतात की, ग्रीष्म ऋतूत ऋतुस्वभावाला अनुसरून देहात लघु आणि रूक्ष या गुणांचे प्राबल्य असते. औषधी, आहारद्रव्ये वगैरेही या ऋतूत अशाच गुणाची असतात. वायू तर लघु आणि रूक्ष गुणाचाच असतो. अर्थात् ग्रीष्म ऋतूत लघुरूक्षगुणी औषधादिकांनी त्याच गुणाच्या वायूचा संचय तद्‌गुणी झालेल्या शरीरात होणे स्वाभाविक असते. परंतु अतिवृद्ध झालेला हा वायू त्या वेळी प्रकुपित मात्र होत नाही. कारण कालस्वभाव. ग्रीष्म ऋतूतील उष्णतेचाच हा परिणाम होय. वायू अतिवृद्ध होऊनही स्रोतोरोध होईल तेव्हाच तो प्रकुपित होणार. हा स्रोतोरोध होणार शैत्यामुळे. ग्रीष्म ऋतूत शैत्याचा अभाव असतो म्हणून वायूचा प्रकोप होत नाही. वर्षा ऋतूत मात्र शैत्यामुळेच तो प्रकुपित होतो. पित्ताचेही असेच. ते तीक्ष्णोष्णगुणी असते. वर्षा ऋतूत आंबट, खारट इत्यादि अम्लविपाकी आहार्य द्रव्ये, जल, औषधे इत्यादींचे सेवन केल्यास सदृशगुणी पित्ताची

अभिवृद्धी झाली तरी त्याचा प्रकोप मात्र त्या ऋतूत होत नाही. वर्षा ऋतूतील शीततेचा हा परिणाम असतो. स्निग्धशीतगुणी कफही याचप्रमाणे सदृशगुणी शिशिर ऋतूत स्निग्धशीतगुणी आहार्य द्रव्ये, जल, औषदी इत्यादिकांनी संचित होत असला तरी प्रकुपित होत नाही. कारण तत्कालीन शीततेने तो त्यावेळी घनीभूत झालेला असतो. वसंत ऋतूतील उष्णतेच्या योगाने मात्र त्याचेच पुढे द्रवीभवन होते व तो कुपित होतो' ['चीयते लघुरूक्षाभिरौषधीभिः समीरणः । तद्विधस्तद्विधे देहे कालस्यौष्ण्यान्न कुप्यति । अद्भिरम्लविपाकाभिरौषधीभिश्च तादृशम् । पित्तं याति चयं कोपं न तु कालस्य शैत्यतः । चीयते स्निग्धशीताभिरुदकौषधिभिः कफः । तुल्येऽपि काले देहे च स्कन्नत्वान्न प्रकुप्यति' – अ. हृ.]. दोषांचे चय आणि प्रकोप याप्रमाणे कालस्वभावाला अनुसरून भिन्न ऋतूंत प्रतिवर्षी येत असतात.

### ४०) ऋतुस्वभावामुळे प्रकुपित झालेल्या वातादींचे प्रशमन

ऋतुस्वभावामुळे प्रकुपित झालेल्या वातादींचे प्रशमन करण्यासाठी ऋतुचर्येत विशिष्ट आहार, विहार आणि शोधन–शमन–स्वरूपी काही औषधे यांचे उपपादन करण्यात आले आहे. त्यांचा यथोचित उपयोग केल्याने दोषांचे शमन होते.

### ४१) वात वृद्धिकर आणि वातक्षयकर द्रव्ये

तुरट, तिखट व कडू रसाची, लघु व रूक्ष गुणाची तसेच शुष्क व शीत अशी आहार्य वा औषधिस्वरूप द्रव्ये विशेषतः वातवृद्धिकर असतात. उलट, मधुर, आंबट व खारट रसाची, गुरु, स्निग्ध व उष्ण गुणाची द्रव्ये अतिप्रमाणात सेवन केल्याने वाताचा क्षय होतो.

### ४२) पित्तवृद्धिकर आणि पित्तक्षयकर द्रव्ये

तीक्ष्ण आणि उष्ण गुणाची, तसेच तिखट आणि आंबट रसाची द्रव्ये पित्ताच्या वृद्धीला कारणीभूत होतात तर कडू, तुरट आणि मधुर रसाची तसेच मंद व शीत गुणाची द्रव्ये पित्ताचे प्रशमन करतात.

### ४३) कफवृद्धिकर आणि कफक्षयकर द्रव्ये

गोड, आंबट व खारट रसाची, तसेच मंदशीतगुणी आणि स्निग्ध द्रव्ये ही कफवर्धक असतात तर लघु व रूक्ष गुणाची तसेच तुरट, खारट व कडू रसाची अथवा तीक्ष्ण व उष्ण द्रव्ये विशेषतः कफाचे शमन करतात.

### ४४) आहाराची मात्रा आणि दोषांची अभिवृद्धी

अल्पाशन अथवा अनशन हे वात वाढविते तर अधिक प्रमाणात आहाराचे सेवन केल्याने कफ वाढतो. मिथ्याशनाने [समशन, अध्यशन, विषमाशन आणि विरुद्धाशन हे चारही मिथ्याशनाचेच प्रकार होत.] प्रायः पित्ताची वाढ होते. विदग्धता उत्पन्न होण्याचा तो परिणाम असतो.

अनुक्रमणिका

### ४५) दोषवर्धक शारीर कर्मे (विहार)

व्यायाम, व्यवाय, श्रम इत्यादि शारीरिक कर्मे अतिरिक्त प्रमाणात केल्याने तसेच जागरणाने वायू आणि पित्त या दोघांचीही सामान्यतः अभिवृद्धी होते. रूक्षता, लघुता आदि गुणांची वाढ होण्याचा तो परिणाम असतो. अतिश्रमाची कामे करणे अथवा अधिक बलवान व्यक्तीशी कुस्ती करणे इत्यादिकांनी तसेच, हस्तपादादि अवयवांच्या अस्वाभाविक हालचालींनी विशेषतः वाताची अभिवृद्धी होते. उद्योग न करता एका जागी बसून राहणे, अतिनिद्रा, सुखासीनपणा, आळशीपणा इत्यादिकांच्यामुळे कफ वाढतो.

### ४६) दोषवर्धक मानस कर्मे

चिंता, शोक इत्यादि मनाला क्लेश देणाऱ्या विकारांनी वायू व पित्त यांची अभिवृद्धी होते. कफाचा क्षयही [चिंतादिकांच्या योगाने मन अस्वस्थ झालेले असले म्हणजे आहार, निद्रा इत्यादि गोष्टींचा अपेक्षित उपयोग होत नाही. वातपित्ताची वाढ आणि कफाचा क्षय होण्यात अखेर त्याचा परिणाम होतो.]. त्यामुळेच घडून येतो. त्याची वृद्धी कोणत्याच मनोविकाराने होत नाही. मनाला क्षुब्ध करणारे विकार नसले म्हणजे जे मनःस्वास्थ्य लाभते त्याने संपूर्ण शरीराचे स्वास्थ्य संवर्धित होत असले तरी त्यामुळे ते कफवर्धक होत नाही. इतकेच नव्हे तर मनःस्वास्थ्यातून कित्येकदा संभवणारा आळशीपणा कफाच्या वाढीला कारणीभूत होत असला तरी वृद्धीचे हे कारण वस्तुतः शारीरिकच होय, मानसिक नव्हे.

### ४७) दोषांच्या तीन विकृती आणि त्यांची लक्षणे

वृद्धी, क्षय आणि प्रकोप याप्रमाणे वातादि दोषांत तीन प्रकारे विकृती वा विषमता संभवू शकते. वृद्धावस्थेत दोषांच्या गुणकर्मांची वाढ होते तर क्षयावस्थेत त्यांचीच हानी होते. प्रकोपावस्थेत नानाविध रोग प्रादुर्भूत होतात.

### ४८) वृद्धी व प्रकोप यांचे स्वरूप

वातादि दोषांची आपापल्या स्थानांत स्वाभाविक प्रमाणापेक्षा अधिक वाढ होण्याला वृद्धी वा चय ['चयो वृद्धिः स्वधाम्न्येव' अ. हृ.] अशी संज्ञा असून अस्वाभाविक मार्गाने गमन करण्याच्या दोषांच्या प्रवृत्तीला प्रकोप ['कोपस्तून्मार्गगामिता' अ. हृ.] म्हणतात.

### ४९) वातवृद्धीची लक्षणे

वायूची वृद्धी झाली की शरीर रूक्ष व कृश होते, बल कमी होते, झोप कधी कमी येते तर कधी येतच नाही, मलात शुष्कता येते, मलावरोध होतो, तसेच अंत्रकूजन आणि आध्मान [वातवृद्धीने आतड्यात विशिष्ट ध्वनी होणे म्हणजे अंत्रकूजन आणि पोट फुगून त्यात सशूल ध्वनी होणे म्हणजे आध्मान.] या विकारांचीही उत्पत्ती होते.

अनुक्रमणिका

### ५०) वातक्षयाची लक्षणे

वायूच्या क्षीणतेमुळे शरीरातील निरनिराळ्या स्वाभाविक कर्मांत मांद्य उद्‌भवते आणि गात्रे गळून जातात. त्यांतील उत्साहच कमी होतो.

### ५१) कुपित वायूची लक्षणे

वायूचा प्रकोप झाला म्हणजे तोद, भेद, व्यध इत्यादि निरनिराळे शूलाचे प्रकार, निरनिराळ्या ठिकाणच्या पेशींचा व स्नायूंचा स्तंभ (जखडणे, ताठणे) झाल्याने उद्‌भवणारे मन्यास्तंभ, जिव्हास्तंभ, इत्यादि व्याधी, काही अवयवांत वा सर्वांगात कंप उद्‌भवणे, मांसशोषादि कारणांमुळे विशिष्ट स्थानी आवळल्याप्रमाणे वेदना होणे, विशिष्ट ठिकाणी त्वचा काळसर वा तांबुस होणे [जेथील धातुघटक क्षीण अथवा सत्त्वहीन होतात तेथील त्वचा काळसर भासते आणि जेथील धातुघटक प्रपीडित होतात तेथील त्वचा लालसर दिसते.], आणि आक्षेप, आयाम ['मुहुराक्षिपति क्रुद्धो गात्राण्या-क्षेपकोऽनिलः । पाणिपादं च संशोष्य सिराः सस्नायुकंडराः । ' (च. सं.), म्हणजे 'कुपित झालेला वायू हात, पाय तसेच सिरा, स्नायू आणि कंडरा यांच्यात शुष्कता उत्पन्न करून निरनिराळ्या अवयवांच्या ठिकाणी जेव्हा आक्षेप (झटके) उत्पन्न करतो तेव्हा त्या विकाराला आक्षेप म्हणतात', असे चरकांनी सांगितले आहे. आयामाची लक्षणेही ते पुढीलप्रमाणे सांगतात – 'अंतरायम्यते ग्रीवा मन्या च स्तभ्यते भृशम् । दंतानां दंशनं लाला पृष्ठाक्षेपः शिरोग्रहः । जृंभा वदनसंगश्चाप्यन्तरायामलक्षणम्' (च. सं.), म्हणजे 'मान अन्तर्वक्र होणे, ताठणे, दातखिळी बसणे, लाळ गळणे, पाठीला झटके येणे, मस्तक जखडल्यासारखे वाटणे, जांभया येणे आणि तोंड जखडणे ही अंतरायामाची लक्षणे होत.' 'पृष्ठमन्याश्रिता .बाह्याः शोषयित्वा सिरा बली । वायुः कुर्याद् हनुस्तंभं बहिरायामलक्षणम्' (च.सं.), 'कुपित झालेल्या वायूमुळे पाठीच्या भागाकडे गेलेल्या मानेच्या मागील बाजूच्या शिरा शुष्क होऊन त्यामुळे मान आखडणे आणि ती बहिर्वक्र होणे याला बहिरायाम म्हणतात'], तसेच बाहू, मांड्या वगैरेंचा शोष आदि विकार उत्पन्न होणे, ही लक्षणे उद्‌भवतात.

### ५२) पित्तवृद्धीची लक्षणे

पित्त वाढले की समस्त शरीरात उष्णता वाढते आणि पाचक पित्त व धात्वग्नी यातही तीक्ष्णता उत्पन्न होते.

### ५३) पित्तक्षयाची लक्षणे

पित्तक्षयात शरीरातील उष्णता कमी होते आणि अग्नीही मंद होतो.

### ५४) पित्तप्रकोपाची लक्षणे

पित्ताचा प्रकोप झाला म्हणजे दाह, पाक, कोथ ही लक्षणे उद्‌भवतात. सहन न होण्याइतकी उष्णता वाढणे म्हणजे दाह; आणि जीभ, ओठ, घसा इत्यादि अवयवांची अंतस्त्वचा (कला) दाह होऊन विदारित होणे–फाटणे म्हणजे पाक. कोथ म्हणजे धातुघटक कुजून नष्ट होणे. कोथाचा संभव मांसमय अवयवांत विशेषत्वाने होत असतो. पित्तप्रकोपामुळे या दाहादिकांशिवाय कुष्ठ, रक्तपित्त इत्यादि दाहात्मक [दाह, पाक,कोथ या लक्षणांपैकी कोणते तरी एकच लक्षण प्रधानत्वाने कुष्ठ, रक्तपित्त इत्यादि विकारांत वस्तुतः विद्यमान असते, तथापि, हे सर्व विकार दाहमूलकच होत.]. विकार उद्‌भवतात. त्वचेच्या ठिकाणी तांबुस, पिवळसर, वा हिरवट वर्ण सर्व शरीरात व रोगस्थानी दिसू लागतो. तसेच, सर्व पदार्थ जिभेला तिखटही भासू लागतात.

अनुक्रमणिका

### ५५) कफवृद्धीची लक्षणे

कफाची वृद्धी झाली की अग्निमांद्य संभवते. शरीरात अन्तर्बाह्य शैत्य जाणवू लागते. शरीर जड भासू लागते आणि आळशीपणाही वाटू लागतो. 'आलस्य म्हणजे सामर्थ्य असूनही कर्म करण्याविषयी उत्साह नसणे' ['शक्तस्य चाप्यनुत्साहः कर्मण्यालस्यमुच्यते' – च. सं.], असे सुश्रुताचार्यांनी म्हटले आहे.

### ५६) कफक्षयाची लक्षणे

कफाचा क्षय झाला की सर्व अवयव गळल्यासारखे वाटतात, आणि विशेषतः सांध्यांत शैथिल्य जाणवू लागते.

### ५७) कफप्रकोपाची लक्षणे

कफाचा प्रकोप झाला म्हणजे विशिष्ट स्थानी अथवा सर्व शरीरात सूज उद्‌भवते, मान, हनुवटी इत्यादि अवयवांचे चलनवलन करता येत नाही, निरनिराळी स्रोतसे अवरुद्ध होतात, आणि क्लेद व कोथ ही लक्षणे ज्यांत समानत्वाने आढळतात असे प्रमेह, गंड, अर्बुद वगैरे नानाविध विकारही प्रादुर्भूत होतात.

### ५८) संसर्ग आणि सन्निपात यांचे स्वरूप

वातपित्त, पित्तकफ, वातकफ याप्रमाणे कोणतेही दोन दोष जेव्हा एकाच वेळी वृध्द, क्षीण वा प्रकुपित होतात तेव्हा दोषांच्या त्या स्थितीला संसर्ग अशी संज्ञा आहे. तीनही दोष एकाच वेळी वृध्द, क्षीण अथवा प्रकुपित झाले म्हणजे त्या स्थितीला सन्निपात म्हणतात.

### ५९) संसर्ग आणि सन्निपात यांतील क्रियावैषम्य

विशिष्ट प्रकारच्या संसर्गात त्यातील दोषद्वयाला अनुसरून विशिष्ट प्रकारचे क्रियावैषम्य उद्‌भवते तर सन्निपातात सर्वच दोषांच्या क्रियांत विषमता निर्माण होते. अर्थात् वृद्धी, क्षय आणि प्रकोप यांपैकी प्रत्येक अवस्थेत संसर्गरूप आणि सन्निपातात्मक विकृती संभवू शकते.

### ६०) दोषांचे भेद

संसर्ग आणि सन्निपात यांचे वृद्धिक्षयादि अवस्थांनुसार जे प्रकार संभवतात त्यांतही तरतमभावाला अनुसरून पुनश्च आणखी पोटभेद आढळून येतात. तदनुसार दोषांचे एकूण ६३ भेद शास्त्रकारांनी उल्लेखिले आहेत.

### ६१) दोषांचे त्रेसष्ट भेद

वातादि दोष प्रत्येकशः वृद्ध आणि प्रत्येकशः क्षीण याप्रमाणे एकदोषीय विकृतीचे भेद ६. संसर्गाचे भेद १८. पैकी दोन दोषांच्या समवृद्धीने ३ – वायुपित्त, कफपित्त, कफवायु. तरतमभावाला अनुसरून ६–

अनुक्रमणिका

वृद्ध वायु, वृद्धतर पित्त, वृद्धकफ वृद्धतर पित्त, वृद्धवायु वृद्धतर कफ, वृद्धपित्त वृद्धतर वायु, वृद्धपित्त, वृद्धतर कफ, वृद्ध कफ वृद्धतर वायु; याप्रमाणे संसर्गाचे वृद्धावस्थेतील प्रकार ९. तसेच ९ क्षयावस्थेतील. समक्षीणतेने ३- वायुपित्त, कफपित्त, वायुकफ. तरतमभावाला अनुसरून ६ – वायुक्षीण, पित्तक्षीणतर, कफक्षीण, पित्तक्षीणतर, कफक्षीण वायुक्षीणतर, पित्तक्षीण वायुक्षीणतर, पित्तक्षीण कफक्षीणतर, वायुक्षीण कफक्षीणतर, – याप्रमाणे संसर्गाचे एकूणभेद १८. सन्निपाताचे भेद एकूण ३८– वृद्धावस्थेत एक दोषाच्या आधिक्याने ३– वातपित्तवृद्ध कफवृद्धतर, पितकफवृद्ध वायुवृद्धतर, वातकफवृध्दपित्तवृध्दतर; दोन दोषांच्या आधिक्याने ३ –वायुवृद्ध पित्तकफ वृद्धतर, पित्तवृद्ध कफवात वृद्धतर, कफवृद्ध वायुपित्त वृद्धतर. वृद्ध दोषांच्या तरतमभावाला अनुसरून ६ -वातवृद्ध पित्तवृद्धतर कफवृद्धतम, पित्तवृद्ध कफवृद्धतर वातवृद्धतम, कफवृद्ध वायुवृध्दतर पित्तवृध्दतम, वायुवृध्द कफवृध्दतर पित्तवृध्दतम, पित्तवृद्ध वायुवृध्दतर, कफवृध्दतम, कफवृध्दपित्तवृध्दतर वायुवृध्दतम; सर्वांच्या समवृद्धीने एकएकूण वृध्द दोषांचे प्रकार १३. क्षीणावस्थेतील प्रकारही याचप्रमाणे १३. दोनही मिळून एकूण २६. एकाचा क्षय आणि दोघांची वृध्दी, तसेच एकाची वृध्दी आणि दोघांचा क्षय याप्रमाणे सन्निपाताचे आणखी भेद ६ – वायुक्षीण पित्तकफवृध्द, पित्तक्षीण वातकफवृध्द, कफक्षीणवातपित्तवृध्द; वायुवृध्द कफपित्तक्षीण, पित्तवृध्द कफवातक्षीण, कफवृध्द वातपित्तक्षीण. एकाची वृध्दी – एकाची समता एकाचा क्षय याप्रकारे एकूण ६– वायुवृध्दपित्तसम कफ क्षीण, पित्तवृध्द वायुसम कफ क्षीण, कफवृध्द वायुसम पित्तक्षीण, पित्तवृध्द कफसम वायुक्षीण, कफवृध्दपित्तसम वायुक्षीण, वायुवृध्द कफसम पित्तक्षीण. अशा प्रकारे सन्निपाताचे भेद एकूण ३८ होतात. अशा रीतीने एकदोषीय ६, संसर्ग १८, आणि सन्निपात ३८ मिळून दोषभेद ६२. शिवाय स्वस्थाचे लक्षण म्हणून सांगितलेली तीनही दोषांची समावस्था हा एक प्रकार अधिक. सर्व मिळून दोषभेद एकूण ६३ होतात.

### ६२) संसर्ग आणि सन्निपात यांतील दोषलक्षणांचे तारतम्य

संसर्ग आणि सन्निपात यांचे जे प्रकार वर उल्लेखिले त्यांत दोषांच्या तारतम्याला अनुसरून त्या त्या दोषांची शूलदाहादि लक्षणेही तारतम्यानेच प्रकट होत असतात. उदाहरणार्थ, जेव्हा वायु वृध्द आणि पित्त वृध्दतर असा प्रकार असतो तेव्हा तदुत्पन्न विकारांत शूलापेक्षा दाह अधिक जाणवतो. उलट, ज्यावेळी पित्त वृध्द आणि वायु वृध्दतर अशी स्थिती असते त्यावेळी त्या प्रकारच्या संसर्गोत्पन्न विकारांत दाहापेक्षा शूलाचे प्रमाण अधिक असते. सन्निपातोत्पन्न विकारांत सर्व दोषांची लक्षणे समन्वित असली तरी त्यांतही वायूच्या प्राधान्यामुळे शूल, पित्ताच्या प्रमुखत्वामुळे दाह आणि कफाच्या आधिक्यामुळे शोथ हीच लक्षणे अनुक्रमे अधिक प्रमाणात प्रतीत होत असतात. दोषांच्या वृद्धीमुळे त्यांची क्षीणताही अनुमानिता येते. चलन, पचन, पोषण ही वातपित्तकफांची स्वाभाविक कर्मे. निरनिराळ्या विकारांत आढळून येणाऱ्या त्यांच्या हीनयोगाला अनुसरून त्या त्या विकृतीतील क्षीणता समजून घेता येते. दोष आणि त्यांची लक्षणे यांच्यात वृद्धिक्षयरूपी तारतम्य याप्रमाणे अनेकप्रकारे संभवू शकते. दोषांचे सविशेष ज्ञान करून घेऊ इच्छिणाराने ते सूक्ष्म निरीक्षण करून जाणून घेतले पाहिजे.

### ६३) वृद्धी, क्षय आणि सम या अवस्थांतील दोषांच्या सन्निपातांचे स्वरूप

सन्निपाताच्या पूर्वोक्त ३८ प्रकारांपैकी सहा प्रकार क्षीण आणि वृद्ध दोषांच्या समवायानुसार सांगण्यात आले असून शिवाय आणखी सहा प्रकार वृद्ध, क्षीण आणि समस्थितीतील दोषांच्या समवायाला अनुसरून उल्लेखिण्यात आले आहेत. हे बाराही प्रकार सन्निपाताचे म्हणून सांगण्यात आले असले तरी ते केवळ सन्निपातात्मक होत असे म्हणता येत नाही. वृद्ध आणि क्षीण दोषांचा समवाय ज्यात झालेला असतो

अशा पहिल्या सहा भेदांपैकी तिघांत एका दोषाचा क्षय आणि दोन दोषांची वृद्धी असा प्रकार असतो. तर एका दोषाची वृद्धी आणि दोन दोषांचा क्षय हे बाकीच्या तिघांचे स्वरूप असते. अर्थात् या सहांपैकी कोणते तरी दोन दोष वृद्ध अथवा क्षीण अवस्थेत विद्यमान असतात. आणि अभिवृद्ध अथवा क्षीण झालेल्या या दोषद्वयापासूनच त्या त्या विशिष्ट विकाराची उत्पत्ती होत असते. सन्निपाताच्या या सहाही भेदांचे स्वरूप संसर्गसदृश होय असे म्हणावयास हरकत नाही. दोन दोष वृध्द असताना क्षीण असलेला तिसरा दोष त्याच्या क्षीणतेमुळे ज्याप्रमाणे रोगोत्पत्ती करू शकत नाही त्याचप्रमाणे दोन दोष क्षीण असले म्हणजे चलनादिकांपैकी दोन कर्मांत क्षीणता उद्‌भवते व तीच रोगाला कारणीभूत होते. अर्थात् उपर्युक्त सहाही प्रकारांत रोगोत्पत्तीच्या दृष्टीने दोन दोषांची क्षीणता वा वृध्दी हीच महत्त्वाची असून तीमुळेच सन्निपाताचे हे सहाही प्रकार संसर्गाच्या भेदांशी सरूप ठरू शकतात.

एक दोष वृध्द, दुसरा क्षीण आणि तिसरा सम अशी स्थिती सन्निपाताच्या ज्या प्रकारांत विद्यमान असल्याचे वर उल्लेखिले, त्या सहा प्रकारांपैकी प्रत्येकात जो दोष वृध्द असतो त्यापासूनच वस्तुतः त्या त्या विकाराची उत्पत्ती होत असते. कारण सम स्थितीतील दोषाकडून रोगोत्पत्ती होतच नाही. आणि वृध्द दोषाच्या विरुध्दगुणी असलेला क्षीण दोष त्याच्या क्षीणतेमुळेच रोगोत्पत्तीच्या कामी असमर्थ ठरतो. अर्थात् या सहा प्रकारांतील वैषम्याचे स्वरूप तत्त्वतः एकदोषोद्‌भव वैषम्यासारखेच असल्याने हे सहा भेद एकदोषीय प्रकारांशी तुल्यरूप ठरू शकतात.

सन्निपाताच्या या १२ भेदांचे स्वरूप केवळ सन्निपातात्मक नाही, असे म्हणूनच वर म्हटले.

### ६४) रोगांत आढळणारी दोषविशिष्ट लक्षणे

स्थानादि भेदांना अनुसरून रोगांचे प्रकार अनेक असले तरी वातप्रकोपोत्पन्न रोगांत शोष आणि शूल ही लक्षणे प्रायः विद्यमान असतात तर पित्तप्रकोपजनित व्याधी प्रायः दाहकोथात्मक असतात. कफाच्या कोपातून उद्‌भवणाऱ्या रोगांत [निरनिराळ्या विकारांत त्यांतील दोषांच्या न्यूनाधिक्याला अनुसरून या शूलादिकांच्या व्यतिरिक्त अन्य लक्षणेही कित्येकदा प्रादुर्भूत होत असतात. उदा. वातकोपोत्पन्न विकारात कधी शोथ उद्‌भवतो तर कफोत्पन्न शोथात कधी शूलाचाही प्रादुर्भाव होतो. ही लक्षणे अर्थातच प्रधान नव्हेत.]. प्रायः शोथ आणि स्तंभ ही लक्षणे आढळून येतात.

### ६५) औषधांचे मुख्य प्रकार

औषधांचे मुख्य प्रकार दोनच–शोधन आणि दमन. काही औषधे विकारोत्पादक दोषांचे शोधन करतात तर काही त्यांचे शमन करतात. सर्व औषधांचा अंतर्भाव या दोनच प्रकारांत होऊ शकतो.

### ६६) शोधन आणि शमन यांचा विशिष्ट उपयोग

वातादि दोषांची वाढ अल्प प्रमाणात झाली असेल तर शमनाचा उपयोग करतात. या शमनाच्या सात प्रकारांचे विवरण पूर्वी करण्यात आले आहेच. दोषांच्या क्षीण अवस्थेत मात्र शमन चिकित्सा करीत नाहीत. अशा वेळी बृंहण प्रशस्त मानले आहे. दोषांची वृद्धी अधिक प्रमाणात होते तेव्हा शोधनाचा उपयोग करावा. त्याच्या पांच प्रकारांची माहितीही पूर्वी देण्यात आली आहे.

अनुक्रमणिका

### ६७) वातादिकांचे शोधन आणि शमन

वायु, पित्त आणि कफ यांचे प्रमुख शोधन म्हणजे अनुक्रमे बस्ती, विरेचन आणि वमन. गोड, आंबट आणि खारट रस ज्यांत अधिक आहेत आणि जे स्निग्धोष्णगुणी आहे असे आहार्य वा औषधी द्रव्य तसेच स्नेहन आणि स्वेदन विधी यांच्या योगाने वायूचे शमन होते. गोड, कडू आणि तुरट रस असलेली आणि मंदशीतगुणी अशी आहारस्वरूप व औषधिद्रव्ये पित्ताचे शमन करतात. कफनाशक द्रव्ये रसाने तिखट आणि कडू, तसेच गुणाने रूक्ष, उष्ण आणि तीक्ष्ण असतात.

### ६८) वातादींची सर्वश्रेष्ठ शमन द्रव्ये

वायु, पित्त आणि कफ यांची सर्वश्रेष्ठ शमनद्रव्ये म्हणजे तेल, तूप आणि मध. अष्टांगहृदयात वाग्भटाचार्यांनी तसे सांगितलेही आहेच ['वाते पित्ते श्लेष्मशांतौ च पथ्यं तैलं सर्पिर्माक्षिकं च क्रमेण' । – अ. हृ.]. चरकाचार्य या संबंधात थोडे निराळे सांगतात. तेलादिकांची शमनकारिता प्रत्येकी दोन दोन दोषांना अनुसरून त्यांनी वर्णिलेली आहे. 'कफपित्तावरील सर्वोत्कृष्ट शमन म्हणजे मध, तूप हे वातपित्तांचे सर्वोत्तम प्रशमन आणि वातकफांचे सर्वश्रेष्ठ शमन द्रव्य म्हणजे तेल ['मधु श्लेष्मपित्तप्रशमनानाम्, सर्पिर्वातपित्तशमनानाम्, तैलं वातश्लेष्मप्रशमनानाम्' –च. सं.]', असे त्यांचे म्हणणे आहे.

### ६९) वातादींची सामान्य चिकित्सा

प्रकुपित झालेले वातादि दोष हेच सर्व रोगांना हेतुभूत असतात. 'दोष हेच सर्व रोगांचे एकमात्र कारण होय' ['दोषा एव हि सर्वेषां रोगाणामेककारणम्' । – अ. हृ.], असे अष्टांगहृदयात म्हटलेही आहे. त्यांचा उपशम करणे हेच चिकित्सेचे सर्वसामान्य स्वरूप. अशा चिकित्सेलाच हेतुविपरीत म्हणतात.

### ७०) विभिन्न स्थानी प्रकुपित झालेल्या वातादींचा उपशम

वातादि दोषांत उद्‌भवलेली विकृती जेव्हा एखाद्या आमाशयादि विशिष्ट स्थानाचा आश्रय करते तेव्हा ज्वर, गुल्म इत्यादि कोणत्या तरी विशिष्ट रोगाची उत्पत्ती होते. या विशिष्ट रोगाचा उपशम विशिष्ट प्रभावगुणयुक्त [विशिष्ट रोगाचा उपशम करणारा विशिष्ट गुण म्हणजेच प्रभाव]. औषधाकडूनच होऊ शकतो. हेतुभूत दोषाचा उपशम करणारे औषध अशावेळी कार्यक्षम होत नाही. अशा व्याधिविनाशक चिकित्सेलाच व्याधिविपरीत म्हणतात.

### ७१) स्वास्थ्य रक्षण करण्याचा उपाय–दोषांना सम स्थितीत ठेवणे

शरीराचे स्वास्थ्य सम स्थितीत असलेल्या वातादि दोषांच्याकडूनच राखले जाते. अर्थात् वृद्ध दोषांचे ऱ्हसन आणि क्षीण दोषांचे अभिवर्धन करून स्वास्थ्याला कारणीभूत होणारे दोषसाम्य सदैव सुरक्षित राखले पाहिजे. 'सम स्थितीत जे देहाच्या अभिवृद्धीला कारणीभूत होतात तेच वातादि दोष विषम स्थितीत देहाचा नाश घडवून आणतात. हितकारक आहारविहारांच्या योगाने, म्हणूनच, या वातादिकांना त्यांच्या क्षयवृद्धीपासून सदैव सुरक्षित ठेवावे', असा इषारा आचार्य वाग्भटांनी दिला आहे ['य एव देहस्य समा विवृध्यै त एव दोषा विषमा वधाय । यस्मादतस्ते हितचर्ययैव क्षयाद् विवृद्धेरिव रक्षणीयाः' । –अ.हृ.].———

अनुक्रमणिका

# सारांश (उत्तरार्ध)

प्रस्तुत ग्रंथाच्या उत्तरार्धात आतापावेतो पुढील विषयांचे प्रतिपादन मुख्यत्वे करण्यात आले :—

(१) वातादि दोषांची विशिष्ट स्थाने आणि त्यांचे आश्रय (२) स्थानभेदांनुसार संभवणारे त्यांचे कर्मभेद (३) वातादींचे प्रत्येकशः पांच भेद (४) या दोषभेदांची विशिष्ट स्थाने (५) दोषभेदांचे स्वरूप (६) दोषभेदांची विशिष्ट कर्मे (७) चलन, पचन आणि पोषण या दोषांच्या तीन स्वाभाविक क्रिया (८) तदनुसार शरीराच्या विविध स्थानांतील नानाविध कर्मांचे त्रैविध्य (९) पचन, उत्सर्जन आदि कर्मे आणि त्यांचे प्राधान्य (१०) नानाविध व्याधी आणि त्यांच्या विविध अवस्था यांना कारणीभूत होणारे तीन प्रकारचे क्रियावैषम्य (११) रसादि धातू आणि पक्वाशयादि स्थाने यांना अनुसरून संभवणारे रोगांचे नानाविध भेद (१२) चरकोक्त ८० वातविकार (१३) चरकोक्त ४० पित्तविकार (१४) चरकांनीच सांगितलेले २० श्लेष्मविकार (१५) दोषांचे संसर्ग (१६) दोषांचे सन्निपात (१७) संसर्गोद्भव आणि सन्निपातोत्पन्न व्याधी (१८) रोग अनेकविध असताही त्यांत सामान्यत्वाने संभवणारी शूल, दाह आणि शोथ ही प्रमुख लक्षणे (१९) रोगांतील दोषांच्य अनुबंधानुसार रोगलक्षणांत प्रत्यंतराला येणारे तारतम्य वा न्यूनाधिक्य (२०) वातादींचे शोधन करणारे बस्त्यादि उपाय (२१) दीपनपाचनादि शमनोपाय (२२) रोगचिकित्सेतील दोषानुबंध (२३) आहार्य आणि औषधिस्वरूप द्रव्यांच्या गुणवर्णनातील दोषानुबंध (२४) त्रिदोषविज्ञानातील विज्ञेय विषयांचे दिग्दर्शन.

हे सर्व विवेचन अर्थातच आयुर्वेदीय ग्रंथांतील विशेषतः चरकसुश्रुतवाग्भटप्रणीत ग्रंथांतील, अभिप्रायाला अनुसरूनच करण्यात आले आहे. किंबहुना, त्रिदोषविज्ञानासंबंधी चरकादिकांचा वास्तविक अभिप्रायच यथावत् स्वरूपात विशद करण्याचा प्रयत्न या प्रतिपादनातून करण्यात आला आहे.

———

अनुक्रमणिका

# उपसंहार

वातादि दोष हेच सम स्थितीत सर्व शारीर क्रियांना हेतुभूत होतात आणि विषमावस्थेत समस्त विकारांचे उत्पादकही तेच असतात. अविकृत आणि विकृत स्थितीतील वातादि दोष हेच याप्रमाणे शरीरातील सर्व क्रियांचे आणि विक्रियांचे प्रधान कारण होत. 'वायु, पित्त आणि कफ हीच शरीराची उत्पादक कारणे असून अविकृत स्थितीत त्यांच्याकडूनच शरीराचे धारण होते. तसेच विकृत झाले की तेच शरीराच्या नाशाला कारणीभूत होतात', असे सुश्रुताचार्यांनी या संबंधात म्हटले आहे ['वातपित्तश्लेष्माण एव देहसंभवहेतवः। तैरेवाव्यापन्नैः … … शरीरमिदं धार्यते । … … त एव च व्यापन्नाः प्रलयहेतवः । ' – सु. सं.]. 'सर्व शरीरात संचार करणारे वातपित्तकफ अकुपित स्थितीत शरीराला शुभकर असतात पण कुपित झाले की तेच अशुभकर होतात; पुष्टी, बल, वर्ण, प्रसाद, इत्यादि शुभ कर्मे प्रकृतिभूत दोषांकडून होत असतात तर विकृत दोषांकडून विकारसंज्ञक अशुभ कर्मे घडून येतात', अशा शब्दांत चरकाचार्यांनीही उपरिनिर्दिष्ट अभिप्रायच व्यक्त केला ['सर्वशरीरचरास्तु वातपित्तश्लेष्माणः सर्वस्मिन् शरीरे कुपिताकुपिताः शुभाशुभानि कुर्वन्ति । प्रकृतिभूताः शुभानि उपचयबलवर्णप्रसादादीनि, अशुभानि पुनर्विकृतिमापन्ना विकारसंज्ञकानि ।' – च. सं.] आहे.

अर्थात् स्वस्थांच्या स्वास्थ्यरक्षणासाठी आणि रुग्णांच्या रोगपरिहारासाठी हितकर होणाऱ्या ज्या गोष्टी आयुर्वेदीय ग्रंथांत विवेचिण्यात आल्या आहेत त्यांचे सम्यक् ज्ञान होण्याच्या दृष्टीने चिकित्सकांनी प्रथमतः वातपित्तकफांचे स्वरूप यथावत् रीतीने समजून घेणे अवश्य होय. स्वस्थ आणि आतुर या दोघांच्याही शरीरांतील सर्व कर्मांचे कर्तृत्व या वातादिकांच्याकडेच असते. त्यांचे ज्ञान चिकित्सकाला जेव्हा यथावत् होईल तेव्हाच स्वस्थ आणि रोगी यांचे हित तो सुयोग्य प्रकारे साधू शकेल.

स्वस्थांना आणि रुग्णांना त्यांच्या हिताचे दर्शन घडविणे हे आयुर्वेदाचे साध्य. ते सिद्ध होण्यासाठी हे **शारीर तत्त्वदर्शन**ही एक साधन होवो, इतकीच शेवटी अपेक्षा.

———

अनुक्रमणिका

# निष्कर्ष

**प्रास्ताविक**

१) पुरुषार्थ हे पुरुषाचे साध्य असून त्यासाठी स्वास्थ्यसाधन अवश्य.

२) हे स्वास्थ्यसाधन आयुर्वेदाने साधते म्हणून आयुर्वेदाचे सम्यक् ज्ञान असणे अवश्य.

३) आणि शरीराचे सर्व प्राकृत–वैकृत व्यापार, शरीरात संभवणारे विविध विकार, त्यांचे शमनोपाय व त्यांत योजण्याची औषधे या संबंधीचे सर्व विवेचन आयुर्वेदात त्रिदोषानुरोधाने केलेले असल्यामुळे आयुर्वेदाला तत्त्वरूप असलेल्या आणि शरीराला हेतुभूत असलेल्या वातपित्तकफांचे ज्ञान होणे अवश्य.

**दर्शन १**

१) पांच महाभूते व सहावी चेतना यांच्यापासून बनलेल्या शरीराची दोष, धातू व मल ही मूलद्रव्ये किंवा उपादानकारणे होत.

२) दोष, धातू, व मल शरीरात सतत व सर्वत्र विद्यमान असतात. या तिघांतच शरीरातील यच्चयावत् वस्तूंचे वर्गीकरण होऊ शकते.

३) शरीराला दूषित करतात ते दोष, धारण करतात ते धातू व मलिन करतात ते मल, असा या शब्दांचा धात्वर्थ असला तरी आयुर्वेदात या संज्ञा विशिष्ट अभिप्रायाने योजलेल्या आहेत.

४) वातादि दोष शक्तिरूप असून शरीरातील सर्व क्रियांचे ते कारक होत. रसादि धातू द्रव्यरूप असून आकृति–रूपाने ते शरीराचे धारण करतात. शकृदादि मल म्हणजे धातूंचेच सत्त्वहीन अंश असून अवष्टंभादि क्रियांच्या योगाने तेही शरीराचे धारक आहेत.

५) दोष, धातू व मल हे तीनही आपापल्या परीने देहधारक असल्याने त्या सर्वांना 'धातू' म्हणून संबोधणे शक्य आहे. तथापि, त्यांच्या धारणकर्मांत भेद आहे आणि तो स्पष्ट होण्यासाठीच त्यांना संज्ञा पृथक् योजण्यात आल्या आहेत.

६) दोष, धातू व मल या 'स्वसंज्ञा' आहेत. केवळ धात्वर्थानुसार निरनिराळ्या द्रव्यांना अवस्थाभेदानुसार त्या योजू नयेत. दोष, म्हणजे वातादि, धातू म्हणजे रसादि व मल म्हणजे शकृदादि, हा त्यांतील तत्त्वार्थ स्वीकार्य व व्यवहार्य मानणे शरीरज्ञानासाठी अवश्य होय.

**दर्शन २**

१) शरीराचे मुख्य विभाग दोन : एक द्रव्य व दुसरा शक्ती. द्रव्य हे धारक व व्यक्तस्वरूप असून शक्ती ही कारक व अव्यक्तस्वरूप असते.

२) हे दोन विभाग अविभाज्य व परस्पराश्रयी असल्याने द्रव्य व शक्ती या संज्ञा 'प्राधान्येन व्यपदेश' या न्यायाने तारतम्यानुसार योजण्यात येतात.

३) शरीरान्तर्गत शक्तीच्या तारतम्यानुसार शक्त्युत्कर्षसंपन्न, मध्यम शक्तीने युक्त व अत्यल्प शक्तीने युक्त असे शारीरद्रव्यांचे त्रिविध वर्गीकरण होत असून या तीन विभागांनाच आयुर्वेदात दोष, धातू व मल या संज्ञा योजलेल्या आहेत.

अनुक्रमणिका

४) पृथिव्यादि पंचमहाभूते जीवसृष्टीचे उपादान होय आणि जीवन म्हणजे उत्पात्त्यादि क्रियांची क्रमशः अनुवृत्ती. पदार्थांची उत्पत्ती व वृद्धी पृथिव्यादिकांच्या परमाणुसंयोगामुळे होते आणि त्यांचाच वियोग झाला की पदार्थ क्षीण व नष्ट होतात. शरीरातील प्रत्येक अवयवात ही उत्पत्तिविनाशात्मक क्रिया अविरत सुरु असते व म्हणून क्रांतिशीलता ही जिवंत शरीराची नित्यावस्था होय.

५) संग्रह, पचन व उत्सर्जन हे शरीरातील सर्व क्रियांचे प्रमुख भेद असून त्यांचे कर्तृत्व ज्यांच्याकडे असते त्या सूक्ष्म व शक्तिरूप अशा धातुघटकातील अंतर्निष्ठ अंशांनाच दोष म्हणतात. श्लेष्मा, पित्त व वायू हे त्यांचे कार्यभेदानुसार संभवणारे प्रकार होत.

६) शरीराचा जो 'द्रव्य' संज्ञक दुसरा विभाग असतो त्यातच पचनादि सर्व क्रिया होत असतात. उत्पत्त्यादि अवस्था तोच अनुभवीत असतो व शक्तीचे अधिष्ठानही तोच असतो. उत्पद्यमान अवस्थेत असणारा क व क्षीयमाण अवस्थेत असणारा दुसरा, असे त्याचे दोन विभाग असून त्यांनाच धातू व मल म्हणतात.

७) स्वतःच्या विशिष्ट स्वरूपानुसार शरीराचे धारण करणारे रसरक्तादि धातू एकूण सात आहेत. दोष, मल, आकृतिविशेष, विविध कर्मे आणि अभिधाने या सर्वांना आश्रयस्वरूप असणाऱ्या या रसरक्तादि द्रव्यांचेच शरीरात एक प्रकारे प्राधान्य असून त्यांची 'धातू' ही संज्ञाही अन्वर्थक अशीच आहे. घन, द्रव व स्वेद असे त्यांचे प्रमुख भेद तीन संभवतात.

८) एकातून दुसरा याप्रमाणे रसादि धातूंची उत्क्रांती होत असताना त्यातून जे निःसत्त्व अंश पृथक् होतात त्यांना 'मल' ही संज्ञा आहे. सात धातूंचे असे मलही सातच सांगितले असून त्यांचे सुद्धा घन, द्रव व स्वेद असे प्रमुख भेद तीनच संभवतात. शकृत्, मूत्र व स्वेद हे शब्द त्यांचेच वाचक आहेत.

९) हे शकृदादि अविकृतावस्थेत असले म्हणजे शरीराची जीवनयात्रा चालविण्याच्या कामी उपकारक होतात. परंतु त्यांची प्रमाणाबाहेर वाढ झाली म्हणजे मात्र धातुघटकांना सुरक्षित राखण्याऐवजी ते मलिन करतात, व म्हणूनच देहमूलक असताही त्यांना 'मल' ही संज्ञा देण्यात आली आहे.

**दर्शन ३**

१) चेतनाधिष्ठित पंचभूतविकारांचा समुदाय म्हणजे शरीर, पृथ्वी, अप्, तेज, वायू, आकाश व चेतना ही सहा तत्त्वे शरीरात भावरूपाने सदैव विद्यमान असतात.

२) पदार्थमात्राची उत्पत्ती घनद्रवादि द्रव्यांच्या एकीभावापासूनच होत असते. आणि त्यात घडणारी पचनादि कर्मेही या एकीभावापासूनच संभवत असतात. या सर्वांत चेतना हीच आद्य प्रेरक असते.

३) प्रत्येक नामारूपात्मक सृष्ट पदार्थात पृथ्वीतत्त्व अधिष्ठानभूत असल्याने यच्चयावत् सृष्ट पदार्थ हे पार्थिवच असतात तथापि पार्थिव, आप्य, तैजस, वायवीय, आकाशीय, असा जो त्यांचा निर्देश करण्यात येतो तो त्या त्या पदार्थातील पथिव्यादींच्या आंशिक आधिक्याचाच वाचक असतो.

४) पृथिव्यादि भूतचतुष्टयापैकी सर्वात स्थूलस्वरूप तत्त्व म्हणजे पृथ्वी. आकर्षकत्व हा तिचा गुण असून पदार्थविज्ञानात त्यालाच 'गंध' म्हणतात.

५) वायू हे भूतचतुष्टयापैकी सर्वात सूक्ष्म तत्त्व होय.संयोगवियोगात्मक सर्व कर्माचे कर्तृत्व प्रामुख्याने त्याच्याकडेच असते. चलनात्मकता या त्याच्या गुणालाच पदार्थविज्ञानात 'स्पर्श' म्हणतात.

६) अप्तत्त्वाचे शीतस्पर्शवत्त्व व तेजाचे उष्णस्पर्शवत्त्व म्हणजे अनुक्रमे संयोजक व वियोजक गुण असून हे संयोगवियोग चलनाचे अथवा गतीचेच दोन प्रकार होत. आकर्षणरूप गती म्हणजे संयोग व अपकर्षणरूप गती म्हणजे वियोग.

७) सूक्ष्म भूतविकारांशांच्या संयोगापासून पदार्थाची उत्पत्ती व वृद्धी होते आणि वियोगामुळे ऱ्हास व विनाश होतो. शरीरांतर्गत पदार्थांचे म्हणजे रसादि धातूंचे उत्पत्तिविनाशही संयोगवियोगात्मक असतात.

८) १. उत्पादक परमाणूंचे संयोजक अथवा मीलन २. संमीलित परमाणूंचे रसीभवन किंवा द्रवावस्थेत विलयन ३. रसीभूत परमाणूंचे पचन किंवा सारकिट्टविवेचन आणि ४. मलरूप अंशांचे उत्सर्जन, या पदार्थांच्या उत्पत्तिविनाशांतील क्रमावस्था होत. जिवंत शरीरात हे उत्पत्तिविनाशात्मक कार्य या क्रमाने अव्याहत सुरु असते. या क्रमसातत्यालाच जीवन म्हणतात.

९) शारीर द्रव्यांच्या उत्पत्तिविनाशाला अशाप्रकारे संश्लेषण, पचन, व वियोजन या तीनच क्रिया मुख्यतः साधनीभूत होत असतात, आणि त्या ज्यांच्यामुळे होतात त्या दोषसंज्ञक सामर्थ्यसंपन्न व सूक्ष्म द्रव्यांनाच आयुर्वेदात अनुक्रमे श्लेष्मा, पित्त व वायू अशा संज्ञा देण्यात आल्या आहेत.

**दर्शन ४**

१) शरीराचा अत्यंत सूक्ष्म घटकही षड्धातुक असतो. विशिष्टाकृतिमत्त्व, चैतन्य, आदि धर्म पृथिव्यादि तत्त्वांपासून त्याच्या ठिकाणी उत्पन्न होतात.

२) रजस्तमोयुक्त पुरुष म्हणजे जीवात्मा हा सर्व शारीर क्रियांचा मुख्य प्रेरक असतो. ही प्रेरणा म्हणजे चैतन्य. ते विद्यमान असणे म्हणजे सजीवित्व व त्याचा अभाव म्हणजे अजीवित्व.

३) पार्थिवादि अंशांच्या समुदायापासून बनलेला शरीराचा आद्य अवयव आहारादिकांतून प्राप्त होणाऱ्या पार्थिवादि अंशांनी परिपुष्ट होतो. एकूण सर्व शरीराची अभिवृद्धी अशीच होते. आणि ही वाढ वृद्धिकर पदार्थ अमर्याद असताही विशिष्ट मर्यादेपर्यन्तच होऊ शकते.

४) केवळ वाढच नव्हे तर वृद्धी, विकास, उत्क्रांती, विशिष्टाकृतिमत्त्व, सामर्थ्य व आयुर्मान या सर्वच बाबतीत सृष्ट पदार्थ प्रतिनियत असतात.

५) विशिष्ट आकारात वाढ पूर्ण झाली की, शारीर अवयव व रसरक्तादि धातू संततिरूपाने वाढू लागतात. स्वभिन्न पदार्थाची स्वीय अंशांपासून होणारी स्वसमान उत्पत्ती म्हणजे संतती.

६) रसरक्तादि सात धातू शुद्ध आहारापासून उत्पन्न होतात. रसापासून रक्त, रक्तापासून मांस याप्रमाणे रस, रक्त, मांस मेद, अस्थी, मज्जा व शुक्र या क्रमानुसार त्यांची उत्पत्ती होत असते. रस, रक्त या त्यांच्या संज्ञाही स्वरूपबोधक अशाच आहेत. हे सातही धातू शरीराच्या आद्य घटकात प्रथमपासून सूक्ष्म स्वरूपात विद्यमान असतात आणि आहारोत्पन्न रसापासून त्यांची वाढ होते.

७) आहाराचा शुद्धतर रस म्हणजे रक्त. त्यापासून 'मांस' हा व्यक्तरूप पदार्थ उत्पन्न होतो. तसेच रसादि धातूंचा शुद्धतर रस म्हणजे शुक्र. त्यापासून व्यक्तरूप गर्भाची उत्पत्ती होते.

अनुक्रमणिका

१) शुक्रार्तवसंयोग हे शरीराच्या आरंभक अवयवाचे बीज असून शरीराची वृद्धी, विकास व उत्क्रांती तदनुरोधानेच होत असते.

२) रसरक्तादि सात धातूंपैकी मांस, व अस्थी हे उत्पाद्य असून उर्वरित पांच उत्पादक असतात. मांसास्थींत मूर्तत्व सामान्य आहे तर बाकीच्या पांचांत अमूर्तत्व सामान्य आहे.

३) शरीराप्रमाणे शरीराचा प्रत्येक सूक्ष्म घटकही सप्तधातुक असतो.

४) आहाररसापासून क्रमशः उत्पन्न होणाऱ्या रसादि धातूंत उत्तरोत्तर अधिकाधिक निर्मलत्व व चिरविनाशित्व उत्पन्न होत असते. याच प्रक्रियेनुसार एक महिन्याने आहाररसाचे शुक्र (अथवा आर्तव) बनते.

५) पोष्य-पोषक अंशांचा प्रथम समागम होणे व शेवटी सारकिट्टविभाजन होणे हा धातूत्पत्तीतील क्रम आहे. धातूत्पत्तीला धातूंचेच जे अंश कारणीभूत होतात ते प्रसादसंज्ञक अंश असून त्यांचेच विनाशोन्मुख निःसत्त्व अंश म्हणजे मलाख्य अंश होत. त्यांनाच अनुक्रमे दोष व मल म्हणतात.

६) शारीर द्रव्यांच्या निर्मितीत संयोजन, विभाजन व वियोजन या त्रिविध सामर्थ्याची आवश्यकता असते. हे सामर्थ्य शरीरात ज्यांच्या ठिकाणी असते ती सामर्थ्योत्कर्षसंपन्न द्रव्ये म्हणजेच अनुक्रमे श्लेष्मा, पित्त व वायू हे त्रिदोष होत.

७) प्रत्येक देह सप्तधातुक असतो. याला स्त्रीदेहही अपवाद नाही. मात्र त्यात गर्भोत्पादक शुक्रधातूऐवजी गर्भसंवर्धक आर्तव असते. अर्थात् स्त्रीदेहातही देहव्यापी अवयोत्पादक शुक्र असतेच.

८) पुरुष हा उत्पादनाकांक्षी असतो तर स्त्री संवर्धनकांक्षिणी असते. पुरुषदेह आकाराने व संततिरूपाने वाढत असतो तर स्त्रीदेह केवळ आकारातच वाढत असतो.

९) शरीराच्या शुक्रार्तवसंयोगरूपी बीजात अन्य शरीरोत्पादक सामर्थ्य असेल तर त्या बीजापासून होणारा गर्भ पुरुषदेहधारी होतो आणि तसे सामर्थ्य नसेल तर तो स्त्रीदेहधारी होतो.

१०) शारीर पदार्थात प्रमुख भेद दोन संभवतात— १) शक्ती व २) द्रव्य. उत्पादक वस्तू शक्तिरूप व उत्पत्तीला सहायभूत होणारी द्रव्यरूप. पुरुष व स्त्री ही नांवे अनुक्रमे त्यांना योजता येतील.

११) परंतु ज्यात उत्पादक अथवा संवर्धक अशा दोनही प्रकारचे सामर्थ्य नसते असाही शारीरद्रव्यांचा एक प्रकार संभवतो. त्या द्रव्याला व तदुत्पन्न शरीराला नपुंसक म्हणतात.

१२) शरीराप्रमाणे शारीर घटकातसुद्धा (१) उत्पादनक्षम, शक्तिरूप (२) संवर्धनक्षम, द्रव्यरूप व (३) उभयविध सामर्थ्याचा अभाव असणारा शक्तिहीन द्रव्यरूप असे तीन प्रकार असून यांनाही अनुक्रमे पुरुष, स्त्री व नपुंसक अशा संज्ञा योजता येण्यासारख्या आहेत.

१३) शरीराच्या उत्पादनक्रियेत दोष हे उत्पादक किंवा कारक असून धातू साहाय्यक किंवा संवर्धक असतात. मलांत मात्र हे दोनही प्रकारचे सामर्थ्य नसते. दोष, धातू व मल यांनाही अनुक्रमे, पुरुष, स्त्री व नपुंसक या संज्ञा म्हणूनच योजता येण्यासारख्या आहेत.

अनुक्रमणिका

**दर्शन ६**

१) पुरुषशरीराची वाढ पूर्ण झाल्यानंतर त्याचे देहोत्पादक बीज स्त्रीच्या गर्भाशयात प्रविष्ट झाले की तिच्या आहाररसातून मिळणाऱ्या पोषक अंशांनी ते विकसित होते. व हा विका सपूर्ण झाला की नवीन देह धारण करून जन्माला येते. वृद्धी, विकास व उत्क्रांती हे याप्रमाणे अभिवृद्धीचेच तीन प्रकार होत.

२) अवयव उत्पन्न होणे, आहारातून मिळणाऱ्या पोषक अंशांनी त्याची वाढ होणे व ती पूर्ण झाली की त्याच्यापासून विभक्त झालेल्या घटकांकडून पुनश्च नवीन अवयव निर्माण होणे हा क्रम सजीव शरीरात अविरत सुरु असतो.

३) शरीर ही एक समुदायात्मक वस्तू आहे. शरीराचे स्थूल अवयव सूक्ष्म अवयवांच्या समुदायांपासून व सूक्ष्म अशा असंख्य परमाणूंच्या समुदायांपासून बनलेले असतात. स्थूल अवयवांच्या समुदायालाय शरीर म्हणतात.

४) मांस व अस्थी हे दोनच धातू शरीरात मूर्त किंवा स्थिरस्वरूप असून त्यांच्यामुळेच सर्व लहानमोठ्या अवयवांत स्थिरत्व उत्पन्न होत असते.

५) परंतु, मांसास्थिमय असले तरी सर्व अवयव आकाराने व स्वरूपाने सारखेच नसतात आणि ते ज्या सूक्ष्म घटकांच्या समुदायांपासून बनलेले असतात त्यांची आकारभिन्नता त्याला कारण असते.

६) विशिष्टाकृतिमत्त्व येणे म्हणजे सृष्टी किंवा उत्पत्ती व हे मूर्तत्व नष्ट होणे म्हणजे विनाश. व्यक्तत्व व व्यक्तत्व हे या उत्पत्तिविनाशांचेच पर्याय होत.

७) शरीरातील आद्य सृष्टी म्हणजे मांस व अंतिम सृष्टी म्हणजे अस्थी. शरीरगत उत्पत्तीला अस्थीत परिणतावस्था प्राप्त होते.

**दर्शन ७**

१) बाल्य, तारुण्य व वार्धक्य या शरीराच्या तीन अवस्था आहेत. शारीर अवयव बाल्यात अविकासित असतात, तारुण्यात पूर्ण विकसित होतात व वार्धक्यात क्षीण होऊ लागतात. बालवयात उत्पादक सामर्थ्य अधिक प्रमाणात असते. तारुण्यात त्याला इतिकर्तव्यता प्राप्त होते व वृद्धावस्थेत ते क्षीण होऊ लागते. ते सर्वस्वी लुप्त झाले की शरीर नष्ट होते.

२) या बाल्यादि अवस्था शरीराप्रमाणे शरीराचा प्रत्येक सूक्ष्म घटकही उपभोगीत असतो. आणि हे घटक ज्या रसरक्तादिपासून तयार झालेले असतात त्यांची उत्पत्ती व वृद्धी अविरत होण्यावरच शारीर घटकांची व शरीराची अभिवृद्धी अवलंबून असते.

३) रसरक्तादि धातूंत एकप्रकारे पोष्यपोषक संबंध असतो. या सातांपैकी मांस व अस्थी या दोघांत घनत्व जसे वाढत्या प्रमाणात असते तसेच बाकीच्या पांच द्रव धातूत निर्मलत्वही उत्तरोत्तर अधिकाधिक प्रमाणात असते. या द्रव धातूंत उत्पादक सामर्थ्याचाही उत्तरोत्तर उत्कर्ष दिसून येतो. मात्र म्हणूनच त्यांचे परिमाण उत्तरोत्तर कमी होत जाते.

४) शारीरधातूंत जे स्थित्यंतर अविरत होत असते ते संयोगवियोगात्मक कर्मामुळे होत असून त्यात शीत व उष्ण हे गुण साधक असतात. सर्व कर्मभेदांचा संयोगवियोगांत व सर्व गुणभेदांचा शीत व उष्ण या दोघांत अंतर्भाव होऊ शकतो.

अनुक्रमणिका

५) सर्व सृष्ट पदार्थांचे वर्गीकरण द्रव्य, गुण व कर्म या तिघांतच करता येण्यासारखे आहे. अधिष्ठानभूत वस्तूला द्रव्य म्हणतात, चलनात्मकता हे कर्माचे स्वरूप असते आणि द्रव्याच्या आश्रयाने राहणाऱ्या कार्यकारी सामर्थ्याला गुण म्हणतात.

**दर्शन ८**

१) संयोगवियोगात्मक कर्माचे जे कारक गुण त्यांनाच आयुर्वेदात 'वीर्य' म्हणतात. या वीर्याचे एकूण भेद आठ आहेत. त्यांपैकी शीत व उष्ण हे प्राधानकारणरूप, स्निग्ध व रूक्ष हे कार्यरूप आणि गुरु, मृदू, तीक्ष्ण व लघु हे कार्यलक्षणरूप होत.

२) या आठ गुणांशिवाय आणखी बारा गुणांचे वर्णन आयुर्वेदात केलेले आहे. हे गुण म्हणजे स्निग्ध व रूक्ष यांचेच तरतमभावसूचक असे लक्षणात्मक गुण होत.

३) या एकूण वीसही गुणांत शीत व उष्ण हे दोनच गुण प्रधान असून त्यांचा निर्देश 'प्राधान्येन व्यापदेशः' या न्यायाने करण्यात येतो.

**दर्शन ९**

१) द्रव्य व गुण यांत आधाराधेयत्व असून गुण हे द्रव्याश्रयानेच अभिव्यक्त व कार्यकारी होतात.

२) कार्यानुमेय असलेल्या गुणांना पंचभूतांचे सूक्ष्म अंश आश्रयभूत असून स्थूल अंशांच्या ठिकाणी त्यांचा अनुभव येत असतो. पंचभूतविकार म्हणजेच गुण होत असा आयुर्वेदाचा अभिप्राय दिसतो. 'वीर्य' ही संज्ञा आयुर्वेदात या गुणांनाच दिलेली आहे.

३) पंचभूतोत्पन्न द्रव्यांत पंचभूतांचा संयोग भिन्न भिन्न प्रमाणात होत असल्याने गुणभेद व कर्मभेद आढळून येतो. तथापि, संयोग व वियोग या दोघांत सर्व कर्मभेदांचा आणि शीत व उष्ण या दोघांत सर्व गुणभेदांचा अंतर्भाव होऊ शकतो.

४) स्निग्धादि गुणांचे स्वरूप थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे-शीतत्त्व हा अप्तत्त्वाचा व उष्णत्व हा तेजाचा गुण आहे. पृथ्वी व अप् या दोन तत्त्वांच्या आधिक्यामुळे स्निग्धत्व उत्पन्न होते तर तेज व वायू यांच्या आधिक्यामुळे रूक्षत्व निर्माण होते. स्थूलत्व, स्थिरत्व व गुरुत्व हे स्निग्ध गुणाचे, तर सूक्ष्मत्व, चलत्व व लघुत्व हे रूक्ष गुणाचे लक्षणरूप गुण होत. स्थूलत्वादींचा परिणाम म्हणून पदार्थांच्या ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या चिरकारितेला मंदत्व म्हणतात तर सूक्ष्मात्वादींच्या परिणामरूपी आशुकारितेला व्यवायित्व म्हणतात. मंदत्व हे स्थिरत्वाचे व व्यवायित्व हे चलनगुणाचे आधिक्य होय. उष्णत्व हा तेजाचा गुण वायुगुणाशी संयुक्त झाला की, त्यालाच तीक्ष्णत्व म्हणतात. विकासित्व ही याचीच आधिक्यसूचक अवस्था होय. पृथ्वी, अप्, व तेज या तिघांच्या संयोगापासून द्रवत्व निर्माण होते. सरत्व हे त्याचे लक्षण आहे. द्रवत्व ईषद्घन असले म्हणजे त्यालाच सांद्रत्व म्हणतात. द्रवसंयुक्त तीक्ष्णतेला विस्रता असे नाव आहे. वैशद्य ही सूक्ष्मगुणाचीच एक अवस्था असते. आणि रूक्षत्व असताही मृदुस्पर्श असणे याला श्लक्ष्णत्व म्हणतात.

५) संयोजन, विभाजन व वियोजन हे सर्व शारीर क्रियांचे मुख्य प्रकार असून या तीन क्रियांचे कर्तृत्व ज्यांच्याकडे असते त्या तीन प्रकारच्या गुणसमुदायांनाच श्लेष्मा, पित्त व वायू अशा संज्ञा आहेत.

अनुक्रमणिका

**दर्शन १०**

१) स्निग्धादि दहा गुणांचा समुदाय म्हणजे श्लेष्मा, तीक्ष्णादि गुणत्रयी म्हणजे पित्त व रूक्षादि गुणसप्तक म्हणजे वायू.

२) दोष-गुण व गुणसंग्रहोक्त गुण याप्रमाणे आयुर्वेदीय ग्रंथांत गुणवर्णन दोन प्रकारे करण्यात आले असून त्यांत संख्याभेदही आढळतो. तथापि प्राधान्याने स्निग्धत्व व शीतत्त्व हे कफाचे, उष्णत्व व द्रवत्व हे पित्ताचे आणि रूक्षत्व व सूक्ष्मत्व हे वायूचे स्वरूप असून तदनुरोधाने संग्रहोक्त गुणांचा दोषगुणांत अंतर्भाव होऊ शकतो.

३) पृथिव्यादि महाभूतांचे नित्य व अनित्य असे प्रत्येकी प्रकार दोन संभवतात. (आकाश याला अपवाद आहे)./: 'नित्य''संज्ञक अंश अविनाशी, सूक्ष्म व शक्तिसंपन्न असतो तर 'अनित्य' हा विनाशी, स्थूल व शक्तिविहीन असतो. सृष्ट द्रव्ये ही अनित्यसंज्ञक अंशांची विकाररूपे आहेत तर गुण हे नित्याश्रित शक्तीचे विकार होत. गंधरसादि स्वाभाविक गुण पंचभूताश्रयी असतात तर स्निग्धरूक्षादि संयोगजन्य गुण भूतसंघाताश्रयी असतात.

४) सृष्ट पदार्थांतील उत्पत्ति–विनाश त्यांच्या अनित्यभूतांशोत्पन्न भागांत होत असतात आणि 'नित्य' संज्ञक भागाच्या आश्रयाने कार्यसाधक गुण निवास करीत असतात. स्निग्धादि गुण व तत्समुदायरूपी वातादि दोष हे शारीरद्रव्यांच्या सूक्ष्म अंशांच्या आश्रयानेच राहत असतात.

५) दोष केवळ द्रव्यरूपही नव्हेत वा केवळ शक्तिरूपही नव्हेत. ते गुणरूप होत. गुण म्हणजे शक्तिविशेष व हे वैशिष्ट्य द्रव्यानुबंधाने येते. अर्थात् शरीरातील शक्त्युत्कर्षसंपन्न पण सूक्ष्म असे द्रव्य म्हणजे दोष.

६) पृथिव्यादि महाभूतांचे स्वाभाविक गुण प्रत्येकशः भिन्न असतात. त्यांचा व तदाश्रयी भूतांचा जेव्हा संयोग होतो तेव्हा स्निग्धादि गुणांची व तदुत्पन्न सृष्ट द्रव्यांची उत्पत्ती होते.

७) पृथ्वी व अप् या दोन भूतांच्या आणि गंध व रस या तदाश्रित गुणांच्या संयोगापासून स्निग्ध–गुणांची व नंतर त्यामुळे शारीर द्रव्यांची निर्मिती होते. संयोजक श्लेष्मा स्निग्धगणप्रधान असून तोही भूजलसंयोगोद्‌भवच असतो.

८) कफाप्रमाणे विभाजक पित्त व वियोजक वायू हे दोषही भूतसंयोगोद्‌भवच होत. शरीरस्थ पित्त तेजःप्रधान असले तरी द्रवत्वानुविद्ध असते व वायूही केवळ वायुस्वरूपच नसतो तर अप्संयुक्त अथवा शीतगुणान्वित असतो.

**दर्शन ११**

१) पंचमहाभूते ही सृष्टीची उपादन कारणे असून त्यांचा आंशिक संयोग विभिन्न प्रमाणात व स्वरूपात होत असल्याने सृष्टीतही भिन्नता आढळते.

२) पंचभूते स्वभावतः जड असतात. त्यांपासून विविध प्रकारची सृष्टी जी निर्माण होते ती तदाश्रित चेतनांशामुळे. हे चैतन्य अनुमेय असते.

३) पंचभूतांपैकी सूक्ष्मतम जो वायू त्याच्या ठिकाणी चैतन्य सर्वांत अधिक असते; तर पृथ्वीच्या ठिकाणी ते सर्वांत कमी असते. चैतन्याच्या न्यूनाधिक अस्तित्वावरूनच सृष्ट द्रव्यांना अचेतन वा सचेतन असे म्हणण्यात येते.

४) यच्चयावत् सृष्ट द्रव्यांचे वर्गीकरण शक्ती व द्रव्य या दोन विभागांत होऊ शकते. उत्पत्त्यादि विविध कर्मे ज्यामुळे घडून येतात तो विभाग म्हणजे शक्ती व ही कार्ये ज्याच्या आश्रयाने व

ज्यात घडून येतात तो विभाग म्हणजे द्रव्य. हे विभाग पूर्णपणे अन्योन्यनिरपेक्ष नसतात. ज्यात सामर्थ्य प्राचुर्याने व द्रव्य स्वल्पांशाने असते त्या विभागाला शक्ती व उलट प्रकार ज्यात असतो त्याला द्रव्य म्हणतात.

५) अन्य सृष्ट पदार्थांप्रमाणे मानवी देहाचेही प्रमुख विभाग वरीलप्रमाणे दोनच संभवतात. त्यांपैकी रसरक्तादि धातू हे द्रव्यस्वरूप व वातादि दोष हे शक्तिस्वरूप होत.

६) शरीरस्थ सामर्थ्य रसादि धातूंच्या सूक्ष्म भागाचा आश्रय करून राहते व अशा सामर्थ्यसंपन्न सूक्ष्म द्रव्यालाच सामर्थ्य किंवा शक्ती म्हणतात. आयुर्वेदीयांची 'दोष' ही संज्ञा त्याचीच वाचक आहे.

७) आहारादिकांमुळे वृद्धी, ऱ्हास आणि उत्क्रांती इत्यादि अवस्था रसादि धातूंत अनुभवास येतात. परंतु हे अवस्थांतर ज्यामुळे संभवते त्या दोषसंज्ञक अंतर्वर्ती सामर्थ्यात मात्र कोणतेच स्थित्यंतर होत नाही. त्याच्या प्रमाणात न्यूनाधिक्य होते इतकेच. शारीर द्रव्यांच्या, विविध अवयवांच्या व धीधैर्यादि गुणांच्याही वाढीत शरीराच्या या स्वाभाविक सामर्थ्यालाच महत्त्व असून 'सहज बल' या शब्दांनी चरकाचार्यांनी त्याचाच निर्देश केलेला आहे.

८) शरीराची जीवनयात्रा चालविणारे सामर्थ्य त्रिविध असते व तीन कर्मांचे प्रवर्तक असते. श्लेष्मा, पित्त व वायू या संज्ञा या सामर्थ्यभेदांना देण्यात आल्या असून त्या अनुक्रमे संयोजन, विभाजन व वियोजन या कर्मांच्या वाचक आहेत.

**दर्शन १२**

१) शरीराची जीवनयात्रा ज्याच्यावर अवलंबून असते. त्या वातपित्तकफांना आयुर्वेदात 'दोष' ही संज्ञा दिलेली आहे.

२) ही संज्ञा धात्वर्थानुसारी नाही तर पारिभाषिक आहे. कारण विकृत व अविकृत अथवा देहधारक व देहघातक या दोन्ही अवस्थांत वातादींना 'दोष' म्हणूनच संबोधले आहे. 'दोष' हा शद्ब योजावयाचा तो इतक्याच करिता की अविकृत अवस्थेत देहधारक असणारे वातादि विकृत झाले म्हणजे मात्र देहघातक होतात हे लक्षात असावे.

३) या दोषांचे कित्येकजण स्थूल व सूक्ष्म असे भेद कल्पितात. पण ते योग्य नाही. शरीराच्या अपरिसंख्येय अशा सुसूक्ष्म घटकांत सुद्धा नित्य व सर्वत्र विद्यमान असणारे दोष सूक्ष्मच होत.

४) दोष, धातू व मल हे सर्वच वस्तुतः देहधारक असले तरी त्यांच्या धारणकर्मात फरक आहे व तो स्पष्ट होण्यासाठीच या तीन भिन्न संज्ञा योजण्यात आल्या आहेत. एकूण शरीराची विभागणी या तिघांतच होऊ शकते. शक्तिरूप, शक्त्याश्रयरूप व शक्तिहीन असणाऱ्या या दोषधातुमलांना उत्पादक, उत्पाद्य व क्षीयमाण अशीही स्वरूपबोधक नावे योजता येतील.

**दर्शन १३**

१) वातादि दोष देहव्यापी असल्याने संयोजन, विभाजन व वियोजन ही त्यांची कार्ये सर्व शरीरात अनुभवाला येतच असतात. तथापि, स्थानभेदांनुसार त्यांच्या स्वरूपांत फरक पडतो. त्यामुळे क्रियाकारी दोषांचेही तदनुसार भेद कल्पिण्यात आले आहेत.

अनुक्रमणिका

२) गती, पचन व पोषण या क्रिया सार्वत्रिक असल्या तरी त्यांचा अनुभव विशेषत्वाने विशिष्ट अवयवांच्या ठिकाणीच येतो. हे अवयव म्हणजेच वातादि दोषांची सांगण्यात आलेली पक्वाशयादि स्थाने होत. त्यांतही पक्वाशय हे वाताचे, ग्रहणी हे पित्ताचे व हृदय हे कफाचे प्रमुख स्थान होय. चलन, पचन, व पोषण ही कार्ये अनुक्रमे याच अवयवांत प्रामुख्याने घडून येतात.

३) शरीराच्या निरनिराळ्या अवयवांत राहणारे दोष धातुमलांचा आश्रय करून असतात. या आश्रयदशकापैकी अस्थी हे वायूचे, स्वेद व रक्त ही पित्ताची आणि उर्वरित सात ही कफाची आश्रयस्थाने आहेत.

४) वातादि दोष गुणसमुदायरूपी होत. त्यांचे हे स्वाभाविक गुण सर्व शरीरात सारखेच आढळत नाहीत. गुणांच्या या विविधतेमुळेच विविध प्रकारच्या कर्मांचा संभव होतो. पक्वाशयादि वाताची, ग्रहणी इत्यादि पित्ताची व हृदय वगैरे कफाची, म्हणून ज्यांचा निर्देश करण्यात आला आहे ती स्थाने म्हणजे या नानाविध गुणांचीच आश्रयस्थाने होत.

**दर्शन १४**

१) शरीरातील जीवनव्यापाराला साधनीभूत होणाऱ्या क्रियांना अनुसरून वातादि दोषांचे स्थानभेदाने प्रत्येकी पाच भेद संभवतात.

२) वातभेदांपैकी प्राण मस्तिष्कात राहतो. ज्ञानेंद्रियांना प्रेरणा देणे हे त्याचे प्रधान कार्य. उरोभाग व कंठ यांत चालणाऱ्या श्वसनादि क्रियांना तो साहाय्यकही होतो. तो सूक्ष्म असतो आमि मनोबुद्ध्यादींच्या अनुबंधामुळे त्याचे अनुमान करता येते.

३) उदान वायुफुफ्फुसात असतो. शारीर अवयवांना आपापली कार्ये करण्यात प्रयत्नशील व उत्साहसंपन्न राखून त्यायोगे बलशाली कार्यक्षम आणि कांतिपूर्ण राखणे हे त्याचे कार्य होय. श्वसनाकृष्ट बाह्य वायूमुळे त्याचे उपबृंहण होते.

४) हृदयस्थ व्यान रसधातूशी मिश्र होऊन सर्व शरीरात संचार करतो व निरनिराळ्या अवयवांतील सर्व क्रिया तोच घडवून आणतो. प्राण व उदान यांच्यापेक्षा तो सापेक्षतया स्थूल असतो.

५) प्रवृत्ती, वेग व आकुंचनप्रसरण ही एकाच गतीची तीन स्वरूपे, प्रकार अथवा अवस्था होत. चलनकर्तृक वायूचे भेदही तदनुसार तीन संभवतात. प्राण, उदान व व्यान या नावांनी त्यांचा निर्देश करताही येईल. प्राणादि त्रयीच्या क्रिया अशा प्रकारे परस्परानुविद्ध असल्याचे दिसून येते.

६) अन्नाचे ग्रहण करणे, पचन करणे, व त्यातील सारकिट्टांचे सम्यक् वियोजन करणे ही कार्ये समान वायूची होत. लघ्वंत्र हे त्याचे स्थान आहे.

७) अपानवायू अपानप्रदेशात राहतो. शुक्रार्तव, मलमूत्र, गर्भ आदींचे अभिवहन करणे हे त्याचे कार्य.

८) पित्तभेदांपैकी पाचक ग्रहणीत राहते. द्रवीभूत अन्नातील रसरूप सारांश व मलमूत्ररूप किट्टांश यांचे पृथक्करण करणे हे त्याचे प्रधान कार्य होय.

९) लघ्वंत्रातून आलेल्या अन्नरसात रंजकता निर्माण करून त्याला विशुद्धतर बनविणे हे रंजक पित्ताचे कार्य आहे. ते यकृत्प्लीहेत असते.

अनुक्रमणिका

१०) साधक पित्त हृदयात राहते. प्राणाशी सहकार्य करून प्रज्ञा, धारणा, अभिमान इत्यादींच्या योगाने त्या त्या इंद्रियांना ते विषय प्राप्त करून देण्यात ते साधनीभूत होते.

११) कनीनिका व त्वचा ही अनुक्रमे आलोचक व भ्राजक पित्ताची स्थाने होत. त्यांपैकी पदार्थमात्राचे रूप ग्रहण करणे हे आलोचकाचे व त्वचेचा वर्ण तेजस्वी राखणे हे भ्राजकाचे कार्य आहे.

१२) पित्ताचे प्रकार मूलतः दोनच संभवतात : द्रवरूप व अद्रवरूप, यकृत्, लघ्वंत्र इत्यादींतील पित्त द्रवरूप असते तर ग्रहणी मस्तिष्क इत्यादींतील अद्रवरूप असते.

१३) कफभेदांपैकी अवलंबक कफ हृदयात राहतो. अन्य कफस्थानांचे व समस्त शरीराचे स्निग्धशीतादि गुणांनी धारण करणे हे त्याचे कार्य होय.

१४) क्लेदक कफ अन्नाचे क्लेदन करतो तर बोधक कफामुळे जिभेवर टाकलेल्या द्रव्यातील मधुरादि रसांचा बोध होतो. आमाशय व रसनागात स्रोतसे ही या कफभेदांची अनुक्रमे स्थाने होत.

१५) ज्ञानेंद्रिये व मस्तक यांना प्रसन्न ठेवणे हे तर्पकाचे, तर सर्व संधिस्थाने सुश्लिष्ट राखणे हे श्लेषकाचे कार्य होय. तर्पक कफ मस्तकाच राहतो व श्लेषक कफ संधिस्थानांत असतो.

**दर्शन १५**

१) शरीराचे जीवन म्हणजे शारीर घटकांची उत्पत्ती, वाढ, विनाश, इत्यादि कर्मांचे सातत्य. आहारपचन, श्वसन, रसविक्षेपण, धातूंची अभिवृद्धी आणि धातुमलांचे वियोजन या क्रिया जीवनकर्माला साधनीभूत असून त्या ज्यांच्यामुळे संभवतात तेच वातादि दोष होत.

२) वरील क्रियापंचकाची निष्पत्ती, पचन, पोषण व उत्सर्जन या कर्मत्रयीपासून होते. हे त्रिविध कर्म आकुंचनप्रसरणामुळे संभवते. आणि आकुंचनप्रसरणाला चलन कारणीभूत होते.

३) सर्व कर्मांना आत्मभूत असणारे चलन हे स्वाभाविक संवेदनेमुळे संभवते. बाह्य स्पर्शाने अथवा अंतःप्रेरणेने तिचे उद्दीपन होते. नंतर संत्रावाहिनींतून ती संचार करू लागते. आणि विशिष्ट स्थानी तिचे आगमन झाले की तेथील स्नायूंत चलनाचा उद्भव होतो. तत्संबंध पेशीत त्यानंतर हालचाल उत्पन्न होते आणि त्याचा परिणाम म्हणून उत्सर्जनादि कर्मे घडून येतात.

४) या कर्मात पचनाचे महत्त्व विशेष आहे. ते ज्या स्थानांत घडून येते त्यांना पचनसंस्थान म्हणतात. मुख, आमाशय, लघ्वंत्र, ग्रहणी व पक्वाशय ही ती स्थाने होत. या स्थानांत राहणाऱ्या त्रिदोषांकडूनच आहाराचे क्रमशः पचन होते.

५) श्वसन ही पचनक्रियेइतकीच दुसरी महत्त्वाची क्रिया होय. नासिका, श्वासनलिका व फुफ्फुसे हे अवघड तिला साधनीभूत होतात. त्यांना श्वसनसंस्थान असे म्हणतात. या अवयवांचे आकुंचनप्रसरण अविरतपणे सुरु असते व म्हणूनच श्वसनात खंड पडत नाही. या क्रियेतील वायूचा संबंध स्पष्ट आहे.

६) पचन व श्वसन या दोन क्रियांप्रमाणे धातूंचे पोषणही दोषकर्तृकच असते.

७) तात्पर्य, शरीराच्या विभिन्न स्थानांत ज्या ज्या म्हणून क्रिया संभवतात त्या सर्वांचा अंतर्भाव चलन, पचन व पोषण या प्रमुख क्रियांत होतो. आणि या कर्मत्रयीचे कर्तृत्व अनुक्रमे वायू, पित्त व कफ यांच्याकडे असल्याने शरीरातील यच्चयावत् कर्मे त्रिदोषकर्तृक असतात, हे उघड होय.

## १६ दर्शन

१) दोषांच्या विकृतीमुळे शरीराच्या स्वाभाविक कर्मांत जी विकृती उत्पन्न होते तिचे प्रकार तीन संभवतात. ऱ्हास, वृद्धी व वैपरीत्य. हीनयोग, अतियोग व मिथ्यायोग ही नावे अनुक्रमे त्यांचीच वाचक आहेत.

२) दोषांच्या गुणकर्मांतील न्यूनाधिक्यतेमुळे अस्वास्थ्य उद्‌भवते, परंतु रोग निर्माण होण्यासाठी त्यांच्या गुणकर्मांत विपरीतताच उत्पन्न व्हावी लागते आणि त्यासाठी दोषांचा कोप व्हावा लागतो. आपले स्थान सोडून अन्यत्र गमन करण्याची प्रवृत्ती म्हणजे कोप.

३) विकार अगणित असले तरी वातकोपजनित, पित्तकोपजनित व श्लेष्मकोपजनित असे त्यांचे प्रमुख प्रकार तीन असून शूल, दाह, व शोथ ही लक्षणे या प्रकारांत अनुक्रमे प्रधान असतात. ही लक्षणे म्हणजे अनुक्रमे चलन, पचन व पोषण या स्वाभाविक क्रियांच्या विकृतीच होत.

४) वातादींना प्रकुपित करणाऱ्या द्रव्यांना आम ही संज्ञा असून आहार्य द्रव्ये आणि शारीर धातू यांतील अपाचित अंश म्हणजे ही आमद्रव्ये होत. आहार्य पदार्थांतील गुणधर्मांना अनुसरून वातप्रकोपण पित्तप्रकोपण व कफप्रकोपण असे प्रकार त्यातही आढळून येतात. या आमाचा उल्लेख विकृतिविज्ञानात दोष या नांवानेही करण्यात आला आहे.

५) आमयुक्त अथवा कुपित दोषांचा संचार सर्व शरीरात होत असला तरी स्थानवैगुण्यामुळे त्यांना जेथे अडथडा निर्माण होतो तेथीलच धातू दूषित व्हावेत आणि तेथेच रोगोत्पत्ती व्हावी असा नियम आहे.

६) संचित आमद्रव्याचा विशिष्ट स्थानातील धातूत प्रथम प्रवेश होतो, नंतर धातुघटकांपासून धात्वग्नीच्यां योगाने त्या द्रव्याचे पृथक्करण सुरु होते, आणि ही क्रिया पूर्ण झाली की शारीर धातूंपासून ते द्रव्य शेवटी पूर्णपणे वियुक्त होते. या अवस्थांनाच अनुक्रमे आमावस्था, पच्यमानावस्था व पक्वावस्था अशी नांवे असून प्रत्येक रोगात संभवणाऱ्या या अवस्थांतही श्लेष्मा, पित्त व वायू यांचा संबंध अनुक्रमे विद्यमान असतोच. वियुक्त झालेले आमद्रव्य मलमार्गाने वा व्रणमार्गाने नंतर उत्सर्जित होते व रोगाचा उपशम होतो.

## दर्शन १७

१) प्रकुपित दोषांपासून उद्‌भवणारे विकार असंख्य असले तरी स्पष्ट स्वरूपांत आविष्कृत होणारे वातविकार ८०, पित्तविकार ४० आणि कफविकार २० संभवतात, असे चरकाचार्य म्हणतात.

२) वायूच्या अस्वाभाविक प्रवृत्तीतून स्रोतसादिकांच्या ठिकाणी जी पीडा उद्‌भवते तिला शूल म्हणतात. हा शूल सर्व वातविकरांत सामान्यपणे विद्यमान असतोच.

३) वायूच्या स्वाभाविक गतीत जो अवरोध उद्‌भवतो त्याला संचय वा संकोच यांपैकी काही तरी एक कारण असते.

४) समस्त वातविकारांचे प्रमुख प्रकार दोनच संभवतात. संकोचरूप व स्तंभरूप. संकोचरूप विकारांत शूल प्रायः भासत नाही तर स्तंभरूप विकारांत तो बहुधा जाणवतोच. स्तंभरूप विकार शोथातून तर संकोचरूप विकार शोषातून उद्‌भवतात.

अनुक्रमणिका

५) पचनक्रियेच्या वैषम्यातून उद्‌भवणारे प्रायः सर्वच पित्तविकार दाहस्वरूप असतात. तथापि, त्यांपैकी काहींची उत्पत्ती दाहातून, काहींची कोथातून तर काहींची क्लेदातून होत असल्याने तदनुसार त्यांचे प्रकारही तीन संभवतात. आहार्य द्रव्ये आणि रसादि धातू यांच्या पचनात उद्‌भवणारी पित्तकोपजन्य विकृती म्हणजे दाह, धातुघटकांच्या ठिकाणी उद्‌भवणारी विनाशोन्मुख प्रवत्तीम्हणजे कोथ आणि मांसादि घनद्रव्यांतून त्यांतील द्रवांश पृथक् होणे म्हणजे क्लेद.

६) चरकसंहितेत जे २० कफविकार सांगण्यात आले आहेत, त्या सर्वात शैत्य, शारीर द्रव्यांचा अतिरिक्त संचय आणि अग्निमांद्य ही तीन लक्षणे क्वचित् समस्त तर क्वचित् व्यस्त रूपांत पण नित्य विद्यमान असताच.

७) वातोद्‌भव, पित्तोद्‌भव व कफोद्‌भव विकारांची अमुक्रमे ८०, ४०, २० ही चरकोक्त परिगणना कोणत्या तत्त्वानुसार करण्यात आली हे जसे स्पष्ट होत नाही, तसेच तीत निर्देशिलेली आविष्कृततततमता म्हणजे काय याचाही योग्य खुलासा होत नाही.

८) गती पचन, पोषण ही अनुक्रमे वातपित्तकफांची अविकृत वा स्वाभाविक कर्मे असून शूल, दाह, शोथ ही त्यांचीच विकृत वा अस्वाभाविक कर्मे होत. समस्त विकार या विकृतित्रयीतूनच उद्‌भवतात.

९) व्याध्युत्पादक दोष हे कारण एकच असले तरी स्थानादिकांच्या भिन्नतेनुसार तदुत्पन्न कार्ये म्हणजेच नानाविध रोग मात्र अनेक संभवतात. त्यांपैकी काही सुखसाध्य, काही कष्टसाध्य तर काही असाध्य असतात. प्रकुपित दोषांच्या बलाबलावरच ही साध्यासाध्यता अवलंबून असते.

१०) दोषांचा प्रकोप ज्यामुळे होतो त्या द्रव्यालाच अपथ्य म्हणतात. आहार, विहार, काल आणि मानसिक कर्म याप्रमाणे अपथ्याचे प्रमुख प्रकार चार संभवतात.

११) विकारोत्पादक प्रकुपित दोष सर्व शरीरव्यापी असतानाही विशिष्ट विकार मात्र शरीराच्या विशिष्ट ठिकाणीच उद्‌भवतो. स्थानिक वैगुण्य हे एक याला कारण असतेच. तथापि, आहारादि अपथ्यातील विशिष्ट गुणाचाही तो परिणाम होय. या गुणालाच प्रभाव म्हणतात.

१२) रोगाची उत्पत्ती केवळ दोषप्रकोपातून होत नाही. त्याच्या जोडीला शरीरातील रोगप्रतिकारशक्ती दुबळी व्हावी लागते.

**दर्शन १८**

१) वातादि दोषांच्या स्वाभाविक क्रियांतील वैषम्याला व्याधी म्हणतात.

२) शरिरगत धातूंचा आणि क्रियांचा ऱ्हास होणे हा परिणाम सर्व विकारांत घडून येतो.

३) दुष्ट दोषांचा प्रतिकार करण्याच्या कामी धातू स्वभावतः समर्थ असतात तेव्हा विकार साध्य असतात. तदभावी त्यांना असाध्यता प्राप्त होते.

४) शारीर धातूंचा ऱ्हास दोन कारणांनी घडून येतो. उत्पादनात अल्पता उद्‌भवते तेव्हा आणि धातूंचा ऱ्हासच अधिक होतो तेव्हा. पचनादि क्रियांतील वैषम्यामुळेच हे घडून येते.

५) वातादींच्या गत्यादि प्रमुख क्रियांना अनुसरून त्यांच्या विक्रियांतही त्रैविध्य संभवते. या विक्रियांनाच अनुक्रमे शोष, कोथ व क्लेद ही नांवे असून सर्व विकार त्यांतच अंतर्भूत होतात.

अनुक्रमणिका

६) धातूंच्या ठिकाणी उद्भवणाऱ्या शोषादि अवस्था कित्येकदा शोष, क्लेद, कोथ या क्रमानुसार तर अनेकदा हा क्रम सोडूनही उत्पन्न होऊ शकतात. विश्लेषणकारी कोथच धातुघटकांच्या विनाशाला मुख्यतः कारण होतो.

७) धातुगत शुष्कतेला शोष म्हणतात. या शोषतूनच अनेकदा क्लेद व कोथ यांची उत्पत्ती होऊन धातू विशीर्ण होतात. या अवस्थेलाच राजयक्ष्मा म्हणतात.

८) कित्येकदा धातूंच्या ठिकाणी शुष्कता येऊनही तीतून पुढे क्लेदकोथांची उत्पत्ती होत नाही. अशा धातुक्षयाला शोष म्हणतात. तो स्वतंत्र व्याधी नव्हे व साक्षात् व्याधिहेतूही नव्हे. क्लेदकोथांना तो कारण होतो.

९) धातुघटकांच्या उत्पादनकर्मात संभवणाऱ्या विकृतिस्वरूप हीन, अति व मिथ्या या योगांपैकी पहिले दोन विशेष उपद्रव देत नाहीत. मिथ्यायोग मात्र विनाशक असतो. कोथ त्यालाच म्हणतात.

१०) धातूंच्या ठिकाणी क्लेद दोन प्रकारे उद्भतो : आहारादिकांच्या अतियोगाने व पचनाच्या मिथ्यायोगाने. पहिला प्रकार प्रायः शोथकर तर दुसरा बहुधा कोथकर असतो.

११) शोथ आणि कोथ या दोघांत समस्त विकार अंतर्भूत होऊ शकतात. काहीत शोथ तर बाकीच्यात कोथ हे लक्षण समान असते. शोथ–कोथांची उत्पत्ती क्लेदापासून होत असल्याने सर्व रोगांना क्लेदोत्पन्नही मानता येईल.

१२) क्लेद म्हणजे रसरक्ताश्रयी आणि सापेक्षतया सत्त्वहीन पण आपल्या परीने देहधारणकर्मात सहायभूत होणारा देहव्यापी द्रव. क्लेदवाहन हे कर्म करणारा मूत्रसंज्ञक मल हाच.

१३) क्लेदाच्या अतिवृद्धीतून विविध मूत्रविकार संभवतात. प्रमेहविकार त्यांनाच म्हणतात. कोणत्याही स्थानी ते होऊ शकतात. प्रमेहातील अभिष्यंद मुख्यतः मांसगत असतो.

१४) क्लेदाच्या देहव्यापकतेमुळे दोष, दूष्ये व स्थाने यांना अनुसरून त्याचे व तदुत्पन्न विकारांचे प्रकार अनेक होतात.

१५) शोथ हे सर्व क्लेदजनित विकारांतील सामान्य लक्षण. शोथ म्हणजे अयथावत् संचय. अर्थात् शोथलक्षणात्मक सर्व विकार श्लेष्म्याच्या वैषम्यातूनच उद्भवतात.

१६) आहारादिकांतील सार व किट्ट पृथक् करणे हे पचनाचे स्वाभाविक स्वरूप. आणि रसादि धातूंचे विश्लेषण होऊ लागणे हे पचनातील वैषम्य.पित्तप्रकोपक आहारादिकांच्या अतिसेवनामुळे ते घडून येते. दाहातिरेकाने विश्लिष्ट झालेले धातुघटक विशीर्ण होऊन नाश पावतात.

१७) धातुविनाशक कोथावस्थेला व्यापक अर्थाने कुष्ठविकृती म्हणता येईल. कुष्ठत्व हे सर्व कोथात्मक विकारांचे एक स्वरूपच होय.

१८) कोथावस्था सर्व धातूंत आणि सर्व ठिकाणी संभवू शकते. दूष्ये स्थाने यांना अनुसरून कोथात्मक विकृतीचे प्रकार अनेक संभवतात.

१९) कोथ हे समस्त दाहोत्पन्न विकारांतील सामान्य लक्षण. आणि दाह हा पचनवैषम्यातून उद्भवतो. अर्थात् कोथलक्षणात्मक सर्व विकार पचनकर्तृक पित्ताच्या वैषम्यातून उत्पन्न होतात.

२०) समस्त विकारांची प्रमुख कारणे तीन : शोष, कोथ व क्लेद. सर्व विकारांचे मुख्य प्रकारही तीनच : क्षयात्मक, कोथात्मक व क्लेदात्मक. वायू, पित्त आणि कफ या त्रिदोषांच्या प्रकोपातूनच त्यांची उत्पत्ती होते.

अनुक्रमणिका

२१) गती, पचन व पोषण ही वातपित्तकफांची स्वभाविक कर्मे असून अनुक्रमे शूल, दाह व शोथ ही त्यांचीच अस्वाभाविक कर्मे होत. शरीरातील सर्व स्वाभाविक क्रियांचा समावेश जसा गत्यादि त्रयीत होऊ शकतो तसाच सर्व विक्रियांचा म्हणजे विकारांचा समावेशही शूलादि त्रयीत होऊ शकतो.

**दर्शन १९**

१) रोगांची उत्पत्ती होते तेव्हा कधी एक, कधी दोन तर कधी तीनही दोष एकदम प्रकुपित होतात. एकदोषोद्भव, द्विदोषोद्भव आणि त्रिदोषोद्भव असे रोगांचे प्रकार तदनुरोधाने संभवतात. यांपैकी दुसऱ्या व तिसऱ्या प्रकारांना अनुक्रमे संसर्ग आणि सान्निपात अशा संज्ञा आहेत.

२) परंतु, वातादींचे स्निग्धरुक्षदि गुण परस्पर विरुद्ध असल्याने त्यांची वा त्यांच्या लक्षणांची उपस्थिती एकाच ठिकाणी व एकाच वेळी संभवू शकत नाही. संसर्ग आणि सन्निपात या शब्दातून तसा अर्थ अभिप्रेतही नाही.

३) वातादींच्या चलनादि प्रमुख क्रियांत वैषम्य उद्भवले की रोगांची उत्पत्ती होते. हे वैषम्य कित्येकदा दोन तर कित्येकदा तीनही क्रियांत एकदम संभवते. आणि हेच संसर्ग आणि अभिप्रेत आहे.

४) वातपित्तकफांच्या स्वाभाविक कर्मांतील शूलादि विकृतीपासून जे विकार उद्भवतात ते अनुक्रमे शूलात्मक, दाहात्मक आणि शोथात्मक असतात. हे सर्व विकार एकदोषज होत. परंतु कित्येक विकारांत शूलादि विकृतींपैकी कधी दोघांची तर कधी तिघांचीही उत्पत्ती एकदमच होते. अशा विकारांनाच अनुक्रमे संसर्गज आणि सान्निपातज अथवा द्विदोषज आणि त्रिदोषज व्याधी म्हणतात.

५) चलनादि क्रियांच्या साम्यावस्थेत शारीर द्रव्यांची उत्पत्ती व अभिवृद्धी होते तर त्यांच्याच वैषम्यावस्थेत शारीर द्रव्ये ऱ्हास पाऊ लागतात. तीनही क्रियांच्या एककाल विकृतींतून तर शारीर द्रव्यांचा नाशच होतो. सान्निपातिक विकार म्हणूनच क्षयकारी असतात.

६) पोषणादि कर्मे दूषित करणाऱ्या द्रव्यांना अनुक्रमे कफप्रकोपण, पित्तप्रकोपण व वातप्रकोपण अशी नांवे आहेत. जे द्रव्य या तीनही कर्मांना एकदम दूषित करून शारीर घटकांचा नाश घडवून आणते त्याला सन्निपातप्रकोपण म्हणतात. असे विनाशक द्रव्य विषरूपच होय. सन्निपातोद्भव विकारांत एकदम प्रकुपित झालेले तीन दोषही त्यांच्या विनाशकतेमुळे शरीराला विषरूपच होतात.

७) सन्निपातिक विकार म्हणूनच असाध्य मानण्यात आले आहेत. द्विदोषोद्भव व्याधी मात्र कष्टाने बरे होतात. एकदोषज तर साध्यच होत.

**दर्शन २०**

१) विशिष्ट स्थानातील विशिष्ट विकृती म्हणजे रोग. त्याचे अनुमान ज्यावरून होऊ शकते ते त्या रोगाचे लक्षण.

२) विशिष्ट दोष हाच विशिष्ट विकृतीचा उत्पादक असल्याने कोणत्याही रोगात कोणत्या तरी पण एकाच दोषाचे प्राधान्य असते.

३) अन्य दोषांचा अनुबंध कोणत्याही उत्पादक दोषाला विरोधी अशी लक्षणे उत्पन्न करीत नाही. मुख्य दोषाच्या लक्षणांत केवळ न्यूनाधिक्य वा तरतमभावच तो उत्पन्न करतो. अन्य दोषांचा अनुबंध नसतो त्यावेळी उत्पादक दोषांची शोथादि लक्षणे त्या त्या पूर्ण प्रमाणात प्रकट होतात.

४) उत्पादक दोषांच्या लक्षणांत दूष्ये आणि स्थाने यांना अनुसरूनसुद्धा तरतमभाव संभवू शकतो. तथापि, दूष्यभेद आणि स्थानभेद देखील कोणत्याही रोगात उत्पादक दोषाला विरोधी अशी लक्षणे उत्पन्न करीत नाही.

५) आपापल्या कारणांनी विकृत झालेले दोष, ज्यांच्यात वैगुण्य उद्‌भवलेले आहे. अशा निरनिराळ्या स्थानांत निरनिराळे रोग उत्पन्न करतात. त्यांपैकी काही सार्वदेहिक, काही प्रादेशिक आणि काही उभयात्मक असतात.

६) परंतु, स्थाने आणि नावे भिन्न असताही या रोगांपैकी काहीत शूल, काहीत दाह आणि काहीत शोथ ही लक्षणे समान असतात. वातज, पित्तज आणि कफज या तीन प्रकारांत तदनुसार त्यांचा अंतर्भाव होऊ शकतो.

७) अन्य दोषांचा अनुबंध असतानाही वातादि दोषांची शूलादि लक्षणे तदुत्पन्न विकारांत सामान्यत्वाने विद्यमान असतात. तथापि, त्यांचे निरनिराळ्या रोगांतील तारतम्य सुद्धा सम्यक ज्ञात होणे अवश्य असते. उत्पादक दोषाबरोबर अन्यदोषानुबंधही व्याधिविज्ञानात म्हणूनच विचारात घ्यावयाचा.

**दर्शन २१**

१) प्रकुपित दोष हेच सर्व विकारांचे कारण असल्याने दोषप्रशमन हेच चिकित्सेचे सामान्य स्वरूप होय.

२) चिकित्सा करणे म्हणजे वैषम्य प्राप्त झालेल्या दोषांत साम्य उत्पन्न करणाऱ्या उपायांची योजना करणे.

३) शरीराच्या अस्वास्थ्याला दोषांचे वृद्धिक्षय हे दोनही कारणीभूत होत असले तरी रोगोत्पत्ती मात्र दोषांच्या वृद्धीतूनच होते. ही वृद्धीच दोषप्रकोपाला कारण होते.

४) विकृती सार्वदेहिक असो वा प्रादेशिक असो, तदुत्पादक दोषाचा उपशम करणे हेच तीवरील चिकित्सेचे सर्वसामान्य स्वरूप.

५) या चिकित्सेचे बृंहण आणि लंघन असे प्रमुख भेद दोन. पैकी बृंहण शरीराच्या अभिवृध्यर्थ योजण्यात येत असल्याने आणि विशिष्ट रोगाचा नाश करणे हे त्याचे उद्दिष्ट नसल्याने बृंहण ही वस्तुतः चिकिसाच नव्हे.

६) खरी चिकित्सा म्हणजे लंघन. रोगोत्पादक दोषाचे अथवा आमचे शरीराबाहेर निर्हरण करणे, हे चिकित्सालक्षण लंघनाला पूर्णपणे लागू पडते. शोधन आणि शमन असे त्याचे प्रमुख भेद दोन संभवतात.

७) वातादि दुष्ट दोषांचे शरीराबाहेर बलपूर्वक आणि एकदमच निर्हरण करणे म्हणजे शोधन. आणि तसे न करता कुपित दोषांचा उपशम करून त्यांचे साम्य पुनः प्रस्थापित करणे म्हणजे शमन. शोधनाचे वमनादि पांच आणि शमनाचे दीपनादि सात प्रकार सांगण्यात आले आहेत.

८) रोगोत्पादक द्रव्य शरीरातून पूर्णतया जेव्हा उत्सर्जित होते तेव्हाच रोगाचा उपशम होतो. हे उत्सर्जन शोधनोपायांनी तत्काळ घडून येते. तर शमनोपायांनी ते मलोत्सर्जानाच्या स्वाभाविक मार्गांनी आणि क्रमशः होत असते.

९) प्रकुपित दोष वा आमसंज्ञक रोगोत्पादक द्रव्य रसधातूबरोबर सर्व शरीरात प्रसृत होऊन ते नानाविध रोग उत्पन्न करते. आहार्य द्रव्यांच्या रूक्षादि गुणांना अनुसरून या आमाचेही वातप्रधान, पित्तप्रधान आणि कफप्रधान असे भेद संभवतात. त्यांचाच परिणाम म्हणून निरनिराळ्या रोगांत शूल, दाह आणि शोथ ही लक्षणे प्रादुर्भूत होतात.

१०) शारीर धातूंत अतिरिक्त प्रमाणात संचित झालेल्या आमद्रव्याचे निर्हरण मलोत्सर्जनाच्या स्वाभाविक क्रियेने होऊ शकत नाही. स्नेहल आणि स्वेदन या क्रियांनी ही आमद्रव्ये धातूंपासून वेगळी झाली म्हणजे कोठ्यात येतात आणि तेथून पुढे वमनादि शोधनोपायांनी ती यथाक्रम शरीरातून उत्सर्जित होतात.

११) आमद्रव्यांचे प्रमाण जेव्हा कमी असते तेव्हा दीपनादि शमनोपाय योजतात. त्यांच्या योगेच ही द्रव्ये धातूंपासून विभक्त होतात. ती प्रायः द्रवरूपच असल्याने मूत्र आणि स्वेद यांच्याशी मिश्र होऊन स्वाभाविक मार्गांनी पण थोड्या थोड्या प्रमाणात ती शरीराबाहेर निघून जातात.

१२) शोधन चिकित्सेचा उपयोग सर्वशरीराश्रयी दुष्ट दोष आणि तदुत्पन्न रोग यांवर होतो तर शमन चिकित्सेने विशिष्ट स्थानांत प्रकुपित झालेल्या दोषांचा आणि तदुद्‍भूत रोगांचा नाश होतो.

१३) शमन चिकित्सेचेही हेतुविरुद्ध आणि व्याधिविरुद्ध असे दोन प्रकार संभवतात. सर्वशरीरव्यापी पण स्वल्प प्रमाणातील दोषांचे निर्हरण करणे हे पहिल्याचे तर विशिष्ट स्थानी विशिष्ट द्रव्याच्या प्रभावाने कार्यान्वित होणे हे दुसऱ्याचे स्वरूप असते.

१४) वायू, पित्त आणि कफ यांच्या पासून उद्‍भवणाऱ्या विकारांवरील सर्वश्रेष्ठ उपाय म्हणजे बस्ती, विरेचन आणि वमन. पक्वाशय, लघ्वंत्र आणि आमाशय या वातपित्तकफांच्या प्रधान स्थानांत प्रवेश करून दूषित वातादींचे ते मुळातच उन्मूलन करतात.

१५) वाढलेल्या वातपित्तकफांचे प्रशमन करण्यासाठी जो द्रव्ये योजली जातात त्यांत अनुक्रमे तेल, तूप आणि मध ही सर्वश्रेष्ठ होत.

१६) रोगकारक आमाचे उत्सर्जन शोधनशमनात्मक उपयांनी होत असतेच. परंतु, शरीराच्या निरनिराळ्या स्थानांत राहणारे वातादि दोषही आपापल्या शक्त्यनुसार आमनिर्हरणाचे कार्य करीत असतात. ते त्यांचे एक स्वभावसिद्ध कर्म असून चिकित्सेचे नानाविध भेद हे केवळ त्यात सहायभूतच होत असतात.

१७) व्याध्युत्पादक द्रव्याचा प्रतिकार करण्याच्या वातादींच्या या प्रवृत्तीतूनच शूल, दाह आणि शोथ ही त्यांची अस्वाभाविक कर्मे प्रादुर्भूत होतात.

१८) शूल, दाह आणि शोथ ही तीनच सर्व विकारांची प्रधान कारणे होत. त्यांचा उपशम करणारी चिकित्साही वातशामक, पित्तशामक आणि कफशामक याप्रमाणे मुख्यतः तीनच प्रकारची असते. चिकित्सेतील दोषानुबंध म्हणूनच विचारात घ्यावयाचा.

अनुक्रमणिका

**दर्शन २२**

१) प्रकुपित दोष हे सर्व रोगांचे सामान्य कारण. रोगांतील भेदही दोषभेदांनुसारच संभवतात. दोषांचा हा सर्व रोगांतील अनुबंध चिकित्सा करताना म्हणूनच विचारात घ्यावा लागतो.

२) विशिष्ट स्थानातील वैगुण्य हाच प्रत्येक व्याधीचा प्रधान हेतू आणि ते नष्ट करणे हीच त्या विशिष्ट रोगाची चिकित्सा.

३) चिकित्सेचे प्रमुख प्रकार दोन : हेतुविपरीत आणि व्याधिविपरीत हेतूभूत प्रकुलिप दोषांचा नाश करणारी ती हेतुविपरीत, आणि विशिष्ट स्थानी उद्‌भवलेल्या विशिष्ट व्याधीचा नाश करणारी ती व्याधिविपरीत.

४) वातादींची उत्सर्जनादि सार्वदेहिक कार्ये निरनिराळ्या स्थानांत श्वसनादि निरनिराळी रूपे धारण करतात. या वातादींच्या शूलादि सार्वदेहिक विकृती देखील निरनिराळ्या स्थायी निरनिराळ्या व्याधींच्या रूपांनी आविर्भूत होतात.

५) शूलादि विकृति विशिष्ट व्याधीच्या रूपाने जोवर प्रकट होत नाही तोवर हेतुविपरीत चिकित्सा उपयुक्त होते. व्याध्युत्पत्ती झाल्यानंतर मात्र व्याधिविपरीत चिकित्साच अवश्य असते.

६) रोगोत्पादक स्थानवैगुण्यात उत्पादक दोषाबरोबर कित्येकदा अन्य दोषांचाही अनुबंध असतो. आणि व्याधिविपरीत चिकित्सा करताना तोही विचारात घ्यावा लागतो.

७) केवळ दोषनाशक औषध व्याधिविनाशक होत नाही. आणि दोषानुबंधाची उपेक्षा व्याधिचिकित्सेतही करता येत नाही.

